हे प्रेषित!
त्यांना सांगा,
जर तुम्ही अल्लाहवर
प्रेम करत असाल तर
माझं अनुसरण करा,
अल्लाह तुम्हांस जवळ करील.
(कुरआन, ३:३१)

हे शक्तिशाली अल्लाह!
माझा निर्माता, स्वामी आणि पोशिंदा,
माझ्या कृतींवर नजर ठेवणारा,
मी विनंती करतो, याचना करतो, तुझी मदत मागतो,
माझ्या या नम्रतापूर्वक प्रयत्नांचा स्वीकार कर.
या पुस्तकाच्या वाचकांना मार्गदर्शनाचा प्रकाश दे.
अंतिम निवाड्याच्या दिवशी
जेव्हा तुझ्या कृपा आणि दयेशिवाय
काहीएक कमी येणार नाही,
त्या दिवशी मला क्षमा कर.
माझी मदत कर.

आमीन!

# प्रेषित मुहम्मद

( त्यांना शांतता लाभो )

## मुहम्मद सर्वांसाठी

जीवनदर्शन आणि संदेश

सय्यद हामिद मोहसिन

अनुवाद

सय्यद इफ्तिखार अहमद

SALAAM Centre

सलाम सेंटर

शांतता आणि बंधुभावाचा पुरस्कार करते

www.muhammadforall.in www.salaamcentre.in

PRESHIT MUHAMMAD (Marathi)
FOLLOW ME, God Will Love You (English)

Copyright © 2015 SYED HAMID MOHSIN

ISBN: 978-81-928089-1-1

All rights reserved. No part of this book may be reproduced or transmitted in any form or by any means, electronic, mechanical, including photocopy, recording, or any information storage and retrieval system, without permission in writing from the author, except for the situation below which is permitted.

**For Reprinting:** Reprinting or reproducing this book on the condition that absolutely no change, addition, or omission is introduced is permitted free of charge. To make high quality reprints, you may contact the author / Salaam Centre to obtain free copies of the soft copy or printing files of this book.

The Web site of this Book:
This e-book is available on the web world wide at:
www.muhammadforall.in - www.salaamcentre.in

1st Edition : June 2015 - Quantity : 5000
No. of pages : 392
Price: Rs. 400/-

Printed at Thomson Press India Ltd.

Published by :

SALAAM CENTRE
# 65, Ist main, S.R.K. Garden, Jayanagar East, Bangalore - 560 041

Branch #5, Rich homes, Rochmond road, Bangalore - 560 025

Contact: +91 99011 29956 / +91 99451 77477 / 080 - 2663 9007
Email: salaamcentrebangalore@gmail.com

# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| | श्रेयनिर्देश | i |
| | प्रस्तावना | iv |
| १. | काबागृह, अल्लाहचं घर | १ |
| ✯ | जन्म | २ |
| ✯ | नैसर्गिक प्रशिक्षण | ४ |
| २. | प्रेषित्वाची लक्षणं | ९ |
| ✯ | तीक्ष्ण बुद्धिमत्ता | १७ |
| ✯ | पहिलं अवतरण | २२ |
| ३. | संदेश | २५ |
| ४. | छळ आणि अत्याचार | ३१ |
| ✯ | कुरैश लोक उपाय करू लागले | ३६ |
| ✯ | मीडियाची दडपशाही | ३९ |
| ✯ | ‘ज्याला इच्छितो त्यास अल्लाह मार्ग दाखवतो!’ | ४१ |
| ५. | क्रांती - मनांची आणि समाजाची | ४५ |
| ✯ | ‘इन्शाअल्लाह’ जर अल्लाहनं इच्छिलं तर | ४८ |
| ६. | ॲबिसिनियाकडे स्थलांतर | ५१ |
| ✯ | मरयमपुत्र येशू | ५५ |

| | | |
|---|---|---|
| ✯ | जोखिम आणि सत्यता | ५७ |
| ✯ | हमजा | ५८ |
| ✯ | उमर | ६० |
| ✯ | मनांची क्रांती | ६३ |
| ७. | प्रतिबंध | ६५ |
| ✯ | खदीजा, काळजी वाहणारी पत्नी | ६९ |
| ८. | हिजरत (स्थलांतर) | ७७ |
| ✯ | अबु बक्र | ७८ |
| ✯ | स्थलांतर, परीक्षा व विश्वासाचं | ८० |
| ९. | मदीना | ८३ |
| ✯ | मशीद | ८४ |
| ✯ | अस्सलामु अलैकुम | ८५ |
| ✯ | अजान, प्रार्थनेसाठी निमंत्रण | ९० |
| ✯ | जिहाद, प्रतिकार | ९४ |
| ✯ | महानतम जिहाद | १०१ |
| १०. | पहिलं युद्ध, बद्र | १०३ |
| ✯ | बौद्धिक सर्जनशीलता | १०५ |
| ✯ | मदीनेत आनंदोत्सव आणि दुखवटाही | ११३ |
| ✯ | हृदयापाशी | ११४ |
| ११. | सभ्यपणा, काळजी घेणं आणि मायाळू स्वभाव | ११७ |
| ✯ | फातिमा, 'एक कन्या' | १२२ |
| ✯ | आयशा, 'एक पत्नी' | १२५ |

१२. उहुद, ‘कधीही अंत नसतो’ १२९
✯ नम्रता १३७

१३. खंदक, द्रोह आणि युक्ती १४७
✯ कल्पकता आणि परकीय युद्धकौशल्य १४९
✯ प्रखर सेनापती १५१
✯ एक प्रभावी युक्ती १५७
✯ मुस्लिमांचं औदार्य १६०
✯ अभिव्यक्ती स्वातंत्र्य १६२
✯ मानवजातीची सेवा १६५
✯ कृतज्ञता १६९

१४. हुदैबिया, युद्धावर शांततेचा विजय १७१
✯ रमजान महिना आणि एक स्वप्न १७१
✯ मदीना, दोन शत्रुंच्या कचाट्यात १७९
✯ इस्लामचा लोंढा १८७
✯ महत्त्वाचा धडा १८९
✯ सीमांच्या पलीकडं समस्त सत्ताधीशांना १९०

१५. प्रेषित मुहम्मद (स.), मुस्लिमेतरांदरम्यान १९३
✯ नातं मक्केतील मुस्लिमेतरांशी १९३
✯ नातं मदीनेच्या मुस्लिमेतरांशी २०३
✯ उघड निंदनीय गुन्हा २०७
✯ सभ्यपणा आणि सहिष्णुता २०९
✯ परधर्मियांशी सहिष्णुता २१०
✯ धर्माची सक्ती नाही २११

| | |
|---|---|
| ✯ बहुधर्मवाद | २१३ |
| १६. खैबर | २१५ |
| ✯ विषप्रयोग आणि करार | २१७ |
| ✯ उदार मनाची चिन्हे | २२० |
| ✯ मनोरंजन आणि विश्रांती | २२३ |
| १७. उमराह, अल्पावधीची हजयात्रा | २२५ |
| ✯ आंतरिक तेज | २२६ |
| ✯ आपल्या जिवलगांसाठी रडणं | २२९ |
| ✯ अबु सुफियान | २३२ |
| १८. वैभवशाली विजय | २३५ |
| ✯ दयेचा दिवस | २३९ |
| ✯ इस्लामच्या नेतृत्वासाठी हृदयांचं परिवर्तन | २४५ |
| ✯ 'अल्लाह, मी निष्पाप आहे' | २४७ |
| १९. हुनैन | २४९ |
| ✯ भाकितं | २५४ |
| ✯ प्रेषित मुहम्मद (स.) यांचं एक वचन | २५८ |
| २०. प्रेषितांचं मक्केवरील प्रेम | २६१ |
| ✯ मानवाधिकारांबाबत प्रेषितांची कल्पना | २६८ |
| ✯ कुरआन आणि मानवसन्मान | २७१ |
| ✯ युवकांना उत्तेजन | २७५ |
| २१. प्रेषितांची युद्धसंकल्पना | २७९ |
| ✯ विसावं शतक - सर्वांत हिंसक शतक | २८३ |

२२. प्रेषित मुहम्मद (स.) यांचे अनेक विवाह २८९
✯ अनेकविध विवाहांची कारणं ३०४
२३. मदीना, एक आदर्श नगर ३११
✯ सर्वांना न्याय ३३१
✯ इस्लामी कायद्यासमोर सत्ताधारी व सामान्य माणूस समान... ३३४
✯ प्रेषितांच्या मुलाच्या निधनावर दुखवटा ३३६
२४. समारोपीय हजयात्रा ३३९
२५. स्वर्गामध्ये : सर्वोच्च एकात्मतेत ३४५
✯ निरोप ३४९
✯ प्रेम आणि शून्यता ३५१
२६. अल्लाहचे प्रेषित : उत्कृष्ट आदर्श ३५५
✯ प्रकाशाकडं नेणारा प्रकाश ३६०
✯ प्रेषित मुहम्मद (स.) यांच्याबाबत मान्यवरांचं मत ३६३
✯ संदर्भ ग्रंथ सूची ३६७

# श्रेयनिर्देश

अलहम्दुलिल्लाह! (अल्लाहचा गौरव असो!) शक्तिशाली अल्लाहनं मला त्याच्या अत्यंत जवळचे प्रेषित मुहम्मद (त्यांना शांतता लाभो) यांचं जीवनचरित्र संकलित करण्याचा मान दिला ही माझ्यासाठी अतिशय महत्त्वाची बाब आहे.

मी नम्रतापूर्वक विधान करू इच्छितो की माझा ग्रंथ 'माझं अनुसरण करा... अल्लाह तुम्हांस जवळ करील'च्या पहिल्या आणि द्वितीय आवृत्तीच्या ७०,००० प्रती इंग्रजी, हिंदी, कानडी, तेलुगु आणि तमिळ भाषेत जानेवारी २०१२ पासून प्रकाशित झाल्यानंतर त्या मुस्लिम आणि मुस्लिमेतर बंधु-भगिनींनी मिळवल्या आहेत. हे केवळ अल्लाहच्या कृपेमुळेच शक्य झालंय, ज्याच्यापाशी मी सदैव 'माझ्या या प्रयत्नांचा स्वीकार करून मला आखिरत (परलोकात) नजामध्ये (मुक्ती) देवो.' अशी प्रार्थना करत असतो. हा ग्रंथ लिहिण्यामागं माझा हाच एकमेव उद्देश होता आणि आहे.

मला आशा आहे आणि मी यासाठी प्रार्थना करतो की माझ्या या ग्रंथास मुस्लिम आणि मुस्लिमेतर बांधवांकडून पाठबळ लाभत राहील.

हा ग्रंथ मुस्लिम आणि मुस्लिमेतर दोन्ही धर्मांतील वाचक बांधवांसाठी योजण्यात आलंय.

खरं पाहता हा एक प्रयास आहे प्रेषितांच्या जीवनातले असे पैलू देशबांधवांसमोर आणण्याचा, ज्यामुळे जगातल्या समकालीन समाजांचा विकास आणि शांततेचं संरक्षण व्हावं. या ग्रंथाच्या वाचकांनी प्रेषितांच्या जीवनचरित्राचा इतिहास म्हणून अभ्यास करू नये तर ज्या व्यक्तीनं इतिहासाला कलाटणी दिली त्यापासून मार्गदर्शन प्राप्त करण्याच्या दृष्टीनं त्याचं अवलोकन करावं.

प्रेषित मुहम्मद यांचं एखादं पारंपरिक जीवनचरित्र लिहिणं हे यामागचं उद्दिष्ट नाही. प्रेषितांचं आणखी एक जीवनचरित्र संपादन करण्याच्या इच्छेसाठी हा ग्रंथ लिहिला गेलेला नाही किंवा प्रेषित मुहम्मद आणि त्यांच्या कार्याबाबत माझं आकलन आणि माझ्या भावनांना वाट करून देण्याचा हा एक प्रयास नाही. 'कुरआन सर्वांसाठी' या मोहिमेदरम्यान माझ्या मनात एक ठिणगी पडली आणि तिनं मला प्रेषितांचं जीवनचरित्र सामान्य माणसांसाठी साध्या शब्दांमध्ये प्रकाशात आणण्याचा उपक्रम हाती घेण्यास उद्युक्त केलं.

इ. सन २००८ मध्ये मी 'कुरआन सर्वांसाठी' या मोहिमेची संकल्पना योजली होती, ती प्रत्यक्षात आणण्याच्या विचाराने मी थोडा वेळ अस्वस्थ झालो होतो. माझी पत्नी आणि मुलगी (शबाना) यांनी मला ते साध्य करण्यासाठी प्रवृत्त केलं. आणि मग मी मागं वळून पाहिलं नाही. या दोघींनी मला प्रोत्साहन दिलं आणि पदोपदी माझ्याबरोबर राहिल्या, ज्यामुळे ही मोहीम यशस्वीपणे पार पडली. अल्लाह त्यांना अतोनात मोबदला देवो. 'कुरआन सर्वांसाठी' या योजनेमुळे मानवांच्या डोळ्यांवर पडलेला पडदा बाजुला सारला गेला, हे सांगण्याची गरज नाही.

देशबांधवांनी ईशसंदेश पोचवण्यापलीकडं दुसरा कोणताही उपक्रम इतका आनंददायी नसतो. कित्येक काळांपासून भारतात अप्रतिम सांप्रदायिक सद्भावना नांदत आलीय. भारतीय समाजासाठी ही लाख मोलाची गोष्ट आहे. मा. न्यायाधीश, वकील, पोलीस अधिकारी, बुद्धिजीवी, विचारवंत आणि विद्यार्थी अशा प्रतिष्ठित लोकांसाठी आयोजित कार्यक्रमांमध्ये पवित्र कुरआनच्या संदेशाचा प्रसार करताना याचा साक्षात्कार झाला होता. ज्या पद्धतीनं अशा कार्यक्रमांमध्ये वैयक्तिक मला व माझ्या प्रयत्नांना सन्मान मिळाला त्यावरून देशबांधवांमध्ये ईश्वर आणि पवित्र गोष्टींसाठी किती आदरभाव आहे याची प्रचिती येते. माझी उत्कट इच्छा आहे की निर्णयाच्या दिवशी अल्लाह अशाच प्रकारे मला सन्मानित करील आणि मला अनंतकालीन यश प्राप्त होईल.

माझ्या इंग्रजी भाषेतील मूळ ग्रंथाचा सुलभ मराठी अनुवाद सय्यद इफ्तिखार अहमद, उस्मानाबाद (महाराष्ट्र) (माजी संपादक, साप्ताहिक शोधन,

मुंबई) यांनी केलाय, यासाठी मी त्यांचा आभारी आहे.

तसेच शाहजहान मगदुम यांनी या ग्रंथाच्या अक्षरजुळणीचं काम केलं त्यासाठी मी त्यांचा आभारी आहे.

प्रेषित मुहम्मद यांच्या जीवनचरित्रावरील विविध ग्रंथांच्या लेखकांपासून मला हा ग्रंथ संपादित करताना मोलाची मदत लाभलीय, त्यासाठी मी उलेमा, बुद्धिजीवी आणि साहित्यिकांचं मनापासून आभार मानतो. या ग्रंथाच्या शेवटी सविस्तर संदर्भ ग्रंथ सूची देण्यात आलीय.

माझ्या परिवारातील सदस्य, माझे बंधु, भगिनी यांचाही मी आभारी आहे. हाती घेतलेला उपक्रम यशस्वीपणे पार पाडण्यासाठी माझय आईसाहेब सतत माझा उत्साह वाढवित होत्या. माझे वडील मयत सय्यद अब्दुस्सलाम हे इ. सन १९७० मध्ये शहीद झाले. त्यांच्यावर अल्लाहची सतत कृपा होत राहो, आमीन. त्यांच्या मृत्युपश्चात माझ्या आईनंच माझं संगोपन केलं, म्हणूनच मी आज या ठिकाणी आहे आणि हे महत्‌कार्य मी हाती घेतलं. इस्लामचा संदेश प्रत्येकास पोचवण्याच्या कार्यासाठी त्या अत्यंत उत्सुक आहेत. या क्षणभंगुर जीवनामध्ये त्यांची प्रसन्नता हीच माझी अमूल्य ठेव आहे. त्यांच्या याच उत्साहामुळे मी लिहीत असलेला प्रेषित मुहम्मद यांच्या जीवनचरित्रावरील हा ग्रंथ त्या ऐकून घेत होत्या. शेवटी मी शक्तिशाली अल्लाहचे आभार मानतो, ज्याची मला अफाट धन्यता लाभली. ज्यानं मला सामर्थ्य दिलं आणि आपल्या विनम्र सेवकास आंतरिक शक्ती प्रदान केली.

मी अल्लाहपाशी विनंती करतो की त्यानं माझ्या या प्रामाणिक प्रयत्नांचा स्वीकार करावा. मी विनंती करतो की त्यानं मला मार्ग दाखवावा, माझी मदत करावी, जेणेकरून मी माझं सर्वस्व त्याच्यासाठी अर्पण करावं. माझ्या अगणित चुकांना क्षमा करून माझ्यावर दया आणि कृपावर्षाव करावा, आमीन.

बेंगळूरु **सय्यद हामिद मोहसिन**

दि. January - 2014

# प्रस्तावना

प्रेषित्व हा पवित्र कुरआनचा एक महत्त्वाचा विषय आहे. प्रेषित्वाद्वारे ईश्वर मानवजातीला चुका आणि अपराधांपासून दूर करून न्याय्य आणि भलं मार्गदर्शन करतो. प्रेषित मानवजातीच्या विकासासाठी उच्च दर्जाची खूशखबर देत असतात. तसेच हा इशाराही देतात की आम्ही वैयक्तिक आणि सामूहिकपणे अज्ञानाच्या आणि दुष्टतेच्या खाईत लोटले जाणार आहोत. प्रेषितांच कार्य म्हणजे मानवजातीला ऐहिक आणि नैतिक विकासाचा मार्ग दाखवणं, उदात्त आणि उच्च दर्जाच्या भावना उत्पन्न करणं स्त्री-पुरुषांमध्ये अशा संवेदना निर्माण करणं ज्या त्यांची ईश्वराशी जवळीक निर्माण करतील. अशा प्रकारे प्रेषित्व एक पद्धतच नाही ज्याद्वारे ईश्वर मानवजातीला आपला संदेश पोचवतो, तर त्याची कृपा आणि दयेचाही तो एक संकेत आहे.

पवित्र कुरआन प्रेषित्वास अभूतपूर्व व सर्वव्यापी अशी घटना म्हणून प्रस्तुत करते. आम्ही प्रत्येक जनसमूहाकडं प्रेषित पाठवलेत. (कुरआन, १६:३६) सर्व प्रेषित समान आहेत. आम्ही त्यांच्यामध्ये भेदाभेद करत नाही. (कुरआन, ३:३४) तर आम्ही काही प्रेषितांना इतरांपेक्षा अधिक श्रेष्ठत्व प्रदान केलं. (कुरआन, २:२५३) मुस्लिमांनी प्रत्येकाच्या (धर्मग्रंथाच्या) अवतरणावर श्रद्धा ठेवायचीय. प्रेषित ईशसंदेशाचे केवळ वाहकच नसून त्यांनी आपल्या जीवनात त्या संदेशास प्रत्यक्षात आणायचं असते. म्हणूनच ते मानवजातीतले असतात. (कुरआन, १४:११) ते आपल्या समूहांपैकीच असतात. तुम्हाला काही त्रास होणं त्यांना जड जातं. (कुरआन, ९:१२८) त्यांच्या पवित्र आचार आणि विशेष व्यक्तिमत्त्वामुळे त्यांची निवड केली जाते. त्यांना ज्ञान आणि बुद्धिमत्ता लाभल्यानं ते आपल्या समुदायास त्याच्या आयती वाचून दाखवतात. (कुरआन, ३:१६४) ते मार्गदर्शन करतात. ईश्वराकडून आलेलं अवतरण कसलीही भीती न बाळगता संयमानं आणि दृढ निश्चयानं लोकांपर्यंत पोचवतात.

प्रेषित्वाच्या पवित्र इतिहासामध्ये इस्लामचा एकेश्वरी धर्माचा सिद्धान्त सातत्यानं चालत आलाय.

सुरुवातीपासून एकमेव ईश्वर, अल्लाहनं मानवजातीकडं प्रेषितांना आपला संदेश देऊन पाठवलंय त्यांना अल्लाहच्या अस्तित्वाचं स्मरण करून देण्यासाठी, त्याचे आदेश आणि त्याचा जिव्हाळा दाखवून देण्यासाठी.

आदम (त्यांना शांतता लाभो) हे सर्वप्रथम प्रेषित होते आणि मुहम्मद (त्यांना शांतता लाभो) अंतिम प्रेषित आहेत. कुरआनमध्ये आणखीन २४ प्रेषितांचा उल्लेख आलाय. यातले बहुतेक बायबलमधील पर्यायी नावं आहेत.

| | अरबी नाव | इंग्रजी नाव | कुरआनातला संदर्भ |
|---|---|---|---|
| • | इद्रीस | (Enoch) | अध्याय १९, आयती ५६-५७, २१:८५-८६ |
| • | नूह | (Noah) | (६:८४) |
| • | हूद | | (११:५०-६०) |
| • | सालेह | | (११:६०-६६) |
| • | इब्राहीम | (Abraham) | (६:८३,११:६९-७६) |
| • | इस्माईल | (Ishmael) | (६:८४,१९:५४-५५) |
| • | इसहाक | (Isaac) | (११:७०-७४) |
| • | लूत | (Lot) | (७:८०-८४) |
| • | याकूब | (Jacob) | (११:७१) |
| • | यूसुफ | (Joseph) | (६:८४,अध्याय-१२, ७:८५,११:८४) |
| • | शुऐब | | (७:८५,११:८४) |
| • | अय्यूब | (Job) | (६:८४) |
| • | मूसा | (Moses) | (६:८४,२०:९-९९) |

| | | |
|---|---|---|
| • हारून | (Aaron) | (६:८४,२०:९-९९) |
| • जुल-किफ्ल | (Ezekeil) | (२१:८५-८६,३८:४८) |
| • दाऊद | (David) | (६:८४) |
| • सुलैमान | (Solomon) | (६:८४) |
| • इलियास | (Elias) | (६:८५) |
| • अल-यसअ | (Elisha) | (६:८६) |
| • यूनुस | (Jonah) | (६:८६) |
| • जकरिया | (Zachariah) | (६:८५) |
| • यहया | (John) | (६:८५) |
| • इसा | (Jesus) | (३:४५-४८,४३:५७-५९, १९:८८-९८,५:११६-११७, ५:७२-७५,४३:६३-६५) |

हे सर्व प्रेषित एक समूह आहेत. त्या सर्वांनी ईश्वराचा- एकच एक ईश्वराचा संदेश दिला आणि न्याय व समतेचं महत्त्व सांगितलं. (कुरआन, ४२:१३)

एकमेव शक्तिशाली ईश्वर, आरंभापासून अंतापर्यंत सदैव आमच्या सहवासात आहे, हाच एकेश्वराचा अर्थ होय. मानवजातीचं आणि प्रत्येक मनुष्याबाबत कुरआनातलं विधीलिखित हेच आहे.

> ''आम्ही अल्लाहसाठीच आहोत आणि त्याच्याकडंच आम्ही परतणार आहोत.'' (कुरआन, २:१५६)

प्रेषित मुहम्मद यांची अंतिम प्रेषित म्हणून निवड करून आणि पवित्र कुरआनच्या माध्यमानं आपल्या अवतरणांची सांगता करून ईश्वरानं स्वत: आणि मनुष्याशी संवाद साधण्यासाठी कायमचा दुवा स्थापन केलाय. तसेच मार्गदर्शनासाठी सदैव प्रकाशणारा दिवा उभारलाय.

अवतरण म्हणजे काय? या प्रश्नाचं उत्तर कुरआनमध्ये अध्याय

४२:५१-५२ मध्ये दिलंय. ‘‘अल्लाह त्याच्याशी संभाषण करेल ही माणसाची ऐपत नाही. (तर) दिव्य अनुभूतीद्वारे अथवा पडद्याआडून किंवा एखादा दूत पाठवून त्याच्या (अल्लाहच्या) अनुमतीनं व प्रेरणेद्वारे जशी त्याची इच्छा असेल (त्याप्रमाणे तो संवाद साधतो). अशाच रीतीनं आमच्या आज्ञेनुसार आम्ही तुम्हांस दिव्य अनुभूती (पवित्र कुरआन) पाठवली. ग्रंथ काय आणि श्रद्धा काय? हे तुम्हांस माहीत नव्हतं. आम्ही त्यास (कुरआनास) प्रकाश बनवला आणि आपल्या भक्तांपैकी ज्यास इच्छितो त्यांना त्याद्वारे मार्ग दाखवतो. आणि तुम्ही (मुहम्मद) त्यांना रास्त मार्ग दाखवता. आम्हांस जे काही सांगण्यात येते ते म्हणजे अल्लाह आपल्या प्रेषितांशी रास्त बोलत नसतो तर अल्लाहच्या दूतांकडून (फरिश्ते) त्याची अवतरणं (अनुभूती) येत असतात. म्हणजेच जिब्राईल (अ.) हे अल्लाहचे विशेष दूत आहेत, जे अल्लाहच्या अनुभूती आणि त्याचा संदेश आणत असतात.

प्रेषित मुहम्मद यांनी शेवटचा धर्मग्रंथ पवित्र कुरआन मानवजातीस समर्पित केला, ज्यामध्ये अल्लाहच्या प्रेषितांच्या अलौकिक दर्जाचा उल्लेख आहे. संदेश पोहोचविणारा, मार्गदर्शक आणि आदर्श व्यक्तित्व. त्यांनी आपल्या विधाता अल्लाहकडून प्रेरणा घेऊन त्या अवतरणांच्या प्रकाशात या जगात बदल घडवून आणला. अल्लाहनंच त्यांची निवड केली होती म्हणून लोकांनी त्यांचा स्वीकार केला. ते मानवजातीसाठी एक आदर्श मार्गदर्शक होते. पूर्वकालीन मुस्लिमांमध्ये त्यांना जसं वैशिष्ट्य आणि मरातब लाभलं होतं तसेच ते सद्यकालीन मुस्लिमांमध्येही लाभलंय.

प्रेषित मुहम्मद यांना मुस्लिम अल्लाह आणि लोकांमधील मध्यस्थ मानत नाहीत. प्रत्येक व्यक्तीनं अल्लाहशी रास्त संभाषण करायचंय. प्रेषितांनी मुस्लिम समूहाच्या वतीनं अल्लाहकडं प्रार्थना केली असली तरी प्रत्येक व्यक्तीनं रास्त त्याच्याकडं आपलं म्हणणं मांडावं असा त्यांचा आग्रह होता. त्यांनी मानवजातीला अल्लाहच्या अस्तित्वाचं स्मरण करून दिलं. अध्यात्माद्वारे त्याच्याशी जवळीक साधावी. एकमेव अल्लाहची आराधना करावी, ज्यास कुणी जन्म दिला नाही की त्यानं कुणाला जन्म दिला.

प्रेषितांच्या आयुष्यात ज्या लोकांना प्रेषितांची साक्ष पाहायची होती

किंवा चमत्कार घडवून आणण्याची जी मागणी लोक त्यांना करत होते, एका अवतरणाद्वारे अल्लाहनं त्या लोकांना उत्तर देण्यास सांगितलं-

> ''(त्यांना सांगा) मीही तुमच्यासारखा माणूसच, पण माझ्याकडं दिव्य प्रकटन पाठवलं जातं.''
>
> (कुरआन, १८:११०)
>
> ''तुमच्यामधील प्रत्येकासाठी ज्यांना अल्लाह आणि परलोकाबाबत आकांक्षा आहेत. आणि जे अल्लाहच्या स्मरणात मग्न असतात त्यांच्यासाठी अल्लाहच्या प्रेषितामध्ये उत्कृष्ट आदर्श आहे.'' (कुरआन, ३३:२१)

पवित्र कुरआनचं हे अवतरण सर्वकालीन मुस्लिमांना मुहम्मद त्यांच्या अद्वितीय दर्जाची माहिती देतात, ज्यांची अल्लाहनं प्रेषित म्हणून निवड केली.

मुहम्मद यांच्या आयुष्याचे विविध पैलू आणि त्यांच्या शिकवणींचे संपादन करण्याचा एक विनम्र प्रयास म्हणजे 'माझं अनुसरण करा, अल्लाह तुम्हांस जवळ करील' हा ग्रंथ होय. ज्याद्वारे त्यांनी अरबांच्या जीवनामध्ये कोणते बदल घडवून आणले आणि अरब द्वीपकल्पात शांतता आणि समृद्धी प्रस्थापित केली याची वाचकांना माहिती मिळेल.

प्रेषित मुहम्मद यांच्या जीवनाचं वर्णन करताना आम्ही त्यावेळची परिस्थिती, त्यांची भूमिका आणि त्यांच्या वचनांवर विशेष लक्ष्य दिलंय. ज्याद्वारे आमच्यावर कोणते संस्कार होतील आणि आम्हांस आजच्या काळात कसं मार्गदर्शन लाभेल हे स्पष्ट करण्याचा प्रयत्न केलाय.

प्रेषित मुहम्मद यांच्या पत्नी आयशा (अल्लाह त्यांच्यावर राजी होवो) यांना एकदा प्रेषितांच्या व्यक्तिमत्त्वाविषयी प्रश्न विचारला गेला तेव्हा त्यांनी उत्तर दिलं, ''प्रेषितांचं आचरण (व्यवहारातील नीतीमत्ता) कुरआन होते.''

आणि म्हणूनच सुरवातीची संकल्पना प्रेषितांच्या आयुष्यात पाहून त्यांची अनंतकालीन आध्यात्मिक शिकवण लोकांसमोर मांडावी. मुहम्मद याच्या आयुष्यातील घटनांद्वारेदेखील दुसऱ्या प्रकारचा बोध घडू शकतो. इ. सनाच्या सातव्या शतकातील विशिष्ट अशा सामाजिक, राजकीय आणि

सांस्कृतिक वातावरणात अल्लाहच्या प्रेषितांनी इस्लामच्या नीतीमत्तेनुसार श्रद्धा आणि मानवी समाज, त्यांच्यातील घटनांच्या अनुषंगानं प्रेषितांनी कृती केली, प्रतिक्रिया दिली आणि स्वत:स अभिव्यक्त केलं. त्याचं आचरण आणि त्यांच्या वचनांचं विशिष्ट ऐतिहासिक व भौगोलिक परिस्थितींमध्ये अध्ययन केलं असता त्यांचा मानवांबाबत बंधुभाव, स्नेह, अडीअडचणी, सामाजिक जीवन, न्याय, कायदे आणि युद्धाबाबत बऱ्याच सिद्धतांवर प्रकाश पडतो. आणि म्हणूनच आम्ही सद्यकालीन शिकवणींचं आमच्या बाबतीत काय मत आहे या दृष्टिकोनातून आम्ही प्रेषितांच्या जीवनाचा आढावा घेतलाय.

वाचकांनी, मुस्लिम असोत की मुस्लिमेतर प्रेषितांचं आयुष्य निरखून पाहावं आणि त्यामागील तथ्यांचा स्वीकार करून त्यांचं पालन करावं. ज्या घटनांची निवड केली त्याचा उद्देश एवढाच होता की त्यांच्या त्यामागच्या शिकवणींचा आमच्या आयुष्याशी आणि सद्यकाळाशी संबंध आहे. लहान लहान अध्यायांमध्ये विभागलेल्या या ग्रंथातल्या भागांमध्ये प्रेषितांचं जीवन, पवित्र कुरआन आणि त्यांच्या शिकवणींच्या तात्त्विक, सामाजिक, राजकीय, न्यायविषयक, संस्कृती आणि निसर्ग यांचा एकमेकांशी तत्कालीन व सद्यकालीन संबंध वाचकांच्या लक्षात येईल.

आमचा उद्देश म्हणजे स्वत: प्रेषितांविषयी ज्ञान संपादन करणे होय. त्यांची कृपा, त्यांचं आकर्षण आणि स्नेह अनुभवण्याचं उद्दिष्ट. कुणाची श्रद्धा असेल, कुणाची नसेल, पण ज्या इस्लामी कार्यात त्यांनी आपलं स्र्वस्व समर्पित केलं होतं त्यांचा आत्मा जाणून घेण्यासाठी त्यांचा शोध घेणं नक्कीच अशक्य नाही. या ग्रंथामागच्या प्राथमिक आकांक्षा याच आहेत. आजच्या काळात लोकांना ज्या आव्हानांना सामोरं जावं लागतंय त्यांच्यासमोर प्रेषितांच्या आदर्शाचं दर्पण ठेवणं, ज्यास पाहून ते आपल्या मनांचा आपल्या बुद्धिमत्तेचा शोध घेऊ शकतील.

मुहम्मद यांच्या शिकवणींचं लोक अध्ययन करतात, ते मार्गदर्शक आहेत, लोक त्यांच्या मार्गाचा अवलंब करतात. एक आदर्श ज्याचं अनुसरण केलं जातं आणि त्यांची कृती, त्यांची वचनं यावर लोकांना चिंतन करण्यास आमंत्रित केलं जातं.

या ग्रंथाचं प्रयोजन मुस्लिम आणि मुस्लिमेतरांसाठी केलं गेलंय. यातील घटनाक्रम आणि त्यावरील निष्कर्ष त्यांचं पालन करण्यासाठी सोपं असून तो इस्लामच्या सार्वत्रिक व आध्यात्मिक शिकवणींची माहिती करून देण्याचा प्रयत्न आहे. हे अनंतकालीन सिद्धान्त जगातल्या १.७ बिलियन मुस्लिमांचा वारसा आहेत. आणि म्हणूनच हा ग्रंथ इस्लामचा जीवनपरिचय करून देतो.

प्रेषित मुहम्मद यांचे अनुयायी त्यांच्यावर प्रेम करत होते आणि त्यांच्यादरम्यान त्यांची उपस्थिती त्यांना ऊर्जा मिळवून देत असे.

प्रेषितांनी आपल्या अनुयायींना आणि मुस्लिमांना अल्लाह व कुरआनशी जवळीक साधण्याची शिकवण दिली.

> ''(हे मुहम्मद) त्यांना सांगा, जर तुम्ही अल्लाहशी प्रेम करत असाल तर माझं अनुसरण करा, अल्लाह तुम्चयावर प्रेम करील.'' (कुरआन, ३:३१)

मुहम्मद यांच्या प्रत्येक कृतीचं अनुसरण करण्याचा मुस्लिम अतोनात प्रयत्न करत असतात. ते प्रेषितांच्या प्रेमाखातर आणि हे प्रत्यक्षात अल्लाहशी प्रेम करण्यात व्यक्त होतं.

त्यांच्या हृदयांमध्ये हे प्रेम सतत जागृत असते आणि आपल्या दैनंदिन जगण्यात त्यांची अभिव्यक्ती होत राहते. मनुष्य याच उद्देशानं आपल्या अंत:करणातून त्याची प्रार्थना करत राहतो.

> ''अल्लाह आणि त्याचे दूत प्रेषितांसाठी शुभचिंतन व्यक्त करतात तेव्हा श्रद्ध लोकहो, तुम्हीसुद्धा त्यांच्यासाठी शुभचिंतन व्यक्त करा आणि सलाम पाठवा.''
> (कुरआन, ३३:५६)

हा ग्रंथ ज्ञानाची व प्रेमाची जाणीव करून देण्याचा प्रयत्न आहे. मुहम्मद यांचं जीवन आम्हांस आध्यात्मिकतेचं आमंत्रण देते आणि आम्हांवर असे संस्कार घडवते ज्याद्वारे जगातल्या सध्याच्या घडामोडी, त्यातून उदयास येणाऱ्या प्रश्नांची उत्तरे हृदयापासून द्यावयाची आहेत, फक्त बुद्धिमत्तेनं नव्हे.

ज्यास प्रेमाची जाणीव नसते त्याकडे सामंजस्य नसते.


सखोल अध्ययन व संशोधनाद्वारे मी वास्तविकता प्रस्तुत केलीय. माझ्या निर्मात्या अल्लाहस मी विनंती करतो की त्यानं माझ्या प्रामाणिक प्रयत्नांचा स्वीकार करावा, माझं सर्वस्व मी त्यासाठी वाहून द्यावं यासाठी त्यानं माझी मदत करावी, माझ्या अगणित चुकांना त्यानं क्षमा करावी, माझ्यावर दया करावी आणि कृपेचा वर्षाव करावा. आमीन.

> ''माझं भलं अल्लाहमुळेच आहे. त्यावरच माझी भिस्त.
> त्याच्याकडंच मी वळतो.'' (कुरआन, ११:८८)

बेंगळूरु **सय्यद हामिद मोहसिन**

दि. January 2012

## प्रेषित मुहम्मद (इ.सन ५७० - ६३२) यांच्या काळातील अरब द्वीपकल्पाचा नकाशा



This document was created with the Win2PDF “Print to PDF” printer available at

https://www.win2pdf.com

This version of Win2PDF 10 is for evaluation and non-commercial use only.
Visit https://www.win2pdf.com/trial/ for a 30 day trial license.

This page will not be added after purchasing Win2PDF.

https://www.win2pdf.com/purchase/

# १

# काबागृह

## अल्लाहचं घर

इस्लामी परंपरेनुसार, ईश्वराचं घर (काबागृह) प्रेषित इब्राहीम आणि त्यांचे पुत्र इस्माईल यांनी एकेश्वराची भक्ती करण्यासाठी निर्माण केलं होतं. एकमेव ईश्वर आकाश आणि पृथ्वीचा निर्माता, ज्यानं मानवसमूह आणि सर्व प्रेषितांना निर्माण केलं. शेकडो वर्षं उलटल्यानंतर मक्का तीर्थयात्रा आणि व्यापाराचं प्रमुख केंद्र झालं, ज्यामुळं सभ्यता आणि धर्म हे एकरूप झाले. कालांतरानं एकमेव ईश्वराच्या उपासनेऐवजी वेगवेगळ्या टोळ्या आणि स्थानिक मूर्तीपूजा तसेच बहुदेववादाची प्रथा रुजली. इस्लामी परंपरेच्या अहवालानुसार, कुरआनचं अवतरण सुरू झालं त्या वेळी काबागृहात ३६० मूर्ती, छायाचित्रं, पुतळे वगैरे होते; ज्यांची तिथं पूजा होत असे.

काही मोजक्या लोकांचे समूह मात्र मूर्तीपूजेस नाकारून एकमेव ईश्वराची उपासना करीत होते. त्यांना 'हुनफा' (म्हणजे एकाग्र) म्हणत असत आणि त्यांचा संबंध इब्राहीम यांच्या एकेश्वरी परंपरेशी होता. पवित्र कुरआन प्रेषित इब्राहीम आणि त्यांच्या उपासनापद्धतीस हनीफ (एकाग्र) म्हणतो,

> ''आणि धर्म पाळण्यात कोण बरं उत्तम, जो संपूर्णपणे
> अल्लाहस समर्पित झाला त्यापेक्षा? आणि तो नेकदेखील

आहे आणि एकाग्र इब्राहीम यांच्या धर्माचं पालन करतो,
अल्लाहनं इब्राहीम यांना मित्र म्हणून निवडलं होतं.''
(क़ुरआन-४:१२५)

## जन्म

प्रेषित मुहम्मद यांचा जन्म मक्का येथील एका उच्चकुलीन कुटुंबामध्ये सोमवार दि. २० एप्रिल इ. स. ५७० ला झाला. मक्का येथील सर्व कबिले-जमाती त्यांचा आदर करीत असत. त्यांचा जन्म जरी उच्चभ्रू कुटुंबात झाला असला तरी त्यांना काही वैयक्तिक असहाय्य घटनांना सामोरं जावं लागलं. त्यांच्या आई दोनच महिन्यांच्या गरोदर असताना त्यांच्या वडिलांचं मक्केच्या उत्तरेकडील यसरिबच्या प्रवासादरम्यान निधन झालं. त्यांचा जन्म झाला तेव्हा त्यांचे पिता हयात नव्हते, म्हणून आता एकीकडं एका सन्माननीय कुटुंबामध्ये ते जन्मले तर दुसरीकडं वडील हयात नसल्यामुळं त्यांना स्थैर्य लाभलं नाही.

मुहम्मद ('मुहम्मद' शब्दाचा अर्थ : १. स्तुतीय, २. प्रशंसेस पात्र) हे नाव त्या वेळी अरब द्वीपकल्पात परिचयाचं नव्हतं. त्यांच्या आई गरोदर असताना त्यांना एका काल्पनिक दृष्याद्वारे कळविलं गेलं होतं आणि याच काल्पनिक दृष्यानं त्यांना जगाच्या नेत्याच्या जन्माची कल्पना दिली. त्यांचा जन्म झाल्यानंतर त्यांना (प्रेषितांच्या आईंना) त्याच काल्पनिक शक्तीद्वारे असं कळवलं गेलं की ''मी यांना एकमेव ईश्वराच्या संरक्षणात अधिन करते'' या शब्दांचा उच्चार करावा. आपल्या पतीच्या निधनाचं दु:ख झेलत असताना आपल्या मुलाच्या जन्माचा आनंद साजरा करताना आमिना (त्यांच्यावर अल्लाहची कृपा असो) यांना कठीण परिस्थितीशी तोंड द्यावं लागलं. त्यांना काही विलक्षण संकेतांच्या अनुभवातून जावं लागलं, मग गरोदर काळात अतिशय सहज सोप्या रितीनं आपल्या बाळाचा जन्म व्हावा, असं त्या वारंवार म्हणत.

# वाळवंट

अरब वाळवंटात बनु सऊद खेडूत अरब टोळीतील दाई हलीमा यांनी सुरुवातीची चार वर्षं मुहम्मद यांचं पालनपोषण केलं. (मक्का येथे आपल्या मुलांचं पालनपोषण खेडूत अरबांकडून करावं अशी परंपरा होती.) इथं दूरवर पसरलेल्या नापीक जमिनी आणि कष्टमय परिस्थितीत मुहम्मद यांनी ही चार वर्षं काढली. अशा परिसरात माणसाचं जगणं किती कठीण आहे आणि तो निसर्गापुढं किती दुबळा आहे याची जाणीव होत असे. मात्र त्यांना अजून हे कळत नव्हतं. मुहम्मद अल्लाहनं योजलेल्या परीक्षेस सामोरं जात होते, ज्यानं त्यांची प्रेषित म्हणून निवड केलेली होती, जो त्यांचा विधाता आणि त्यांच्यावर संस्कार घडवणारा होता.

पवित्र कुरआनात त्यांच्या या परिस्थितीचं नंतरच्या काळात त्यांना स्मरण करून दिलंय. जे वाळवंटातील जगण्याच्या प्रयोगावर आधारित आहे.

> ''त्याला तुम्ही अनाथ आढळला, मग आश्रय दिला नाही?
> तुम्हाला मार्ग शोधताना पाहिलं आणि त्यानं तो दाखवला
> तुम्ही त्याला परावलंबी आढळला नि त्यानं तुम्हाला
> स्वावलंबी केलं. म्हणून अनाथांशी दुर्व्यवहार नका करू.
> हात पसरणाऱ्यांना नका परतवून लावू. आपल्या विधात्यानं
> दिलेली देणगी जाहीर करा.''
>
> (कुरआन-९३:६-११)

कुरआनातील या आयतींचा (श्लोकांचा) बराच अर्थबोध आहे. भविष्यातील अल्लाहचे पैगंबर असलेले, अतिशय गरीब त्याचबरोबर पोरकं असणं ही सुरवातीची स्थिती होती. याची दोन कारणं. पहिलं म्हणजे त्यांना बालपणीच ही शिकवण द्यावी की त्यांना किती अपमानजनक आणि बिकट परिस्थितीला तोंड द्यावं लागतंय. वयाच्या सहाव्या वर्षी त्यांच्या मातेचं निधन झाल्यानं या स्थितीत आणखीनच भर पडली. परिणामी ते फक्त अल्लाहच्या आश्रित होते. त्यांनी आयुष्यभर विशेषत: आपल्या प्रेषितकाळात हे कधीही

विसरू नये असं कुरआन त्यांना आठवण करून देतो. ते स्वत: पोरके आणि गरीब होते. हे त्यांच्या स्मरणात आणून असे आदेश दिले जातात की प्रेषितांचं व्यक्तित्व सर्वांनाच आदर्शवत असल्यानं त्यांनीही गरजवंत, वंचितांकडं दुर्लक्ष करू नये. या आयतीचा दुसरा अर्थ असा की माणसानं आपल्या अतीत, आपल्या अनुभवातील परीक्षा आपल्या अवतीभवतीचं वातावरण, सुरवातीचा काळ इ. कधीही विसरता कामा नये आणि यापासून मिळालेल्या अनुभवांना सकारात्मक रूप द्यावं. एकमेव ईश्वर - अल्लाह त्यांना आठवण करून देतो की त्यांचं गतकाळातील जीवन त्यांच्यासाठी एका शाळेसारखं आहे. यापासून त्यांनी शिकावं, त्याचा उपयोग त्यांनी अशा लोकांसाठी करावा जे तशाच परिस्थितींना तोंड देत आहेत. त्यांच्या भावना आणि यातनांची जाणीव त्यांनाच होऊ शकते, कारण त्यांनी स्वत: अशाच परिस्थिती अनुभवल्यात.

# नैसर्गिक प्रशिक्षण

ही सृष्टी आणि त्यातील निर्मितीद्वारे वाळवंटात माणसाची जडणघडण होत असते. तरुण वयात जेव्हा मुहम्मद वाळवंटात आले, खेडूत अरबांच्या परंपरा आणि पट्टीचे वक्ते म्हणून त्यांचा नावलौकिक, या गुणांचा त्यांना बोली भाषेवर प्रभुत्व मिळवण्यास मोलाची मदत लाभली. आपल्या प्रेषितकाळात शब्दांवर त्यांची पकड, त्यांची अस्खलित भाषा यामुळं ते इस्लामची सर्वव्यापी शिकवण कौशल्यानं व्यक्त करण्यास समर्थ होते.

मुहम्मद यांनी आपल्या जीवनातील सुरवातीच्या काळात निसर्गाशी विशिष्ट प्रकारचं नातं जोडलेलं होतं आणि ते त्यांच्या संपूर्ण कार्यकाळात टिकून राहिलं. या सृष्टीत भरगच्च संकेतं आहेत जी एका निर्मिकाच्या अस्तित्वाची आठवण करून देतात आणि वाळवंट इतर गोष्टींबरोबरच माणसाच्या बुद्धिमत्तेला एकाग्र होऊन निरीक्षण करण्यास आणि त्यांचा अर्थ लावण्यास उद्युक्त करते. अशा प्रकारे कुरआनच्या कित्येक आयतीं निर्मिती आणि त्यांच्या शिकवणी नजरेस आणून देतात. निर्जीव वाळवंट वारंवार पुनरुज्जीवनाची साक्ष देऊन ते सिद्ध करते.

> ''आकाश आणि पृथ्वीच्या निर्मितीत, रात्रंदिवसाच्या फेरबदल आणि मानवांना ज्यांचा लाभ होतो त्या सागरांवर तरंगणाऱ्या जहाजात आणि आकाशातून अल्लाह लोकांच्या हितार्थ जी पर्जन्यवृष्टी करतो, ज्या (पाण्या) मुळे मृत अवस्थेतील पृथ्वीला परत सजीव करतो आणि त्यात सर्व प्रकारचे प्राणी विखरून दिले, वाऱ्यांत घडणारे बदल आणि ढगांत जे आकाश व पृथ्वीदरम्यान अधीन केलेत, हे सर्व निश्चितच ज्ञानी लोकांसाठी संकेत आहेत.''
>
> (कुरआन-२:१६४)

मुहम्मद यांच्या जीवनातील सुरवातीच्या काळानंच त्यांच्या दृष्टिकोनाला आकार दिला होता. कारण त्यांना निसर्गातील संकेतांचा अर्थ कळावा.

काही वर्षांनंतर प्रेषित मदीनेत युद्ध आणि लढायांद्वारे संघर्ष करीत असताना रात्रीच्या वेळी जे (कुरआनचं) अवतरण झालं त्यापासून त्यांनी अर्थाचं नवं क्षितीज पाहिलं.

> ''आकाश आणि पृथ्वीच्या निर्मितीत आणि रात्र व दिवसाचं आळीपाळीनं येणं, समंजस लोकांसाठी यामध्ये संकेत आहेत.'' (कुरआन-३:१९०)

असं सांगितलं जातं की ही आयत अवतरल्यावर रात्रभर प्रेषित मुहम्मद रडत होते. पहाटे माननीय बिलाल अजान देण्यासाठी जेव्हा मशिदीत आले तेव्हा त्यांनी प्रेषितांना रडण्याचं कारण विचारलं.

प्रेषितांनी त्यांना आपल्या दु:खाचं कारण सांगताना म्हटलं, ''ज्यांनी ही आयत ऐकली आणि त्यांनी त्यावर चिंतन केलं नसेल तर त्याचा नाश होवो.''

# अनाथ आणि त्याचं शिक्षण

मक्केत परतल्यानंतर मुहम्मद (त्यांना शांतता लाभो) दोन वर्षं आपल्या आईच्या सहवासात होते. ते सहा वर्षांचे झाल्यावर त्यांच्या आईंची इच्छा होती की त्यांना मदीनेतील आपल्या नातलगांशी ओळख करून द्यावी. ते तिथं गेले, पण परत येताना माननीय आमिना रस्त्यातच अबवाच्या ठिकाणी आजारी पडल्या आणि तिथंच मरण पावल्या. त्यांचा दफनविधी तिथंच करण्यात आला. आता तरुण वयातले मुहम्मद दु:ख, यातना आणि मृत्युच्या समस्यांनी वेढले गेले होते. माननीय आमिना यांचे सेवक बराका प्रवासात त्यांच्यासोबत होते. त्यांना परत मक्केत घेऊन गेले. त्यांचे आजोबा अब्दुल मुत्तलिब यांनी लगेच त्यांना आपल्या आश्रयात घेतलं. ते नेहमीच त्यांच्याशी प्रेमानं वागत आणि त्यांचा सन्मान करीत. पण दोन वर्षांनी तेही मरण पावले.

मुहम्मद याचं जगणं फारच कठीण होतं. पवित्र कुरआनच्या खालील आयतींत यावर फार महत्त्व दिलंय.

> ''खचितच कठीण अवस्थेसोबत सहजताही येते. निश्चितच अडचणींमागोमाग (त्यातून) मुक्तताही येते.''
>
> (कुरआन-९४:५-६)

वयाच्या आठव्या वर्षी मुहम्मद यांना दारिद्र्य, एकाकीपणा आणि आपल्या आई व आजोबांच्या मृत्युचा अनुभव आला. तरीदेखील त्यांनी आपली परस्थिती आणि संबंधातील लोकांद्वारे ते सतत विकासाकडं वाटचाल करीत राहिले.

आपल्या मृत्युसमयी अब्दुल मुत्तलिब यांनी त्यांचे पुत्र आणि मुहम्मद यांचे चुलते अबु तालिब यांना त्यांची देखरेख करण्यास सांगितलं. अबु तालिब यांनी हे कार्य एका पित्याप्रमाणं पार पाडलं.

नंतरच्या काळात मुहम्मद आपले चुलते आणि चुलती फातिमा, असद यांच्या कन्या यांनी आपल्यावर कसं प्रेम केलं आणि कशी काळजी वाहिली याची सतत आठवण काढीत. खरंच अडचणींनंतर सौख्य असतेच.

आपल्या आयुष्यभर अडीअडचणींना तोंड देत मुहम्मद यांना आपला विधाता- एकमेव अल्लाहचं संरक्षण लाभत राहिलं.

मक्केत असताना मूर्तीपूजा, सण-समारंभ जिथं मद्यपान केलं जात होतं, त्यात लिप्त होण्यापासून त्यांची सुरक्षा केली जायची, असं म्हटलं जातं.

एकेदिवशी मक्केतील एका लग्न समारंभाच्या आयोजनाची बातमी त्यांच्या कानावर आली. ते तिथं जाऊ इच्छित होते. त्यांचं त्यावेळचं असं म्हणणं आहे की त्यांना काहीसा थकवा जाणवला. विश्रांती घेण्याकरिता ते जमिनीवर आडवे झाले, त्यातच त्यांना झोप लागली. दुसऱ्या दिवशी ऊन्हाच्या उष्णतेमुळं ते जागे झाले. वरवर पाहता ही क्षुलल्क गोष्ट वाटत असली तरी प्रेषितांच्या रक्षणकर्त्यानं कशा पद्धतीनं आपल्या भावी प्रेषितांचं मद्यपान व इतर गोष्टींपासून संरक्षण केलं याचा आविष्कार होतो. सर्वशक्तिमान अल्लाह सदैव त्यांच्या पाठीशी असे. त्यानंच प्रेषितांना अशा अनैतिक गोष्टींपासून वाचवलं, ज्यांचा तरुण वयातील मुलांना मोह असतो, जेणेकरून प्रेषितांच्या मनात दोषभावना निर्माण होऊ नयेत.

# तरुण मेंढपाळ

पुढच्या वर्षांमध्ये तरुण मुहम्मद रोजगार कमवण्यासाठी मेंढपाळ झाले. ते मक्केच्या बाहेर शेळ्या-मेंढ्या चरायला घेऊन जात. शेळ्यांच्या घोळक्याबरोबर ते अफाट वाळवंटात फिरत असत. त्यामुळं त्यांना निसर्गाला स्पष्टपणे पाहण्याची तसेच सर्वशक्तिमान अल्लाहच्या आश्चर्यकारक निर्मितीला जवळून पाहण्याची संधी मिळाली.

मुहम्मद यांना बालपणी शेळ्या राखण्याचा फार गर्व होता. ते नेहमी म्हणत-

> ''अल्लाहनं असा एकही प्रेषित पाठवला नाही जो मेंढपाळ नव्हता. प्रेषित मूसा आणि प्रेषित दाऊद दोन्ही मेंढपाळ होते.''

शेळ्या-मेंढ्या-उंट यांना चूक काय आणि बरोबर काय याची समज नसते, म्हणून त्यांच्या घोळक्यांना आवरणं फार जिकिरीचं काम असते. जनावरांना हाताळण्यासाठी पुष्कळ संयमाची गरज असते.

मेंढपाळाचे कार्य करताना तरुण मुहम्मद यांना एकांतवास, संयम चिंतन आणि जागरुकतेचा अनुभव आला. सर्व प्रेषितांना आपलं कर्तव्य पार पाडण्यासाठी ही गुणवैशिष्ट्ये अतिशय गरजेची असतात.

बालपणापासूनच मुहम्मद संकेत आणि परीक्षेशी परिचित होते. त्याद्वारे आपलं कर्तव्य पार पाडण्यासाठी त्यांना शिक्षण लाभलं.

२

# प्रेषित्वाची लक्षणं

आपल्या आयुष्याच्या अखेरीस मुहम्मद यांच्या आजोबा अब्दुल मुत्तलिब यांना आपली आर्थिक स्थिती खालावत जाण्याचं दिसत होतं. तसेच त्यांचे चुलते आणि पालकदेखील आर्थिक टंचाई आणि कठीण समस्यांनी ग्रासले होते. म्हणूनच मुहम्मद यांनी लवकरच स्वत:च्या गरजा पूर्ण करण्यास कमवणं सुरू केलं. त्याचबरोबर ते नेहमी आपल्या कुटुंबियांचीही मदत करण्याचा प्रयत्न करीत.

अबु तालिब व्यापारी होते. एकदा ते व्यापारासाठी सीरियाच्या प्रवासाच्या तयारीत होते. मुहम्मद यांनीही त्यांच्याबरोबर जाण्याची इच्छा व्यक्त केली. असा कठीण प्रवास करण्याचं त्यांचं वय नव्हतं, तरीदेखील अबु तालिब यांना त्यांचा फार मोह असल्यानं ते त्यांना नाकारू शकले नाहीत आणि त्यांना बरोबर येण्याची परवानगी दिली.

त्यांचा हा व्यापारी काफिला सीरियामधील बसरा शहराजवळ मुक्कामास थांबला. तिथं बहिरा नावाचे ख्रिस्ती संत होते. त्यांनी धर्मग्रंथांमध्ये शेवटच्या प्रेषितांच्या आगमनाचा उल्लेख वाचलेला होता.

मुस्लिमांच्या वृत्तान्तानुसार, इतर ख्रिस्ती, ज्यू आणि हुनफा धर्मियांबरोबरच बहिरासुद्धा प्रेषितांच्या आगमनाबाबतच्या संकेतांची वाट पाहात होते.

तो काफिला जवळ येताना दिसू लागल्यावर बहिराच्या लक्षात आलं

की ढगाचा एक तुकडा त्या लोकांचा उन्हापासून बचाव करीत आहे.

याबाबत अधिक माहिती मिळवण्याचं ठरवून बहिरा यांनी त्या लोकांना जेवणाचं आमंत्रण देण्याचं ठरवलं. त्या लोकांमधील सर्वांचं बारकाईनं निरीक्षण केल्यावर ते तरुण मुहम्मद यांना टक लावून पाहू लागले. मुहम्मद यांना आतमध्ये घेऊन गेले आणि त्यांच्या सामाजिक स्थिती, कुटुंब, त्यांचं स्वप्न वगैरे इत्यादींबाबत विचारणा करू लागले. शेवटी बहिरा यांनी मुहम्मद यांना विचारलं की ते त्यांची पाठ पाहू शकतील काय? मुहम्मद यांनी संमती दिली. त्यांच्या खांद्याच्या मध्यभागी असलेला मांसल भाग काही प्रमाणात वाढलेला होता. धर्मग्रंथांप्रमाणे ती प्रेषित्वाची मोहर होती. त्यांनी मुहम्मद यांच्यात प्रेषित्वाच्या खुणा पाहिल्या आणि लवकरच त्यांना हे कळून चुकलं की हा मुलगा शेवटचे प्रेषित होणार!

त्या ख्रिस्ती संत बहिरा यांनी अबु तालिब यांना विचारलं, ''तुमचं या मुलाशी नातं कोणतं?'' त्यांनी उत्तर दिलं, ''हा माझा मुलगा आहे.''

बहिरा म्हणाले, ''हे शक्य नाही. त्याचे वडील हयात नसतील.'' तेव्हा अबु तालिब यांनी त्यांना सांगितलं, ''त्याचे पिता जीवंत नाहीत.''

ते संत म्हणाले, ''हे साऱ्या मानवजातीचे धनी आहेत. ईश्वर त्यांना आपल्या संदेशासह पाठवणार आहे जो सर्वांसाठी कृपा असेल.'' अबु तालिब यांना आश्चर्य वाटलं. त्यांनी विचारलं, ''तुम्हाला हे कसं माहीत?''

बहिरा यांनी उत्तर दिलं, ''जेव्हा तुम्ही अकबाच्या दिशेनं येत होते तेव्हा सारी झाडं आणि दगडं त्यांच्यासमोर नतमस्तक होत होती. ते असं फक्त प्रेषितासाठीच करतात. ते तसं कधीही करत नसतात. मी त्यांना प्रेषित्वाची मोहर पाहूनही ओळखू शकतो. ती त्यांच्या खांद्याखाली सफरचंदाच्या आकारात आहे.''

बहिरा यांनी अबु तालिब यांना मुहम्मद यांना घेऊन तिथून लवकर परत घेऊन जाण्याचा सल्ला दिला आणि आपल्या पुतण्याचं शत्रूंपासून संरक्षण करण्यास सांगितलं आणि म्हणाले, ''देवा शपथ! जर त्यांची ओळख पटली तर त्यांना हानी पोहचेल.''

अबु तालिब यांनी त्यांचं म्हणणं मान्य केलं आणि आपल्या पुतण्याला मक्केस परत पाठवून दिलं.

# सलोखा-शांततेसाठी तह

मुहम्मद पंधरा वर्षांचे असताना कुरैश आणि हवाजिन टोळ्यांदरम्यान हजयात्रेच्या काळात लढाई सुरू झाली. मक्केतील परंपरेनुसार हजयात्रेच्या काळात लढाया-तंटे यांना बंदी होती. असं असतानादेखील हे युद्ध सतत चार वर्षं चालूच होतं. दोन्हींकडील लोकांना यामुळे भयंकर यातना सोसाव्या लागलत होत्या. या मूर्खपणाच्या युद्धामुळं जगणं कठीण झालं होतं.

मुहम्मद या मूर्ख युद्ध आणि रक्तपातामुळं अत्यंत कंटाळून गेले होते. इतर लोकही असाच विचार करू लागले. बऱ्याच लोकांना असं वाटू लागलं की काहीही करून हे युद्ध थांबावं आणि शांतता प्रस्थापित करावी.

अब्दुल्लाह बिन जुदान नावाच्या एका व्यापाऱ्याने अशा समविचारी लोकांना जेवणाचं आमंत्रण देण्याचं ठरवलं, ज्यांना ही लढाई संपुष्टात आणून समाजामध्ये पुन्हा शांतता, आदर आणि न्याय स्थापन करावा असं वाटत होतं.

विविध टोळ्यांचे सरदार आणि इतर प्रतिष्ठित नागरिकांनी आपल्या सामूहिक जबाबदारीचं भान ठेवून अशा युद्धांमध्ये हस्तक्षेप करून अत्याचारपीडितांच्या बाजूनं उभं राहण्याची शपथ घेतली; मग ते कोणत्याही कबिल्याचे किंवा समूहातील लोक असोत. हा तह हिलफुल फुजुल नावानं सर्वत्र परिचित झाला. हा एक विशेष प्रकारचा करार होता. यात कोणत्याही नातेसंबंध किंवा कुणाच्याही वर्चस्वाला न जुमानता न्यायिक मूल्यांचा आदर करणं, अत्याचारपीडितांच्या बाजूनं उभं राहणं वगैरे बाबी ठरवण्यात आल्या होत्या. तरुण मुहम्मद आणि अबु बक्र जे नंतर त्यांचे आयुष्यभर मित्र बनले, दोघंही या ऐतिहासिक बैठकीत सहभागी होते.

कुरआनचं अवतरण सुरू होऊन बऱ्याच काळानंतर मुहम्मद या करारातील अटींचा उल्लेख करीत म्हणाले होते,

> "हा करार संमत झला त्या वेळी मी अब्दुल्लाह बिन जुदान यांच्या घरी होतो. मला जर कुणी तांबड्या रंगाचे शंभर उंट जरी दिले तरी मी या करारातील माझा सहभाग सोडणार नाही आणि आता इस्लाममध्ये असतानादेखील मला जर कुणी अशा करारासाठी बोलविलं तर मी आनंदानं त्यात सहभागी होईन."

प्रेषित मुहम्मद यांनी त्या करारातील अटींच्या गुणवत्तेवर भर दिली नाही तर इस्लामसंदेश धारण करतानादेखील - एक मुस्लिम या नात्यानं ते त्यातील मजकुराशी सहमत असून आजही ते सहभागी होऊ इच्छितात.

इथं महत्त्वाची गोष्ट अशी की मुहम्मद यांना न्यायाच्या मूलतत्त्वांशी बांधिल असणं मान्य असून अत्याचारपीडितांचं रक्षण करण्यास ते तयार होते, मग हे लोक इस्लाम धर्मातील असोत की इस्लामबाहेरचे.

# सत्यनिष्ठ

मेंढ्या सांभाळल्यानंतर तरुण मुहम्मद व्यापार करू लागले आणि या क्षेत्रात त्यांनी आपला प्रामाणिकपणा आणि कार्यकुशलपणा सिद्ध केला.

मुहम्मद यांनी तरुण वयात पदार्पण केलं तेव्हा स्वयं ईश्वरच सर्वत्र पसरलेल्या अज्ञानकाळातील दुष्प्रवृत्तींपासून त्यांचा बचाव करीत होता. ते अत्यंत साधेपणानं राहात आणि सर्व प्रकारच्या वैभव व अहंकाराचा तिटकारा करीत. गरीब लोकांशी, अनाथांशी व विधवा महिलांशी ते सन्मानपूर्वक आणि दयाळूपणानं वागत. त्यांना मदतीचा हात देत. समाजामध्ये ते प्रामाणिक, चांगल्या स्वभावाचे आणि मायाळू म्हणून ओळखले जात.

तरुण वयात मुहम्मद यांनी जुगार, मद्यपान आणि असभ्य गोष्टींपासून लांबच राहात. भांडण-तंट्यापासून ते नेहमी अलिप्तच राहात. त्यांनी कधी असभ्य भाषा वापरली नाही की कधी शिवीगाळ केली नाही. ते सर्वत्र अल-सादिक (सत्यनिष्ठ) म्हणून परिचित होते.

# विश्वसनीय

व्यापारी काफिल्याचं नेतृत्व करीत असताना त्यांना अल-अमीन (विश्वसनीय) या उपाधिनं संबोधलं जाऊ लागलं. इंग्रजी भाषेतल्या आमीन (Ameen) या शब्दाची उत्पत्ती याच शब्दापासून झालीय, ज्याचा उच्चार प्रार्थनेच्या वेळी केला जातो. मक्केतील सर्व गरीब श्रीमंत लोक स्त्री-पुरुष आपला पैसा आणि मौल्यवान वस्तू मुहम्मद यांच्याकडं सुरक्षित म्हणून ठेवत असत. मुहम्मद यांची विश्वासार्हता आणि नैतिक प्रमाणबद्धतेमुळंच लोक त्यांना विश्वसनीय असे समजू लागले.

दोन माणसांच्या भांडण-तंट्यामध्ये मध्यस्थी करण्यास त्यांना विश्वासानं बोलविलं जाई. अबु तालिब यांचे पुत्र अली (अल्लाह त्यांच्यावर jepeer neslebs) cnCele Denele, ''l UebÛUeMerpeJeU ekeâ neeOeCeej sneJe&ue ueskeâl UebÛUe Øeselehe[ le Denele''

# विवाह

माननीय खदीजा (अल्लाह त्यांच्यावर राजी होवो) मक्केतील श्रीमंत व्यापाऱ्यांपैकी एक महिला होत्या. त्या विधवा होत्या. वरका नामक एका ख्रिस्ती संताच्या त्या मामेबहीण होत्या. मुहम्मद नावाच्या एका तरुणाचं नाव त्यांच्या कानावर येत होतं, जे प्रामाणिक, कार्यकुशल आणि सभ्य स्वभावाचे होते. त्यांच्याविषयी अधिक माहिती मिळवण्याचं ठरवून त्यांनी आपल्या प्रतिनिधीद्वारे त्यांना आपल्या काही वस्तू सीरियाला घेऊन जाण्यास (विकायला) सांगितलं. त्यांनी मुहम्मद यांना वचन दिलं की जर ते यात यशस्वी झाले तरक त्या त्यांना दुप्पट कमीशन देतील. मुहम्मद यांनी हे मान्य करून खदीजा यांच्या नोकर मैसरहला बरोबर घेऊन सीरियाकडं निघाले. सीरियामध्ये मुहम्मद यांनी असा व्यापार केला जो खदीजा यांच्या अपेक्षेपेक्षा दुपटीनं वाढला.

काफिला परतल्यावर खदीजा यांनी मैसरहचं वर्णन शांतपणे ऐकून घेतलं. त्याचबरोबर २५ वर्षीय मुहम्मद यांच्या व्यक्तिमत्त्वाचं निरीक्षणही करीत होत्या. मैसरहनं त्यांना सांगितलं की या प्रवासात मुहम्मद यांच्या वागणुकीत आणि आवेशात काही संकेतं पाहिलीत. ते इतर माणसांसारखे नाहीत. माननीय खदीजा यांनी आपल्या नुफैसा नावाच्या मैत्रिणीला मुहम्मद यांच्याकडं पाठवून ते त्याच्याशी लग्न करतील का, हे विचारण्यास सांगितलं.

मुहम्मद यांनी नुफैसा यांना उत्तर दिलं की लग्न करणं त्यांना परवडणारं नाही. नुफैसांनी माननीय खदीजा यांचं नाव घेऊन म्हणाल्या की खदीजा यांच्यात सभ्यपणा, श्रीमंती, खानदान आणि सौंदर्य सर्व काही लाभेल. मुहम्मद म्हणाले की त्यांची तशी इच्छा आहे, पण सद्यस्थितीत ते तसा विचार करण्याच्या बेतात नाहीत. नुफैसांनी सांगितलं की त्यांनी सर्व काही त्यांच्यावर सोडावं, त्या सगळं काही जमवून आणतील. नंतर त्यांनी खदीजा यांना मुहम्मद यांच्या मानसिक तयारीबद्दल सांगितलं. खदीजा यांनी त्यांना घरी बोलावून लग्नाचा रीतसर प्रस्ताव मांडला, त्यास मुहम्मद यांनी संमती दर्शविली. त्यांच्या नातलगांनीही या विवाहास मंजुरी दिली. लग्नाच्या वेळी माननीय खदीजा यांचं वय होतं ४० वर्षं. त्यांचं पहिलं मूल दोन वर्षं वयाचं मरण पावलं. नंतर जैनब,

रुकय्या, उम्मे कुलसुम आणि फातिमा या कन्या झाल्या. दुसरा मुलगा अब्दुल्लाहदेखील दोनच वर्षांच्या आत मरण पावला.

या काळात प्रेषितांनी हारिस नावाच्या आपल्या गुलामाचा मुलगा झैद यास दत्तक म्हणून घेण्याचं ठरवलं. त्यांच्या पत्नींनी हारिस यांना भेट म्हणून मुहम्मद यांना दिलं होतं. त्यांचा स्वत:चा मुलगा अब्दुल्लाह यांच्या मृत्युनंतर मुहम्मद यांनी आपले चुलते अबु तालिब यांना मदतीचा हात द्यावा म्हणून त्यांच्या अली नामक मुलाला आपल्या घरी आणलं. अबु तालिब यांना त्या वेळी आर्थिक समस्यांनी ग्रासलं होतं. नंतर मुहम्मद यांच्या सर्वांत लहान कन्या फातिमा यांच्याशी माननीय अली यांचं लग्न लावून दिलं.

## दत्तक मुलगा

त्यांनी दत्तक घेतलेल्या झैद यांचं कथन अनेक कारणांनी महत्त्वाचं आहे. माननीय खदीजा यांचा गुलाम बनण्याआधी त्यांना अनेक वेळा विकलं गेलं होतं. शेवटी ते एका लढाईत पकडले गेले. मुहम्मद यांच्या सेवेत ते बरीच वर्षं राहिले.

झैद हे मुहम्मद यांच्याकडं असल्याची बातमी कळल्यानंतर त्यांचे वडील आणि चुलते यांनी त्यांना परत आपल्या कबिल्यात घेऊन जाण्याचं ठरविलं. ते मुहम्मद यांच्या घरी आले आणि झैद यांना विकत देण्यास सांगितलं. मुहम्मद म्हणाले की या बाबतीत झैद यांनीच काय ते ठरवावं. जर त्यांना आपल्या पिता व चुलत्याबरोबर जायचं असल्यास ते त्यांना मुक्त करतील. मोबदल्यात त्यांना काहीही नको आहे. याउलट जर ते इथंच राहू इच्छित असतील तर त्यांच्या नातेवाईकांना त्यांची इच्छा मान्य करावी लागेल. त्यांनी मान्य केलं आणि झैद यांना त्यांची मर्जी विचारली. त्यांनी आपल्या मालकाच्या सेवेतच राहण्यास पसंत केलं आणि आपल्या नातेवाईकांना म्हणाले की ते स्वतंत्र होऊन मुहम्मद यांच्यापासून दूर जाण्यापेक्षा त्यांच्या सेवेतच राहण्यास प्राधान्य देतील.

अशा प्रकारे ते आपल्या मालकाबरोबर राहिले. मुहम्मद यांनी झैद हे आतापासून आपला पुत्र असल्याची जाहीर घोषणा केली. त्यांना आता झैद इब्न मुहम्मद या नावानं ओळखलं जावं. त्यांना त्यांचा वारसा लाभेल. यानंतर त्यांना याच नावानं ओळखलं जाऊ लागलं. पुढं जाऊन पवित्र कुरआनचं अवतरण सुरू झाल्यावर असा आदेश देण्यात आला की दत्तकमुलांना त्यांच्या कौटुंबिक नावानं संबोधलं जावं. (पाहा : पवित्र कुरआन-३३:४५)

आपल्या मालकाचा गुलाम म्हणून राहताना आणि आपल्या पित्यावर मालकास प्राधान्य देऊन झैद यांनी मुहम्मद यांच्या व्यक्तिमत्त्वाविषयी मुहम्मद यांचा एक आगळावेगळा परिचय करून दिला, ज्या वेळी पवित्र कुरआनचं अवतरण सुरू झालं नव्हतं, फार बोलकी घटना आहे. त्यांचा साधेपणा, शिष्टाचार, त्याच वेळी प्रामाणिक आणि आपल्या व्यवहारात सक्षम, महिलांशी ते आदर आणि सन्मानानं वागणं. असाच व्यवहार लहान मुलं आणि पुरुषांशीही करत. म्हमूनच सर्व लोक त्यांचे ऋणी होते. त्यांच्यावर प्रेम करीत होते. ते अल-सादिक म्हणजेच सत्यनिष्ठ आणि अमीन म्हणजे विश्वसनीय होते. त्यांच्याभोवती त्यांच्या भाग्याची संकेतं दिसत होती. अलौकिक मानवी गुणांनी ते समृद्ध होते.

# तीक्ष्ण बुद्धिमत्ता

आणखीन एका घटनेचा उल्लेख महत्त्वाचा आहे, जेव्हा त्यांनी आपली तीक्ष्ण बुद्धिमत्ता विविध कबिल्यांदरम्यान आणि समाजात शांतता राहावी यासाठी उपयोगात आणली.

अचानक पूर आल्याने काबागृहाच्य भिंतींना तडे गेले होते. कुरैशच्या लोकांनी त्याची पुनर्बांधणी करण्याचं ठरवलं. जुनी इमारत पायासहित पाडण्यात आली आणि पूर्वी ज्या ठिकाणी 'काळा दगड' (हजरे अस्वद - इस्लामी परंपरेनुसार याचा संबंध आदम आणि हव्वा यांच्याशी आहे. हा दगड काबागृहाच्या पूर्वेकडील भिंतीच्या कोपऱ्यात बसवलाय.) जडलेला होता त्याच ठिकाणी बसवण्याची वेळ आली तेव्हा विविध कबिल्यांमध्ये भांडण सुरू झालं. तो दगड आपल्याच हातांनी बसवला जाण्याचा सन्मान आपल्याला मिळावा अशी सर्वांची इच्छा होती. काही कबिले तर चक्क शस्त्रच उचलण्याच्या तयारीत होते. एका वृद्ध माणसानं एक सूचना पुढं केली. तो म्हणाला, ''दुसऱ्या दिवशी पहाटे जो माणूस सर्वांत अगोदर काबागृहात येईल त्याला याबाबत निर्णय करण्यास सांगू.'' सर्व लोकांनी हे मान्य केलं.

मुहम्मद हे प्रथमपुरुष होते जे दुसऱ्या दिवशी सर्वांत अगोदर काबागृहात आले. ते पाहून सर्वांना समाधान वाटलं. या प्रकरणात मध्यस्थी करण्यास नियतीनं त्यांची निवड केली याचा सर्वांना आनंद झाला. त्यांनी त्यांचं म्हणणं ऐकूण घेतलं. एक चादर आणण्यास सांगितली. त्यांनी तो दगड उचलून चादरीवर ठेवला आणि प्रत्येक कबिल्याच्या सरदाराला त्या चादरीच्या कडेला पकडून ती उचलण्यास सांगितली. जेव्हा त्यांनी ती चादर ठराविक उंचीपर्यंत उचलली, त्यांनी स्वत: तो दगड उचलून निश्चित जागी ठेवला. अशा तऱ्हेनं सर्वांचं समाधान झालं आणि कुणीही या सन्मानास मुकला नाही.

मुहम्मद यांनी ऐनवेळी अत्यंत हुशारीनं घेतलेल्या निर्णयामुळं साऱ्या कबिल्यांचा अभिमान राखला गेला. नंतर आपल्या जीवितकार्यात त्यांच्या सामर्थ्यामुळं मुस्लिम समुदायाला एकत्र ठेवण्यास मोलाची मदत मिळाली. अशा समुदायास ज्यामध्ये वेगवेगळया स्वभावाची, वृत्तीची, त्याचबरोबर

असाधारण व्यक्तिमत्त्वाची लोकं होती.

सामाजिक शांतता आणि सलोख्याचं ध्येय बाळगत मुहम्मद यांनी कुरैश कबिल्यातील कलह हाताळताना याच कौशल्याचा उपयोग केला. ते थेट लोकांच्या मनांना आवाहन करीत, त्यांच्या भावना दुखवत नसत. कोणतीही समस्या असो, ती सोडविण्यास मानमरातबाच्या भावना न दुखवता त्यांचं मनपरिवर्तन करीत. पवित्र कुरआनच्या अवतरणापूर्वीच्या काळात सर्वशक्तिमान अल्लाहनं त्यांना या गुणांनी संपन्न केलं होतं. त्याचं हृदय आणि बुद्धिमत्ता यात एक प्रकारचा दुवा निर्माण केला होता. म्हणूनच विभिन्न परिस्थितींमध्ये स्वत:शी आणि इतरांशी कसा समंजसपणाचा व्यवहार करावा यात ते तरबेज होते.

पस्तीस वर्षं वयात त्यांनी आपली आणि बनु हाशिमची जी प्रतिष्ठा साकारली ते पाहता लोक असा विचार करू लागले होते की ते लवकरच आपल्या पूर्वजांचा वारसा पुढं नेतील आणि आपल्या कबिल्याचा सन्मान पूर्वीप्रमाणे बहाल करून नेतृत्व करतील. लग्नानंतरची त्यांची कार्ये तसेच त्यांच्या वैयक्तिक गुणांमुळं ते आर्थिक आणि सामाजिकदृष्ट्या सक्षम झाले. आता त्यांच्या मुलींना लग्नाची मागणी येऊ लागली. अबु लहब आपल्या उत्बा आणि उसेंबा या मुलांचं लग्न प्रेषितांच्या कन्या रुकय्या आणि उम्मे कुलसुम यांच्याशी करू पाहात होता. जर मुहम्मद आपल्या कबिल्याचे सरदार झाले तर यामुळं कबिल्यामधील कुटुंबांमध्ये बांधिलकी दृढ होऊन त्याचा फायदा मिळेल, अशी अपेक्षा लोकं बाळगू लागली.

# दुष्कृत्यं

आपलं प्राबल्य गाजवण्यासाठी कबिल्यामधील लढाया, तंटे, क्षुल्लक कारणावरून वर्षानुवर्षं चालणारे रक्तपात, दुष्कृत्य आणि रानटीपणा ही वैशिष्ट्ये प्रेषित मुहम्मद यांच्या आगमनापूर्वीच्या जगात होती. गल्लीबोळात अत्याचार आणि हिंसेचं वातावरण होतं. मानवी समाज अडाणीपणा आणि अंधकारात लोटलेला होता; जुलूम, अन्याय, यातना, दुराचारामुळं अधोगतीस गेलेला होता. पवित्र कुरआनात त्या दुष्ट काळाचं वर्णन खालीलप्रमाणं आहे,

> ''लोकांनी आपल्या हातांनी जे घडवलं त्यामुळं जळी-स्थळी अनाचार माजला. त्यामुळं त्यांना त्यांच्या काही कृत्यांचं फळ चाखू द्या, शक्यतो ते परत फिरतील.''
>
> (कुरआन-३०:४१)

ज्यू आणि ख्रिस्ती धर्माच्या धर्मपंडितांनी आपापले धर्म भ्रष्ट करून टाकले होते. विवेकशक्ती आणि सूज्ञपणाला त्यामध्ये काही आकर्षण उरलं नव्हतं. मक्केतील कुरैश लोक आपल्याच हातांनी घडवलेल्या मूर्तींची पूजा करीत. या मूर्तींमध्ये हबल, अल-लात आणि अल-उज्जा या मोठ्या मूर्तींचा समावेश होता. कुरैश आणि अरब द्वीपकल्पाच्या इतर टोळ्या त्यांची पूजा करीत, त्यांची मदत मागत, त्यांच्या नावांनी शपथा वाहत आणि त्यांच्यासाठी लढत असत.

माणसांसाठी कसलाही आदर-सन्मान नव्हता, विशेषत: दुर्बल घटक आणि स्त्रियांसाठी. स्त्रियांना पुरुषांसाठी आनंदवस्तू समजलं जाई. त्यांना मारझोड आणि छळ केला जात असे. मुलीच्या जन्मास आर्थिक बोजा समजलं जायचं. तिला स्वयं तिचा पिता जमिनीत पुरत असे. पवित्र कुरआनात सर्वशक्तिमान म्हणतो,

> ''एखाद्याला मुली (झाल्याची) खूशखबर दिली की त्याचा चेहरा काळा पडतो आणि तो रागावून जातो.''
>
> (कुरआन-१६:५८)

# सत्यतेची ओढ

या काळात मुहम्मद मक्केजवळील एका गुहेत काही वेळ एकाग्रतेत घालवित असत. रमजान महिना सुरू झाल्यास ते महिनाभर हिरा नावाच्या एका गुहेत खाण्या-पिण्याच्या काही वस्तू सोबत घेऊन एकांतवास व्यतीत करीत असत. फक्त गरज पडल्यासच ते बाहेर येऊन परत जात.

त्या गुहेपर्यंत पोचण्यास त्यांना एक लहानसा डोंगर चढावा लागत असे आणि एका अरुंद रस्त्यानं दुसऱ्या बाजूच्या शिखरावर जावे लागत असे. त्या गुहेच्या तोंडावर उभं राहिल्यास समोर काबागृह दिसे आणि दुरून सर्वत्र वैराण मैदान नजरेस पडत होतं.

इतर माणसांपासून लांब जाऊन निसर्गाच्या सान्निध्यात मुहम्मद यांना आता शांततेची ओढ लागली होती. त्यांनी मूर्तीपूजेत कधीही भाग घेतला नाही. परिसरातील कबिल्यांच्या श्रद्धा आणि रुढींमध्ये ते कधीही लिप्त झाले नव्हते. जादूटोणा वगैरे भानगडीत ते पडले नाहीत. अन्यायापासून ते फार लांब होते. खोट्या देवीदेवतांपासून त्यांची सुरक्षा केली जात होती. मग ती मूर्तीची पूजा-अर्चना असो की श्रीमंती आणि सत्ताधिकारांची प्राप्ती असो.

अलीकडे ते पत्नी खदीजा यांना आपल्या स्वप्नांबाबत सांगत होते, जी सत्य ठरली आणि झोपेतून जागं झाल्यावर त्यांच्या मनावर झालेल्या परिणामाबाबत ते त्यांना सांगत होते. खरं पाहता हा सत्यतेसाठी त्यांचा शोध होता. आपल्याभवती असलेल्यांच्या उत्तरांनी समाधान होत नसल्यानं आणि मनात दडलेल्या सत्याचा शोध लावण्याच्या आकांक्षेमुळं त्यांनी एकांतवासात चिंतन करण्याचं ठरवलं. ते वयाच्या चाळीसाव्या वर्षात पदार्पण करीत होते. आत्मिक विकासाचा आणि आत्मनिरीक्षणाचा एक महत्त्वाचा टप्पा त्यांनी गाठला होता.

हिरा गुहेत एकाग्र होऊन ते आता जीवनाचा अर्थ, पृथ्वीवर त्यांची उपस्थिती आणि जीवनात त्यांना जे संकेत दिसत होते या बाबींवर विचार-विनिमय करू लागले. त्यांच्याभवती पसरलेल्या अफाट अवकाशानं त्यांना

वाळवंटातील त्यांच्या बालपणीची आठवण करून दिली असावी. आता मधलं अंतर एवढंच की ती जागा काही अत्यंत महत्त्वाच्या मूलगामी प्रश्नांनी भरली.

मुहम्मद शोधात व्यस्त होते आणि त्यांच्या आत्म्याची ही ओढ त्यांना आयुष्यभर जाणवत असलेल्या संकेतांकडं नेत होती. जी संकेतं त्यांची रक्षा करत होती, जे त्यांनी स्वप्नात पाहलं आणि जाग आल्यावर विरघळून गेलं होतं, तसेच निसर्गाशी संबंधित जे प्रश्न त्यांच्या बुद्धी आणि मनानं विचारलं होतं, आता त्यांच्या सर्वश्रेष्ठ अर्थांनी मुहम्मद यांचा परिचय करून देण्यास त्यांचं नेतृत्व करीत होते. एकमेव ईश्वर त्यांच्या शिक्षकाची गाठभेट करून देण्यासाठी. चाळीसाव्या वर्षी त्यांच्या आयुष्याचा पहिला टप्पा नुकताच संपलेला होता.

ते जेव्हा रमजान महिन्यात हिरा गुहेकडं निघाले होते, इ. स. ६१० मध्ये त्यांनी प्रथमच एक आवाज ऐकला, त्यांना बोलवणारा व त्यांचं स्वागत करणारा,

"अस्सलामु अलैक या रसूलल्लाह!"

हे ईश्वराच्या प्रेषिता! तुम्हाला शांतता लाभो.

☆

# पहिलं अवतरण

हिरा गुहेत मुहम्मद (त्यांना शांतता लाभो) यांनी सत्यता आणि अर्थाचा शोध सुरूच ठेवलेला होता. तेव्हा सोमवारी दि. २१ रमजान म्हणजेच इसवी सनाच्या १० ऑगस्ट ६१० ला रात्रीच्या वेळी अल्लाहचे दूत जिब्राईल (त्यांच्यावर शांतता होवो) त्यांच्यासमोर येऊन उभे राहिले आणि आज्ञा दिली, ''वाचा!''

मुहम्मद म्हणाले, ''ज्यांना वाचता येतं त्यांच्यापैकी मी नाही.''

तेव्हा दूतांनी त्यांना घट्ट धरलं, इतक्या जोरात की त्यांना असह्य झालं होतं. मग पुन्हा आदेश दिला, ''वाचा!''

मुहम्मद पुनश्च उद्‌गारले, ''ज्यांना वाचता येतं त्यांच्यापैकी मी नाही.''

दूतांनी त्यांना आणखीनच आवळून धरलं आणि तिसऱ्यांदा त्यांना ''वाचा!'' असा आदेश दिला.

उत्तरादाखल मुहम्मद यांनी तेच सांगितलं, ''ज्यांना वाचता येतं त्यांच्यापैकी मी नाही.''

त्यांना तसेच धरून ते दूत पठण करू लागले,

''वाचा तुमच्या विधात्याच्या नावानं ज्यानं निर्माण केलं. गोठलेल्या रक्तापासून मानवाला निर्मिलं. वाचा तुमचा विधाता वैभवशाली आहे. ज्यानं लेखणीद्वारे शिकवलं. मानवाला तो जाणत नसलेलं ज्ञान दिलं.''

(कुरआन-९६:१-५)

ईशदूत जिब्राईल द्वारा मुहम्मद यांच्यावर अवतरण झालेल्या कुरआनच्या त्या पहिल्या आयती.

या शब्दांचा उच्चार केल्यानंतर दूत जिब्राईल मुहम्मद यांना अत्यंत त्रासदायक अवस्थेत सोडून निघून गेले.

मुहम्मद यांनी परत पत्नीकडं जाण्याचं ठरवलं. ते कमालीचे दुःखी झाले होते. त्यांनी सांगितलं, ''माझ्यावर पांघरूण घाला.''

माननीय खदीजा यांनी त्यांच्यावर एक चादर टाकली आणि काय झालंय ते विचारलं.

मुहम्मद यांनी झालेला प्रकार सांगितला आणि भीती व्यक्त केली, ''मला हे काय होतंय, मला माझी भीती वाटतेय.''

खदीजा त्यांना दिलासा देत म्हणाल्या, ''तुम्हाला भिण्याचं काहीच कारण नाही. शांत व्हा. थोडा आराम करा. तुम्ही नातेवाईकांशी दयेनं वागता, सत्य बोलता, गरजवंतांच्या मदतीला धावता, पाहुण्यांशी निःस्वार्थी वागता आणि प्रत्येक न्याय्य गोष्टीची तुम्ही साथ देता. ईश्वर कधीही तुमचा अपमान करणार नाही.''

# संत वराका

खदीजा यांनी आपले चुलत भाऊ आणि ख्रिस्ती संत वराका यांचा सल्ला घेण्याचं ठरवलं. ते त्यांच्याकडं गेले आणि मुहम्मद यांचा अनुभव सांगितला. वराका यांनी ते संकेत ओळखले ज्यांची ते प्रतीक्षा करत होते आणि खात्रीपूर्वक म्हणाले, ''ज्याच्या कब्जात वराकाचे प्राण आहेत त्याची शपथ, हे तेच उत्कृष्ट 'नामूस' आहेत (पवित्र अवतरण आणणारे दूत) जे मुहम्मद यांच्याकडं आले, मूसाकडंही हेच आले होते. मुहम्मद लोकांसाठी प्रेषित आहेत ही वस्तुस्थिती आहे.''

नंतर काबागृहाजवळ मुहम्मद यांची भेट झाल्यावर वराकांनी पुढं सांगितलं, ''तुम्हाला लोक नक्कीच खोटार्डे म्हणतील, तुमच्याशी गैरवर्तन करतील, तुमच्यावर हल्ले करतील. ईश्वरच जाणो जर मी त्या वेळी हयात असलो तर मी त्याचा विजय घडवून आणण्यासाठी तुमची साथ देईन.'' वराकांनी असंही सांगितलं, ''तुमची लोकं तुम्हाला घालवून देतील.''

हे ऐकून मुहम्मद यांना धक्का बसला. त्यांनी विचारलं, ''मला लोक बाहेर करतील?'' वराकांनी उत्तर दिलं, ''हो नक्कीच. कोणत्याही माणसानं असं काही आणलं नव्हतं जे तुम्ही घेऊन आला आहात आणि त्यास लोकांनी शत्रू ठरवलं नसेल.''

मुहम्मद यांनी नुकतीच आपल्या ध्येयप्राप्तीच्या कार्याची सुरुवात केली होती आणि त्यांना शेवटच्या अवतरणाच्या काही मूळ शिकवणींचं आकलन करण्याची तसेच इतिहासात लोकांमध्ये जी काही सत्य भकितं प्रचलित होती त्यांचं आकलन करण्याची अनुमती दिली गेली होती.

खदीजा यांना हे कळलं आणि त्या मुहम्मद यांच्या पाठीशी खंबीरपणे उभ्या राहिल्या.

३

# संदेश

अवतरणाच्या सुरुवातीच्या वर्षात कुरआनचा संदेश आकार घेत होता आणि ईश्वराचं एकत्व, पवित्र कुरआनचं नैतिक स्थान, उपासना आणि परलोकीय जीवन या चार सूत्रांवर आधारित होता. मुस्लिमांना गंभीर आणि मूलगामी स्वरूपाचा बदल घडवून आणण्यास सांगण्यात आलं होतं. त्यांच्या कबिल्यातील विरोधकांना हे चांगलं कळून चुकलं होतं की इस्लाम नावाचा नवा धर्म त्यांच्या समाजजीवनात आणि श्रद्धांमध्ये मोठे बदल घडवून आणण्यास कटिबद्ध आहे, ज्याची त्यांना भीती वाटत असे.

# संदेशाचा स्वीकार

इस्लामचा स्वीकार करणारी पहिली व्यक्ती माननीय खदीजा होत्या आणि प्रेषित मुहम्मद (त्यांना शांतता लाभो) यांच्या सुरुवातीच्या दहा वर्षांत त्या खंबीरपणे त्यांच्या बाजूनं उभ्या होत्या.

खदीजा यांच्यानंतर कुटुंबातील त्यांच्या जवळच्या नातलगांनी आणि मित्रांनी इस्लाम स्वीकारला. त्यांच्यानंतर त्यांच्या आश्रयाखालील चुलत भाऊ माननीय अली, दत्तकपुत्र झैद, त्यांची देखरेख करणाऱ्या उम्मे एयमन आणि आयुष्यभर त्यांचे मित्र असलेले माननीय अबु बक्र हे लोक होते ज्यांनी त्या संदेशाची सत्यता लक्षात घेऊन आपली श्रद्धा व्यक्त करीत घोषणा

केली, ''एकमेव अल्लाहशिवाय कुणीही (उपासनेस पात्र) ईश्वर नाही आणि मुहम्मद अल्लाहचे प्रेषित आहेत.''

मुहम्मद यांच्या लक्षपूर्वक (इस्लामच्या) प्रचार आणि माननीय अबु बक्र यांच्या अविरत सहभाग यामुळे इस्लाममध्ये प्रवेश घेणाऱ्यांची संख्या हळूहळू वाढत गेली. इस्लामचा सामाजिक समतेचा सिद्धान्त पटवून देत ते गुलामांना विकत घेऊन त्यांना मुक्त करत होते. मक्केत मुहम्मद यांची उपस्थिती, त्यांचे आचार आणि आदर्श पाहून मोठ्या संख्येनं पुरुष आणि महिला इस्लामकडं आकर्षित होऊन इस्लाम स्वीकार करू लागले. एखाद्या धर्मांतरित मुस्लिमांच्या घरी ते प्रेषितांना भेटून इस्लामच्या मूलभूत शिकवणी जाणून घेत. मक्केतील रहिवाशांनी जेव्हा इस्लामचा मूलभूत गाभा समजला आणि समाजातील तरुण आणि गोरगरीब लोकांवर त्यामुळे होणाऱ्या परिणामांचा जेव्हा आढावा घेतला तेव्हा सभोवतालचं वातावरण अधिकाधिक प्रतिकूल होत गेलं.

सुरुवातीपासून प्रेषितांनी संख्येपेक्षा गुणधर्मांना प्राधान्य दिलं होतं आणि ज्यांच्याशी ते संवाद साधत त्यांच्या संख्येवर लक्ष न देता त्यांच्या मानसिक आणि बौद्धिक स्थितीवर जास्त लक्ष पुरवित असत. प्रेषित मुहम्मद पुढच्या टप्प्यातील धोका आणि तणावाची परिस्थिती निर्माण होईल हे जाणून होते. त्यांनी काही लोकांना एकत्र करून त्यांना ठोस शिक्षण देण्याचा निर्णय घेतला. त्यांच्यावर लोक टीका करतील, त्यांना दूर सारतील आणि शक्यतो त्यांना हाकलून देतील हे त्यांना चांगलं ठाऊक होतं. याच लहानशा गटातील मुस्लिमांनी कठीण परिस्थितीत आणि जाचाला तोंड दिलं, इस्लामशी बांधिल राहिले.

तीन वर्षं मुहम्मद यांनी इस्लामवर अढळ श्रद्धा ठेवणाऱ्या मुस्लिम समुदायाची शांतपणे उभारणी केली. या समुदायाचं वैशिष्ट्य म्हणजे ते स्त्री-पुरुष कबिला आणि सामाजिक वर्गीकरणाचा भेद न पाळता एकत्रित आले होते.

# अवतरण

## दैवी संचारण

कुरआनातील पहिल्या अवतरणांनी मुहम्मद (त्यांना शांतता लाभो) यांच्यामध्ये उद्‌गम पावलेल्या जागृतींना सर्वोच्च ईश्वराच्या उपस्थितीकडं दिशानिर्देश दिले, ज्याला ते शिक्षक त्यांचा विधाता, संवर्धित करणारा या नात्यानं संबोधत असे. माणसाच्या सद्‌वर्तनासाठटी ज्ञानाचं महत्त्व, आत्मिक श्रद्धा हे मूलभूत सिद्धान्त जिब्राईल यांनी त्यांच्याप्रत पोचवले होते. या शुभवार्ताबरोबरच भविष्यात उद्‌भवणाऱ्या विरोधाची चेतावणीही देण्यात आली होती. कारण या पृथ्वीत सत्याधिष्ठित गोष्टी घेऊन येणारी अशी कोणतीही व्यक्ती नव्हती जिला घृणा, क्लेश आणि शत्रुत्वाशी तोंड द्यावं लागलं नसावं. त्यांच्या नात्यातले असे लोक जे त्यांच्यावर प्रेम करीत असत ते द्वेष करू लागले इतका की ते त्यांना ठार करू इच्छित होते.

ईशदूत जिब्राईल (त्यांच्यावर शांतता होवो) मुहम्मद यांच्या समक्ष अनेकवेळा उपस्थित राहात. प्रेषित म्हणत होते की कधी जिब्राईल दूताच्या रूपात येत असत तर कधी मानवाचं रूप धारण करून येत. तर इतर काही वेळा त्यांना घंटानाद ऐकू यायचा आणि लगेचच अवतरण येत असे. शेवटची ही पद्धत त्यांना त्रासदायक वाटे. तरीदेखील या प्रक्रियेनंतर त्या अवतरणाच्या मजकुरातील शब्द न् शब्द ते उच्चारत असत. २३ वर्षं जिब्राईल यांची प्रेषितांना सोबत होती आणि ते प्रसंगानुरूप कुरआनातील आयती (श्लोक) आणि अध्यायांचं अवतरण करीत असत. नंतर या आयती आणि अध्यायांचा पवित्र कुरआनात समावेश केला जात असे. या अवतरणांची त्यांच्या घटनांनुसार क्रमवारी केली गेली नसून जिब्राईल यांनी ती क्रमवारी प्रेषितांना सुचवली. दरवर्षी रमजान महिन्यात प्रेषित मुहम्मद त्या सर्व अवतरणाचं पठण जिब्राईल यांच्या समक्ष, त्यांनी सुचवलेल्या क्रमानुसार करीत असत. २३ वर्षांच्या कालखंडात अवतरलेल्या कुरआनातील मजकुराचा हा एक प्रकारचा अधिकृत पुरावा होता.

# शुद्धीकरण आणि प्रार्थना

एके दिवशी प्रेषित मुहम्मद (त्यांना शांतता लाभो) मक्केच्या सान्निध्यात चालत होते. एका उंच स्थानी जिब्राईल (त्यांच्यावर शांतता होवो) त्यांच्या जवळ आले आणि जमिनीच्या त्या पृष्ठभागावर आपली टाच आदळली. तेथून पाण्याचा एक झरा वाहू लागला. मग त्यांनी त्या पाण्यानं वुजू (नमाजपूर्वी तोंड, हात, पाय धुणे - शुचिर्भूत होणे) केली आणि मुहम्मद यांना नमाजच्या विविध विधी कशा कराव्यात म्हणजे- उभं राहणं, झुकणं, नतमस्तक होणं आणि बसणं. प्रत्येक वेळी ''अल्लाहु अकबर'' (अल्लाह महान आहे) चा उच्चार करीत. शेवटी ''अस्सलामु अलैकुम'' (तुम्हास शांती लाभो) म्हणत अभिवादन. हे प्रत्यक्ष दाखवून दिलं. प्रेषित त्यांच्या सूचना पाळत होते. नंतर जिब्राईल निघून गेले. प्रेषित घरी परतले आणि ते जे काही शिकले होते खदीजा यांनाही शिकवलं. मग दोघांनी प्रार्थना (नमाज अदा) केली.

आता हा धर्म शुद्ध धार्मिक विधी आणि प्रार्थनेच्या आधारांवर स्थापित झालेला होता. मक्केतील सुरुवातीच्या काळात सकाळी आणि संध्याकाळी, दिवसातून दोनदाच विधिवत प्रार्थना केली जायची. नंतर सर्व मुस्लिमांनी दिवसातून पाच वेळा प्रार्थना करणे अनिवार्य झालं.

मक्केच्या केंद्रस्थानी वाढत जाणाऱ्या प्रतिकूल परिस्थितीत ज्या पुरुष आणि स्त्रियांनी इस्लाम धर्म स्वीकारला होता, शांतपणानं अविरत प्रशिक्षण घेत होते. ते रात्री जागं होऊन कुरआनातील आयती पाठ करीत असत, ज्यास एकमेव अल्लाहनं त्याच्या अनंत कृपा आणि प्रत्येकाचं हृदय जोडणारा प्रतिष्ठित दुवा म्हणून जोडलं होतं. या सखोल आणि भावनाविवश प्रशिक्षणामुळं सर्वप्रथम श्रद्ध लोकांमध्ये अर्थपूर्ण आणि स्वाभाविक गुणधर्म निर्माण केले, दूरदर्शीपणानं, अविचल आणि धर्मनिष्ठेनं ते कृपाशाली ईश्वराची उपासना करू लागले. त्याच्या अवतरणाचं पठण करीत प्रेषितांच्या शिकवणी अंमलात आणू लागले. सर्वशक्तिमान ईश्वराशी जवळीक अढळ विश्वासाद्वारे इस्लामच्या संदेशाचा साद संपूर्णपणे व्यक्त होतो. त्याच्या किंवा तिच्या निर्मिक अल्लाहच्या दरम्यान रास्त दुवा स्थापित होतो, ज्यानं आदर्श वर्तनाचं दर्शन

घडवण्यासाठी एका प्रेषिताची निवड केली, ज्यास त्यानं आदर्श बनवलं. तीन आयतींमध्ये त्यांच्या शिकवणींचा मूळ गाभा आलाय.

> ''माझा भक्त जेव्हा माझ्याविषयी तुमच्याकडं विचारणा करतो, मी त्याच्या जवळच असतो. जेव्हा तो हाक मारतो ती मी ऐकतो, त्यानेही माझं ऐकावं, माझ्यावर विश्वास ठेवावा, तरच ते रास्त मार्ग धरतील.''
>
> (कुरआन-२:१८६)

अशा जीवलग नात्याचं अंत:करण प्रेषित आहेत.

> ''(हे प्रेषित!) त्यांना सांगा, जर तुम्ही अल्लाहशी प्रेम बाळगत असाल तर माझं अनुसरण करा. अल्लाहदेखील तुमच्यावर प्रेम करील. तुमच्या अपराधांना क्षमा करून टाकील, कारण अल्लाह तर कृपाशाली आणि क्षमा करणारा आहे.'' (कुरआन-३:३१)

ते मानवजातीचं अंत:करण आहेत. या जीवनाच्या मर्यादा ओलांडून ईश्वराच्या सान्निध्याची उत्कट इच्छा बाळगणारे आहेत.

> ''तुमच्यामधील अशा प्रत्येकासाठी ज्यांना अल्लाह आणि परलोकाच्या बाबतीत आकांक्षा आहेत आणि जे अल्लाहच्या स्मरणात मग्न असतात त्यांच्यासाठी अल्लाहच्या प्रेषितांमध्ये उत्कृष्ट आदर्श आहे.''
>
> (कुरआन-३३:२१)

४

# छळ आणि अत्याचार

पवित्र कुरआन अवतरणाच्या आरंभीच्या अनुभवानंतर ते सावरल्यानंतर आणि त्यानंतरही कुरआनचं अवतरण सुरूच असताना प्रेषित मुहम्मद (त्यांना शांतता लाभो) हे संदेश आपल्या जवळीकीतील लोकांना सांगत असत. या संदेशाचा लोकांमध्ये कसा प्रचार करायचा या बाबतीत त्यांचं मार्गदर्शन झालं नव्हतं. पण संत वराकांनी जसं भाकित केलं त्यावरून त्यांचा जोरदार विरोध होईल याचा अंदाज त्यांनी लावला होता.

## जाहीर निमंत्रण

तीन वर्षांनंतर प्रेषित मुहम्मद यांना एका अवतरणाद्वारे जाहीरपणे लोकांना याचं निमंत्रण देण्यास सांगण्यात आलं.

''आणि आता तुम्ही आप्तेष्टांना सावध करा.''

(कुरआन-२६:२१४)

आता प्रेषित मुहम्मद यांना कळून चुकलं की त्यांना इस्लामचा हा संदेश ज्या कुटुंबांशी त्यांचं जवळचं नातं होतं त्यांच्यापर्यंत पोहचवावा लागेल. अरब परंपरेनुसार कुणास लोकांना एखादी सूचना द्यावयाची असल्यास त्यानं एखाद्या टेकडीवर जायचं. एके दिवशी प्रेषित मुहम्मद

अस्-सफा नामक टेकडीवर गेले आणि कबिल्यांच्या सरदारांना हाक देऊ लागले. त्यांना एखादी महत्त्वाची सूचना द्यावयाची असेल असा विचार करीत ते त्या टेकडीच्या पायथ्याशी ती ऐकण्यासाठी गोळा झाले. ते लोक जिथं उभे होते त्या जागेवरून टेकडीच्या पलीकडचं पाहू शकत नव्हते. मुहम्मद त्या दिशेनं तोंड करून उभे होते.

प्रेषित मुहम्मद कुरैश लोकांना हाक देऊन विचारू लागले, ''या घाटीत खाली घोड्यांवर स्वार सशस्त्र हल्लेखोर तुमच्यावर चढाई करण्याच्या बेतात आहेत, असा इशारा जर मी तुम्हांस दिला तर तुम्ही माझआ विश्वास करणार?'' त्यांनी एका स्वरात उत्तर दिलं, ''नक्कीच. तुम्ही विश्वसनीय आहात. तुम्हाला खोटं बोलताना आम्ही कधीच ऐकलं नाही.''

प्रेषित पुढं म्हणाले, ''मी इथं तुम्हाला (भविष्यातील) हिंसक संकटांच्या बाबतीत आगाऊ सूचना देण्यासाठी उभा आहे. ईश्वरानं मला आप्तस्वकीयांना सावध करण्यास सांगितलंय. याच जगात तुमचं संरक्षण करण्याची किंवा पुढं येणाऱ्या जीवनात तुमच्यावर कृपा करण्याची माझी क्षमता नाही. जर तुम्ही एकमेव ईश्वरावर श्रद्धा ठेवली नाही.'' ते पुढं म्हणाले, ''एखाद्यानं शत्रूस पाहिलं आणि तो लोकांकडं 'सावध व्हा' म्हणून हाक देत धावून जातो, अशी माझी स्थिती आहे.''

प्रेषित मुहम्मद यांना अबु लहबने ताबडतोब उत्तर दिलं. म्हणाला, ''विनाश असो, यासाठी तुम्ही आम्हांस इथं बोलवलं?'' तिथं जमलेल्या सरदारांना बरोबर घेऊन तो लगेच परतला. ज्यांनी मुहम्मद यांच्या संदेशास नाकारलं आणि विरोधात गेले त्यांना अबु लहबनं हाती धरलं.

अबु लहब, त्याची पत्नी आणि मक्केतील इतर प्रतिष्ठितांनी मुहम्मद यांना अगोदर श्रीमंती आणि सत्तेची लालसा देऊन भ्रष्ट करण्याचे प्रयत्न केले. त्यांनी जर आपला संदेश सोडून दिला तर त्यांना राजा बनविण्याचं आमिष दाखवलं. यात त्यांना यश आलं नाही. तेव्हा त्यांच्यापैकी काहीजण प्रेषितांना 'झपाटलेला' तर इतर काहीजण 'वेड लागलेला' असं म्हणू लागले.

नंतर प्रेषितांनी दोन वेळा मेजवानीचं आयोजन केलं. इस्लामचा संदेश पोचता करण्याकरिता. पहिल्या वेळेस अबु लहबनं पुन्हा खोळंबा करीत मुहम्मद यांना बोलू दिलं नाही. दुसऱ्या वेळेस मुहम्मद आपल्या संदेशाचा सार व्यक्त करू शकले. लोकांनी ते ऐकलं आणि काहींनी गुप्तपणे त्याचा स्वीकार केला.

मुहम्मद आपल्या कुटुंबियांनाच तो संदेश ऐकवित होते. त्यातच कुरआनचं आणखी अवतरण झालं ज्याद्वारे त्यांना रास्त आणि ठाम भूमिका घेण्याचा आदेश दिला गेला.

> ''तुम्हाला ज्या आज्ञा दिल्या आहेत त्या (त्यांना) स्पष्ट करून
> सांगा आणि अनेकेश्वरींशी दूर व्हा.''
>
> (कुरआन-१५:९४)

प्रेषितांचं कार्य आता दुसऱ्या टप्प्यात दाखल झालं होतं. इस्लाम आता सर्वांपर्यंत आणि स्पष्टपणे पोचविला जाऊ लागला. अल्लाहचं एकत्व, त्याची श्रद्धा आणि कुरैशच्या अनेकेश्वरत्व हे वेगळं करून सांगितलं जात होतं. प्रेषितांनी आपल्या सान्निध्यात विश्वसनीय पुरुष आणि महिलांना एकत्र जमविलं होतं. काहीजण त्यांचे नातलग होते, तर अनेक लोक विविध समाजगट आणि टोळींचे होते, ज्यांना ते गेल्या तीन वर्षांपासून आध्यात्मिक आणि धार्मिक शिकवण देत होते. मक्केतील समाजजीवनात मुस्लिम अविचल आणि सहिष्णुतेनं, दाबदपटशा, त्यांना टाकून देणं, वेगळं पाडण्यास तोंड देत होते. तो समाज आता विघटनाच्या उंबरठ्यावर उभा होता.

# आमिष आणि दडपण

इस्लामचा संदेश आता जगजाहीर होता. अल्-अरकम यांच्या घरी मुस्लिमांना जे प्रशिक्षण दिलं जात होतं ते संवेदनशील होतं. तरीदेखील मुस्लिम लोक आता आपल्या नातेवाईकांशी आणि आसपासच्या लोकांशी चर्चा करण्यास मागेपुढे बघत नव्हते. दररोज कुरैश सरदारांना नव्या धर्माच्या धोक्याची कल्पना जाणवत होती. हा सगळा प्रकार त्यांचं देव रूढी-परंपरांविरूद्ध थेट बंड होता. ज्यामुळं शेवटी सरदारांच्या सत्तेला धोका होता. जर इस्लामचा प्रसार झाला तर लोक मूर्तींना आदरांजली देण्यास काबागृहाला भेट देणार नाहीत आणि काबागृहाचे प्रभारी म्हणून त्यांना जो आदर-सन्मान लाभलाय ते त्यास मुकतील. शिवाय परिसरातील असंख्य लोक वर्षभर त्या मूर्तींना जे अर्पण करत आहेत त्यावर मक्केचं वैभव टिकून आहे. त्याचबरोबर काबागृहाच्या यात्रेमुळेच मक्का शहराच्या लोकांची कमाई होते. लोकांकडं कमवण्याचं दुसरं साधन नव्हतं.

कुरैश सरदारांनी प्रथम मुहम्मद यांचे चुलते अबु तालिब यांच्याकडं एक शिष्टमंडळ पाठवण्याचा निर्णय घेतला. अबु तालिब हे मुहम्मद यांचं संरक्षण करीत होते. अबु तालिब यांना मुहम्मद आवरण्यास सांगितलं, कारण ते ज्या संदेशाचा प्रचार करीत आहेत तो त्यांना मान्य नाही. त्यांच्या देवांची तसेच त्यांच्या पूर्वजांची त्याद्वारे अवहेलना होते. कुरैश सरदारांच्या या पहिल्या भेटीनंतर अबु तालिब यांनी काही प्रतिसाद दिला नाही. ते परत आले आणि आग्रह धरला की हे प्रकरण निकडीचं आहे. अबु तालिब यांनी आपल्या पुतण्यास बोलावून घेतलं. त्यांनी आपले कार्य सोडून द्यावं असं समजावण्याचा प्रयत्न केला.

प्रेषित मुहम्मद यांनी ठामपणानं उत्तर दिलं, ''माझ्या चुलत्या! मी अल्लाहची शपथ घेतो, त्यांनी जरी माझ्या उजव्या हातात सूर्य आणि डाव्या हातात चंद्र ठेवला आणि मला हे कार्य सोडून देण्यास सांगितलं तरी

मी या कार्यास तोवर सोडणार नाही जोवर ईश्वर मला यश देत नाही किंवा या कामी माझा नाश होत नाही.'' अशा या अविचल इच्छेसमोर अबु तालिब हतबल झाले. त्यांनी आग्रह धरला नाही, उलट आपल्या पुतण्याला येथून पुढं कायम साथ देण्याचं आश्वासन दिलं.

मुहम्मद यांच्याकडं कुरैश सरदारांचं आणखीन एक शिष्टमंडळ आलं. त्यांनी मुहम्मद यांना संपत्ती, सत्ता आणि इतर वस्तु देऊ केल्या. त्यांनी त्या सर्व गोष्टी धुडकावून लावल्या आणि म्हणाले त्यांनी फक्त इस्लामचं कार्य करण्याचं ठरवलंय. ते लोकांना एकमेव ईश्वराची श्रद्धा बाळगण्याचं आमंत्रण देत राहतील, मग त्यांना याची कोणतीही किंमत मोजावी लागो.

> ''न मी झपाटलेला आहे आणि न मी तुमच्याकडून सत्ता, आदर-सन्मान याची मागणी करतोय. मला ईश्वरानं तुमच्याकडं पैगंबर नेमून पाठवलंय. मी माझ्या विधात्याचा संदेश तुम्हास पोचता केला. मी तुम्हाला चांगुलपणाचा उपदेश दिला. मी जे आणलंय त्याचा जर तुम्ही स्वीकार केला तर तुम्ही या जगात आणि परलोकातदेखील यशस्वी व्हाल. पण मी जे आणलंय ते तुम्ही नाकाराल तर मी संयमानं तुमच्या आणि माझ्यात अल्लाहच जे काही निर्णय घेईल त्याची वाट पाहीन.''

या वक्तव्याद्वारे प्रेषितांनी कोणत्याही प्रकारच्या तडजोडीच्या मर्यादा निश्चित केल्या. आपल्या संदेशाचा प्रसार थांबणार नाही. अल्लाहवरच भिस्त ठेवून या जगात या निर्णयाचे कोणते परिणाम उमटतील त्यावर आपण संयमी राहू. आता शत्रुत्वाची सुरुवात झाली होती. कबिल्याच्या सरदार त्यांचा अपमान करू लागले आणि म्हणत राहिले की ते वेडे आहेत, झपाटलेले आहेत किंवा एखादे जादूगार असतील.

# कुरैश लोक उपाय करू लागले

प्रेषित मुहम्मद (त्यांना शांतता लाभो) यांना आता अवमानना आणि टिंगलटवाळीचा सामना करावा लागे. मक्केचे लोक त्यांना चमत्कार दाखवण्याची मागमी करू लागले. ते पवित्र कुरआनचा संदर्भ देऊन त्यांना उत्तरे देत राहिले आणि म्हणत असत, ''मी एक प्रेषित आहे.'' त्यांच्यावर दबाव वाढत गेला आणि हिंसक विरोधाची सुरुवात झाली.

- कुरैश सरदार गरीब आणि ज्यांच्या पाठीशी कोणताही कबिला नव्हता अशा मुस्लिमांवर हल्ले करू लागले. बिलाल (अल्लाहची त्यांच्यावर कृपा होवो) गुलाम होते. त्यांच्या मालकानं त्यांना वाळवंटात उन्हामध्ये बांधून ठेवलं. त्यांच्या छातीवर एक मोठा दगड ठेवून त्यांना इस्लाम नाकारण्यास सांगितलं. पण बिलाल ''अल्लाह एकच आहे, अल्लाह एकच आहे.'' असा वारंवार उद्घोष करू लागले. अबु बक्र (अल्लाहची त्यांच्यावर कृपा होवो) यांनी बिलाल यांना विकत घेऊन त्यांना मुक्त करून टाकलं. (जसं त्यांनी अनेक गुलामांविषयी केलं होतं.) नंतर माननीय बिलाल मदीनेचे मुअज्जिम (मशिदीत अजान देणारे) झाले. त्यांची निखालस श्रद्धा, एकनिष्ठता आणि मधुर आवाजामुळे सारेच्या सारे त्यांचा आदर करू लागले.

- इस्लामचा अटळ शत्रू अबु जहल यानं त्यांचा छळ करण्याच्या कारवाईची सुरुवात केली आणि असंख्य हानिकारक उपाय योजू लागला. प्रेषितांचा द्वेष करून त्यांच्याशी असभ्य वागू लागला. त्यांच्यावर दगडांचा मारा करू लागला. आपल्या दोन मुलांना, ज्यांचं लग्न प्रेषितांच्या कन्या रुकय्या आणि उम्मे कुलसुम यांच्याश झालं होतं, तलाक देण्यास भाग पाडलं. प्रेषितांच्या मुलाचा लहान वयात मृत्यु झाला त्याचा आनंद साजरा केला आणि प्रेषितांना आपल्या संततीशी विलग झालेला असल्याचे म्हणू लागला. अब्दुल्लाहपुत्र तारिक यांच्या म्हणण्यानुसार, अबु लहब प्रेषितांना शिवीगाळ करूनच थांबत नव्हता तर तो त्यांच्या पायामधून रक्त निघेपर्यंत त्यांना दगडांनी मारत होता.

- अबु लहबची पत्नीसुद्धा या निर्दयी कृत्यात त्याची साथ देत होती. तिला प्रेषितांबद्दल असलेल्या वैर आणि द्वेषाबाबत ती आपल्या पतीपेक्षा कमी नाही हे सिद्ध करून देत होती. त्यांना शारीरिक इजा पोचवण्यासाठी ती काटेरी झाडं-झुडपं बांधून त्यांच्या वाटेत पसरवून टाकत होती. ती असभ्य वर्तणुकीची आणि दुष्ट प्रवृत्तीची स्त्री होती. शिवीगाळ करायची, तसेच षड्यंत्र रचनेच्या कलेत पटाईत होती. पवित्र कुरआनात तिचा उल्लेख 'अग्नी पेटवण्याची लाकडी नेणारी' असा केलेला आहे.

- एकदा काबागृहात प्रेषित प्रार्थना करीत उभे होते. इस्लामचा शत्रू अबु जहल आपल्या मित्रांसोबत तिथं बसला होता. त्यातील एका माणसानं विचारलं, ''तुमच्यापैकी कोण उंटाच्या आतड्या आणून त्या प्रेषित मुहम्मद नतमस्तक अवस्थेत असताना त्यांच्या मानेवर ते घालू शकतो?'' त्यांच्यातला सर्वांत नीच माणूस उकबा उठला आणि जाऊन आतड्या आणल्या. प्रेषित नतमस्तक होईपर्यंत वाट पाहिली आणि मग त्यानं त्या आतड्या त्यांच्या दोन्ही खांद्यांच्या मधोमध - मानेवर घातल्या. ते एकमेकांच्या अंगावर पडून हसू लागले. प्रेषित त्या वेळी नतमस्तक झालेले होते, त्यांना उठता येत नव्हतं. शेवटी त्यांच्या कन्या फातिमा आल्या आणि त्यांनी त्यांच्या मानेवरील आतड्या काढून टाकल्या.

- त्यांनी प्रेषित काबागृहात नमाज अदा करताना त्यांचा घेराव करून छेड काढली. उकबानं येऊन आपल्या वस्त्रांनं त्यांचा गळा आवळण्यास सुरुवात केली. कुणीतरी अबु बक्र यांना हाक देत म्हणाला, ''तुमचे प्रेषित...!'' अबु बक्रनी उकबाला धरून मागं सारलं आणि विचारलं, ''तुम्ही फक्त या गोष्टीमुळं प्रेषितांना ठार करू पाहता की ते म्हणतात, अल्लाह माझा विधाता आहे?''

- एकदा उकबा मुहम्मद यांच्याकडं आला आणि निर्लज्जपणानं ओरडून म्हणाला, ''मी कुरआनास मानत नाही.'' नंतर तो मुहम्मद यांच्याशी रानटीपणानं वागू लागला. त्यांना हातानं धरलं, त्यांची वस्त्रं फाडली आणि थुंकू लागला.

● इस्लामचा कट्टर शत्रू, आपल्या मंडळीस म्हणू लागला, ''कुरैशच्या लोकांनो, मला वाटते मुहम्मद आमच्या धर्माला खोटं म्हणणं, आमच्या वाडवडिलांची मानहानी करणं आणि आपल्या जीवनपद्धतीला नाकारण्याचं ठरवलंय. मला आमच्या देवाची शपथ! मुहम्मद प्रार्थनेच्या वेळी नतमस्तक असताना मी त्यांच्या डोक्यात भलामोठा दगड घालीन आणि एकदाची तुमची सुटका करून देईन. त्यांच्या कबिल्याचे लोक मला काय करतील याची मला काळजी नाही.'' त्या दुर्दैवी लोकांनी त्याच्या योजनेस दुजोरा दिला आणि त्यास प्रत्यक्ष कृती करण्यास भडकविले.

दुसऱ्या दिवशी सकाळी अबु जहल मुहम्मद यांची काबागृहात प्रार्थनेसाठी येण्याची वाट पाहत बसला. कुरैशचे लोक एका खोलीत जमून पुढच्या बातमीची वाट पाहू लागले.

मुहम्मद जेव्हा नतमस्तक झाले, अबु जहल आपला हेतू साधण्यासाठी हातात दगड घेऊन पुढे सरसावला. पण तो प्रेषितांजवळ जात असतानाच मागं वळला. त्याचं तोंड पाढरं फट पडलं, त्याचे हात थरथरू लागले आणि तो दगड खाली पडला. लोक त्याला पाहत होते. ते धावत आले आणि विचारलं, ''काय झालं?'' त्यानं उत्तर दिलं, ''जेव्हा मी त्यांच्या निकट गेलो. एका अजब प्रकारच्या उंटानं ज्याचे दात कुत्र्यासारखे होते, माझी वाट अडवली आणि मला भक्ष करू पाहत होता.'' इब्ने इसहाक या संदर्भातील प्रेषितांचं एक वर्णन कथन करतात,

''ते जिब्राईल होते. जर अबु जहल आणखिन जवळ आला असता तरक त्यांनी त्यास ठार केलं असतं.''

☆

# मीडियाची दडपशाही

## अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा उपयोग व दुरुपयोग

प्रेषित मुहम्मद (त्यांना शांतता लाभो) यांच्या काळात प्रसारमाध्यमं आणि त्यासंबंधी तंत्रज्ञान आजच्यासारखं विकसित नव्हतं, किंबहुना ते अस्तित्वातच नव्हतं. तरीदेखील प्रेषित मुहम्मद आणि त्यांच्या संदेशाची निंदानालस्ती करणाऱ्यांचा तुटवडा नव्हता. मक्केतील कवी प्रेषित मुहम्मद यांची मानहानी करण्यासाठी कविता करत असत. त्या गायल्या जात आणि कशा या कविता निव्वळ शिवीगाळ, बाकी काहीच नाही.

इतिहासात प्रेषितांचं चारित्र्यहरण करणाऱ्या कवींची नोंद आहे. झुबैरचा मुलगा कअब, तलातीलपुत्र हारिस, अबीवहाबचा हुबैरा, नफीजचा मुलगा हुवैरिस आणि अब्दुल्लाहपुत्र हंजल यांचा या कवींमध्ये समावेश होता. काही कवी आपल्या कलेचा दुरुपयोग मुहम्मद यांची प्रतिमा मलीन करण्यासाठी करत.

कुरैशचे सरदार सभांचं आयोजन करून अशा कवींचं काव्यगायनाचे कार्यक्रम ठेवत होते, ज्यात प्रेषित आणि इस्लामविरोधात कविता ऐकवल्या जात. ते ऐकवण्यावरच थांबले नाहीत तर अब्दुल्लाहपुत्र हंजल गुलाम, अबु जहलपुत्र इक्रमाची गुलाम सारा या काव्य-गायन समारंभात नृत्य सादर करीत

होत्या. कुरैश यांच्या मद्यसेवन कार्यक्रमांमध्ये हे हमखास घडत होते. अश्लील आणि शिवराळ कवितांमुळे प्रेषित मुहम्मद आणि त्यांच्या अनुयायांना अनावर क्लेश आणि दु:ख होत असे. हा एकप्रकारे मानसिक छळच होता.

पवित्र कुरआनात सांगितल्याप्रमाणे 'कठीणाईनंतर समाधान' येत असते. काही वर्षांनंतर हस्सान यांच्या कअब आणि साबित या मुलांनी इस्लाम धर्म स्वीकारला. ही प्रेषितांसाठी अत्यंत आनंददायक घटना होती. हस्सान यांची इस्लाम स्वीकारण्याची घोषणा मुहम्मद यांना आल्हाददायक बातमी होती.

प्रेषितांनी हस्सान (अल्लाहची त्यांच्यावर कृपा होवो) यांना इस्लामशत्रू कवींना उत्तर देण्यासाठी प्रतिकाव्य रचण्यास सांगितलं. त्यांना प्रेषित मुहम्मद ज्या मंचावर उभं राहून प्रवचन देत असत त्यावरूनच इस्लामच्या नैतिक, सकारात्मक सिद्धान्तांवर कविता रचून ऐकविण्याची अनुमती दिली. प्रेषितांनी असेही मत व्यक्त केलं की शत्रूच्या शस्त्रापेक्षा काव्यपंक्ती अधिक प्रभावी असतात. त्यांनी एकदा असं म्हटलं होतं की एक मुस्लिम आपल्या तलवारीनं आणि शब्दांद्वारेही जिहाद करीत असतो. अशा प्रकारे प्रेषितांनी त्या कवींचं उत्तर दिलं जे कविता नव्हे तर शिवराळ कथन करीत होते.

आजची परिस्थितीही काही वेगळी नाही. जगभरातील दुष्ट प्रवृत्तीचे बुद्धिवादी, लेखक, साहित्यिक, चित्रकार, कलाकार आणि व्यंगचित्रकार आपल्या अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा दुरुपयोग करून प्रेषित मुहम्मद (स.), इस्लाम आणि मुस्लिमांची प्रतिमा मलीन करण्यात व्यस्त आहेत.

या आधुनिक जगात फक्त एकाच बाजूच्या लोकांना आपल्या अभिव्यक्तीचं स्वातंत्र्य आहे. खरं पाहता अभिव्यक्ती स्वातंत्र्याच्या धारणेमागं इस्लाम आणि मुस्लिम यांची हिंसक, अनैतिक, दुष्ट, जहाल आणि दहशत माजविणारे अशी प्रतिमा निर्माण करण्यासाठी शस्त्रासारखा उपयोग होत आहे.

मुस्लिमांना कुरआन अशा प्रवृत्तींकडं दुर्लक्ष करण्यास सांगतो, ज्या मुस्लिमांशी असभ्यपणे वागतात. जे आपल्या साहित्यामध्ये, चित्रपट आणि टी.व्ही.वरील कार्यक्रमांद्वारे रानटी, दहशतवादींच्या भूमिकांमध्ये दाखवतात. प्रेषितांचं कार्टून बनवतात आणि मीडियाद्वारे त्यांचा अपमान करतात.

(प्रेषित आणि इस्लामची) निंदानालस्ती, अवाजवी टीका-टिप्पणी किंवा गंभीर स्वरूपाचा विरोध होत असेल तर, श्रद्ध लोकांनी नैतिक संयम ठेवावा आणि संवेदनशील होऊ नये अशी कुरआनची अपेक्षा आहे.

> ''धरतीवर अशा लोकांचा भरणा आहे ज्यांचं ऐकल्यास ते तुम्हाला अल्लाहच्या मार्गापासून भरकटून टाकतील. ते आपल्या कल्पनांच्या मागे पडलेले आहेत आणि तर्कवितर्क लावत असतात, दुसरं काही नाही.''(कुरआन-६:११६)

## जादूगार

कुरैश सरदारांनी मुहम्मद (त्यांना शांतता लाभो) यांचा उपहास सुरूच ठेवला आणि इतरांनाही त्यांच्यावर टीका करणे आणि त्यांचा अपमान करण्यास भडकवित राहिले. ज्याच्याकडं कसलीही क्षमता नाही, जो बाजारात हिंडतो, इतरांपेक्षा वेगळं दिसून येण्याची ज्याच्यात कोणतीही लक्षणं नाहीत, अशा माणसाला प्रेषित म्हणून ईश्वरानं का बरं निवडलं, असा प्रश्न ते उपस्थित करीत. मुहम्मद कुटुंबांचं विभाजन करत आहेत. मुलांना त्यांच्या माता-पित्यापासून आणि पती-पत्नींना एकमेकांपासून विलग करतात. ते झपाटलेले आणि जादूगार आहेत, अशा अफवा पसरवल्या.

## *'ज्याला इच्छितो त्यास अल्लाह मार्ग दाखवतो!'*

मक्का येथील वार्षिक बाजार - महोत्सवाची वेळ जवळ येत असल्यास मुहम्मद (त्यांना शांतता लाभो) याचं औचित्य साधून बाहेरून येणाऱ्या लोकांना इस्लाम धर्म सांगतील या भीतीनं कुरैशांचे लोक प्रवेशाच्या स्थळांवर आपली माणसं उभी करत होते. बाहेरून येणाऱ्या लोकांनी मुहम्मद यांना भेटू नये वा त्यांचं ऐकू नये हे सांगणं त्यांचं काम होतं.

मुहम्मद यांना एकाकी पाडण्यात कुरैश सरदार बऱ्याच अंशी यशस्वी

झाले होते. तरीदेखील काही लोकांवर त्यांच्या प्रभावाचा परिणाम झाला नाही. बनु गिफ्फार टोळीचे अबु ज़र अशांपैकीच एक. ते दरोडेखोर होते. एकमेव ईश्वरावर श्रद्धा ठेवण्याचा नवीन संदेश ते ऐकून होते. कुरैश लोकांचा इशारा धुडकावून अबु ज़र प्रेषितांना भेटण्यास आले. त्यांनी मुहम्मद यांना काबागृहात सावलीत निजलेले पाहिलं. प्रेषितांना नावानं हाक देऊन त्यांच्या नवीन संदेशाविषयी विचारणा केली. त्यांचं ऐकून घेतलं आणि लगेचच आपली श्रद्धा व्यक्त केली. प्रेषित आश्चर्यचकित झाले. म्हणाले, ''अल्लाह ज्यास इच्छितो त्यास मार्ग दाखवतो.'' अबु ज़र गिफ्फारी (अल्लाहची त्यांच्यावर कृपा होवो) प्रेषितांचे सर्वांत जास्त प्रसिद्ध अनुयायी झाले. लोक त्यांना निष्ठा, ताठरपणा आणि विलासीपणाचं जगणं यावर त्यांची टीका करणारे म्हणून ओळखत होते.

## इस्लामचे पहिले हुतात्मा

माननीय अम्मार (अल्लाहची त्यांच्यावर कृपा होवो) अल-अरकम यांच्या घरी मूळचे यमनी माननीय अम्मार यांनी सुरुवातीलाच इस्लाम स्वीकारला होता आणि अल-अरकम यांच्या घरी प्रेषितांच्या देखरेखीत त्यांचं प्रशिक्षण झालं होतं. त्यांच्यानंतर त्यांचे पिता यासिर (अल्लाहची त्यांच्यावर कृपा होवो) आणि आई सुमय्या यांनीही इस्लाम स्वीकारला. इस्लामचा शत्रू अबु जहल यानं त्यांना आपल्या द्वेषाचं लक्ष्य बनवलं. तो त्यांना मारहाण करू लागला. ऊन्हात त्यांना बांधून ठेवून त्यांचा छळ करू लागला. अनेक दिवस त्यांना छळलं जात असतानादेखील सुमय्या यासिर यांनी इस्लाम सोडणं नाकारलं. अबु जहल आणि त्याच्या भेकड वृत्तीचा सुमय्या मोठ्यानं विरोध करीत होत्या. अबु जहलनं बेफाम होऊन सुमय्या यांना भोसकून ठार केलं आणि मग त्यांच्या पतीला मारहाण करून ठार केलं. सुमय्या आणि यासिर इस्लामचे पहिले शहीद होते. त्यांनी छळ, अत्याचार, यातनांना न जुमानता अल्लाहचं एकत्व नाकारलं नाही.

आता मुस्लिमांसाठी परिस्थिती बिकट होत चालली होती. विशेषकरून अशांसाठी ज्यांच्या सामाजिक दर्जाचा विचार केला जात नव्हता

आणि कोण्या कबिल्याशी त्यांचा संबंधही नव्हता. प्रेषित मुहम्मद (त्यांना शांतता लाभो) यांच्या संरक्षणाची हमी त्यांचे चुलते अबु तालिब आणि माननीय हमजा (अल्लाहची त्यांच्यावर कृपा होवो) यांनी घेतली होती. पण सर्वप्रथम अस्तित्वात आलेल्या मुस्लिम समुदायालाही सुरक्षा लाभत नव्हती. त्यांचा अपमान, त्यांच्याशी दुर्वर्तन आता सर्रास होऊ लागलं होतं.

५

# क्रांती

## मनांची आणि समाजाची

कुरैश लोकांचा विरोध एक व्यक्ती आणि एका संदेशापुरता नव्हता. वास्तविक पाहता ईश्वराच्या तमाम पैगंबरांना अशाच व्यवहाराला, विरोधाला आणि द्वेषाला तोंड द्यावं लागलं, कारण त्यांनी जो संदेश आणला होता त्यामुळे समाजघटकांमध्ये संपूर्ण क्रांती घडली होती.

विविध काळात जे पैगंबर येऊन गेले त्यांच्या विरोधात लोकांचं म्हणणं कुरआननं कथन केलंय. त्यांचा पहिला प्रतिसाद म्हणजे त्यांनी दिलेला नकार, ज्यामागचं कारण म्हणजे सत्तेवरून आपला ताबा निसटण्याची भीती होय. प्रेषित मूसा आणि हारून यांना फिरऔननं असेच उत्तर दिलं होतं.

> ''तुम्ही आमच्याकडं यासाठी आलात? आम्हाला आमचे वाडवडील ज्या मार्गावर आढळले त्यापासून आम्हास दूर करण्याकरिता? आणि तुला व तुझ्या भावाला या धरतीवर महानता लाभावी म्हणून? आम्ही तुम्हा दोघांना मानणार नाही.'' (कुरआन-१०:७८)

प्रेषित मुहम्मद (त्यांच्यावर शांतता होवो) लोकांना मूर्तीपूजा सोडून

देण्यास सांगत होते, त्यांना एकमेव अल्लाहला मान्य करणं, परमात्म्यावर विश्वास ठेवणं आणि नैतिकता व न्यायाच्या गोष्टींकडं बोलवत होते. प्रेषितांनी लोकांच्या मनांमध्ये आणि समाजात संपूर्ण क्रांती संचारली होती. त्यांच्या संदेशाची दिशा परलोकाकडं होती हे उघड झाल्यानं सांसारिक आणि ऐहिक सत्तेचा पायाच हादरून गेला.

एकमेव अल्लाहवर श्रद्धा, अनंताची जाणीव आणि त्याचबरोबर नैतिक शिकवणी मुस्लिमांना त्यांच्या आध्यात्मिक, बौद्धिक आणि सामाजिक स्वातंत्र्याची साधनं वाटू लागली. कुरैश लोकांना श्रद्धा आणि ईश्वराच्या एकत्वाचं महत्त्व समजलं होतं, जे मनांमध्ये खोलवर उमटणारं आणि सार्वत्रिक बदल घडवून आणणारं होतं.

> ''म्हणा, तो अल्लाह एकमेव आहे. अल्लाह, स्वयंपूर्ण आहे, त्यानं कुणाला जन्मलं नाही की कुणी त्याला जन्म दिलेला नाही. त्याच्या तोडीचा कुणी नाही.''
>
> (कुरआन-११२:१-४)

पवित्र कुरआनातील हे वक्तव्य एका अडथळ्याकडं संकेत करते,

> ''सांगून टाका, हे नाकारणारे लोकहो! मी त्याची आराधना करत नाही ज्याची तुम्ही आराधना करता. ना तुम्ही त्याची भक्ती कराल ज्याची मी भक्ती करतो. मी त्याची आराधना करणार नाही ज्याची आराधना तुम्ही करीत आहात. (तसेच) तुम्ही त्याची आराधना करणार नाही ज्याची मी आराधना करतो. तुमच्यासाठी तुमचा धर्म, माझा धर्म माझ्याकरिता.''
>
> (कुरआन-१०९:१-६)

हा अध्याय अशा प्रसंगी अवतरित झाला जेव्हा जेव्हा कुरैश सरदारांनी त्यांचा वडिलोपार्जित अनेकेश्वरी धर्म आणि प्रेषितांनी सांगितलेल्या एकेश्वरी धर्मादरम्यान तडजोड करण्याचा प्रस्ताव मांडला होता. या अवतरणाचा अर्थ स्पष्ट असून अंतिम आहे. याद्वारे त्याचं वेगळंपण ठळकपणे निश्चित होतं.

# तीन प्रश्न

कुरैशच्या लोकांना प्रेषित मुहम्मद (त्यांना शांतता लाभो) यांच्या धर्मप्रचाराला कसा प्रतिबंध घालावा हे कळत नव्हतं. त्यांनी मदीनेला एक प्रतिनिधीमंडळ पाठवून या धर्माचं मूळ आणि त्याच्या सत्यतेविषयी तेथील ज्यू धर्मियांशी माहिती मिळवण्याचं ठरवलं. मदीनेची ज्यू लोकं अशाच एकेश्वरी धर्मामध्ये विश्वास ठेवत असल्याचं माहीत होतं. प्रेषित मुहम्मद ज्यू लोकांचे प्रेषित मूसा यांचा नेहमी उल्लेख करीत होते. यामुळे ते या बाबतीत काही मत व्यक्त करणे अथवा कोणती युक्ती करावी याबाबत त्यांच्यापेक्षा दुसरे कुणी योग्य नव्हते.

प्रेषितांविषयी त्यांनी मत मांडलं त्यानुरूप ज्यू धर्मपंडितांनी मक्केच्या लोकांना मुहम्मद यांना तीन प्रश्नांची उत्तरं विचारण्याचं सुचवलं. म्हणजे ते जे सांगत आहेत ते वास्तवात अवतरलंय की नाही हे सिद्ध होईल. पहिला प्रश्न काही तरुणांच्या बाबतीत होता ज्यांना त्यांच्या लोकांनी हाकलून दिलं होतं. दुसरा प्रश्न एका महान प्रवाशाबाबत होता जो पृथ्वीच्या एका टोकापासून दुसऱ्या टोकापर्यंत गेला होता. आणि तिसऱ्या प्रश्नाद्वारे आत्म्याचा रास्त अर्थ काय याबाबत होता. ते (ज्यू लोक) म्हणाले, ''त्यांनी जर या तीन प्रश्नांची उत्तरे दिली तर ते प्रेषित असल्याचं मान्य करा.'' कुरैश लोक या भ्रमात पडले की आता त्यांच्याकडं मुहम्मद यांची कोंडी करण्याचं हे एक उत्तम साधन आहे. मक्केत परतल्यावर ते मुहम्मद यांच्याकडं गेले आणि ते तीन प्रश्न त्यांच्यासमोर उपस्थित केले. प्रेषितांनी त्यांना लगेच सांगितलं, ''तुमच्या प्रश्नांची उत्तरं मी उद्या देईन.''

पण दुसऱ्या दिवशी जिब्राईल (अल्लाहची त्यांच्यावर कृपा होवो) यांचं आगमन न झाल्यामुळे कोणतंही अवतरण आलं नाही. तिसऱ्या दिवशीही ते आले नाहीत. चौदा दिवस जिब्राईल आलेच नाहीत.

मुहम्मद यांना ज्यू धर्मपंडितांनी उपस्थित केलेल्या प्रश्नांची उत्तरं

देता आली नाहीत आणि अशा प्रकारे त्यांचा दुटप्पीपणा सिद्ध करण्यात आपण यशस्वी झालो या भ्रमाचा आनंद कुरैश लोकांना होऊ लागला. जसजसे दिवस निघून गेले मुहम्मद दु:खी होत गेले. त्यांना एकाकी तर सोडून देण्यात आलं नाही, असा विचार त्यांच्या मनात येऊ लागला.

## *इन्शाअल्लाह*

## ‘जर अल्लाहनं इच्छिलं तर’

दोन आठवड्यांनंतर प्रेषित मुहम्मद (त्यांना शांतता लाभो) यांनी एक अवतरण आणि स्पष्टीकरण प्राप्त केलं.

> ‘‘आणि कोणत्याही बाबतीत मी ते उद्या करणारच असं म्हणू नका. पण जर अल्लाहनं (तसं) इच्छिलं तरच. कधी काही विसरलं तर आपल्या विधात्याची आठवण करा. आणि म्हणा, माझा पालनकर्ता यापेक्षाही अधिक जवळचा सरळमार्ग सुचवेल अशी मला अपेक्षा आहे.’’
>
> (कुरआन-१८:२३-२४)

या अवतरणाद्वारे प्रेषितांना आठवण करून दिली की त्यांचं स्थान, त्यांचं ज्ञान आणि भवितव्य आपल्या विधात्यावर विसंबून आहे हे त्यांनी विसरता कामा नये. ‘इन्शा अल्लाह’चा अर्थ अशाच प्रकारे व्यक्त केला जाऊ शकतो. याद्वारे आपल्या मर्यादा, आपल्या हतबलतेची प्रचिती येते. आपण जे काही करू शकतो अथवा सांगतो त्यास प्रत्यक्षात उतरविणं फक्त अल्लाहच्याच हाती आहे. याचा अर्थ आपण निष्क्रिय राहावं असा तर्क लावणं चुकीचं आहे. उलट माणसानं सतत सक्रिय राहावं आणि त्याचबरोबर आपली कार्यक्षमता आणि विचारांच्या मर्यादा ओळखायला हव्यात. दुसऱ्यांदा प्रेषितांच्या हे लक्षात आणून दिलं गेलं की या जगात कसल्याही अडीअडचणी

उद्‌भवल्या तरी या पृथ्वीतलावर माणसाचं सामर्थ्य आणि स्वातंत्र्य आपल्या निर्मात्यावर अवलंबून आहे याचा विचार त्यानं सतत करीत राहावं.

यानंतरच प्रेषितांना विचारण्यात आलेल्या त्या तीन प्रश्नांची उत्तरं पुरविली गेली. त्या प्रश्नांची उत्तरं मिळवण्यात जो विलंब झाला त्यामुळे श्रद्ध लोकांची धारणा आणखीनच प्रबळ झाली आणि हेही सिद्ध झालं की जो ग्रंथ अवतरला होता तो प्रेषितांनी रचलेला नव्हता व त्यांना आपल्या विधात्याच्या मर्जीनुसारच वागायचंय.

जसे त्याच्या लक्षात आणून दिलं होतं की त्यांनी नेहमी नम्रता बाळगावी, त्यानुसार आता त्यांना आत्म्याविषयीच्या पहिल्या प्रश्नाचं उत्तर दिलं गेलं.

> ''ते आत्म्या (रूह) विषयी तुम्हांस विचारतात. त्यांना सांगा, तो माझ्या विधात्याच्या आदेशांपैकी आहे. तुम्हाला याबाबत फार थोडंच ज्ञान दिलंय.'' (कुरआन-१७:८५)

दुसऱ्या दोन किस्स्यांचं (एफेससचे सात झोपलेले तरुण आणि प्रवासी जुलकरनैन) कथन कुरआनातील अठरावा अध्याय 'कहफ'मध्ये केलंय. या कथांमध्ये विस्तृत माहिती देण्यात आलीय, ज्याची अपेक्षा मक्केतील कुरैश लोकांना तर नव्हतीच तसेच ज्यू धर्मपंडितांनाही एवढा तपशील माहीत नव्हता; प्रेषितांनाही या अवतरणापूर्वी याची कल्पना नव्हती. याच अध्यायात प्रेषित मूसा यांचंही कथन आलंय ज्यांनी विसरून एक क्षुल्लक चूक केली आणि असं म्हटलं होतं की ते प्रेषित असल्यानं त्यांना ईश्वराची माहिती आहे. त्यांची परीक्षा घेण्यासाठी त्यांचा सामना अशा व्यक्तींशी करण्यात आला ज्यांना त्यांच्यापेक्षा जास्त माहिती होती. कुरआनात हे विवरण खिजर (अल्लाहची त्यांच्यावर कृपा होवो) यांच्या बाबतीत आहे. त्यांनी मूसा यांना ईश्वराच्या ज्ञानाविषयी समजावून सांगितलं. संयम आणि नम्रपणे वागण्यामागील सज्ञानपणाची समज दिली.

मुहम्मद यांचा हा अनुभव तसेच सर्व मानवजातीला जी शिकवण

दिली गेलीय (ज्याच्या माहितीविषयीचं ज्ञान अत्यल्प आहे) की प्रत्येक घटना मुस्लिमांना त्यांची अगतिक अवस्था आणि त्यामुळे त्यांना ईश्वराची किती गरज आहे याचं स्मरण करून देते, मग त्यांची स्थिती कसलीही असो. कुरआनातील कहफ या अध्यायामध्ये ही शिकवण विस्तृतपणे दिली गेलीय. प्रेषितांनी मुस्लिमांना अशी सूचना दिली की त्यांनी आठवड्यातून एकदा शुक्रवारी या अध्यायाचा अभ्यास करावा म्हणजे त्यांनी स्वत:बरोबरच अल्लाहलाही विसरता कामा नये.

# ६

# ॲबिसिनियाकडे

## स्थलांतर

पवित्र कुरआनचं जसजसं अवतरण होत गेलं मुस्लिमांचा अपमान आणि छळही वाढत गेला. आता जे मुस्लिमांपैकी सर्वसामान्य लोक होते त्यांनाच नव्हे तर अबु बक्रसारखे प्रतिष्ठित मुस्लिमही होते आणि त्यांचं संरक्षण करत होते, त्यांनाही लक्ष्य केलं जाऊ लागलं. मुहम्मद (त्यांना शांतता लाभो) यांना त्यांचे चुलते अबु तालिब यांचं संरक्षण लाभलं होतं. आता अबु तालिब यांनाही लक्ष्य केलं गेलं. मक्केतील मुस्लिमांची परिस्थिती बिकट होत आहे हे पाहून प्रेषितांनी अशी सूचना केली :

> ‘‘जर तुम्ही ॲबिसिनिया देशास स्थलांतर केलं तर तुम्हांला तिथं एक बादशाह मिळेल ज्याच्या अधिपत्याखाली कोणाशीही अन्यायानं वागलं जात नाही. या देशात खऱ्या अर्थानं धर्म पाळला जातो. सध्या तुमचे जे हाल होत आहेत त्यांत अल्लाहनं बदल करेपर्यंत तुम्ही तिथं राहू शकता.’’

मुहम्मद ॲबिसिनियाचा बादशाह नेगूस याच्याविषयी बोलत होते. तो ख्रिस्ती धर्म पाळत होता आणि अन्य रयतेशी आदरानं आणि सन्मानानं वागत होता. मुस्लिमांमधील काही लोक ॲबिसिनियाला जाण्याची तयारी करू लागले

आणि ते मक्का सोडून ॲबिसिनियाला स्थलांतर करू लागले. सगळे मिळून ते शंभर लोक होते त्यांत २० स्त्रिया होत्या.

कुरैशच्या लोकांच्या लक्षात आलं की काही मुस्लिम मक्का सोडून गेलेत आणि ते कुठं गेलेत हे त्यांना लवकर कळलं. त्यांच्या चिंतेचं कारणदेखील होतंच. जर मुस्लिमांचा हा लहानसा गट इतरत्र स्थायिक झाला तर तो मक्केची प्रतीमा मलीन करील. एवढ्यावरच न थांबता ते तिथल्या लोकांमध्ये त्यांच्याबाबत शत्रुत्व निर्माण करतील आणि त्यांच्याविरूद्ध तिथल्या बादशहाशी संगनमत करून एक आघाडीही उघडतील. त्या बादशहाविषयी त्यांना हेदेखील माहीत होतं की मुस्लिमांसारखंच तोही एकाच ईश्वरावर श्रद्धा बाळगतो. मुस्लिम निघून गेल्यानंतर कुरैश लोकांनी नेगूस बादशाहकडं दोन प्रतिनिधी पाठवण्याचा निर्णय घेतला, ते अम्र बिनुल आस आणि रबीअहचे पुत्र अब्दुल्लाह होते, जेणेकरून बादशाहनं त्या मुस्लिमांना आश्रय देऊ नये आणि त्यांना मक्केस परत पाठवून द्यावं. दोघांचं हे शिष्टमंडळ नेगूसच्या दरबारात पोहोचलं. त्यांनी आपल्याबरोबर अनेक मौल्यवान वस्तु बादशहास भेट म्हणून देण्यास नेल्या होत्या. त्यांनी दरबारी लोकांची एक एक करून भेट घेतली आणि त्यांना भेटवस्तु दिल्या आणि दरबारींनी त्यांना आश्वासन दिलं की त्यांनी बादशहाकडं रीतसर विनंती केल्यास ते त्यांची साथ देतील.

# बादशहा नेगूस

कुरैशचे प्रतिनिधी अम्र बिनुल आस आणि अब्दुल्लाह बिन रबीआह यांना असं वाटत होतं की बादशहानं त्या मुस्लिमांची बाजू न ऐकताच परत पाठवून द्यावं. नेगूसनं यास नकार दिला. तो म्हणाला, ''ज्यांनी त्याचा आश्रय मागितलाय त्यांना आपली बाजू मांडण्याचा अधिकार आहे.'' त्यानं मक्केचे प्रतिनिधी आणि मुस्लिम शरणार्थींना दरबारात हजर करण्याचा आदेश दिला. मुस्लिमांनी अबु तालिबपुत्र जाफर (अल्लाह त्यांच्याशी राजी होवो) ते चांगले वक्ते असून समंजस असल्यानं आपली बाजू मांडण्यासाठी त्यांची निवड केली. बादशहानं त्यांच्या स्थलांतराची कारणं विशेषकरून प्रेषित मुहम्मद (त्यांना शांतता लाभो) यांनी जो नवा धर्म आणला त्याबाबत विचारणा केली. जाफर यांनी कुरआनातील मूलभूत सिद्धान्त आणि प्रेषितांच्या शिकवणी, एकाच ईश्वरावर श्रद्धा, मूर्तीपूजेस नकार, नातलगांचा आदर, सत्य बोलणं आणि अन्यायाचा विरोध करणे सविस्तर सांगितलं.

जाफर यांनी आपली बाजू मांडताना म्हटलं,

> ''बादशहा! आम्ही अडाणीपणा आणि रानटीपणाच्या खाईत खोलवर लोटलो होतो. आम्ही पापी जीवन जगत होतो. आम्ही मृत जनावरांचं मांस खात होतो आणि द्वेषभाव बाळगत होतो. आम्ही मानवतेच्या सर्व संवेदनांची अवहेलना केली. कधीच कुणाचा पाहुणचार केला नव्हता. आपल्या शेजाऱ्यांशी दुष्पणानं वागलो. जो बळकट त्यासच आम्ही कायदा समजत होतो. दुसरे कायदे माहीत नव्हते. अशात ईश्वरानं आमच्या अशा एका व्यक्तीस उभं केलं ज्याचा जन्म, सत्यनिष्ठा, विश्वासार्हता आणि शुद्धतेविषयी कुणीही शपथ वाहत होता. त्यांनी आम्हाला एकमेव अल्लाहवर श्रद्धा ठेवण्यास सांगितलं आणि त्याच्या बरोबरीनं कुणालाही जोडू नये असं शिकवलं. त्यांनी आम्हाला मूर्तीपूजा सोडून देण्यास सांगितलं, सत्य

बोलण्याची, प्रामाणिकपणा बाळगण्याची, दयेनं वागण्याची आणि शेजाऱ्यांच्या हक्काधिकारांचा आदर करण्याची ताकीद दिली. त्यांनी आम्हाला महिलांबाबत अपशब्द काढण्यास मनाई केली. अनाथांची मालमत्ता लुबाडण्यास मज्जाव केला. त्यांनी आम्हाला दुष्टवृत्तीपासून अलिप्त राहण्याचा, उपासना करण्याचा, दानधर्म करण्याचा आणि उपवास पाळण्याचा आदेश दिला. आम्ही त्यांच्यावर श्रद्धा व्यक्त केली. त्यांच्या शिकवणी आणि आदेश स्वीकारले. याच कारणामुळं आमची लोकं आमच्या विरोधात उभी राहिली. त्यांनी आम्हास छळलं, एकमेव ईश्वराची उपासना सोडून देण्यास सांगितलं आणि दगड, लाकुड व इतर कशाच्याही मूर्तींची पूजेकडं मागं वळण्यास सांगितलं. त्यांनी आमचा छळ केला आणि यातना दिल्या. त्यांच्यामध्ये राहून आम्हाला संरक्षण मिळणार नाही, म्हणून आम्ही तुमच्या देशात आलो. आम्हाला अपेक्षा आहे की आपण त्यांच्या अत्याचारांपासून आमचं संरक्षण कराल.''

नेगूस बादशहा जाफर यांच्या वक्तव्यानं हेलावून गेला आणि त्या अवतरणाचा काही उतारा किंवा त्याचं पठण करू शकता का अशी त्यांच्याकडं विचारणा केली. जाफर यांनी होकार दिला आणि कुरआनातील 'मरयम' या अध्यायाच्या आयतींचं पठण सुरू केलं.

''ग्रंथात मरयमचा उल्लेख करा, जेव्हा त्या आपल्या कुटुंबीयांना सोडून पूर्वेकडच्या एका जागी गेल्या आणि मग त्यांच्यापासून त्यांनी पडदा केला, मग आम्ही त्यांच्याकडं मानवरूपी आमच्या दूतास पाठवलं. मी तुझ्यापासून परम दयावंताचा आश्रय मागते, जर तू सदाचारी असशील तर (येथून निघून जा.) तो म्हणाला, मी तुझ्या विधात्याकडून पाठवला गेलोय, तुम्हांस एका पावन मुलाची भेट देण्यासाठी. त्या म्हणाल्या, मला कोणा पुरुषानं स्पर्श केला

> नाही आणि आणि मी शुद्धता भंग केली नसताना कसं बरं मला मुलगा होईल? ते म्हणाले, असेच होईल, तुझा विधाता म्हणतो, त्यास हे सोपं आहे. लोकांसाठी त्यास एक संकेत बनवण्यासाठी आमच्या कृपेचं हे घडणं ठरवलेलंच आहे.''
> (कुरआन-१९:१६-२१)

बादशहा आणि त्याचे दरबारी लोकं या अरबी मजकुराच्या आकर्षणानं हेलावून गेली. आणि जेव्हा या आयतींचा अनुवाद करून सांगितला गेला आणि त्यांना जेव्हा प्रेषित येशू (त्यांच्यावर शांतता होवो) यांचा जन्म कसा चमत्कार होता हे कळून चुकलं तेव्हा ते जास्तच भारावून गेले. नेगूस बादशहा आश्चर्यानं म्हणाला, ''वास्तविक पाहता हे त्याच माध्यमानं आलंय जे प्रेषित येशूंनी आणलं होतं.'' तो मक्केच्या त्या प्रतिनिधींकडं वळला आणि त्यांची विनंती धुडकावून लावली आणि त्यांना कळवलं, ''मुस्लिम स्थलांतरितांना त्यांच्या हवाली करणार नाही, ते आमच्या शरणात राहतील.''

# मरयमपुत्र येशू

कुरैशचे प्रतिनिधी अम्र आणि अब्दुल्लाह रागानं बाहेर पडले. पण अम्रनं लगेच नेगूस बादशहाकडं जाण्याचा निर्धार केला आणि या नवीन संदेशात येशू ख्रिस्ताविषयीचा उल्लेख त्याच्या लक्षात आणून देईल, जो ख्रिस्ती धार्मिक धारणांशी विपरित आहे. दुसऱ्या दिवशी त्यानं हेच केलं. नेगूसनं जाफर आणि त्याच्या प्रतिनिधीमंडळास बोलावून घेतलं आणि येशू ख्रिस्ताबाबत प्रेषित मुहम्मद यांचं म्हणणं काय आहे याबाबत अधिक माहिती मागितली. मुस्लिमांना या प्रकरणाचा धोका बळावत होता. दोन धर्मांतील फरकाचे स्पष्टीकरण केल्यास नेगूस त्यांना परत पाठवू शकतो हे त्यांना माहीत होते. तथापि त्यांनी त्या संदेशात काहीही बदल न करता सत्य काय तेच सांगायचं ठरवलं.

नेगूसनं प्रश्न केला, ''मरयमपुत्र येशू ख्रिस्तांविषयी तुमची काय

धारणा आहे?''

जाफर यांनी उत्तर दिलं, ''प्रेषितांनी आम्हाला जे शिकवलंय तेच आम्ही सांगतो. येशू ख्रिस्त ईश्वराचे भक्त आणि त्याचे प्रेषित. त्याचा आत्मा आणि त्याचे बोल आहेत. त्यांना शुद्ध आणि पवित्र मरयमनी जन्म दिला.''

यात ते ईश्वरपुत्र आहेत याकडं संकेत दिले नव्हते. नेगूसनं काठी हातात धरली आणि म्हणू लागला, ''येशू ख्रिस्त (त्यांच्यावर शांतता होवो) मरयम (त्यांच्याशी अल्लाह राजी होवो) यांचे पुत्र होते. त्यांच्याविषयी तुम्ही जे काही बोलला ते या काठीपेक्षा जास्त नव्हते.''

धार्मिक नेतेमंडळींना हे ऐकून आश्चर्य वाटलं आणि ते खाकरून आपल्या भावना व्यक्त करू लागले. नेगूस यांनी त्यांच्याकडं लक्ष दिलं नाही आणि मक्केच्या प्रतिनिधींना त्यांनी आपल्या भेटवस्तुंसहित परत लोटण्याचा आदेश दिला. त्यांनी मुस्लिमांचं परत एकदा स्वागत केलं आणि त्यांना या देशात संरक्षण दिलं जाईल याचं आश्वासन दिलं.

# जोखीम आणि सत्यता

मक्केच्या लोकांसाठी ही मोठी पिछेहाट होती. त्यांचे प्रतिनिधी परतल्यावर मुस्लिमांवरील अत्याचारांनी आणखी जोर धरला. जाफर आणि त्यांचे मुस्लिम साथीदार एका ख्रिस्ती बहुल देशात स्थिर झाले. त्यांच्या धारणांशी त्यांचा कसलाही संबंध नसतानादेखील त्यांना सामावून घेतलं गेलं. त्यांची सुरक्षा करू लागले आणि त्यांच्याशी सहिष्णुतेचा व्यवहार करू लागले. अत्यंत धोकादायक समयी त्यांनी सत्य तेच बोलण्याचं ठरवलं होतं. नेगूसच्या प्रश्नाला टाळलं नाही की मुहम्मद (त्यांना शांतता लाभो) यांनी मरयमपुत्र येशूविषयी जे सांगितलं त्यास खोटं म्हटलं नाही. त्यांनी खऱ्या अर्थानं परत पाठवण्याचा धोका पत्करला होता. मुस्लिम आपल्या श्रद्धेशी चिकटून राहिले, ज्यात त्यांनी अगदी प्रमाणिकपणे आपली बाजू मांडली होती. त्यांच्याकडं सत्य सांगण्यापलीकडं दुसरा पर्यायच नव्हता. त्यांनी तेच केलं.

बादशहा नेगूस यांनी नंतर इस्लाम स्वीकारला आणि सतत प्रेषित मुहम्मद (त्यांना शांतता लाभो) यांच्या संपर्कात राहिले. त्यांचा मृत्यु झाल्याची बातमी मिळताच प्रेषितांनी त्यांच्यासाठी प्रार्थना (सलातल गैब) केली. त्या देशात स्थलांतरीत केलेल्या बहुसंख्य मुस्लिम खैबरच्या युद्धापर्यंत जवळपास १५ वर्षं (इ.स. ६३०) तिथंच वास्तव्यास होते. आणि मग ते मदीनेस येऊन मुहम्मद यांना मिळाले. इतर मुस्लिम मक्केत स्थिती सुधारत असल्याचं कळल्यावर मक्केला परतले. नेगूस यांच्या राज्यात त्यांना कोणत्याही अडचणी आल्या नव्हत्या.

☆

## अध्यात्म आणि धैर्य

# हमजा

(अल्लाह त्यांच्यावर राजी होवो)

सर्वत्र काळोख पसरला असताना अन्याय आणि अत्याचाराच्या काळ्याभोर ढगांनी वातावरण दूषित झालेलं असताना क्षितीजावर एक प्रकाश दिसला, म्हणजेच अब्दुल मुत्तलिबपुत्र हमजा यांनी इस्लामप्रवेश केला, ही प्रेषितकाळाच्या सहाव्या वर्षात घडलेली घटना होय.

एकदा प्रेषित मुहम्मद (त्यांना शांतता लाभो) सफा टेकडीवर बसले होते. अबु जहल तिथून जात होता. त्यानं मुहम्मद यांच्या धर्मास शिवीगाळ सुरू केली. तरीदेखील मुहम्मद शांतपणे बसले. एक शब्दही उच्चारला नाही. अबु जहलनं आपलं दुर्वर्तन सुरूच ठेवलं. एक दगड उचलला आणि प्रेषितांच्या डोक्यावर मारला. त्यांच्या डोक्यातून रक्त वाहू लागलं. थोड्याच वेळानं माननीय हमजा शिकारीहून परतताना त्याच मार्गानं जात होते. त्यांच्या खांद्यावर त्यांचे बाण लटकवलेले होते. एका गुलाम मुलीनं, जिनं ही घटना पाहिली होती, अबु जहलच्या या दुर्वर्तनाचा अहवाल माननीय हमजा यांना सांगितला.

हे ऐकून हमजा फार दु:खी झाले आणि लगेच काबागृहाची वाट धरली. तिथल्या प्रांगणात त्यांनी अबु जहलला कुरैश लोकांबरोबर बसलेलं पाहिलं. हमजा धावून त्याच्या अंगावर गेले आणि त्याच्या डोक्याला बाणानं

मारलं व म्हटलं, "तू मुहम्मद यांना शिव्या देतो?" ते पुढं म्हणाले, "मीसुद्धा त्यांचा धर्म पाळतो." असं सांगून ते मुहम्मद यांच्याकडं गेले आणि म्हणाले, "मी अबु जहलशी तुमचा बदला घेतला. आता तुम्ही समाधानी व्हा." प्रेषितांनी उत्तर दिलं, "मला बदल्याशी काहीही देणंघेणं नाही. पण जर तुम्ही मुस्लिम झाला असाल तर मग स्वत:स अल्लाहला समर्पित करा. जर तुम्ही असं केलं तर मला खरंच आनंद होईल." हमजा यांना त्यांचा संदेश कळला आणि ते मुस्लिम झाले.

हमजा यांनी जाहीर घोषणा केली की ते आता मुस्लिम झाले आहेत आणि यापुढे ते स्वयं आपल्या पुतण्याची रक्षा करतील. आता अबु जहलनं मुहम्मद यांना त्रास देण्याचं सोडून दिलं. मात्र जे गरीब आणि निराधार होते त्यांच्याशी दुर्वर्तन करू लागला.

खरे पाहता हमजा यांनी जे धर्मांतर केलं त्यामागं त्यांच्या नात्यातील कुणाचाही अवमान करता कामा नये ही भूमिका होती. नंतर मात्र अल्लाहनं त्यांच्या आत्म्याचं शुद्धीकरण केलं आणि त्यांनी अल्लाहवर अमर्याद विश्वास व्यक्त केला. इस्लाम आणि त्याचा अंगीकार करणाऱ्यांसाठी ते खंबीर आधार ठरले.

# उमर

(अल्लाह त्यांच्यावर राजी होवो)

इस्लामला दुसरा भक्कम आधार लाभला तो उमर यांच्या इस्लामप्रवेशानं. त्यांनी प्रेषितकाळच्या सहाव्या वर्षात आणि माननीय हमजा यांच्या इस्लामप्रवेशाच्या तिसऱ्या दिवशी इस्लाम स्वीकारला होता. ते एक धैर्यशील व अविचल वृत्तीचे व्यक्ती होते. मक्केत त्यांचा दरारा होता. लोकांवर त्यांचा धाक होता आणि ते त्यांचा आदर करीत. त्याआधी ते इस्लामचे कडवे विरोधक होते. अशी एक परंपरा सांगण्यात येते की मुहम्मद (त्यांना शांतता लाभो) यांनी हात पसरवून प्रार्थना केली,

> ''अल्लाह! इस्लामला शक्ती दे, विशेषकरून अबु जहल बिन हिशाम किंवा उमर बिन खत्ताब यांच्या माध्यमानं, ज्यांच्यावर तुझं प्रेम आहे.''

एकेदिवशी उमर फार निराश होते. त्यांनी निर्णय घेतला की एकच केलं जाऊ शकते की मुहम्मद यांना ठार मारणं. हाच खात्रीचा उपाय होता ज्याद्वारे मक्केतील बंडाळी, अनाचार ज्यामुळे साऱ्या समाजाला धोका निर्माण झालाय त्याचा अंत होऊ शकतो.

हातात तलवार घेऊन उमर घराबाहेर पडले आणि मुहम्मद यांना इकडंतिकडं पाहू लागले. रस्त्यात त्यांना नुयम भेटले. त्यांनी गुप्तपणे इस्लाममध्ये धर्मांतर केलं होतं. नुयमनी मुहम्मद यांची हत्या करण्याचा आपला इरादा असल्याचं सांगितलं. त्यांनी उमर यांना सल्ला दिला की मुहम्मद यांचा निकाल लावण्याआधी त्यांनी आपल्या कुटुंबाची खबर घेतलेली बरी. त्यांनी उमर यांना माहिती दिली की त्यांची बहीण आणि मेहुणे सईद यांनी आधीच इस्लाम धर्म स्वीकारलाय. आश्चर्यचकित होऊन रागाच्या भरात उमर यांनी आपला विचार बदलला आणि थेट बहिणीचं घर गाठलं.

उमर यांची बहीण फातिमा (अल्लाह त्यांच्याशी राजी होवो), त्यांचे

पती आणि अन्य एक तरुण खब्बाब (अल्लाह त्यांच्याशी राजी होवो) तिघं मिळून कुरआनचं पठण करीत होते. त्यांनी जेव्हा कुणीतरी घरी येण्याचा आवाज ऐकला तेव्हा खब्बाब यांनी कुरआनचं पठण थांबवलं आणि लपून बसले. उमर यांनी कुरआन पठणाचा आवाज ऐकला होता. त्यांनी त्यांना अत्यंत रागानं आणि निर्दयीपणानं ते काय वाचत असल्याचं विचारलं. त्या दोघांनी वस्तुस्थिती नाकारली पण उमर यांनी ते काय वाचत होते त्याबाबत सांगण्याचा आग्रह धरला. मात्र त्या दोघांनी उत्तर देण्यास नकार दिला तेव्हा रागानं उमर याचा पारा चढला. त्यांनी आपल्या मेहुण्यास मारायला उडी घेतली, तोच त्यांच्या बहिणीनं आडवं येण्याचा प्रयत्न केला. उमर यांनी त्यांना मारलं, त्यामुळे त्यांच्या डोक्यातून रक्त वाहू लागलं. आपल्या बहिणीचा चेहरा रक्तानं माखलेला पाहताच उमर यांच्यावर त्याचा प्रभाव पडला आणि ते थांबले. त्याचक्षणी त्यांची बहीण जोरजोरानं म्हणू लागली, ''होय, नक्कीच आम्ही मुस्लिम आहोत. एकच शक्तिशाली अल्लाह आणि त्याच्या प्रेषित यांच्यावर आमची श्रद्धा आहे. तुम्हाला जे काही करायचंय ते करा.'' उमर यांना धक्काच बसला. आपल्या बहिणीला मारहाण करण्याचं त्यांना दु:ख झालं होतं. तसेच आताच जी काही बातमी त्यांनी ऐकली त्यामुळे आश्चर्यात पडले. ते आपल्या बहिणीला म्हणाले, ''मी येत असताना तुम्ही जे वाचत होता तो मजकूर मला द्या.'' त्यांच्या बहिणीनं सांगितलं की त्यांनी आधी हातपाय धुवून (वुजू करून) पवित्र व्हावं. स्थितीचं भान ठेवून त्यांनी तसं केलं आणि मग वाचायला सुरवात केली,

> ''ताहा. आम्ही तुम्हांस कष्ट देण्यासठी हे कुरआन अवतरलं नाही. पण जे भितात त्यांच्यासाठी मात्र हे बोध घडवण्यासाठी आहे. ज्यानं ही धरती आणि उंच-उंच आकाशं निर्माण केलीत त्याच्याकडून अवतरलेला. (जो) महान कृपावंत सिंहासनावर आरुढ आहे. आकाश आणि पृथ्वीत आणि त्यांच्या उभयतांत आणि जमिनीखाली सर्वकाही त्याच्याच मालकीचं आहे. तुम्ही मोठ्यानं बोलला तरी आणि जे काही गुप्त अथवा लपलंय ते सर्व त्यास ठाऊक

> आहे. अल्लाहशिवाय कुणी ईश्वर नाही. सारी सुंदर नावं त्याचीच आहेत.'' (कुरआन-२०:१-८)

उमर यांनी सुरवातीच्या या आयती वाचल्या आणि ते वाचतच राहिले, ज्यामध्ये मूसा यांना अल्लाहनं सिनाई पर्वतावर पाचारण केलं होतं त्याचा वृत्तान्त होता. ते खालील आयतीपर्यंत पोहोचले,

> ''निश्चितच मीच अल्लाह आहे, माझ्याव्यतिरिक्त कुणी ईश्वर नाही. तेव्हा माझी आराधना करा आणि माझ्या आठवणीसाठी नमाज कायम करा.'' (कुरआन-२०:१४)

उमर यांनी वाचन थांबवले आणि त्या शब्दांच्या सुंदरतेविषयी आपली आस्था व्यक्त केली. उमर यांना उत्साहित पाहून खब्बाब बाहेर आले आणि त्यांना ही माहिती दिली की त्यांनी मुहम्मद यांना अल्लाहशी अशी प्रार्थना करताना ऐकलंय की अबु जहल किंवा उमर यांनी इस्लाम धर्मात प्रवेश करून मुस्लिमांच्या पाठिशी उभं राहावं. उमर यांनी विचारलं, ''मुहम्मद कुठं आहेत?'' ते अल-अरकम यांच्या घरी असल्याचं सांगितल्यावर ते तिथं गेले. उमर दरवाजापाशी येऊन उभे राहिले तेव्हा त्यांना पाहून तिथली लोकं घाबरली, कारण उमर यांच्या हातात अजूनही तलवार होती. प्रेषितांनी त्यांना सांगितलं, ''उमर यांना आत येऊ द्या.'' आणि उमर लगेचच मुस्लिम होण्याचा आपला मनोदय सांगितला. प्रेषितांनी ''अल्लाहु अकबर'' अल्लाह महान आहे) ची घोषणा दिली आणि उमर यांना इस्लाम धर्मात प्रवेश दिला. त्यांच्या 'त्या' प्रार्थनेचं ते उत्तर होतं.

# मनांची क्रांती

प्रेषित मुहम्मद (त्यांना शांतता लाभो) हे जाणून होते की त्यांना लोकांच्या मनांवर कोणताही अधिकार नाही. अत्यंत कठीण परिस्थिती आणि त्यांचा छळ होत असताना त्या दोघांपैकी (अबु जहल आणि उमर (अल्लाह त्यांच्याशी राजी होवो)) एकाला मार्ग दाखवील या आशेनं वळले होते. त्यांना हे माहीत होतं की त्यांच्यामध्ये मानवी गुण आहेत त्याचबरोबर या परिस्थितीत बदल करण्याचं सामर्थ्य त्यांच्यात आहे. प्रेषितांना हे चांगलं ठाऊक होतं की लोकांचं मनपरिवर्तन फक्त अल्लाहच करू शकतो. काही लोकांसाठी इस्लाम स्वीकारण्याची प्रक्रिया फार लांबत होती. ते प्रश्न विचारत होते, कधी एक पाऊल पुढं तर दुसरं पाऊल मागं टाकीत असत. त्यांच्या मनांमध्ये शंका होत्या. तर काही लोक कुरआन वाचून लगेच प्रतिसाद देत होते. ज्यांनी धर्मांतरास बराच काळ लावला किंवा ज्यांनी तत्क्षणी तो स्वीकारला त्यांचा इस्लाम भक्कम स्वरूपाचा होता आणि दुसऱ्यांचं तसं नव्हतं अशातली गोष्ट नाही. जेव्हा माणूस धर्मांतर करतो, मनाची तयारी, श्रद्धा आणि प्रेम या गोष्टी लक्षणीय असतात आणि बाकी जी उरते ती ईश्वराची अलौकिक शक्ती.

उमर प्रेषितांची हत्या करण्याचं निश्चित करून घराबाहेर पडले होते. एकमेव ईश्वराला नाकारण्यात ते आंधळे झाले होते. काही तासांच्या आतच ते पार बदलून गेले. त्यांच्या स्वभावात बदल झाला. याचे कारण कुरआननं घडवून आणलेलं त्यांच धर्मांतर आणि ईश्वराचा अर्थ होय. ज्या व्यक्तीस जिवे मारण्याची त्यांची इच्छा होती आता ते त्यांचेच निष्ठावंत अनुयायी बनले. ज्या तीव्रतेनं ते इस्लामचा द्वेष करीत ते पाहता मुस्लिमांमधील कुणीही अशी कल्पना केली नव्हती की ते इस्लाम स्वीकारतील. मनाचं हे परिवर्तन एक प्रकारचे संकेत होते. यात दुहेरी अर्थ दडलेला होता. एक म्हणजे अल्लाहसाठी काही अशक्य नाही तसेच कुणी कोणत्याही बाबतीत किंवा व्यक्तीविषयी आगाऊ निर्णय लावू नये.

उमर (अल्लाह त्यांच्याशी राजी होवो) यांनी आपल्या आत्मिक साहसाच्या जोरावर ापल्या इस्लामप्रेमाची जाहीर घोषणा करण्याचा निर्णय

घेतला. ते अबु जहललाही बातमी देण्यासाठी तात्काळ त्याच्याकडं गेले. काबागृहात उघडपणे प्रार्थना (नमाज) करण्याची सूचना त्यांनी प्रेषितांना दिली. यात नक्कीच धोका होता. त्याचबरोबर कुरैश सरदारांना हे ठळकपणे कळवून द्यायचं होतं की त्यांच्यामध्ये मुस्लिम लोकही आहेत आणि ते ठाम आहेत. उमर आणि हमजा दोघंही खंबीर व्यक्तिमत्वाचे होते. मुस्लिमांच्या पुढं पुढं काबागृहाकडं निघाले आणि तिथं त्यांनी नमाज अदा केली. त्यांना अटकाव करण्याची कुणी हिंमत दाखवली नाही.

# ७

# प्रतिबंध

तरीदेखील भयंकर घटना घडत गेल्या. दिवसेंदिवस तणाव वाढत चालला. कुरैश लोकांनी इस्लाम प्रचारास आळा घालण्यासाठी बैठक बोलावली. ते टोकाची भूमिका घेण्याच्या मन:स्थितीत होते. इस्लाममध्ये प्रथम प्रवेश घेणारे सर्वच टोळ्यांमधील होते त्यामुळं नेहमीसारखी एकत्रित आघाडी करून एखादी युक्ती योजणे त्यांना शक्य नव्हते. लांबलचक आणि तापलेल्या चर्चेअंती, ज्यामुळं कबिले एकमेकांपासून विभक्त झाली. प्रेषित मुहम्मद (त्यांना शांतता लाभो) यांच्या कबिल्यावर प्रतिबंध घालण्याचा आणि त्या कबिल्याला व त्यामधील सदस्यांना पूर्णपणे बहिष्कृत करण्याचा निर्णयही घेण्यात आला. त्यांच्या मुलामुलींशी कुणी लग्न करायचं नाही, त्यांच्याशी व्यापार-व्यवहार करायचा नाही किंवा त्यांच्याशी कोणताही संबंध ठेवायचा नाही, असं ठरवलं.

एक करारनामा करून त्यावर कुरैशच्या चाळीस सरदारांच्या स्वाक्षऱ्या घेण्यात आल्या आणि तो काबागृहामध्ये लटकण्यात आला जेणेकरून या निर्णयाचं गांभीर्य आणि त्याचं अंतिम स्वरूप लोकांच्या लक्षात यावं. अबु लहब, ज्याचा संबंध हाशिम कबिल्याशी होता त्यानंसुद्धा प्रतिबंधास पाठिंबा देत त्या कबिल्याशी नातं तोडलं.

बहिष्काराचा हा काळ बनी हाशिम आणि मुस्लिमांसाठी अतिशय भयंकर होता. हा प्रतिबंध सुरू असताना प्रेषितांचे चुलते अबु तालिब यांना अरुंद घाटीत शरण घ्यावी लागली. प्रेषित मुहम्मद आणि त्यांचे अनुयायी तीन

वर्षं त्या घाटीत राहिले. घाटीकडं होणारा सर्व प्रकारचा पुरवठा बंद करण्यात आला होता. प्रेषित मुहम्मद आणि त्यांच्या अनुयायींना कैक वेळा झाडांची पानं व मूळ खाऊन जीवन कंठावं लागलं.

आता परिस्थिती गंभीर होत चालली. त्यांच्यातले अनेक लोक भुकेनं आजारी पडू लागले. हा प्रतिबंध तीन वर्षं अंमलात होता त्यामुळे हे दोन्ही कबिले आर्थिक टंचाईत सापडले. अबु बक्र (अल्लाह त्यांच्याशी राजी होवो) यांना या बहिष्कारामुळे आर्थिक हानी सहन करावी लागली. त्यांना सामाजिक आणि मानसिक दबाव सहन होत नव्हता.

# कराराचं विसर्जन

कुरैशमधील अनेक लोकांच्या मते हा करार निरुपयोगी नसला तरी अनावश्यक अवश्य होता. काही लोकांचे या कबिल्याशी नातेसंबंध होते जे विसरणं किंवा नाकारणं शक्य नव्हतं. या तीन वर्षांच्या काळात हा प्रतिबंध संपुष्टात आणण्याकरिता बरेच प्रयत्न झाले, पण त्यांना यश आलं नाही. कारण काही प्रमुख व्यक्ती, जसे अबु जहल आणि अबु लहब यांनी या प्रश्नावर विचार करण्यास नकार दिला. शेवटी काही लोकांनी पुढाकार घेतल्यानं परिस्थितीत बदल घडून आला. ज्या काही लोकांनी याची सुरुवात केली होती ते हा करार संपुष्टात आणण्यासाठी पुढं सरसावले आणि त्यातील सर्व अटी रद्दबातल ठरवल्या. त्यांनी शपथ घेतली की जोवर बहिष्काराचं ते पत्र फाडलं जात नाही तोवर ते थांबणार नाहीत. अबु जहल जवळच होता. तो धिटाईनं म्हणाला, ''असं कधीच होणार नाही.''

दरम्यान, अन्याय-अत्याचाराच्या आधारावर त्या जाहीरनाम्या–वरील अल्लाहचं नाव असलेली जागा सोडून बाकी साराच्या सारा कागद वाळवीनं खाऊन टाकला. असं कुरआनच्या एका अवतरणाद्वारे प्रेषितांना कळवण्यात आल्याची बातमी घेऊन अबु तालिब कुरैश सरदारांकडं आले. ते जे काही बोलले ते जर खोटं असल्याचं सिद्ध झालं तर मुहम्मद यांना त्यांच्या

हवाली करण्याची तयारीही त्यांनी दर्शवली अन्यथा त्यांनी टाकलेला बहिष्कार परत घ्यावा आणि तो रद्द करावा. त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा प्रामाणिकपणा पाहता मक्केवाल्यांनी हे मान्य केलं. कुरैश सरदार मुतअम ते पत्रक (शेळी किंवा मेंढीच्या कातडीवर लिहिलेला मजकूर) पाहण्यासाठी निघाला आणि तिथं त्यास ते वाळवीनं खाऊन टाकल्याचं आढळून आलं. फक्त अल्लाहचं नाव जिथं लिहिलं होतं तेवढा भाग मात्र शिल्लक होता.

जहालमतवादींना आता आग्रह धरण्याचं कोणतंच कारण दिसत नव्हतं. तो जाहीरनामा रद्द करून बहिष्कार उठवण्यात आला. प्रेषित मुहम्मद आणि त्यांच्या अनुयायींना घरी परतण्याची परवानगी दिली गेली. मुस्लिमांच्या या परीक्षेद्वारे कुरैश सरदारांना मुहम्मद यांना प्रेषित मान्य करण्याची सुवर्णसंधी मिळाली होती, पण त्यांनी तसं केलं नाही आणि अश्रद्धेत आणखीनच गुरफटले. कुरआनचं म्हणणं आहे,

> ''पण तरी ती संकेतं पाहूनसुद्धा पाठ फिरवतात. म्हणतात,
> ही तर जादू आहे, पूर्वापार चालत आलेली.''
>
> (कुरआन-५४:२)

# दुःखद वर्ष

बहिष्कार संपल्यानंतर अल्पशा मुस्लिम समुदायाची परिस्थिती बरीच वर्षं सुधारली होती. ते कुरैश लोकांशी पुन्हा मिलन आणि नातेसंबंध वाढवू लागले. प्रेषित मुहम्मद (त्यांना शांतता लाभो) यांनी मक्केतील लोकांना धर्म सांगणं सुरूच ठेवलं, तरीपण अवमान-अत्याचार काही थांबला नव्हता.

घटनाक्रम नाट्यमयरित्या बदलत गेला. प्रेषितपत्नी खदीजा (अल्लाह त्यांच्याशी राजी होवो) बहिष्कार उठल्यानंतर थोड्याच वेळानं वारल्या. त्या मक्केतील सर्वांत श्रीमंत महिला होत्या. त्यांनी आपली सर्व संपत्ती गोरगरिबांच्या कल्याणासाठी दान दिली. त्या मुहम्मद यांच्या पत्नी असून त्यांच्या श्रद्धेतही सहभागी होत्या. गेली २५ वर्षं मुहम्मद यांना त्यांचा भक्कम

पाठिंबा लाभला होता. इस्लामचं मिशन साध्य झाल्यावर नऊ वर्षांनी ईश्वरानं इ. स. ६१९ मध्ये त्यांना परत बोलावलं. याचं प्रेषितांना अतिशय दु:ख झालं होतं. त्यांच्या बाजूनं खदीजा यांची उपस्थिती अल्लाहची सुरक्षा आणि त्याच्या प्रेमाचंच एक प्रतीक होतं हे त्यांना माहीत होतं.

काही काळ उलटला नाही तोच प्रेषितांचे चुलते आजारी पडले. त्यांना भेटण्यास प्रेषित गेले असता तिथं त्यांनी आपले शत्रू अबु जहल आणि अबी उमय्या यांना पाहिलं. त्यांनी आपल्या चुलत्यांना विनंती केली, ''अल्लाहशिवाय दुसरा कुणीही ईश्वर नाही अशी तुम्ही कबुली द्यावी, मी अल्लाहकडं याची साक्ष देईन (की तुम्ही श्रद्धा धारण केली होती म्हणून).'' अबु जहल आणि अबी उमय्या यांनी अबु तालिब यांना गळ घातली, ''तुम्ही तुमच्या पित्याच्या ईश्वरास सोडून देणार?'' मुहम्मद निरंतर विनंती करू लागले आणि अबु जहल व अबी उमय्याही पुन्हा पुन्हा ते उच्चारित राहिले. सरतेशेवटी अबु तालिब यांनी अंतिम निर्णय घेतला. ते आपल्या पित्याच्या धर्मास चिकटून राहिले आणि अल्लाहच सत्य ईश्वर आहे अशी कबुली देण्याचं नाकारलं. यावर प्रेषित मुहम्मद म्हणाले,

''अल्लाहची शपथ! जोवर मला अल्लाह मनाई करत नाही, तोवर मी निरंतर तुमच्यासाठी माफी मागत राहीन.''

या प्रकरणावर विचार करण्यासाठी त्यांच्याकडं वेळ नव्हता. अबु तालिब यांचा मृत्यु झाला त्या वेळी मुहम्मद त्यांच्या समीप होते. ज्या माणसानं आदरपूर्वक आणि मोठ्या धाडसानं मुहम्मद यांना सुरक्षा दिली, स्नेहपूर्वक आदर केला, पण त्यानं इस्लामचा स्वीकार केला नाही. मुहम्मद त्यांचा फार आदर करीत होते. त्यांना अतिव दु:ख झालं होतं. याच संदर्भात कुरआनची एक आयत अवतली, ज्यात मनाची स्थिती आणि त्याच्या रहस्याविषयी शिकवण आहे.

> ''तुम्ही आपल्या मर्जीप्रमाणे कुणास मार्गदर्शन करू शकत नाही, पण अल्लाह ज्यास इच्छितो त्याला मार्गदर्शन करतो, कारण त्यास ठाऊक आहे कोण मार्गदर्शन स्वीकार करतो.''
>
> (कुरआन-२८:५६)

# *खदीजा*

## (काळजी वाहणारी पत्नी)

### (अल्लाह त्यांच्यावर राजी होवो)

माननीय खदीजा (अल्लाह त्यांच्यावर राजी होवो) यांनी काही साधारण तर काही दु:खद घटना त्या काळात घडत असताना जी भूमिका निभावली त्याचं महत्त्व सांगणं आवश्यक आहे. त्याच पहिल्या व्यक्ती होत्या ज्यांनी प्रेषित मुहम्मद (त्यांना शांतता लाभो) यांच्या प्रामाणिकपणा, त्यांचं चारित्र्य, उमदेपणा आणि त्यांच्या स्वच्छ स्वभावाकंड लक्ष दिलं आणि परंपरेविरूद्ध त्यांनी आपली मैत्रीण नुफैसाद्वारे आपल्या लग्नाचा प्रस्ताव त्यांच्याकडं पाठवला. त्यांच्या ऐक्यातून त्यांना आनंद व सुख-दु:ख मिळालं. कासिम व अब्दुल्लाह या आपल्या दोन मुलांना बालपणी हरवलं. चार मुलीच तेवढ्या जिवंत राहिल्या. अरबांमध्ये मुलीचा जन्म लाजिरवाणा मानला जात होता. अशा वातावरणात प्रेषित मुहम्मद आणि त्यांच्या पत्नींनी आपल्या मुलींचा किती प्रेमानं आणि काळजीपूर्वक सांभाळ केला याची प्रचिती येते आणि जाहीरपणे याची त्यांनी कबुली दिली.

वयाच्या चाळीसाव्या वर्षी जेव्हा मुहम्मद यांना सर्वप्रथम कुरआनचं अवतरणं लाभलं. ते लगेचच आपल्या पत्नीकडं वळले आणि सर्वांत अगोदर त्यांच्या बाजूनं उभं राहणाऱ्या त्याच होत्या. त्यांना आधार देत होत्या आणि गत वर्षांत त्यांनी एका अशा व्यक्तीस न्याहाळलं होतं ज्यांचं वैशिष्ट्य हे त्यांचं स्वाभाविक चारित्र्य होतं. प्रेषित मुहम्मद जेव्हा हिरा नामक गुहेतून विचलित अवस्थेत आपलं काय होईल या भीतीनं खदीजा यांच्याकडं आले तेव्हा त्यांनी प्रेषितांना आपल्या प्रेमाचा आधार दिला. त्यांना त्यांच्या सद्‌गुणांची आठवण करून दिली आणि त्यांच्यात आत्मविश्वास निर्माण केला. पहिलं अवतरण त्यांच्यासाठी एक अलौकिक भेट तसेच त्यांची परीक्षा दोन्ही होते. ते एकाकी आणि गोंधळून गेले होते. ते आपल्या पत्नीकडं वळले, ज्यांनी त्यांना लगेच धीर आणि आधार दिला. त्या क्षणापासून त्या दोघांनी मिळून परीक्षेचा सामना केला. त्याचा अर्थ समजण्याचा प्रयत्न करू लागले. अल्लाहच्या हाकेस प्रतिसाद देऊ

लागले आणि आध्यात्मिक दीक्षेच्या वाटेवर चालू लागले. या संबंधानं खदीजा यांची मुहम्मद यांच्या परीक्षेच्या केंद्रस्थानी उपस्थिती म्हणजे अल्लाहचं प्रतीकच होय. इस्लाम स्वीकार करण्यात खदीजा सर्वांत अग्रेसर होत्या आणि इस्लाम कार्याच्या सुरुवातीची दहा वर्षं त्या त्यांच्या बाजूनं उभ्या होत्या एकनिष्ठ अनुयायी होऊन. पंचवीस वर्षं प्रेषितांच्या सहवासात त्याच एक पत्नी होत्या. त्यांची उपस्थिती मुहम्मद यांना सुरक्षा प्रदान करीत होती आणि त्यांच्याबरोबरच त्यादेखील आपल्या नातेवाईकांच्या अत्याचारास बळी पडल्या. त्यांना टाकून देण्यात आलं. खदीजा यांना जेव्हा मुहम्मद यांच्या ईश्वरानं निवड केल्याचं कळलं तेव्हा त्या स्वतंत्र, प्रतिष्ठित व आदरणीय होत्या. एका पत्नीच्या स्वरूपात ते अत्यंत काळजीवाहक, सदैव तत्पर आणि निष्ठावंत होत्या. त्या धर्मनिष्ठ, सच्चा मनाच्या व ठाम वृत्तीच्या मुस्लिम होत्या. अल्लाहचे शेवटचे प्रेषित एकटे नव्हते. त्यांना ईश्वराच्या देणगीचा स्पष्ट संकेत त्यांच्या जीवनातील त्या महिला होत्या.

मुहम्मद यांच्या जीवनामध्ये त्यांच्या उपस्थिती आणि त्यांच्या भूमिकेबाबतचं वर्णन कुरआनच्या एका आयतीत दडलंय, जिचा अर्थ खूप काही सांगून जातो, जिचं अवतरण पुढच्या काळात झालं होतं आणि ज्यामध्ये पती-पत्नीमधील नात्याचं विवरण आहे.

> ''त्या तुमची वस्त्रं आहेत आणि तुम्ही त्यांची वस्त्रं आहात.''
> (कुरआन-२:१८७)

त्या एका वस्त्राप्रमाणे होत्या जे सुरक्षा देतं (आत्मिक व भौतिक), झाकून घेतं उष्णता, शक्ती, मानमरातब आणि सभ्यता प्रदान करतं.

आपल्या पत्नी खदीजा यांच्या मृत्युसमयी प्रेषितांना दु:ख आवरेना. ते भावनावश होऊन म्हणाले होते,

> ''तिनं माझ्यावर विश्वास टाकला, जेव्हा माणसांना माझा विश्वास वाटत नव्हता. तिनं माझ्यावर भरवसा ठेवला आणि इतरांनी मला खोटं ठरवलं. तिनं मला आधार दिला आणि मदत केली वैयक्तिक व संपत्तीनिशी, जेव्हा लोकांनी मला टाळलं. अल्लाहनं मला तिच्यापासून मुलंबाळं दिलीत.''

# ताईफ

ज्या व्यक्तीनं प्रेषित मुहम्मद (त्यांना शांतता लाभो) यांना स्नेह व सुरक्षा पुरविली होती ती गेल्याच्या काही महिन्यांत ते एकदम कमजोर दिसू लागले. स्वत: दु:खी अवस्थत असतानादेखील त्यांना लवकरच मक्केतील मुस्लिमांच्या बचावाची उपाययोजना करणं गरजेचं होतं. मुहम्मद यांनी शहराबाहेर जाऊन पाठिंबा मिळवण्याचं ठरवलं.

जून महिन्याच्या आरंभी प्रेषित्वाची जबाबदारी आल्याच्या दहा वर्षानंतर इ. स. ६१९ मध्ये मुहम्मद ताईफकडं पायीच निघाले. हे शहर मक्केपासून ६० कि.मी.च्या अंतरावर आहे. सोबत त्यांनी आपल्या गुलामीतून मुक्त केलेल्या जैद यांना घेतलं होतं आणि इस्लाम धर्म सांगण्यास सुरुवात केली. ते प्रतिसाद देतील या आशेनं त्यांनी बनी सकीक टोळीच्या लोकांशी संवाद साधला. त्यांना त्यांच्याकडून काही प्रतिसाद मिळाला नाही, उलट ते 'प्रेषित कसे' यावरून त्यांची चेष्टा करण्यात आली. त्या लोकांनी विचारलं, ''अनोळखी कबिल्याच्या लोकांचा आधार मागण्यास ईश्वरानं कसं बरं सांगितलं असेल?'' त्यांनी या विषयावर बोलण्यास केवळ नकारच दिला नाही तर त्यांच्या विरोधात लोकांना जमवून त्यांच्या मागं लावून दिलं. ते तिथून निघत असताना मुलं त्यांचा पाठलाग करू लागली. त्यांना दगडांनी मारलं. त्यांच्या पायातून रक्त वाहू लागलं. त्यांना वाचविण्यासाठी जैद पुढं येताच त्यांच्या डोक्यावर मारण्यात आलं. टेकड्यांनी वेढलेल्या वाळवंटात तीन मैल दूरवर ती मुलं त्यांच्या मागं येतच राहिली. थकलेल्या अवस्थेत प्रेषितांनी तिथल्या एका बागेत आश्रय घेतला. जेव्हा माणसांमधून कुणीच त्यांना आधार दिला नाही तेव्हा अल्लाहकडं वळले आणि विनंती करू लागले,

> ''हे ईश्वरा! मी तुझ्याकडंच माझ्या दुर्बल अवस्थेविषयी, माझ्याकडील क्षुल्लक साधनं आणि माझ्या नगण्य अवस्थेविषयी तक्रार करतो. कृपावंतांपैकी महान कृपावंत तू दुर्बलांचा स्वामी असून तूच माझा विधाता आहे. तू मला कोणाच्या हवाली केलंस? दूरवरच्या अनोळखी लोकांकडं

जे माझ्याशी दुर्व्यवहार करतात? किंवा एखादा अशा शत्रू ज्यास तू माझ्यावर अधिकार दिला? जोवर तुला माझा राग नाही, मला मुळीच भीती नाही तरी तुझ्या दयेचा आधार माझ्यासाठी मार्ग मोकळा करील आणि नवी क्षितीजं उघडील. ज्यामुळे सर्वत्र प्रकाश पसरतो आणि काळोख नष्ट होतो अशा तुझ्या तेजस्वी अस्तित्वास मी शरण येतो. या जगातील सर्व काही आणि परलोकातदेखील सारी व्यवस्था तुझीच. मी राग व क्रोध ओळखत नाही, तरीदेखील तुझं समाधान होत नाही तोवर मला सूचना देत राहणं हा तुझ्या प्रतिष्ठेचा भाग आहे. तुझ्यावर कुणीच सामर्थ्य बाळगत नाही की कुणास शक्ती नाही.''

त्या विशिष्ट प्रसंगी इतर लोकांपासून दूर त्या उदंड कृपावंतावर श्रद्धा ठेवून एका तासात त्यांनी संपूर्णपणे आणि प्रत्यक्षात स्वत:स अल्लाहला वाहून दिलं. या कल्पनेमध्ये आपली ही प्रार्थना मुहम्मद यांची सर्व सामर्थ्यावानाशी जी जवळीक होती तिच्यातील विश्वास व सौहार्दाचं दर्शन घडवते. ही प्रार्थना जशी प्रसिद्ध झाली ती आम्हाला मानवजातीची लाचारी आणि मुहम्मद यांच्या अलौकिक आध्यात्मिक शक्तीविषयी बरंच काही सांगून जाते. वरकरणी जरी ते एकटे आणि निराधार दिसत असले तरी ते एकाकी पडले नाहीत याची त्यांना जाणीव होती.

## एक गुलाम

त्या बागेचा मालक प्रेषित मुहम्मद (त्यांना शांतता लाभो) यांना काही अंतरावरून बागेत येताना पाहत होता आणि त्यांनी आपले हात पसरून ईश्वराकडं जी प्रार्थना केली ते बारकाईनं पाहिलं. त्यांनी आपल्या ख्रिस्ती गुलाम अद्दास याला द्राक्षांचा एक घड देऊन त्यांच्याकडं पाठवलं. जेव्हा अद्दासनं प्रेषितांना द्राक्षं दिली तेव्हा त्यांनी 'बिसमिल्लाह' (अल्लाहच्या नावानं) चा उच्चार केल्याचं ऐकलं. अद्दासनं आश्चर्यचकित होऊन त्यांची ओळख

विचारली. ज्यांनी अशा शब्दांचा उच्चार केला जे एका ख्रिस्तीनं अनेकेश्वर पाळल्याचं कुणा व्यक्तीकडून ऐकलं नव्हतं. मुहम्मद यांनी त्यास विचारलं की तो कुठला आहे? अद्दासनं उत्तर दिलं की तो निनेव्हचा (आता इस्राईलमधील) रहिवासी आहे. प्रेषित म्हणाले, जोनाहचा मुलुख मत्ताचा प्रामाणिक पुत्र. तो तरुण आश्चर्यचकित होऊन गोंधळात पडला. या माणसाला ते कसे माहीत. तो ख्रिस्ती असल्याचं सांगून अद्दासनं प्रेषित मुहम्मद यांना विचारलं की ते कोण आहेत आणि त्यांना हे कसं माहीत? प्रेषितांनी त्यास उत्तर दिलं, ''जोनाह माझे भाऊ होत. ते प्रेषित होते आणि मीही प्रेषितच आहे.''

अद्दासनं प्रेषितांना टक लावून पाहिलं आणि मग त्यानं त्यांच्या डोक्याचं, हातांचं आणि पायाचं चुंबन घेतलं. हे पाहून त्याच्या मालकांना धक्का बसला आणि जेव्हा तो त्यांच्याकडं परतून म्हणाला की त्या माणसाला जे माहीत आहे ते फक्त एका प्रेषितालाच कळत असते. काही मिनिटांच्या चर्चेनंतर अद्दासनं लगेच इस्लाम स्वीकारला.

ॲबिसिनियाच्या ख्रिस्ती बादशाहनं दोन धर्मांमधील दुवा लगेच ओळखला होता आणि हा तरुण गुलाम तोही ख्रिस्तीच, ज्याच्या भावना तशाच प्रकारच्या होत्या. दुखावलेल्या आणि एकाकी पडलेल्या मुहम्मद यांना या मार्गात अशा दोन ख्रिस्ती व्यक्तींची भेट झाली ज्यांनी त्यांच्यावर विश्वास टाकला. त्यांचा आदर केला आणि त्यांना शरण दिली. एका गुलामानं प्रेषितांची अशा वेळी सहायता केली जेव्हा प्रत्येकानं त्यांना व त्यांच्या धर्माला नाकारलं होतं आणि एका बादशाहनं अशाच परिस्थितीत मुस्लिमांचं स्वागत केलं आणि त्यांना सुरक्षा दिली.

त्या अदृश्य दैवी मदतीमुळे अल्लाहच्या अंतिम प्रेषितांचा उत्साह वाढला. त्यांच्या मनाला शांतता मिळाली आणि मग ते मक्केकडं परत निघाले.

# मदीनेत प्रगतीशील

मक्केपासून जवळच असलेल्या अल-अकबाह या ठिकाणी मुहम्मद (त्यांना शांतता लाभो) यांची मदीनेच्या एका समूहाशी भेट झाली. ते खजरज टोळीतील होते. मदीनेतील दोन परस्परविरोधी महान टोळ्यांपैकी एक (दुसरे औस टोळीतील होते). मुहम्मद यांनी त्यांना इस्लाम धर्म सांगितला. त्यांनी प्रेषितांचं ऐकून घेतलं आणि इस्लाम धर्म स्वीकारला. त्यांनी आपल्या टोळीतील इतरांना इस्लाम धर्माचा आशय समजावून देण्याचं आश्वासन दिलं. तसेच ते सतत प्रेषितांच्या संपर्कात राहतील हेही सांगितलं. ते आपल्या ठिकाणी परतले आणि मदीनेत इस्लाम धर्माचा प्रसार करू लागले.

एका वर्षनंतर मक्केतील महत्त्वाच्या प्रसंगी यात्रेकरू आणि व्यापारी लोक पुन्हा येणार होते. मदीनेचे प्रतिनिधी आणि प्रेषित मुहम्मद यांच्या परत एका भेटीचं आयोजन अल-अकबाह या ठिकाणी केलं होतं. तिथं मदीनेची परिस्थिती आणि पुढील कारवाईबाबत अहवाल सांगण्यात आला होता. या भेटीत मदीनेच्या बाराह लोकांनी ज्यामध्ये अवस कबिल्याचे दोन व्यक्ती होते, भाग घेतला. त्यांनी मुहम्मद यांच्यावर निष्ठा राखतील, एकमेव अल्लाहचीच ते उपासना करतील तसेच ते इस्लामची कर्तव्य पाळतील अशी शपथ घेतली. ते मदीनेमधील सर्वप्रथम मुस्लिम समुदाय बनले. मुहम्मद यांनी त्यांच्याबरोबर उमैरचे पुत्र मुसब यांना पाठवलं. ते शांत स्वभावाचे, विचारवंत होते. तसेच कुरआनचे पठण अतिशय सुंदर आवाजात करीत होते.

मदीनेत परतल्यावर त्या लोकांनी इस्लामचा प्रसार सुरू केला. मुसअब (अल्लाह त्यांच्याशी राजी होवो) त्यांना इस्लाम धर्माची शिकवण देऊ लागले, त्यांना कुरआन वाचून दाखवू लागले आणि मदीनेच्या लोकांनी उपस्थित केलेल्या प्रश्नांची उत्तरं देऊ लागले.

वर्षानुवर्षं चालत आलेल्या औस आणि खजरज टोळीतील विभागणीचा विचार न करता दोन्ही कबिल्यांच्या लोकांनी इस्लाम धर्म स्वीकारला आणि त्यांच्यातील पूर्वापार चालत आलेला विरोध निरर्थक आहे हे त्यांच्या लक्षात आलं. इस्लाममधील बंधुभावानं त्यांच्यात ऐक्य निर्माण केलं.

कबिल्यांचे सरदार मात्र इस्लाम स्वीकार करण्यास धजावत नव्हते. मुसअब भांडखोर लोकांच्या हल्ल्यांना कोणतीही प्रतिक्रिया न देता त्यांना सांगत असत, ''बसा आणि इस्लाम धर्म ऐकून घ्या. तुम्हाला पटलं तर स्वीकार करा नसता सोडून द्या.'' परिणामी इस्लामचा स्वीकार करणाऱ्या प्रतिष्ठित लोकांची संख्या वाढत गेली.

नंतरच्या वर्षी यात्रेच्या प्रसंगी, मदीनेतील मुस्लिमांच्या प्रमुख प्रतिनिधींची प्रेषितांनी भेट घेतली. या शिष्टमंडळात दोन स्त्रियांसह एकूण सत्तरजण होते आणि त्यांचा संबंध खजरज आणि औस या दोन्ही कबिल्यांशी होता. ते प्रेषितांना इस्लामप्रति त्यांच्या निष्ठेची शुभवार्ता देण्यास आले होते. औपचारिक चर्चेअंती त्यांनी एक तह केला, ज्यानुसार मदीनेच्या मुस्लिमांनी प्रेषितांना आणि मक्केतील मुस्लिम, स्त्रिया आणि मुलांना सुरक्षा देणयाची हमी घेतली होती.

या दुसऱ्या करारानुसार त्यांनी मक्केतील मुस्लिम बंधु व भगिनींना शरण देण्याची जी तयारी दाखवली होती, प्रेषितांनी एका आशादायी भविष्याची दारं उघडली. त्यानंतर प्रेषितांनी मुस्लिमांना मदीनेकडं स्थलांतर करून जाण्यास उद्युक्त केलं. मात्र त्यांच्या जवळचे अनुयायी त्यांच्या सोबतच राहिले.

## षड्‌यंत्र

मक्केत प्रेषित मुहम्मद (त्यांना शांतता लाभो) यांना संरक्षण पुरविणारे त्यांचे अलीकडच्या काळातील अनुयायी मुतअम यांचा नुकताच मृत्यु झाला होता. परिस्थिती बिकट होत चालली होती. मुस्लिम मक्का सोडून जात आहेत हे जेव्हा कुरैश लोकांच्या लक्षात आलं तेव्हा ते अधिकाधिक हिंसक विरोध करू लागले. कुरैश सरदारांनी ऐक्य घडवून आणलं. अबु जहल आणि अबु लहब यांच्या संगनमतानं त्यांनी प्रेषितांना ठार करण्याचं ठरवलं. योजनेनुसार प्रत्येक कबिल्यातून एका व्यक्तीची त्यांनी या कामासाठी निवड केली, कारण बनु

हाशम कबिल्याच्या लोकांना याचा बदला घेण्यासाठी साऱ्याच कबिल्यांचा विरोध पत्करणं अवघड जाईल आणि ते रक्ताचा मोबदला मागू शकणार नाहीत. वेळ न दवडता त्यांनी प्रेषितांपासून लवकरात लवकर मुक्त होण्याचं ठरवलं.

काही दिवसांपूर्वी अनुभूतीद्वारे स्वप्नात झपाट्यानं प्रगती पावत असलेलं एक शहर त्यांच्या स्वागतार्थ उदयास येतंय. या स्वप्नाची पुष्टी करण्यासाठी जिब्राईल त्यांच्याकडं आले. जिब्राईल यांनी त्यांना मदीनेकडं स्थलांतराची तयारी करण्यास सुचवलं. त्यांच्याबरोबर अबु बकर असतील. प्रेषितांनी अबु बक्र यांना ही बातमी दिली. आनंदानं त्यांच्या डोळ्यांत अश्रु आले. पुढच्या रात्री त्यांच्या जागी माननीय अली यांना झोपण्यास सांगितलं आणि जोपर्यंत ते आदेश देत नाहीत तोवर मक्का सोडू नये, असंही त्यांनी सांगितलं.

कुरैश मारेकऱ्यांना घरातून काही आवाज ऐकू आला, तेव्हा त्यांना वाटलं की मुहम्मद आता उठून जाण्याची तयारी करत आहेत. ते त्यांच्यावर हल्ला करण्याच्या घाईत असतानाच त्यांना फसवण्यात आल्याचं त्यांच्या लक्षात आलं. त्या घरात त्यांचे पुतणे अली होते. कुरैश आणि त्यांच्या साथीदारांची योजना फोल ठरली.

८

# हिजरत

## (स्थलांतर)

प्रेषित मुहम्मद (त्यांना शांतता लाभो) यांना एकमेव अल्लाहवर अखंड विश्वास होता आणि घटनाक्रम बदलत जाताना ते कधीही त्या विश्वासापासून ढळले नाहीत. कुरआनातील एका अवतरणाद्वारे त्यांना कोणतंही कार्य करण्याआधी त्यांनी 'इन्शाअल्लाह' (जर अल्लाहनं इच्छिलं तर) असं म्हणणं कधीही विसरू नये, अशी शिकवण देण्यात आली होती. विशेष म्हणजे अल्लाहचं स्मरण नम्रतेनं करावं हेही कळवलं होतं. (आपण एक मनुष्य असून आपलं सामर्थ्य मर्यादित आहे हे लक्षात ठेवून.)

गेल्या दोन वर्षांपासून प्रेषित मुहम्मद मदीनेकडं स्थलांतर करण्याची योजना करीत होते आणि कदापिही काही गैर घडू नये याची काळजी घेत होते. त्यांनी अत्यंत कुशलतेनं आणि काळजीपूर्वक मानवी सामर्थ्य उपयोगात आणून स्वत:स दैवी इच्छेस वाहून घेतलं. अशा प्रकारे त्यांनी आम्हास 'अत्-तवक्कुल अल्लाह' (अल्लाहवर भरवसा ठेवणं आणि स्वत:स त्याच्या अधिन करणं) चा अर्थ स्पष्ट करून दिला. आमच्यापैकी प्रत्येकास बौद्धिक, आध्यात्मिक, मानसिक आणि भावनात्मक गुण लाभलेत. त्याचबरोबर त्यांचा उपयोग करण्याची क्षमताही दिली गेलीय. तसेच आम्ही मानवी नम्रतेनं हे लक्षात ठेवलं पाहिजे की फक्त अल्लाहच घटना घडवत असतो. वास्तविक पाहता ही शिकवण दैववादी कल्पनेच्या अगदी विपरित आहे. (म्हणजे सर्व घटना

नशिबानं ठरवलेल्या असतात आणि म्हणून माणूस आपलं नशीब बदलू शकत नाही.) जेव्हा माणूस आपल्या परिनं सर्वकाही प्रयत्न करून थकतो, त्यानंतर अल्लाह माणसाची मदत करतो. कुरआनातील खालील आयतींचा अर्थ हाच आहे.

> ''कोणत्याही जनसमूहाच्या परिस्थितीत अल्लाह तोवर बदल करत नसतो जोवर ते स्वत:च बदल करत नसतात''
> (कुरआन, १३:११)

# अबु बक्र

## (अल्लाह त्यांच्यावर राजी होवो)

प्रेषित मुहम्मद (त्यांना शांतता लाभो) आणि माननीय अबु बक्र अल्लाह त्यांच्यावर राजी होवो) यांनी रात्रीच्या वेळी मक्का सोडण्याचा निर्णय घेतला आणि लोकांच्या लक्षात येऊ नये यासाठी त्यांनी येमेनकडं प्रस्थान केलं. दक्षिणकडं निघाल्यावर ते काही दिवस सौर गुहेत लपून पसले.

सर्व प्रकारची पूर्वकाळजी घेतल्यानंतरदेखील कुरैशच्या काही लोकांना शंका आली. ते गुहेच्या दारापर्यंत पोचले आणि आत शिरण्याच्या तयारीत होते. ज्या ठिकाणी अबु बक्र (अल्लाह त्यांच्याशी राजी होवो) उभे होते तिथून त्यांनी त्या लोकांना पाहिलं आणि ते प्रेषितांना म्हणू लागले, ''जर त्या लोकांनी खाली पाहिलं तर ते आम्हां दोघांना पाहू शकतात.''

> प्रेषित मुहम्मद यांनी त्यांना धीर देत म्हटलं, ''घाबरू नका. अल्लाह आपल्या पाठीशी आहे.'' (कुरआन, ९:४०)

त्यानंतर प्रेषित म्हणाले, ''तुम्ही अशा दोन व्यक्तींसंदर्भात काय म्हणता ज्यांच्यासोबत अल्लाह आहे?''

प्रेषितांच्या या बोलण्यानं अबु बक्र यांचं सांत्वन झालं. सौर गुहेच्या

दारावरच एका कोळ्यानं आपलं जाळं विणून ते झाकून टाकलं आणि एका कबुतरानं आपलं घरटं बांधलं. हे त्या लोकांना आढळलं. आता मुहम्मद गुहेत लपले नसतील हे उघड झाल्यावर ते लोक तिथून दुसरीकडं त्यांना पाहायला निघाले. प्रेषित मुहम्मद आणि त्यांचे सोबती अबु बक्र यांनी काळजीपूर्वक योजलेला मार्ग अवलंबला असतानाही त्यांना आणखीन एका परीक्षेस तोंड द्यावं लागलं. कोळ्यासारख्या एका क्षीण जीवानं त्यांच्या प्राणाचं रक्षण केलं होतं आणि त्या वेळी मुहम्मद यांनी अबु बक्र यांना अल्लाहवर विश्वास ठेवण्याचं त्या विशिष्ट क्षणी स्मरण करून दिलं होतं. त्याचा परिपूर्ण अर्थ आणि त्यामध्ये दडलेली शक्ती आता त्यांच्या लक्षात आली, एकमेव अल्लाहच आपल्या प्रेषिताचं रक्षण करू शकतो. जेव्हा प्रेषित मुहम्मद यांनी मक्का सोडलं त्या वेळी आपण कुणाचं देणं नाही याची त्यांनी दक्षता घेतली होती. त्यांनी भेटवस्तु घेतल्या नव्हत्या. आपलं कर्ज चुकतं केलं आणि ज्यांनी आपल्या ठेवी त्यांच्याकडं ठेवल्या होत्या त्या परत करून टाकल्या. त्याचबरोबर त्यांना याची जाणीव होती की ते हरप्रकारे अल्लाहचे ऋणी आहेत. त्याच्या ऋणानुबंधाची आणि त्याच्या उपकारांची कुठलीच सीमा नव्हती.

अबु बक्र यांनी मदीनेची अपरिचित व कुणास ठाऊक नसलेली वाट दाखवण्यासाठी एक मुस्लिमेतर खेडूत उरकयात याला बरोबर घेतलं. आधी ठरल्याप्रमाणं उरकयात वेळेवर येऊन सौर गुहेत त्यांना भेटला. त्यांनी आधी पश्चिमेकडंची वाट धरली आणि मग दक्षिणेस जाऊन ज्या दिशेनं मदीनेस जायचं होतं त्या पूर्वेकडं निघाले. मक्केपासून ३४० कि.मी.चे अंतर आणि खडतर प्रवास. त्यात जर कुरैश लोकांनी त्या तिघांना पाहिलं असतं तर त्यांना नक्कीच ठार केलं असतं. मुहम्मद आणि इस्लामची घडू पाहणारी क्रांती संपुष्टात आली असती.

प्रेषित मुहम्मद आणि त्यांचे सोबती अबु बक्र यांनी स्वत:स पूर्णपणे अल्लाहला वाहून घेतलं होतं. तरीपण त्यांनी एका अशा खेडुताची मदत घेण्यास मागंपुढं पाहिलं नाही ज्याचा संबंध अनेकेश्वरी शत्रूशी होता. उरकयातचा विश्वासूपणा सर्वांच्या परिचयाचा होता. तसेच तो एक निष्णात वाटाड्या होता. (प्रेषितांनी निवडलेल्या वाटेची त्याला चांगली माहिती होती.)

मुहम्मद यांच्या आयुष्यात असे अनेक प्रसंग होते. त्यांच्या भोवती असलेली माणसं मुस्लिम नसली तरी त्यांच्यातल्या नैतिक आणि मानवी मूल्यांना प्रेषित ओळखत असत. मुहम्मद त्यांच्यावर विश्वास ठेवण्यास कधीही कचरले नाहीत.

# *स्थलांतर*

## परीक्षा विश्वासाची

प्रेषित मुहम्मद (त्यांना शांतता लाभो) आणि त्यांच्या सर्व अनुयायींना आपल्याच कबिल्याच्या कुटुंबातील भाऊबंधकीच्या त्रासास आणि छळास कंटाळून मक्का सोडून द्यावं लागलं. परिस्थिती हाताबाहेर गेली होती. पुरुष आणि स्त्रिया मारल्या गेल्या, इतरांचा छळ केला जात होता. शेवटी कुरैश लोकं प्रेषितांच्याच जिवावर उठली होती. मुस्लिम पुरुष आणि महिलांसाठी ज्यांना स्वतंत्रपणे इस्लाम धर्म पाळता येत नव्हता, त्यांच्यासाठी देश सोडून जाणं हाच पहिला व वास्तविक पर्याय होता. त्यांनी आपल्या श्रद्धेसाठी त्यांच्यापासून आपला संबंध तोडण्याचा निर्णय घेतला. अल्लाहची पृथ्वी उदंड आहे. या कुरआनच्या म्हणण्यानुसार त्यांनी आपली मायभूमी सोडून जायचं आणि आपल्या आवडीनिवडी त्यागून फक्त इस्लामच्या श्रद्धेसाठी परदेशाचा अनुभव घ्यायचं ठरवलं.

पवित्र कुरआनच्या एका अवतरणात त्या मुस्लिम श्रद्ध लोकांच्या निश्चयाची आणि हिंमतीची प्रशंसा करण्यात आली ज्यांनी एकमेव अल्लाहवर विश्वास ठेवून मानवी अंगानं एक अतिशय कठीण उपाय निवडला होता.

> ''ज्यांच्यावर अत्याचार झाल्यामुळे त्यांनी अल्लाहसाठी आपली घरंदारं सोडली तर आम्ही त्यांना या जगात चांगली जागा देऊ. आणि परलोकात तर त्यांना याहून अधिक लाभेल. तेवढं त्यांनी (ज्यांनी स्थलांतर केलं नाही त्यांना)

> जाणून घेतलं असतं. ज्यांनी धैर्य दाखवलं आणि आपल्या विधात्यावर भिस्त ठेवली.'' (कुरआन, १६:४१-४२)

आपली मायभूमी सोडून जाणं ही त्याच विश्वासाची दुसरी परीक्षा होय. सर्वच प्रेषितांना याचा प्रत्यय आलाय आणि त्यांच्या प्रत्येक अनुयायींनाही हे भोगावं लागलंय. किती लांब ते जाऊ शकतात आणि एक अल्लाह, त्याचं सत्य आणि त्याच्या प्रेमापोटी ते आपल्या प्राणांची कुठवर बाजी लावतील, ही श्रद्धेची अनंत प्रश्नं आहेत ज्यांचा संबंध श्रद्धेच्या ऐहिक व ऐतिहासिक अनुभवांशी होता. अशा प्रसंगी मुस्लिम समुदायासमोर उभ्या ठाकलेल्या प्रश्नांचं उत्तर हिजरत (स्थलांतर) मध्ये दडलं होतं.

खरं पाहता प्रथमत: मुस्लिम झालेल्यांना बदलत्या परिस्थितीत, नव्या देशात, अनोळखी सभ्यतामध्ये वावरताना इस्लामची श्रद्धा आणि शिकवणींशी एकनिष्ठ राहता यावं यासाठी स्थलांतराची गरजच होती. मदीना म्हणजे नवी परंपरा आणि सामाजिक संबंधांची नवी गरज होती.

देश सोडून जाणं म्हणजे एका गंभीर अनुभवासारखंच, स्वत:च मुळासकट उपटून जाणं, त्याच वेळी त्याच ईश्वराची श्रद्धा बाळगत राहणं म्हणजे विविध वातावरणात त्याच अर्थांनी कायम राहणं.

इस्लामच्या कारणानंच आपला छळ होतोय म्हणून निष्ठावंत मुस्लिमांनी क्लेष पोचवणाऱ्या लोकांशी नातं तोडून वेगळी वाट धरणं. असं करताना त्यांनी हे दाखवून दिलं की आता ते अत्याचार सहन करणार नाहीत. अत्याचारपीडितावस्था त्यांना मान्य नाही. मुख्य गोष्टी साधीच होती. जाहीरपणानं अल्लाहचं नाव घेणं म्हणजे आता ते स्वतंत्र आहेत अथवा ते मुक्त होत आहेत हे दाखवून देणं. हाच संदेश पहिल्यांदा प्रेषितांनी दिला होता आणि नंतर मक्केतील सर्व गुलामांना अबु बक्र यांनी हाच संदेश दिला. इस्लाममधील त्यांचा प्रवेश म्हणजे त्यांचं स्वातंत्र्य आणि इस्लामच्या सर्व शिकवणी याकडंच खूण करीत होतं. यापुढं आध्यात्मिक मुस्लिमांना एकत्रितपणे (एका व्यापक उद्दिष्टाकडं) बोलावलं जात होतं. श्रद्धेसाठी स्वातंत्र्य व न्याय निकडीचा असतो. त्यासाठी व्यक्तिगत व सामूहिकरीत्या किंमत मोजावी लागते. हिजरत (स्थित्यंतर) बाबतही हेच सत्य होतं.

हिजरत (स्थित्यंतर) म्हणजे थोतांड ईश्वरांना, दुष्कृत्यांना व पापांना सोडून देण्यासाठीची मानसिक तयारी. आपल्या आयुष्यातील मूर्तींकडं (सत्ता, धनसंपत्ती आणि संस्कृती) पाठ फिरवणं. खोटं बोलणं व अनैतिकतेपासून लांब जाणं. स्वत:स अशा सर्व प्रकारच्या स्वातंत्र्यापासून मुक्त करून घेणं ज्या सवयींना आपण अंगीकारलं असेल. हीच ती हिजरतची आध्यात्मिक बाजू. नंतरच्या काळात प्रेषितांना सर्वोत्तम हिजरतबाबत विचारलं असता ते म्हणाले होते,

> ''म्हणजे तुम्ही स्वत:स सर्व कुकृत्यांपासून मुक्त करून घेणं (तिरस्कार, खोटं बोलणं व पाप).''

या आध्यात्मिक स्थित्यंतराचा निरनिराळ्या अविष्कारात वारंवार प्रत्यय येत होता.

अशा प्रकारे मुस्लिमांनी जे स्थलांतर केलं होतं - मक्का सोडून मदीनेला गेले होते. खरे पाहता त्यांना इस्लामच्या विशिष्ट प्रकारच्या शिकवणींचा प्रत्यय आला होता. कारण त्यांना परत स्वत:कडं वळायचं होतं. मनांचं परिवर्तन करायचं होतं. मदीनेकडं त्यांचा ऐहिक प्रवास आपल्या आत्मियतेकडं एक प्रकारचं आध्यात्मिक स्थित्यंतर होतं. ते आपलं शहर आणि आपलं मूल सोडून परत स्वत:ला मिळाले. आपल्या अल्लाहशी जवळीक साधली आणि ऐतिहासिक शक्यतांपलीकडच्या जीवनाचा अर्थ कळला.

उमर (अल्लाह त्यांच्याशी राजी होवो) यांनी नंतरच्या काळात इ. स. ६२२ मध्ये याच घटनेपासून नववर्षाची सुरुवात केली. हाच तो आध्यात्मिक स्थित्यंतराचा अनुभव प्रत्येक काळात, अनंत काळापर्यंत जी व्यक्ती परत स्वत:कडं घेऊन जाते आणि त्यास स्वत:च्या बाबतीत भ्रामक कल्पना आणि प्रतिमांपासून मुक्त करतो. अल्लाहसाठी स्थलांतर करण्याचा आंतरिक अर्थ म्हणजे प्रश्नांची एक श्रृंखला जी अल्लाह प्रत्येक व्यक्तीसमोर उपस्थित करतो.

तुम्ही कोण? तुमच्या जगण्याचा अर्थ काय? कुणीकडं तुम्ही जात आहात? अशा स्थलांतराचा धोका पत्करताना आणि अल्लाहमध्ये विश्वास ठेवून जे उत्तर दिलं जाऊ शकते म्हणजे - मी तुझ्याद्वारे स्वत:कडं वळतो, मी आता मुक्त आहे.

# ९

# मदीना

मक्केपासून कुबापर्यंतचा प्रवास वीस दिवसांचा होता. प्रेषित मुहम्मद (त्यांना शांतता लाभो) आणि माननीय अबु बक्र (अल्लाह त्यांच्याशी राजी होवो) मदीनेच्या लगत असलेल्या कुबा नावाच्या छोट्याशा गावी पोहोचले. लोक त्यांची वाट बघत होते. त्यांनी त्यांचं हार्दिक स्वागत केलं. या गावी त्यांचा तीन दिवस मुक्काम होता आणि स्थलांतरानंतरची पहिली मशीद बांधण्यास सुरुवात केली. प्रेषितांनी कुबा सोडल्यावर मदीनेच्या दिशेनं निघाले. दुपारच्या वेळी रानुना घाटीत विसावले. ती नमाजची वेळ होती. त्यांनी आपल्या अनुयायींसोबत जुमाची पहिलीवहिली नमाज अदा केली. या ठिकाणीही एका मशिदीचं बांधकाम सुरू झालं आणि मग सोमवार दि. ४ ऑक्टोबर इ. स. ६२२ रोजी मदीनेत त्यांचं आगमन झालं. (हिजरी कालगणनेचं पहिलं वर्ष)

बऱ्याच लोकांनी त्यांना थांबवून आपल्याबरोबर राहण्याची विनंती केली. त्यांनी त्यांना सांगितलं, कसवा या त्यांच्या उंटिणीला मोकळ्यानं जाऊ द्यावं. त्यांना कुठं मुक्काम करायचाय त्याकडं तीच संकेत करील. ती लोकांमधून मागं आणि पुढं जाऊ लागली. शेवटी एका जागी थांबली. ती जागा दोन अनाथांच्या मालकीची होती. प्रेषितांनी ती जागा त्या अनाथांकडून दामदुपटीनं विकत घेतली आणि याच जागी स्वत: त्यांना राहण्यासाठी घराचं आणि मशिदीचं बांधकाम लगेच सुरू झालं.

# मशीद

कुबा, रौनाना घाटी आणि मदीना इथं तीन ठिकाणी मशीद बांधून प्रेषित मुहम्मद (त्यांना शांतता लाभो) मशिदींचं महत्त्व आणि ते केंद्रस्थान असल्याचं संकेत देत होते. मशीद सुरुवातीस आपल्या परिसराचं निरीक्षण करून मग या सृष्टीच्या निरीक्षणाची (प्रक्रियेची) स्थापना करते. प्रेषित म्हणाले की सारी पृथ्वी मशीद आहे. त्यांच्या या म्हणण्याचा साधा अर्थ आहे - म्हणजे अल्लाहनं प्रेषितांना पृथ्वीवर कुठंही प्रार्थना (नमाज) करण्याची अनुमती दिली होती. म्हणजे पृथ्वीचा कुठला भाग अपवित्र नव्हता. अशाच प्रकारे प्रेषितांचं पालन करीत मुस्लिमांना कुठेही प्रार्थना करण्याची (इस्लामी कायद्याप्रमाणं) परवानगी आहे. म्हणूनच लोकांना मुस्लिम पार्कमध्ये, सडकेच्या कडेला, रेल्वे प्लॅटफॉर्म, एअरपोर्ट वगैरे ठिकाणी नमाज अदा करताना आढळतात. मुस्लिमांसाठी सकल पृथ्वी धर्मस्थळच आहे. ते अल्लाहचं स्मरण करीत ठरल्या वेळी जिथं असतील तिथं नमाज अदा करतात.

या साधारण अर्थाव्यतिरिक्त मुहम्मद यांच्या म्हणण्याचा आणखी एक गूढ अर्थ असादेखील आहे- मुस्लिम मशिदीला शांततापूर्ण ठिकाण समजतात. त्यांच्यात शुचिर्भूत स्थितीतच प्रवेश करतात. त्यांचं शरीर व त्यांची वस्त्रं स्वच्छ असतात. तसेच त्यांची मनं आणि त्यांचे विचारही निर्मळ असतात. ते मशिदीकडं अल्लाहचे विनम्र सेवक या भावनेनं वळतात. ते मशिदीत दाखल होताच आधीपासूनच तिथं असलेल्या लोकांना ''अस्सलामु अलैकुम'' (तुम्हांस अल्लाहची शांतता असो) म्हणत अभिवादन करतात. नंतर मशिदीत येणाऱ्यांकडून ही शांततेची घोषणा आहे. मशीद शांतता, एकोपा, ईश्वराचं एकत्व आणि बंधुभावाचा संदेश पसरवते. काबागृह हे मध्यवर्ती मशीद होय. इस्लामी कायद्यानुसार काबागृहाला आदरणीय म्हटलं गेलंय. काबागृहात आणि त्याच्या सान्निध्यात रक्तपात घडवण्याची परवानगी नाही. अशा प्रकारे मशिदीद्वारे मध्यवर्ती मशीद (काबागृह) च्या अनुषंगानं शांतता वृद्धिंगत होत जाते.

म्हणजे जेव्हा प्रेषितांनी पृथ्वीशी मशिदीचा संबंध जोडला तेव्हा ते या पृथ्वीस शांततेचं ठिकाण बनवण्यावर भर देत होते. प्रेषितांच्या दृष्टीनं

पृथ्वीवरील सर्व मानवजाती जिथं कुठं असेल तिथं त्यांना शांतता लाभावी. जेव्हा ही पृथ्वी मशिदीचं रूप धारण करते तेव्हा मशिदीप्रमाणंच मानवी बंधुभाव व एकोप्याचा संदेश देते.

## अस्सलामु अलैकुम

### (तुम्हांस अल्लाहची शांतता लाभो)

कुबा या ठिकाणी पोचल्यावर मुहम्मद (त्यांना शांतता लाभो) यांनी ज्या शब्दांचा उच्चार केला त्याद्वारे त्यांनी मुस्लिमांना त्यांच्या जबाबदारीची माहिती दिली. ''अस्सलामु अलैकुम'' (तुम्हांस अल्लाहची शांतता लाभो) या इस्लामी अभिवादनाच्या पद्धतीनं शांततेचा प्रसार करावा. याचं उत्तर त्यांनी ''वअलैकुम अस्सलाम'' (तुम्हांसही अल्लाहची शांतता लाभो) या शब्दांनी द्यावं. सुरुवातीला आणि शेवटी दोन्ही वेळा शांततेचा संदेश. अशा तऱ्हेनं मुहम्मद यांनी आपल्या अनुयायींना या नव्या शहरात कसं स्थायिक व्हायचंय हे सांगितलं. गरीबांची काळजी घ्यावी. आपल्या नात्याचा सन्मान करावा. अशा नैतिक मूल्यांची त्यांनी आठवण करून दिली. रात्री सर्व लोक झोपलेले असताना नमाज अदा करणे म्हणजे आध्यात्मिक स्थित्यंतर होते, ज्यामुळं मनांतील श्रद्धा वाढीस लागते आणि नैतिक मूल्यांची जोपासना करण्याची आणि त्यांचा आदर करण्याच्या गरजेची पूर्तता होते. आंतरिक शांततेचा हा शोध (एकट्यानं, पण आपल्या कुटुंबियांच्या स्नेहाच्या उजेडात) घेण्याचा हा मार्ग जगात सर्वत्र शांततेचा प्रसार करण्यासाठी एका श्रद्धावानानं अवलंबणे अत्यावश्यक आहे. मुहम्मद यांच्या उभ्या आयुष्यात मदीनेच्या प्रत्येक टप्प्यावर या शिकवणी अस्तित्वात होत्या. मदीनेत आल्यावर त्यांना आधीपासूनच लाभलेल्या प्रतीकात्मक राजकीय सामर्थ्याकडं शहरातील कुणीही प्रतिष्ठित व्यक्ती दुर्लक्ष करू शकत नव्हती. मदीनेच्या बऱ्याच लोकांनी त्यांना अल्लाहचे पैगंबर मान्य करून इस्लाम धर्म स्वीकारला होता. ज्यांनी इस्लाम धर्मात प्रवेश घेतला होता त्यांच्यात औवस व खजरज लोकांचा समावेश होता. त्यांच्यात वर्षानुवर्ष लढाया होत होत्या. इस्लामच्या संदेशात विविध कबिल्यांच्या, समाजवर्गांच्या आणि विविध जातींच्या स्त्री-पुरुषांना एकत्र करण्याचं सामर्थ्य होतं.

# ज्यू धर्मियांशी करार

मदीनेत पोहोचल्यावर आणि नव्या इस्लामी समुदायाची प्रशासकीय, राजकीय व वैचारिक बांधणी खंबीर आधारावर प्रस्थापित झालीय याची खात्री करून घेतल्यानंतर मुहम्मद (त्यांना शांतता लाभो) यांनी मुस्लिमेतर लोकांशी स्पष्ट संबंध स्थापित करण्याची प्रक्रिया सुरू केली. हे प्रयत्न साऱ्या मानवांना शांतता, सुरक्षा व भरभराट प्रदान करण्याच्या एकमेव उद्दिष्टानं केले जात होते. त्याचबरोबर त्यांच्यात सामंजस्य आणि एकोपा निर्माण करण्याचेही प्रयत्न होत राहिले.

भौगोलिकदृष्ट्या ज्यू धर्मिय लोक अत्यंत जवळचे होते. त्यांची मनं कलुषित आणि त्यांच्यात कटुता असली तरी त्यांनी प्रतिकारही केला नव्हता की शत्रुत्वही केलं नव्हतं. प्रेषित मुहम्मद यांनी त्यांच्याशी एक करार संमत केला, यात त्यांना श्रद्धा आणि धनसंपत्ती बाळगण्याविषयी संपूर्ण स्वातंत्र्य देण्यात आलं होतं. त्यांना (मदीनेतून) हाकलून देण्याचा किंवा त्यांची धनसंपत्ती, त्यांच्या जमिनी जप्त करण्याचा त्यांचा हेतू नव्हता. मुस्लिमांशी हा करार त्यांच्या संबंधांवर आधारित होता.

हा करार अंमलात आल्यावर मदीना आणि त्याची उपनगरे एका लोकतांत्रिक राज्यात परिवर्तीत झाली. मदीना शहर त्याची राजधानी बनली आणि मुहम्मद त्या राज्याचे सत्ताधीश झाले. सर्व अधिकार मुस्लिमांकडं होते. परिणामी मदीना हे इस्लामचं वास्तविक केंद्रस्थान बनलं. इस्लाममध्ये हा करार केंद्रस्थानी मानला जाऊ लागला. वैवाहिक, सामाजिक करार असो की व्यापारिक अथवा भांडण-तंटे संपवणं, ही सर्व प्रकरणं या करारानुसारच हाताळली जाऊ लागली. कुरआन करारांना फार महत्त्व देतो आणि त्यांची पूर्तता करण्यास सांगतो, ''दिलेली वचनं पाळा. वचनांविषयी नक्कीच विचारलं जाईल.'' (कुरआन, १७:३४) प्रेषित मुहम्मद (त्यांना शांतता लाभो) म्हणतात, ''मुस्लिमांनी करारांच्या अटींशी वचनबद्ध राहावं.''

# दांभिक लोक

प्रेषित मुहम्मद (त्यांच्यावर शांतता लाभो) यांनी विविध कबिल्यांशी, धार्मिक मंडळींशी करार करून त्यांना आश्वासन दिलं असतानादेखील परिस्थिती समाधानकारक नव्हती. काही लोकांचे हेवे-दावे, त्यांचा सत्तेसाठीचा लोभ व संघर्ष तर काही लोकांमधील नैराश्याला प्रेषितांना सामोरं जावं लागत होतं. मदीनेत प्रेषितांना लोकांच्या ज्या वर्तणुकीला तोंड द्यावं लागत असे, तसा अनुभव मक्केत आलाच नव्हता. तिथं लोकांना इस्लाम स्वीकारण्यासाठी अशा मानवी बलिदानाची आवश्यकता होती जी प्रामामिक आणि श्रद्ध मनांतून स्वत:च बाहेर पडत असे. यापुढील बाबी बदलत जाणार होत्या. मदीनेची सामाजिक बांधणी, तिथली वेगवेगळी सत्ताकेंद्रं अशा सामाजिक स्थिती व लोकांच्या मनांवर प्रभाव टाकताना मुहम्मद यांचा स्वभाव आणि त्यांच्या अनुभवामुळं तिथलं वातावरण पूर्णत: बदलून गेलं. काही लोकं इस्लामचा स्वीकार करून त्याचा जाहीरपणे प्रचार करण्याची संधी शोधत होती. मदीनेत अवतरित झालेल्या पहिल्या अध्यायात कुरआन दांभिक लोकांच्या अशा अडचणीत टाकणाऱ्या प्रवृत्तीचा उल्लेख करतो. म्हणजेच 'मुनाफेकून' (दांभिक लोक) जो एक मोठा धोका आहे. कारण ते मुस्लिम समुदायाच्या आतून त्याच्यावर हल्ला करतात. कुरआनच्या दुसऱ्या अध्यायातील ('अल बकरह' - जो कुरआनातील सर्वांत मोठा अध्याय आहे.) १३ आयतीमध्ये दंभिक लोकांचं वर्तन, त्यांची द्विअर्थी बोली आणि त्यांच्या विश्वासघाताचं तपशीलवार वर्णन आलंय.

> ''काही लोक असं म्हणतात आम्ही अल्लाह आणि अंतिम दिनावर विश्वास ठेवतो, वास्तविक पाहता ते विश्वासूंपैकी नाहीत. ते अल्लाह आणि श्रद्धावंतांना फसवू पाहतात, पण त्यांना याचं भान नाही की ते स्वत:चीच फसवणूक करून घेतात.'' (कुरआन, २:८-९)

आणि पुढं...

''श्रद्धावंतांशी त्यांची भेट झाल्यास ते म्हणतात, आम्हीदेखील विश्वासू आहोत. पण जेव्हा ते आपल्या सैतानांच्या सान्निध्यात असतात ते म्हणतात, आम्ही तर तुमच्या बाजूनं आहोत. आम्ही त्यांची थट्टा करत आहोत.''

(कुरआन, २:१४)

हा धोका प्रत्यक्षच होता आणि तो कायमचाही होता. यातल्या काही लोकांनी औस आणि खजरज टोळींमध्ये पूर्वापार चालत आलेल्या लढायांना भडकावण्याचे प्रयत्न केले. एकदा तर अशीही वेळ आली की त्यांचे प्रयत्न यशस्वी झाले असते. ऐन वेळेला त्यांच्यातल्या एका सदस्यानं त्यांना इस्लाममधील बंधुभावाची आठवण करून दिली.

खजरज कबिल्याच्या उबैय याच्या अब्दुल्लाह या मुलानं इस्लामप्रवेश केला होता. पण तो कुरआनमध्ये आलेल्या वर्णनानुसार श्रद्ध लोकांना अडचणीत टाकणाऱ्या स्वभावाचा वाटत होता. हा दांभिक लोकांचा गुणधर्म आहे. औस कबिल्याच्या अबु आमिरच्या बाबतीतही असंच समजलं जात होतं. त्यानं खरंच त्रास द्यायला सुरुवात केली. त्यांच्याविरूद्ध कोणतंही पाऊल उचललं गेलं नव्हतं तरी मुस्लिम त्यांच्याबाबत अस्वस्थ होते आणि त्यांच्याशी कसलेही वाद घालून मुस्लिमांमध्ये विभागणी होऊ नये याची ते काळजी घेत असत.

# बंधुभावाचा कळस

मुस्लिमांमधील संबंध आणि विशेषकरून मदीनेतील मुस्लिम (अन्सार) आणि मक्का सोडून आलेले मुस्लिम (मुहाजिर) यांच्यामधील संबंध सुदृढ करण्यासाठी प्रेषित मुहम्मद (त्यांना शांतता लाभो) यांनी उभतांमध्ये बंधुत्वाचा करार करण्याचं ठरवलं. याचा अर्थ प्रत्येक मुहाजिरचा संबंध या करारानुसार एका अन्सारशी जोडला गेला पाहिजे, ज्यानं त्यास (मुहाजिरला) मदीनेत स्थापित होण्यास मदत करावी. आपल्या दैनंदिन उपयोगाच्या वस्तू विभागून द्याव्यात आणि त्यास मदीनेत अगदी समाधानानं राहण्यास सहाय्य करावं. व्यापक स्तरावर परस्परांतील संबंधांचा आधार बंधुभावावर होता. एकमेकांबरोबर राहणं, आपसांतील अडीअडचणी सोडवणं आणि आध्यात्मिक स्वरूपाचा संबंध स्थापित करणं. (मक्केहून आलेले मुस्लिम लोक मदीनेतील आपल्या मुस्लिम बंधु-भगिनींना ज्ञानाचा पाठ देऊ लागले.) या करारामुळं मदीनेत स्थायिक झालेल्या नवीन मुस्लिम समुदायास शक्ती लाभणार होती. इस्लामवर विश्वास ठेवणाऱ्यांमध्ये अशा प्रकारे जे घनिष्ट संबंध प्रस्थापित झाले त्यामुळं ईश्वराप्रति त्यांच्या प्रेमभावना बळकट झाल्या. प्रेषित मुहम्मद यांनी श्रद्धेद्वारे बंधुत्वाचा हा कळस गाठायला मदत केली आणि त्यांच्या अनुयायींनी आपल्या दैनंदिन जीवनात यास प्रत्यक्ष साकारण्याचे प्रयत्न केले. पुनरुत्थानाच्या दिवशी अल्लाह म्हणेल–

> ''जे माझ्या कृपेसाठी एकमेकांशी स्नेह बाळगतात ते कुठे आहेत, मी त्यांना आपल्या सावलीच्या छायेत ठेवीन, ज्या दिवशी माझ्याशिवाय कसलीच सावली नसणार.''

मुस्लिम ज्याप्रकारे कठीण प्रसंगांशी, यातनांशी आणि धोक्याच्या परिस्थितीशी भिडले त्यामुळं त्यांच्या आपसांत कशा स्वरूपाचा बंधुभाव होता हे पाहावयास मिळतं. त्यांनी एकमेकांचा जसा विश्वास जिंकला होता त्यास कोणताही कठीण प्रसंग बाधा पोचवू शकत नव्हता.

ही बंधनं मुस्लिमांच्या आध्यात्मिक व सामाजिक शक्ती होती आणि यामध्येच अल्लाहपाशी व एकमेकांजवळ त्यांचं यश दडलं होतं. म्हणजेच

अल्लाहवर विश्वास, आईवडिलांसाठी स्नेहभाव, एकमेकांमधील बंधुभाव आणि या सृष्टीबद्दलची त्यांच्या सेवाभावाची नैतिकता होय.

# *अजान*

## प्रार्थनेसाठी निमंत्रण

जसजसे दिवस लोटत होते तसतसा धर्मविधीही टप्प्याटप्प्यानं सुरू करण्यात येऊ लागला. रमजान महिन्यात उपवास धरणं आणि जकात देणं अनिवार्य करणं (म्हणजे अल्लाहची कृपा मिळवण्यासाठी आपली धनसंपत्ती पावन करून घेणं ज्यामुळं त्यात वृद्धी व्हावी) यांचा श्रद्धेमध्ये समावेश करण्यात आला. ठराविक वेळी मशिदीत मुस्लिमांमध्ये भेटीगाठी होऊ लागल्या आणि एकत्रितपणे नमाज अदा करू लागले.

प्रेषित मुहम्मद (त्यांना शांतता लाभो) मुस्लिमांना नमाजसाठी बोलवण्याची पद्धत योजत होते. ज्यू किंवा ख्रिस्ती धर्मियांची पद्धत अंगीकारण्याच विचार त्यांच्या मनात आला होता, म्हणजे घंटा किंवा हॉर्न वाजवून. तेवढ्यात अब्दुल्लाहपुत्र जैद (अन्सार) प्रेषितांकडं आले आणि त्यांनी स्वप्नात त्यांना एका मनुष्यानं श्रद्धावानांना प्रार्थनेसाठी बोलावण्याची जी पद्धत शिकवली होती, त्याचं कथन केलं. प्रेषितांनी त्यांचं म्हणणं ऐकून घेतलं आणि लवकरच त्यांना हे कळून आलं की ही एक अनुभूती होती. त्यांनी पूर्वीचे गुलाम बिलाल यांना बोलावून आणण्यास पाठवलं. त्यांचा आवाज गोड व मधुर होता. त्यांना मशिदीलगतच्या एका उंच ठिकाणी उभं राहून लोकांना बोलावण्यास सांगितलं.

| | |
|---|---|
| १) अल्लाहु अकबर | अल्लाह महान आहे<br>(चार वेळा उच्चारावं) |
| २) अशहदु अल्लाइलाहा इल्लल्लाह | मी साक्ष देतो एकमेव अल्लाहशिवाय इतर कुणी ईश्वर नाही (दोन वेळा) |

| | |
|---|---|
| ३) अशहदु अन्न मुहम्मदुर्रसूलुल्लाह | मी साक्ष देतो मुहम्मद अल्लाहचे प्रेषित आहेत (दोन वेळा) |
| ४) हय्या अलस्सलाह | प्रार्थनेसाठी या (दोन वेळा) |
| ५) हय्या अललफलाह | यशाकडं धाव घ्या (दोन वेळा) |
| ६) अल्लाहु अकबर | अल्लाह महान आहे (दोन वेळा) |
| ७) लाइलाह इल्लल्लाह | अल्लाहव्यतिरिक्त कुणी ईश्वर नाही (एकदाच उच्चारावं) |

- सकाळच्या नमाजच्या अजानमध्ये यात दोन अतिरिक्त वाक्यांचा उच्चार 'हय्या अललफलाह'नंतर केला जातो-

  अस्सलातु खैरुम्मिननौम — नमाज निद्रेपेक्षा उत्तम होय (दोन वेळा)

गेल्या पंधरा शतकांपासून जिथं जिथं मुस्लिम वास्तव्यास आहेत तिथं हेच कधी न बदलणारं अल्लाहच्या महानतेच्या घोषणेसह देण्यात येते ही हाक (मी साक्ष देतो अल्लाहव्यतिरिक्त कुणी ईश्वर नाही आणि मुहम्मद अल्लाहचे प्रेषित आहेत). प्रार्थनेसाठीचं निमंत्रण आणि या जगातील यश मिळवण्यासाठीचं आवाहन जगात सर्वत्र दुमदुमतंय. विविध उच्चारांच्या आवाजात व सुरांमध्ये, मधुर अशा संगीतासारख्या या निमंत्रणाद्वारे अल्लाहचं स्तवन केलं जातं. सकाळी झोपेतून उठण्यासाठी व दिवसाच्या समारोपाचं स्मरण करून देण्यासाठी ही हाक दिली जाते.

दिवसभर कामांमध्ये गुंतलेलं असताना एकमेव ईश्वर म्हणजेच लोकांना अल्लाहचं स्मरण करून देणं, ज्यामुळं त्यांच्यात नवचैतन्य निर्माण करणं होय. पवित्र अवस्थेत आपापल्या विहित जबाबदाऱ्या पार पाडण्याआधी त्याची निष्ठा वृद्धिंगत करण्यासाठी ही हाक दिली जाते.

# *मदीना*

## कल्याणकारी राज्य

प्रेषित मुहम्मद (त्यांना शांतता लाभो) आणि मक्केहून आलेले त्यांचे अनुयायी उत्तरोत्तर मदीनेत स्थायिक होत होते आणि या नव्या वातावरणात त्यांनी आपली ओळख शोधण्याची सुरुवात केली.

विशिष्ट स्वरूपाच्या कठीण परिस्थितीत एका समाजाची बांधणी होत होती. विविध ज्यू धर्मिय कबिल्यांमध्ये तह-करार असतानादेखील सत्तेसाठी या कबिल्यांमध्ये कलह निर्माण होऊन ते गुंतागुंतीचे बनू लागले. प्रेषित मुहम्मद यांच्या अनुयायींचं धार्मिक व शैक्षणिक कार्य सुरूच राहिलं आणि त्यांना श्रद्धावंतांनी एकनिष्ठ राहण्यासाठी ज्या सिद्धान्तांचं पालन करावयास हवंय त्यांची आठवण करून देण्यासाठी प्रेषित सदैव हजरच होते.

मक्कावासियांमध्ये या स्थलांतराचा असंतोष अनावर झाला होता, कारण ते आपल्यासाठी अवमान व अरबस्थानातील सत्तासमीकरणाला एक प्रकारचं आव्हान समजत होते. कित्येक दशकांपासून त्यांना कुणीच आव्हान दिलं नव्हतं. ज्यांचा आधार त्यांचा भूतकाळच नव्हे तर ते मक्का शहराचे प्रभारी आहेत, जिथं त्यांच्या देवीदेवतांचं ठिकाण असून परिसरातील सारे कबिले - टोळ्या वर्षातून एकदा व्यापारासाठी एकत्र येत होते.

मुहम्मद यांच्या हे शहर सोडून मदीनेत स्थायिक होण्याची बातमी अरबस्थानात दूरवर पसरली होती, यामुळं कुरैश लोकांच्या प्रतिष्ठेवर आणि त्यांच्या सत्ताकारणावर परिणाम झाला होता. प्रेषित मुहम्मद आणि त्यांचे अनुयायी हे जाणून होते आणि आपल्या कबिल्याकडून, कुरैश सरदार व त्यांच्या नातेवाईकांकडून याविरूद्ध प्रतिकार होईल असा त्यांना अंदाज आलेला होता, ज्यांना ते चांगलं ओळखून होते.

# कुरैश लोकांशी वादविवाद

सर्वच मुस्लिम मदीनेस गेले नव्हते. मुहम्मद (त्यांना शांतता लाभो) यांच्या यशामुळं कुरैश लोकं कमालीची अस्वस्थ झाल्यानं त्यांनी मक्केत मागं राहिलेल्या मुस्लिमांशी दुर्व्यवहार सुरू ठेवला होता. काही मुस्लिम आपला इस्लामस्वीकार जाहीर न करता मक्केतच राहत होते आणि जर वस्तुस्थिती उघड झाली तर त्यांच्याविरूद्ध हिंसक व्यवहार केला जाईल याची त्यांना भीती लागून होती.

कुरैशच्या काही लोकांनी अरबस्थानातील सर्व कबिल्यांमध्ये सातत्यानं चालत आलेल्या परंपरांच्या आदराचं उल्लंघन करून, ज्या मुस्लिमांनी मक्का सोडलं होतं त्यांची मालमत्ता काबिज करण्याचा निर्णय घेतला. प्रेषित मुहम्मद आणि मदीनेतील स्थायिक त्यांचे अनुयायी हे ऐकल्यावर स्वाभाविकपणे रागावले.

मक्केचे व्यापारी उत्तरेकडील इराक व सीरिया देशांना व्यापारासाठी ज्या मार्गानं जात होते त्या तांबड्या समुद्राच्या किनारपट्टीतील निवासी व्यापाऱ्यांशी प्रेषित मुहम्मद तह-करार संमत करत होते. यामुळं असहाय्य होऊन कुरैशच्या व्यापाऱ्यांनी दुसरा मार्ग शोधून काढला. तणावाचं वातावरण निर्माण होऊ लागलं आणि स्थलांतर केलेल्या मुस्लिमांची प्रतिमा मलीन करण्यासाठी त्या इलाख्यातील टोळ्या त्यांच्याविरूद्ध (मुस्लिमांविरूद्ध) एकवटू लागल्या.

दरम्यानच्या काळात कुरैश लोकांच्या हालचाली, त्यांच्या कारवाया व त्यांचं (युद्ध छेडण्याविषयीचं) उद्दिष्ट यांची माहिती मिळवण्यासाठी आणि हेरगिरीच्या उद्देशानं मुहम्मद यांनीदेखील आपलं मंडळ पाठवलं. कुरैश लोकांचं शत्रुत्व वाढतच जात होतं म्हणून खबरदारीचा उपाय करणं अगत्याचं झालं होतं. प्रेषित मुहम्मद यांच्या राजकीय प्रतिनिधींनी इकडून तिकडून जी माहिती मिळवली होती त्यावरून एखादं युद्ध जवळच असल्याचे संकेत मिळत होते.

☆

# जिहाद

## प्रतिकार

जेव्हा कधी त्यांच्या विरोधकांनी त्यांना लक्ष्य बनवलं प्रेषित मुहम्मद (त्यांना शांतता लाभो) यांनी पवित्र कुरआनद्वारे त्यांचं उत्तर दिलं, बचावार्थ प्रतिकार केला. पवित्र कुरआननं त्यांना हीच शिकवण दिली होती. कुरआनची खालील आयत जिहादच्या बाबतीत प्रथमच उल्लेख करते–

> ''तुम्ही नाकारणाऱ्यांचं पालन करू नका, त्यांच्याविरूद्ध याद्वारे तीव्र संघर्ष करा.'' (कुरआन, २५:५२)

काही प्रमाणात सौम्य तर काही वेळा हिंसक अशा चोहोबाजूंनी त्यांच्यावर आलेल्या दडपणास सामोरं जाताना मुहम्मद यांच्यावर कुरआनातील एक आयत अवतरली जी मुहम्मद यांनी प्रतिकाराबाबत म्हणजेच जिहाद- कोणत्या मार्गाचा आणि उपायांचा अवलंब करावयाचंय याकडं संकेत करते.

आम्हाला यामध्ये जिहादच्या संकल्पनांविषयी प्राथमिक आणि आवश्यक उपायांचा अर्थ पाहावयास मिळतो. अरबी भाषेत 'जिहाद' या शब्दाची व्युत्पत्ती 'ज-ह-द' या अक्षरांपासून झाली आहे. याचा अर्थ 'प्रयत्न करणं' असा होतो. त्याचबरोबर प्रतिकार करण्याचाही अर्थ निघतो. (अत्याचार आणि छळाचा प्रतिकार करणं.)

सर्वशक्तिमान अल्लाह आपले पैगंबर मुहम्मद यांना कुरैश लोकांच्या

दुर्वर्तनाचा प्रतिकार पवित्र कुरआनचा आधार घेऊन करण्याचा आदेश देतो. कुरैशांच्या भांडखोरीविरूद्ध कुरआनातील शिकवण हे प्रेषित मुहम्मद यांचं आध्यात्मिक व बौद्धिक अस्त्र आहे. जी लोकं त्यांचा अपमान करतात, त्यांचा तिरस्कार करतात, त्यांच्यावर उठून येतात, छळ करतात, ठार करू इच्छितात, तसेच ज्या लोकांना चमत्कार व पुरावा हवाय त्यांना मुहम्मद त्याच कुरआनच्या अस्त्रानं उत्तर देतात. कुरआनचं ज्ञान संपादन करून प्रेषित आणि त्यांच्या अनुयायींनी सुरुवातीस भांडणं टाळत स्वतंत्रपणानं आपला संदेश-प्रसार करण्याचा प्रयत्न केला.

पण कुरैश लोकांना हे नको होतं. जसजसं एकामागून एक कुरआन-वचनांचं अवतरण होत गेलं त्यांनीही आपल्या अत्याचारांत वाढ केली. सुरुवातीचे मुस्लिम अनुयायीदेखील प्रेषितांप्रमाणंच जिहादद्वारे त्यांचा प्रतिकार करत राहिले. लोकांना ईश्वराच्या अस्तित्वाची, या जीवनानंतरच्या दुसऱ्या जीवनाची आणि निर्णयाच्या दिवसाची आठवण करून देत राहिले. शारीरिक अत्याचारांपासून स्वत:चा बचाव करण्यासाठी त्याच्याकडं नेहमी कुरआनचंच आध्यात्मिक व बौद्धिक अस्त्र होतं. पण काही वेळा त्यांना इतकं छळलं जायचं, सातत्यानं हिंसा केली जायची की अशा प्रकारचा जिहाद सहन करणं कठीण झालं होतं. एकेदिवशी मुस्लिमांचं एक प्रतिनिधीमंडळ प्रेषितांकडं आलं आणि त्यांनी विचारलं, ''तुम्ही अल्लाहस आपल्या मदतीस बोलावणार नाही काय?'' प्रेषितांनी ठामपणे उत्तर दिलं,

> ''तुमच्या पूर्वी जे मुस्लिम होऊन गेलेत, त्यांच्यापैकी कित्येकांना खड्डे खोदून त्यात घातलं गेलं, त्यांना त्यांच्या डोक्यापासून पायापर्यंत उभं चिरण्यात आलं, तरीदेखील ते आपल्या धर्मापासून परत फिरले नाहीत. लोखंडी दातांनी हाडांपासून त्यांचं मांस कापण्यात आलं तरीदेखील त्यांनी आपला धर्म सोडला नाही. अल्लाहची शपथ! हे उद्दिष्ट नक्कीच सफल होईल आणि एखादी व्यक्ती एकट्यानं सनापासून हजरमौतचा (येमेनमधील एक शहर) प्रवास करील आणि तिला अल्लाहशिवाय कुणाचीही भीती

वाटणार नाही. तसेच तिच्या शेळ्यांनादेखील लांडग्याचं भय नसेल. पण तुम्ही तर फारच उतावळे आहात.''

म्हणून त्यांना संयम बाळगायचा होता, सहन करायचं होतं आणि धीर धरायचा होता तसेच अल्लाह व त्याच्या इच्छेबाबत निराश व्हायचं नव्हतं. प्रेषित मुहम्मद आपल्या अनुयायींना अल्लाहवर विश्वास ठेवणं किती कठीण असतं हे समजावून सांगत होते. शारीरिक व नैतिक त्रास सहन केल्यावरच अनुभवांति माणूस श्रद्धेचा असा पल्ला गाठतो ज्यामुळं संकटांना सहन करतो आणि अल्लाहबाबत नव्हे तर स्वत:च्या बाबतीत शंका घेत असतो.

# *किताल*

## सशस्त्र प्रतिकार

याच काळात प्रेषित मुहम्मद (त्यांना शांतता लाभो) यांच्यावर आणखी दोन, अगदी भिन्न प्रकारच्या आयती अवतरल्या, पण त्यांचा परिणाम मागील परिस्थितींपासून विभक्त होण्यात झाला. कुरैश सरदारांकडून केला जाणार छळ व यातनांना तोंड देत असताना मुस्लिमांना गेली १३ वर्षं संयम व धैर्य राखण्यास सांगितलं जात होतं. त्यांनी ते भोगलं, सहन केलं आणि नंतर मदीनेस निघून गेले, पण भांडण टाळण्यासाठी त्यांनी त्यास प्रत्युत्तर दिलं नव्हतं.

मुस्लिम एकदाचे मदीनेत स्थायिक झाल्यावर हे उघड झालं की कुरैश लोक आणखी तीव्रपणे त्यांचा विरोध करतील आणि प्रेषितांचं कार्य संपुष्टात आणण्यासाठी ते इतर उपाय योजतील. आता मक्केच्या राजकीय संतुलनालाच धोका निर्माण झाला नव्हता तर संपूर्ण अरब देशातच सत्ता समीकरणाला आव्हान मिळालं होतं. इतर कबिल्यांच्या तुलनेत कुरैश लोकांची केवळ प्रतिष्ठाच दावणीला बांधली गेली नव्हती तर त्यांच्या धार्मिक व लष्करी प्रतिष्ठेलाही धोका निर्माण झालेला होता.

यातच प्रेषितांवर एक अवतरण आलं, ज्यामुळं आता कोणतीच शंका उरली नव्हती,

> ''ज्यांच्याविरूद्ध युद्ध केलं जातंय त्यांना त्यांच्यावर होत असलेल्या अत्याचारांचा (बिमोड करण्यासाठी) परवानगी दिली गेली. आणि अल्लाह त्यांच्या मदतीस समर्थ आहे. ज्या लोकांना नाहक त्यांच्या घरातून घालवण्यात आलं, कारण ते म्हणतात, अल्लाह आमचा विधाता आहे. जर अल्लाहनं काही लोकांचा इतर लोकांकरवी बिमोड केला नसता तर मठं, गिरिजाघरं (ख्रिस्ती लोकांचे) यहुदी लोकांची देवळं आणि मशिदींचा विध्वंस केला गेला असता, ज्यांत अल्लाहचं भरपूर नामस्मरण होते. अल्लाह त्यांना मदत करतो जे त्याची मदत करतात. निश्‍चितच अल्लाह प्रभुत्वसंपन्न आणि सर्वशक्तीसंपन्न आहे.''
>
> (कुरआन, २२:३९-४०)

यापुढं मुस्लिमांनी शांतपणानं प्रतिकार करण्याची गरजच नव्हती, तर शत्रूंच्या हल्ल्यांविरूद्ध त्यांना आपलं संरक्षण करायचं होतं आध्यात्मिक व बौद्धिक जिहादापलीकडं, ज्याचा आधार फक्त स्वत:चा लोभ, हिंसक वृत्ती किंवा नाकारणाऱ्यांच्या उलटसुलट चर्चेचा प्रतिकार करण्यावर होता. आता एका नव्या स्वरूपाच्या जिहादची अनुमती दिली गेली म्हणजेच 'किताल'- सशस्त्र उठावाविरूद्ध स्व-संरक्षणास आवश्यक सशस्त्र प्रतिकाराची अनुमती.

सर्व प्रकारच्या जिहादचा संबंध प्रतिकाराच्या उद्देशाशी असतो. कितालच्या बाबतीत 'सशस्त्र लढा' हेच सत्य आहे. या आयतीच्या शेवटी मानवजातीचा विस्तार आणि अत्याचाराविरूद्ध लढा देण्याच्या आवश्यकतेविषयी सांगितलं गेलंय.

> ''ज्या लोकांना नाहक त्यांच्या घरातून घालवण्यात आलं, कारण ते म्हणतात, अल्लाह आमचा विधाता आहे. जर अल्लाहनं काही लोकांचा इतर लोकांकरवी बिमोड केला नसता तर मठं, गिरिजाघरं (ख्रिस्ती लोकांची) यहुदी

> लोकांची देवळं आणि मशिदींचा विध्वंस केला गेला असता, ज्यांत अल्लाहचं भरपूर नामस्मरण होते. अल्लाह त्यांना मदत करतो जे त्याची मदत करतात. निश्चितच अल्लाह प्रभुत्वसंपन्न आणि सर्वशक्तीसंपन्न आहे.''
>
> (कुरआन, २२:४०)

विविध शक्तींमध्ये संतुलन राखणं आणि त्यांचं नियमन करणं ही मानवतेची स्वाभाविक गरज असल्याचं म्हटलंय. कोणत्याही व्यक्तीस, राष्ट्रास व साम्राज्यास अमर्याद शक्ती मिळाली तर मानवी संस्कृतीची विविधता नष्ट होते. तसेच विविध धर्मस्थळांचाही नाश होतो. हेच धार्मिक स्वातंत्र्याचं द्योतक आहे, ज्याची अनुमती अल्लाहनं दिलीय. म्हणूनच अशा शक्तींशी लढा देणं, त्याचबरोबर माणसांच्या लढाऊ वृत्तीचा प्रतिकार करणं आणि मानवजातीला शांततेची हमी देणं यात वरकरणी विरोधाभास वाटतो आणि कुरआनातील दुसरी आयत याची पुष्टी देते–

> ''जर अल्लाहनं एका समूहाच्या सहाय्यानं दुसऱ्या लोकसमूहाला नष्ट केलं नसतं तर धरतीवर अनाचारानं थैमान घातलं असतं. पण अल्लाह तर सर्व विश्वांवर वरदान करणारा आहे.'' (कुरआन, २:२५१)

स्वाभाविकच माणसं सत्तेचे लोभी असतात, दुष्ट गोष्टींचा प्रसार करण्यास आणि एकमेकांची हत्या करण्यास तत्पर असतात, त्याचबरोबर माणसाची दुसरी बाजू म्हणजे जे काही चांगलं असतं त्यासाठी त्यांचा प्रेमभाव व न्याय्य वागणूक. अशा प्रकारे जिहादचा तत्त्वत: आत्मा म्हणजे शांततेचा शोध होय, आणि किताल म्हणजे काही वेळा शांततेचा अनिवार्य मार्ग.

# *जिहाद*

## ‘‘मी माझ्या परीनं सर्वकाही प्रयत्न करीन.’’

ग्राहम इ फुल्लर, राज्यशास्त्र व नॅशनल इंटेलिजन्स काऊन्सिल, अमेरिकेच्या सीआयएचे माजी उपाध्यक्ष ‘अ वर्ल्ड विदाऊट इस्लाम’ या आपल्या सुप्रसिद्ध पुस्तकात इस्लाममध्ये जिहादच्या संकल्पनेची अशी व्याख्या करतात–

‘‘जिहादची कल्पना आणि त्याबाबतचं प्रचंड साहित्य ख्रिस्ती धर्माच्या ‘न्याय्य युद्धा’च्या समानार्थी आहे. ही संकल्पना युद्धप्रसंगी मुस्मिलांची भूमिका स्पष्ट करून तिच्या मर्यादा निश्चित करण्यासाठी ठरवून दिली गेलीय. आज पाश्चिमात्य राष्ट्रं इस्लामशी ज्याचा संबंध जोडतात त्यामध्ये ‘जिहाद’ हा शब्द सर्वांत जास्त वादग्रस्त व भावनिक आहे. एक दिवसही असा जात नाही की जेव्हा इस्लामचे टीकाकार मीडियाद्वारे या शब्दास चर्चेत आणत नसतील. बरेच निरीक्षक ‘जिहाद’ या शब्दाचा आरंभ आणि त्याच्या उपयोगाचा शोध घेण्यास फारच उतावळे दिसतात. पाश्चिमात्य सत्ता, शांतता व (जागतिक) स्थैर्यास जिहादी वृत्तीच्या भयानक आव्हानास योग्य ठरवून ते पटवून देणं; अशा प्रकारच्या त्यांच्या भावना आहेत.’’

कुरआन व हदीसमध्ये जिहादचे अनेक अर्थ आहेत. अरबी भाषेतील ‘जिहाद’ शब्दाच्या व्युत्पत्ती-अक्षराचा अर्थ ‘प्रयत्न’ व ‘संघर्ष’ असा होतो. एका व्यक्तीस प्रामाणिक जीवन जगण्यासाठी करावयाच्या प्रयत्नासाठी तो हमखास वापरला जातो. त्याचबरोबर एका माणसाच्या वैयक्तिक जीवनामध्ये इस्लामी नीतीमूल्यांची जोपासना करणं, स्वत:चा आदर्श समोर ठेवून इस्लाम-प्रसारास हातभार लावणं आणि इस्लामी श्रद्धेस प्रोत्साहन देणं यासाठीही ‘जिहाद’ शब्दाचा प्रयोग केला जातो. या संदर्भात मुस्लिमांसाठी ‘जिहाद’ शब्दाचा संबंध चांगल्या गोष्टी, वैयक्तिक भक्तीभाव आणि सकारात्मक धार्मिक परंपरेशी आहे. अरबी बोलीभाषेत नित्याच्या कामासाठी या शब्दाचा उपयोग ‘मी प्रयत्न करीन’, ‘माझ्या परीनं उत्तम ते सर्व करीन’ या अर्थानं केला जातो. यालाच

लहान अथवा 'वैयक्तिक जिहाद' म्हटलं जातं, जशी प्रेषितांनी त्याची व्याख्या केली.

प्रेषितांनी आरंभी ज्या 'अल्पतर जिहाद'ची व्याख्या केली, त्याचा संबंध इस्लाम व उम्माच्या (मुस्लिम समुदायाच्या) संरक्षणार्थ लष्करी संघर्षाच्या संदर्भात केली होती. कारण मदीनेत मुस्लिम समुदायास मक्केतील नाकारणाऱ्या शक्तींनी कायम वेढलेलं होतं. अशा स्थितीत पवित्र कुरआनचं अवतरण आणि प्रेषित मुहम्मद यांनी मुस्लिम समुदायाच्या संरक्षणास केंद्रस्थानी ठेवलं होतं. नंतर जेव्हा मुस्लिम समुदायाचं स्थैर्य आणि चोहीकडं इस्लामचा विस्तार झाला तेव्हा त्यांना आपल्या क्षेत्रावर ताबा ठेवण्यासाठी इतर राज्यं व साम्राज्याशी लढा द्यावा लागला. इस्लामच्या व्यवस्थेनं, युद्धप्रसंगीच्या कायद्यांचं पालन करण्याविषयी लांबलचक निर्णय दिलेत, ज्यामध्ये स्त्री व लहान मुलांना लक्ष्य करू नये, शहरी इमारतींना अकारण उद्ध्वस्त करू नये, शक्तीचा योग्य प्रमाणाबाहेर वापर करू नये, जिहादची घोषणा कायदेशीर सत्ताधारी, राज्यप्रमुखानंच करावी आणि या कायद्याविरूद्ध कोणताही जिहाद विधीवत नसल्याचं म्हटलं गेलंय. प्रेषित मुहम्मद यांनी सैन्याला असा आदेश दिल्याची नोंद आहे की स्त्रिया व मुलांना, वृद्ध लोकांना तसेच मंदिर, चर्च आणि प्रार्थनागृहांमधील लोकांना कसलीही इजा करता कामा नये.

☆

# महानतम जिहाद

तथापि जे पुरुष व महिला सत्याच्या शोधार्थ इस्लाम समजून घेण्यासाठी प्रेषित मुहम्मद (त्यांना शांतता लाभो) यांच्याकडं येऊन नेहमीच त्यांना भेटत असत. काही वर्षांनंतर हुनैन युद्धाहून परत येताना प्रेषितांनी असं जाहीर केलं, ''आम्ही अल्पतर जिहादनंतर (सुधारणेसाठी, प्रयत्न, प्रतिकार व संघर्ष) पुन्हा महानतम जिहादकडं जात आहोत.''

एका अनुयायीनं विचारलं, ''प्रेषिता! महानतम जिहाद तो कोणता?'' प्रेषितांनी उत्तर दिलं, ''स्वत्वाशी (अहंकार) लढा देणं.''

मुस्लिम किंवा मुस्लिमेतरांना, सर्वच माणसांना हा आंतरिक लढा बराच कठीण व उदात्त असतो आणि यासाठी मोठ्या सामंजस्याची, क्षमाशीलतेची व प्रामाणिकतेची गरज असते.

युद्ध व अल्पतर जिहादानं अल्लाहसाठी मरण पत्करणं किती कठीण असतं हे दाखवून दिलं. दैनंदिन जगणं आणि यासाठीच्या महानतम जिहादनं आता उजेडात, पारदर्शकतेनं, सातत्यानं, आध्यात्मिक गरजेसाठी, संयम व शांततेनं अल्लाहसाठी जगणं किती अवघड असतं याची प्रचिती येते.

# १०

## पहिलं युद्ध

# बद्र

कुरैश सरदार अबु सुफियानच्या नेतृत्वात एक व्यपारी काफिला सीरियाहून माल घेऊन परतत असल्याचं प्रेषित मुहम्मद (त्यांना शांतता लाभो) यांच्या नुकतंच कानावर आलं होतं. कुरैशच्या इतर कबिल्यांचाही त्यात सहभाग होता. कुरैश लोकांनी त्या काफिल्याच्या सुरक्षेसाठी तसेच मुस्लिमांची शक्ती क्षीण करण्यासाठी मदीनेकडं सैन्यही पाठवलं होतं.

प्रेषित मुहम्मद आपले ३१३ अनुयायी घेऊन मदीनेहून निघाले. त्यांनी आपल्याबरोबर शस्त्रंही घेतली होती, पण ती युद्धामध्ये कामी येण्याजोगी नव्हती. प्रेषितांनी माननीय उस्मान (अल्लाह त्यांच्याशी राजी होवो) यांना मदीनेतच थांबण्यास सांगितलं. एरव्ही तेदेखील या मोहिमेत सहभागी झाले असते - त्यांच्या पत्नी माननीय रुकय्या - प्रेषितांच्या कन्या आजारी होत्या त्यासाठी. कुरैश सरदार अबु सुफियानवर हल्ला होण्याची शक्यता असल्याचं त्याच्या हेरांनी कळवलं होतं. त्यानं एका विशेष प्रतिनिधीद्वारे मक्केतील कुरैश सरदारांना या धोक्याची माहिती दिली आणि त्यांची मदत मागितली. त्यांनी लगेच आपल्या प्रवासाची दिशा बदलली आणि अशी खात्री करून घेतली की ते या हल्ल्यावर ताबा मिळवू शकतील तेव्हा दुसऱ्या एका माणसाला मक्केस पाठवून धोका टळल्याचं आणि आता मदतीची काही गरज नसल्याचं कळवलं.

पण या दरम्यान कुरैश सरदार एक हजारांपेक्षा अधिक माणसं घेऊन

आधीच निघाले होते. अबु जहलच्या आग्रहावर त्यांनी ही मोहीम - धोका असो वा नसो - पुढं नेण्याचा निर्णय घेतला. हा सामना जरी टाळता आला असता तरी त्यांनी मुस्लिमांसमोर शक्तीप्रदर्शन करण्याचं ठरवलं.

प्रेषित मुहम्मद आणि त्यांच्या अनुयायींनी बद्र या गावाजवळ, मदीनेच्या नैऋत्येस १३० कि.मी.च्या अंतरावर आपला तळ ठोकला. मक्केहून एक बलाढ्य लष्कर निघाल्याची माहिती त्यांना मिळाली. याचा अर्थ त्यांच्यापेक्षा तिपटीनं एक लष्कर त्यांच्याकडं येत आहे आणि त्याचे सरदार युद्ध करण्यास ठाम आहेत. हे एक युद्ध होते आणि मुस्लिम खरे पाहता यासाठी तयार नव्हते.

## सल्लामसलत

प्रेषित मुहम्मद (त्यांना शांतता लाभो) यांनी आपल्या अनुयायींशी विचारविनिमय करून या बाबतीत त्यांचा काय विचार आहे हे जाणून घेण्याचा निर्णय घेतला. त्यांच्या अनुयायींनी पुढं होऊन युद्धाचा सर्वतोपरी धोका पत्करण्याची तयारी दर्शविली. अल मिकदाद म्हणाले, ''पुढं व्हा तुम्ही आणि तुमचा विधाता आणि तुमच्या बरोबरीनं आम्हीसुद्धा लढू उजवीकडून व डावीकडून, तुमच्या समोरून व पाठीमागून.''

अशा प्रकारच्या भूमिकेमुळं प्रेषितांचं समाधान झालं, पण मुहाजिरीन (मक्केहून स्थलांतर करून आलेले मुस्लिम) कडून त्यांना हीच अपेक्षा होती आणि त्यांना अन्सार (मदीनेतील मुस्लिम) कडून उघड पाठिंब्याची आवश्यकता होती, कारण ते कुरैश लोकांशी रास्त भिडले नव्हते आणि त्यांनी जो करार केला होता त्यानुसार मदीनेवर हल्ला झाल्यासच ते मदत करण्यास बांधिल होते, मदीनेबाहेर नव्हे. अन्सार लोकांच्या वतीनं सऊद यांनी विचलित न होता सांगितलं, ''तुम्हांस जे करायचं असेल ते करा, आम्ही तुमच्या पाठीशी आहोत. ज्यानं तुम्हाला सत्यासह पाठवलंय त्याची शपथ! तुम्ही आम्हाला समुद्रात उडी घेण्याचा जरी आदेश दिला तरी तुमच्याबरोबर आम्हीसुद्धा उडी घेऊ. आमच्यापैकी एकजणही मागं राहणार नाही.''

# बौद्धिक सर्जनशीलता

आम्ही या ठिकाणी आपणास प्रेषित मुहम्मद (त्यांना शांतता लाभो) यांच्या आयुष्यातील ती बाजू दाखवत आहोत की त्यांनी कशा स्वरूपाच्या वैचारिक स्वातंत्र्यास प्रोत्साहन दिलं आणि कशा स्वरूपाची लोकशाही त्यांनी सामूहिक जीवनात रुजविली. राजकीय व धार्मिक सत्ता लाभलेल्या लोकांच्या जीवनशैलीच्या संदर्भात याचा तपास केला जाऊ शकतो. धर्मगुरूंना विचारविनिमय करण्याची गरजच नाही, कारण स्वयं भगवानच त्यांना दिशानिर्देश करतो, किंबहुना ते स्वत: ईश्वराचे अवतार असतात असं गृहित धरलं गेलंय. भूतकाळात ही अवस्था होती आणि आजदेखील याचंच अनुसरण केलं जातंय.

आपल्या संपूर्ण कार्यकाळात प्रेषित मुहम्मद आपल्या अनुयायींशी सल्लामसलत करीत असत. आपली बाजू मांडण्यास त्यांना प्रेरणा देत आणि त्याकडं लक्ष पुरवित असत. एवढंच नव्हे तर प्रेषितांनी मूळ अध्ययनशास्त्राची सुरूवात करून त्याद्वारे मुस्लिमांना स्वत:च्या गुणधर्मांनी अभिव्यक्त केलं आणि टीका करण्यास प्रोत्साहन दिलं.

प्रेषित मुहम्मद विविध विषयांवर अनुयायींना प्रश्न विचारित असत आणि त्यांनी आपलं वेगवेगळं उत्तर दिल्यावरच त्या प्रश्नांची उत्तरं देत असत. काही वेळा ते एखाद्या प्रकरणात वादग्रस्त निर्णय घ्यायचे, ज्यामुळं ते ऐकणाऱ्यांनी त्या प्रकरणाचा सखोल अभ्यास करावा. एकदा ते म्हणाले, ''आपल्या शत्रूवर ताबा मिळवणारा माणूस शक्तिशाली नसतो.''

त्यांच्या अनुयायींना यावर आपसांत विचारविनिमय केला आणि त्यांनी विचारलं, ''तर मग कोण शक्तिशाली माणूस?''

प्रेषितांनी या प्रश्नाचं उत्तर देत त्यांना खोलवर विचार करण्यास भाग पाडलं आणि आश्चर्यचकित केलं. ते म्हणाले, ''जो मनुष्य आपल्या रागावर नियंत्रण करतो तोच बलवान.''

कधीकधी प्रेषित मुहम्मद अलंकारिक भाषेत बोलायचे, ''तुमच्याकडील मौल्यवान वस्तू म्हणजे धनसंपत्ती नव्हे.''

यावर त्यांच्या अनुयायींनी विचारणा केल्यानंतर प्रेषित ते स्पष्ट करून सांगायचे, ''आपला आत्मा हीच खरी धनसंपत्ती.''

काही वेळा प्रेषितांची वक्तव्यं सामान्य धारणेविरूद्ध वाटायची, ''आपल्या भावाची मदत करा, तो न्यायी असो की अन्यायी.''

अनुयायी गोंधळून गेले. त्यांनी आपल्या अन्यायी भावाची मदत कशी करायची? तेव्हा प्रेषित म्हणाले, ''आपल्या भावास अन्यायी वर्तन करण्यापासून रोखा. अशा तऱ्हेनं तुम्ही त्याची मदत कराल.''

वरकरणी विरोधाभास निर्माण करणाऱ्या प्रश्नांनी आणि वक्तव्यांद्वारे प्रेषितांनी आपल्या अनुयायींच्या टीकात्मक संवेदनांना उत्तेजन दिलं. अंधश्रद्धेचं पालन न करता त्यांनी आपल्या क्षमतेची ओळख करून घेण्यास मदत केली. या पद्धतीमुळं विचारविनिमियासाठी बौद्धिक क्षमतांचा प्रभावीपणे विकास झाला. जर प्रेषितांना कोणते उपयुक्त उपदेश द्यायचे झाल्यास त्यासाठी त्यांच्या अनुयायींमध्ये बौद्धिक जागृती असणं आणि प्रेषितांच्या हजेरीतसुद्धा ज्यांच्या व्यक्तिमत्व व प्रतिभेनं ते प्रभावित होते, त्यांनी धाडसी व स्वतंत्र वृत्ती बाळगणं गरजेचं होतं. त्यांच्या बौद्धिक क्षमतेला उत्तेजित करीत त्यांना बोलण्याच्या संधी व प्रेरणा देत. त्यांनी एक असं नेतृत्व साकारलं ज्यामुळं त्यांच्या अनुयायींना ठामपणे वागणं शक्य झालं.

तरुण वयातले हुबाब (अल्लाह त्यांच्याशी राजी होवो) याचं बोलकं उदाहरण होतं. बद्रच्या ठिकाणी पोहचल्यावर प्रेषित मुहम्मद यांनी जी पहिली विहीर पाहिली त्याच ठिकाणी त्यांनी तळ ठोकला.

हे पाहून हुबाब त्यांच्याकडं आले आणि विचारलं, ''आपण या ठिकाणी थांबावं हे अल्लाहनं कळवलंय. म्हणजे आपण यापुढंही जाऊ नये आणि मागंही जाऊ नये अथवा युद्धाबाबतचं हे तुमचं स्वत:चं मत व युक्ती आहे?''

प्रेषितांनी म्हटलं की हे त्यांच्या मतानुसार आहे. हुबाब यांनी दुसऱ्या एका विहिरीलगतची जागा सुचवली. ती जागा ज्या दिशेनं शत्रू येत होते त्या वाटेत होती आणि परिसरातील सर्व विहिरींची वाट अडविली जाऊन शत्रुला पाण्याची सोय होणार नव्हती आणि याच ठिकाणी मग तळ उभा केला गेल्यास लढाई सुरू झाल्यावर मुस्लिमांचे कुरैश-विरोधक अडचणीत सापडतील. प्रेषितांनी हुबाब यांच्याकडून या उपाययोजनेचा तपशील सविस्तर ऐकून घेतल्यावर सरळपणे ती मान्य केली होती. अशा प्रकारे हुबाब यांची योजना प्रत्यक्षात आणली गेली.

या उदाहरणावरून हे दिसून येतं की त्यांचे अनुयायी प्रेषित मुहम्मद यांवर जे काही अवतरण अल्लाहकडून येत होतं त्याचं ते 'ब्र'देखील न काढता पालन करीत होते आणि प्रेषित एका मनुष्यरूपात त्यांच्या वैयक्तिक मतं व विचारांमध्ये अंतर ठेवत नसत. मानवी व्यवहारांमध्ये पैगंबरांचे अधिकार अनाठायी व अमर्याद नव्हते. त्यांनी आपल्या अनुयायींना महत्त्वाची भूमिका निभावण्यास अनुमती दिली होती आणि जसं आपण पाहिलं या शिकवणींमुळं निसर्गदत्त सर्जनशील शक्ती मिळवणं शक्य झालं.

प्रेषित मुहम्मद यांनी आपल्या महिला व पुरुष अनुयायींमध्ये स्वतंत्रपणे आपलं धाडस दाखवणं आणि आपल्यासमोर स्वत:स व्यक्त करणं आणि यास त्यांनी प्रेषितांचा अनादर न समजता प्रेषितांच्या मतापेक्षा भिन्न मत मांडण्याचा आत्मविश्वास निर्माण केला. या वर्तणुकीद्वारे प्रेषितांनी त्यांच्या बुद्धिमत्तेचा व मनांचा सन्मान केला. त्यांच्याकडून लाभलेली ही काळजी आणि त्यांच्या सामर्थ्याचा उपयोग करून घेण्याची प्रेषितांची वर्तणूक यासाठी त्यांनी प्रेषितांबाबत अपार स्नेह व प्रेमाच्या भावना बाळगल्या.

# बद्रचं युद्ध

कुरैश सरदार अबु सुफियानचा काफिला पळून गेल्याचं स्पष्ट झाल्यावर आता एका संपूर्ण युद्धास तोंड द्यायचंय हे पाहून मुहम्मद (त्यांना शांतता लाभो) यांनी युद्ध टाळण्यासाठी कुरैश सरदारांना परावृत्त करण्याचे प्रयत्न केले गेले. त्यांनी यासाठी माननीय उमर (अल्लाह त्यांच्याशी राजी होवो) यांना कुरैश सरदारांकडं पाठविलं. कुरैशांमधीलही काही लोकांना युद्ध नको होतं. पण जे लोक युद्धाच्या बाजूने होते, त्यांनी आपलं संख्याबळ पाहून युद्ध करणं निश्चित केलं होतं. उमर यांच्या प्रयत्नांत त्यांना त्यांच (मुस्लिमांचं) दुबळेपण वाटलं. प्रेषित मुहम्मद यांच्यापासून सुटका करून घेण्याची आणि मुस्लिमांचा नायनाट करण्याची ही संधी चालून आलीय, असं त्यांना वाटू लागलं.

सर्व प्रकारची गुप्त माहिती मिळाल्यावर प्रेषित मुहम्मद यांनी मदीनेपासून १३९ आणि मक्केपासून ३१९ कि.मी. अंतरावरील एका ठिकाणी शत्रुशी सामना करण्याचा निर्णय घेतला. ते आपल्या ३१३ अनुयायींना घेऊन निघाले. हे लहानसं सैन्य मदीनेहून निघालेलं. प्रेषितांचा ध्वज माननीय अली यांनी उचलला होता. शनिवारच्या पहाटे १३ मार्च इ. स. ६२४ म्हणजेच १६ रमजान हिजरी सन दोन रोजी प्रेषित मुहम्मद यांनी आपल्या ३१३ माणसांना पाच गटांमध्ये विभागलं. त्यांचे सेनापती नियुक्त केले गेले आणि उजवीकडं, डावीकडं व मैदानाच्या मध्यभागी देखरेख करण्याचं कार्य काहींना सोपवलं गेलं. आपल्या माणसांच्या संरक्षण व सुरक्षेची त्यांनी पूर्णपणे काळजी घेतली. एका टेकडीवर लहानशी झोपडी बांधली, म्हणजे तिथून मुहम्मद यांना युद्धादरम्यान सर्व बाजूंच्या हालचालीचं निरीक्षण करता यावं आणि आपल्या सेनापतींना योग्य वेळी आदेश देता यावेत. ते या वेळी मुस्लिम सैन्याचे प्रमुख सेनापतीची भूमिका पार पाडत होते. पाणी घेण्यासाठी विहिरीवर येत असलेल्या दोन माणसांना मुस्लिम गस्त घालणाऱ्या पथकानं बंदी बनवलं. त्यांना प्रेषितांकडं नेण्यात आलं, त्या वेळी ते नमाज अदा करीत होते. मुस्लिम सैन्यानं त्यांची चौकशी केली असता कैद्यांनी सांगितलं की ते मक्केहून आलेत. चौकशी करणाऱ्या मुस्लिमांनी म्हटलं की ते अबु सुफियानच्या काफिल्यातले आहेत

याची त्यांनी कबुली दिली. नंतर त्यांची कसून चौकशी चालू असताना मक्केच्या लष्करातील असल्याचं त्यांनी मान्य केलं.

प्रेषितांची प्रार्थना संपल्यावर सवड मिळाल्यानंतर त्यांनी मुस्लिम सैन्याला म्हटलं, ''जेव्हा ते सत्य बोलत होते तेव्हा तुम्ही त्यांना मारत होता आणि जेव्हा त्यांनी खोटं सांगितलं तेव्हा तुम्ही त्यांना सोडून दिलं.''

नंतर प्रेषितांनी स्वत: त्यांची चौकशी सुरू करीत विचारलं, ''तुम्ही कोण?'' त्यांनी उत्तर दिलं, ''आम्ही मक्केच्या सैन्यातले आहोत.''

''तुमची संख्या किती?''

''आम्हाला माहीत नाही.'' ते सत्य बोलत होते.

''तुमच्या लोकांच्या भोजनासाठी रोज किती उंट कापता?''

''एक दिवस नऊ तर दुसऱ्या दिवशी दहा.''

प्रेषितांनी अंदाज लावला की त्यांची संख्या नऊशे ते हजारादरम्यान असावी. कारण एक उंट शंभर माणसांसाठी पुरेसा आहे. खरा आकडा ९५० होता. त्यांना सैन्याच्या विभिन्न तुकड्यांच्या प्रमुखांची नावं विचारली गेली. उजवीकडील, डावीकडील, वगैरे बाजूच्या. प्रेषितांना सर्वांची नावं माहीत होती, कारण ते त्यांचे देशबांधव होते.

अबु जहलच्या नेतृत्वाखाली मक्केतील ९५० कुरैश होते तर मुस्लिमांची संख्या ३१३ इतकी होती. मुस्लिम सैन्याकडं फक्त दोनच घोडे होते तर कुरैशांकडं शंभरहून अधिक घोडे होते. मुस्लिमांकडं केवळ १२ शस्त्रास्त्रं होती तर कुरैशांकडं २०० शस्त्रास्त्रं होती. प्रत्येक बाबतीत शत्रूपक्षाचा दर्जा उत्तम व शक्तिशाली होता. आपल्या झोपडीत प्रेषितांनी नतमस्तक होऊन अल्लाहचा धावा करून त्याची मदत मागितली. ही प्रार्थना फार कळकळीची आणि मन हेलावून टाकणारी होती.

> ''जर हा लहानसा समुदाय आज पराभूत झाला तर मग
> निर्णयाच्या दिवसापर्यंत तुझी कुणी आराधना करणार नाही.
> हे अल्लाह!''

माननीय हमजा, अली व उबैदा यांच्यापासून रणसंग्रामास सुरुवात

झाली. हमजा आणि अली यांनी आपल्या प्रतिद्वंद्वीस जेर केले, पण उबैदा गंभीर जखमी झाले. जेव्हा संपूर्ण युद्ध सुरू झालं तेव्हा मुस्लिमांनी असं साहस दाखवलं की कुरैशांना अल्पावधीतच पराजय पत्करावा लागला. मुस्लिमांच्या तिपटीनं फौजफाटा असतानाही ते मुस्लिमांना रोखू शकले नाहीत.

प्रेषितांनी प्रथमच युद्धामध्ये सैन्यातील प्रत्येकास वेगवेगळ्या जबाबदाऱ्या सोपविल्या होत्या. यापूर्वी युद्धाच्या वेळी कोणतंही ठराविक नियमन नव्हतं. प्रेषितांनी आपल्या सैन्याची अशी चोख रचना केली होती की त्यांनी शत्रूचा सामना एका लोखंडी भिंतीसारखा केला आणि एखाद्या निश्चित व्यूहरचनेशिवाय त्यांना कुणी मात करू शकत नव्हतं. चार-चार सैन्यांची एक तुकडी सामूहिकपणे शत्रूसैन्याचा घेराव करून एकामागून एक अशा तलवारींचा, बाणांचा व भाल्यांचा मारा करीत ढालीनं स्वत:चा बचाव करीत होते. हे एका साधारण माणसाचं काम नव्हतं. वस्तुस्थिती अशी होती की मुहम्मद यांनी सैन्यदलाच्या सेनापतीसारखं लष्कराचं नेतृत्व केलं. कुरआनातील नंतरच्या एका अवतरणात मुस्लिमांना युद्धांत अल्लाहचं सतत संरक्षण असल्याचं त्याच्या दूतांकरवी म्हटलंय. दिलेलं आश्वासन पूर्ण केलाचाही त्यात उल्लेख आहे.

> ''तुम्ही दुबळे असतानादेखील बद्रच्या (युद्धाच्या) वेळी
> त्यानं तुमची मदत केली. (म्हणूनच) अल्लाहचं आभार
> मानण्यासाठी त्याची भीती बाळगा.'' (कुरआन, ३:१२३)

शक्तिशाली कुरैशांवर मुस्लिमांची मात एक महत्त्वाचं वळण ठरलं. कुरैश लोकांच्या श्रेष्ठत्व आणि प्राबल्यास गंभीर स्वरूपाचा धक्का बसला. साऱ्या अरबस्थानात त्यांच्या पराजयाची बातमी वणव्यासारखी पसरली.

मुस्लिमांनी चौदा माणसं युद्धात कामी आली तर मक्कावाल्यांनी ८० माणसं गमावली. हे युद्ध व्हावं यासाठी उताविळ असलेला इस्लामचा कडवा विरोधक अबु जहलही यात मारला गेला.

प्रेषितांचे चुलते (ज्यांना मुहम्मद यांनी मक्केतच राहू दिलं होतं आणि स्थलांतराच्या संपूर्ण तयारीची व्यवस्था पाहिली होती) यांचा ७० युद्धकैद्यांमध्ये समावेश होता.

# मक्केत
# बदल्याचा कांगावा

कबिल्यातील सर्वच कुटुंबांतील सदस्य मारले गेल्यामुळं कुरैश सैन्याचं मक्केत परतणं दु:खदायी होतं. काही लोक आधीपासूनच बदला घेण्यासाठी आरडाओरड करीत होते, यात हिंदही होती. तिचा पिता, पुत्र व चुलता युद्धात मारला गेला होता. हमजा यांनी तिच्या पिता व चुलत्यास ठार केलं होतं म्हणून तिनं त्यांच्या रक्ताचा घोट घेण्याची शपथ घेतली. कुरैश लोकांनी यास प्रत्युत्तर देण्यास वेळ न दवडता मुस्लिमांशी लढण्यासाठी शेजारील शहरं व टोळ्यांशी आघाडी करण्याचे प्रयत्न सुरू केले. त्यांच्याशी अपमानाचा बदला घेऊन अरबस्थानातून त्यांचं उच्चाटन करण्याचा कुरैशांनी जणू चंगच बांधला.

इस्लामचा अट्टल शत्रू आजारी पडल्यानं युद्धात सहभागी झाला नव्हता. तो मक्केतच होता. त्यानं अबु सुफियानला युद्धात काय काय घडलं आणि पराजयाची कारणं विचारली.

''फक्त एवढंच की....'' अबु सुफियान बोलू लागले, ''आम्ही शत्रूच्या समोर गेलो व मागं फिरलो आणि त्यांनी आम्हाला लढाईत मागं टाकलं अथवा आमच्यापैकी काहींना बंदी बनवलं. यात त्यांना आनंद होईल तसेच मी आपल्या माणसांना दोष देत नाही, कारण आम्ही फक्त त्यांच्याशी लढत नव्हतो तर रंगीबेरंगी घोड्यांवर स्वार पांढरी वस्त्रं परिधान केलेल्या, आकाश आणि पृथ्वी दरम्यान पसरलेल्या लोकांशीही लढा देत होतो. त्यांच्यासमोर कुणीही टिकू शकत नाही.''

जे काही घडलं त्याचं वर्णन अबु सुफियान करीत होते. त्यांच्या बाजूस गुलाम असलेले अबु राफे बसले होते. त्यांनी गुप्तपणे इस्लाम स्वीकारला होता. त्यांना याचा आनंद आवरता आला नाही. प्रेषितांच्या विजयाची बातमी ऐकून आणि पांढऱ्या वस्त्रांतल्या माणसांचा अहवाल ऐकल्यावर ते आश्चर्यानं जोरात उद्‌गारले,

"ते दूत होते...!"

अबु लहब लगेच त्यांच्यावर तुटून पडला. त्यांच्या तोंडावर आघात करून त्यांना खाली पाडलं.

अबु लहबच्या मेहुणी, अब्बास यांच्या पत्नी उम्मुल फज्ल याही तिथं होत्या आणि त्यांनीही गुप्तपणे इस्लाम स्वीकारला होता, आपल्या भावाच्या मदतीस धावून आल्या आणि काठीनं अबु लहबला जोरात मारलं. खोलवर झालेली ही जखम काही दिवसांनंतर आणखीनच वाढली आणि संपूर्ण शरीरात त्याचं विष पसरलं. काही आठवड्यांतच त्याचा मृत्यु झाला. अबु लहब आणि त्याची पत्नी इस्लामविरूद्ध बेधडक काहीही बोलत असत. कुरआननं वर्षापूर्वीच त्यांच्याविषयी विधीलिखित केलं होतं. (कुरआनमध्ये फक्त अबु लहब याचंच नाव घेऊन त्याचा निषेध केला गेलाय.) इतर विरोधकांनी आपला विचार बदलून जसा इस्लामचा स्वीकार केला होता त्याप्रमाणं अबु लहब किंवा त्याच्या पत्नीनं मुहम्मद यांच्या धर्माशी तिळमात्रही सहानुभूती दर्शविली नव्हती. अबु लहबचा मृत्यु त्याच्या हिंसे व नकाराच्या अवस्थेतच झाला, त्यामुळं कुरआनातली अवतरणरूपी भविष्यवाणी खरी ठरली. शेवटपर्यंत ती दोघंही त्यांच्याच दरम्यान राहतील जे नाकारतात आणि बंड करतात.

# मदीनेत आनंदोत्सव आणि दुखवटाही

मदीनेलगतच्या अर्रहा या गावी मदीनेच्या लोकांनी आनंदाच्या जल्लोषात मुस्लिम सेनानींचं स्वागत केलं. ते मुहम्मद (त्यांना शांतता लाभो) यांना अल्लाहनं जे घवघवीत यश दिलं होतं त्यासाठी शुभेच्छा देण्यास जमले होते. बद्रच्या युद्धामध्ये आपले अनुयायी गमावल्यानंतर प्रेषितांना त्यांच्या कन्या रुकय्या यांच्या निधनाची वार्ता दिली गेली. त्या मोहिमेवरून विजयी होऊन परत आल्यावर त्यांना ही माहिती मिळाली होती. दु:ख व आनंदाच्या या मिलाफाद्वारे त्यांना या जीवनाच्या दुर्बलतेची आठवण झाली आणि त्याचबरोबर कठीण प्रसंगामध्ये तसेच यश मिळाल्यावर सर्व शक्तिशाली अल्लाहशी त्यांच्या जवळीकीचंही स्मरण झालं, काहीही कायमस्वरूपी नाही.

प्रेषितांनी मुस्लिमांना युद्धकैद्यांशी अशा तऱ्हेनं वागण्यास उत्तेजन दिलं की मुस्लिम लोक आपल्या कैद्यांना स्वत:च्या भाकरी खायला देत होते आणि स्वत: खजुरींवर गुजरान करायचे. (त्या वेळी अन्नधान्य महाग होते.)

कैद्यांच्या नातेवाईकांशी वाटाघाटी सुरू झाल्या. काही नातलगांनी बदल्यात रक्कम दिली त्यांना घेऊन परत गेले. काही कैद्यांना खंडणी न घेता सोडून दिलं गेलं. गरीब कैद्यांना त्यांच्या वैयक्तिक स्थितीनुसार निर्णय देण्यात आला. उदाहरणादाखल खंडणी देऊ शकत नसलेल्या साक्षर कैद्यांना मदीनेच्या दहा तरुणांना लिहणं-वाचणं शिकवण्याच्या अटीवर सोडण्यात आलं. पुन्हा एकदा कुठल्याही परिस्थितीत युद्ध असो की शांतता ज्ञानाचं महत्त्व स्पष्ट करून दिलं. शिकणं, लिहता येणं व वाचता येणं यामुळं लोकांमध्ये कौशल्य निर्माण होऊन त्यांचा आदर होतो. ज्या कैद्यांकडं ज्ञान होतं तेच त्यांची संपत्ती ठरली आणि तीच मुक्ततेची खंडणी झाली.

☆

# हृदयापाशी

प्रेषित मुहम्मद (त्यांना शांतता लाभो) आपले एक अनुयायी लुबादह (अल्लाह त्याच्याशी राजी होवो) यांचा मोठा सन्मान करीत असत इतका की बद्रच्या पहिल्या मोहिमेवर जाताना त्यांनी लुबादह यांना मदीनेच्या देखरेखीची जबाबदारी सोपविली होती. काही काळानंतर एक अनाथ तरुण मुहम्मद यांच्याकडं येऊन म्हणाला की लुबादह यांनी त्याच्या मालकीचं एक खजुरीचं झाड घेतलंय. प्रेषितांनी लुबादह यांना बोलावून याबाबत जाब विचारला. चौकशीअंती ते खजुरीचं झाड लुबादह यांचच असल्याचं निष्पन्न झालं. प्रेषितांनी लुबादहच्या बाजूनं निकाल दिला. यामुळं तो अनाथ तरुण कमालीचा निराश झाला, जणू त्यानं त्याची मौल्यवान वस्तू हरवली होती.

निकाल दिल्यावर आणि निवाड्यानंतर प्रेषितांनी लुबादह यांना ते झाड त्या अनाथास देऊन टाकण्यास सांगितलं, ज्याला ते फार महत्त्वाचं होतं. अबु लुबादह यांनी निग्रहानं नकार दिला. त्यांनी आपला हक्क सिद्ध करण्यास इथपर्यंत मजल मारली की असं करणं कल्पनेबाहेरचं असल्याचं म्हटलं. त्यांच्या या उत्कट इच्छेनं त्यांच्या भावनांचं स्वरूप बदललं.

पवित्र कुरआनात वैयक्तिक व सामूहिक दोन्ही स्तरांवर याची आठवण करून देण्यात आलीय. स्वाभाविकच आध्यात्मिक विकास न्यायाच्या जागृतीपलीकडं जाणं सुलभ करतो, ज्यामुळं लोकांना त्यांच्या अधिकारापेक्षा काही जास्तच देऊन आणि क्षमा करण्याची मागणी करतो.

"अल्लाह तुम्हांस न्याय आणि परोपकाराची आज्ञा देतो."
(कुरआन, १६:९०)

हा आपला हक्काधिकार देऊन टाकण्याचा प्रश्नच नव्हता. (अबु लुबादह यांचं म्हणणं मान्य करणं हेच न्याय्य होतं.) तर याचा संबंध प्रस्थापित मर्यादा ओलांडून शिकण्याशी संबंध होता. आपल्या मनांच्या भावनांनी क्षमा करून ते बुद्धीला पटवून देणं जे मानवी सहजीवन आणि आपसातील स्नेहाकरिता गरजेचं असतं.

प्रेषित मुहम्मद यांना आपल्या अनुयायींची प्रतिक्रिया आणि त्यांच्या वर्तणुकीमुळं दु:ख झालं. अबु लुबादह यांना ते फार सन्मान देत होते. इस्लामी जीवनशैलीचा एक महत्त्वाचा घटक असलेल्या न्यायाला चिकटून राहण्यास अबु लुबादह जणू अंधच झाले होते आणि यामुळं ते हृदयातील भावना परोपकार व सौहार्द या श्रेष्ठतम गुणांपासून वंचित राहिले.

दुसरे एक अनुयायी साद हे सर्व काही पाहात होते. त्यांनी त्या एका झाडाच्या मोबदल्यात एक सबंध बाग त्या अनाथास देऊन टाकली. प्रेषितांनी त्यावर आनंद व्यक्त केला आणि लुबादह यांच्या वर्तणुकीचं राग मनी बाळगला नाही की आपली नापसंतीही व्यक्त केली नाही.

प्रेषित मुहम्मद यांनी अबु लुबादह यांना दुसऱ्या जबाबदाऱ्या सोपविल्या. बनु कुरैजा या ज्यू धर्मिय कबिल्याशी त्यांच्या शरणागतीच्या अटी निश्चित करण्याच्या हेतूनं अबु लुबादह यांना बोलणी करण्यास पाठवलं, पण त्यांनी नकळत मुस्लिमांविषयीची गुपितं त्यांच्यासमोर उघड केली. आपल्या या कृत्यानं खजील होऊन त्यांनी प्रायश्चित्त करण्यासाठी स्वत:ला मशिदीच्या खांबास बांधून घेतलं. अल्लाह आणि त्याचे प्रेषित त्यांना या चुकीसाठी क्षमा करतील अशी त्यांना आशा होती.

एके दिवशी सकाळी प्रेषित मुहम्मद उम्मे सलमा यांच्या घरी असताना स्मितहास्य करीत जागे झाले.

"अल्लाह तुम्हांस सदैव हसत-खेळत ठेवो. या हसण्यामागचं कारण कळू शकेल काय?" उम्मे सलमा यांनी विचारलं.

''अबु लुबादह यांचं प्रायश्चित्त स्वीकारलं गेलंय... त्यांना ही बातमी द्या, जर तशी इच्छा असेल तर!'' प्रेषितांनी उत्तर दिलं.

मग उम्मे सलमा आपल्या घराच्या दरवाज्यात उभ्या राहिल्या आणि हाक मारली, ''अबु लुबादह! तुम्हाला हार्दिक शुभेच्छा! तुमचं प्रायश्चित्त स्वीकारलं गेलंय.''

त्यांचा आवाज ऐकून मदीनेचे तमाम लोकं मशिदीकडं निघाले. क्षमादान झालं आणि मुहम्मद यांनी स्वत: अबु लुबादह यांना मोकळं केलं.

हे वैयक्तिक उदाहरणावरून अध्यात्माचं प्रशिक्षण पूर्णत्वास गेलं नसल्याचंच लक्षात येतं. विवेकाचं सतत परीक्षण होत होतं आणि प्रेषितांनी आपल्या शिकवणींद्वारे फक्त शिस्त व कडक व्यवहारच लादला नव्हता तर दानशीलपणाचं बीजही रोवलं होतं.

# ११

# सभ्यपणा, काळजी घेणं आणि मायाळू स्वभाव

प्रेषित मुहम्मद (त्यांना शांतता लाभो) रोजच्या कामांत गुंतलेले जरी असले तरी ते त्यांच्या भोवती असणाऱ्यांच्या इच्छा-आकांक्षांकडं ते लक्ष पुरवित असत. रात्रीच्या वेळी त्यांच्या अनुयायी आणि पत्नी त्यांना कित्येक तास प्रार्थना (नमाज) करताना पाहत होते. इतरांपासून दूर हळूवारपणे एकांतात अल्लाहशी हितगुज करताना पाहत होते. प्रेषितांच्या पत्नी माननीय आएशा (अल्लाह त्यांच्याशी राजी होवो) यांना आश्चर्य वाटायचं. त्या म्हणाल्या,

''तुम्ही (आराधनेचा) अधिकचा बोजा उचलत नाही? अल्लाहनं तर तुमच्या मागील व पुढील सर्व चुका क्षमा करून टाकल्यात.''

प्रेषितांनी उत्तर दिलं, ''मग मी त्याचे आभार कसं व्यक्त करू शकतो?''

स्वत: प्रेषित जशी आराधना - प्रार्थना - उपवास करीत होते, तशीच भक्ती आपल्या अनुयायींनीही करावी अशी मागणी त्यांनी कधी केली नाही. याउलट अनुयायींनी जास्त बोजा न उचलता (भक्तीचा) अतिरेक करू नये असं त्यांना वाटे. काही अनुयायी आपल्या लैंगिक इच्छा संपविण्यासाठी रात्रभर नमाज अदा करीत राहायचे आणि दिवसा उपवास करायचे. (माननीय उस्मान बिन माजुन किंवा अम्रपुत्र अब्दुल्लाह यांना) प्रेषितांनी सांगितलं,

> ''तसं करू नका. एक दिवस उपवास पाळा, दुसऱ्या दिवशी खा-प्या. रात्री काही वेळ झोप घ्या, तर काही वेळ प्रार्थना करीत जा. तुमच्या शरीराचेही तुमच्यावर हक्क आहेत.

> तुमच्या डोळ्यांचा तुमच्यावर हक्क आहे. तुमच्या पत्नीचा तुमच्यावर अधिकार आहे.''
>
> एकदा ते मोठ्या आवाजात तीन वेळा बोलले, ''ते दु:खी होतील जे अतिशयोक्ती करतात.''
>
> आणखी एका प्रसंगी ते म्हणाले, ''सौम्यपणा बाळगा. सौम्यपणाद्वारेच तुम्हाला यश मिळेल.''

ज्या मुस्लिम श्रद्धावानांना आपल्यातील उणिवांची आणि अभावाची भीती होती त्यांच्या मनांना धीर देण्याचा प्रयत्न प्रेषित मुहम्मद यांनी सुरूच ठेवला होता. एके दिवशी त्यांचे एक सोबती हन्जलाह अबु बक्र यांना भेटले आणि अशी कबुली दिली की ते दांभिक असतील याची त्यांना खात्री आहे. कारण ते विसंगत भावनांमध्ये निघालेले आहेत. प्रेषितांच्या उपस्थितीत ते जवळजवळ स्वर्ग व नरकास आपल्या डोळ्यांनी पाहतात, पण जेव्हा ते प्रेषितांपासून दूर असतात तेव्हा आपली मुलंबाळं, पत्नी आणि दैनंदित व्यवहारात ते विसरून जातात. अबु बक्र म्हणाले की ते स्वत:ही हेच अनुभवतात. ते दोघं मिळून आपल्या आध्यात्मिक स्थितीबद्दल विचारण्यासाठी प्रेषितांकडं गेले. हन्जलह यांनी आपल्या शंका सविस्तर मांडल्या. प्रेषितांनी उत्तर दिलं,

> ''ज्याच्या हाती माझा आत्मा आहे त्याची शपथ! तुम्ही जर माझ्या उपस्थितीत जशा आध्यात्मिक स्थितीत असता आणि कायम अल्लाहचं स्मरण करीत असता तर तुम्ही झोपलेल्या अवस्थेत दूतांनी तुमचा हात हलवला असता. पण तसला प्रकार हन्जलाह यांचा नाही. भक्ती व स्मरण आणि विश्रांती व मनोरंजनासाठी काही वेळ ठरलेली असते. त्यांची अवस्था दांभिकपणाची नव्हती. ही मानवी जीवनाची साधी वास्तविकता होती. ते स्मरण करतात आणि विसरूनही जातात. आपण विसरून जातो म्हणून आठवण करावी लागते, कारण मानवसमूह हे काही (ईश)दूत नव्हेत.''

इतर परिस्थितींमध्ये प्रेषित मुहम्मद यांनी नमाजच्या वेळी प्रामाणिक असणं, गोरगरिबांना मदत करणं किंवा भक्ती करणं या मानवी आवश्यकताच आहेत असं सांगून आपल्या साथीदारांना आश्चर्यचकित करून सोडलं असतं.

> ''काही चांगलं करणं हा परोपकार होय. दुष्टाणास मनाई करणं, आपल्या पत्नींशी लैंगिक संबंध ठेवणं हादेखील परोपकारच आहे.''
>
> प्रेषितांच्या अनुयायींनी आश्चर्यचकित होऊन विचारलं, ''अल्लाहच्या प्रेषिता! आमच्यापैकी जर कुणी आपल्या लैंगिक गरजा पूर्ण करतो, त्यासाठीही त्यास मोबदला मिळेल?''
>
> ''प्रेषित मुहम्मद यांनी उत्तर दिलं, ''मला सांगा, तुमच्यापैकी जर कुणी अनैतिक संबंध ठेवले तर त्यानं अपराध केला की नाही? म्हणून वैध संबंध प्रस्थापित करणारास मोबदला दिला जाईल.''

अशा प्रकारे त्यांनी अनुयायींना कोणत्याही मानवी गरजांना न नाकारता स्वत:वर नियंत्रण ठेवणं हेच परोपकाराचं महत्त्वाचं अंग आहे, अशी शिकवण दिली. आध्यात्मिकता म्हणजे आपल्या स्वाभाविक गरजा मान्य करून त्यावर नियंत्रण ठेवणं, आपल्या नैतिक मूल्यांवर आधारित नैसर्गिक जीवन जगणं ही आराधनाच होय. हे कसलंही चुकीचं कृत्य नाही की दांभिकताही नाही.

आपल्या अनुयायींनी दोषी असल्याची भावना बाळगणं प्रेषितांना पसंत नव्हतं. अनुयायींनी सर्वशक्तिशाली अल्लाहशी संभाषण करणं कधीही सोडू नये, अशी शिकवण त्यांना दिली. तो अत्यंत कृपाशील आणि दयावान असून सर्वांचं स्वागत करतो. मनांचा प्रामाणिकपणा पसंत करणे, घडलेल्या चुकीमुळं दु:खी होणे आणि अल्लाहकडं वळणे, हाच 'तौबा'चा अर्थ होय. याची संधी सर्वांना दिली गेली. एखादी चूक किंवा अपराधी कृत्य झाल्यावर अल्लाहकडं परत वळणं हे अल्लाहस पसंत असून तो त्यास क्षमा करून पावित्र्य बहाल करतो.

प्रेषितांनी आपल्या अनुयायींना त्याच सभ्य वर्तणुकीसाठी सतत प्रयत्नशील असण्याकडं आणि क्षमायाचना करण्याकडं निमंत्रित केलंय.

> ''जर तुमच्या भावानं असं काही केलं जे तुम्हास मान्य नसेल तर त्यासाठी एक ते सत्तर निमित्तं शोधून काढा. जर तुम्हाला ती सापडली नाहीत तर तुम्ही स्वीकार करा की त्याचं कारण तुम्हाला माहीत नाही.''

प्रेषितांच्या विश्वासू अनुयायींना याचं भान होतं की प्रेषित मुहम्मद त्यांचा आदर करीत होते. त्यांना समजून घेत आणि त्यांच्यावर प्रेम करीत होते आणि ते तसं त्यांना कळवतही होते. अशा प्रकारे प्रेषितांनी स्नेह व आध्यात्मिक शिकवणी दोन्ही देऊ केल्या आणि या शिकवणींवर स्नेहाचं परिपूर्ण आवरण होते.

# अहल अस-सुफाह
## (बाकावरची माणसं)

नव्यानं इस्लाम धर्म स्वीकारणाऱ्यांनी ज्यांचं स्वत:चं घर नव्हतं आणि खाण्या-पिण्याची सोय नव्हती, मशिदीजवळ प्रेषित मुहम्मद (त्यांना शांतता लाभो) यांच्या घराशेजारी निवास केला होता. ते गरीब असून त्याचं जीवन मुस्लिमांच्या देणग्या आणि दानधर्मावर अवलंबून होतं. त्यांची संख्या वाढत गेली आणि त्यांना 'अहल-ए-सुफाह' (म्हणजे बाकावर बसलेली माणसं) म्हटलं जाऊ लागलं. प्रेषितांना त्यांच्या अवस्थेची काळजी लागून होती त्यांच्याशी ते आपुलकीचा व्यवहार करू लागले. ते त्यांना ऐकून घेत, त्यांच्या प्रश्नांची उत्तरं देत आणि त्यांच्या गरजांची पूर्तता करीत असत. त्यांचं व्यक्तिमत्त्व व शिकवणीचं एक वैशिष्ट्य असं होतं की जेव्हा मुस्लिम त्यांना अध्यात्म, श्रद्धा, शिक्षणाविषयी प्रश्न विचारायचे तेव्हा ते एकाच प्रश्नाची विविध उत्तरं द्यायचे. म्हणजे प्रश्न करणाऱ्याची मानसिक स्थिती, त्याचा अनुभव आणि बुद्धिमत्तेचा विचार करूनच उत्तरं द्यायचे.

प्रेषित मुहम्मद यांचं राहणीमान अत्यंत साधं होतं. त्यांच्या घरात फारसं काही नव्हतं. जेवणासाठी त्यांच्या घरी काही खजुरीशिवाय काहीच नसायचं. तरीही ते गरजू लोकांना मदत करीत. विशेषत: 'अहल-ए-सुफ्फाह'ची काळजी घेत होते.

त्यांनी आयुष्यभर साधेपणाचं जीवन व्यतीत केलं. मुस्लिम लोक त्यांच्याकडं कधीही जाऊ शकत होते. प्रेषितांकडं काहीही नव्हतं. पुरुष-महिला, मुलबाळं, गुलाम आणि गरीब लोकांना ते कधीही भेट द्यायचे. ते त्यांच्यापैकीच एक होते. त्यांच्याच सहवासात ते राहायचे.

# फातिमा

## 'एक कन्या'

### (अल्लाह त्यांच्यावर राजी होवो)

प्रेषित मुहम्मद (त्यांना शांतता लाभो) यांच्या कन्या फातिमा (अल्लाह त्यांच्याशी राजी होवो) आपल्या पित्याशी अगदी जवळच्या होत्या. प्रेषितांच्या चुलत भावाशी, माननीय अली यांच्याशी त्यांचा विवाह झाला होता. त्या आपल्या पित्याच्या शेजारीच राहू लागल्या. गरिबांच्या हितासाठी तसेच 'अहल-ए-सुफ्फाह'साठी त्यांनी स्वतःला वाहून घेतलं होतं.

प्रेषितांना तीन मुलं होती. ही तिन्ही मुलं लहानपणीच जग सोडून गेली होती. खदीजा यांच्यापासून त्यांचा चार कन्या प्रौढावस्थेत आल्या होत्या. फातिमा सर्वांत लहान कन्या होत्या. प्रेषित त्यांच्याकडं सर्वांत जास्त आकर्षित होते. एखाद्या प्रवासातून परतल्यावर नमाजनंतर त्यांचं पहिलं कार्य म्हणजे आपल्या मुलीस भेटून तिला प्रेम करणं हे होतं.

उमैरपुत्र जुमई यांनी एकदा आएशा यांना विचारलं, ''प्रेषित सर्वांत जास्त कुणावर प्रेम करतात?''

''फातिमा.'' त्यांनी उत्तर दिलं.

प्रेषित म्हणायचे, ''फातिमा माझं अंग आहे, जो कोणी तिच्यावर रागावतो, तो माझ्यावर रागावतो.''

प्रेषित घरी किंवा सार्वजनिक ठिकाणी असताना जर फातिमा तिथं आल्या तर त्यांच्या सन्मानार्थ ते उठून उभं राहायचे आणि त्यांचं स्वागत करायचे. मक्का व मदिना दोन्ही ठिकाणचे लोक आपल्या कन्येशी प्रेषितांची वागणूक पाहून आश्चर्यचकित व्हायचे. त्यांच्या मुलींना अशा प्रकारची वागणूक परंपरेनुसार कधी मिळालीच नव्हती.

एकदा त्यांनी खेडूत अरबांच्या एका समुदायासमोर आपले नातू, फातिमा यांचे पुत्र अल-हसन यांचं चुंबन घेतलं. त्या लोकांना धक्काच बसला!

लोकांपैकी अल-अकरा नावाच्या एका व्यक्तीनं म्हटलं, ''मला दहा मुलं आहेत, पण मी कधी एकाचंही चुंबन घेतलं नाही.'' यावर प्रेषित म्हणाले, ''जो स्वत: मोठ्या मनाचा नसतो, अल्लाह त्याच्याशी उदारहस्ते वागत नाही.'' प्रेषितांनी आपल्या शांत स्वभावानुसार मत व्यक्त केलं आणि लोकांना शिष्टाचार, दया, सभ्यपणा, लहान मुलांचा सन्मान करणं, महिलांचा आदर आणि त्यांची सेवा शिकविली. ते म्हणायचे, ''मी फक्त चांगल्या चालीरिती रुजविण्यास पाठविलो गेलो आहे.''

फातिमा यांना प्रेम, कोमलता व इस्लामी श्रद्धेच्या शिकवणी आपल्या पित्यापासून मिळाल्या आणि त्यांनी गरिबांत कार्य करीत त्यांचा प्रसार केला. एके दिवशी फातिमा यांनी आपल्या पतीस आपल्या अडीअडचणी सांगितल्या. त्यांच्या वडिलांप्रमाणेच त्यांच्याही घरात काही नव्हतं. त्यांना आपलं घरदार, आपलं कुटुंब आणि मुलांचा सांभाळ करणं अवघड वाटू लागलं. त्यांचे पती अली यांनी त्यांना आपल्या वडिलांकडं जाण्यास सांगितलं, कदाचित ते मदत करतील. त्या वडिलांना भेटण्यासाठी गेल्या, पण आपल्या म्हणणं त्यांच्यासमोर मांडण्याचं धाडस होईना. कारण त्या प्रेषितांचा अतिशय आदर करीत होत्या.

फातिमा रिकाम्या हाती घरी परतल्यावर अली यांनी स्वत: प्रेषितांकडं जाऊन त्यांना मदतीची विनंती करण्याचा निर्णय घेतला. प्रेषितांनी त्यांचं ऐकून घेतल्यावर उत्तर दिलं की ते त्यांच्यासाठी काहीही करू शकत नाहीत. 'अलह-ए-सुफाह'पेक्षा त्यांची स्थिती फार बरी आहे, ज्यांना तातडीच्या मदतीची गरज आहे. त्यांना सहन करावं लागेल आणि संयम ठेवावा लागेल. निराश होऊन अली घरी परतले. प्रेषितांच्या कन्या आणि चुलत भाऊ असतानादेखील त्यांना कसलेही सामाजिक विशेषाधिकार प्राप्त नव्हते.

संध्याकाळच्या वेळी प्रेषित त्यांच्या दारावर पोहोचले. त्यांच्या स्वागतासाठी त्या उभे राहण्याच्या तयारी होत्या, इतक्यात मुहम्मद आत आले आणि त्यांच्या बाजूस बसले. त्यांनी विचारलं, ''तुम्ही मला जे मागितलं त्यापेक्षा काही चांगलं मी तुम्हाला देऊ?''

फातिमा हो म्हणाल्या आणि प्रेषित सांगू लागले, ''मला जिब्राईल यांनी काही शब्द शिकवलेत आणि प्रत्येक नमाजनंतर तुम्ही त्या प्रत्येक शब्दाचा दहा दहा वेळा उच्चार करा.

''सुबहानल्लाह'' (अल्लाहचा उत्कर्ष होवो)

''अलहम्दुलिल्लाह'' (अल्लाहचं स्तवन होवो)

''अल्लाहु अकबर'' (अल्लाह महान आहे)

या आमच्यापर्यंत कालांतरानं पोचलेल्या आध्यात्मिक शिकवणी आहेत ज्या प्रत्येक मुस्लिमानं आपल्या दैनंदिन जीवनात अंगीकारल्यात.

फातिमा आपले पती अली यांच्याप्रमाणंच धर्मनिष्ठ, उदार मनाच्या व प्रेमळ स्वभावाच्या आदर्श होत्या. त्या आपल्या वडिलांच्या आध्यात्मिक शिकवणींच्या स्वरूपात होत्या. त्या प्रत्येक गरज अल्लाहकडंच मागत आणि इतरांना सर्वकाही देऊन टाकत असत.

एकेदिवशी प्रेषित मुहम्मद यांच्या अत्यंत लाडक्या कन्या फातिमा त्यांच्याकडं आल्या. कन्येच्या एका प्रश्नाच्या उत्तरादाखल प्रेषित म्हणाले, ''फातिमा तुम्ही एक प्रेषिताच्या कन्या असल्यानं असा विचार करायचा नाही की तुम्हाला स्वर्गात विशेष दर्जा दिला जाईल.''

प्रेषितांना हे स्पष्ट करून द्यायचं होतं की प्रेषितांचे वंशज होणं निर्णयाच्या दिवशी काही कामी येणार नाही किंवा कुण्या धर्मनिष्ठ व्यक्तीचे वंशज असणं एखाद्या विशिष्ट कुटुंबात जन्म घेतल्यानं कुणी स्वर्गात जाणार नाही, तर माणूस आपल्या स्वत:च्या कर्मानुसार स्वर्ग किंवा नरकात जाईल.

काही वर्षांनंतर आपल्या आजारी वडिलांच्या बाजूस बसून जेव्हा प्रेषितांनी फातिमा यांच्या काळात हळूच सांगितलं की अल्लाह त्यांना आपल्याकडं बोलवतोय आणि आता त्यांच्या जाण्याची वेळ येऊन ठेपलीय, तेव्हा फातिमा यांना रडू कोसळलं. काही मिनिटांनी प्रेषितांनी त्यांना विश्वासात घेऊन सांगितलं की - प्रेमळ विश्वास एक कन्या आणि तिच्या पित्यामधलं नातं, आपल्या कुटुंबात सर्वप्रथम त्याच त्यांच्याशी भेटणार आहेत - तेव्हा त्या आनंदानं हसू लागल्या.

# *आयशा*

## एक पत्नी

### (अल्लाह त्यांच्यावर राजी होवो)

प्रेषित मुहम्मद (त्यांना शांतता लाभो) यांचा आदर्श आणि त्यांच्याशी संभाषणामुळं माननीय आयशा (अल्लाह त्यांच्याशी राजी होवो) प्रेमळ स्वभावाच्या होत्या. प्रत्येक गोष्टीद्वारे आध्यात्मिक शिकवण मिळत होती. नंतरच्या काळात प्रेषितांचा धर्म, त्यांचं व्यक्तिमत्त्व, वैयक्तिक व सार्वजनिक जीवनात त्यांच्या वागणुकीची माहिती मिळवण्यात त्या मौलिक स्रोत ठरल्या. त्या तरुण वयात असताना मदीनेत प्रेषितांच्या घरी आल्या असता मुहम्मद त्यांची कशी काळजी घेत, त्यांच्या इच्छा-आकांक्षांची कशी पूर्तता करीत असत ते सांगितलंय. खेळ त्यांच्या जीवनाचं अंग होता आणि मुहम्मद यांनी त्यांच्याबरोबर खेळण्यास कधीही मनाई केली नव्हती. ॲबिसीनियातील एक लोकनाट्य मंडळ मदीनेत त्यांच्या घराशेजारी आल्याचं कळलं. कलाकार मंडळी आपल्या कलेचं प्रदर्शन करीत असता माननीय आयशा यांनाही पाहता यावं यासाठी प्रेषित आपल्या दारात उभे राहिले होते आणि आयशा त्यांच्या पाठीमागे खांद्यावरून तो खेळ पाहात होत्या.

वेळोवेळी त्यांनी प्रेषितांची काळजी घेण्याविषयी सांगितलंय. त्यांची मवाळ वागणूक आणि दैनंदिन जीवनात त्यांनी जे स्वातंत्र्य त्यांना दिलं होतं त्याचाही उल्लेख केलाय. माननीय आयशा यांनी प्रेषितांच्या नंतर त्यांच्या परंपरांचं (हदीस) जे वर्णन केलंय त्यावरून मुहम्मद त्यांच्याशी किती संभाषण करीत, आपल्या भावना व्यक्त करीत आणि त्यांच्याशी कशी व्यवहार करीत हे स्पष्ट होते.

माननीय आयशा इतर महिलांसारखंच वागत होत्या आणि मदीनेच्या सार्वजनिक जीवनात त्या उपस्थित असत. प्रेषितांनी याची दखल घेत आपल्या सोबत्यांना समजावलं होतं की आयशा यांचा आदर्श पुढं ठेवून महिलांनी त्यांच्या वैयक्तिक व सार्वजनिक जीवनात कशा प्रकारची भूमिका पार पाडावी.

एकदा एका पर्शियन शेजाऱ्यानं प्रेषित मुहम्मद यांना जेवणाचं आमंत्रण दिलं. प्रेषितांनी विचारलं की त्यांच्याबद्दल (आयशा यांच्याबद्दल) काय? त्या व्यक्तीनं बोलविण्यास नकार दिला. म्हणजे ते आमंत्रण फक्त प्रेषितांसाठीच होतं. तेव्हा प्रेषितांनी ते आमंत्रण स्वीकारलं नाही. काही दिवसांनी त्या शेजाऱ्यानं पुन्हा त्यांना आमंत्रण दिलं. प्रेषितांनी पुन्हा आयशा यांच्याविषयी विचारलं. त्या व्यक्तीनं पुन्हा नकारच दिला. प्रेषितांनीदेखील आमंत्रण नाकारलं. तिसऱ्यांदा पुन्हा त्या शेजाऱ्यानं प्रेषितांना बोलावलं तेव्हा प्रेषितांनी पुन्हा आयशा यांच्याबाबत विचारलं असता त्या व्यक्तीनं होकारार्थी उत्तर दिलं. मग प्रेषितांनी त्याचं आमंत्रण स्वीकारलं आणि त्याच्या घरी गेले. वारंवार तीच ती भूमिका घेऊन प्रेषितांना रीतीरिवाजांवर टीका न करता अरबांमधील रूढी-परंपरांमध्ये सुधारणा घडवून आणायची होती. पूर्वी माननीय खदीजा व प्रेषितांच्या इतर पत्नी आणि त्यांच्या कन्यांप्रमाणंच आयशा देखील सार्वजनिक जीवनात सक्रीय होत्या आणि विनयशीलतेशी, सामाजिक, राजकीय, आर्थिक जीवनातून तसेच युद्धाच्या प्रसंगी अनुपस्थित राहण्याची कधी गल्लत केली नाही.

प्रेषितांनी त्यांना स्वत:स अभिव्यक्त करण्याची, ते वृद्धिंगत करण्याची साधनं बहाल केली होती. तसेच विनयशीलतेबरोबरच स्त्रियांशी संबंधित विषय हाताळण्याची, आपल्या इच्छा-आकांक्षांची पूर्तता करण्यासही उद्युक्त केलं होतं. काही वर्षांनंतर मदीनेतील स्त्रियांचं साहस व त्यांच्या बौद्धिक क्षमतेची आदरानं आठवण काढली ज्या मक्केतील महिलांच्या तुलनेत वेगळ्या होत्या. त्या बोलण्याचं धाडस करीत होत्या आणि रास्त प्रश्न विचारत होत्या. ''धन्य असो अन्सार महिला! ज्या मर्यादांचं पालन करीत (धर्माच्या बाबतीत) सूचना विचारत होत्या.''

प्रेषित मुहम्मद यांनी आयशा यांचं अशाच तऱ्हेनं प्रशिक्षण केलं होतं.

कुरआनचं अवतरण होत असताना त्या उपस्थित असत आणि जेव्हा प्रेषित तो संदेश पोचता करीत आणि उपदेश देत असत त्या वेळीही त्या त्यांच्या बरोबर असत. किंवा प्रेषित एकांतात घरी धर्माचं पालन करीत तेव्हाही त्या त्यांच्या बरोबर असत. त्या आपल्या पतीच्या आवडी-निवडी व त्यांच्या भूमिकेविषयी त्यांना प्रश्न विचारीत आणि समजून घेत असत. आपल्या बौद्धिक क्षमता व स्मरणशक्तीमुळं आणि टीकात्मक वृत्तीमुळंच त्यांनी प्रेषितांची दोन हजारांहून अधिक वचनं (हदीस) आमच्यापर्यंत पोहोचवल्या. तसेच इतरक अनुयायींनी प्रेषितांच्या वचनांचं केलेलं वर्णनही त्या दुरुस्त करीत असत.

प्रेषित मुहम्मद आणि आयशा यांचा परस्पर स्नेह शक्तिशाली व प्रखर असाच होता. आयशा आपल्या श्रद्धेत व स्नेहाबाबत प्रामाणिक होत्या. आपल्या बौद्धिक व सामाजिक बांधिलकीमध्ये त्या आपले पावित्र्य व निष्ठेच्या आदर्श होत्या. प्रेषितांना त्यांच्या प्रती जी जवळीक होती त्यामध्येही त्या आदर्श ठरल्या. प्रेषितांनी शेवटचा श्वास त्यांच्याच खोलीत घेतला आणि त्याच खोलीमध्ये त्यांचा अंत होऊन तिथंच त्यांना दफनही करण्यात आलं.

# १२

# उहुद

## कधीही अंत नसतो

मदीनेच्या मुस्लिमांची आध्यात्मिक व सामाजिक जडणघडण करत असतानाच प्रेषित मुहम्मद (त्यांना शांतता लाभो) त्यांच्या सुरक्षेचीही चिंता करत होते. बद्रच्या युद्धाचा बदला घेण्याच्या तयारीत कुरैश आहेत याची त्यांना जाणीव होती. त्यांचे चुलते माननीय अब्बास यांच्याकडून त्यांना एका पत्राद्वारे अशी माहिती मिळाली की तीन हजारांहून अधिक सैन्यदलानं मदीनेकडं कूच केलंय. त्यांच्या प्रतिकाराची व्यवस्था करणं आणि रणनीती आखण्यासाठी त्यांच्याकडं एकच आठवडा होता. याबाबत आपल्या अनुयायींचं मत घेण्यासाठी त्यांनी तातडीनं एक सल्लामसलीतीची बैठक (शूरा) बोलावली. एकतर शहरातच राहून शत्रूवर आक्रमण करावं अथवा शहराबाहेर जाऊन खुल्या मैदानात रास्तच शत्रूशी दोन हात करावेत एवढाच पर्याय त्यांच्यापुढं होता.

आपले इतर अनुयायी तसेच अविश्वासू वृत्तीचे दांभिक अब्दुल्लाह बिन उबैद यांच्या मतानुसारच शहरात राहूनच शत्रूची वाट पाहावी असा प्रेषितांचा विचार होता. तरीदेखील या मुद्द्यावर चर्चा होऊन प्रेषितांचं मत स्वीकारण्यात आलं नाही. विशेषत: तरुणांनी आणि बद्रच्या युद्धात ज्यांना भाग घेता आला नव्हता अशांनी याचा विरोध केला.

बहुसंख्य लोक शहराबाहेर जाऊन शत्रूशी भिडण्याच्या बाजूनं होते. प्रेषित मुहम्मद यांनी हा निर्णय मान्य करून लगेच युद्धवस्त्र घालण्यासाठी घरी गेले, कारण त्यांना वेळ वाया घालवायची नव्हती. आपण चुकलो की काय! प्रेषितांच्या मताचं पालन करणं हेच उत्तम! असा विचार करून काही अनुयायी प्रेषित आपल्या घराबाहेर पडत असताना त्यांना भेटले आणि घेतलेल्या निर्णयाचे फेरविचार करून प्रेषितांच्या मताप्रमाणंच करावं, हाच मनोदय त्यांनी प्रेषितांसमोर व्यक्त केला. प्रेषितांनी त्यास स्पष्टपणे नकार दिला. सामूहिकरीत्या निर्णय घेतला गेला होता, त्यांनी युद्धाची वस्त्रं परिधान केली होती आणि आता मागं वळण्याचा प्रश्नच उरत नव्हता.

# उहुदकडं कूच

दि. २३ मार्च इ. स. ६२५ रोजी हिजरतच्या तिसऱ्या वर्षी मदीनेच्या उत्तरेस पाच किलोमीटर अंतरावर उहुद टेकडीकडं मुस्लिमांनी कूच केलं. शत्रूच्या ३००० सैनिकांशी मुकाबला करण्यास मुस्लिमांचे १००० सैन्य होते. ते पुढे निघाले असता दांभिक अब्दुल्लाह बिन उबै यानं आपल्या ३०० सैनिकांसह युद्ध सोडून मागं जाण्याचा निर्णय घेतला. मदीनेतच राहून शत्रूची वाट पाहण्याऐवजी प्रेषितांनी नवख्या तरुणांच्या प्रभावाखाली येऊन आपला निर्णय बदलला. मात्र त्याचाही तोच निर्णय होता जो प्रेषितांनी अगोदर घेतला होता. तो निर्णय त्यांनी मागं घ्यायला नको होता, अशी दांभिक अब्दुल्लाह बिन उबैनं प्रेषितांवर टीका केली. त्याचं अशा तऱ्हेनं पळ काढणं गंभीर स्वरूपाचं होतं, कारण यामुळं मुस्लिम सैन्याची संख्या ७०० वर आली आणि ते आपला निर्णय मागं घेऊन परत वळू शकत नव्हते. बिन उबैचं दांभिकत्व सर्वांना माहीत होतं. कितीतरी वेळा त्यानं धोका दिलेला होता. याची आधीच शंका होती आणि शत्रूशी सामना न करण्याच्या त्याच्या निर्णय म्हणजे त्याच्या दुटप्पीपणाचा स्पष्ट पुरावाच होता. जरी मुस्लिम सैन्य (संख्येनं) कमकुवत झाले असले तरी ते पुढं पुढं चालू लागले. मुस्लिम सैन्याच्या हालचालीची चाहूल लागू न देता त्यांना अशी वाट धरायची होती जी सहज लक्षात येऊ नये. पुन्हा एकदा मुहम्मद यांनी

एका मुस्लिमेतरावर विश्वास केला ज्यानं त्यांना प्रतिसाद दिला. त्यांना मार्ग दाखवणाऱ्याची क्षमता सर्वांनाच परिचित होती. त्याच्या नेतृत्वात मुस्लिम सैन्य निश्चित ठिकाणी पोहोचलं.

मुस्लिम सैन्यानं आपली योग्य जागा निश्चित केली आणि प्रेषित मुहम्मद यांनी युद्धाची रणनीती स्पष्ट करून दिली. मुस्लिम तिरंदाजांनी टेकडीच्या कडेला उभं राहायचं होतं तर घोडेस्वार आणि इतर सैन्य मैदानात शत्रूशी रास्त भिडणार होते. प्रेषितांनी आपल्या तिरंदाजांना पुढीलप्रमाणं आदेश दिला,

> ''तुम्ही जरी आमची कत्तल होताना पाहिलंत, तुम्ही जर आमचे तुकडे पक्षी उचलून नेताना पाहिलंत तरी तरी आमच्या मदतीस येऊ नका. जोवर मी तुम्हांस बोलवत नाही तोवर तुम्ही आपली जागा सोडू नका. आपल्या ठिकाणी दृढतेनं उभं राहा आणि तुमच्या बाजूनं आमच्यावर हल्ला होणार नाही याची काळजी घ्या.''

खाली मैदानातील मुस्लिम सैन्य युद्ध जिंकू दे किंवा हरू दे, कुठल्याही परिस्थितीत तिरंदाजांनी आपली जागा सोडू नये, असा आदेश त्यांना प्रेषित मुहम्मद यांनी दिला होता. म्हणजे मुस्लिम सैन्यावर कुरैश लोकांकडून टेकडीच्या मागून होणाऱ्या हल्ल्यास प्रतिबंध व्हावा. युद्धाची सुरुवात होताच कुरैश सैन्याच्या एका तुकडीनं वास्तविक हेच करायचा प्रयत्न केला होता, पण त्यांच्यावर बाणांचा वर्षाव करण्यात आला आणि त्यांना मागं फिरणं भाग पाडलं होतं. ही रणनीती उत्तमरित्या कार्य करीत होती.

# उहुदचं युद्ध

युद्धास सुरुवात झाली आणि खालील मैदानात मुस्लिम हळूहळू ताबा मिळवत होते. कुरैश पछाडले जात होते आणि त्यांची बरीच हानी होत होती. त्याच वेळी मुस्लिम सैन्य आपल्या विलक्षण साहसाचं दर्शन घडवत होते. या लढवय्यांमध्ये दोन महिला- उम्मे सुलयम आणि एक अन्सार महिला नुसैबा - या जखमींची देखरेख करणं आणि पाणी पाजण्यासाठी आल्या होत्या. आपली शक्ती व उत्साह दाखवित त्या शेवटी युद्धात सामील होऊन हातात तलवार घेऊन कुरैशांशी भिडल्या होत्या. प्रेषितांनी महिलांना युद्धात भाग घेण्याचा सल्ला कधीच दिला नव्हता, पण जेव्हा त्यांनी नुसैबाचा उत्साह व शक्ती पाहिली तेव्हा त्यांची प्रशंसा करीत संरक्षण व विजयासाठी अल्लाहची प्रार्थना केली.

काही अनुयायी यात मृत्युमुखी पडले आणि काही प्रमाणात मुस्लिमांची पिछेहाट झाली असली तरी सुरुवातीस मुस्लिम सैन्यानं आघाडी घेतली होती. मुस्लिम जसजसे युद्धात रंगत गेले, त्यांची आगेकूच होत होती आणि या युद्धात मुस्लिमांना विजय प्राप्त होणारच हे स्पष्ट दिसत होतं. कुरैश सैन्य आपले घोडे आणि इतर सामुग्री सोडून मागं फिरले होते.

त्या टेकडीच्या खाली कडेला नियुक्त केलेल्या तिरंदाजांना जेव्हा युद्ध मुस्लिम सैन्याला अनुकूल असून त्यांचा विजय जवळ असल्याचं दिसलं आणि यात जे सैन्य सहभागी आहेत त्यांना युद्धातील साधनसंपत्ती मिळेल असं वाटलं, तेव्हा त्यांनी प्रेषितांनी दिलेला आदेश आणि त्यांचे नेते अब्दुल्लाह बिन जुबैर यांनी दिलेले निर्देश विसरले. फक्त मोजकेच तिरंदाज आपल्या जागी उभे राहिले. त्यांच्यापैकी ४० जण टेकडीच्या खाली आले आणि विजय मिळेलच याची खात्री करून घेऊन तेही युद्धातील लुटीत आपला वाटा घेण्यासाठी सरसावले.

कुरैश सैन्याचा सेनापती खालिद कुरैशांच्या एका तुकडीचं नेतृत्व करत होता. तिरंदाज आपल्या जागेवरून निघून गेल्याचं त्याच्या लक्षात येताच त्यानं टेकडीच्या मागं जाऊन मुस्लिम सैन्यावर पाठीमागून हल्ला करण्याचा

निर्णय तातडीनं घेतला. मुस्लिम सैन्यास आपल्या तावडीत घेण्यात तो यशस्वी झाला. परिणामी प्रेषितांचे अनुयायी गोंधळून गेले आणि सैरावैरा भरकटू लागले. काही सैनिक मारले गेले तर काही पळून गेले, बाकीचे सैनिक मात्र नम्रपणे लढा देत राहिले. पण कुठं हल्ला करावा आणि काय करावं हे त्यांना सुचत नव्हतं.

प्रेषित मुहम्मद यांच्यावरदेखील हल्ला झाला. त्यांचा जीव थोडक्यात वाचला. एका दगडाच्या माऱ्यानं त्यांचं वरचं ओठ चिरलं गेलं आणि एक दात तुटून पडला. दुसऱ्या दगडानं त्यांच्या डोक्यावर मार लागून त्यांच्या कपाळातून रक्त वाहू लागलं. ते अचंभित होऊन खाली पडले, पण लवकरच त्यांना सुरक्षित स्थानी हलवण्यात आलं. त्यांच्या सहकाऱ्यांमधील सहाजण मारले गेले, सातवे सहकारी त्यांच्या बचावासाठी निकराचा लढा देत गंभीर जखमी झाले.

प्रेषित मुहम्मद मारले गेल्याची अफवा पसरल्यावर मुस्लिमांमध्ये आणखीनच गोंधळ माजला. शेवटी त्यांच्या काही सहकाऱ्यांनी त्यांचा बचाव करीत त्यांना टेकडीवर नेलं आणि हल्लेखोरांपासून त्यांना सुरक्षित केलं.

मुस्लिम सैन्य अडचणीच्या परिस्थितीतून मागं हटण्यात यशस्वी झाले आणि गरज पडल्यास शत्रूशी मुकाबला करण्यासाठी एकत्रित झाले. युद्ध संपले तेव्हा कुरैशचे फक्त २२ सैनिक मारले गेले होते तर मुस्लिमांचे ७० सैनिक हुतात्मा झाले.

## बदला

प्रेषित मुहम्मद (त्यांना शांतात लाभो) यांचे चुलते हमजा (अल्लाह त्यांच्याशी राजी होवो) कुरैश सरदार अबु सुफियानची पत्नी हिंदच्या लक्ष्यावर होते आणि बद्रच्या युद्धात कुरैशांना जो पराभव पत्करावा लागला होता त्याचा बदला हिंदला घ्यायचा होता. वहशी नावाच्या एका अबिसियन भाला फेकणाऱ्या सैनिकाला तिनं फक्त हमजा यांना ठार करण्याची जबाबदारी सोपविली होती. जेव्हा हमजा युद्धात लढत होते त्या वेळी वहशीनं अचूकपणे

त्यांच्यावर भाला फेकला, ज्यामुळं हमजा जागच्या जागी शहीद झाले. नंतर हिंदनं हमजा यांचा मृतदेह हुडकून काढला आणि त्यांच्या काळजाचा चावा घेऊन बद्रच्या युद्धात तिचे जे नातेवाईक मारले गेले होते त्यांच्या मृत्युचा अशा प्रकारे बदला घेतला. तिनं त्यांचे कान व नाकही कापून घेतले आणि त्यांची माळ बनवून आपल्या गळयात घातली.

कुरैश लोक आपले सर्व सैन्य आणि त्यांची साधनसामुग्री घेऊन गेले, पण मुस्लिम परत युद्धभूमीत गेले. त्यांनी छिन्नविच्छिन्न अवस्थेतले मृतदेह पाहिले. आपल्या चुलत्याची अवस्था पाहून प्रेषित गहिवरले.

प्रेषित जीवित अथवा मयत शरीराचा आदर करीत आणि अशा प्रकारे मृतदेहांना छिन्नविच्छिन्न करणं त्यांना मान्य नव्हतं. मानवजातीचा आदर-सन्मान करण्याची त्यांची शिकवण होती.

## तिरंदाजांकडून अवज्ञा

तिरंदाचांच्या अवज्ञेमुळं नाट्यमय परिणाम उमटले. धनसंपत्तीच्या मोहात अडकून ते भूतकाळातील कृतींना बळी पडले. आपल्या नजरेसमोर असलेली मालमत्ता पाहून अल्लाहवरील श्रद्धा न्याय आणि ऐहिक वस्तूंच्या मोहात न अडकणे या प्रेषितांच्या शिक्षण व प्रशिक्षणाचा त्यांना लगेच विसर पडला. जुन्या रुढी-परंपरेनुसार युद्धातल्या विजयाचं मोजमाप युद्धात हाती लागलेल्या मालमत्तेशी केली जात असे. त्यांच्या या भूतकाळानं आणि जुन्या परंपरेमुळं त्यांनी आपल्या आध्यात्मिक जडणघडणीचा बळी घेतला. परिणामी खालिद बिन वलीद यांच्या जाळयात- जे नंतर काही वर्षांनी इस्लाम धर्मात रुजू झाले- अडकले. इस्लाम स्वीकारल्यानंतर खालिद बिन वलीद मुस्लिम समुदायाचे अप्रतिम योद्धा व नायक ठरले. उहुदच्या लढाईतील तो विशिष्ट क्षण चिंतेचा गहन विषय ठरला. ज्या वातावरणात माणूस घडवला जातो आणि ज्याद्वारे त्याचं गत जीवन साकारलं गेलं, त्याची दिशा ठरली, त्याच्या आवडीनिवडीवर तो कधीही पूर्णपणे मात करू शकत नाही. मुस्लिम लोक

आपल्या पूर्वीच्या रूढींमध्ये अडकून गेले. खालिद बिन वलीद भविष्यात इस्लामचा स्वीकार करणार होते आणि त्यांच्या बाबतीत जे काही आकलन केलं गेलं असेल त्यास त्यांनी पुसून टाकलं. 'काहीही कधीही कायम राहात नसतं' हाच नम्रतेचा धडा आणि 'कोणताही निकाल शेवटचा नसतो' हे आशावादाचं वचन होय.

# शूरा

## परस्परांतील सल्लामसलत

ज्या घटना घडल्या त्यामुळं कमालीचं नैराश्य निर्माण होऊन जखमी अवस्थेत मुस्लिम लोक मदीनेस परतले. याचं मुख्य कारण तिरंदाजांची अवज्ञा होतं. त्यातले कित्येक शहीद झाले. प्रेषित मुहम्मद (त्यांना शांतता लाभो) आणि त्यांचे साथीदार जखमी झाले होते.

यानंतर काही दिवसांनी कुरआनचं अवतरण झालं आणि उहुदच्या युद्धविषयक मुद्द्याकडं परतणं भाग पाडलं, विशेषत: यामध्ये रणनीतीबाबतचे मतभेद, तिरंदाजांची अवज्ञा, आपल्या साथीदारांचा मृत्यु आणि प्रेषितांच्या भूमिकेचा संदर्भ होता.

मुहम्मद यांनी आपल्या अनुयायींच्या ऐहिक इच्छा-आकांक्षांच्या आहारी जाऊन जी अवज्ञा केली त्यास शांतपणे समजून घेतलं.

पवित्र कुरआनात त्या घटनांचा उल्लेख आहे आणि प्रारंभी आम्ही जे विचार मांडले होते त्याची पुष्टीही. म्हणजे सिद्धान्ताबाबत आदर आणि मुहम्मद यांच्या मवाळ व्यक्तिमत्त्वात दडलेलं त्यांचं सामर्थ्य.

> ''तुम्ही (प्रेषित) त्यांच्या बाबतीत मायाळू स्वभावाचे आहात हे अल्लाहच्या कृपेनंच. तुम्ही जर कडक आणि कठोर वृत्तीचे असता तर ते तुमच्याकडून पळून गेले असते. तेव्हा त्यांना माफ करा, त्यांच्यासाठी क्षमेची याचना करा. त्यांच्याशी

सल्लामसलत करा आणि एकदा का ठरवल्यावर अल्लाहवर विश्वास टाका. निश्चितच अल्लाह विश्वास टाकणाऱ्यांना पसंत करतो.''

(कुरआन, ३:१५९)

प्रेषितांनी घेतलेल्या निर्णयाचा विरोध आणि तिरंदाजांनी केलेल्या अवज्ञेपासून घटनाक्रम घडत गेला. कुरआन या ठिकाणी शूरा - सल्लामसलतीच्या सिद्धान्ताची पुष्टी करतो, परिणाम काही का असे ना. हे अवतरण अनन्यसाधारण महत्त्वाचं आहे. यामधील विधानानुसार, बहुसंख्येनं जे निर्णय घेतले गेले असतील त्या सिद्धान्ताबाबत कोणती तडजोड करायची नसते आणि ऐतिहासिक स्वरूपाच्या गरजांपलीकडं जाऊन माणसानं केलेल्या चुकांचा विचार न करता त्याचा आदर राखला जावा. अशा प्रकारे जे आपसातील व्यवहार एकमेकांशी विचारविनिमयानं हाताळतात तेच मुस्लिम आहेत. आणि ज्या परिस्थितीमध्ये हे सिद्धान्त अंमलात आणले गेले असतील स्थळ-काळानुरूप माणसांत बदल झालेला असला तरी तो कायम ठेवला जावा.

जोवर तिरंदाजांनी केलेल्या अवज्ञेचा संबंध आहे, कुरआन याचा उल्लेख करतो की मुहम्मद यांच्या औदार्यामुळंच परिस्थिती नियंत्रणात राहिली आणि त्यांचे अनुयायी त्यांच्यापासून दूर गेले नाहीत. ते कठोर मनाचे नव्हते आणि त्यांच्या पूर्वीच्या जीवनशैलीच्या लोभामुळं त्यांनी केलेल्या अवज्ञेमुळं प्रेषितांनी त्यांची निंदानालस्ती केली नाही. प्रेषित मुहम्मद यांच्या मायाळू स्वभावनं त्यांच्या अनुयायींचं सांत्वन केलं आणि ही जी पिछेहाट झाली होती त्यापासून त्यांनी धडा घेतला. त्यांनी जसे स्वत:स जबाबदार धरले होते त्यानुरूप अल्लाहनं त्यांची साथ दिली.

☆

# नम्रता

प्रेषित मुहम्मद (त्यांना शांतता लाभो) यांचं म्हणणं आहे–

''नम्रता आणि शिष्टाचार हे स्वत:च अल्लाहचा आदर करण्याची पद्धत आहे.''

नम्रतेसाठी इंग्रजी भाषेतल्या 'Humility' या शब्दाची व्युत्पत्ती 'Humus' - पृथ्वीपासून झालीय. पुढं याच शब्दापासून 'Hominis, Human Being' हे शब्द बनले. जसं सांगितलं जातं त्याप्रमाणं आम्ही पृथ्वीपासून निर्मिलो गेलो आहोत आणि शेवटी आम्ही पृथ्वीलाच मिळणार आहोत. दुसऱ्या भाषेतील 'Lowly' हा 'Humility'चा समानार्थी शब्द आहे. 'Humility' किंवा 'Lowly'चा अर्थ हे मान्य करणं होय की आम्ही मानवजात आहोत, यापेक्षा काही कमी नाही की काही अधिकही नाही - ईश्वर नव्हे.

पवित्र कुरआनमध्ये सर्वशक्तिमान अल्लाह म्हणतो,

''आणि पृथ्वीवर उद्दामपणे संचार करू नकोस, तू धरतीला दुभंगूही शकणार नाही की पर्वताएवढी उंची गाठू शकणार नाही.'' (कुरआन, १७:३७)

आणखीन असं की,

''लोकांशी बोलताना तोंड वाकडं करू नकोस, जमिनीवर ऐटीत मिरवू नकोस, कारण अल्लाहस उद्धटपणा करणारे आवडत नसतात.'' (कुरआन, ३१:१८)

मुहम्मद अल्लाहशी अशा प्रकारे भिऊन असत, जणू त्यांनी नम्रतेचं रूप धारण केलंय.

मदीनेत प्रेषित मुहम्मद ज्या घरात राहात होते ते चिखलाच्या लांबट विटांपासून बांधलेलं होतं. खिडक्या उघड्याच होत्या आणि खजुरीच्या झावळ्यांपासून त्यावर छत घातलेलं होतं. त्याच्या बांधकामात त्यांनी स्वत: हातभार लावला होता. त्यांच्या पत्नींसाठी दरम्यान भिंतीवजा तट्ट्याचा आडोसा उभा करून खोल्या केल्या होत्या. अरब खेडुतांच्या तंबूप्रमाणंच मुहम्मद यांना झोपण्यासाठी वेगळी खोली नव्हती. काही वर्षांनी त्यांनी पडदाही घातला होता. त्यांनी अत्यंत साधं व सभ्य जीवन व्यतीत केलं. दिवसा त्या युगातले ते सर्वांत व्यस्त व्यक्ती होते. ते एका राष्ट्राचे प्रमुख होते, तसेच सरन्यायाधीश, सरसेनापती - एकाच वेळी सर्व काही. रात्रीच्या वेळी ते सर्वांत जास्त भक्तीस वाहून घेतलेले व्यक्ती होते. निम्या अथवा एकतृतियांश रात्रीपर्यंत ते प्रार्थनेसाठी जागेच राहत असत. सर्वशक्तिमान अल्लाहची उपासना करीत त्यांच्या डोळ्यांमध्ये अश्रू उभे राहायचे. आपल्यावरील जबाबदाऱ्या पूर्ण करण्यास शक्ती लाभावी यासाठी अल्लाहकडं विनवणी करीत राहायचे.

ते जरी अरब द्वीपकल्पाचे सत्ताधीश असले तरी फर्नीचरच्या नावाखाली खजुरीच्या पत्त्यांनी बनवलेली एक चटई, जग, ब्लँकेट आणि अशाच प्रकारच्या काही इतर वस्तुंपलीकडं त्यांच्याकडं काहीच नव्हतं. त्यांचं जीवन इतकं कठीण व साधं होतं की त्यांच्या पत्नींनी कधी काही आरामदायी वस्तुंची त्यांच्याकडं मागणी केली, पण त्यांना काही कधी मिळालं नाही. जेवणासाठी डायनिंग टेबल नव्हतं. ते जमिनीवर बसून जेवायचे. आपल्या उजव्या हातानंच जेवायचे. साधं पांढरं वस्त्र त्यांना आवडत असे.

- ज्या घरातून सारं जग प्रकाशमान झालं त्या घरात तेलाचाही दिवा नव्हता. ते अंधारातच राहायचे. सर्वेसर्वा असले तरी आपल्या कुटुंबासाठी मुहम्मद यांनी मागं काहीच ठेवलं नाही. त्यांनी मृत्युपत्रही केलं नाही. त्यांनी आपल्या मागं जे सोडलं ते फक्त एक वचन होतं,

"आम्ही प्रेषित, आमचे वारसदार नसतात. आम्ही जे काही

मागं सोडून जातो ते दानधर्म करण्यासाठीच असतं.''

जगातल्या महाकाय साम्राज्याच्या संस्थापकाचे हे शब्द होते आणि त्यांना चांगलं माहीतदेखील होतं की त्या साम्राज्यात लवकरच आशिया व आफ्रिका विलीन होणार असून त्याचबरोबर यूरोपच्या सीमाही ओलांडणार आहे.

## मी एका प्रवाशासारखा

प्रेषित मुहम्मद (त्यांना शांतता लाभो) अरेबियन द्वीपकल्पाचे शासक होते आणि त्यांच्याकडं निष्ठावंत अनुयायींचा एक समुदाय होता, ज्यांच्यासारखी माणसं जगाच्या इतिहासात कुठं आढळणार नाहीत.

प्रेषितांच्या जवळच्या अनुयायींपैकी एक उमर (अल्लाह त्यांच्याशी राजी होवो) एकदा प्रेषितांच्या घरी गेले तेव्हाचं वर्णन असं करतात, मी एकदा त्यांच्या खोलीमध्ये गेलो आणि खजुरीच्या एका चटईवर विश्रांती घेत असताना पाहिलं. त्यांच्या अंगावर अंगरखा नव्हता. त्यांच्या पाठीवर चटईच्या खुणा उमटल्या होत्या. एका कोपऱ्यात लाकडाच्या एका बाकड्यावर थोडंसं सातू ठेवलेलं होतं. ते पाहून मी दुसरं काही करू शकत नव्हतो, मी रडू लागलो.

प्रेषितांनी विचारलं, ''तुम्ही का बरं रडता?'' मी त्यांना उत्तर दिलं, ''रोम आणि पर्शियाचे राजे जगातल्या सर्व ऐश-आरामाच्या मजा लुटतात आणि आपण - अल्लाहचे प्रेषित असूनदेखील - इतकं कष्ट सहन करता!''

माझं हे बोलणं ऐकून प्रेषित उठून बसले आणि म्हणाले, ''उमर! या जगात म्हणजे तुमच्या बोलण्याचा अर्थ काय? तुम्हास हे पसंत नाही की त्या लोकांना हे जग मिळावं आणि आम्हाला परलोक?''

- त्यांच्या आयुष्यात मदीनेचा सबंध देश, जिथं प्रेषित मुहम्मद राहत असत- समृद्ध झाला. तरी भरभराटीच्या त्या काळातदेखील त्या अरेबिनय द्वीपकल्पाच्या घरी कित्येक दिवस चूल पेटत नव्हती. त्यांचा आहार केवळ

खजूर व पाणी एवढंच त्यांच्या कुटुंबियांना रात्रीच्या जेवणासाठी काही नसल्यानं सतत कितीतरी दिवस उपाशीच राहावं लागत असे.

- जेव्हा त्यांचे एक अनुयायी उरवा यांच्या पत्नीनं विचारलं, "इतकं अल्प प्रमाणात आहार घेऊन तुम्ही कसं काय जगता?" त्यांनी उत्तर दिलं, "त्यांचा आहार केवळ खजूर व पाणीच आहे. असं कधी कधीच घडत असते की सलग तीन दिवस पुरेल इतकं अन्नधान्य प्रेषितांच्या घरी असायचं."

- एकदा एक अन्सारी महिला आएशा यांच्याकडं आल्या असता त्यांनी प्रेषित मुहम्मद यांचा बिछाना पाहिला, ते फक्त कापड होतं. त्या घरी जाऊन वुलनचा एक बिछाना घेऊन परतल्या. जेव्हा प्रेषितांनी विचारलं, "काय ते?" आएशा म्हणाल्या, "अल्लाहचे प्रेषिता! एक अन्सारी महिला घरी आल्या होत्या. त्यांनी तुमचा बिछाना पाहिला आणि घरी जाऊन तुमच्यासाठी हे पाठवून दिलंय." प्रेषितांनी त्यांना ते परत करण्यास सांगितलं.पण आएशा यांनी ते परत पाठवलं नाही. घरी असलेलं बरं, असा त्यांनी विचार केला. प्रेषित म्हणाले, "आएशा! जर तशी माझी इच्छा असती तर अल्लाहशपथ! त्यानं माझ्यासाठी सोन्या-चांदीचे डोंगर देऊ केले असते."

- एके दिवशी प्रेषित मुहम्मद एक जाडजूड चटईवर विश्रांती घेत होते. त्या चटईचे व्रण त्यांच्या शरीरावर उमटले होते. त्यांच्या काही अनुयायींनी त्यांना विचारलं, "जर तुमची अनुमती असेल तर आम्ही तुमच्याकरिता काही मऊ बिछाना आणू?" प्रेषितांनी उत्तर दिलं,

> "माझं या जगाशी काय देणं-घेणं? मी एका प्रवाशासारखा, जो उन्हानं तापलेल्या दिवशी एका झाडाखाली त्याच्या छायेत थोडीशी विश्रांती घेतो आणि मग तो आपल्या प्रवासावर निघतो."

# दयाळू

माननीय आएशा म्हणतात, ''प्रेषित मुहम्मद (त्यांना शांतता लाभो) घरगुती कामात नेहमी भाग घेत, आपली वस्त्रं शिवत, आपली पादत्राणं दुरुस्त करीत, शेळीचं दूध काढीत, चामड्याच्या बादल्या शिवत, ते स्वत: बाजारातून वस्तू खरेदी करून आणीत असत.'' आएशा पुढं म्हणतात, ''प्रेषित घरात सर्वांत जास्त दयाळूपणानं वागत. खरं पाहता प्रेषितांपेक्षा अधिक कुणीही त्यांच्या लोकांसाठी प्रिय नव्हतं.''

- सवारीसाठी प्रेषित घोड्याला प्राधान्य देत असत. ते स्वत: आपल्या हातांनी घोड्याचे कान, नाक आणि डोळे स्वच्छ करायचे.

# विशेष अधिकार नाहीत

एका प्रतिष्ठित माणसासारखं प्रेषित मुहम्मद (त्यांना शांतता लाभो) चालताना पुढं पुढं जात नसत. ते आपल्या सेवकांना आणि मुलांना पुढं चालण्याचा मान देत.

- एखादी बैठक होत असेल तर प्रेषित स्वत:साठी कोणती जागा राखून ठेवत नसत. जिथं कुठं रिकामी जागा आढळे तिथं जाऊन बसत असत.

आपल्या अनुयायींना मुहम्मद म्हणाले, ''तुमच्यासारखाच मी एक माणूस, तुम्ही खाता तेच अन्न मी खातो आणि मला थकवा येतो तेव्हा तुमच्यासारखंच मीही खाली बसतो.''

- प्रेषितांचं पदार्पण झालं असता त्यांच्या आदरार्थ काही वाजवणं, उभं राहून त्यांचं स्वागत करणं त्यांना पसंत नव्हतं. जर काही लोक त्यांच्या सन्मानार्थ उभे राहिले तर ते नाराज होत आणि विदेशी लोकांच्या रीती-रिवाजांची नक्कल करण्याबद्दल ते त्यांना तंबी देत. दुसऱ्या शब्दांत सांगायचं झाल्यास स्वत:साठी काही विशेष अधिकार त्यांना मान्य नव्हते.

> ''जे परम कृपावंताची आराधना करणारे आहेत ते धरतीवर नम्रतेनं वावरतात आणि अज्ञानी लोक वाद घातल्यास त्यांना सांगतात, तुम्हांस सलाम.'' (कुरआन, २५:६३)

## कसलाही भेद नाही

एका प्रवासादरम्यान प्रेषित मुहम्मद (त्यांना शांतता लाभो) यांनी आपल्या अनुयायींना एक शेळी भाजून आणण्यास सांगितलं. एकानं शेळी कापण्याचं (जुबह करण्याचं) काम स्वीकारलं, दुसरा तिचं चामडं काढण्यास पुढं आला आणि आणखी एकानं ती शिजवण्याची जबाबदारी स्वीकारली.

प्रेषित म्हणाले, ''मी लाकडं गोळा करून आणतो.'' ''अल्लाहचे प्रेषिता!'' त्यांचे अनुयायी उद्गारले, ''आम्ही सर्व कामे करतो.'' प्रेषितांनी उत्तर दिलं, ''तुम्ही ते कराल मला माहीत आहे. पण त्यामुळं भेदभाव होईल, जे मला मान्य नाही. आपल्या भक्तानं इतर अनुयायींवर प्राधान्य देणं अल्लाहला आवडत नाही.''

## सहनशीलता

एकदा प्रेषित मुहम्मद (त्यांना शांतता लाभो) यांनी एका ज्यू धर्मिय व्यक्तीकडून जैद बिन सनाद्वारे काही कर्ज घेतलं. कर्जाच्या परतफेडीसाठी निश्चित केलेल्या दिवसाआधीच तो ज्यू इसम दिलेलं कर्ज परत मागण्यासाठी आला. तो प्रेषितांकडं गेला, त्यांचे कपडे धरले आणि सक्तीनं म्हणाला, ''मुहम्मद (स.)! तुम्ही माझं देणं का बरं परत करीत नाही? मी ऐकलंय की मुत्तलिब यांचे वंशज आपल्या कर्जाची परतफेड करीत नसतात.''

त्या वेळी उमर प्रेषितांबरोबर होते. ते रागावले. ज्यू इसमाची खरडपट्टीही काढली आणि त्यास मारहाण करण्याच्याच बेतात होते. पण प्रेषित

त्या माणसाला काहीच बोलत नव्हते. त्यांनी एवढं त्याच्या लक्षात आणून दिलं की ''मला शब्द पाळायला अजून तीन दिवस बाकी आहेत.'' मग प्रेषितांनी उमर यांना संबोधून म्हटलं, ''जैद आणि मला तुमच्याकडून चांगल्या वागणुकीची अपेक्षा होती. तुम्ही मला त्याच्या कर्जाची परतफेड करण्यास सांगायला हवं होतं आणि त्यास परत मागायला सांगितलं असतं तर बरं झालं असतं. त्याला बरोबर घेऊन जा आणि त्याचं कर्ज चुकतं करून टाका. वास्तविक त्यास २० सा (अंदाजे ४० किलो) खजूर अधिक देऊन टाका, कारण तुम्ही त्यास धमकावलंय.'' या घटनेचा महत्त्वाचा पैलू असा की मदीनेच्या इस्लामी राज्याचे सत्ताधीश असतानादेखील ते अशा प्रकारे सहनशीलतेनं आणि नम्रतेनं वागत होते.

## हसतमुख व प्रेमळ

प्रेषित मुहम्मद (त्यांना शांतता लाभो) इतरांबरोबर समतेनं राहात असतं. त्यांच्यावर टीका किंवा त्यांच्याशी अर्वाच्च भाषेत बोलला तरी त्यांच्या स्वभावावर काहीही परिणाम होत नसे. एकदा एक जंगली माणूस त्यांच्याकडं आला आणि त्यांचा रुमाल इतका घट्ट धरून ठेवला की त्यांच्या गळयावर त्याची खूण उमटली.

तो म्हणाला, ''मुहम्मद! मला दोन उंट उचलतील इतका माल देऊन टाका. कारण तुमच्याकडं असलेलं धन काही तुमचं नाही, ते तुमच्या वडिलांचं नाही. सर्व काही अल्लाहचंच आहे.'' यावर प्रेषित म्हणाले, ''आणि मी त्याचा सेवक.'' मग प्रेषितांनी विचारलं, ''मी जसा तुझ्याशी व्यवहार केला त्यामुळं तुला भीती वाटली की नाही?'' तो माणूस म्हणाला, ''नाही.'' प्रेषितांनी विचारलं, ''का?'' ''कारण तुम्ही वाईटाचा बदला वाईटानं घेत नाही हे मला माहीत आहे,'' त्यानं उत्तर दिलं.

हे ऐकून प्रेषितांनी स्मितहास्य केलं आणि त्यास एका उंटावर सातु आणि दुसऱ्या उंटावर खजूर देऊन टाकले.

## कणवाळू

एके काळी महिला मदीनेतील मशिदीची (सध्याची मस्जिदे नबवी) साफसफाई करीत होती. एके दिवशी ती प्रेषित मुहम्मद (त्यांना शांतता लाभो) यांना दिसली नाही. प्रेषितांनी तिच्याविषयी विचारणा केली. त्यांना कळवलं गेलं की ती मरण पावली. प्रेषित म्हणाले, ''मला तुम्ही आधीच का नाही सांगितलं? मला तिची कबर दाखवा.'' प्रेषित आपल्या अनुयायींना सोबत घेऊन कब्रस्तानात गेले. तिच्या कबरीशेजारी उभं राहून प्रेषितांनी तिच्यासाठी प्रार्थना केली.

## शांत स्वभाव आणि मोठेपणा

प्रेषित मुहम्मद (त्यांना शांतात लाभो) यांना गदारोळ पसंत नव्हता. त्यांना आपल्या प्रत्येक कामकाजावेळी शांतता, सभ्य वर्तन आणि शिस्त हवी होती. त्यांनी आपल्या सोबत्यांना मशिदीकडं धावत पळत जाण्यास मनाई केली. ते नेहमी सांगत असत, ''शांतपणा व सभ्यपणा तुमच्यासाठी आहे.''

एकदा हजच्या वेळी गजबज व गदारोळाचं दृश्य त्यांच्या पाहण्यात आलं. प्रेषितांनी हात उचलून शांतता पाळण्यास सांगितलं आणि म्हणाले, ''फाजिल घाई करणं चांगलं नव्हे.''

## मानवजातीची मुक्ती

जेते लोक सामान्यत: दोन प्रकारच्या भावनांच्या आहारी जातात- अहंकार व बदला, पण हिजरी सन ८ ला त्यांनी मक्का जिंकल्यावर यातली एकही भावना प्रेषित मुहम्मद (त्यांना शांतता लाभो) यांच्या वर्तनात दिसून आली नाही. प्रेषितांनी मानवजातीस मुक्तीची वाट दाखविली आणि पापांपासून

वाचण्यास सांगितलं. इब्न इसहाक याच्या कथनानुसार, मक्का जिंकल्यावर ते जेव्हा शहरात दाखल झाले त्या वेळी ते इतके वाकलेले होते की त्यांची दाढी उंटावरील खोगिराला लागत होती. आपल्या विजयाप्रसंगीसुद्धा मुहम्मद यांची नम्रता अशा प्रकारची होती. काबागृहाच्या दारावर उभे राहून त्यांनी जे प्रवचन दिलं त्यात ते म्हणतात, ''एकमेव अल्लाहशिवाय कुणीही सेवेस पात्र नाही, त्यानं आपलं वचन पाळलं आणि आपल्या भक्तास अडचणीत मदत केली, त्यानंच शत्रुंना खालच्या स्तरावर आणलं.''

दुसऱ्या शब्दांत त्यांनी या विजयाचं श्रेय स्वत: लाटलं नाही तर ते अल्लाहच्या मदतीनं मिळाल्याचं म्हटलं.

## मी अल्लाहचा दास आहे

एकदा प्रेषित मुहम्मद (त्यांना शांतता लाभो) यांच्या अनुयायींनी बोलायला अशी सुरुवात केली, ''ही जर अल्लाहची इच्छा असेल आणि त्याच्या पैगंबराची इच्छा असेल.''

हे ऐकून प्रेषितांच्या चेहऱ्याचा रंग रागानं बदलला आणि ते खूपच भावनावश होऊन गेले. त्यांनी सक्तीनं विचारलं, 'तुम्ही ईश्वराशी माझी बरोबरी करता! असं म्हणा, जर एकमेव अल्लाहनंच इच्छिलं तर...''

प्रेषित मुहम्मद म्हणाले, ''ख्रिस्ती व ज्यू धर्मियांसारखं तुम्ही माझं कौतुक करत जाऊ नका. तुम्ही मला अल्लाहचा दास व प्रेषित म्हणत जा. (कधीही अल्लाहचा पुत्र अथवा काही दैवी अस्तित्व म्हणू नका.)''

प्रेषित म्हणाले, ''ज्यांनी आपल्या प्रेषिताच्या कबरीचं मंदिर (ज्यू धर्मिय) केलं त्यांचा धिक्कार असो. माझ्या कबरीला धर्मस्थळ बनवू नका.''

१३

# खंदक, द्रोह आणि युक्ती

मदीनेत मुस्लिमांसाठी परिस्थिती कठीण होऊन गेली होती. उहुदच्या घटनेचे अनेक परिणाम उमटले. शेजारील कबिल्यांच्या नजरेत त्यांच्या प्रतिष्ठेला हानी पोचली. मुस्लिम दुबळे असल्याचं त्यांना वाटू लागलं होतं. या परिस्थितीचा फायदा उपटण्यासाठी त्यांच्याविरूद्ध अनेक मोहिमा आखल्या जात होत्या. मुहम्मद (त्यांना शांतता लाभो) यांना काही वेळा अशा योजनांबद्दल आगाऊ सूचना मिळत होत्या. ते १०० ते १५० मुस्लिमांच्या समूहांना विविध कबिल्यांना शांत करण्यासाठी किंवा अशा हल्ल्यांना रोखण्यासाठी पाठवित असत.

हिजरी सन ४ (इ. स. ६२०) मध्ये स्थानिक पातळीवर अशा लहानसहान लढाया होत राहिल्या. तरीदेखील यामुळं त्या त्या क्षेत्रात शक्तीचं संतुलन स्थापन करण्यास मदतच झाली. मक्केच्या कुरैश आणि मदीनेतील मुस्लिमांमध्ये हा एक प्रकारचा लपंडावच होता. एक परिपूर्ण युद्ध भविष्यात होणारच याची त्यांना खात्री होती. मक्केच्या कुरैश लोकांना अरब द्वीपकल्पातून मुस्लिम समुदायास नाहिसं करायचं होतं. हे तथ्य त्यांनी लपवलंही नव्हतं. यासाठी ते शेजारील कबिल्यांशी करार करीत होते. त्यांची परिस्थिती अधिकच अडचणीची होती, कारण उत्तरेकडील सीरिया व इराकला जाणारे व्यापारी मार्ग अजूनही मदीनेच्या मुस्लिमांच्या नियंत्रणाखाली होते. म्हणूनच कुरैश लोकांचा असा विचार होता की सीरिया व इराककडं जाणाऱ्या त्यांच्या काफिल्यासाठी लवकरात लवकर मुक्त करणं गरजेचं असून त्याकरिता तातडीची धडक मोहीम हाती घ्यावी लागणारच.

# आघाडी

प्रेषित मुहम्मद (त्यांना शांतता लाभो) यांच्या धर्मप्रचाराचा शेवट करण्यासाठी आणि मुस्लिमांना चिरडून टाकण्यासाठी अरब द्वीपकल्पातील इस्लामविरोधी कबिले आणि कुरैश लोक एक परिपूर्ण हल्ला करण्याच्या तयारीस लागले होते. बनू नजीर कबिल्याचा सरदार ह्यूये, खैबरहून ज्यू नेत्यांना घेऊन करार संमत करण्यासाठी मक्केला गेला, यात मुळीच शंका नव्हती की त्यांना प्रेषित मुहम्मद आणि मुस्लिम समुदायावर हल्ला करून हाकलून द्यायचं होतं. या करारात सहभागी होण्यासाठी त्यांनी इतर कबिल्यांशीही संपर्क साधला. बनू गतफान आणि बनू सुलयाम यांनी एकत्र येऊन इस्लामला चिरडून टाकण्यासाठी आघाडी केली.

कुरैश आणि त्यांच्याशी करार केलेल्या शक्तींकडं दुर्लक्ष करण्याजोगी गोष्ट नव्हती. जेव्हा त्यांचं लष्कर मदीनेकडं निघालं, तेव्हा असं वाटू लागलं की मुस्लिम त्यांच्या तोडीचे नाहीत. कुरैश आणि त्यांच्या आघाडीचे कबिले धरून ४००० सैन्य होतं. शिवाय नज्दहून विविध कबिल्यांच्या दुसऱ्या आघाडीचे ६००० सैन्य त्यांना मिळणार होतं. म्हणजे एकूण १० हजारांचं लष्कर. मदीना शहरावर दोन्ही बाजुंनी हल्ला होणार होता. म्हणजे मदीना शहराला चोहोबाजुंनी १०००० सैन्य वेढा घालणार होतं.

कुरैश सैन्यानं मदीनेसाठी कूच केल्यावर प्रेषितांचे चुलते अब्बास यांनी मक्केहून मदीनेला एक शिष्टमंडळ पाठवून मुहम्मद यांना शत्रूच्या हल्ल्याची बातमी पुरविली. हे शिष्टमंडळ मदीनेला पोचल्यानंतर मदीनेच्या मुस्लिमांना आपल्या बचावाची युक्ती योजण्यासाठी जेमतेम एक महिन्याचा कालावधी उपलब्ध होता. ते ३००० पेक्षा अधिक सैन्य जमवू शकत नव्हते. म्हणजे शत्रूच्या संख्येच्या एकतृतियांशपेक्षाही कमी.

# कल्पकता आणि परकीय युद्धकौशल्य

इस्लामच्या परंपरेनुसार प्रेषित मुहम्मद (त्यांना शांतता लाभो) यांनी या परिस्थितीबाबत कोणती उपाययोजना करावी यावर विचारविनिमय करण्यासाठी सर्व अनुयायींना एकत्र बोलवलं. काहींनी अशी सूचना केली की बद्र युद्धाच्या वेळी बाहेर जाऊन रास्त सामना केला होता, तसाच या वेळीही करावा. इतरांचं म्हणणं होतं की शहराच्या आत राहूनच जर आपण शत्रूची वाट पाहिली तर यशस्वी ठरू. उहुदच्या युद्धापासून आपण धडा घेतला पाहिजे. पर्शियाचे सलमान (सलमान फारसी) या अनुयायींमध्ये होते. ते बऱ्याच काळापासून सत्याचा व ईश्वराचा शोध घेत होते. प्रेषितांची जवळीक साधण्याच्या हेतूनं त्यांनी मक्केचा प्रवास केला. त्यांच्या सभा-बैठकांमध्ये सहभाग घेतला. ते सर्वांत जास्त परायण आणि एकनिष्ठ होते. सलमान फारसी एक अशी युक्ती सांगण्यास उभे राहिले जी त्या काळात अरबांना माहीत नव्हती. ते म्हणू लागले,

“अल्लाहचे प्रेषिता! पर्शियामध्ये आम्हाला कुणाच्या हल्ल्याची भीती जाणवली की आम्ही शहराभोवती एक खंदक खणत होतो. आम्हाला तसाच खंदक खोदावा लागेल.”

ही कल्पना अनपेक्षित होती, पण सर्वच अनुयायींना ती पटली आणि त्यास प्रत्यक्ष साकारण्याचं ठरलं. शत्रूंच्या घोडेस्वारांना उडी मारून अलीकडं येणं शक्य होऊ नये इतका रुंद खंदक खोदण्यासाठी त्यांच्याकडं फक्त एक महिना होता, किंबहुना त्याहूनही कमीच अवधी होता. तो इतका खोल होता की त्यात पडलेला माणूस बाहेर निघू शकत नव्हता.

कुरैश लोकांशी हा तिसरा लढा होता आणि मुहम्मद यांनी आखलेली ही तिसरी रणनीती होती. बद्रच्या वेळी तिथल्या विहिरीभोवती वेढा घालण्यात आला होता. उहुदच्या वेळी टेकडीचा उपयोग युद्धाचे डावपेच म्हणून केला होता. या वेळी या दोन्ही युत्त्या उपयोगी नव्हत्या. म्हणून खंदक खणून शत्रूच्या येण्याची वाट पाहण्याचा निर्णय घेतला गेला आणि फक्त याच युक्तीद्वारे

हल्ल्याला तोंड देणं शक्य होतं. शत्रूनं घातलेला वेढा दीर्घकाळ चालूच राहिला तर शहरामधील लोकांनाही त्या हल्ल्याचा प्रतिकार करता येईल. प्रेषितांनी जी शोधात्मक पद्धत या युद्धात अवलंबली त्यामुळं त्यांनी आपल्या अनुयायींची विभिन्न परिस्थितींमध्ये अल्लाहवर प्रगाढ श्रद्धेबरोबरच आपल्या बुद्धीकौशल्याचा कसा उपयोग करावा याच्या त्यांनी दिलेल्या प्रशिक्षणाचा अंदाज बांधला जाऊ शकतो. प्रेषित मुहम्मद आणि त्यांच्या अनुयायींनी एक विदेशी युद्धनीती अंगीकारली जी एका पर्शियन अनुयायीनं सुचविली होती, ती अंमलात आणण्यात मागं-पुढं पाहिलं नव्हतं. ही पद्धत मदीनावासीयांसाठी नवीनच होती. त्यांच्या विचारशक्तीमध्ये त्या लोकांची बुद्धिमत्ता, राष्ट्राचा सुज्ञपणा आणि मानवी सृजनशीलता या गुणांचा समावेश होता. प्रेषितांनी महतत्व देऊन म्हटलं होतं,

"सुज्ञपणा मुस्लिमांचा हरवलेला गुणधर्म होता, जिथं कुठं आढळेल ते आत्मसात करावा."

मानव विचारांच्या अभ्यासासाठी ही सर्वोत्तम पद्धत होती. तिला मानवजातीचा सकारात्मक वारसा समजून (मारूफ : सर्वपरिचित गुणधर्म) स्वीकारायला हवं. विस्तारित अर्थानं मानवजातीचं व्यवस्थापन करताना जिज्ञासा, शोधात्मक वृत्ती आणि सृजनशीलतेचं दर्शन घडवणं होय. प्रेषितांची ही पद्धत फक्त युद्धापुरतीच सीमित नव्हती तर त्यांनी जागतिक घडामोडी आणि विचारांचाही याच दृष्टिकोनातून अभ्यास केला.

## खंदक

मदीना शहर तीन बाजुंनी घरं आणि बागांनी वेढलेलं होतं. फक्त एकच बाजू खुली होती. प्रेषित मुहम्मद (त्यांना शांतता लाभो) यांनी खंदक खोदण्यासाठी ३००० अनुयायींना नेमलं. प्रत्येकाला दहा वार एवढा भाग खोदण्यास ठरवून दिला. हा खंदक सहा कि.मी. लांब १० वार (तीन मीटर) रूंद आणि १६ मीटर खोल होती. सबंध खोदकाम आणि दगड-माती उचलून ९

लाख ६३ हजार चौरस फूट एवढा ढिगारा उपसण्याचं काम फक्त तीन आठवड्यांच्या विक्रमी अवधीत पूर्ण झालं. ही एक ऐतिहासिक बाब आहे. त्या कामासाठी लागणारी साधनं इतकी अपुरी होती की खोदकामाची यंत्रं, टिकाव, खोरं, टोपली इत्यादी बनु कुरैजा कबिल्याकडून उसणवारीनं घेतली गेली. लोक हे काम सकाळपासून रात्रीपर्यंत करीत होते.

''मीही काम करतो.'' प्रेषित मुहम्मद म्हणाले, ''जर काही काम असेल तर...'' त्यांनीही खोरं व टिकाव घेतलं आणि आपल्या इतर अनुयायींबरोबर खोदकाम करू लागले. आपल्या खांद्यावर माती भरलेली पाटी उचलली.

सलमान फारसी यांना आठवतं की, खोदकाम करतेवेळी एका मोठ्या दगडाचा अडथळा येत होता. तो काही केल्या फुटत नव्हता. प्रेषितांनी त्यांना पाहिलं आणि मदतीस आले. त्यांनी त्या दगडावर जोराचा प्रहार केला आणि त्याचे दोन तुकडे झाले.

प्रेषित मुहम्मद कसलंही काम करण्यास तत्पर असत, मग ते घरगुती काम का असेना. अनस नंतरच्या काळात त्यांचे सेवक झाले. आपली आठवण सांगतात, ''मी त्यांची जितकी सेवा केली त्याहून अधिक त्यांनी माझी सेवा केली. ते माझ्यावर कधी रागावले नाहीत. माझ्याशी कधीही सक्तीनं वागले नाहीत.''

इतर लोकं काम करीत असताना मुहम्मद त्यांना बघत बसत नव्हते. ते कामात सहभागी होत असत. मध्ये मध्ये अल्लाहचा नामोच्चार करीत, कधी एखादी कविता म्हणत आणि ते त्यांची साथ देत. असं करून त्यांनी काम करताना अनुयायींमध्ये बंधुभाव व आपुलकी निर्माण केली. आपल्या भावना आणि इच्छा-आकांक्षा व्यक्त करणं याद्वारे शक्य झालं. जेव्हा जेव्हा मुहम्मद यांना अनुयायींमध्ये सामर्थ्य एकवटण्याची गरज भासली त्यांनी त्यांच्या सर्व गुणांना एकत्र केलं. मुस्लिम समुदायात ऐक्य निर्माण करणं हा त्यामागचा हेतु होता. अल्लाहवर त्यांची प्रगाढ श्रद्धा. त्यांच्या संवेदनांना काव्यात्मक रूप दिलं आणि भावनांना सूरबद्ध केलं. ते त्याच समुदायातले होते. त्यांच्या दरम्यान जरी ते अल्लाहची सेवा करीत होते तरीदेखील त्यांची व प्रेषितांची संस्कृती व इतिहास एकच. त्यांच्यातच ते होते.

जसजसं खंदकाचं खोदकाम सुरू झालं तो साकारत गेला. हे फार मोठं यश होतं. कोणत्याही ठिकाणावरून शत्रूच्या घोडेस्वारास तो ओलांडणं शक्य नव्हतं. मुस्लिमांचे तिरंदाज त्यांना सहज आपलं लक्ष्य बनवू शकत होते.

# प्रखर सेनापती

खंदक-युद्धाची तयारी करताना प्रेषित मुहम्मद (त्यांना शांतता लाभो) यांच्या व्यक्तिमत्त्वातील लष्करी कौशल्य प्रखरतेनं जाणवलं. युद्ध सुरू होण्याआधी प्रेषितांनी अनेक उपाय योजले.

काही अनुयायींना बरोबर घेऊन घोड्यावर स्वार होऊन सबंध शहराची टेहळणी केली आणि कुठं संरक्षण कमी पडते, कुठं खंदक खोदावा लागेल याचं निरीक्षण केलं. प्रेषितांनी एका अभियंत्यासारखी कामाची देखरेख केली आणि शत्रूकडून हल्ला होण्यापूर्वी आपल्या अनुयायींचं नेतृत्व केलं. त्यांनी शत्रूनं शहरावर आक्रमण करण्याआधीच आपलं काम पूर्ण केलं होतं.

खंदक खोदून संरक्षण करणं मदीना आणि अरब द्वीपकल्पातील लोकांसाठी एक नवी आणि अभिनव बाब होती. म्हणूनच त्यांनी या गोष्टीची पूर्ण खबरदारी घेतली की या बाबतची माहिती कुरैश आणि त्यांच्या आघाडीतील इतर दलांना मिळू नये, जे मुस्लिमांवर एक जोरदार आक्रमण करण्याच्या बेतात होते. ते शत्रूंना आश्चर्यचकित करणार होते. मदीनेच्या आत व बाहेर लोकांच्या ये-जा करण्यास प्रतिबंध लावण्यात आला. अशा प्रकारे खंदकाची माहिती कुणालाही मिळू नये याची काळजी घेतली. मदीनेच्या सरहद्दीवर २४ तास पहारा ठेवण्यासाठी माननीय अली आणि इतर अनुयायींना नियुक्त केलं. शत्रूवर पाळत ठेवण्यासाठी दोन मनोरे बांधण्याचा आदेश दिला. प्रेषितांच्या आदेशावर त्यांच्या अनुयायींनी मदीनेच्या बाहेरील शेत आणि बागांमधला सर्व अन्नधान्याचा साठा करून घेतला. म्हणजे शत्रूंना फक्त त्याच्या स्वत:च्याच अन्नधान्यावर आपला उदरनिर्वाह करणं भाग पडेल. याद्वारे प्रेषितांनी अन्नधान्याचा साठा शहरातच करून घेतला आणि हे धान्य शत्रूच्या

हाती लागू नये अशी व्यवस्था केली. कुरैशच्या फौजा मदीनेस पोचायला निघताच मुस्लिमांचे ३००० सैनिक घाईघाईनं खंदकाच्या अलीकडं मदीनेच्या आत आले आणि शत्रूची वाट पाहू लागले.

कॉन्स्टनटाइन व्ही. जी. (पॅरिस, फ्रान्स) एक रोमन साहित्यिक होता. त्यानं आपल्या पुस्तकात खालीलप्रमाणं लिहिलंय,

> ''जर्मनविरूद्धच्या युद्धात सोव्हियत फौजांनी हीच रणनीती अंमलात आणली होती. जर्मन लष्कराच्या मार्गातील शेत व बागांमधील उत्पादनं त्यांनी गोळा करून घेतली किंवा त्यांची नासधूस करून टाकली. म्हणजे त्यांचा जर्मन लष्कराला फाया मिळू नये. ही २०व्या शतकातली गोष्ट आहे. मुहम्मद यांनी ७व्या शतकातच ती अंमलात आणली होती. जेव्हा कुरैश (मदीनेच्या) सीमेवर पोचले ते पूर्णत: आश्चर्यात पडले. त्यांनी अशा कोणत्याही शत्रूचा सामना केला नव्हता, ज्यानं खंदक खोदून इतक्या कौशल्यानं रास्त सामना टाळला होता. तसेच त्यांचा अशा कोणत्याही शत्रूशी सामना झालेला नव्हता ज्यानं आपल्या शेत व बागांच्या उत्पादनांपासून त्यांना वंचित केलं होतं. कुरैश फौजांचा अन्नधान्य साठा आणि त्यांच्या घोड्यांसाठी चारा लवकरच संपून गेला.''

## नाकेबंदी

मक्केचे कुरैश त्यांच्या आघाडीतील जवळपास १००० सैन्य, घोडे आणि काही उंट ३१ मार्च इ. स. ६२७, हिजरी वर्ष ४ रोजी मदीनेच्या पूर्व व पश्चिमेस येऊन स्थिरावले. तिथल्या पिकांना अगोदरच कापून टाकलेलं पाहून कुरैशांचं धैर्य खचून गेलं. त्यांनी आपल्याबरोबर जो चारा आणला होता त्याशिवाय त्यांच्या घोड्यांना काहीही उपलब्ध नव्हतं. मुस्लिमांना शक्यतो

लवकरात लवकर संपवणं शक्य नव्हतं, ज्या हेतुनं ते मदीनकडं निघाले होते. खंदक पाहताच ते अनपेक्षित आश्चर्यात पडले. ज्यामुळं मदीनेभोवती वेढा घालून सामूहिकपणे शहरावर हल्ला चढवण्याची योजना फसली. ही खंदक युद्धातलीच एक युक्ती होती अरबांसाठी अपरिचित आणि म्हणूनच मुस्लिमांना पराभूत करून मदीना जिंकण्यासाठी त्यांना दुसरी योजना आखावी लागणार होती. अल्प काळासाठीच वेढा घालून मदीनेवर ताबा मिळवण्यासाठी कुरैश आणि त्यांच्या साथीदारांदरम्यान चर्चा सुरू झाली. त्यांनी असं ठरवलं की उत्तरेकडं सैन्याची मोठ्या संख्येनं जमवाजमव करून इतर सैन्यांनी पश्चिमेकडून खंदक ओलांडण्याचा प्रयत्न करावा जिथं मदीनेच्या सैन्याचा पहारा नाही.

## द्रोह

बनु कुरैजा हा ज्यू कबिला मुख्यत: त्याच भागात राहात होता. त्यांनी मुहम्मद (त्यांना शांतता लाभो) यांची मदत करण्याच्या करारावर स्वाक्षरी केली होती. मदीनेच्या एकतेसाठी मात्र ते एक दुर्बल घटक होते. त्यांचा सरदार कअब बिन असदला भेटून त्यास मुहम्मद यांच्याशी केलेला करार भंग करण्यास समजावण्यासाठी बनु नजीर कबिल्याचा सरदार ह्युअय यानं आग्रह धरला. सुरुवातीस कअब हा ह्युअय यास भेटण्यास तयार नव्हता. पण त्यानं कअबवर दबाव आणला आणि मग तो तयार झाला. त्यानं पाहिल्यांदा ह्युअयचं ऐकून घेतलं आणि मग मदीनेच्या मुस्लिमांशी केलेला करार मोडून टाकला.

बनु कुरैजाच्या दलबदलीचा सरळ अर्थ मदीनेच्या मुस्लिमांची संपूर्ण रणनीती कोलमडून जाण्याचा होता. बनु कुरैजाच्या शत्रूशी जाऊन मिळणं म्हणजे शत्रूला शहरात दाखल होण्याचा मार्ग सोयिस्कर होणार होता. ज्यामुळं पराभूत होणं अटळ आणि मुस्लिमांची सर्रास कत्तल होणार होती.

बनु कुरैजा या ज्यू टोळीनं कुरैश सैन्याशी हातमिळवणी करणं मान्य केलं. यादरम्यान शत्रूसैन्याच्या हालचालीची मुहम्मद यांना शंका येऊ लागली, कारण त्यांच्या फौजा उत्तरेकडं निघाल्या होत्या. म्हणून त्यांनी बनु कुरैजाची

विश्वसनीयता परखून घेण्याचा निर्णय घेतला. बनु कुरैजा पूर्णत: त्याच्या बाजूनं नव्हते, हे त्यांना माहीत होते.

याच दरम्यान बनु कुरैजा कबिल्याच्या सरदारांशी झालेला करार एकतर्फी मोडून टाकण्याची कुजबुज मुहम्मद यांच्या कानावर आली. जर ही बातमी खरी ठरली तर मुस्लिम सैन्याचं मनोबल खचून जाणार नव्हतं तर हे युद्ध जिंकण्याची संधीच त्यांनी गमावली असती. मुहम्मद यांनी याबाबतची गुप्त माहिती मिळवण्यासाठी दोन हेर पाठवले. जर ही बातमी खोटी असेल तर जाहीरपणे तिची घोषणा करण्याचा आदेश त्यांना दिला जेणेकरून मुस्लिमांना धैर्य मिळावे आणि जर ती खरी असेल तर त्याबाबत फक्त त्यांनाच त्यांनाच माहिती द्यावी. हेर म्हणाले, ''ही बातमी खरी आहे.'' आता मुहम्मद यांना ताबडतोब कृती करायची होती. बनु कुरैजाच्या मदतीनं शत्रूसैन्य मदीनेत दाखल होऊ नये यासाठी त्यांनी जैद यांच्या नेतृत्वात ३०० शिपाई पश्चिमेकडील सीमेवर पाठवले.

या वेढ्यामुळं दिवसेंदिवस अडचणी वाढत गेल्या. मुस्लिमांना सतत दक्षता घ्यावी लागत होती. एकेदिवशी चोहोबाजुंनी आणि प्रत्येक आघाडीवर आक्रमण होत राहिलं. यामुळं मुस्लिमांना सकाळ आणि दुपारची नमाज अदा करता आली नाही याचा प्रेषितांना राग आला आणि या नाकेबंदीमुळं अनुयायींचं मनोबलही खालावत होतं. पवित्र कुरआनमध्ये त्यांच्या संवेदनांचं वर्णन अशा प्रकारे आलंय,

> ''जेव्हा ते तुमच्यावरून आणि खालून चालून आले तेव्हा तुमचे डोळे मिटून गेले, काळीज तोंडाशी आले. आणि तुम्ही अल्लाहच्या बाबतीत काहीबाही विचार करू लागलात. या ठिकाणी श्रद्धावंतांची परीक्षा घेण्यात आली आणि ते प्रचंड हादऱ्यानं हादरून गेले.'' (कुरआन, ३३:१०-११)

कसोटी अत्यंत कठीण होती आणि यामुळं कबिल्याची (सामूहिक व) वैयक्तिक निष्ठा आणि त्यांचा प्रामाणिकपणा समोर आला. बनु कुरैजांचा दुटप्पीपणाच या युद्धाद्वारे चव्हाट्यावर आला नाही तर त्यांचा दांभिकपणाही उघड झाला. त्यांनी दिलेल्या वचनांचा पुनर्विचारच केला नाही तर शरण

जाण्याचाही विचार केला.

पवित्र कुरआनात म्हटलंय,

> ''तेव्हा दांभिक आणि अशी माणसं ज्यांच्या मनांना विकृती जडलीय म्हणू लागले, अल्लाह आणि त्याच्या प्रेषितानं जे वचन दिलं ते फसवणुकीपलीकडं काहीच नव्हतं.''
>
> (कुरआन, ३३:१२)

आणि हे की,

> ''त्यांच्यापैकी एक गट म्हणाला, मदीनेचे लोकहो! आता तुमचं काही खरं नाही. आता परत चला, तर (आणखीन) एक गट प्रेषितांकडं असे सांगत परवानगी मागत होता, की आमची घरं सुरक्षित नाहीत, पण ते धोक्यात नव्हते. त्यांना तर नुसती पळ काढायची होती.'' (कुरआन, ३३:१३)

काही दुसरी माणसं सरळ युद्धातून पसार होऊ इच्छित होती. त्यांच्यावर असं उघड झाल्याचं वाटत होतं की मुस्लिमांचं संरक्षण लवकरच डगमगणार आहे. अशा पद्धतीनं जास्त काळ टिकून राहणं संभव नाही.

मुस्लिम लोक प्रेषितांशी एकनिष्ठ होते आणि त्यांच्या अपार निर्धारात ती सामील होती. या अत्यंत अडचणीच्या अवस्थेत मुस्लिमांची एकमेव अल्लाहवर प्रगाढ श्रद्धा आणि त्याची निष्ठा उजेडात आली. खालील आयतीत (कुरआनचा श्लोक) याचं वर्णन अशा प्रकारे आहे,

> ''तुमच्यामधील अशा प्रत्येकासाठी ज्यांना अल्लाह आणि परलोकाच्या बाबतीत आकांक्षा आहेत आणि जे अल्लाहच्या स्मरणात मग्न असतात त्यांच्यासाठी अल्लाहच्या प्रेषितांमध्ये उत्कृष्ट आदर्श आहे.'' (कुरआन, ३३:२१)

या आयतीचा अर्थ युद्धाच्या परिस्थितीपलीकडं आहे. यामध्ये प्रत्येक मुस्लिमाच्या जीवनात प्रेषितांची भूमिका आणि त्यांचा मरातब सांगण्यात आलाय. पण या आयतीच्या अवतरणाचा संदर्भ लक्षात घेतल्यास बरेचसे पैलू समोर येतात. मुस्लिम समुदायाभोवती वेढा घातलेला होता, ते हादरून गेले

होते. समोर येऊ घातलेल्या अनर्थापासून बाहेर पडण्याचा कोणताच मार्ग सुचत नव्हता. कुरआनच्या खालील अवतरणात म्हटलं गेलंय,

> ''शत्रूंचा जमाव पाहताच श्रद्धावंत म्हणू लागले, हेच ते वचन जे आम्हांस अल्लाह आणि त्याच्या प्रेषितानं दिलं होतं. अल्लाह आणि त्याच्या प्रेषितांचं म्हणणं खरं होतं. यामुळं त्यांच्या श्रद्धेत भरच पडली नि आज्ञापालनात त्यांचा उत्साह आणखीनच वाढला.'' (कुरआन, ३३:२२)

# एक प्रभावी युक्ती

मुस्लिम वास्तविक अडचणीत होते, पण दिवस उलटत गेले तसतसं कुरैश आणि त्यांच्या संयुक्त फौजादेखील अडचणीत अडकत होत्या. त्यांच्याकडं अन्नधान्याचा पुरेसा साठा नव्हता आणि रात्रीच्या वेळी कडक थंडी होती.

या वेळी कुरैशचे एक प्रतिष्ठित वयस्क व्यक्ती नएेम- ज्यांचा सर्वच लोकं सन्मान करीत होती- प्रेषित मुहम्मद (त्यांना शांतता लाभो) यांच्याकडं आले आणि म्हणाले की त्यांनी इस्लाम धर्म स्वीकारलाय. पण आतापर्यंत कुणाला याची माहिती नाही. ते प्रेषितांच्या सेवेत हजर झाले.

इब्ने हिश्शामच्या कथनानुसार, नुऐम सर्वपरिचित होते आणि ज्या सरदारांनी मदीनेभोवती वेढा घातलेला होता ते सर्वच त्यांचा आदर करीत होते, हे प्रेषितांना माहीत होते. ते नुऐम यांना म्हणाले,

> ''त्यांच्यामध्ये कलह माजविण्यासाठी जे काही करता येईल ते करा. आमच्यावरील त्यांची पकड सैल करण्यासाठी वाटेल ते करा, युद्ध म्हणजे लबाडीच!''

नुऐम यांनी एक उत्तम युक्ती आणली. ते सर्वप्रथम बनु कुरैजा या ज्यू टोळीकडं गेले. त्यांना असं सांगितलं की कुरैशांनी त्यांची काही माणसं

त्यांच्याकडं ओलीस म्हणून पाठवून द्यावीत, म्हणजे ते बनु कुरैजाला वाऱ्यावर सोडून देणार नाहीत. बनु कुरैजाच्या प्रमुखांना ही कल्पना आवडली आणि कुरैशांकडं आपले प्रतिनिधी पाठवून त्यांना तसं कळवण्याचा निर्णय घेतला.

नुऐम आता घाईनं कुरैश सरदार अबु सुफियानकडं असा इशारा देण्यासाठी गेले की बनु कुरैजा त्यांच्याशी लबाडी करत आहे. खरं पाहता ते मुहम्मद यांच्या बाजुनं आहेत. नुऐम यांनी त्यांना असंही सांगितलं की बनु कुरैजा त्यांची काही माणसं त्यांच्या निष्ठेचा पुरावा म्हणून पाठवायला सांगत असले तरी वास्तविक पाहता त्या माणसाला ते प्रेषितांकडं पाठवून आपल्या निष्ठेची साक्ष देणार आहेत.

बनु कुरैजाच्या प्रतिनिधीनं अबु सुफियानकडं येऊन तशी विनंती केली असता अबु सुफियानला खात्री झाली की नुऐम सत्य सांगत होते, बनु कुरैजा त्यांच्याशी लबाडी करत आहेत. अबु सुफियाननं ताबडतोब ह्युअयला बोलावून घेतलं आणि या धोक्याबाबत त्यांना विचारू लागले. बनु नजीरप्रमुख आश्चर्यचकित झाला. त्याला काय सांगावं कळेना. अबु सुफियानला त्याच्या वर्तनात गद्दारी दिसून आली.

कुरैश आणि त्यांच्या संयुक्त फौजांमध्ये मतभेदाची चिन्हं दिसू लागली. काही कबिल्यांमध्ये आपसात विश्वासाचं वातावरण होतं, तर काही कबिले एकमेकांना पसंत करत नव्हते. या बाबीमुळं संयुक्त सैन्याचा निर्धाव डगमगु लागला.

दोन आठवडे उलटले तरी काहीही हाती लागलं नाही. त्यांच्या सैन्याच्या खाण्या-पिण्याच्या वस्तू संपू लागल्या. चाऱ्याअभावी त्यांची घोडी दररोज मरू लागली. काही उंटही मरण पावले. थकवा, अन्नपाण्याची कमतरता आणि कंटाळा यामुळ संयुक्त फौजा खचून गेल्या. त्यातच कडाक्याच्या थंडीचं वारं वाहू लागलं. आता त्यांना खात्री होऊ लागली की मदीनेवर ताबा मिळवणं संभव नाही.

प्रेषित मुहम्मद यांना शत्रूच्या मनोबलाची माहिती मिळाली होती. त्याची पुष्टी करण्यासाठी त्यांनी आपले अनुयायी हुजेफा यांना पाठवलं. हुजेफा

शत्रूसैन्यात गोंधळ माजविल्याची चांगली बातमी घेऊन परतले. शत्रूसैन्य इकडंतिकडं भरकटत होतं. थंडीचं तापमान आणि वाऱ्यामुळं गारठल्यासारखं झालं होतं. माणसं आपले तंबू काढत होते. बरेच लढवय्ये आधीच पसार झाले होते.

प्रेषित मुहम्मद यांनी सकाळच्या नमाजनंतर शत्रूसैन्यानं पळ काढल्याची खूशखबर दिली. दिवस उजाडल्यावर त्याची पुष्टी केली. हिजरी सनाच्या चौथ्या वर्षी टाकलेला हा वेढा पंचवीस दिवस चालला आणि संयुक्त फौजा पराभूत होऊन घरी परतल्या. युद्ध न करताच त्यांना पराजयाची नामुष्की पत्करावी लागली.

मुस्लिमांच्या दुहेरी विजयाची बातमी अरब द्वीपकल्पात सर्वदूर वाऱ्यासारखी पसरली. यामुळं त्यांच्या विजयाचा दृष्टिकोन आणि सत्तेचं संतुलन बदलून गेलं. मुस्लिमांनी १०,००० च्या सैन्याचाच प्रतिकारच केलेला नव्हता तर त्यांचा निश्चयदेखील तसूभरही खालावला नव्हता.

# मुस्लिमांचं औदार्य

प्रेषित मुहम्मद (त्यांना शांतता लाभो) यांच्या कन्या जैनब (अल्लाह त्यांच्याशी राजी होवो) यांचा विवाह अबुल आस यांच्याशी झाला होता. त्यांनी इस्लाम स्वीकारलेला नव्हता. त्या सुरुवातीस त्यांच्याबरोबर मक्केतच राहिल्या होत्या. प्रेषितांनी नंतर त्यांना आपली मुलगी उमामासह मदीनेत येण्यास सांगितलं. जैनब आपल्या पतीवर प्रेम करीत होत्या, पण त्यांच्या विभिन्न जीवनशैलीमुळं त्यांना वेगळं व्हावं लागलं. पण दोघांनीही पुनर्विवाह केला नाही.

खंदकयुद्धाच्या काही महिन्यांनंतर कुरैश सरदार अबुल आस यांच्या नेतृत्वात एक व्यापारी काफिला सीरियाहून मक्केकडं परततोय असं प्रेषित मुहम्मद यांना कळलं. यात मोठ्या प्रमाणात वस्तू होत्या आणि कुरैश टोळ्यांचाही यात मोठा वाटा होता. प्रेषितांनी या काफिल्यास अडविण्याचा निर्णय घेतला. मुस्लिम सैन्याचे सेनापती बनवून जैद यांना पाठवलं. ज्या मुस्लिमांनी मक्का सोडून मदीनेस स्थलांतर केलं होतं त्यांची मालमत्ता कुरैश शत्रूंनी जप्त केली होती. त्याची नुकसानभरपाई करून घेणं हा प्रेषितांच्या या हल्ल्यामागचं एक कारण होतं आणि दुसरं कारण मक्केतील लोकांसमोर आपलं शक्तीप्रदर्शन करणं जे मदीनेविरूद्ध कारवाया करत होते.

जैदनं काफिल्याचा माल जप्त केला आणि बऱ्याच प्रमाणात मक्केच्या लोकांना ताब्यात घेतलं. काही पळून गेले, यामध्ये अबुल आसही होते. त्यांनी मक्केस परतताना मदीनेत थांबून आपल्या पत्नीला गुप्तपणे भेटण्याचा निर्णय

घेतला. यात मोठा धोका असला तरी आपल्या पत्नी व मुलगीला पाहण्याची त्यांना उत्कट इच्छा होती. रात्री उशिरा त्यांनी आपल्या पत्नीचा दरवाजा खटखटला आणि जैनब यांनी त्यांना आत घेतलं. ते तिथंच राहिले.

पहाट होताच जैनब नमाज अदा करण्यासाठी मशिदीत गेल्या. मशिदीत पुरुषांच्या मागं महिलांसाठीच्या पहिल्याच रांगेत त्या उभ्या राहिल्या. प्रेषित जेव्हा नमाजची सुरुवात करण्यास उठले, तेवढ्यात त्यांनी मोठ्या आवाजात सांगितलं, ''लोकहो, मी रबीयाचा पुत्र अबुल आस यांना आपला आश्रय देते.''

नमाज संपल्यावर त्यांच्या कन्या आणि पतीदरम्यान पूर्वी काय घडलं हे प्रेषितांना माहीत नव्हतं. अनुयायींनीही जे ऐकलं त्याची पुष्टी केली. प्रेषितांनी आवर्जून सांगितलं की त्यांच्या कन्येनं किंवा कुणीही जर आश्रय दिला असेल तर त्याचा आदर करायला हवा.

प्रेषित मुहम्मद आपल्या कन्येच्या घरी गेले. त्यांनी अबुल आसची परिस्थिती सांगितली. उत्तरेकडं आताच ज्यांना मोहिमेवर पाठवलं होतं त्यांनी अबुल आसकडील सगळा माल काढून घेतला. या वस्तू मक्कावासियांनी त्याच्या संरक्षणात दिल्या होता. आता त्यांच्यावर कर्जाचा बोजा आहे. प्रेषित मुहम्मद यांनी सुचवलं की ज्या लोकांकडं अबुल आसचा माल आहे तो त्यांनी त्यांची इच्छा असेल तर परत करून टाकावा. सर्वांनी ते मान्य केलं. काही अनुयायींनी आस यांना इस्लाम धर्म स्वीकारण्यास सांगितलं आणि तो माल त्यांनी स्वत:कडंच ठेवावा. त्यांना नकार देत ते म्हणाले की लोकांचा विश्वासघात करून मुस्लिम होणं उचित नाही. त्यांनी सारा माल उचलला आणि मक्केस परतले ज्यांचं सामान त्यांना देऊन टाकलं. नंतर ते मदीनेस परत आले आणि इस्लाम धर्म स्वीकारला आणि जैनब व आपल्या मुलीसह राहू लागले.

अशा प्रकारे प्रथमतः मुस्लिम झालेल्यांचं औदार्य सर्वांसमोर होतं. मुहम्मद यांच्याप्रमाणंच त्यांना अबुल आसकडून काहीही घ्यावयाचं नव्हतं. ते मुस्लिम नव्हते. त्यांचा संबंध शत्रूटोळीशी होता तरीदेखील त्यांना जाऊ दिलं. त्यांना आध्यात्मिक विकासासाठी वेळ आणि स्वातंत्र्य दिलं. परिस्थिती टोकाची असतानादेखील त्यांना मुस्लिम समुदायाचं संरक्षण लाभलं.

☆

# अभिव्यक्ती स्वातंत्र्य

प्रेषित मुहम्मद (त्यांना शांतता लाभो) यांच्या कन्या जैनब यांनी जाहीररीत्या आणि जोरदारपणे आपल्या पती अबुल आस यांच्या वतीनं आपलं मत व्यक्त केलं. त्या नेहमी मस्जिदे नबवीमध्ये जात असत. तिथं स्त्री-पुरुष दोन्हींसाठी नमाज अदा करण्याची अनुमती होती. त्यांना आपलं मत व्यक्त करण्यास कुणीही आक्षेप घेतला नाही. खरं पाहता मुस्लिम महिलांनी अशा प्रकारे जाहीरपणे आपलं मत मांडणं एक साधारण गोष्ट होती.

मदीनेच्या याच मस्जिदे नबवीमध्ये एका महिलेनं (खौला, सलाबाची कन्या आणि औस बिन साबित यांच्या पत्नी) प्रेषितांकडं आपल्या पतीकडून होणाऱ्या मारहाणीची तक्रार केली होती. पण ही साधारण तक्रार नव्हती. त्यांनी प्रेषितांबरोबर मोठा वादविवाद केला होता, जे आता मुस्लिमांचे राजकीय नेते होते. ते इतके जोरदार आणि उघडपणे बोलले होते की कुरआननं त्यांची दखल घेतली आणि त्या अध्यायाचं नावच 'अल मुजादिला' म्हणजे 'वाद घालणे' ठेवलं गेलं.

> ''अल्लाहनं त्या स्त्रीचं म्हणणं ऐकून घेतलं जी आपल्या पतीविषयी तुम्हांपाशी वाद घालत होती आणि आपल्या दुःखाविषयी अल्लाहकडं तक्रार करत होती. अल्लाह तुम्हां दोघांचं संभाषण ऐकत होता. निश्चितच अल्लाह ऐकतो आणि पाहत असतो.'' (कुरआन, ५८:१)

हा वाद इस्लामपूर्व काळातील तलाक पद्धतीबाबत होता. यामध्ये एका घटस्फोटित स्त्रीला पुनर्विवाह करण्याची परवानगी नव्हती. तिला निराधार सोडून दिलं जायचं, विवाहित नाही की अविवाहित नाही. या अध्यायाच्या दुसऱ्या आयतीत या अनेकेश्वर व्यवस्थेतील सामाजिक स्थितीचा अर्थ असा–

> ''तुमच्यापैकी जे लोक आपल्या पत्नींना (आई बनवून) टाकून देतात त्या त्यांच्या आई होत नसतात, तर ज्यांनी त्यांना जन्म दिला त्याच त्यांच्या आई होत. ते जे म्हणत असतात ते निरर्थक व खोटं आहे. अल्लाह क्षमा करतो आणि दयावंत आहे.'' (कुरआन, ५८:२)

कुरआननं त्या महिलेची बाजू घेतली. इस्लामपूर्व काळातील तलाक पद्धत बदलली गेली. यामागचा उद्देश आपलं मत सरळ आणि स्वतंत्रपणे मांडण्यानं न्यायदानात आणि ज्ञान व कायदे करण्यात अडथळा येत नाही.

मस्जिदे नबवीमध्ये पुरुषांच्या मागं महिला रांगेत उभं राहून विधीवत नमाज अदा करत असत. यासाठी अशा वातावरणाची गरज असते ज्यात महिलांची विनयशीलता, आदर आणि सन्मान राखला जाऊ शकतो. त्याजागी महिला नमाज अदा करत आणि स्वत:स अभिव्यक्तही करू शकत होत्या. प्रेषित मुहम्मद यांच्या या पद्धतीत त्यांचे शिष्टाचार आणि महिलांसाठीची त्यांची काळजी दिसून येते. प्रेषितांचा आदेश होता, ''महिलांनी मशिदीबाहेर पडेपर्यंत पुरुषांनी आपल्या जागीच बसून राहावे आणि त्यांना सोय करून द्यावी. ते महिलांशी सभ्यतेनं व आदरानं वागत, त्यांचं म्हणणं ऐकून घेत आणि आपलं त्या मत मांडत असत. वादविवाद करण्याची आणि त्यांची सुरक्षा घेण्याची काळजी घेत.

# माझ्या अल्लाह, मला क्षमा कर!

नंतर असंच एक उदाहरण मुस्लिमांच्या इतिहासात प्रसिद्ध झालं. मदीनेच्या मुस्लिमांना श्रीमंती लाभली तेव्हा ते आपल्या मुलीसाठी महेरच्या स्वरूपात मोठ्या रकमेची मागणी करू लागले. माननीय उमर (अल्लाह त्यांच्यावर राजी होवो) प्रेषितांनंतर मुस्लिमांचे खलीफा (मुस्लिमांचे आध्यात्मिक व भौतिक प्रमुख) झाले. त्यांनी आदेश दिला,

''कुणीही ४०० दिरहमपेक्षा अधिक महेर देऊ नये. यापेक्षा जास्त रक्कम देण्यात आली तर ती जप्त करून सार्वजनिक कोषागार (बैतुलमाल) मध्ये जमा केली जाईल.''

या घोषणेनंतर उमर प्रवचनपीठावरून खाली येताच एक महिला उभं राहून म्हणू लागली,

''कुरआनात अशा प्रकारचं कोणतंही बंधन घातलेलं नाही. उमर यांना कोणतीही मर्यादा घालण्याचा अधिकार नाही.''

आपल्या म्हणण्याचा पुरावा देत त्या महिलेनं खालील आयतीचा संदर्भ दिला,

> ''तुम्ही जर एका पत्नीची जागा दुसऱ्या पत्नीशी बदलायचं ठरवलं असेल तर तुम्ही जर तिला गडगंज खजिना जरी दिला असला तरी त्यातलं काहीएक परत घेऊ नका, कसं ते घेणार तुम्ही परत, आरोप ठेवून? उघड अपराध करून?''
>
> (कुरआन, ४:२०)

उमर यांनी ताबडतोब आपली चूक मान्य केली आणि म्हणाले,

''माझ्या अल्लाह, मला माफ कर! प्रत्येकास माझ्यापेक्षा अधिक माहिती आहे. या महिलेसदेखील.''

☆

# मानवजातीची सेवा

आरंभापासूनच क़ुरआननं श्रद्धेव्यतिरिक्त दोन गोष्टींवर भर दिलाय. पहिली- माणसाचा अल्लाहप्रति दृढ संबंध, त्यानं फक्त त्याचीच आराधना करावी आणि त्याच्याशिवाय कुणासमोरही आपला माथा टेकू नये. दुसरी- माणसानं इतर माणसांशी आदरानं वागावं. त्यानं लोकांच्या हक्काधिकारांची जाणीव ठेवावी, आपल्या मातापित्याशी, शेजाऱ्यांशी, अनाथांशी आणि गरजवंतांशी वचनबद्ध राहावं. तो बलशाली असल तरी त्यानं दुर्बलांवर हात उगारू नये, तर त्यांना शक्ती द्यावी. जशी आपल्या जिवाची, मालमत्तेच्या सुरक्षेची काळजी घेता, तशी दुसऱ्यांच्या जिवांची, आदर-सन्मानाची मालमत्तेची सुरक्षा करावी, आपल्या वर्तनात त्यांनी कधी लबाडी करता कामा नये, तर नेहमी प्रामाणिक असावं. त्याचं अस्तित्व समाजास त्रासदायक नसावं, तर त्यानं इतरांच्या आराम व शांततेची खात्री द्यावी. कुरआन या शिकवणीला फार महत्त्व देतो. वारंवार त्यांचा उच्चार केला जातो. याचं उत्तम उदाहरण म्हणजे कुरआनातील बनी इस्राईल शीर्षकाखालील सतरावा अध्याय होय.

# अल्लाहचा कृपाप्रसाद

या जगात काही लोकांना सर्व प्रकारच्या सोयी-सुविधा लाभल्या आहेत तर काही त्यापासून वंचित आहेत. पहिल्या श्रेणीतील लोकांनी दुसऱ्या श्रेणीतील लोकांना मदत करावी, अशी कुरआनची ताकीद आहे.

या जगात ज्या माणसाची स्थिती चांगली आहे त्यानं अल्लाहचा आभार मानला पाहिजे आणि आभार प्रकट करण्याची सर्वोत्तम पद्धत, त्या माणसानं अशा लोकांना मदत करावी जे गरजवंत आहेत. आम्हाला अल्लाहनं जे काही दिलंय त्यामध्ये आमच्या बरोबर राहणाऱ्या लोकांचा वाटा आहे. आम्ही जर त्यांना त्यांचा वाटा दिला नाही तर अल्लाहचा आभार कधीही पूर्ण होणार नाही. आम्हाला इतकं प्रचंड लाभलं असतानाही आम्ही जर सेवा केली नाही तर आमची हृदयं कठोर असतील.

इस्लाममध्ये मानवजातीच्या सेवेची तुलना अल्लाहच्या सेवेशी केली जाते. लोकांच्या अडचणींत त्यांना मदत करणं म्हणजे अल्लाहची मदत होय. कुणाला काही न देता हाकलून देण्याचा अर्थ अल्लाहला मदत करण्यास नकार देणं असा होतो. धरतीवरील लोकांनी एकमेकांशी कृपेचं वर्तन केलं नाही तर धरतीवर आकाशातून कृपावृष्टी होणार नाही.

# ही सेवा सर्वांची

इस्लाम आपल्या निष्ठावंतांशी फक्त मुस्लिमांच्या सेवेची काळजी घेण्याचा आग्रह करत नाही तर या धरतीवरील प्रत्येक मानवाची मदत करण्याची ताकीद करतो. फाजील धर्माभिमान, द्वेष आणि शत्रुत्वाच्या भावनांना जन्म देतो. राष्ट्रवादाच्या फाजील अभिमानानं अंध झालेली व्यक्ती इतर राष्ट्रांशी सहिष्णुतेचं वर्तन करू शकत नाही. इस्लाम याचा विरोध करतो. तमाम मानवजातीची सेवा केली जावी अशी त्याची मागणी आहे. मग त्याचा आमच्याशी काही संबंध असो नसो, आम्हास ते मान्य असतील नसतील, ती

आमची भाषा बोलतात की दुसरी कोणती, सर्वांची सेवा कसलाही भेदभाव न करता केली पाहिजे. कोणतीही पीडित व्यक्ती वाऱ्यावर सोडून दिली जाणार नाही. आपल्या अडचणींवर मात करण्यास तिला मदत केली जाईल, कारण सर्वांचा वर्ण, मातृभूमी भिन्न भिन्न जरी असली तरी सर्वांना एकाच अंशापासून निर्माण केलं गेलंय. प्रेषितांच्या काही वचनांवरून हे तथ्य समोर येतं.

१. जबीर बिन अब्दुल्लाहच्या कथनानुसार- प्रेषित मुहम्मद (त्यांना शांतता लाभो) म्हणाले, ''अल्लाह अशा व्यक्तीवर दया करत नाही जी दुसऱ्या व्यक्तीशी दयेची वर्तणूक करत नाही.''

२. अब्दुल्लाह बिन उमर वर्णन करतात- प्रेषित मुहम्मद यांनी सांगितलं, ''रहमान- कृपावंत त्यांच्यावर कृपावृष्टी करतो जे दयावंत असतील. तुम्ही या धरतीवरील लोकांवर दया करा, तो (अल्लाह) तुमच्यावर कृपा करील.''

३. अब्दुल्लाह बिन मसूद कथन करतात- प्रेषित मुहम्मद म्हणाले, ''तुम्ही जर दयेची वागणूक करत नसाल तर तुम्ही श्रद्धावंत होऊच शकत नाही.''

अनुयायींनी अर्जवं केली, ''अल्लाहचे प्रेषिता! आमच्यापैकी प्रत्येक दयावंत आहे.''

तेव्हा प्रेषित मुहम्मद म्हणाले, ''तुम्ही जर फक्त आपल्या नातलगांशी दयेचा व्यवहार केला तर त्यास काही अर्थ नाही, दया ही सर्वांसाठी करायची असते.''

४. अबु हुरैरा (अल्लाह त्यांच्याशी राजी होवो) म्हणतात- काही अनुयायी बसले होते. प्रेषित त्यांच्याकडं आले आणि त्यांनी विचारलं, ''मी सांगू तुम्हाला, कोण भला माणूस आणि कोण दुष्ट माणूस आहे?''

प्रश्न ऐकून सारेच्या सारे शांत झाले. प्रेषितांनी तीन वेळा याच शब्दांचा उच्चार केल्यावर एक अनुयायी म्हणाले, ''प्रेषिता! कृपया आमच्यापैकी कोण भला आणि कोण दुष्ट हे ठळकपणे सांगावं.''

प्रेषित म्हणाले, ''तुमच्यापैकी ज्या माणसाकडून लोकांना फक्त चांगुलपणाचीच अपेक्षा असते तो भला माणूस, लोक त्याच्या खोडसाळपणापासून सुरक्षित असतात आणि ज्या माणसाकडून लोक भल्याची अपेक्षा बाळगत

नाहीत, तो तुमच्यापैकी दुष्ट माणूस, लोक त्याच्या खोडसाळबणापासून सुरक्षित नसतात.''

या परंपरा आम्हांस कसलाही भेदभाव न पाळता अल्लाहच्या निर्मितीची सेवा करण्याची शिकवण देतात. ज्या कुणास आमच्या मदतीची आणि स्नेहाची गरज् सेल त्यास आपण मदत करावी, असा इस्लामचा विचार आहे. मानवजातीला विविध समूहांमध्ये, पंथांमध्ये, आपल्या स्वत:च्या व दुसऱ्यांच्या अनोळखी समाजांमध्ये, स्वधर्मिय व परधर्मियांमध्ये विभाघणं निसर्गनियमाविरूद्ध आणि इस्लामविरूद्ध आहे.

## सेवासुद्धा आराधनाच

आराधना-भक्ती हे जीवनाचं एकमेव उद्दिष्ट असल्याची कुरआनची मांडणी आहे.

अल्लाहचं सान्निध्य आणि त्याची प्रसन्नता मिळवणं हीच आराधना होय. ही आराधना ऐहिक व आध्यात्मिक दोन्ही असते. ऐहिक भक्तीचं उच्चारण ही शारीरिक कृती असते. यासच कर्मकांड म्हटलं जातं. कुणास मदत करतेवेळी याद्वारे आपण अल्लाहशी जवळीक साधत आहोत याची कल्पना असली पाहिजे. आपलं धन मानवजातीच्या सेवार्थ खर्च करणंदेखील उपासनाच होय.

अशा प्रकारे माणूस ऐहिक कल्यााण कार्य करतानादेखील तीव्र भावनांचा आनंद अनुभवू शकतो.

इस्लाममध्ये माणसाची सेवा करणं ही ऐहिक बाब आहे, पण वास्तवात ही आराधना आहे. याची वस्तुस्थिती समजून घेण्यासाठी आपणास आराधनेची सकल संकल्पना पाहायला हवी.

☆

# कृतज्ञता

कृतज्ञता ही कुरआनच्या शिष्टाचार व नैतिकतेचा मौलिक आधार होय. आम्हांस वारंवार अल्लाहची कृतज्ञता व्यक्त करण्यास सांगितलं जातं.

> ''आणि त्यांना अल्लाहच्या (ऐतिहासिक) घटनांची आठवण करून देण्यास, निश्चितच त्यामध्ये संयमानं वागून आभार मानणाऱ्यांसाठी संकेत आहेत.''
> (कुरआन, १४:५)
>
> ''तुमच्या उपजीविकेसाठी शुद्ध साधनं दिलीत, जेणेकरून तुम्ही त्याचे आभार मानावे.'' (कुरआन, ८:२६)
>
> ''अल्लाह कृतज्ञतेचा मोबदला देणारा आहे.''
> (कुरआन, ४:१२६)

कृतज्ञता मनापासून आणि हृदयापासून व्यक्त केली जाते. अल्लाहची विलक्षण निर्मिती पाहून व्यक्त केलेल्या संवेदनांचं हे प्रतिबिंब आहे.

पवित्र कुरआनमध्ये अल्लाह म्हणतो,

> ''माझं स्मरण करा. मी तुम्हाला आठवणीत ठेवीन. माझे आभार माना, कृतघ्न होऊ नका.'' (कुरआन, २:१५२)
>
> मुस्लिम श्रद्धावंतांनी सांगायला हवं, ''माझ्या विधात्या, मला सुबुद्धी दे तुझे आभार मानण्याची, मला आणि माझ्या आई-बापांना तू जसं अनुग्रहीत केलं त्याबद्दल.''
> (कुरआन, ४६:१५)

याउलट कुरआन काही ठिकाणी कृतघ्न लोकांबाबत दुखः व्यक्त करतो,

"त्यांच्यातले बहुतेक लोक आभार व्यक्त करत नाहीत."

(कुरआन, १०:६०)

तरीदेखील अल्लाह म्हणतो,

"तुमचा विधाता मानवांशी दयेनं वागतो, तरीदेखील त्यांच्यातले बरेचजण कृतघ्न आहेत."

कृतज्ञता आणि कृतघ्नता या दोन्ही गोष्टी मानवजातीची सेवा करणं किंवा न करण्यानं उघड होते. कृतज्ञता बाह्य आणि आंतरिक वैयक्तिक रूप असतं. इतरांचं जीवन सुधारून आपण राहतो, ते वातावरण साकारण्यानं कृतज्ञतेचं बाह्य स्वरूप दिसून येतं. दानधर्माला कुरआन जे महत्त्व देतो ते आम्ही आधीच पाहिलंय. अनाथांना मदत करणं, गरजूंना हातभार लावणं आणि चांगल्या उद्दिष्टांसाठी आपलं धन खर्च करणं इत्यादी. जे भाग्यशाली नाहीत त्यांना मदत करणं मुस्लिमांचं प्रासंगिक किंवा अर्धवेळ कार्य नाही तर आयुष्यभर लोकांची सेवा करणं, शांतता व सलोखा आणि समतेसाठी स्वत:स वाहून घेणं म्हणजे कृतज्ञता व्यक्त करणं असा त्याचा अर्थ आहे. अल्लाहचे आभार मानण्याचा सर्वोत्तम मार्ग म्हणजे माणुसकी समृद्ध करणं आणि त्यानं निर्माण केलेल्या बागांना सौंदर्य प्रदान करणं होय.

सर्वांत महान कृतज्ञता, समाजाचं अशा रीतीनं व्यवस्थापन करणं ज्याद्वारे मुस्लिम मुस्लिमेतर तमाम मानवांचा आदर-सन्मान होतो, शांतता, एकोपा आणि ममता नांदते.

# १४

# हुदैबिया

## युद्धावर शांततेचा विजय

कुरैश आणि त्यांच्या संयुक्त शक्तीवर विजय मिळाल्यानं अरब द्वीपकल्पातील वातावरण बदलून गेलं होतं आणि मुहम्मद (त्यांना शांतता लाभो) व त्यांच्या सहकाऱ्यांच्या सामर्थ्यास लोकांनी मान्य केलं. पर्शियन आणि बायझन्टाइन (रोमन) साम्राज्यं आता प्रेषित मुहम्मद यांना अरबांचे शक्तिशाली सत्ताधीश म्हणून संबोधू लागले होते.

## रमजान महिना आणि एक स्वप्न

रमजान महिना सुरू झाला होता आणि नेहमीप्रमाणं प्रेषित मुहम्मद (त्यांना शांतता लाभो) रात्रीच्या वेळी उपासना-आराधनेत व्यस्त झाले. त्याचप्रमाणं गोरगरीब आणि गरजवंतांची अधिकाधिक काळजी वाहू लागले होते. हा महिना आध्यात्मिकतेनं परिपूर्ण होता आणि कुरआनचं अवतरण झालेल्या भागाचं ते जिब्राईल यांना वाचून दाखवित होते. नियमित नमाजशिवाय ते ‘तरावीह’ची विशेष नमाज रात्रीच्या (इशा) नमाजनंतर अदा करीत होते. (८ ते २० रकअत) या नमाजमध्ये अवतरणाचा संपूर्ण भाग ते पठण करीत होते. नियमितपणे दुआ मागत असत. दिवसा स्त्रिया व पुरुषांना

उपवास करावे लागत होते, म्हणजे खाणंपिणं आणि लैंगिक संबंध वर्ज्य होते. नैसर्गिक गरजांना नियंत्रित करून मुस्लिमांनी दैवी गुण आत्मसात करण्याचा प्रयत्न करावयाच होता आणि एकाग्र होऊन अल्लाहच्या उपस्थितीचा अनुभव घ्यावयाचा होता. शारीरिक उपवासाशिवाय मुस्लिमांना जिभेचा उपवास (खोटं न बोलणं) अश्लील व असभ्य कृत्यांपासून दूर राहावं लागत असे. तसेच मनाचाही उपवास करायचा होता. (दुष्ट भावना व विचार सोडून देणं) ही आध्यात्मिक शिस्त पाळतानाच गरिबांची काळजीही घ्यावी लागत होती. रमजान महिना कुरआनच्या महिन्याबरोबरच औदार्याचा आणि ऐक्य स्थापन करण्याचा महिना होता. रमजान महिना संपल्यावर सण साजरा करताना मुस्लिम स्त्री, पुरुष आणि लहान मुलांनीसुद्धा विशेष प्रकारचं दानधर्म करण्याचा कडक आदेश होता, जेणेकरून समाजाच्या तमाम सदस्यांच्या गरजा पूर्ण व्हाव्यात. गरिबांशी आपुलकीच्या व्यवहाराद्वारेच अल्लाहशी जवळीक साधण्याचा अनुभव घेतला जाऊ शकतो. त्यांची सेवा करून, त्यांचा आदर करून आणि त्यांची काळजी वाहूनच अल्लाहशी जववळीक परिपूर्ण होऊ शकते.

अशा या रमजान महिन्यात प्रेषित मुहम्मद यांनी एक आश्चर्यजनक स्वप्न पाहिलं. अनपेक्षित आणि फलदायी असं. स्वप्नात त्यांनी पाहिलं ते काबागृहात दाखल होत आहेत. डोक्याचे केस काढलेले आहेत. काबागृहाच्या किल्ल्या उजव्या हातात आहेत. ही शक्तिशाली अनुभूती होती आणि मुहम्मद यांनी नेहमीप्रमाणं यास एक संकेत आणि एक प्रकारचा संदेश असल्याचं पाहिलं.

दुसऱ्या दिवशी त्यांनी आपल्या सहकाऱ्यांना बोलावून घेतलं आणि मक्केत जाऊन उमरा (हजच्या काळाशिवाय केलेलं काबागृहाचं दर्शन) करण्याचं निमंत्रण दिलं.

जवळपास १२००-१४०० निष्ठावंत सहकारी प्रवासावर निघाले. धोका गंभीर स्वरूपाचा होता तरी प्रेषितांना शस्त्र सोबत घेण्यास अनुमती दिली नाही. (प्रवासात इतर गरजेच्या वस्तू वगळता) आणि सोबत एक पत्नी उम्मे सलमा यांना घेतलं. प्रेषितांनी स्वत: बळीच्या उंटांचा पवित्र कार्यास अर्पण

करण्याचा विधी केला. मक्कावासियांना लवकरच कळलं की मुस्लिमांचा एक काफिला मक्केस निघालाय आणि काबागृहास भेट देणार आहे. अरब द्वीपकल्पातील कबिल्याचं काबागृहास भेट देणं वर्षानुवर्षं चालत आलेल्या परंपरेनुसार त्यांचा हक्काधिकार होता.

# कुरैशांची द्विधा

कुरैश एका अनपेक्षित पेचप्रसंगात सापडले. मुहम्मद (त्यांना शांतता लाभो) आणि त्यांच्या सहकाऱ्यांना मक्केत येऊ देण्यास ते नाकारू शकत नव्हते; तर दुसरीकडं शत्रूला शहरात येण्याची अनुमती देऊन ते मुस्लिमांची प्रतिष्ठा उंचावू शकत नव्हते. कुरैशांनी खालिद बिन वलीद यांच्या नेतृत्वात २०० माणसं पाठवून मुस्लिमांना मक्केपासून लांबच रोखण्याचं ठरवलं.

मदीनेपासून ३१० कि.मी.च्या अंतरावर पवित्र क्षेत्राच्या सीमेलगत मक्केपासून १८ कि.मी.च्या अंतरावर अल-हुदैबिया ठिकाणावर मुहम्मद यांचा कसवा नावाचा उंट थांबला आणि पुढं जाण्यास नाकारलं. सात वर्षांपूर्वी मुहम्मद मदीनेस आले होते तेव्हासारखंच, यात प्रेषितांना संकेत दिसून आले. त्यांना इथंच थांबून मक्केत मुस्लिमांच्या दाखल्यासाठी कुरैशांशी वाटाघाटी कराव्या लागतील. कुरैश लोक पुन्हा एकदा पेचात सापडले. प्रेषितांची ही पद्धत त्यांच्या धार्मिक, सांस्कृतिक किंवा युद्धाच्या परंपरेशी वेगळी होती. सत्तेचा कळस गाठला असतानादेखील ते मक्केला नि:शस्त्र येत होते. स्वत:स धोक्यात टाकून. त्यांची सध्याची स्थिती आपल्या शत्रूवर प्रभुत्व गाजवण्याची होती.

प्रेषितांनी लोकांना नवा धर्म सांगितला असतानादेखील अरब परंपरा-नियमांचा आदर करीत त्यांना त्यांच्या आक्रमणापासून बचाव करण्यास त्यांच्यावर विश्वास ठेवला होता. असं करताना त्यांनी कुरैशांची कोंडी केली, कारण आता त्यांना आपला सन्मान (नियमांचं पालन) जपायचा होता किंवा मुस्लिमांना मक्केत येण्याची अनुमती देऊन आपली प्रतिष्ठा गमवावी लागायची होती. मुहम्मद यांनी निवडलेला पर्याय फलदायी ठरला.

# वाटाघाटी

त्यांचा प्रतिकात्मक आधार यात गुंतलेला होता आणि प्रेषित मुहम्मद (त्यांना शांतता लाभो) यांचा खरा हेतू काय हे त्यांना माहीत नव्हता, यामुळं त्यांनी मुस्लिमांना उमराचा विधी करू न देण्याचा निश्चय केला. त्यांनी बनु खुजाआ कबिल्याच्या बुदैल यास आपला प्रतिनिधी बनवून पाठवण्याचा निर्णय घेतला. बुदैलचं कोणत्याही टोळीशी भांडण नव्हतं म्हणून तो मध्यस्थीची भूमिका पार पाडू शकत होता. तो मुहम्मद यांना भेटला. प्रेषितांनी त्याला सांगितलं की आक्रमण करण्याचा त्यांचा हेतू नाही. ते आपल्या सहकाऱ्यांबरोबर फक्त उमराचा विधी करून परत जाणार आहेत. त्यांनी पुढं असंही सांगितलं की जर कुणी आडकाठी केलीच तर ते त्यांच्याशी दोन हात करण्यास तयार आहेत. कुरैशांना या संदर्भात निर्णय घेण्यासाठी वेळ लागत असेल तर ते अल-हुदैबियाजवळ थांबतील, कुरैश काय तो निर्णय गेतील तोपर्यंत. बुदैल मक्केस परतला आणि असा प्रस्ताव मांडला की कुरैशांनी मुस्लिमांना अनुमती द्यावी; पण त्यांच्या प्रस्तावास थंड प्रतिसाद मिळाला. कुरैश सरदार इक्रिमा बिन अबु जहलनं त्यास धुडकावून लावलं. वाटाघाटीच्या चार फेऱ्या झाल्या. पण कुरैश पूर्वीपेक्षाही जास्तच अडून बसले. अखेरीस प्रेषितांनी एक असा प्रतिनिधी- ज्यांना मक्केत चांगला सन्मान व संरक्षण लाभलंय- पाठवून शेवटचा प्रयत्न करण्याचा निर्णय घेतला.

प्रेषितांनी उस्मान (अल्लाह त्यांच्याशी राजी होवो) यांची निवड केली. ते त्यांचे मेहुणे होते आणि मक्केतील कबिल्यांशी त्यांचा दृढ संबंध होता आणि त्यांच्यावर आक्रमण करण्याचं कुणात सामर्थ्य नव्हतं. उस्मान गेले. त्यांचं स्वागतही झालं; पण त्यांनाही नकारच मिळाला. मुस्लिमांना उमरा करू देण्यास कुरैश तयार नव्हते. त्यांना हवं असेल तर ते काबागृहाच्या प्रदक्षिणा घालू शकतात; पण मुहम्मद यांना आत येऊ देण्याचा प्रश्नच नव्हता. उस्मान यांनी यास नकार दिला. अपेक्षेविरूद्ध त्यांचं कार्य लांबत गेलं. तीन दिवस उलटले तरी उस्मान परतले नव्हते. प्रेषितांना त्यांच्या बाबतीत माहिती मिळाली नव्हती.

माननीय उस्मान यांची हत्या झाल्याची अफवा पसरली, यामुळं

प्रेषितांना मोठा धक्का बसला. कुरैशांद्वारे निषिद्ध अशा महिन्यामध्ये हत्या करणं आणि तेही एका राजकीय प्रतिनिधीची हत्या होणं आणि मुस्लिमांना त्यांच्या विधिवत हक्कापासून वंचित ठेवण्याचा सरळ अर्थ युद्धाची घोषणा असाच होता. यापासून मुस्लिमांना आता बिकट परिस्थितीला तोंड देण्याची तयार ठेवायची होती.

## निष्ठेची शपथ

प्रेषित मुहम्मद (त्यांना शांतता लाभो) यांनी आपल्या सहकाऱ्यांना बोलावून घेतलं. ते लगबगीनं त्यांच्याकडं गेले. एका बाभळीच्या झाडाखाली प्रेषित बसले आणि प्रत्येक मुस्लिमाला निष्ठेची शपथ वाहण्यास सांगितलं. (बैअत-रिजवान) त्यांनी शपथेवर घोषणा केली की काहीही झालं तरी ते मुहम्मद यांच्या बाजुनं उभे राहतील. ते काबागृहाच्या दर्शनासाठी आले होते. त्यांनी शस्त्रं बाळगली नव्हती आणि आता त्यांना एका अशा लढाईस सामोरे जावं लागत होतं, ज्यासाठी त्यांची तयारी नव्हती. प्रेषितांजवळ त्यांनी गांभीर्यानं जी निष्ठा व्यक्त केली होती त्याचा अर्थ असा होता की त्यांनी पळून न जाण्याची शपथ वाहिली होती आणि मृत्युचा स्वीकार करायचा होता. कारण शक्तीचं संतुलन त्यांच्या विरूद्ध होतं. प्रेषितांनी आपल्या उजव्या हातात डावा हात ठेवला आणि म्हणाले,

''ही उस्मान यांची शपथ आहे, ते परत आले नसल्यानं ते मरण पावले असे गृहित धरलं गेलं होतं.''

तथापि शेवटच्या माणसानं शपथ वाहतानाच उस्मान अचानकपणे तिथं आले. याचा प्रेषितांनी आनंद व्यक्त केला. कुरैश एवढे रानटी नव्हते, ते निषिद्ध महिन्यांमध्ये आपल्या परंपरेचा अनादर करून त्यांच्याविरूद्ध गेले नव्हते. आता कुरैश लोकांशी लढाई होण्याची शक्यता कमी होती. त्यांनी एक दुसरे प्रतिनिधी सुहैल यांना पाठवून दिलं. ते मुस्लिमांशी अंतिम स्वरूपाचा करार करतील अशी माहिती प्रेषितांना दिली गेली. प्रेषितांनी त्यांना भेट देऊन त्यांचा

प्रस्ताव तपासून घेण्याचा निर्णय घेतला.

आताची परिस्थिती अगदी उलट होती. मुहम्मद आपल्या समुदायाच्या वतीनं शांततेच्या अटीवर वाटाघाटी सुरू करणार होते. त्यांच्या अनुयायींनी जी शपथ वाहिली होती ती लढाईच्या बाबतीत होती. त्या वेळी त्यांची बाजू दुबळी होती. आता जो तह होणाार होत तो अंमलात आणण्याच्या अटीबाबत त्यांच्या निष्ठेची परीक्षा होणार होती. या वेळचं कुरआनचं अवतरण असं–

> ''ज्या श्रद्धावंतांनी झाडाखाली तुमच्याशी (एकनिष्ठतेची)
> शपथ घेतली, अल्लाह त्यांच्याशी प्रसन्न झाला.''
>
> (कुरआन, ४८:१८)

मुस्लिम आपला अधिकार मागत होते. पूर्वी झालेल्या युद्धांमुळं त्यांची प्रतिष्ठा उंचावली होती आणि म्हणून खालचा दर्जा स्वीकारण्याचा प्रश्नच नव्हता.

# निर्माणकर्ता आणि निर्मिती

काही वर्षांनंतर ज्या बाभळीच्या झाडाखाली प्रेषित मुहम्मद (त्यांना शांतता लाभो) यांनी मुस्लिमांशी निष्ठेची शपथ घेतली होती, त्या बाभळीच्या झाडाला काही लोक पवित्र समजू लागले. आजारी माणसं त्या झाडाखाली रोग बरा होईल या विचारानं बसत होते. जेव्हा या घटनेस प्रसिद्धी मिळू लागली, लोक त्या झाडाची आराधना करण्याच्या बेतात होते. अशा कृतीची प्रेषितांनी कधी शिकवण दिली नव्हती. हे इस्लामच्या एकेश्वरवाद सिद्धान्ताविरूद्ध होते. हा विरोध नष्ट करून टाकण्यासाठी माननीय उमर यांनी बाभळीच्या त्या झाडालाच उपटून टाकलं. ''लोकांनी निर्मात्याची आराधना केली पाहिजे, त्याच्या निर्मितीची नव्हे.''

ही कृती इस्लाममध्ये कोणत्याही प्रतीक किंवा वारसास कसलंही स्थान नाही हे ठासून सांगते.

# हुदैबिया करार

हा करार मदीनेचं राज्य आणि मक्केच्या कुरैश कबिल्यामध्ये संमत झाला. हिजरतच्या सहाव्या वर्षी मार्च इ. स. ६२८ मध्ये प्रेषित मुहम्मद (त्यांना शांतता लाभो) यांनी कुरैशांचे प्रतिनिधी सुहैल यांना भेटीस बोलावलं. ते इतर दोन व्यक्ती मिकर्ज़ आणि ह्युवैयिह यांच्या बरोबर आले. त्यांच्यात बोलणी सुरू झाली. प्रेषितांचे सहकारी बोलणीच्या ठिकाणापासून काही अंतरावर बसले होते. करारातील प्रत्येक अटीवर चर्चा झाली. जेव्हा अटी ठरवून झाल्या, प्रेषितांनी आपले चुलत भाऊ माननीय अली यांना ते लिहून काढण्यास सांगितलं. स्वाभाविकच अली यांनी लिहायची सुरवात ''बिस्मिल्ला-हिर्रहमानिर्रहीम'' (असीम दयावंत आणि परम कृपावंत अल्लाहच्या नावानं) अशी केली. सुहैल यांनी त्यांना थांबण्यास सांगितलं आणि म्हणाले की ''अर्रहमान'' कोण हे त्यांना माहीत नाही. त्यांना ''बिस्मिका अल्लाहुम्म'' (हे अल्लाह तुझ्या नावानं) या शब्दांनी सुरुवात करण्यास सांगितलं. सर्व अरब लोक याशी परिचित होते. (अनेकेश्वरी लोकसुद्धा याच नावानं त्यांच्या देवांना हाक मारीत होते.) काही सहकाऱ्यांनी हा बदल करण्याचा तीव्र विरोध केला, पण प्रेषितांनी मध्ये येऊन अली यांना ''तुझ्या नावानं हे ईश्वरा!'' असं लिहिण्यास सांगितलं. आणि प्रेषितांनी अली यांना खालीलप्रमाणं लिहिण्यास सांगितलं, ''ह्या कराराच्या अटी आहेत ज्यांवर अल्लाहचे प्रेषित मुहम्मद आणि सुहैल बिन अम्र...''

सुहैल यांनी पुन्हा विरोध केला आणि म्हटलं, ''जर तुम्ही अल्लाहचे प्रेषित असल्याचं आम्हास माहीत असते तर आम्ही तुमच्यासाठी भांडलोच नसतो. तुम्ही असे लिहा- अब्दुल्लाहपुत्र मुहम्मद (स.).''

अली यांनी आधीच नेहमीप्रमाणं लिहिलेलं बदलण्यास नकार दिला आणि म्हटलं की ते तसं करू शकत नाहीत. प्रेषितांनी अली यांना विचारलं, ''ते कुठं लिहायचंय ते दाखवा.'' त्यांनी आपल्या हातानं खोडून टाकलं आणि सुहैल यांनी सांगितल्याप्रमाणं लिहिण्यास सांगितलं- ''अब्दुल्लाहपुत्र मुहम्मद.'' अली आणि इतर सहकाऱ्यांना धक्काच बसला; त्यांना प्रेषितांचा

कल समजत नव्हता.

करारातील अटींनी मुस्लिम लोकं विचलित झाली. त्यातील कित्येक मुद्द्यांवर तडजोड केली होती. हा करार खालील पाच मुद्द्यांवर आधारलेला होता.

१. मुस्लिमांनी यावर्षी उमरा करू नये. येत्या वर्षी त्यांना उमरा करण्याची अनुमती असेल. ते तीन दिवस फक्त मक्केत राहू शकतील.
२. दोन्ही पक्षांनी दहा वर्षांचा 'युद्धबंदी करार' संमत करावा आणि सारी माणसं या काळात मुक्तपणानं त्या प्रदेशात प्रवास करू शकतील.
३. दोन्ही पक्षांशी जो कुणी करार करील त्यावर या करारातील अटी लागू होतील.
४. मक्केतील जो कुणी मुस्लिम मदीनेला जाईल त्यास ताबडतोब मक्केच्या सरदाराकडं परत पाठवून दिलं जाईल आणि जर मदीनेच्या कुण्या नागरिकानं मक्केत येऊन शरण मागितली तर त्यास शरण दिली जाईल.
५. तलवार म्यानाबाहेर काढली जाणार नाही आणि कुणा विश्वासघात करणार नाही.

अशाच प्रकारच्या इतर तरतुदींही होत्या, वरकरणी त्या मुस्लिमांसाठी अपमानास्पद असून त्यांच्याविरूद्ध दिसत होत्या तरी प्रेषितांनी मान्य केल्या. ते म्हणाले की ते शांततेच्या हेतूनं आले होते आणि मक्कावासियांच्या मागण्या मान्य करणार होते.

# *मदीना*

## दोन शत्रुंच्या कचाट्यात

प्रख्यात कायदेतज्ज्ञ सराक्षी एक महत्त्वाचा मुद्दा मांडतात. ते म्हणतात, खैबर मदीनेच्या उत्तरेस आहे, तर मक्का मदीनेच्या पश्चिमेस. अशा प्रकारे मदीना दोन शत्रूंच्या तावडीत सापडलं होतं. खैबरचे ज्यू लोक आणि मक्केचे कुरैश दोन्ही मदीनेशी युद्ध करण्याच्या स्थितीत होते. दोघे मित्रपक्ष होते. मुस्लिमांनी त्यांच्यापैकी कुणाशीही युद्ध छेडलं असता तर एकमेकांच्या मदतीस येण्यास ते कटिबद्ध होते. अशात दुसरा पक्ष मदीनेवर आक्रमण करण्यास बांधिल होता. जर मुहम्मद (त्यांना शांतता लाभो) खैबरकडं निघाले तर मक्केचे कुरैश मदीनेवर चाल करून येतील आणि प्रेषित मक्केकडं निघाले तर मदीनेच्या लोकांवर खैबरचे लोक आक्रमण करतील.

अशा परिस्थितीत एक कुशल सेनापती आणि निपुण राजकारणी या दोन्हींपैकी एकाशी शांतता करार करून दुसऱ्याला अकार्यक्षम करून टाकण्याचा निर्णय घेईल तेव्हा संकटांचा सामना करणं सोपं होईल. कुरैशांच्या अटींना मान्य करण्यामागं हेच कारण होतं, ज्या लादलेल्या दिसत होत्या. कोणत्या पक्षाची निवड करावी हा मुद्दा महत्त्वाचा होता. खैबर की मक्का? खैबरचा प्रश्नच मिटला होता. बनु नजीरना मदीनेतून काढून टाकलं होतं. त्यांची पहिली मागणी त्यांना मदीनेत परत येण्याची अनुमती मिळावी हीच होती. ते श्रीमंत होते, आर्थिक नुकसानभरपाईत त्यांना आकर्षण नव्हतं.

मक्केचे लोक मुहम्मद आणि त्यांच्या सहकाऱ्यांचे जवळचे नातेवाईक होते, ज्यांनी मदीनेस स्थलांतर केलं होतं, त्यांचे भाऊबंद, चुलते, पुतणे इत्यादी त्यांच्यावर आक्रमण न करता या नातेवाईकांची सुटका करणं अधिक योग्य होतं. याशिवाय मक्केचे लोक बद्र, उहुद व खंदक या तीन युद्धांमधील पराजयामुळं शक्तीहीन झाले होते. त्यांची आर्थिक परिस्थिती खालावून गेली होती. त्यांचा व्यापारसुद्धा मंदावला होता आणि म्हणून त्यांना मुस्लिमांबाबत शांतता पाळण्यासाठी सहज राजी केलं जाऊ शकत होतं. विविध कारणानं

मक्केचे लोक मुस्लिमांशी शांततेचे संबंध स्थापण्यासाठी प्रामाणिकपणे तयार होते. दुष्काळी परिस्थितीत प्रेषितांनी त्यांची मनं जिंकण्याचा प्रयत्न केलेला होता. हुदैबियाचा करार करताना फक्त एक तरतूद वगळता जिचा संबंध त्यांचा आदर व सन्मानाशी होता, प्रेषितांनी सर्व अटी मान्य केल्या होत्या. त्यामध्ये एक महत्त्वाचं कलम आहे, ''तलवार म्यानाबाहेर काढू नये आणि विश्वासघात करू नये.''

मक्केचे लोक आणि मदीनेच्या मुस्लिमांनी एकमेकांशी भांडण न करण्याची, षड्‌यंत्र करून हा करार भंग न करण्याची शपथ घेतली होती. याचा अर्थ असा की तिसऱ्या पक्षाशी जर मुस्लिमांचं भांडण झालं तर मक्केच्या लोकांनी तटस्थ राहणं मान्य केलं होतं. विश्वासघात करणार नव्हते की धोका देणार होते.

प्रेषित मुहम्मद यांनी मक्केच्या लोकांनी तेवढी एक अट मान्य करावी याकरिता त्यांना राजी केलं आणि मक्कावाल्यांनी मांडलेलं बाकीचं सर्व उदार मनानं कबुल केलं. त्यांनी हा शांतता करार दहा वर्षांसाठी अबाधित ठेवण्याचं मान्य केलं. त्यांनी मक्केच्या व्यापारी काफिल्यांना मदीनेच्या मार्गानं जाण्याची अनुमती दिली. या बदल्यात जर भविष्यात तिसऱ्या पक्षांनी मुस्लिमांवर आक्रमण केलं तर मक्केचे लोक तटस्थ राहतील हे त्यांच्याकडून कबूल करून घेतलं. मक्केला न जाता त्यांच्या अनुयायींनी हुदैबिया या ठिकाणीच उमराचा हा विधी पार पाडण्याचे आदेश दिले. ते कमालीचे नाराज होते, तरी त्यांनी त्यांचा आदेश पाळला.

# अस्वस्थता

मुस्लिमांना आता हे कळून चकुलं होतं की हा करार करून ते फसले आहेत आणि आता काबागृहास भेट न देताच त्यांना परतावं लागणार आहे.

माननीय उमर प्रेषितांकडं धावून गेले आणि तीव्र विरोध करीत प्रश्नांचा भडिमार केला, ''तुम्ही अल्लाहचे प्रेषित नाही? आम्ही सत्य नाही? आणि आमचे शत्रू लबाडी करत नाहीत? आम्ही का बरं त्यांच्या आहारी जावं? लाज वाटली पाहिजे आम्हाला, आम्ही आपल्या धर्माचा मान् राखला नाही?''

प्रेषितांनी शांतपणानं उत्तर दिलं, पण उमर यांचं समाधान होत नव्हतं. रागाच्या आवेशात ते अबु बक्र यांच्याकडं मदतीसाठी वळले. अबु बक्र यांनी त्यांना शांत होण्यास सांगितलं. प्रेषित सत्यतेवर आहेत, याचा त्यांना विश्वास होता. उमर यांनी आवरतं घेतलं आणि शांत झाले. पण हा करार अपमानजनक असल्याची त्यांची धारणा होती.

हे दृश्य पाहून मुस्लिमांना दु:ख झालं. त्यांना या (करारा) मागची प्रेषितांची भूमिका समजत नव्हती. प्रेषितांनी मुस्लिमांना साहस व सन्मानाची शिकवण दिली होती आणि ते आता त्यांना एक अन्यायकारक करार स्वीकारण्यास सांगत होते.

प्रेषितांनी आपल्या सहकाऱ्यांना उंटांचा बळी देण्यास सांगितलं, जे पवित्र करून विधीसाठी आणलेले होते. तेव्हा सुरुवातीस कोणताही अनुयायी ऐकायला तयार नव्हता. प्रेषितांनी आपला आदेश तीन वेळा उच्चारला, पण एकानंही प्रतिसाद दिला नाही. आपल्या सहकाऱ्यांनी सामूहिक अवज्ञा करण्याची ही पहिलीच वेळ होती. प्रेषितांना याचं आश्चर्य वाटलं आणि ते निराश झाले. ते आपल्या तंबूत परतले आणि आपल्या पत्नी उम्मे सलमा यांना घडलेला प्रकार सांगितला.

उम्मे सलमा यांनी ऐकून घेऊन त्यांना शांतपणे समंजसपणा दाखविण्याचा सल्ला दिला. त्या म्हणाल्या, ''काही न बोलता बाहेर जा आणि आपल्या उंटांचा बळी देऊ त्यांच्यासमोर उदाहरण ठेवा. अल्लाहचे प्रेषित! या

१५०० व्यक्तींना करू वाटत नाही असे काम करण्यास तुम्ही विवश करू शकत नाही. तुम्ही फक्त आपलं कर्तव्य पाळा, जे अल्लाहनं तुमच्यावर अनिवार्य केलंय. पुढं जा आणि स्वत: विधी संपवा, उघड्यावर अशा जागी जिथं तुम्ही जे काय करता ते सर्वांना पाहता येईल. हे पुरेसं आहे.''

प्रेषित मुहम्मद यांनी त्यांचा सल्ला ऐकला. ते आपल्या उंटाजवळ आले आणि विधीवत त्याचा बळी दिला. हे पाहून त्यांच्या सहकाऱ्यांनी एकामागून एक सर्वांनी तेच केलं. प्रेषितांनी आपल्या डोक्यावरील केसं काढली त्याचंही त्यांच्या सहकाऱ्यांनी अनुकरण केलं.

## भावनाप्रवण आंधळेपणा आणि अलौकिक बुद्धिमत्ता

मुस्लिम सहकाऱ्यांना लवकरच हे तथ्य समजलं की कराराबद्दल त्यांचा पूर्वीचा निर्णय साफ चुकीचा होता आणि प्रेषित मुहम्मद (त्यांच्यावर शांतता लाभो) यांची आध्यात्मिकता, परखड बौद्धिक तर्क आणि अपार व अलौकिक बुद्धिमत्तेचं आकलन करू शकले नव्हते. त्यांना संकेतांचा अर्थ कळत होता. त्यांची उंटिण जेव्हा हुदैबियावर थांबली आणि पुढं जातच नव्हती, तेव्हा अशी अनुभूती झाली की मुस्लिम या वर्षी हुदैबिया मैदानापलीकडं जाणार नाहीत. चार वेळा बोलणी होऊनही तोडगा निघेना आणि कुरैश लोक अडून बसले. त्यांनी संयमच राखावा हे त्यांना ठाऊक झालं. त्यांना याचा पक्का विश्वास होता की स्वप्नात त्यांनी पवित्र घरात प्रवेश केला होता आणि असं होणारच होतं; पण ते कधी घडेल हे त्यांना सध्या कळत नव्हतं. निष्ठेची जी शपथ त्यांनी वाहिली होती ती त्यांच्या सहकाऱ्यांमध्ये ऐक्य निर्माण करण्याकरिता होती; पण आता ती कराराचा सन्मान राखण्यासाठीच्या शपथेत परिवर्तीत झाली.

कुरैश प्रतिनिधी सुहैल यांनी जेव्हा रहमान व मुहम्मद यांच्या प्रेषित्वावर आक्षेप घेतला तेव्हा प्रेषितांनी त्याचा दृष्टिकोन समजून घेतला आणि

त्या क्षणी त्यांनी ही परिस्थिती सुहैल यांच्या भूमिकेतून पाहिली. सुहैल जे काही म्हणत होते ते सत्य होते. कुरैशांनी जर त्यांना प्रेषित म्हणून स्वीकारलं असतं तर ते त्यांच्याशी लढलेच नसते, हे उघड आहे. म्हणूनच एका पक्षाचं मत वेगळं असताना दुसरा पक्ष त्यास सत्य समजतो, त्याचा स्वीकार करणं करारासाठी शक्य नव्हतं. प्रेषितांबाबत त्यांच्या सहकाऱ्यांमध्ये जसा आदर होता त्यामुळं त्यांना विरोधी पक्षाची सत्यता समजता आली नाही; पण प्रेषितांची भूमिका आणि कराराच्या अटींबद्दल त्यांच्या पाहण्याचा मूळ गाभा आध्यात्मिक व बौद्धिक शिकवणींवर आधारलेला होता.

सारांश- सत्यता आणि दृढ आध्यात्मिकतेशी हृदयाचा संबंध कधीही संवेदनशील, भावनात्मक आंधळेपणाशी जोडता कामा नये. स्थितीचं विश्लेषण करताना सामंजस्य बाळगायला हवं आणि दुसऱ्या पक्षाच्या स्थितीस प्रतिक्रियेवर नियंत्रण ठेवून तर्कसंगत दृष्टिकोनानं पाहावं. मुस्लिमांच्या श्रद्धेनुसार जी तडजोड स्वीकारण्याजोगी नव्हती ती दुसऱ्या पक्षाच्या दृष्टिकोनानुसार वास्तव व न्यायसंगत होती.

मुस्लिमांचा आदर आणि प्रतिष्ठा वाचवण्यासाठी मुहम्मद यांनी कुरैशांना अपमानित केलं नाही. खंदक युद्धानंतर नव्या राजकीय परिस्थितीचा फायदा घेतला नाही. या वर्षी मक्केत पाऊल ठेवणं मान्य करून त्यांनी कुरैशांची दुर्बलता आखली होती, म्हणून त्यांची प्रतिष्ठा अबाधित राखली आणि यामुळं दीर्घकालीन शांतता कायम ठेवण्यात योगदान मिळालं. हे जरी दोन्ही पक्षांच्या हिताचं होतं तरी याचा लाभ मुस्लिमांनाच मिळाला.

मदीनेहून मक्केत जाणाऱ्या मुस्लिमांना तिथं शरण देण्याबाबत आणि मक्केतील कोणी मदीनेस आलं तर त्यास परत पाठवण्याबाबत जी कलमं त्या करारात होती, त्यांचा मुस्लिम हितांवर क्षुल्लक परिणाम झाला. अश्रद्ध व्यक्तीनं मदीना सोडणं मुस्लिमांच्या काहीच उपयोगाचं नव्हतं आणि मुस्लिम श्रद्धावंतास परत मक्केस पाठवून देणं, त्यास कितीही यातना सहन कराव्या लागल्या तरीही काहीही परिणामकारक होणार नव्हतं.

# जाहीर विजय

प्रेषित मुहम्मद (त्यांना शांतता लाभो) यांची सत्यनिष्ठा, अप्रतीम सामंजस्य आणि याचबरोबर अल्लाहवरील त्यांची आस्था यामुळं ते दहा वर्षांचा शांतता करार करू शकले. त्याचबरोबर येत्या वर्षी काबागृहास भेट देण्याचीही आशा होती. त्यांचे सहकारी विशेषत: उमर यांनी फक्त त्वरित काही परिणाम निघावा याचा विचार केला. अपमानास्पद करार समजून हे सरळ पराजय असल्याचं वाटलं. इतर बऱ्याच लोकांप्रमाणं त्यांनी प्रेषिताना जी तीव्र प्रतिक्रिया दिली त्याचं त्यांना दु:ख होतं; पण त्यांनी असं गृहित धरलं होतं की हा करार शरणागती पत्करल्यासारखाच आहे. परतीच्या प्रवासादरम्यान त्यांना मुहम्मद यांनी बोलावल्याचं सांगण्यात आलं. प्रेषित त्यांच्या भूमिकेवर ठपका ठेवतील, याची त्यांना भीती होती किंवा याहूनही वाईट गोष्ट अशी की त्यांची वर्तणूक अयोग्य असल्याबाबत कुरआनची एखादी आयत अवतरली असेल.

उमर यांनी प्रेषितांचा तेजस्वी चेहरा पाहिला आणि प्रेषितांनी कुरआनच्या आयतींचं अवतरण झाल्याची सूचना दिली; पण उमर यांचा जो विचार होता त्याउलट हे अवतरण होतं. दैवी उच्चरणेनं घोषणा केली,

> ''निश्चितच आम्ही तुम्हांस विजय बहाल केला. उघड उघड विजय.'' (कुरआन, ४८:१)
>
> ''ज्या श्रद्धावंतांनी झाडाखाली तुमच्याशी (एकनिष्ठतेची) शपथ घेतली, अल्लाह त्यांच्याशी प्रसन्न झाला. त्यांच्या मनांमध्ये काय आहे ते त्यास ठाऊक होतं. म्हणून त्यानं त्यांना मन:शांती दिली आणि त्यांना जवळच विजय मिळवून दिला.'' (कुरआन, ४८:१८)

प्रेषित मुहम्मद यांनी स्वप्नात पाहिलं होतं त्याचा उल्लेख केला आणि म्हणून ते सत्याधिष्ठित होतं.

> ''अल्लाहनं आपल्या प्रेषितांचं स्वप्न साकारलं. तुम्ही मस्जिदे हराम (काबागृह) मध्ये प्रवेश घेणार. अल्लाहनं इच्छिलं तर

> - शांततापूर्ण रितीनं, डोकी मुंडन केलेली, केस कमी केलेले, कोणतंही भय नसताना, तुम्हांस ठाऊक नाही ते त्यास ठाऊक असतं. त्यानं तुम्हांस त्याआधी (मक्काविजयाआधी) एक विजय मिळवून दिला.''
>
> (कुरआन, ४८:२७)

मागं जे काही घडत गेलं ते सहकाऱ्यांच्या कल्पलनेशी पूर्णपणे उलट होते. युद्ध करण्यासाठी जी शपथ घेतली गेली होती ती प्रत्यक्षात शांततेसाठी विश्वास टाकण्याची शपथ ठरली. उघड उघड पराजय, उघड विजय दिसू लागला आणि ज्या स्वप्नास दुर्लक्षित केलं गेलं होतं त्याची भविष्यात विजयाच्या स्वरूपानं घोषणा केली गेली. ''तुम्ही पवित्र गृहात प्रवेश करणार'' बहुसंख्य मुस्लिमांनी याकरारामध्ये ज्या शक्यता दडल्या होत्या त्या पाहिल्या नव्हत्या, त्यांना समजल्या नव्हत्या.

हा करार पुन्हा एकदा बुद्धिमत्ता आणि सामंजस्यानं परपूर्ण असा विलक्षण प्रसंग ठरला. दुसऱ्या पक्षाचं ऐकूण घेणं आणि आपला दृष्टिकोन बदलणं इतरांच्या प्रतिष्ठेविषयी संवेदना समजून घेणं आणि दूरदृष्टी या गुणांचा प्रेषितांनी आदर्श घडवला, ज्यामुळं त्यांच्या व्यक्तिमत्त्व अवर्णनीय बनलं.

☆

# उम्मे सलमांचा

## उपाय

प्रेषित मुहम्मद (त्यांना शांतता लाभो) यांच्या जीवनाचा दुसरा पैलूसुद्धा आदर्शच होता. त्यांच्या सहकाऱ्यांनी उंटांचा बळी देण्याचं नाकारलं तेव्हा ते आपल्या पत्नीकडं गेले, त्यांनी त्यांचं ऐकून घेतलं आणि धीर दिला. त्यांनी त्यांच्याप्रति विश्वास दाखवला आणि समस्येचं निरसरण केलं. त्यांच्यामधलं संभाषण आणि आपसातला समजुतदारपणा प्रेषित मुहम्मद आपल्या पत्नींशी कसा व्यवहार करत होते हे व्यक्त करतात. काही वर्षांपूर्वी खदीजा (अल्लाह त्यांच्याशी राजी होवो) यांच्याप्रमाणंच त्यांनी आपल्या पत्नींना समस्या सांगण्यास मागंपुढं पाहिलं नाही. ज्या वेळी समस्त समुदायाचं भविष्य, स्वप्न, निष्ठेची शपथ आणि शांततेच्या करारावर अवलंबून होतं, तेव्हा एक साधारण माणसाप्रमाणं ते आपल्या पत्नीकडं गेले आणि त्यांनी त्यांचा सल्ला व विश्वास मागितला, जे मानवांसाठी एक उदाहरण होतं.

उम्मे सलमा (अल्लाह त्यांच्याशी राजी होवो) नेक होत्या. त्यांना विशेष प्रकारचा दर्जा लाभला होता. आयशा (अल्लाह त्यांच्याशी राजी होवो) यांनी म्हटलं होतं की त्यांना उम्मे सलामा यांचा हेवा वाटत होता, कारण प्रेषित त्यांचं म्हणणं ऐकत होते आणि त्यांच्या मताशी प्रभावी होत असत.

☆

# इस्लामचा लोंढा

मुस्लिम मदीनेस परत आले. दैनंदिन जीवनाचा पुनश्च आरंभ झाला. वातावरण पूर्वीपेक्षा जास्त तापलेलं होतं. करारामुळं त्यांना बाहेरील घडामोडींकडं पाठ फिरवून समुदायाच्या आंतरिक समस्यांवर लक्ष देण्याची संधी मिळाली. विकासकामं आणि अशा भागांमध्ये इस्लामचा प्रसार करू लागले जिथं आतापर्यंत गेले नव्हते.

इस्लामचा संदेश अरब द्वीपकल्पात चारी बाजुंस पोहचला होता. प्रत्येक कबिल्या-टोळीमध्ये अशी माणसं होती ज्यांच्या मनामध्ये प्रेषितांच्या धर्मानं घर केलेलं होतं. प्रेषितांच्या व्यक्तिमत्त्वाची ओढच तशी होती.

अनेक कारणांनी लोकांना इस्लामच्या झोतात येण्यापासून दूर ठेवलं होतं. अनेक कबिले व टोळ्यांना इस्लामची सत्यता पटली होती; पण यात प्रवेशाची घोषणा करणं म्हणजे कुरैशांविरूद्ध वैर ओढवून घेण्यासारखं होतं. म्हणून ते असं काही करण्यास कचरत होते, ज्यामुळं कुरैश त्यांच्यावर रागवतील.कुरैश लोकांशी मैत्रीमुळं जे आर्थिक लाभ त्यांना मिळत होते ते गमवण्याची भीतीही त्यांना लागून होती.

हुदैबिया कराराचा सर्व कबिल्या-टोळ्यांना आनंद झाला. या तहाद्वारे द्वीपकल्पात शांतता नांदू लागली आणि लढायांचा अंत झाला. आता हे दोन्ही पक्ष आपसातील शत्रुत्व संपवून दहा वर्षांसाठी शांतता पाळण्यास बांधिल होते.

मुस्लिम झालेल्या लोकांवर कुरैश सूड उगवू शकत नव्हते. आतापर्यंत तटस्थ राहणारे लोक इस्लामप्रवेश करण्यासाठी तीव्र इच्छा बाळगू लागले. कारण इस्लामनं उत्तम समाजव्यवस्था करण्याचं सामर्थ्य सिद्ध केलं होतं. हुदैबियाला जाताना प्रेषित मुहम्मद यांच्या सोबत १४०० मुस्लिम होते आणि फक्त दोनच वर्षांनंतर मक्केस मुक्त करण्यासाठी निघाले असता त्यांच्या सोबत १०,००० लोक होते. नव्यानं इस्लामप्रवेश करणाऱ्या लोकांना या नव्या इस्लाम धर्माच्या सिद्धान्ताचं शिक्षण द्यावं लागत होतं. त्यांच्या इस्लामप्रवेशाची आणि शिक्षण-प्रशिक्षणाची योजना सतत करावी लागत होती आणि त्यांना संघटित करावं लागत होतं. अरब द्वीपकल्पातील उच्चशिक्षित संपन्न मंडळी इस्लाम स्वीकार करून ओळख नसलेल्यांमध्ये सामील होणार होते किंवा मदीनेत स्थायिक होऊ पाहत होते.

☆

# महत्त्वाचा धडा

हुदैबियाचं महत्त्व हे होतं की माणसानं संयम पाळावा आणि घटनांना वरकरणी पाहू नये. मुस्लिमांसाठी प्रतिकूल हुदैबिया करारामध्ये महान संधी होत्या, ज्या फक्त आंतरयामी लोकांनाच कळून येतात. या करारानं कूटनितीचा एक नवीन पायंडा घातला. प्रेषितांनी आपले सहकारी आणि पालनकर्त्यामध्ये संयमाचं महत्त्व ठसविण्यासाठी तो उपयोगात आणला.

इब्ने कसीरनं हुदैबिया कराराविषयी अबु बक्र (अल्लाह त्यांच्याशी राजी होवो) यांच्या काही टिपणींची नोंद घेतलीय. ''हा इस्लामचा महान विजय होता.'' ते म्हणाले, ''त्या दिवशी लोक प्रेषित मुहम्मद (त्यांना शांतता लाभो) आणि त्यांच्या विधात्याची गुपितं समजून घेण्यात कमी पडले. लोक असंयमी असतात, पण अल्लाह नव्हे. तो घटनांना घडू देत असतो त्यानं ठरवलेल्या सीमा गाठेपर्यंत. लोकांना या जगात ताबडतोब यश मिळवायचं असतं. हे उघड आहे, पण वास्तववादानंच यश प्राप्त होत असतं.

☆

# सीमांच्या पलीकडं समस्त सत्ताधीशांना

करार झाल्याच्या नंतरच्या वर्षी मुस्लिमांची संख्या दुप्पट झाली. मुहम्मद (त्यांना शांतता लाभो) यांनी कराराच्या महिन्यामध्ये शेजारच्या साम्राज्यातील समस्त सत्ताधीशांना इस्लामचं निमंत्रण देण्यासाठी पत्र पाठवायचा निर्णय घेतला. आपल्या प्रेषित्वाला अधिकृत स्वरूप देण्यासाठी एक शिक्का तयार करून घेतला. त्यावर 'अल्लाहचे प्रेषित मुहम्मद' असं कोरण्यात आलं होतं.

इस्लाम स्वीकारण्याआधी ॲबिसिनियाचे राजे नेगूस यांना एक नवीन पत्र मिळालं. प्रेषित मुहम्मद यांनी पर्शियाचे राजे खुसरो, बायझंटाइन सम्राट हर्क्युलस, इजिप्तचे सत्ताधीश मुकाकिस, सवाचे पुत्र मुनाजिर, बहरीनचा राजा आणि अबी शामिर अलगस्सानीचा पुत्र अलहारिस जो सीरियालगतच्या अरब प्रदेशात राज्य करीत होता; या सर्वांना पत्रं पाठवली.

या पत्रांचा आशय जवळपास एकच होता. ज्यांना पत्रं पाठवली होती त्यांना ते 'अल्लाहचे प्रेषित मुहम्मद' असा स्वत:चा परिचय करून देत. त्यांना अल्लाहचं एकत्व लक्षात आणून देत आणि त्यांना इस्लाम स्वीकार करण्याचं निमंत्रण देत असत. त्यांनी नकार दिला तर ते त्यांना त्याच्या तमाम जनतेच्या चुकीसाठी जबाबदार धरत होते.

या पत्रांविरूद्ध राजा-महाराजांनी विभिन्न प्रतिक्रिया दिल्या. काहींनी (नेगुस व मुंदिरपुत्र सवा) संदेश स्वीकारला तर काहींनी (मुकाकिस, हर्क्युलस)

आदर दाखवला आणि धर्मपरिवर्तन किंवा विरोध करण्याची इच्छा व्यक्त केली नाही, तर इतरांनी (अलहारिस, अबी शामिर अल गस्सानीचा पुत्र) नकार देत आक्रमण करण्याची धमकी दिली. तथापि हा संदेश सर्वदूर पसरला होता. आता आणि मदीनेच्या मुस्लिमांची इस्लामधर्मिय अशी ओळख झाली होती. विभागीय शक्ती म्हणून त्यांचा आदर होऊ लागला. मुहम्मद, अब्दुल्लाहपुत्र प्रेषित होते, ज्यांचं शासन अल्लाहनं स्वीकारलं होतं.

हुदैबियाचा तह खऱ्या अर्थानं एक विजय होता आणि त्यांच्यासाठी सर्व जग खुलं झालं होतं. युद्धांनी मुस्लिम समुदायाची सर्व शक्ती पणाला लावली होती. ज्यापासून त्यांना आपला बचाव करावा लागत होता. प्रतिकार करून जगायचं होतं.

आता सर्व काही बदललं. आता शांततेच्या वातावरणात मुहम्मद इस्लामचा संदेश पोहचवू लागले, प्रसार करू लागले. एकेश्वरत्वाचा सिद्धान्त (तौहीद) जो मानवांना भौतिक हितसंबंधांपासून मुक्त करतो आणि आध्यात्मिक व नैतिक मूल्यांची जोपासना करण्याचं मार्गदर्शन करतो, ज्यात त्यांची श्रद्धा असणं आवश्यक आहे, आता द्वीपकल्पात सर्वत्र नांदत असलेल्या शांततेच्या वातावरणानं परिस्थितीत बदल घडवला होता. अधिकाधिक कबिले इस्लामचा आत्मिक संदेश समजू लागले. काही लोकांनी इस्लाम स्वीकारला तर काही स्वीकार न करता त्याचा आदर करू लागले. काही इतर लोक त्यांच्याविरूद्ध लढा देऊ लागले, पण संपूर्ण जाणिवेतून फक्त वर्चस्व मिळवणं किंवा सत्ता व संपत्ती मिळवणं त्यांचं उद्दिष्ट नव्हतं.

# १५

## प्रेषित मुहम्मद (स.)
# मुस्लिमेतरांदरम्यान

इस्लाम मानवी समाजात सहकार, परस्परांमध्ये संबंध आणि सहिष्णुतेने वागण्याचा आदेश देतो. प्रेषित मुहम्मद (त्यांना शांतता लाभो) मुस्लिमेतरांशी सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक आणि राजकीय स्तरावर सहकार करत होते. प्रेषित मुस्लिम-मुस्लिमेतर अशा सर्वांशीच दयेनं आणि उत्कृष्ट रीतीनं वागत असत. इस्लामनं घेतलेला पवित्रा कशा प्रकारचा होता यावर प्रकाश टाकण्यासाठी काही विषयांवर खाली चर्चा करू या.

# नातं मक्केतील मुस्लिमेतरांशी

### व्यापारात मुस्लिमेतर भागीदार

तरुण वयापासूनच प्रेषित मुहम्मद (त्यांना शांतता लाभो) भागीदारी तत्त्वावर व्यापार करत होते. मक्केच्या व्यापाऱ्यांकडून सामान घेऊन ते सीरिया आणि येमेनला जात होते आणि त्यापासून होणाऱ्या नफ्यामध्ये त्यांना वाटा मिळत होता. श्रीमंत विधवा महिला खदीजा (अल्लाह त्यांच्यावर राजी होवो) यांच्याशी विवाह झाल्यावर पती-पत्नी एकत्रितपणे व्यापार करू लागले. प्रेषित्व

प्राप्त झाल्यानंतर त्यांनी इस्लामच्या कार्यास स्वत:स पूर्णपणे वाहून घेतलं. व्यापार करण्यास त्याच्याकडं वेळच नव्हता. ते कुरैशांचे मोठे व्यापारी आणि कुरैशेतर दलालांमार्फत आपला माल बाजारात पाठवू लागले. यामुळं त्यांची आर्थिक स्थिती सुधारली. आपल्या व्यापारी कारभारामध्ये त्यांनी आपला माल मुस्लिमेतर अबु सुफियान यांच्यामार्फत सीरियाला पाठवला आणि यामध्ये त्यांना बराच फायदा झाला. त्यांना एक अनुभवी व प्रामाणिक या नात्यानं अबु सुफियानवर विश्वास होता. प्रेषित मुहम्मद यांच्या इस्लामी कार्याची कल्पना येऊनसुद्धा अबु सुफियान यांनी त्यांच्याशी आपलं व्यापारी व सामाजिक नातं तोडलं नाही.

इब्ने कसीरचं वर्णन असे– अबु सुफियान आपला एक मित्र उमय्या यांच्याबरोबर सीरिया आणि येमेनच्या व्यापारी दौऱ्यावर गेले होते आणि पाच महिन्यानंतर मक्केस परतले. लोकांनी केलेल्या गुंतवणुकीची माहिती घेण्यासाठी त्यांची भेट घेतली. प्रेषित मुहम्मद देखील त्यांना भेटले. त्या वेळी अबु सुफियान यांची पत्नी हिंद आपल्या मुलांसोबत खेळत होती. प्रेषितांनी अबु सुफियान यांचं ते सुखरूप परतले म्हणून स्वागत केलं. त्यांनी त्यांच्या प्रवासाबाबत चर्चा केली. पण आपल्या वाट्याबाबत काही प्रश्न केला नाही. ते परत गेले तेव्हा अबु सुफियान हिंदला म्हणाले, ''मला या माणसाचं नवल वाटतं. मला ते आवडतात. प्रत्येक कुरैश ज्यानं आपला माल दिला होता त्याबाबत विचारलं, पण मुहम्मद यांनी मला एकही प्रश्न विचारला नाही.'' काही वेळानंतर अबु सुफियान काबागृहात गेले असता तिथं त्यांना प्रेषित मुहम्मद भेटले. त्यांनी मुहम्मद यांना त्यांच्या नफ्याबाबत माहिती दिली आणि तो घेऊन जाण्यास सांगितलं. अबु सुफियान नेहमीप्रमाणे जे कमिशन घेत होते ते घेण्यास नकार दिला. पण प्रेषित यासाठी तयार झाले नाहीत, अबु सुफियान यांनी ठराविक कमिशन घेतलं.

एके दिवशी जेव्हा प्रेषित मुहम्मद लोकांना इस्लाम धर्माबाबत सांगत होते, अबु सुफियान सीरियाचा व्यापारी प्रवास आटोपून परतले होते. ते मुहम्मद आणि इतर लोकांचा माल घेऊन गेले होते. जेव्हा प्रेषितांना हे कळालं तेव्हा ते म्हणाले, ''व्यापाराशी निगडीत कार्य अबु सुफियान प्रामाणिकपणे करतील.''

# व्यापारी संबंध

अर्थव्यवस्था समाजजीवनाचा गाभा आहे. धनसंपत्ती समाजाला आधार देण्यासाठी पुरवठ्यासारखी आहे. जर लोकांची आर्थिक स्थिती चांगली नसेल आणि ते इतरांवर अवलंबून असतील तर त्याचं जगणं कठीण होऊन जातं. प्रेषित मुहम्मद (त्यांना शांतता लाभो) आणि मक्केचे मुस्लिम व्यापारी असल्यानं त्यांना आर्थिक, सामाजिक व सामूहिक जीवनामध्ये धनसंपत्तीचं महत्त्व माहीत होतं.

प्रेषित मुहम्मद आणि त्यांच्या अनुयायींनी आपल्या पायावर उभं राहून आपली आर्थिक स्थिती सुधारण्याचा चंग बांधला. त्यांनी आपल्या व्यापाराची योजना आखली आणि पद्धतशीरपणे ती अंमलात आणण्याचं ठरवलं.

व्यापारात अबु सुफियान यांच्याशी भागीदारी करतानाच त्यांनी कुरैश सरदार आणि अरब टोळ्यांशीही व्यापारी संबंध जोडले होते. मुस्लिमेतरांमध्ये त्यांच्या व्यापारी भागीदारांमध्ये अस्सईब व कैस होते. अल-बगदादी आणि प्रेषितांच्या इतर चरित्रकारांनी कुरैश भागीदारांबाबत बरेच लिखाण केलंय. अल-बगदादी यांनी ५८ मुस्लिम आणि मुस्लिमेतरांची नावं दिलेली आहेत.

त्यांच्या सहकाऱ्यांमध्ये अब्दुर्रहमान इब्ने औफ यांची मुस्लिमेतर व्यापाऱ्यांशी भागीदारी होती. त्यांचे जवळचे मित्र आणि भागीदार मक्केतील आघआडीचे व्यापारी उमय्या इब्ने खलफ यांचा इस्लामला विरोध होता. कुरैश सरदार उतबाचे पुत्र अल-वलीद हे त्यांचे मित्र आणि अब्बास यांचे भागीदार होते. उस्मान आणि राबिआ इब्ने हारिस हेही मित्र आणि व्यापारी भागीदार होते. अब्बास आणि अबु सुफियान चांगले भागीदार होते. मरेपर्यंत ते जवळचे मित्र, व्यापारी भागीदार आणि सहकारी राहिले. युद्धांमुळं त्यांच्या संबंधांना तडा गेला नव्हता आणि धार्मिक मतभेदांनीही त्यांना दूर केलं नव्हतं.

# विवाहसंबंध

मक्का काळात कुरैशचे मुस्लिम आणि मुस्लिमेतर यांच्यामधील विवाहसंबंधांचं महत्त्वाचं उदाहरण म्हणजे प्रेषित मुहम्मद (त्यांना शांतता लाभो) यांच्या सर्वांत थोरल्या कन्या जैनब आणि अबुल आस यांचा विवाहसंबंध. अबुल आस हे खदीजा (अल्लाह त्यांच्यावर राजी होवो) यांचे भाचे होते. इब्ने हिशाम यांच्यानुसार, खदीजा यांनी हा विवाह इस्लामपूर्व काळात ठरवला होता आणि प्रेषितांचीही ती पसंती होती. (मुस्लिम आणि मुस्लिमेतरांमध्ये विवाह वर्ज्य असल्याचं कुरआनचं अवतरण त्या वेळी झालेलं नव्हतं.)

इब्ने सअद यांचं एक महत्त्वाचं वर्णन असे– सुरुवातीस आयशा (अल्लाह त्यांच्यावर राजी होवो) यांचा विवाह मक्केचे सरदार मुतईमचा पुत्र जुबैरशी होणार होता. अबु तालिब यांच्या मृत्युनंतर मुतईमनंच प्रेषितांना संरक्षण दिलं होतं. नंतर मुतईम आणि त्यांच्या कुटुंबियांनी एका मुस्लिम मुलीला आपली सून म्हणून स्वीकार करण्यास नकार दिला. त्यांना ही मुलगी परिवारात इस्लामचा प्रसार करील अशी भीती वाटली होती. या घटनेनंदेखील दोन्ही संप्रदायांमध्ये विवाहसंबंध होत होते, याचा दाखला मिळतो.

# बहुसंख्य कुरैश आणि अल्पसंख्य मुस्लिमांचं संयुक्त शासन

प्रेषित मुहम्मद (त्यांना शांतता लाभो) यांच्या आगमनाच्या वेळी कुरैश कबिल्याकडं राजकीय आणि सामाजिकदृष्ट्या महत्त्वाची १२ पदे होती आणि हे १२ प्रतिष्ठित कुरैश परिवारांमध्ये वारसानं चालत आले होते. त्यांच्यातल्या काहींनी इस्लाम स्वीकारला. उदाहरणार्थ– अबु बक्र (अल्लाह त्यांच्यावर राजी होवो) यांनी आधीच इस्लाम स्वीकारला होता. नंतर उमर यांनी इस्लाम स्वीकारला. अब्बास देखील सुरुवातीचेच मुस्लिम होते. तसेच खालिद आणि

उस्मान यांनीही इस्लाम स्वीकारला. या कुरैश सरदारांमधील निम्म्या लोकांनी आपला वडिलोपार्जित धर्म सोडून इस्लामचा स्वीकार केला होता. तरीदेखील त्यांनी आपला पदभार सोडला नाही. दुसऱ्या शब्दांत जहाल कुरैश सरदारांनी त्यांना पद सोडण्यास भाग पाडलं नव्हतं. मुस्लिम असूनदेखील ते आपल्या कबिल्याचा व्यवहार हाताळत होते आणि मक्केच्या सरदारांना मदीनेस स्थलांतर करेपर्यंत सहकार्य करत होते. अशा प्रकारे मक्केतील राजकीय सत्ता मुस्लिम आणि मुस्लिमेतर पदाधिकाऱ्यांद्वारे चालत होती. कुरैश बहुसंख्य आणि मुस्लिम अल्पसंख्यकांचं ते संमिश्र शासन होते. आपल्या मुस्लिमेतर बांधवांबाबत प्रेषित मुहम्मद यांनी मनापासून मैत्रीपूर्ण मार्ग अनुसरला आणि राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक व आर्थिक बाबींमध्ये त्यांना आपला सहयोग दिला. कुरैशांनीही हाच मार्ग अवलंबिला, तो त्यांच्या हिताचा होता.

# सामाजिक बंधन

## प्रेषितांचा सामूहिक भोजनाचा कार्यक्रम

इस्लामचा जाहीरपणे प्रसार करण्यास दैवी आदेश मिळाल्यानंतर बहुसंख्य कुरैशांशी आपले सामाजिक संबंध विस्तारण्यासाठी आणि इस्लाम धर्माचा प्रचार करण्यासाठी प्रेषित मुहम्मद (त्यांना शांतता लाभो) यांनी सामूहिक जेवणाच्या कार्यक्रमाची व्यवस्था केली. हा अरबांच्या परंपरेचा भाग होता आणि प्रेषित व त्यांचे सहकारी तो नियमितपणे करत असत. इस्लाम प्रचारामुळे ही एक दृढ सामाजिक प्रथा बनली. माननीय उस्मान (अल्लाह त्यांच्यावर राजी होवो), जुबैर, अब्दुर्रहमान व सअद यांनी इस्लाम स्वीकारण्यापूर्वी माननीय अबु बक्र यांनी त्यांना निमंत्रित केलं होतं.

# गुलामांची खरेदी करून त्यांना मुक्त करणं

प्रेषित मुहम्मद (त्यांना शांतता लाभो) यांनी असहाय्य मुस्लिमेतर गुलामांना त्यांच्या अन्यायी मालकांकडून विकत घेऊन मुक्त केलं होतं. अशा मुक्त झालेल्या गुलामांना त्यांनी बरोबरीचे हक्काधिकार बहाल केले. प्रेषितांच्या या मायाळू वृत्तीनं त्यांच्या वेदनांचं सांत्वन झालं होतं. काही श्रीमंत मुस्लिम सहकाऱ्यांनीही आपल्या गुलामांना मुक्त केलं होतं. हे एक प्रकारचं जरी पवित्र कार्य असलं तरी सखोल अभ्यास केला असता असं वाटतं की गुलामांची खरेदी करून त्यांची पिळवणूक थांबवणं ही प्रेषितांची अत्याचारी मालकांच्या तावडीतून त्यांची सुटका करण्यामागची युक्ती होती. प्रेषित मुहम्मद यांनीच श्रीमंत मुस्लिमांना अशी आग्रहाची विनंती केली होती.

प्रेषित मुहम्मद यांनी गुलामांची खरेदी करून त्यांना मुक्त करण्याची पद्धत रुजवली होती. मुस्लिम संप्रदायातील सर्व श्रीमंत लोकांनी प्रेषितांच्या आदेशाची अंमलबजावणी केली. मुस्लिम श्रद्धावंताच्या माता- प्रेषितांच्या पहिल्या पत्नी खदीजा (अल्लाह त्यांच्यावर राजी होवो) यांनी आपली सर्व मालमत्ता या कार्यात दान करून टाकली. अबु बक्र यांनीही अनेक गुलाम मुक्त केले. यामुळं असह्य लोकांची अत्याचाऱ्यांपासून सुरक्षा करण्यास मदत झाली. मदीना काळात अबु बक्र यांच्याकडं ४० हजार दिरहम रोख होते. शिवाय त्यांची इतर मालमत्ताही होती. गुलामांची सुटका करण्याच्या कार्यात त्यांनी ती सर्व खर्ची घातली. मदीनेस स्थलांतर करतेवेळी त्यांच्याजवळ फक्त ५००० दिरहम उरले होते आणि तेही त्यांनी मुस्लिमांसाठी राखीव ठेवले होते. उमर औफ यांचे पुत्र अब्दुर्रहमान आणि इतर अनेक मक्केच्या श्रीमंत मुस्लिमांनीही आपली संपत्ती गुलामांना विकत घेऊन त्यांची मुक्तता करण्यासाठी उदारहस्ते खर्च केली. अब्दुल्लाह अल-नहम यांनी अनेक मुस्लिमेतर गुलामांची जबाबदारी स्वीकारली. त्यांच्या दानधर्म करण्याच्या वृत्तीनं जहाल कुरैश सरदार इतकं प्रभावित झाले होते की त्यांनी मक्केतील गरीब आणि अनाथांना जो आश्रय दिला होता, मदीनेस स्थलांतर केल्यावर त्यांची मदत करण्यास कुणी नसणार या भीतीनं त्यांना जाऊ दिलं नाही. गरीबांना दानधर्म करण्याचा

आणि त्यांना मदत करण्याबाबतचा इस्लामचा आदेश ते प्रत्यक्षात साकारत होते.

## महानतम आदर

प्रेषित मुहम्मद (त्यांना शांतता लाभो) यांनी विविध टोळ्या-कबिल्यांशी आणि ज्या नातेवाईकांनी इस्लाम स्वीकारला नव्हता, तसेच कुरैशांपासून प्रेषितांचं संरक्षण करणारे अबु तालिब, अशा सर्वांशी आपले पूर्वीचे अभेद्य संबंध कायम ठेवले. अबु तालिब शेवटचा श्वास घेत असताना मुहम्मद त्यांना भेटले होते. अबु तालिब यांनी आपल्या पुतण्यास जे संरक्षण दिलं होतं त्याचा त्यांना आनंद वाटत होता, अशी त्यांनी कबुली दिली. अबु तालिब यांच्या मृत्युसमयी प्रेषित त्यांच्या बाजूस होते. त्यांनी प्रेषितांना साहसानं आणि आदरानं संरक्षण दिलं होतं. त्यांच्यावर त्यांच प्रेम होतं आणि ते त्यांचा सन्मान करीत होते तरी त्यांनी इस्लाम स्वीकारला नव्हता. मुहम्मद देखील त्यांचा आदर करीत होते. म्हणून त्यांना याचं उत्कट दु:ख होतं.

## प्रगाढ विश्वास

दुसरे चुलते अब्बास हे प्रेषित मुहम्मद यांच्या बाजूनं उभे होते. त्यांनी इस्लामचा स्वीकारही केला नव्हता. मुहम्मद यांना त्यांच्यावर विलक्षण विश्वास होता. त्यांच्यावर भरवसा करण्यात प्रेषितांनी कधी मागंपुढं पाहिलं नाही. मुस्लिमांच्या भवितव्याविषयी चर्चेसाठीच्या बैठकीतही त्यांना बोलवत होते. नंतर जेव्हा अल-अकबाह तह झाला त्या वेळीही ते उपस्थित होते. मदीनेस स्थलांतर करण्याच्या तयारीचीही माहिती प्रेषितांनी त्यांना दिली होती. अब्बास अनेकेश्वरी असतानादेखील प्रेषितांनी त्यांना मोठा सन्मान दिला होता आणि अशा स्थितीतही त्यांच्यावर विश्वास टाकला होता जेव्हा त्यांच्या जीवाला धोका होता.

# प्रामाणिकपणा

जे लोक प्रेषित मुहम्मद (त्यांना शांतता लाभो) यांच्या श्रद्धेत सहभागी नव्हते त्यांच्याशी समतेचा व्यवहार करण्यात मुहम्मद एक आदर्श होते. मक्केतील संपूर्ण कार्यकाळात मुस्लिमेतर जे त्यांच्याशी व्यवहार करत होते आणि त्यांच्यावर त्यांची अपार श्रद्धा होती अशा लोकांच्या ठेवी स्वीकारत होते. मदीनेस स्थलांतर करण्यापूर्वी ठेवीदारांची अमानत त्यांना परत करण्याची जबाबदारी त्यांनी अली (अल्लाह त्यांच्याशी राजी होवो) यांच्यावर टाकली होती. इस्लामनं मुस्लिमांना दिलेल्या विश्वास आणि न्याय्य वागणुकीच्या शिकवणीच्या सिद्धान्ताचा त्यांनी प्रामाणिकपणानं अवलंब केला होता, मग लोकांचा धर्म कोणताही असो, ते मुस्लिम असोत की मुस्लिमेतर.

# विश्वसनीयता

प्रेषित मुहम्मद (त्यांना शांतता लाभो) आणि त्यांचे सोबती अबु बक्र (अल्लाह त्यांच्याशी राजी होवो) यांनी मदीनेस स्थलांतर करण्याचा निर्णय घेतला आणि आपल्या जिवांना त्यांनी अल्लाहच्या स्वाधीन केलं. तरीदेखील एक मुस्लिमेतर वाटाड्याची मदत घेण्यास ते कचरले नाहीत. तो शत्रूंच्या अनेकेश्वरी धर्माचा असतानाही तो आपल्या विश्वसनीयता व सामर्थ्यासाठी प्रसिद्ध होता. इतरांच्या नियोजिलेल्या वाटेच्या तुलनेत त्या वाटाड्याला अधिक माहिती होती. मुहम्मद यांना आणून आपल्या ताब्यात देणाऱ्यास शंभर तांबड्या उंटांच्या इनामाची कुरैश लोकांनी घोषणा केली होती. मुस्लिमेतर वाटाड्याला कुरैशांनी घोषित केलेल्या इनामाची संपूर्ण माहिती होती. तरीदेखील दिलेल्या वचनावर तो ठाम होता आणि त्यानं प्रेषितांना मदीनेस सुखरूप पोचण्यास मदत केली.

# सभ्य स्वभाव

दररोज काबागृहास जाण्यासाठी प्रेषित मुहम्मद (त्यांना शांतता लाभो) आपल्या घरातून निघण्याआधी एक स्त्री त्यांच्या वाटेत केर-कचरा टाकायची, कारण प्रेषित जो धर्म सांगत होते तो तिला आवडत नव्हता. ती त्यांचा अनादर करीत होती. एके दिवशी प्रेषितांच्या वाटेत कचरा टाकलेला नजरेस आला नाही, म्हणून ते त्या स्त्रीच्या घरी गेले. तिला धक्काच बसला. तिनं मुहम्मद यांना का आलात असं विचारलं. प्रेषितांनी उत्तर दिलं की आज रस्त्यात कचरा दिसला नाही. आजार पडली की काय याची विचारपूस करण्यासाठी आपण आलो आहोत. प्रेषितांच्या अशा वर्तणुकीमुळं त्या महिलेचं मन मवाळ झालं आणि मुहम्मद अल्लाहचे प्रेषित असल्याची तिची खात्री झाल्यानं तिनं इस्लाम स्वीकारला.

# प्रेमळ स्वभाव

मक्केच्या महान विजयानंतर प्रेषित मुहम्मद (त्यांना शांतता लाभो) मक्केत गस्त घालून लोकांची काळजी घेत होते. त्यांनी एका वृद्ध महिलेस आपलं सामान घेऊन मक्का सोडण्याच्या तयारीत असल्याचं पाहिलं. मुहम्मद यांनी तिचं गाठोडं आपल्या खांद्यावर उचललं आणि मक्केची हद्द पार करण्यास तिला मदत केली. त्या महिलेबरोबर चालताना प्रेषितांनी तिला मक्का सोडण्याचं कारण विचारलं. तिनं उत्तर दिलं की मक्का जिंकला गेलाय. मी एक मुस्लिमेतर असल्यानं मुहम्मद यांचं सैन्य मला पकडतील आणि त्रास देतील, असा मी विचार केला. ते मक्केचा नाश करतील. मला हे दृश्य पाहावणार नाही. आपल्या अवस्थेबद्दल ती प्रेषितांना वाईट बोलू लागली आणि त्याच वेळी ज्या माणसानं तिचं सामान उचलून घेऊन तिला मदत केली त्यास धन्यवाद व्यक्त केला. तिनं मुहम्मद यांना विचारलं की तुम्ही कोण? मुस्लिम त्यांना धरतील अशी आपली भीती व्यक्त केली. प्रेषितांनी उत्तर दिलं,

''मी मुहम्मद आहे.'' ती महिला आश्चर्यात पडली आणि विचारू लागली की तेच ते प्रेषित ज्यांनी मक्का जिंकलं! इतके कृपाशील की मक्केत गस्त घालून लोकांची काळजी घेत होते. तिचा विश्वासच बसत नव्हता. प्रेषितांच्या या वागणुकीचा तिच्यावर इतका परिणाम झाला की त्या महिलेनं त्यांची क्षमा मागत लगेच इस्लाम स्वीकारला.

# नातं
# मदीनेच्या मुस्लिमेतरांशी

## सहिष्णुता व शांततापूर्ण सहवास

मदीनेस स्थलांतर केल्यानंतर आणि इस्लामी समुदायाचे आधारस्तंभ त्यांच्यातील प्रशासनिक, राजकीय विचारांवर भक्कमपणे स्थापित झालंय याची खात्री झाल्यानंतर लवकरच प्रेषित मुहम्मद (त्यांना शांतता लाभो) मुस्लिमेतरांशी संबंध स्थापण्याची नियमितपणे सुरुवात केली. त्यांचे हे सर्व प्रयत्न प्रामुख्यानं मानवजातीच्या शांतता, सुरक्षा आणि भरभराटीसाठी होते.

मदीनेच्या आत आणि सभोवताली मुस्लिमांना जवळचे लोक ज्यू धर्मिय होते. त्यांनी त्यांच्याशी एक करार करण्याचा निर्णय घेतला, ज्याद्वारे त्यांना श्रद्धा व संपत्तीबाबत संपूर्ण स्वातंत्र्य दिलं गेलं होतं.

प्रेषितांनी कुणालाही इस्लाम स्वीकारण्यास विवश केलं नाही. त्यांनी हे स्पष्ट केलं की नवीन समाजाशी लोकतांत्रिक बहुजनवादी तत्त्वांवर संबंध जोडायचे आहेत. त्यांनी प्रत्येक व्यक्तीच्या धारणेविषयी आदर व्यक्त केला.

- अनेक वर्षांपासून एक तरुण ज्यू धर्मिय व्यक्ती प्रेषित मुहम्मद यांचा सहकारी होता. तो नेहमी प्रेषितांबरोबर राहायचा, कारण त्यास प्रेषितांवर प्रेम होतं. प्रेषितांनी त्यास त्याचा धर्म सोडण्यास सांगितलं नाही. तो मुलगा गंभीर आजारी पडला. त्यानं मृत्युसमयी आपल्या पित्यास इस्लाम स्वीकारण्याची परवनागी मागितली व तो मुस्लिम झाला. पण प्रेषितांबरोबर असताना जन्मभर जसा तो होता तसाच राहिला आणि त्यास प्रेषितांचं प्रेम व शुभेच्छा लाभल्या.
- प्रेषित मुहम्मद यांच्या काळात बऱ्याच अवधीसाठी मुस्लिम व ख्रिस्ती लोकांमधील परस्परांतील संबंध चांगले व सौहार्दाचे होते. त्यांच्या पत्नी आयशा (अल्लाह त्यांच्यावर राजी होवो) यांनी आपले भाचे उरवा यांना सांगितलं की प्रेषितांच्या काही ख्रिस्ती शेजाऱ्यांकडं दुभती जनावरं होती. ते कधी कधी आम्हाला दूध भेट म्हणून देत असत आणि आम्ही ते घेत होतो.

# परस्परांतील विश्वास

प्रेषित मुहम्मद (त्यांना शांतता लाभो) यांचा मुस्लिमेतरांवर प्रचंड विश्वास होता. त्यांनी मुस्लिमांना ॲबिसिनियाकडं स्थलांतर करण्यास सांगितलं. त्याचा राजा मुस्लिमेतर होता. प्रेषितांच्या संपूर्ण जीवनात त्यांचा कल दिसून येतो. त्यांनी हे संबंध स्नेह आणि सिद्धान्तांवर स्थापले होते, धर्माच्या आवडीनुसार नव्हे. त्यांच्या अनुयायींनाही हे कळलं होतं आणि त्यांनीही मुस्लिमेतरांशी असे संबंध परस्पर आदर, विश्वास, नातं व मैत्री यांच्या आधारावर धोकादायक वातावरणातदेखील विकसित केले होते.

आपल्या मुलांसह मदीनेस स्थलांतर करतेवेळी उम्मे सलामा यांना त्यांच्या कुटुंबियांनी रोखून धरलं होतं. त्यांना आपल्या पतीबरोबर जाऊ दिलं नाही. वर्षभर उम्मे सलामा या अनुभवातून गेल्या. दररोज सकाळी त्या मदीनेस जाणाऱ्या रस्त्यावर उभं राहून संध्याकाळपर्यंत रडत होत्या. एका चुलत भावानं त्यांच्यावर दया करून त्यांची मुलं त्यांना देऊन टाकली आणि मदीनेस जाण्याची परवानगी दिली. त्या एका उंटावर स्वार होऊन एकट्याच मदीनेकडं निघाल्या. वाळवंटात उस्मान बिन तलहा यांनी त्यांना पाहिलं. ते मुस्लिम नव्हते आणि त्यांना साथ देऊन त्यांचे पती राहत होते त्या ठिकाणी पोहोचवलं. उस्मानवर विश्वास करण्यात त्यांना संशय आला नाही. त्यांना आणि त्यांच्या मुलांना त्यांच्या घरी पोचवल्यानंतर ते परतले. उम्मे सलामा उस्मान यांच्या सभ्यपणाची प्रशंसा करीत याचं कथन नेहमी करायच्या.

अबु सुफियान हे आणखी एक मक्केचे सभ्य व्यक्ती होते. त्यांनी प्रेषितांच्या कन्या जैनब यांना मुक्त करून त्यांना मदीनेस जाण्यासाठी मदत केली. बद्रच्या युद्धात कैदी झालेले त्यांच्या मुस्लिमेतर पतीची या अटीवर सुटका करण्यात आली होती की ते जैनब यांना मदीनेस पाठवून देतील. अबु सुफियानच्या प्तनी हिंदनं हे ऐकल्यावर त्यांना मदत करण्याची तयारी दर्शवली. पण जैनब यांनी त्यांच्यावर विश्वास ठेवला नाही. शेवटी त्या आपल्या पतीचे भाऊ किनाना यांच्यासोबत मक्का सोडण्याची अनुमती मागितली. तेव्हा काही

कुरैश सरदारांनी त्यांना बळजबरीनं रोखून धरलं. किनाना यांनी लढण्याची शपथ घेतली आणि रक्तपात घडण्याची परिस्थिती निर्माण झाली. अबु सुफियान कुरैश सरदारांसमवेत या ठिकाणी आले. जैनब आणि किनाना यांना मक्केस परत जाण्यासाठी राजी केलं. परिस्थिती शमल्यानंतर अबु सुफियान यांनी त्यांान मदीनेस जाण्यास मदत केली.

अशी उदाहरणं अनेक आहेत. प्रेषितांनी किंवा इतर मुस्लिमांनी आपले सामाजिक व मानवी संबंध फक्त स्वधर्मियांपर्यंतच मर्यादित ठेवले नाहीत. नंतर कुरआनद्वारे परस्पर विश्वासाच्या आधारावर न्याय्य संबंधाचा सिद्धान्त ठरवून दिला.

> ''जे लोक धर्माचे कारण (पुढं) करून तुमच्याशी लढत नाहीत आणि तुम्हांस तुमच्या घरादारांतून काढलं नाही त्यांच्याशी तुम्ही सलोख्यानं आणि न्यायानं वागण्यास अल्लाह मनाई करत नाही. न्यायी लोक अल्लाहच्या आवडीचे असतात. पण अल्लाह तुम्हांस अशा लोकांशी मैत्री करण्यास मनाई करतो जे धर्माचे कारण करून तुमच्याशी लढतात, तुम्हांस तुमच्या घरादारांतून हाकलून देतात आणि तुम्हांस घालवून देण्यासाठी मदत पुरवितात. जे त्यांना आपले मित्र बनवतील ते लोक अपराधी असतात.''
>
> (कुरआन, ६०:८-९)

कठीण प्रसंग, बंडाळी आणि युद्धांचं वातावरण असतानादेखील ही शिकवण कायम राहणार होती. कुणाचंही सक्तीनं धर्मांतर करायचं नव्हतं आणि तमाम लोकांशी न्याय्य वागणूक करायची होती. हेच कुरआनच्या अवतरणाचं मूळ आणि प्रेषितांच्या कार्याचा आत्मा आहे. कुरआनच्या अशा सर्व अवतरणांचा अभ्यास ज्यांचा संबंध लढाया, हत्या आणि युद्धांशी आहे, त्यांचा अभ्यास अवतरणांच्या संदर्भात केला जावा (मुस्लिम युद्धात गुंतलेले असताना त्यांना आपला बचाव करण्याची गरज असेल) आणि कशाही प्रकारे संदेशाच्या आशयामध्ये मूलभूत बदल करू नये.

# अनुकंपा

धर्माच्या आधारावर मुस्लिमेतरांशी कसलाही भेदभाव केला जात नव्हता. प्रेषित मुहम्मद (त्यांना शांतता लाभो) आपल्या ज्यू धर्मिय शेजाऱ्यांशी दयेनं व प्रेमानं वागत होते. त्यांच्या आजारी माणसांची विचारपूस करण्यास त्यांच्या घरी जात होते. मदीनेत बनु अरीद नावाची एक ज्यू धर्मिय टोळी होती. प्रेषित त्यांच्याबरोबर खूश होते आणि दरवर्षी त्यांना बक्षीस देत होते.

# विश्वास आणि निष्ठा

मुस्लिमेतरांबाबत मुस्लिमांची भूमिका दयापूर्ण, काळजी घेण्याची आणि अपार सहिष्णुतेची होती. मुस्लिमेतरही बदल्यात तसाच व्यवहार करत होते. हिजरीनंतर दोन वर्षांनी मक्केच्या सरदारांनी नेगूस राजाकडं आणखीन एक प्रतिनिधीमंडळ पाठवलं. मुस्लिमांना ॲबिसिनियामधून देण्याच्या हेतुनं म्हणजे त्यांना यातना दिल्या जाव्यात. यास उत्तरादाखल प्रेषित मुहम्मद (त्यांना शांतता लाभो) यांनीही यांना आपला राजदूत बनवून पाठवलं. कुरैशांच्या दुष्ट कृत्यांना रोखण्यात ते यशस्वी झाले.

## मुस्लिमेतरांनी शत्रुंशी लढायांमध्ये प्रेषितांना मदत केली

प्रेषित मुहम्मद (त्यांना शांतता लाभो) फार वास्तववादी होते. युद्धाच्या तयारीकडं त्यांनी कधी दुर्लक्ष केलं नाही की आपले प्रयत्न कधी कमी पडू दिले नाहीत. त्यांनी आध्यात्मिक व भौतिक सामर्थ्यानं विलक्षण संतुलन साधलं. आपल्या माणसांचं मनोबल उंचावण्यासाठी त्यांनी अध्यात्माचा अत्यंत कल्पकतेनं उपयोग केला. त्याच वेळी समकालीन युद्धसामुग्रीनं आपल्या सैन्याला पूर्णपणे तयार केलं. त्यांनी कोणतीही गोष्ट संधींवर विसंबून

केली नाही, तर पूर्ण तयारी ठेवली. सर्व साधनांचा वापर केला. हुनैन युद्धाच्या वेळी त्यांच्याकडं १२ हजार बळकट सैन्य असतानादेखील एक मुस्लिमेतर सफवान बिन उमय्याकडून शंभर पेट्या शस्त्रास्त्रे उसणी घेतली होती. सफवाननं मुस्लिम नसतानाही हुनैनच्या युद्धात इस्लामच्या शत्रुंशी लढण्यासाठी प्रेषितांना मदत केली होती.

- सफवान आणि सुहैल हे दोन मुस्लिमेतरांनी इस्लामच्या शत्रुशी लढा दिला. प्रेषितांनी ओळख ठेवून त्यांचा सन्मान केला. युद्धात हाती आलेल्या मालाची वाटणी करताना त्यांना मोठा वाटा दिला, तरीदेखील त्यांना धर्मांतर करण्यास सांगितलं नाही.

- उहुदच्या युद्धास जाताना मुस्लिम सैन्य एका वहिवाट नसलेल्या मार्गाचा अवलंब करणार होतं, जेणेकरून शत्रू कुरैशांना रणभूमीत त्यांच्या आगमनाची चाहूल लागू नये. यासाठी प्रेषितांनी एका मुस्लिमेतर वाटाड्यावर विश्वास केला. त्याच्या कार्यक्षमतेशी सर्व लोक परिचित होते. अशा प्रकारे एका मुस्लिमेतर वाटाड्यानं मुस्लिम सैन्याचं युद्धभूमीवर नेतृत्व केलं.

# उघड निंदनीय गुन्हा

प्रेषित मुहम्मद (त्यांना शांतता लाभो) यांचं मदीनेत आगमन झाल्यावर त्यांनी कुणावरही इस्लाम स्वीकारण्याची सक्ती केली नाही. त्यांना नव्या समाजामध्ये लोकतंत्राच्या सिद्धान्तावर संबंध प्रस्थापित करायचे होते. नंतर जेव्हा भांडण सुरू झालं आणि कराराचा भंग केला जाऊ लागला, परिस्थिती चिघळत गेली. ज्यू टोळ्यांमधील संबंधांमध्ये बाधा वाढत गेली.

काही वर्षांनी अशा ज्यू धर्मियांशी मुस्लिमांचं भांडण सुरू होतं, ज्यांच्याविषयी मुस्लिमांना दुटप्पीपणाचा संशय होता. याचा विचार करून त्या वेळी एका मुस्लिमाने आपण केलेल्या चोरीचा आळ एका ज्यू धर्मिय व्यक्तीवर घेतला होता.

प्रेषितांनी लगेच या घटनेची न्यायालयीन चौकशी करण्याचा आदेश दिला. तपासांती एका मुस्लिमानं चोरी केल्याचं उघड झालं आणि त्या ज्यू व्यक्तीला निर्दोष घोषित करून मुस्लिमास दोषी ठरवलं गेलं.

आठ आयतींवर आधारित कुरआनच्या अवतरणामध्ये मुस्लिमांच्या विश्वासघाताची निंदा करून ज्यू धर्मियास निर्दोष असल्याचं उघड करण्यात आलं. (पाहा- ४:१०८-११६)

> ''कुणी चूक अगर पाप करून त्याचा आरोप इतर कोणा निरपराधावर ठेवत असेल तर अशा कुभांड आणि पापांचा बोजा त्याला उचलावा लागेल. हा तर उघड अपराध आहे.''
>
> (कुरआन, ४:११२)

कुरआनचं सांगणं आहे की एखाद्या भांडणामुळं अथवा युद्धामुळं द्वेष निर्माण झाला तरी मुस्लिमांनी इस्लामी सिद्धान्ताशी एकनिष्ठ राहावे.

> ''श्रद्धावंत लोकहो, अल्लाहच्या बाजूनं न्यायाची साक्ष देण्यास उभं राहा. एखाद्या जनसमूहाचं शत्रुत्व तुम्हाला त्याच्याशी अन्याय करण्यास प्रवृत्त करता कामा नये. न्याय करा, हे ईशपरायणतेशी निगडीत आहे. अल्लाहची भीती बाळगत राहा. तुम्ही जे काही करत असता त्या सर्व गोष्टी अल्लाहला अवगत असतात.'' (कुरआन, ५:८)

☆

# सभ्यपणा आणि सहिष्णुता

दयापूर्ण सभ्य वर्तन हे मुहम्मद (त्यांना शांतता लाभो) यांच्या शिकवणींचा आत्मा होता. ते म्हणत असत, ''अल्लाह सभ्य आहे आणि त्यास सभ्य वर्तन पसंत आहे.''

एका अनुयायीस प्रेषितांनी सांगितलं, ''तुमच्यामधील दोन गुणांना अल्लाह पसंत करतो, सभ्यपणा आणि सहिष्णुता.''

प्रेषित मुहम्मद यांनी टोकाच्या परिस्थितीतही सहिष्णुतेचा आदर्श घडवला. एकदा एका खेडूत अरबानं मशिदीतच लघवी केली. त्यावर मुस्लिम त्यास मारहाण करण्यास निघाले. प्रेषितांनी त्यास सोडून देण्याचा आदेश दिला.

ज्या जागी त्यानं लघवी केली होती त्यावर प्रेषितांनी पाणी ओतलं आणि मग त्या खेडुतास प्रेषितांनी ती प्रार्थनेची जागा आहे आणि ती अपवित्र करू नये असं समजावून सांगितलं. तो खेडूत तिथून निघून गेल्यावर ते आपल्या सहकाऱ्यांना म्हणाले, ''तुम्हांस लोकांच्या अडचणी सुकर करण्यासाठी पाठवलंय, त्यांच्यासाठी अडचणी निर्माण करण्यासाठी नव्हे.''

प्रेषितांनी त्या खेडुताची जशी काळजी घेतली, ते उघड होतं. तसेच त्यांनी आपल्या सहकाऱ्यांना निरक्षर ग्रामीण लोकांच्या असभ्य वागणुकीबाबत सहिष्णुतेचा व्यवहार करण्यास आणि त्यांच्याशी सभ्यतेनं वागण्यास सांगितलं.

# परधर्मियांशी सहिष्णुता

कुरआनमध्ये सर्वशक्तीमान अल्लाह म्हणतो,

''अल्लाहस सोडून ते ज्यांचा धावा करतात त्यांना अभद्र बोलू नका. त्यांना ज्ञान नसल्यानं ते अल्लाहची निंदा करतील.'' (कुरआन, ६:१०८)

प्रेषित मुहम्मद (त्यांना शांतता लाभो) यांच्या परधर्मियांशी सभ्य बोलण्याचा संदेश स्पष्टपणे व्यक्त होतो. त्यांनी नेहमी अशी ताकीद केली होती की इतर धर्माच्या देवी-देवता आणि त्यांच्या ग्रंथांची अवहेलना करू नये. त्यांनी असंही सांगितलं की परधर्माच्या देवी-देवतांना अपशब्द बोलू नये. उत्तरादाखल तेसुद्धा अल्लाहचं नाव दुष्ट पद्धतीनं घेतील.

एका ज्यू धर्मपंडिताच्या लक्षात आलं की युद्धात इतर सामानासहित त्यांचा पवित्र ग्रंथ काही तरूण मुस्लिमांच्या हाती लागलाय. त्या ज्यू धर्मपंडितानं मुहम्मद यांच्याकडं याबाबत तक्रार केली. प्रेषित अस्वस्थ झाले आणि त्या मुस्लिम युवकांना त्यांनी 'तौरह'ची एकन् एक प्रत परत करण्याचा आदेश दिला. याबाबत आपल्या अनुयायांच्या वतीनं दिलगिरी व्यक्त केली.

या गोष्टीवर भाष्य करताना डॉ. इस्त्रायल वेल्फेन्सन या प्रसिद्ध ज्यूधर्मिय संशोधकानं असं लिहलंय की प्रेषितांनी इतर धर्मग्रंथाचा जसा आदर केला, त्यावर या घटनेनं प्रकाश पडतो. त्यांच्या सहिष्णु व काळजीपूर्वक वर्तनाशी ज्यू धर्मिय प्रभावित होते. प्रेषितांनी त्यांच्या पवित्र धर्मग्रंथांचा कधी अपमान केला नव्हता, हे ते कधी विसरले नाहीत. रोमन राष्ट्रांनी इ. स. पूर्व ७० साली जेरुसेलमवर ताबा मिळवल्यानंतर त्यांचा पवित्र ग्रंथ कसा जाळला होता आणि त्याची पायमल्ली केली होती हे त्यांना माहीत होतं. धर्मवेड्या ख्रिस्तींनी स्पेनमधील ज्यू धर्मियांचा छळ करताना त्यांचे धर्मग्रंथ जाळून टाकले होते. इतर जेते आणि इस्लामच्या प्रेषित यांच्यामधील हा महत्त्वाचा फरक आहे.

☆

# धर्माची सक्ती नाही

कुरआनचं स्पष्ट निवेदन आहे,

''धर्माच्या बाबतीत सक्ती नको.'' (कुरआन, २:२५६)

लोकांना सरळमार्ग दाखवण्याची शिकवण दिली गेली होती, पण जोरजबरदस्ती करून किंवा दहशत निर्माण करून नव्हे तर सभ्यपणे आणि प्रेमाच्या मार्गानं. कुरआन म्हणतो,

> ''लोकांना आपल्या विधात्याकडं सामंजस्य आणि उत्तम शिकवणीद्वारे बोलवा आणि चांगल्या पद्धतीनं त्यांच्याशी चर्चा करा.'' (कुरआन, १६:१२५)

नव्या धर्माच्या श्रद्धेबाबत आणि इस्लाममध्ये प्रेषित येशू ख्रिस्तांचं काय स्थान आहे याची चर्चा करण्यासाठी नजरान (येमेन) मधील ख्रिस्ती धर्माच्या १४ माणसांच्या एका प्रतिनिधीमंडळानं प्रेषितांची भेट घेतली. प्रेषितांनी त्यांच्या प्रश्नांची उत्तरं दिली आणि इस्लाम व ख्रिश्चन या दोन्ही धर्मांचा परस्पर काय संबंध हेही सांगितलं. येशू ख्रिस्तांनी आणलेल्या संदेशापासूनच चालत आलेला इस्लाम धर्म आहे, पण त्यांनी ख्रिस्ती धर्मातील त्रिमूर्तींची संकल्पना स्पष्टपणे धुडकावून लावली.

मुहम्मद यांनी त्यांना एकमेव अल्लाहची उपासना करण्याचं निमंत्रण दिलं. धर्म म्हणून इस्लाम आणि शेवटचा ग्रंथ कुरआनचा स्वीकार करण्यास सांगितलं. मूसा आणि येशू ख्रिस्त यांच्याद्वारे मानवजातीसाठी जे ग्रंथ अवतरले

होते ते त्यांनी मान्य केल्याची पुष्टी होते. कुरआन त्याच एकेश्वरी परंपरेचा भाग आहे. (फक्त एकच ईश्वर असल्याची श्रद्धा.)

ख्रिस्ती प्रतिनिधींनी नव्या धर्माचा मजकूर ऐकून घेतला आणि त्यांनी आपला युक्तिवाद मांडला, तथापि त्यांनी प्रेषित मुहम्मद यांचा धर्म स्वीकारण्यास नकार दिला. तिथून निघण्यापूर्वी त्यांना मशिदीत प्रार्थना करायची होती. त्या वेळी उपस्थित मुस्लिम अनुयायींनी त्यांना विरोध दर्शविण्याचा विचार केला. पण प्रेषितांनी पुढं येऊन सांगितलं, ''त्यांना प्रार्थना करू द्या.'' ख्रिस्तींनी पूर्वेस तोंड करून मशिदीतच प्रार्थना केली. ख्रिस्ती प्रतिनिधींनी तिथून निघण्यापूर्वी प्रेषितांना आपले प्रतिनिधी त्यांच्याबरोबर राहण्यासाठी, त्यांच्या व्यवहारांची पाहणी करण्यासाठी पाठवून देण्याची विनंती केली. प्रेषितांनी ही जबाबदारी अबु उबैदा यांच्यावर टाकली.

ख्रिस्ती प्रतिनिधीमंडळ मायदेशी परतले. ख्रिस्ती लोक मदीनेत आले, नवा धर्म ऐकून घेतला, आपला युक्तिवाद मांडला, मशिदीत प्रार्थना केली आणि त्यांना कसला त्रास न होता ख्रिस्ती राहूनच परत गेले. प्रेषितांचे पहिले अनुयायी प्रेषितांचा हा व्यवहार विसरणार नव्हते. या घटनेपासून इस्लामला मुस्लिमांशी ज्या पद्धतीचा आदर हवाय ते समजून घेतलं. त्यांना तो सहिष्णुतेपलीकडं ऐकून घ्यायचाय आणि एकमेकांचा मोठेपणा समजून घ्यायचाय.

ख्रिस्ती अथवा इतर धर्मिय वा आध्यात्मिक परंपरांनुसार भेटण्याचं निमंत्रण, सहवास वगैरेंचा आधार तीन अटींवर आहे. इतरांना समजण्याचा प्रयत्न करणं, प्रामाणिक असणं, चर्चा व चिंतन करणं आणि आपल्याकडं सत्यता आहे याची जाणीव ठेवून नम्रता बाळगणं. प्रेषित मुहम्मद यांनी परधर्मियांशी जे संबंध जोडले होते यामागचा हाच संदेश आहे. ते ख्रिस्तींशी त्यांच्या श्रद्धेबाबत प्रश्न उपस्थित करण्यास मागंपुढं पाहिलं नाही. पण अंतिमत: त्यांचा व्यवहार ज्ञान, प्रामाणिकपणा व नम्रतेवर आधारित होता. हे आदर व्यक्त करण्याच्या तीन सिद्धान्त आहेत. ख्रिस्ती मुक्तपणानं निघून गेले. पण उभयतांमध्ये प्रेषितांच्या प्रतिनिधींद्वारे संभाषणाची सुरुवात झाली.

कुरआनचा आदेश- ''धर्माच्या बाबतीत सक्ती नाही.'' याच विविधतेच्या सन्मानाशी संबंधित आहे.

☆

# बहुधर्मवाद

बहुधर्मवादाबाबत कुरआनचा व्यावहारिक व वास्तववादी दृष्टिकोन अचंबित करणारा आहे. परधर्मांशी शत्रुत्वाची भूमिका न घेता कुरआन बहुधर्मवाद मान्य करून परधर्मांचा आदर करण्याची शिकवण देतो.

धार्मिक मतभेद असतात आणि यापुढेही ते राहणारच, हे सर्व धर्मियांनी ओळखायला हवं. त्यांनी आपले मतभेद बाजुला ठेवून एकमेकांशी सहकार करावा, असं कुरआनचं म्हणणं आहे. भलं करण्यासाठी समावेशक प्रसंग, मौलिक नैतिकता ज्यामुळे शांतता नांदेल यावर भर देतो.

> ''सांगा ग्रंथधारकांना आमच्या आणि तुमच्यामधील ज्या समान गोष्टी आहेत त्याकडं (जवळ) येऊ.''
>
> (कुरआन, ३:६४)

धार्मिक बहुवादाच्या या जगामध्ये धार्मिक एकोपा वाढवण्यासाठी कुरआनात अनेक ठिकाणी मार्गदर्शन करण्यात आलंय. पहिलं असं की श्रद्धावंत समुदायांनी टोकाची भूमिका घेऊ नये अशी कुरआनची इच्छा आहे.

> ''श्रद्धावंत लोकहो, आपला बचाव करण्यास सज्ज असा. वेळप्रसंगी वेगवेगळ्या तुकड्यांमध्ये निघा किंवा एकत्र येऊन निघा.'' (कुरआन, ४:१७१)

दुसरं–

> ''चांगल्या पद्धतीनं त्यांच्याशी चर्चा करा.''
> (कुरआन, १६:१२५)
>
> ''चांगलं तेच बोलावं.'' (कुरआन, १७:५३)
>
> तिसरं–
>
> ''अल्लाहस सोडून ते ज्यांचा धावा करतात त्यांना अभद्र बोलू नका.'' (कुरआन, ६:१०८)
>
> त्यांना सांगण्यात आलंय की त्यांनी कलह निर्माण करू नये किंवा कुरआनच्या शब्दांमध्ये,
>
> ''जे परम कृपावंताची आराधना करणारे आहेत ते धरतीवर नम्रतेनं वावरतात आणि अज्ञानी लोक वाद घातल्यास त्यांना सांगतात, तुम्हांस सलाम (शांतता).''
> (कुरआन, २५:६३)

एकमेकांशी भल्या पद्धतीनं वागणं आणि सभ्यपणानं बोलणं एवढंच पुरेसं नाही, विशेषकरून जेव्हा धर्माबाबत मूलभूत स्वरूपाचे मतभेद असतील, जेव्हा यामुळे भांडणं होतील, कुरआन श्रद्धावंतांना म्हणतो, ''जगा आणि जगू द्या. करार करा आणि पुढं चला.''

> ''सांगून टाका, हे नाकारणारे लोकहो! मी त्याची आराधना करत नाही ज्याची तुम्ही आराधना करता. ना तुम्ही त्याची भक्ती कराल ज्याची मी भक्ती करतो. मी त्याची आराधना करणार नाही ज्याची आराधना तुम्ही करीत आहात. (तसेच) तुम्ही त्याची आराधना करणार नाही ज्याची मी आराधना करतो. तुमच्यासाठी तुमचा धर्म, माझा धर्म माझ्याकरिता.''
> (कुरआन, १०९:१-६)

कुरआनचं सर्वोत्तम मार्गदर्शन म्हणजे सर्व धर्मांच्या श्रद्धावंतांना चोख उत्तर देणं की अल्लाहच फक्त सर्व काही जाणतो.

# १६

# खैबर

मदीनेच्या उत्तरेस १५० कि.मी. अंतरावर खैबर हे शहर ज्यू धर्मियांच्या प्रादेशिक शक्तीचं स्थान होतं. याचे किल्ले, इथल्या लोकांकडील शस्त्रास्त्रं आणि त्यांची श्रीमंती शत्रूच्या तुलनेत उत्तम दर्जाची असल्यानं मदीनेसहित त्यावर हल्ला करून जिंकण्याचा कुणी विचारही करत नसे. बनु कैनुका, बनु नजीर आणि बनु कुरैजा या कबिल्यांच्या सांगण्यावरून खैबरची नेतेमंडळी या भूभागात प्रेषितांच्या उपस्थितीशी शत्रुत्व बाळगत होते. आणि जेव्हा कधी संधी मिळेल मुस्लिम समुदाय आणि वैयक्तिकपणे मुस्लिमांना हानी पोचवण्यात ते चुकत नव्हते.

या नेत्यांनी मक्केच्या कुरैश आणि इस्लामविरोधी इतर टोळ्यांनी जसं गतफान व हवाजिन यांच्याकडं विशेष प्रतिनिधी पाठवून त्यांना अधिक सहाय्य पुरवलं आणि मदीनेवर हल्ला चढवण्यासाठी त्यांना तयार केलं. खंदकयुद्धाच्या वेळी त्यांनी गुप्त कारस्थान करून मदीनेच्या मुस्लिमांविरूद्ध जमवलं होतं. त्याचबरोबर त्यांनी प्रेषितांचा जीव घेण्याचाही प्रयत्न केला होता. याच कारणांनी हुदैबियाहून परत आल्यावर १५ दिवसांतच प्रेषितांनी सर्वप्रथम खैबरचा समाचार घेण्याचं ठरवलं. हुदैबियाच्या तहानंतर प्रेषितांना मक्केपासून शांतता मिळाली होती आणि मक्केच्या कुरैशांकडून मदीनेवर हल्ला करण्याची भीती नव्हती, म्हणून खैबरचं प्रकरण निकाली काढू शकत होते.

हे प्रकरण शांततापूर्ण मिटवण्यासाठी प्रेषित मुहम्मद यांनी वारंवार आपले प्रतिनिधी खैबरकडं पाठवले. पण ते सर्व निष्फळ ठरलं. परिणामी प्रेषित

मुहम्मद यांनी खैबरविरूद्ध मोहीम हाती घेण्याचा निर्णय घेतला, पण शत्रूला त्याची माहिती मिळू नये म्हणून त्यांनी याबाबत शेवटच्या क्षणापर्यंत गुप्तता पाळण्याचा निर्णय घेतला होता. खैबर आणि त्यांच्या घटकदलांकडं चौदा हजारांचं लष्कर होतं तर मुहम्मद यांनी केवळ चौदाशे माणसांना घेऊन जाण्याचं ठरवलं. ते यापेक्षा जास्त संघटित करू शकत होते तरी. त्यांनी एका वाटाड्याला बोलावून घेतलं ज्यास तिथल्या परिसराची माहिती होती आणि रात्रीच्या वेळी शहराजवळील खैबरच्या दोन किल्ल्यांच्या दरम्यान छावणी उभारली. अशा प्रकारे ते खैबरच्या आणि गतफान लोकांचे परस्परांतील संबंध तोडू शकत होते जेव्हा दिवस उजाडला, या दोन किल्ल्यांमधील रहिवाशी आश्चर्यचकित झाले आणि त्यांच्या सैन्यामध्ये भीतीचं वातावरण पसरलं. अनेक दिवस हा वेढा चालू राहिला. यादरम्यान मुहम्मद आणि त्यांच्या सैन्यानं माहिती गोळा केली ज्यामुळे शत्रूला शरणागती पत्करण्यास भाग पाडण्याची रणनीती आखण्यास मदत झाली. त्यांनी एकानंतर एक किल्ल्यावर आक्रमण करण्याचा निर्णय घेतला. याची सुरुवात ज्यावर सहज ताबा मिळवतायेईल त्यापासून केली. ही पद्धत फार उपयोगी ठरली. लवकरच तो किल्ला ताब्यात आला. व्यक्तिगत शरण येण्याच्या अटींवर चर्चा झाली, पण बऱ्याच लोकांना त्यांच्या मालकीच्या वस्तू सोडून स्त्रिया व मुलांना घेऊन तिथून निघून जाण्यास सांगण्यात आलं. कामुस नावाचा किल्ला चौदा दिवस प्रतिकार करत राहिला, पण शेवटी तो पाडण्यात आला, कारण मुस्लिमांच्या वेढ्यामुळे त्यांना जिंकण्याची कसलीच अपेक्षा नव्हती. आणि मग शेवटचे दोन किल्लेदेखील शरण आले, मात्र त्यांनी आपल्या शरणागतीसाठी काही अटींवर वाटाघाटी केल्या होत्या.

# विषप्रयोग आणि करार

प्रेषित मुहम्मद (त्यांना शांतता लाभो) यांनी तिथल्या रहिवाशांनी आपल्या उत्पन्नावर नियमितपणे मुस्लिमांना कर देत आपली शेती करावी आणि बागांची व्यवस्था करावी या अटीवर त्यांना तिथंच राहण्याची परवानगी दिली.

ज्यू लोकांनी सर्व अटी मान्य केल्या. प्रेषित मुहम्मद आणि त्यांच्या सहकाऱ्यांना हा प्रसंग साजरा करण्यासाठी निमंत्रण दिलं. प्रेषितांना मटणाचा एक तुकडा खावयास दिला. त्यांनी तो जिभेवर ठेवताच थुंकून टाकला. त्यांनी आपले अनुयायी बिशर यांना ते न खाण्याचा इशारा देण्याचा प्रयत्न केला. तोवर त्यांनी तो मटणाचा तुकडा खाऊन टाकला होता. ते सहकारी मरण पावले. ज्या स्त्रीनं ते मटण शिजवलं होतं तिला बोलावून घेतलं आणि त्या मटणात विष घातल्याचं तिनं मान्य केलं. असं तिला आश्वासन देण्यात आलं होतं की जर तो खाणारा एक राजा असेल तर ती त्याच्यापासून मुक्त होईल आणि जर तो प्रेषित असेल तर त्यांना याची माहिती होणारच हे पक्के होते. प्रेषितांनी प्रथम त्या स्त्रीच्या विश्वासघाताकडं दुर्लक्ष केलं. पण जेव्हा बिशर मरण पावले तेव्हा तिला मृत्युदंडाची शिक्षा दिली. मुस्लिम रागवले होते. करार मोडीत काढून युद्ध सुरू करण्याची ते मागणी करू लागले. मात्र प्रेषितांनी ज्यू लोकांना माफ करून टाकलं आणि कराराच्या अटींशी वचनबद्ध राहिले.

# सफिया यांनी अल्लाह आणि त्याच्या पैगंबरांना निवडलं

युद्धकैद्यांमध्ये ह्युयाय (बनु नजीर आणि बनु कुरैजा या ज्यू टोळ्यांचा म्होरक्या) यांची कन्या सफिया (अल्लाह त्यांच्याशी राजी होवो) होत्या. सफिया कोणत्याही अंगानं आपल्या पित्यासमान नव्हत्या आणि फार दिवसांपासून त्या प्रेषित मुहम्मद (त्यांना शांतता लाभो) यांचा धर्म समजून घेण्याच्या प्रयत्नात होत्या. त्या नेक होत्या आणि आपल्या लोकांप्रमाणे त्या प्रेषितांशी शत्रुत्व बाळगत नव्हत्या.

- प्रेषितांनी ती महिला आणि तिच्या आध्यात्मिकतेबाबत ऐकलं होतं. त्यांनी आपलं एक स्वप्नही त्यांना सांगितलं. ज्यामध्ये त्यांनी आपलं भाग्य मदीनेच्या मुस्लिमांसारखं पाहिलं होतं. मुहम्मद यांनी त्यांचं ऐकून घेऊन त्यांच्या पुढं एक पर्याय ठेवला. त्यांनी ज्यू राहूनच आपल्या लोकांमध्ये परत जावं किंवा मुस्लिम व्हावं. त्या आश्चर्यानं म्हणाल्या, ''मी अल्लाह आणि त्याच्या प्रेषिताची निवड करते.''

प्रेषितांनी त्यांचं स्वातंत्र्य त्यांना परत दिलं आणि महान जेत्याचं उदाहरण घेऊन, जे पराभूत झालेल्या राज्याच्या पत्नी व मुलीशी विवाह करत होते, त्यांनीही काही कालांतरानं त्यांच्याशी विवाह केला. ही प्रथा त्यांची शोकांतिका दूर करून त्यांचा सन्मान बहाल करण्यासाठी होती.

हिजरीनंतरच्या सातव्या वर्षी (इ. स. ६२८) एक नवीन टप्पा गाठला गेला. त्या सर्व किल्ल्यांना जिंकून प्रेषित मुहम्मद यांनी त्या प्रदेशातील आपल्या शेवटच्या शत्रूला निष्क्रिय करून टाकलं होतं. आता अरब द्वीपकल्पात सर्वत्र शांतता बहाल झाली होती आणि मुस्लिमांना उत्तरेकडून कोणतंही आक्रमण

होण्याची काही भीती नव्हती. विविध टोळ्यांमधील परसपर संबंध आणि वपार नियमित करण्यासाठी या करारांमुळे मुस्लिम समुदायास सुरक्षितपणे स्थायिक होण्याची शक्ती लाभली.

प्रेषितांच्या विवाहाचाही त्या परिस्थितीवर परिणाम झाला. त्यांच्या काही पत्नी ज्या कबिल्यांमधून आल्या होत्या त्या कबिल्यांशी मुहम्मद यांचे कौटुंबिक संबंध स्थापित झाले. ते स्वत:स त्यांच्या कुटुंबाचे स्वाभाविक घटक समजू लागले. आणि अशा प्रकारे मुस्लिम समुदायास आता कुठलाही धोका नव्हता की त्यांच्यावर कुणी हल्ला करणार होता. फक्त आठ वर्षांच्या कालावधीत तो समुदाय मदीनेच्या नव्या शहरात स्थिरावलाच नाही तर त्यास त्या भूभागामध्ये अद्वितीय स्थान आणि प्रतिष्ठा लाभली.

# उदार मनाची चिन्हे

यावेळी मक्केत दुष्काळ पडला, लोकांना त्याचा मोठा तडाखा बसला. या शहरात शेती होत नसल्यानं बाहेरून अन्नधान्य आयात केलं जात होतं. पण जे देश त्यांना अन्नधान्याचा पुरवठा करीत होते तेही दुष्काळानं प्रभावित झाले.

अरब द्वीपकल्पात नजदचं एकमेव असं क्षेत्र होतं जिथं दुष्काळाची परिस्थिती नव्हती आणि मक्केला अन्नधान्य पुरविण्याच्या स्थितीत होतं.

एकेदिवशी तीस सैनिकांचं एक पथक इब्ने मुस्लिम यांच्या नेतृत्वात गस्त घालत असताना एका माणसाला त्याच्या संशयास्पद हालचालीमुळे धरण्यात आलं, त्यास मदीनेत आणलं गेलं. तो नजद भागातला होता. प्रेषित मुहम्मद त्यास वैयक्तिकपणे जाणत होते. सुमामा नावाचा हा माणूस स्थलांतरापूर्वी मक्केसही येऊन गेला होता. नेहमीप्रमाणे प्रेषितांनी त्यास इस्लाम धर्म सांगितला, पण त्यानं प्रेषितांना जिवे मारण्याची धमकी दिली होती. तोच माणूस आता एक कैदी बनून त्यांच्या समक्ष आला होता.

प्रेषितांनी त्यास विचारलं, ''मूर्तीपूजेचा त्याग करून अल्लाहला शरण येण्याची वेळ नाही का आली?''

त्यानं उत्तरादाखल सांगितलं, ''मुहम्मद, तुम्ही मला ठार केलं तर तुम्ही एका मारेकऱ्याला ठार केल्यासारखं होईल आणि जर तुम्ही दया आणि करुणा दाखवली तर तुम्ही एका कृतज्ञ माणसावर दया केल्यासारखं असेल. तुम्हाला काही भौतिक खंडणी हवी असल्यास मला सांगा, मी देतो.''

त्याचं ऐकून प्रेषित शांत झाले.

त्याचे हे उद्‌गार विविध अर्थ व्यक्त करणारे होते. त्याचे हात रक्ताने माखलेले आहे आणि म्हणून त्यास मृत्युदंड दिला जावा, हाही अर्थ त्याच्या बोलण्यावरून लावला जाऊ शकत होता. त्यानं काही मुस्लिमांना ठार केलं असल्याची शक्यता होती. त्याचं बोलणं आटोपल्यावर त्याच्याशी 'कैदी पाहुणा' म्हणून व्यवहार करण्याचा प्रेषितांनी आदेश दिला, ज्यामुळे त्यास मशिदीत एका मुस्लिमाचं दैनंदिन जगण्याचा अनुभव करता यावा. दुसऱ्या दिवशीही असंच झालं आणि तिसऱ्या दिवशीही त्यानं तीच उत्तरं दिल्यावर प्रेषितांनी त्यास सोडून देण्याचा आदेश दिला आणि म्हणाले, ''सुमामा, तू आता स्वतंत्र आहेस. जिथं कुठं जायचंय जा.''

प्रेषितांनी हा जो दयेचा व्यवहार केला तो त्याच्या अपेक्षेविरूद्ध होता. प्रेषितांच्या या उदार भावनेचं त्याच्या मनावर खोल परिणाम झाला. तो मशिदीतून बाहेर एका लहान विहिरीजवळ गेला. परत प्रेषितांसमोर हजर होऊन ''मी साक्ष देतो, अल्लाहशिवाय कुणी ईश्वर नाही आणि याचीही साक्ष देतो की मुहम्मद त्याचे प्रेषित आहेत,'' अशी घोषणा केली. आणि पुढं त्यानं आणखीन एक उद्‌गार काढले, ''काही क्षणांआधी तुम्ही माझ्यासाठी या जगातला सर्वांत घृणित माणूस होता, पण आता मला जगातल्या सर्वांपेक्षा तुमच्यावर जास्त प्रेम आहे. तुमच्या धर्मापेक्षा वाईट माझ्या नजरेत कोणताच धर्म नव्हता, आता तो माझ्या सर्वांत जास्त आवडीचा आहे. मदीनेपेक्षा जास्त कोणतंच शहर दु:खाचं वाटत नसे आणि आता तेच सर्वाधिक आनंददायक आहे.''

सुमामाच्या इस्लाम स्वीकारण्यानं राजकीयदृष्ट्या नजदच्या भूभागात इस्लामप्रसाराची वाट मोकळी करून दिली.

नंतर त्यांची प्रेषितांशी जी चर्चा झाली त्यांनी नजदहून मक्केस होणाऱ्या अन्नधान्याचा पुरवठा खंडित करण्याचा मनोदय व्यक्त केला आणि एकही कण प्रेषितांच्या मंजुरीशिवाय निर्यात होऊ देणार नाही याची शपथ वाहिली. आधीच दुष्काळी परिस्थितीचा तडाखा बसलेल्या मक्केची स्थिती गंभीर झाली. मक्केच्या लोकांनी मदीनेस प्रतिनिधींना पाठवून प्रेषितांना अशी विनंती करण्यास भाग पाडलं की त्यांनी आपल्या देशबांधवांवर दया करावी जे

उपाशी मरत आहेत. प्रेषितांनी लगेच सुमामाला बोलवणं पाठवून त्यांना बंदी उठवण्यास सांगितलं.

> ''हा अल्लाह आहे जो सर्वांना पावतो, त्याचे शत्रू आहेत त्यांनाही. तुम्ही पाहिलं जे करत होता. (अन्नधान्याचा पुरवठा) ते सुरूच ठेवा, पण काही अधिकच पाठवा.''

इतकेच नव्हे तर प्रेषितांनी अबु सुफियानद्वारे सोन्याची पाचशे नाणी मक्केच्या गरीब लोकांमध्ये वाटण्यासाठी पाठवून दिली.

इस्लामचे कट्टर शत्रू अबु सुफियान संतापाने चिडले. इतिहासानं त्यांचा प्रतिसाद नोंदवून ठेवलाय, ''मुहम्मद आमच्या तरुणांची दिशाभूल करू इच्छितात.'' पण काही केल्या ती रक्कम परत पाठवण्याच्या स्थितीत ते नव्हते.

कुरैशांनी त्यांना त्यांच्या परिवारास आणि अनुयायींना इतका त्रास दिला होता आणि हानी पोहोचवली होती की त्याचं गांभीर्य आणि कठोरता व्यक्त करण्यास शब्द अपुरे पडतात. प्रेषित आणि त्यांच्या परिवारावर त्यांनी तीन वर्षं बहिष्कार टाकला होता. पण प्रेषितांना अशा अमानवी वर्तणुकीची परतफेड दुष्काळग्रस्त मक्कावासियांना सुमामाकडून अन्नधान्याचा पुरवठ्यासह केली आणि उपासमारीच्या तावडीतून त्यांची सुटका केली.

नंतर अशाच काही घटना घडत गेल्या त्याचा मक्कावासियांवर सामूहिक परिणाम असा झाला, प्रेषितांना एका शत्रूच्या नजरेनं न पाहता त्यांना त्यांचा गर्व वाटू लागला. त्याच्या व्यक्तिमत्त्वात त्यांना ते आपले बंधु दिसू लागले जे दिवसेंदिवस सामर्थ्य प्राप्त करत होते. त्यांना आपल्या संवेदना व्यक्त करण्याचं धाडस झालं नाही, पण ते प्रेषित आणि त्यांचा धर्म इस्लामकडं वळू लागले.

☆

# मनोरंजन आणि विश्रांती

एका माणसामध्ये ऊर्जा आणि नवचैतन्य निर्माण करण्यासाठी आणि कंटाळा घालवण्यासाठी मनोरंजन आणि विश्रांती अत्यावश्यक असतात आणि यासाठीच लोक खेळ आणि करमणुकीकडं वळतात.

प्रेषितांनी आपल्या अनुयायींना ठरवलेल्या सीमांचा विचार करून अशा करमणुकीच्या गोष्टींची परवानगी दिली होती, ज्या हानिकारक नसतील आणि स्वच्छ असतील. त्यांना आधी एकटं तर कधी आपल्या सोबत्यांसह बागेत जाणं आणि त्यांच्याशी विविध विषयांवर हितगुज करणं आवडत होतं. ते आपल्या सोबत्यांमध्ये काही वेळा पोहण्याच्या स्पर्धेचं आयोजन करीत असत. अशाच एका प्रसंगी अबु बक्र (अल्लाह त्यांच्याशी राजी होवो) त्यांच्या बरोबर होते. खूप काळानंतर जेव्हा पाऊस पडू लागला तेव्हा प्रेषित त्या पाण्यात वस्त्रे घालूनच भिजत राहिले.

ते धावण्याच्या शर्यतीत आणि तिरंदाजीतही भाग घेत असत आणि इतरांबरोबर जोरानं हसतही होते.

एकदा ईदच्या दिवशी त्यांच्या पत्नी आयशा (अल्लाह त्यांच्याशी राजी होवो) याच्या शेजारी दोन मुली बसून गात होत्या. अबु बक्र यांना याचा राग येऊन ते त्या मुलींवर रागवले. प्रेषित मध्ये आले आणि त्यांना गायन सुरूच ठेवण्यास सांगितलं. ते म्हणाले, ''अन्सार लोकांना संगीताची आवड आहे म्हणून वधूबरोबर एक गाणं म्हणणारी मुलगीही पाठवली जायची.''

काही वेळा प्रेषित आपल्या पत्नी आयशा यांशी धावण्याची शर्यत लावत असत. आयशा म्हणतात तेव्हा त्या प्रेषितांबरोबर एका प्रवासात होत्या, त्यांनी प्रेषितांबरोबर धावून त्यांना मात दिली होती. पण काही अंतरावर जेव्हा त्या काहीशा जाड झाल्या तेव्हा प्रेषितांनी त्यांना मात दिली होती.

# १७

# उमराह

## अल्पावधीची हजयात्रा

अल-हुदैबियाचा तह होऊन एक वर्ष लोटलं होतं आणि करारात म्हटल्याप्रमाणं मक्काभेटीच्या तयारीची वेळ आली होती. प्रेषित मुहम्मद (त्यांना शांतता लाभो) यांच्याबरोबर २००० लोक उमराह करण्याच्या उद्दिष्टानं (हजच्या दिवसांव्यतिरिक्त काबागृहाचं दर्शन) निघाले. त्यांच्यामध्ये मक्केहून आलेले एक गरीब गृहस्थ होते, जे अहले-सुफ्फा बरोबर स्थायिक झाले होते. गरीब आणि नम्र स्वभावाचे होते. प्रेषित त्यांना मांजराचे धनी म्हणून हाक देत असत, कारण त्यांना मांजरांचं वेड होतं. हेच ते अबु हुरैरा! त्यांनी उशिरा इस्लाम स्वीकारला होता. पण ते सर्वाधिक विश्वसनीय अशी प्रेषितांची वचनं (हदीस) सांगणारे झाले.

उमराहचे यात्रेकरू मक्केस जाऊन पवित्र स्थानी थांबले आणि त्या भागातून कुरैश लोक इतरत्र निघून जाण्याची वाट पाहू लागले; म्हणजे मुस्लिमांना मुक्तपणानं विधी पूर्ण करता यावेत. मुस्लिमांनी यात्रेसाठी पावन असलेली वस्त्रं परिधान केली होती. ते मक्केत दाखल होताना कुरैश लोक सभोवतालच्या टेकड्यांवरून त्यांना पाहू लागले. प्रेषितांनी काबागृहाच्या सात वेळा प्रदक्षिणा घातल्या आणि सफा व मरवा या टेकड्यांदरम्यान सात फेऱ्या पूर्ण केल्या. त्यानंतर आपल्या उंटाची कुर्बानी दिली आणि केशवपन केलं. इतर

यात्रीकरूंनीही हेच विधी पार पाडले. प्रेषितांना काबागृहात प्रवेश करायचा होता, पण करारात असं म्हटलं नव्हतं, म्हणून त्यांना प्रवेश नाकारला. प्रेषितांनी त्याचा विरोध केला नाही आणि आपल्या मुक्कामाच्या सर्व दिवसांत ते अल्लाहचं सदन (बैतुल्लाह) मध्येच थांबून राहिले.

माननीय बिलाल (अल्लाह त्यांच्याशी राजी होवो) मुस्लिमांना नमाजला बोलवण्यासाठी बैतुल्लाह (अल्लाहचं घर) मध्ये अजान देत होते. टेकड्यांवरून पाहणारे कुरैश लोक मुस्लिमांच्या धर्माचं साधेपण आणि वैभव पाहून प्रभावित झाले होते, याची त्यांनी नंतर कबुली दिली होती.

या प्रसंगी प्रेषितांचे चुलते अब्बास यांनी जाहीररित्या आपल्या इस्लामप्रवेशाची घोषणा केली.

# आंतरिक तेज

प्रेषित मुहम्मद (त्यांना शांतता लाभो) मदीनेत परत आल्यावर दैनंदिन जीवनाची पुन्हा सुरूवात झाली. तीन व्यक्ती अनपेक्षितपणे भेटण्यास येत असल्याचं त्यांनी ऐकलं. प्रवासात त्यांची भेट झाली होती. आता तेच भेटायला आले होते.

तलहापुत्र उस्मान, वलीदपुत्र खालिद आणि अल-आसपुत्र अम्र हे तिघेजण प्रेषित मुहम्मद यांना भेटून इस्लामप्रवेश करण्याकरिता आले होते, ज्यांच्याशी त्यांनी कित्येक वर्षं हिंसक आणि आक्रमक लढा दिला होता. त्यांच्या इस्लामप्रवेशानं प्रेषित आणि त्यांचे सहकारी आनंदित झाले. त्यांना या तिघांचं सामर्थ्य आणि सक्षमतेची कल्पना होती. अबु हुरैरा यांच्याप्रमाणंच त्या तिघांच्या इस्लामप्रवेशात बरंच काही शिकण्यासारखं होतं. इस्लामचे सर्वांत कट्टर शत्रू असलेल्या या लोकांची गत काळातील भूमिका त्यांनी अल्लाहचं एकत्व मान्य करताच केवळ विसरूनच टाकण्यात आली नाही तर त्यांचा प्रामाणिकपणा, नैतिक गुण आणि इस्लामी समुदायामध्ये भविष्यात त्यांचं स्थान काय असेल याचाही कुणी साधा विचारसुद्धा केला नाही.

प्रेषित मुहम्मद (स।) आणि त्यांच्या धर्माचं जवळपास वीस वर्षं शत्रुत्व केल्यानंतर त्यांनी अतिशय गांभीर्यानं इस्लामप्रवेश केला होता. इस्लामची श्रद्धा, त्याची तीव्रता आणि मनामध्ये बदल घडवण्याचं त्यांचं सामर्थ्य याचं मोजमाप काळानुरूप किंवा बुद्धिमत्तेच्या मापदंडावर केलं जाऊ शकत नाही. त्यांचा प्रामाणिकपणा व तीव्रता त्यांच्या स्वभावाची साक्ष देतात आणि म्हणूनच कालपरवा धर्मांतरित झालेली व्यक्ती दृढ व पूर्णत: आंतरिक तेज प्राप्त करू शकते, अशा व्यक्तीच्या तुलनेत ज्यास हे वर्षानुवर्षं धार्मिक शिकवणी आचरणात आणल्यावरही प्राप्त होत नाही. या विपरीतही तेवढंच सत्य आहे आणि म्हणूनच लोकांनी इतरांची मन:स्थिती तपासू नये.

# सीरियाचा लढा

काही महिन्यांनंतर आपल्या सहकारी कबिल्यांच्या दृढतेची आणि व्यापारासाठी सीरियाला जाण्यास मुस्लिमांच्या क्षमतेची खात्री करून घेण्यासाठी प्रेषित मुहम्मद (त्यांना शांतता लाभो) यांनी उत्तरेकडं आपले प्रतिनिधी पाठवून देण्याचा निर्णय घेतला. त्यांनी पंधरा माणसं पाठवली होती. यातले चौदाजणांची हत्या केली गेली. त्याच वेळी दुसरं एक प्रतिनिधीमंडळ बसराला पाठवलं गेलं. त्या सर्वांची हत्या गस्सान टोळीनं केली. सीरियाकडून धोका तीव्र होत चालला होता आणि शांतता-प्रतिनिधींची जी हत्या झाली त्याची भरपाई करायची होती. प्रतिनिधी आणि दूतांची हत्या करणं हा भयंकर गुन्हा समजला जात होता. याचा अर्थ युद्धाची घोषणा करणे असा होता. या बातमीनं प्रेषितांना धक्का पोहचवला होता. त्यांनी जैद बिन हारिस यांना सेनापती बनवून तीन हजार सैनिकांची फौज पाठवण्याचा निर्णय घेतला. जैद यांच्या नावाचं अनेक अनुयायींना आश्चर्य वाटलं. त्यांनी असंही म्हटलं की जैद मारले गेले तर आताच ॲबिसिनियाहून परतलेले जाफर त्यांच्या जागी नेतृत्व करतील आणि तेही मारले गेले तर त्यांची जागा रवाहापुत्र अब्दुल्लाह घेतील.

प्रेषितांच्या जीवनात सीरियाचं युद्ध सर्वांत महत्त्वाचं व भयंकर होतं. हे युद्ध हिजरतनंतर आठव्या वर्षी / इ. स. ६२९ मध्ये पॅलेस्टाईनलगत

सीरियाच्या सीमेवरील मुताह या गावी झालं.

मुस्लिम सैन्य सीरियाजवळ पोहचलं असता त्यांना कळून चुकलं की अरबांच्या इस्लामविरोधी अनेक टोळ्या एकत्र आल्या आहेत आणि त्यांना बायझन्टाईन (रोमन) च्या शाही फौजांचं सहाय्य मिळालंय. त्यांची संख्या आता एक लाख सैनिक इतकी झाली होती. मुस्लिम सैन्याची संख्या फक्त तीन हजार असल्यानं त्यांना काही वाव नव्हता. एकदाचं ते मुताहला पोचले, जिथला भूभाग अधिक योग्य होता. जैद यांनी आपल्या फौजांना ताबडतोब हल्ला करण्याचा आदेश दिला. या रणनीतीमुळे काही काळ शत्रूंमध्ये खळबळ उडाली, पण यामुळे मुस्लिमांच्या बाजूनं पारडं झुकलं नाही, कारण त्यांची संख्या विलक्षण कमी होती. जैद मारले गेले. नंतर जाफर आणि अब्दुल्लाह देखील मारले गेले. मुस्लिम फौजा विखुरल्या गेल्या. त्यातच खालिद यांनी धुरा सांभाळली. त्यांनी मुस्लिमांना एकत्रित करून त्यांना आपला बचाव करण्यास तयार केलं. मुस्लिमांनी आपली फक्त पाच माणसं गमावली होती, पण ते मागं फिरले. हा सरळ पराभव होता, मात्र खालिद यांनी युद्ध करण्याचं टाळलं, ज्याचा शेवट मुस्लिमांच्या सर्रास कत्तलीनं झाला असता.

# आपल्या जिवलगांसाठी रडणं

त्या वेळी मदीनेत जे अनुयायी थांबले होते, ते प्रेषित मुहम्मद (त्यांना शांतता लाभो) यांच्याबरोबर एका अनुभवातून गेले. प्रेषितांना दिव्य दृष्टी होत असते, त्यांना स्वप्नं पडतात आणि ते नेहमी सत्य ठरतात, हे त्यांना माहीत होते. ते प्रेषितांच्या मागं जात असत आणि कुरआनचा काही भाग प्रेषितांकडं अवतरित होतानाचा अनुभव घेत असत.

एके दिवशी प्रेषित मुहम्मद त्यांच्या जवळ आले. युद्धभूमीतून कुणी परतलं नव्हतं आणि या मोहिमेबाबत त्यांना कसलीही माहिती दिलेली नव्हती. प्रेषितांनी युद्धाचं वर्णन सुरू केलं, जणू ते लढाईत सहभागी झाले होते. डोळ्यांत अश्रु, भावनिक वेदनांनी जैद, जाफर व अब्दुल्लाह (अल्लाह त्यांच्याशी राजी होवो) यांच्या मृत्युची गोष्ट सांगितली. खालिद यांच्या शौर्याचा गौरव करीत त्यांना 'सैफ-अल-इस्लाम' (इस्लामची तलवार) चा किताब बहाल केला; पण मृत्युमुखी पडलेल्यांचा उल्लेख करताना ते आपले दु:ख लपवू शकले नाहीत.

प्रेषित मुहम्मद जाफर यांच्या पत्नी अस्मा आणि त्यांच्या मुलांकडं गेले. त्यांना जाफर यांची बातमी देऊन सांत्वन केलं. पण काही बोलण्याआधीच त्यांना रडू कोसळलं. प्रेषितांचं जाफर यांच्यावर आपल्या मुलासारखं प्रेम होतं आणि त्यांचं कुटुंब त्यांना प्रिय होतं. त्यांच्या घरातून निघताच जैद यांची सर्वांत धाकटी मुलगी आपल्या घरातून बाहेर आली आणि प्रेषितांकडं धावून गेली. तिला शांत करण्याचा ते प्रयत्न करत होते, पण त्यांच्या गालावरून अश्रु ढळत होते.

त्यांचे एक सहकारी सअद बिन उबादा तिथून जात होते. ते चित्र पाहून त्यांना आश्चर्य वाटलं. त्यांनी प्रेषितांना याचं कारण विचारलं. प्रेषितांनी उत्तर दिलं, *''हा असा कुणी आहे ज्यास आपल्या जिवलगांसाठी रडणं पसंत आहे.''* प्रेषितांनी आपल्या अनुयायींना स्नेह व मायाळूपणा व्यक्त करण्याची शिकवण दिली होती. त्यांना मानवांचा मायाळूपणा व अश्रुंच्या सन्मानाबाबत शिकवलं होतं.

खालिद यांच्या नेतृत्वात मुस्लिम सैन्य सीरियाहून परतलं आणि यामुळे प्रेषितांची दिव्यदृष्टी सिद्ध झाली. त्यांनी जसं सांगितलं होतं त्यानुसारच गोष्टी घडत गेल्या होत्या. तिन्ही अनुयायी लढत असतानाच कामी आले. या सकल समुदायासाठी मुहम्मद यांची दिव्यदृष्टी आणि त्यांचं ज्ञान त्यांच्या प्रेषित्वाचा अधिक पुरावा होता. ते अलौकिक व्यक्तिमत्त्व होते. त्यांची कृती लक्षणी होती. त्यांची बुद्धिमत्ता व सामंजस्य कुणाशीही जुळत नव्हतं. तरीदेखील ते विनम्र स्वभावाचे होते, हळवे आणि इतरांप्रमाणेच तेही रडत होते.

उत्तरेत परिस्थिती कठीण होती आणि मुताहमध्ये (सीरिया) मुस्लिमांच्या पराजयाचा फायदा घेण्याचा अरब टोळ्यांनी नक्कीच विचार केला असावा. मुस्लिमांना अशी गुप्त माहिती मिळाली की काही अरब टोळ्या मदीनेविरूद्ध एक मोहीम हाती घेण्याच्या तयारीत आहेत. अम्र यांच्या नेतृत्वात एक बळकट सैन्य पाठवून देण्याचा त्यांनी निर्णय घेतला. मुस्लिम फौजा सीरियाच्या इलाख्यात जाणयात यशस्वी झाल्या. पूर्वीच्या सहकाऱ्यांना संघटित केलं आणि नव्या आघाड्या स्थापन केल्या. यामुळे आतापर्यंत जे असुरक्षित होते त्यांना सुरक्षित करणं सोपं झालं.

## तह मोडला गेला

पूर्वी नमूद केल्याप्रमाणे हुदैबियाचा करार फक्त मदीनेचे लोक आणि कुरैश यांच्यापर्यंतच सीमित नसून तो त्यांच्या सर्व सहकारी टोळ्यांनाही लागू होता. खुजाआ प्रेषित मुहम्मद (त्यांना शांतता लाभो) यांच्या आघाडीत सामील होते आणि त्यांच्या मित्रपक्षांपैकी बनु कअफ यांची कुरैशांच्या मित्रपक्षातले बनु बक्र यांनी एका रात्री विश्वासघातानं हल्ला करून त्यांची हत्या केली. बनु कअफ यांनी ताबडतोब एक प्रतिनिधी पाठवून प्रेषितांना या विश्वासघाताची सूचना दिली. हा करारभंग होता आणि मुहम्मद यांनी या अपराधाची शिक्षा द्यायचं ठरवलं. त्यांनी आपले मित्रपक्ष खुजाआ यांना मदत करायलाच हवी होती.

कुरैशांना परिस्थितीचं गांभीर्य कळून चुकलं होतं. त्यांनी त्या एकाकी

कृत्याविरूद्ध प्रतिसाद देऊ नये हे समजावून देण्यासाठी मुहम्मद यांच्याकडं एका प्रभावी व्यक्तीस पाठवलं. करार झाल्यापासूनच कुरैश त्या करारातल्या अटी आणि त्यांच्या मर्यादा ओलांडत होते. इतर टोळ्यांना मुस्लिमांवर आक्रमण करून त्यांची शक्ती कमी करण्यास उद्युक्त करण्यास ते मागे-पुढे बघत नव्हते. पण या वेळी प्रकरण लांबलं होतं. आणि म्हणूनच प्रेषितांशी संवाद साधण्यासाठी दस्तुरखुद्द अबु सुफियान मदीनेस गेले. प्रेषितांनी प्रथम आपली कन्या, प्रेषितांच्या पत्नी उम्मे हबीबा यांचा पाठिंबा मिळवण्याचा प्रयत्न केला आणि नंतर अली यांचाही. पण त्यांना बोलणी करण्यास काही आधार मिळत नव्हता. तसेच अबु सुफियान यांना या स्थितीत काय करावं हे सुचत नव्हतं. प्रेषितांनी काही तडजोड करण्यास नकार दिला आणि अबु सुफियान रिकाम्या हातांनी मक्केला परतले. या घटनांमुळे शेवटी मक्का विजयाची खात्री झाली.

## मक्केचा विजय

यामागच्या आठवड्यांमध्ये प्रेषित मुहम्मद (त्यांना शांतता लाभो) यांनी आपल्या अनुयायींना एका मोहिमेची तयारी करण्यास सांगितलं, पण त्यांनी आपलं उद्दिष्ट गुप्त ठेवलं. फक्त मोजक्याच जवळच्या अनुयायींना काय घडणार याची कल्पना होती. अशा अफवा पसरल्या की सैन्य सीरियाकडं कूच करील किंवा ताईफच्या दिशेस जाईल अथवा हवाजिन यांचा सामना होईल. त्यामुळे साऱ्या अरब द्वीपकल्पात अनिश्चितता पसरली.

ही मोहीम रमजान महिन्यात निघाली आणि मुस्लिमांनी उपवास करावेत की करू नयेत हे ठरविण्यास प्रेषितांनी सांगितलं. मर्रज्जहरानपर्यंत पोहचेपर्यंत त्यांनी उपवास केला. तेथे छावणी उभारल्यावर त्यांनी मुस्लिमांना उपवास करू नयेत असे सांगितले. कारण त्यांना समस्त मुस्लिमांची शक्ती एकवटायची होती.

मर्रज्जहरानची छावणी दोन रस्त्यांना लागून होती. त्यांचा पुढचा टप्पा पूर्वेकडील नज्द किंवा ताईफ अथवा मक्का होऊ शकत होता. अब्बास मक्का

सोडून मदीनेस स्थायिक होण्यासाठी निघाले होते. मुस्लिमांच्या हालचाली ऐकून त्यांना येऊन मिळाले. छावणी पक्की केल्यावर प्रेषितांनी प्रत्येक सैनिकास शत्रूला प्रभावित करण्यासाठी आग पेटवण्यास सांगितलं. अशा तऱ्हेने एक हजार आगी पेटवण्यात आल्या. एक मोठं लष्कर येतंय असं भासविण्यासाठी हे सर्व केलं गेलं होतं. एका ठिकाणची आग म्हणजे तिथं ५-१० माणसांची गरज पूर्ण होऊ शकते.

कुरैश आणि इतर टोळ्यांना आक्रमण होण्यची भीती वाटत असल्यानं प्रेषितांचा हेतू काय हे जाणून घेण्यासाठी प्रतिनिधींना पाठवण्याचा निर्ण घेतला.

# अबु सुफियान

## सन्मानाचे इच्छुक

मक्केवर हल्ला करू नये हे पटवून देण्यासाठी पुन्हा एकदा अबु सुफियान इतर दोन व्यक्ती, हकीम आणि बुदयल यांना बरोबर घेऊन प्रेषित मुहम्मद (त्यांना शांतता लाभो) यांच्याकडं आले. बराच वेळ चर्चा केली, पण शेवटी त्यांना समजलं की प्रेषितांनी केलेला निश्चय अढळ आहे. त्यांनी अनुयायींचं निरीक्षण केलं. त्यांचं वागणं आणि या छावणीतील शांत वातावरण त्यांनी जवळून पाहिलं.

हकीम व बुदयल यांनी इस्लाम धर्मात प्रवेश घेण्याचा निर्णय घेतला. अबु सुफियान यांनी त्या (श्रद्धेच्या) घोषवाक्याचा पहिला भाग (अल्लाहशिवाय इतर कोणी ईश्वर नाही) मान्य करण्याची घोषणा केली; पण मुहम्मद यांच्या स्थितीबाबत त्यांना काही शंका होत्या. घोषवाक्याचा पुढचा भाग (मुहम्मद अल्लाहचे प्रेषित आहेत) उच्चारण्यासाठी त्यांना अधिक वेळ हवा होता. त्या रात्री ते छावणीतच राहिले. पहाटेच्या नमाजनंतर मुस्लिमांची प्रेषितांवरील निष्ठा आणि त्यांच्याशी असलेल्या सद्वर्तनाचं अगदी जवळून

निरीक्षण केल्यानंतर अब्बास यांच्या सल्ल्यानुसार श्रद्धेचं सबंध घोषवाक्य उच्चारण्याचा निर्णय घेतला.

हे हृदयपरिवर्तन दुबळं आहे हे प्रेषितांना ठाऊक होतं. अबु सुफियान यांनी मुस्लिम सैन्यांना त्यांच्या बाजूनं मार्गक्रमण करताना पाहावं यासाठी प्रेषितांनी अब्बास यांना त्यांच्या बरोबर जाण्यास सांगितलं. याचा हवा तोच परिणाम झाला. अबु सुफियान प्रचंड प्रभावित झाले होते. त्याआधी अब्बास यांनी प्रेषितांच्या कानात सांगितलं होतं, ''अबु सुफियान यांना सन्मानाची तीव्र इच्छा आहे हे विसरू नका.'' मुहम्मद बऱ्यापैकी मानसशास्त्रज्ञ होते. ते अब्बास यांचा सल्ला विसरले नाहीत आणि त्यांनी अशी घोषणा केली, ''जो कुणी अबु सुफियान यांच्या घरी शरण घेईल किंवा पवित्र काबागृहामध्ये किंवा आपल्या घरामध्येच राहील, त्याला भिण्याचं कारण नाही, त्याला माफ केलं जाईल.'' मुस्लिम सैन्य मक्केत दाखल होण्यापूर्वी अबु सुफियान घाईघाईनं मक्केस पोचले. (त्यांची पत्नी हिंद हिनं टोमणा देत अबु सुफियान यांना वेडा व भित्रा माणूस म्हटलं. अबु जहलचा मुलगा इक्रिमानंही त्यांचा अपमान केला.) त्यांनी प्रत्येकास शरण जाण्याचा सल्ला दिला आणि कुणीही प्रेषितांच्या विलक्षण सैन्याचा प्रतिकार करू नये, असं सांगितलं.

प्रेषितांनी अबु सुफियान यांना आपल्या बाजूनं केलं, फक्त त्यांनी इस्लाम स्वीकारला या कारणानंच नव्हे तर प्रेषितांनी त्यांचं चारित्र्य व व्यक्तिमत्त्वाचं निरीक्षण केलं होतं. अबु सुफियान यांनी अल्लाहस मान्य केलं; पण ज्या माणसाशी त्यांनी लढा दिला आणि ते त्यांच्या बरोबरीचे होते, अशा व्यक्तीला विशेष दर्जा देणं त्यांना कठीण जात होतं. प्रेषित मुहम्मद (स।) यांना हे समजलं होतं म्हणून त्यांनी घाई केली नाही, त्यांना स्वत:स समजण्यास वेळ दिला. अबु सुफियान यांनी इस्लाम धर्म स्वीकारल्यानंतरही त्यांना सत्ता व सन्मानाचं आकर्षण आहे. संघर्ष टाळण्यासाठी जेव्हा अबु सुफियान यांच्यासमोर मुस्लिम सैन्यशक्तीचं प्रदर्शन केलं आणि त्यांना विशेष प्रकारचा दर्जा बहाल केला तेव्हा प्रेषितांनी या सर्व पैलूंचा विचार केला होता.

प्रेषित मुहम्मद जरी साधारण सिद्धान्तांचा आग्रह करीत होते तरी ते काही विशेष गुणांचा विचार करीत असत. त्यांना सिद्धान्तांचा उपयोग करून

विशेष गुणांमध्ये सुधार करायचा होता. मात्र त्यांनी चारित्र्य, प्रेरिणा आणि ठराविक तत्त्वांकडं कधी दुर्लक्ष केलं नाही, ज्याद्वारे प्रत्येक माणसाचं व्यक्तिमत्त्व साकारलं जातं. न्यायाच्या बाबतीत सर्वांशी समानतेचा सिद्धान्त हा त्यांच्या संदेशाचा आग्रह होता.

१८

# वैभवशाली विजय

प्रेषित मुहम्मद (त्यांना शांतता लाभो) यांनी जानेवारी इ. स. ६३० म्हणजे हिजरीनंतर आठव्या वर्षी रमजानच्या दहा तारखेला मक्केवर विजय प्राप्त केला. यालाच 'फतह-ए-मुबीन' म्हणजे 'वैभवशाली विजय' असं संबोधलं गेलं. मदीनेचे ३००० आणि इतर अरब समुदायांचं ७००० असं १०००० सैन्य घेऊन प्रेषित मुहम्मद यांनी मक्केकडं कूच केलं. प्रेषितांनी आपल्या सैनिकांना तुकड्यांमध्ये विभागलं होतं. या तुकड्यांनी शहराभोवती रिंगण बनवून त्याच्या मध्यभागी एकत्र आले.

मक्केत प्रवेश करण्यासाठी जेव्हा सैन्य कडामधून कूच करत होतं तेव्हा प्रेषितांच्या सूचनेवरून अब्बास यांनी अबु सुफियान यांना इस्लामी सैन्याची शक्ती दाखवण्यासाठी सोयीस्कर जागेवर नेलं. एका टोळीनंतर दुसरी टोळी आपल्या सरदाराच्या नेतृत्वात जवळून जात असताना अबु सुफियान प्रत्येक तुकडीबाबत विचारत होते. जेव्हा सअद अबु सुफियानच्या बाजूनं जात होते कुरैशांनी केलेल्या अत्याचारांचा दीर्घकाळ इतिहास त्यांच्या डोळ्यांसमोर आला. ते मोठ्यानं उद्‌गारले, ''आजचा दिवस हा महान संघर्षाचा दिवस आहे. आज काबागृहाचं पावित्र्य आमच्यासाठी आहे.'' त्यांची आरोळी ऐकून रागानं प्रेषितांच्या चेहऱ्याचा रंग बदलला. ते भावनावश झाले. तीव्रतेनं त्यांचा विरोध करत त्यांच्याकडचा झेंडा घेण्याचा आदेश दिला आणि म्हणाले,

''आजचा दिवस काबागृहाच्या महानतेचा, भल्याचा आणि

औदार्याचा दिवस आहे.''

कुरैशांचे काही गट सुहैल, इक्रिमा व सफवानच्या नेतृत्वात टेकड्यांवर उभारले होते. पण पहिल्याच झुंजीत लढा देण्यात काही अर्थ नाही, हे त्यांना कळलं. सुहैलनं आपल्या घरी शरण घेतली तर इक्रिमा आणि सफवान पळून गेले.

प्रेषितांना त्या दिवशी युद्ध आणि लढा द्यायला नको वाटत होतं, ज्यास त्यांनी 'दयेचा दिवस' संबोधलं होतं.

आठ वर्षांपूर्वी प्रेषितांनी गुप्तपणे मात्र त्याच वेळी सन्मानपूर्वक मक्का शहर सोडलं होतं. आता भरदिवसा प्रेषित विजयी होऊन मक्केस परतले होते. पण या वेळी ते एकमेव ईश्वराचं आभार मानत नतमस्तक होत होते आणि पवित्र कुरआनातील अध्याय 'अल-फतह' (विजय) च्या आयतींचं पठण करत होते :

> ''निश्चितच आम्ही तुम्हांस विजय बहाल केला. उघड उघड विजय. तुमच्यापूर्वी घडून गेलेल्या उणिवांची माफी देण्यासाठी आणि नंतर ज्या घडल्या त्याही. आणि तुमच्यावर आपला अनुग्रह परिपूर्ण करण्यासाठी, तसंच तुम्हांस रास्त मार्गाचं दर्शन घडवण्यासाठी. अल्लाह तुमचं सहाय्य करील भारदस्त मदतीनं. तोच श्रद्धावंतांच्या मनांना समाधान देतो श्रद्धेत अधिक श्रद्धेची भर घालण्यासाठी. आकाश आणि सर्व पृथ्वीवरील लष्कर (सर्व शक्ती) अल्लाहचीच. अल्लाहच सर्वज्ञ आणि प्रतिभासंपन्न आहे.''
>
> (कुरआन, ४८:१-४)

उदंड नम्रता व्यक्त करीत प्रेषित मुहम्मद मक्केत दाखल झाले. त्यांना मुस्लिमांच्या पूर्वीच्या शत्रूंना प्रचंड दया दाखवायची होती. काही विश्रांती घेण्याआधी त्यांनी प्रार्थना केल्या. त्यानंतर ते आपल्या कसवा उंटिणीवर स्वार होऊन पवित्र काबागृहात गेले. तिथं सात वेळा प्रदक्षिणा घातल्या आणि मग आपल्या हातातल्या काठीनं तिथल्या मूर्ती हटवल्या. असं करताना ते कुरआनच्या खालील आयतींची (श्लोकांची) घोषणा करत होते :

> ''आणि सांगा, सत्य आलं आणि असत्य नामशेष झालं,
> खरंच असत्याचा नाश होणार होता.''
> (कुरआन, १७:८१)

काबागृहाच्या किल्ल्या प्रेषितांना आणून देण्यात आल्या होत्या. त्यांनी सर्व धार्मिक मूर्ती तिथून काढून टाकण्याची विनंती केली, जेणेकरून अल्लाहच्या सदनात, एकमेव अल्लाहची उपासना करण्याकरिता एकेश्वराचं मूलतत्त्व बहाल केलं जावं. ज्याच्यासारखा कुणी नाही आणि त्याचा भागीदार कुणी नाही.

> ''त्याची तुलना कशाशीच नाही, तोच ऐकतो आणि पाहतो.'' (कुरआन, ४२:११)

मक्का सोडल्यानंतर प्रेषित जे काही करत होते त्याच्या उलट त्यांनी मूर्तींना काढून केलेली ही कृती होती. त्यांनी मशीद (ज्यामध्ये मूर्ती नसतात) बांधून प्रार्थनेसाठी पवित्र जागा निश्चित केली. काबागृहाच्या आत आणि बाहेर ज्या मूर्ती होत्या त्यांना काढून शेकडो वर्षांच्या कालांतरानं सत्याच्या संदेशाचा जो विपर्यास केला गेला ते त्यांनी खोडून टाकलं. अशा या कृतीनं काबागृहास वस्तुत: मशिदीत बदललं. ज्यामध्ये फक्त एकमेव अल्लाहचीच आराधना होणार होती.

कुरैश लोक हळूहळू घराबाहेर येऊ लागले आणि काबागृहाच्या पवित्र स्थळी जमू लागले. काबागृहातील मूर्ती काढून टाकल्यानंतर प्रेषित मुहम्मद उद्‌गारले,

> ''तोच अल्लाह आहे दुसरा कुणी ईश्वर नाही, त्याचा कुणी भागीदार नाही. त्यानं आपलं वचन पूर्ण केलं. आपल्या भक्ताची साथ दिली आणि शत्रूटोळ्यांचा धुव्वा उडवला. त्या एकट्यानंच हे केलं.''

नंतर ते कुरैशांकडं वळले. त्यांना इस्लामच्या विधी सांगितल्या आणि खालील आयतींचं पठण केलं :

> ''लोकहो! अल्लाहनं तुम्हांस एक पुरुष आणि एका स्त्रीपासून

> जन्माला घातलं आणि तुमच्यात जमाती आणि टोळ्या बनवल्या, तुम्हांस ओळखता यावं म्हणून. पण अल्लाहपाशी तर तुमच्यापैकी प्रतिष्ठित तोच, जो सदाचारी असेल. अल्लाह सर्वज्ञ आणि सर्वपरिचित आहे.''
>
> (कुरआन, ४९:१३)

यानंतर त्यांनी त्यांना विचारलं, ''ते काय विचार करतात, मी त्यांच्याशी कसा व्यवहार करणार?'' ते उत्तरले, ''एका सभ्य बंधुप्रमाणं, एक सभ्य बधुचा पुत्र.'' ते त्यांच्याशी नक्कीच दयेनं वागणार होते. त्या प्रसंगी प्रेषितांनी कुरआनची एक आयत पठण केली. ज्यामध्ये यूसुफ (जोसेफ) जेव्हा आपल्या बंधुंशी येऊन मिळाले जे त्यांची हत्या करू इच्छित होते, याचं वर्णन आहे,

> ''(यूसुफ) म्हणाले, 'आज तुमच्यावर कसलाच आरोप नाही.' अल्लाह तुम्हाला क्षमा करो. कृपा करणाऱ्यांपैकी (एकमात्र) तो कृपावंत आहे.'' (कुरआन, १२:९२)

आणि मग त्यांनी घोषणा केली, ''जा! तुम्ही सर्व आज मुक्त झालात.'' तमाम स्त्री-पुरुषांना जे त्यांच्याकडं आले, त्या सर्वांना प्रेषितांनी क्षमा केली.

# दयेचा दिवस

प्रेषित मुहम्मद (त्यांना शांतता लाभो) विजयी होऊन मक्केत दाखल झाले त्या वेळी कोणता सोहळा साजरा केला नाही की ढोल-ताशे वाजवण्यात आले नाहीत अथवा फटाके उडवले नाहीत. मान खाली करून अल्लाहच्या आभाराप्रित्यर्थ प्रार्थना करीत, ''सर्वांनी माना खाली करून दाखल व्हायचंय.'' असा आदेश देत होते.

प्रेषित मुहम्मद यांनी बिलाल यांना काबागृहावर चढून मुस्लिमांना नमाजसाठी अजान देण्याची आज्ञा दिली. प्रेषितांनी नमाजचं नेतृत्व (इमाम) केलं आणि मग मक्केच्या लोकांना संबोधून गेल्या वीस वर्षांमध्ये त्यांनी प्रेषितांशी जसा व्यवहार केला होता त्याची आठवण करून दिली आणि आता त्यांच्या अपेक्षा काय आहेत, असं त्यांनी विचारलं. प्रेषितांची इच्छा असती तर त्यांनी सबंध मक्केच्या नागरिकांना तलवारीखाली आणलं असतं. ते त्याच लायकीचे होते. आता प्रेषितांकडं भारी सैन्यबळ होतं. त्यांनी मक्का जिंकून घेतलं होतं. त्यांनी कमीतकमी मक्कावासियांची मालमत्ता जप्त केली असती, कारण त्यांनी मुस्लिमांची मालमत्ता लुटली होती. त्या सर्वांना गुलाम बनवण्याचीही त्यांनी आज्ञा दिली असती. अशी आज्ञा देणं शक्य होतं आणि त्यांची अनुमतीही होती. मात्र अल्लाहच्या अंतिम प्रेषितांनी अशातलं काहीच केलं नाही. फक्त एकाच वाक्याचा उच्चार केला :

> ''आज तुमच्यावर कुठलाही आरोप नाही, कसली शिक्षा
> नाही, जा! तुम्ही सगळे स्वतंत्र आहात.''

त्यांनी ज्या औदार्याचं दर्शन घडवलं त्यामुळे त्यांचे हिंसक विरोधकदेखील आश्चर्यात पडले. अनेकांनी त्यांचा अपमान केला होता, त्यांच्याविरूद्ध लढले होते आणि त्यांच्या कुटुंबियांची हत्यादेखील केली होती. त्यांना प्रेषितांनी क्षमा करून टाकलं. त्यांच्यावर दया केली, त्यांना आश्रय दिला.

# अत्ताब

प्रेषित मुहम्मद (त्यांना शांतता लाभो) यांचे सहकारी माननीय बिलाल काबागृहाच्या छतावर चढले आणि अजान देऊन मुस्लिमांना प्रार्थनेसाठी बोलावलं. इस्लामचा कट्टर शत्रू असीदपुत्र उत्ताबनं अजानचा आवाज ऐकून आपल्या शेजारीच बसलेल्या अल-हारिस या मित्रास म्हणाला, ''जर त्याचे पिता जिवंत असते तर एका काळ्या गाढवानं काबागृहावरून आवाज करताना पाहून त्यांना त्रास झाला असता.''

काही क्षणांआधी बिलाल यांचा वाईट रितीनं उल्लेख करणारा अत्ताब प्रेषितांनी दया आणि माफीची घोषणा केलेली ऐकून खाली आला. प्रेषितांसमोर उभा राहिला आणि म्हणाला, ''मी अत्ताब बिन असीद. तुमच्या ओळखीचा शत्रू. मी घोषणा करतो की अल्लाहशिवाय इतर कोणी ईश्वर नाही आणि मुहम्मद त्याचे प्रेषित आहेत.'' सार्वजनिक माफीच्या घोषणाचा तत्काळ परिणाम झाला आणि अत्ताबनंच नव्हे तर मक्केच्या तमाम लोकांनी एकाच रात्रीत इस्लाम स्वीकारला.

प्रेषितांचा शत्रू अत्ताबनं इस्लाम स्वीकारल्यावर प्रेषितांनी मक्केच्या राज्यपालपदी त्याची नियुक्ती करून दररोज एक दिरहम पगार ठरवला.

# सफवान

मक्केचा सरदार आणि इस्लामचा प्राणघातक शत्रू ज्यानं प्रेषितांची हत्या करण्यासाठी उमेरला बक्षीस देण्याचं वचन देऊन पाठवलं होतं, तिथून तो जेद्दाहला पळून गेला आणि तिथून यमनला जाणार होता. उमेर प्रेषितांकडं आले आणि आपली बाजू मांडली, ''अल्लाहच्या प्रेषिता! सफवान आपल्या समूहाचा सरदार आहे आणि तुमच्या भीतीमुळे तो पळून गेला. तो समुद्रात उडी घेऊ शकतो.'' हे ऐकून प्रेषित म्हणाले, ''त्यास अभय दिलं.'' उमेर म्हणाले,

''अल्लाहच्या प्रेषिता! त्याला अभय दिल्याचा काही पुरावा मला द्या म्हणजे तो पाहून त्याचा माझ्यावर विश्वास बसेल.'' प्रेषितांनी त्यांना पगडी दिली. ती घेऊन ते सफवानकडं परत गेले. सफवान म्हणाला, ''परत जाण्यात मला जिवाचा धोका वाटतो.'' उमेर म्हणाले, ''तुला प्रेषितांचा नम्रपणा आणि क्षमाशीलता अजून माहीतच नाही.'' हे ऐकून तो प्रेषितांकडं गेला आणि म्हणाला, ''उमेर म्हणतात, तुम्ही मला अभय दिलं.'' प्रेषित म्हणाले, ''ते खरं आहे.'' सफवान म्हणाला, ''मला दोन महिन्यांची सवड (विचार करण्यासाठी) मिळावी.'' प्रेषित म्हणाले, ''दोन महिने नव्हे चार महिन्यांचा वेळ दिला.'' प्रेषितांनी त्यास इस्लाम स्वीकारण्यास दबाव आणला नव्हता. त्याला निरीक्षण करता यावं म्हणून वेळ दिला.

# हबर

इस्लामचा दुसरा जिवाचा वैरी हबर यानं प्रेषितांच्या कन्या जैनब यांना मोठा आघात पोहचविला होता. त्या वेळी त्या गर्भावस्थेत होत्या आणि मक्केहून मदीनेस जात होत्या. हबरनं जाणूनबुजून त्यांना उंटावरून खाली खेचलं. त्या गंभीर जखमी झाल्या आणि त्यांचा गर्भपात झाला. तो प्रेषितांच्या क्षमाशीलतेनं प्रभावित होऊन त्यांच्याकडं आला आणि म्हणू लागला, ''अल्लाहच्या प्रेषिता! मी पर्शियाला पळून जाणार होतो, पण मी तुमच्या क्षमाशीलतेनं भारावून गेलो. मी माझा अपराध आणि जहालपणा स्वीकारतो. आता मी इस्लाम स्वीकारण्यास आलोय.'' प्रेषितांनी त्यास माफ करून टाकलं. एकाकी दयाभावनांनी सारं काही पांघरून घेतलं.

# अबु सुफियान

बद्रच्या युद्धापासून अबु सुफियान यांची भूमिका लपलेली नव्हती. सर्व हत्या आणि लढायांची सुरुवात आणि त्यांची व्यवस्था अबु सुफियान (अल्लाह त्यांच्याशी राजी होवो) यांनीच केलेली होती. ते प्रेषित मुहम्मद (त्यांना शांतता लाभो) यांच्याविरूद्ध लढलेदेखील होते. पण विजयाच्या मुहूर्तावर अब्बास त्यांना घेऊन प्रेषितांकडं आले. प्रेषितांनी त्यांच्याशी प्रेम आणि कृपेचं वर्तन केलं. अबु सुफियान यांच्या मागील अपराधासाठी उमर त्यांची हत्या करू पाहत होते. मात्र प्रेषितांनी त्यांना मनाई केली. प्रेषितांनी अबु सुफियान यांना क्षमा केली, एवढंच नव्हे तर त्यांनी त्यांच्या घराला 'शांततेचं स्थान' घोषित केलं. ''जो कुणी अबु सुफियान यांच्या घरात प्रवेश करील तो सुरक्षित आहे, त्यांच्या अपराधांना माफ केलं गेलंय.''

# हिंद

हिंद अबु सुफियान यांची पत्नी होती. इस्लाम धर्माशी तिचं वैर इतकं तीव्र होतं की तिनं उहुदच्या युद्धात माननीय हमजा यांचं काळीज कापून चावून टाकलं होतं. ती प्रेषित मुहम्मद (त्यांना शांतता लाभो) यांच्यांसमोर आली, क्षमायाचना केली आणि इस्लामचा स्वीकार केला. प्रेषितांनी तिला माफ करून इस्लाम धर्मात प्रवेश दिला. नंतर ती घरी गेली आणि सर्व मूर्ती असे म्हणत फोडून टाकल्या की ''खरं तर तुम्हीच माझी दिशाभूल केली.''

# इक्रिमा

अबु जहलचा मुलगा इक्रिमानं आपल्या पित्याच्या पावलावर पाऊल टाकत इस्लामचा विरोध करण्यात कसलीही कसर सोडली नव्हती. मक्केत त्यांचा अंत जवळच दिसत असल्यानं तो यमनला पळून गेला. त्याची पत्नी उम्मे हकीम यांनी इस्लाम स्वीकारलेला होता. त्यांनी आपल्या पतीच्या वतीनं शरण देण्याची प्रेषित मुहम्मद (त्यांना शांतता लाभो) यांना विनंती केली. त्यांची विनंती मान्य झाली. त्यांनी आपल्या पतीला यमनहून परत आणलं आणि प्रेषितांकडं आल्या. इक्रिमाला आपल्याकडं येताना पाहत प्रेषितांनी अनुयायींना सांगितलं,

> ''अबु जहलचा मुलगा इक्रिमा तुमच्याकडं इस्लाम स्वीकारण्यास येतोय. त्याच्या पित्याचा अपमान करू नका, कारण मेलेल्याचा अपमान जीवंत असलेल्यांना इजा करतो, मेलेल्यांना पोहचत नाही.''

प्रेषित मुहम्मद आनंदानं ओतप्रोत झाले आणि इतक्या जलदगतीनं इक्रिमाजवळ गेले की त्यांच्या खांद्यावरली शॉल खाली पडली आणि म्हणाले, ''स्थलांतर करून जाणाऱ्या प्रवाशा! तुझ्या परतण्याचं स्वागत आहे.''

प्रेषितांनी अनुयायींना ही आठवण करून दिली की ''फक्त क्षमा करणंच पुरेसं नाही तर इतरांच्या चुकांसाठी कुणालाही दोषी धरता येत नाही, पित्याच्या मुलांनाही नाही.'' कुरआनच्या आयतीचा अर्थ असा :

> ''कुणी ओझं वाहणारा दुसऱ्याचं ओझं उचलत नसतो.''
>
> (कुरआन, १७:१५)

पवित्र कुरआननं आधीच ही घोषणा करून टाकली होती की जेव्हा छळ झालेले लोक (प्रेषित मुहम्मद आणि त्यांचे सहकारी) विजयी होतील ते मानवी सन्मान आणि आपल्या सदाचारानं सर्वांत उठून दिसतील.

> ''आम्ही ज्या लोकांना धरतीवर स्थापित करतो ते नमाज

> कायम करतात, जकात देतात, भलं ते करण्यास सांगतात आणि वाईट कर्मांस मनाई करतात. आणि सर्व प्रकरणांची परिणती अल्लाहकडंच आहे.'' (कुरआन, २२:४१)

प्रेषित मुहम्मद या सभ्यपणाचं बोलकं उदाहरण होते. त्यांना बदला घेण्यात रस नव्हता की धनसंपत्ती आणि सत्तेत त्यांना रुची होती. ते मक्केत नतमस्तक होऊन दाखल झाले. पवित्र काबागृहात प्रार्थना करीत नतमस्तक झाले. अल्लाहवरील आपली श्रद्धा आणि त्याचं आभार व्यक्त करण्यासाठी ते अनेकानेक आयतींचं पठण करीत राहिले आणि शेवटी त्यांनी मक्का शहरात शांतता स्थापित केली.

☆

# इस्लामच्या नेतृत्वासाठी हृदयांचं परिवर्तन

जेत्यांना निर्दयी होणं परवडू शकतं, पण प्रेषित मुहम्मद (त्यांना शांतता लाभो) यांनी वेगळेपण निवडलं. त्यांच्या अनुयायींना छळं गेलं. त्यांच्या जिवावर उठले. पराभूत झालेल्या शत्रुंशी ते मोठ्या मनानं वागले.

दोन दशकं कुरैशांनी प्रेषितांचा आणि त्यांच्या कार्याचा विरोध केला. प्रेषितांची थट्टा उडवली. त्यांच्या अनुयायींना छळं, त्यांचा जीव घेण्याचे प्रयत्न झाले. त्यांचे सहकारी आणि कुटुंबियांना बंदिस्त केलं गेलं. त्यांच्यावर तीन वर्षे सामाजिक बहिष्कार टाकण्यात आला. त्यांचा एकमेव गुन्हा म्हणजे त्यांनी मुहम्मद यांना आपला नेता मानलं आणि इस्लाम धर्मात गेले. कुरैशांनी इस्लामला उद्ध्वस्त करण्यासाठी त्यांनी कोणती युक्ती आणि कल्पना वाया जाऊ दिली नाही. मात्र तीन युद्धं आणि मक्केच्या पाडावानंतर ते पराभूत झाले. त्यांचं मनोबल खचून गेलं. त्यांच्या आणि मुस्लिमांविरूद्ध त्यांनी जे काही अतिरेक केले होते त्यांचा बदला घेण्याची पाळी मुहम्मद यांची होती, पण प्रेषितांनी त्यांना क्षमा करून टाकलं. त्यांना जी हानी पोचली होती त्याचा बदला घेण्याची त्यांची इच्छा नाही, असं घोषित करून टाकलं. ''ला तसरीब अलैकुमुल यौम'' (आज तुमचा बदला घेण्याचा दिवस नाही.) मुस्लिम लोक मक्का सोडून मदीनेस स्थलांतर केल्यानंतर कुरैशांनी मुस्लिमांची जी मालमत्ता हडप केली होती ती तशीच त्यांान राहू दिली. काबागृहाचे रीतसर कार्यवाहक या

नात्यानं त्यांची पारंपरिक पदं त्यांना पूर्वीप्रमाणंच राहू दिली.

मक्का जिंकल्यानंतर शांततेचं आणि क्षमादानाचं धोरण अवलंबून समंजसपणाचा व्यवहार केला. सौम्यपणानं आणि उदार मनानंच एका नव्यानं उदयास आलेलं इस्लामी राज्य शांततेचा लाभ मिळवू शकेल आणि त्यांच्या मनांची दारं परिवर्तनासाठी उघडतील. शिक्षा आणि बदला यामुळे त्यांचं एक वर्तुळ निर्माण होईल. त्यांनी हृदयपरिवर्तनाची कल्पना केलेली होती. हे फक्त सौम्यपणा अंगीकारून त्यांना पश्चात्ताप व्यक्त करण्याची संधी देण्यानंच शक्य होतं.

कुरैश लोकांना सर्वत्र ओळखलं जात असे. मक्केच्या कारभारात उच्चपदांवर ते विराजमान होते. त्यांचं बुद्धिकौशल्य उच्च दर्जाचं होतं आणि त्यांच्याकडं व्यावहारिक क्षमता, दरारा, शासन करण्याचा अनुभव, युक्तिवाद, मानसिक समज आणि त्याचबरोबर सार्वजनिक जीवनात त्यांचं श्रेष्ठत्व व महती सर्वांना मान्य होती. प्रेषितांना या वस्तुस्थितीची जाणीव होती. त्यांना इतिहासाच्या कचराकुंडीत फेकून देण्यापेक्षा सामाजिक सुधारणेच्या महत्कार्यात त्यांची वर्णी लावली जाऊ शकत होती. प्रेषितांना हेही माहीत होते की अरबांच्यात नेतृत्व करण्याची योग्यता होती आणि इस्लामचा ध्वज दुसऱ्या सभ्यतांमध्ये ते फडकवू शकतात. अज्ञानकाळातील व्यवस्था टिकून ठेवण्यासाठी ते वचनबद्ध होते, म्हणूनच कुरैशांनी शांततेनं युद्ध केलं होतं आणि जर त्यांचा आदर व सन्मान अबाधित राहिला तर इस्लामी कार्यासाठीही ते एकनिष्ठ राहतील. प्रेषितांना अशीदेखील खात्री होती की श्रद्धा आणि सदाचार इस्लामचा पायाभूत आधार असला तरी इस्लामचं नेतृत्व करण्यासाठी मानसिक सामर्थ्य, स्वत्वाची जाणीव, प्रभावीपणा, प्रशासनिक क्षमता आणि लोकांवर नियंत्रण करण्याचं कौशल्यही तितकेच आवश्यक आहे. शक्तीचा वापर करून त्यांना अपमानित केल्यास त्याचा काहीही उपयोग होणार नाही. एका विजयी सैन्याचे प्रमुख म्हणून मक्केत प्रवेश करतेवेळी त्यांना प्रेषितांनी ज्या नम्रतेचं दर्शन घडवलं त्यामुळे लोक त्यांच्याकडं त्यांचा क्रोध नव्हे तर त्यांचा उपकार प्राप्त करण्याच्या इच्छेनं विनंती करीत येतील.

हेच त्यांचं प्रचंड औदार्य आणि ज्यामुळे अरब द्वीपकल्पात अद्भूत भविष्यातील इस्लामी श्रद्धेचं प्रमाण ठरलं.

☆

# 'अल्लाह, मी निष्पाप आहे'

मक्केवर प्रचंड विजय प्राप्त केल्यानंतर १९ दिवस प्रेषित मुहम्मद (त्यांना शांतता लाभो) मक्केत राहिले आणि परिस्थिती स्थिर होत गेली. मदीनेस परत जाण्यापूर्वी त्यांनी इतर कबिल्यांशी त्यांची मैत्री अबाधित असल्याची खात्री करून घेण्यासाठी आणि ज्या लोकांनी इस्लाम स्वीकारला त्यांनी मूर्तीपूजेचा त्याग केला की नाही याची खात्री करून घेण्यासाठी त्यांनी मोहिमा राबविल्या. बनु जद्दिमाह या टोळीकडं खालिद यांच्या नेतृत्वात काही सैन्य पाठवलं. शेवटी ते शरण आले; पण ज्या कैद्यांबाबत राग होता त्यांना ठार न करण्याची अब्दुर्रहमान बिन औफ यांची सूचना खालिद (अल्लाह त्यांच्याशी राजी होवो) यांनी नाकारली. त्यांच्यातल्या काही कैद्यांना ठार केल्यावर ते थांबले. अब्दुर्रहमान यांनी त्यांच्याबाबत हे स्पष्ट केलं की खालिद यांच्या अशा वृत्तीमागं अल्लाह आणि न्याय यात विश्वास नसून इतर काही उद्दिष्ट आहे.

खालिद यांच्या अशा व्यवहारामुळं प्रेषित मुहम्मद कमालीचे रागावले. त्यांनी मारले गेलेल्या सर्व लोकांच्या हत्येची भरपाई करण्याचा निर्णय घेतला आणि जोरजोरानं बोलू लागले,

> ''अल्लाह, खालिद यांनी जे काही केलं त्यापासून मी निर्दोष आहे.''

प्रेषित मुहम्मद यांनी हे स्पष्ट करून दिलं की धर्माच्या नावानं जर

एखाद्या व्यक्तीनं, समूहानं किंवा एखाद्या राज्यानं मानवावर अत्याचार केले, निष्पाप लोकांची हत्या केली किंवा दहशतवाद माजविला आणि त्यास प्रेषितांशी जोडलं आणि अशी कृत्यं इस्लामसाठी घातक असतील तर त्यांचा इस्लामशी काहीएक संबंध नाही.

मदीना आणि मक्केतील मुस्लिमांचं हृदयपरिवर्तन आणि त्यांना विवेकाच्या शिकवणींनी परिपूर्ण करण्याचा मार्ग अजून बराच लांब होता. खोलवर रुजलेल्या सवयी आणि भावना सतत उफाळत होत्या आणि इस्लामी विचारसरणीविरूद्ध होत्या. मक्केतील लोकांच्या इस्लाममध्ये सामूहिक प्रवेशानंतर त्यांच्या धार्मिक प्रशिक्षणासाठी मोठ्या प्रयत्नांची गरज होती. प्रेषितांनी आपले सहकारी मआज बिन जबल (अल्लाह त्यांच्याशी राजी होवो) यांना ही जबाबदारी अग्रक्रमानं उचलण्यास सांगितलं. इस्लाममध्ये नव्यानं प्रवेश करणाऱ्या लोकांना नव्या धर्माचे सिद्धान्त शिकवायचे होते.

विविधतेत जी आजवर एकता कायम होती ती काही आर्थी सोपी होती, मात्र आता श्रद्धा, स्नेह आणि परस्पर आदर स्थापणे सहजसुलभ नव्हतं.

हा जीवनाच्या भौतिक मार्गक्रमणापलीकडं, मानसिक स्वभाव, विवेक याद्वारे महानतम संघर्षाचा प्रवास होता, जो लोकांना तीव्र भावनांच्या तणावापासून मुक्त करून त्यांना शांतता आणि आध्यात्मिकतेच्या दिशेनं घेऊन जाणार होता.

# १९

# हुनैन

प्रेषित मुहम्मद (त्यांना शांतता लाभो) यांना या वास्तविकतेचं भान होतं की त्यांना मुस्लिम समुदायाला अनेक धोक्यांचा सामना करावयाचा आहे. सर्वच कबिल्यांनी प्रेषितांच्या अधिकारास मान्यता दिलेली नव्हती. काही कबिले त्यांना उलथून टाकण्याच्या विचारात होते. सातत्यानं अशा अफवा पसरू लागले होते की मक्केच्या पूर्वेस हवाजिन टोळ्या आणि त्यांच्या मित्रपक्षांनी २० हजारपेक्षा अधिक सैन्यांची जमवाजमव केलीय. प्रेषितांनी आपले शिपाई पाठवले, त्यांनी या अफवांची पुष्टी केली. आता मुस्लिमांना ताबडतोब तयारीला लागायचं होतं. मदीनेतून आलेल्या तमाम मुस्लिमांना एकत्र केलं गेलं. यात कुरैशांचे दोन हजार सैन्य सामील झालं. (यातल्या अनेकांनी नुकताच इस्लाम स्वीकारला होता, तर इतर काही सुहैल व सफवान यांच्यासारखे इस्लाम न स्वीकारताच हुनैन युद्धात मुस्लिमांच्या बाजुनं लढले.)

हवाजिन आणि सकीफ अशा हिंसक टोळ्यांनीसुद्धा युद्धात उडी घेतली. मक्केपासून १६ कि.मी. अंतरावर हिजरतनंतर नवव्या वर्षी इ. स. ६३० मध्ये हुनैनचं निकराचं युद्ध झालं.

प्रेषित मुहम्मद यांनी आतापर्यंतच्या सर्वांत जास्त संख्येनं १६००० च्या सैन्याचं नेतृत्व करीत कूच केलं. अबु बक्र (अल्लाह त्यांच्याशी राजी होवो) यांच्यासारख्या काही लोकांनी आपली संख्या आणि निश्चयाच्या जोरावर हे युद्ध जिंकूच असा गर्व व्यक्त केला होता. यामुळे प्रेषित मुहम्मद नाराज झाले.

हवाजिन सैन्याचं नेतृत्व औफचा पुत्र तरुण योद्धा मलीक करत होता, त्यास या द्वीपकल्पात नावलौकिक प्राप्त होतं. शत्रूवर मोठ्या संख्येचा धाक बसवण्यासाठी त्यानं आपल्या सैन्यांना आपल्या मुलाबाळांनाही बरोबर आणायला सांगितलं. त्यानं घाटाच्या दोन्ही बाजुंना मोठ्या संख्येनं सैन्याच्या चौक्या बनवल्या होत्या. बाकीच्या फौजा अशा ठिकाणी उभ्या केल्या जिथून तळातून वर येणारं मुस्लिम सैन्य त्यांना लगेच पाहता येईल. पहाटेच्या वेळी मुस्लिम सैन्य पुढं येत असता मलीकनं आपल्या टेकडीवरील चौकीतल्या सैन्यांना दोन्ही बाजुंनी मुस्लिम सैन्यावर हल्ला करण्याचा आदेश दिला. ही विलक्षण आश्चर्यात टाकणारी घटना होती आणि खालिद याचा सामना करू शकले नाहीत. मुस्लिम सैन्य त्या अरुंद घाटात सापडले होते. त्यांनी बचाव करण्याच प्रयत्न केला, पण गोंधळून गेले.

काही अंतरावर खुल्या मैदानात असलेल्या मुहम्मद यांनी हा प्रकार पाहिला. त्यांनी लगेच आपल्या जवळच्या सहकाऱ्यांना एकत्र केलं आणि अब्बास यांच्या मदतीनं मुस्लिमांना बोलवण्यास सुरुवात केली. मुस्लिम सैन्य त्यांच्याकडं आलं आणि पलटवार करण्यासाठी संघटित झालं.

शत्रूसैन्यावर मुस्लिम अशा प्रकारे चालून गेले की मलीक, हवाजिन फौजा पूर्णपणे थक्क झाल्या. त्यांना मुस्लिमांकडून अशा अचानकपणे प्रतिकाराची अपेक्षा नव्हती.

मुस्लिम सैन्यामध्ये उम्मे सुलयम (अल्लाह त्यांच्याशी राजी होवो) नावाच्या एक महिला होत्या. त्यांनी आपल्या पतीबरोबर युद्धात भाग घेतला आणि इतरांसारखाच निर्धार दाखवला. आता त्यांच्या शत्रुंना माघार घेणं भाग होतं. ते पळून गेले आणि मुस्लिम सैन्य त्यांच्या मागावर गेले. हवाजिन सेनेचे सेनापती मलिक शेवटी ताईफ या शहरात बनी सकीफ यांच्याबरोबर शरण गेला आणि इतर सैन्य डोंगरांमध्ये जाऊन लपून बसले. त्यांची अनेक माणसं मारली गेली आणि अपमानजनक पराभव पत्करावा लागला. पवित्र कुरआनच्या नंतरच्या एका अवतरणाद्वारे मुस्लिमांना या लढाईतील वस्तुस्थितीच्या विविध भावना आणि आध्यात्मिक पैलूंचं स्मरण करून दिलं :

''अल्लाहनं कित्येक युद्धांत तुमची मदत केलीय. आणि

हुनैनच्या (युद्धाच्या) वेळी तुम्ही आपल्या मोठ्या संख्येनं गर्विष्ट झाला होता, पण ही संख्या तुमच्या काही उपयोगी पडली नाही, आणि विस्तृत अशी भूमी तुम्हास आवळून धरली आणि तुम्ही पाठ फिरवून माघार घेतली. मग अल्लाहनं समाधान प्रदान केली, आपल्या प्रेषताला आणि श्रद्धावंतांनादेखील आणि सैन्य धाडले जे तुम्हाला दिसले नाही आणि ज्या लोकांनी बंड माजवला होता त्यांना शिक्षा केली. बंडखोरांची हीच शिक्षा.''(कुरआन, ९:२५-२६)

# युद्धात हाती लागलेला माल

युद्धात हाती लागलेला माल, हवाजिनच्या ज्या स्त्रिया आणि मुलाबाळांना धरलं गेलं होतं. त्यांना एका प्रशस्त आवारात ठेवलं होतं. उन्हापासून त्यांचा बचाव केला गेला आणि प्रेषित मुहम्मद (त्यांना शांतता लाभो) परत येईपर्यंत त्याच्या खाण्या-पिण्याची सोय केली होती. परत आल्यावर त्यांनी त्या कैद्यांना तोकड्या वस्त्रांमध्ये पाहून युद्धात मिळालेल्या धनसंपत्तीमधून कपडे आणून प्रत्येक कैद्यास वस्त्रं देण्यात आली आणि नंतर युद्धात मिळालेली चांदीची ४०,००० नाणी, २४,००० उंट आणि ४०,००० शेळ्या वाटून घेतल्या. पण ६००० युद्धकैद्यांना परत पाठवलं नाही. हवाजिनचे लोक त्यांची मागणी करण्यास येतीलच असा त्यांचा विचार होता.

प्रेषितांनी वस्तुंची वाटणी सुरू केली. त्यांनी कुरैश लोकांना विशेष म्हणजे अबु सुफियान आणि हकीम (खदीजा यांचे भाचे) ज्यांनी आताच इस्लाममध्ये प्रवेश केला होता, यांनाही वाटा दिला. याचं अन्सार (मदीनेचे मुस्लिम) लोकांना आश्चर्य वाटलं. त्यांनी सुहैल आणि सफवानशीही असाच व्यवहार केला. या उभयतांनी हुनैनच्या युद्धात भाग घेतला होता, पण अजून इस्लाम स्वीकारण्याच्या मन:स्थितीत नव्हते. कुरआनच्या एका अवतरणाद्वारे प्रेषितांना आदेश दिला होता की ''ज्यांची दिलजमाई करायची आहे''

(कुरआन, ९:६०) अशासाठी युद्धलुटीतला काही भाग राखून ठेवावा.

हे धर्मांतर करण्याचं साधन नव्हतं तर काही मूर्त वस्तुंची भेट देऊन एका श्रद्धेस बळकट करायचं होतं, जी व्यक्त झाली असली तरी कमजोर होती. सुहैल आणि सफवान यांनी मुस्लिमांबरोबर लढाई केली होती. त्यांनी त्या दोघांना भल्यामोठ्या वस्तू दिल्या होत्या; पण त्यांनी इस्लाम स्वीकारावा असं त्यांचं मत नव्हतं. मक्का विजयाप्रसंगी मुहम्मद यांनी दाखवलेली क्षमाशीलता, युद्धामधील त्यांचं साहस व निश्चयी वृत्ती आणि युद्धानंतरचं त्यांचं औदार्य यामुळे त्यांना अशी खात्री पटली की ते वास्तवात प्रेषितच आहेत. अबु सुफियानच्या बाबतीत त्यांना माहीत होतं की त्यांना सामाजिक मान्यता आणि सन्मानाची किती आवड आहे आणि म्हणूनच प्रेषित मुहम्मद यांनी त्यांना ते बहाल केले.

## ‘वरचा हात खालच्या हातापेक्षा उत्तम’

हकीम यांना लुटीच्या मालातून आपला वाटा मिळाल्यानंतर त्यांना गर्व वाटला. हे स्वाभाविकच होतं. हकीमला मूर्त वस्तुंच्या भेटीमुळे इतर बाबींपेक्षा जास्त आनंद झाला. भेटवस्तू देताना प्रेषित मुहम्मद (त्यांना शांतता लाभो) यांनी आध्यात्मिक शिकवणही दिली. त्यांनी हकीम यांनीधनसंपत्तीचा गर्व न करण्याची शिकवणही दिली, ‘‘वरचा हात खालच्या हातापेक्षा उत्तम असतो.’’ प्रेषितांनी हकीमच्या लक्षात आणून दिलं की जे आपली धनसंपत्ती औदार्यानं खर्च करतात, गरिबांची काळजी घेतात, आपल्याकडील वस्तुंची भेट देतात; त्यांना जे फक्त मागत राहतात त्यांच्यापेक्षा आध्यात्मिक दृष्टीनं उच्च दर्जाची कायमस्वरूपी देणगी लाभते. त्यांनी हकीमला अशी सूचना दिली की आपल्या मालकीतील काही भाग आपल्या कुटुंबियांना आणि ज्या लोकांचा उदरनिर्वाह त्यांच्यावर अवलंबून आहे अशांना द्या. त्यांनी हकीमला अशी शिकवणदेखील दिली की त्यांनी सभ्यपणानं मिळवावं आणि नम्रपणानं लोकांना द्यावं.

# विश्वसनियतेची लक्षणं

शेवटी सारा माल मक्केच्या लोकांमध्ये वाटून झाल्यावर अन्सार लोकं प्रेषित मुहम्मद (त्यांना शांतता लाभो) यांना थक्क होऊन पाहू लागले. मदीनेच्या लोकांनी जेव्हा प्रेषितांना त्यांची गरज होती त्यांना सर्व काही मदत केली असतानादेखील प्रेषितांनी आपल्या नातलगांनाच श्रेष्ठत्व दिलं, असं वाटू लागल्यानं काही लोकांनी आपली नाराजी जाहीरपणे व्यक्त केली किंवा आपला विरोध दर्शविला. अन्सारींचे प्रतिनिधी या नात्यानं जेव्हा सअद त्यांच्याकडं आले आणि तक्रार मांडली तेव्हा प्रेषितांनी त्यांचं ऐकून घेतलं आणि मदीनेच्या मुस्लिमांना एकत्र आणण्यास सांगितलं. त्यांच्याशी बोलण्यासाठी प्रेषितांनी त्यांना परस्पर उपकारांची आठवण करून दिली. त्यांना मार्ग दाखवून प्रेषितांनी त्यांच्यावर उपकार केला तर मदीनेच्या लोकांनी त्यांना आश्रय दिला, याचे ते ऋणी आहेत. प्रेषितांनी सांगितलं, ''यातलं काहीच त्यांनी विसरलं नाही.'' आणि ते म्हणाले, ''युद्धात आलेल्या मालाची जशी वाटणी केली त्यापासून त्यांनी विचलित होऊ नये. काही लोकांच्या श्रद्धा वृद्धिंगत करण्यासाठी असं केलं गेलंय. त्यांच्यावरच्या प्रेमाची तुलना त्यांनी धनसंपत्तीशी करू नये. या जगातल्या वस्तुंवर त्यांच्या प्रेमानं त्यांना अल्लाहचं प्रेम विसरून जाण्यास भाग पाडले. कुरैश लोक उंट आणि शेळ्या घेऊन जात आहेत तर अन्सार प्रेषितांना आपल्या घरी नेणार आहेत. त्यांनीच मदीनेत स्थायिक होण्याचा निर्णय घेतला.'' प्रेषित मुहम्मद पुढं म्हणाले, ''जर सर्व लोकांनी एक वाट धरली आणि अन्सारनी दुसरी वाट धरली तर मी अनसार लोकांच्या वाटेनं जाणार. अल्लाह मदत पुरवणाऱ्या (अन्सार) लोकांवर दया करो. त्यांच्या मुलावर आणि त्यांच्या मुलांच्या मुलांवर.'' तिथल्या लोकांच्या भावना उत्कट झाल्या. अन्सारचे अनेक लोक रडू लागले. कारण प्रेषितांची भूमिका समजून घेण्यात आणि त्यांच्याशी निष्ठेची लक्षणं समजण्यास त्यांनी कशी चूक केली. त्यांची (प्रेषितांची) उपस्थिती त्यांच्या प्रेमाचं प्रतीक होतं आणि ज्या वस्तू त्यांनी वाटून दिल्या तो या गोष्टीचा पुरावा होता की काही लोकांची मन अजूनही जगाच्या मोहजालात अडकून आहेत.

☆

# भाकितं

निवाड्याच्या दिवसाचं अचूक भाकित वर्तवणं शक्य नाही. याची माहिती फक्त सर्वशक्तिशाली अल्लाहलाच आहे. तरीपण त्याच्या आगमनाविषयी विश्लेषण करून चिंतन केलं जाऊ शकते. वैज्ञानिक निरीक्षण, गणितशास्त्र आणि संशोधनाद्वारे त्याच्या येणं पाहू शकतात. आध्यात्मिक मंडळी आंतरदृष्टीनं त्यास पाहू शकते. पण साधारण माणसांचं काय? कसेतरी अल्लाहचं वचन त्यांनीसुद्धा साक्षात साकारताना पाहावं. प्रत्येकाची मदत व्हावी म्हणून अल्लाहच्या शेवटचे प्रेषित मुहम्मद (त्यांना शांतता लाभो) यांनी न्यायनिवाड्याचा दिवस जवळ येण्याविषयी जगात होऊ घालणाऱ्या घडामोडी स्पष्टपणे सांगितल्या आहेत. या सर्वसाधारण निरीक्षणाच्या गोष्टी आहेत आणि यासाठी एका वैज्ञानिकाची बुद्धिमत्ता किंवा आध्यात्मिक दृष्टीची गरज नाही. आपण सर्वजण सारखेपणानं त्यांना पाहू शकतो. महत्त्वाची बाब एकच की आम्ही त्यापासून कोणता बोध घेतो की आपला शेवट होईपर्यंत आपण डोळे मिटून ठेवतो.

आम्ही इथं प्रेषितांची काही वचनं (हदीस) देत आहोत ज्यामध्ये पृथ्वीचा शेवट होताना जगात कशा प्रकारच्या घडामोडी होत असतील, आपण जर जगात होत असलेल्या घटनांचं बारकाईनं विश्लेषण केलं तर हे दिसून येईल. जगाचा शेवट ही फार लांबवरची घटना नव्हे.

प्रेषित मुहम्मद याचे अत्यंत जवळचे सहकारी इब्ने अब्बास आणि अबु हुरैरा यांच्या वर्णनानुसार प्रेषितांनी शेवटच्या दिवसाची बातमी खालील शब्दांत दिली.

- माणसाचं रक्त कवडीमोल असेल.
- बंडखोर आणि कायदे मोडणारे नेते होतील.
- एका टोळीतली सर्वांत खोडकर व्यक्ती तिचा शासक होईल.
- समुदायात मोल नसलेला माणूस त्याचा नेता होईल.
- अपराधांकडं डोळेझाक केली जाईल.
- पाशवी पद्धतीनं लैंगिक वासना पूर्ण केल्या जातील.
- स्त्री-पुरुषांमध्ये समलैंगिक संबंध जोडले जातील.
- गाणाऱ्या मुली आणि तंतुवाद्यं (आधुनिक बारबाला आणि गिटार व पॉप संगीत) उदयास येतील.
- गायिकांची संख्या वाढत जाईल.
- उदंड मद्यपान होईल.
- व्याजखोरी भरमसाठ वाढेल.
- खोटं बोलणं सहजसाध्य होईल.
- असत्यापासून सत्याची ओळख करणं शक्य होणार नाही.
- मुलं आपल्या माता-पित्यांची अवज्ञा करतील.
- मित्र आपल्या मित्राशी वाईट रितीनं वागेल.
- प्रार्थने (नमाज) कडं दुर्लक्ष केलं जाईल.
- धार्मिक कारणांशिवाय इतर उद्दिष्टांसाठी शिक्षण घेतलं जाईल.
- पावसाचा उपयोग होणार नाही, बेमोसम पाऊस पडेल.
- भूकंपांची संख्या वाढत जाईल.
- उंचउंच इमारती बांधण्यात लोक एकमेकांशी स्पर्धा करतील.

• एका माणसाच्या वाईटपणामुळे लोक त्याचा आदर करतील.

प्रेषित मुहम्मद इशारा देत म्हणाले, त्या वेळी तुम्ही पाहाल की–

> ''हिंस्त्र वारं, भूकंप एकमेकांचं रूपांतर ढगफुटी आणि इतर अशाच प्रकारे दोर तुटल्यावर जसं एखाद्या माळेतील मणी एकामागून एक निसटून खाली पडू लागतील अशा घटना घडतील.''

अनस म्हणतात की प्रेषित मुहम्मद म्हणाले–

> ''शेवटचा दिवस जवळ यत असताना जगभर ज्ञानाला ऊत येईल आणि उदंड मद्यपान होईल.''

सध्या आपण पाहतो आहोत की भविष्यवाणी केलेल्या बऱ्याच घटना घडत आहेत. मद्यपान आणि व्यभिचार सर्रास होत आहे.

अब्दुल्लाह बिन सलाम यांनी प्रेषित मुहम्मद यांना अंतिम दिनाच्या पहिल्या लक्षणांबाबत विचारलं असता प्रेषित म्हणाले,

> ''अंतिम दिनाचा पहिला संकेत एका अग्नीसारखा आहे. तो पूर्वेतील लोकांना पश्चिमेकडं पिटाळून लावील.''

प्रेषित मुहम्मद यांच्या या वचनावर भाष्य करताना मुहम्मद असद (१९००-१९९२) (पूर्वश्रमीचे ऑस्ट्रेलियन ज्यू 'लिवपोल्ड वेस्स', ज्यांनी इस्लाम स्वीकारला), विसाव्या शतकातील पत्रकार, समाजसुधारक, राज्यशास्त्रज्ञ आणि संशोधक म्हणतात :

> ''सामाजिक अध:पतनाचं हे प्रतीकात्मक वर्णन आहे पौर्वात्य संस्कृतीला उद्ध्वस्त करील आणि पूर्वेकडील लोकांना पाश्चिमात्यांचं अंधानुकरण करण्यास भाग पाडील. याचं वर्णन अग्नीनं करण्याचा अर्थ अग्नीप्रमाणे पाश्चिमात्य संस्कृती पौर्वात्य लोकांची उरली सुरली संस्कृती गिळंकृत म्हणजेच भस्म करून टाकील आणि त्यांचा भूतकाळ सांप्रत काळापासून अलिप्त करून त्याच्या इतिहासाला मृत करून टाकील.''

अंतिम दिनाच्या येण्याची आणखी एक निशाणी प्रेषित मुहम्मद यांनी सांगितली ती अशी की अनपेक्षित आणि आकस्मिक मृत्यु सामान्य घटना होतील.

पवित्र कुरआन आणि प्रेषित मुहम्मद यांच्या वचनांचा अभ्यास केल्यास असं आढळून येतं की १५०० वर्षांपूर्वी जे सांगितलं गेलं, आम्ही यातली काही लक्षणं अनुभवत आहोत.

ही उच्च तंत्रज्ञानाची सभ्यता ज्यामध्ये सर्वत्र दहशतवाद, सामाजिक भेदाभेद, अशांतता, हत्या, व्यभिचार आणि मद्यपान इत्यादींनी सर्व सीमा ओलांडल्या आहेत. ती स्वत: आपल्याच नाशाला निमंत्रण देतेय.

या सगळ्यांचा अर्थ काय? हाही सावधानतेचा इशारा आहे. अंतिम दिन आता काही लांब नाही. शेवट जवळच आहे. जे विधीलिखित आहे त्याचं भान ठेवून कोण बोध घेणार आहे आणि स्वत:ला परलोकातील यातनांपासून सुरक्षित करणार आहे. आपण जे घडत आहे त्यात बदल करू शकत नाही, पण आम्हांस स्वत:ला बदलण्याचं स्वातंत्र्य नक्कीच आहे.

प्रेषित मुहम्मद म्हणाले,

''आम्ही जे काही करतो त्याचं परीक्षण त्या कृत्यामागील हेतुनुसार केलं जातं.''

आपण चांगला हेतु बाळगावा, कमीतकमी यासाठी तर आपण प्रयत्न करू शकतो.

# प्रेषित मुहम्मद यांचं एक वचन

खालिद (अल्लाह त्यांच्याशी राजी होवो) प्रेषित मुहम्मद (त्यांना शांतता लाभो) यांच्या एका वचनाचं (हदीसचं) वर्णन करतात :

एक खेडूत अरब एके दिवशी प्रेषितांकडं आला आणि म्हणाला, ''अल्लाहच्या प्रेषिता! मी या जगातल्या आणि परलोकातल्या जीवनाबाबत काही प्रश्न विचारण्यासाठी आलो आहे.'' प्रेषित म्हणाले,

*विचारा, तुम्हाला हवंय ते.*

मी सर्वांत जास्त शिकलेला माणूस बनू इच्छितो.

*अल्लाहची भीती बाळगा मग तुम्ही सर्वांत जास्त शिक्षित व्यक्ती बनाल.*

मला या जगात सर्वांत जास्त धनवान व्हायचंय.

*समाधानी व्हा. (जे काही लाभलंय त्यावर) म्हणजे तुम्ही सर्वांत श्रीमंत व्हाल.*

मी सर्वोत्तम न्यायी होऊ इच्छितो.

*इतरांसाठीही तेच निवडा जे तुम्हां स्वत:साठी हवं असेल. तुम्ही सर्वोत्तम न्यायी माणूस होऊ शकता.*

मला सर्वोत्तम माणूस व्हायचंय.

*इतरांचं भलं करा, तुम्ही सर्वोत्तम माणूस होऊ शकता.*

मला सर्वांत जास्त बलवान माणूस बनायचंय.

*जर तुम्ही अल्लाहवर विश्वास टाकाल तर तुम्ही सर्वांत बलवान माणूस झालात.*

मला वाटतं अल्लाहनं मला सर्वांत जास्त उपकृत करावं.

*अल्लाहच्या स्तुतीत मग्न व्हा, म्हणजे तुम्हांवर अल्लाहची कृपा होईल.*

मला माझी श्रद्धा परिपूर्ण करायचीय.

*जर तुमच्यामध्ये चांगले शिष्टाचार असतील तर तुमची श्रद्धा संपन्न होईल.*

जे काही चांगलं करतात, मला त्यांच्यापैकी व्हायचंय.

*अल्लाहची भक्ती अशा पद्धतीनं करा जणू तुम्ही त्यास पाहताहात. तुम्ही जरी त्यास पाहत नसाल तरी तो तुम्हांस पाहतोय. अशा प्रकारे जे भलं करतात त्यांच्यामध्ये तुम्हीपण सामील होऊ शकता.*

मी अल्लाहचा आज्ञाधारक होऊ इच्छितो.

*अल्लाहच्या आदेशाचं पालन केलं तर तुम्ही आज्ञाधारक बनू शकता.*

माझी तरतूद मोठ्या प्रमाणात व्हावी.

*तुम्ही स्वत:स पवित्र केलं तर अल्लाह तुमच्या तरतुदीत वाढ करील.*

अल्लाह आणि त्याच्या पैगंबरांनी माझ्यावर प्रेम करावं ही माझी इच्छा.

*अल्लाह आणि प्रेषितांचं ज्यावर प्रेम असेल त्याच्याशी तुम्हाला प्रेम असेल तर तुम्हीसुद्धा त्यांना प्रिय होऊ शकता.*

निवाड्याच्या दिवशी मी अल्लाहच्या प्रकोपापासून सुरक्षित होऊ इच्छितो.

*जर तुम्ही आपल्या जवळील मनुष्यप्राण्यावर रागवलं नाही तर तुम्हीसुद्धा निवाड्याच्या दिवशी अल्लाहच्या प्रकोपापासून सुरक्षित होऊ शकता.*

अल्लाहनं निवाड्याच्या दिवशी माझा अपमान करू नये ही माझी इच्छा.

*तुम्ही आपलं पावित्र्य जपलं तर अल्लाह निवाड्याच्या दिवशी तुमचा अपमान करणार नाही.*

अल्लाहनं निवाड्याच्या दिवशी मला सुरक्षाकवच पुरवावं ही माझी इच्छा.

*आपल्या जवळच्यांच्या चुकांना उघड करू नका, मग अल्लाह तुम्हाला निवाड्याच्या दिवशी सुरक्षाकवच प्रदान करील.*

अल्लाहच्या नजरेत सर्वोत्तम कर्म कोणते?

*शालीनता, विनयशीलता आणि संयम.*

अल्लाहच्या नजरेत सर्वांत वाईट गोष्टी कोणत्या?

रागावणं आणि लालसा.

# २०

# प्रेषितांचं मदीनेवरील प्रेम

दोन आठवडे मक्केत मुक्का केल्यानंतर प्रेषित मुहम्मद (त्यांना शांतता लाभो) यांनी मदीनेस परत जाण्याचा निर्णय घेतला. निघण्यापूर्वी त्यांनी उमराह (काबागृहाचं दर्शन) केलं. ते आश्रय घेण्यासाठी मदीनेस आले होते, पण आता तेच त्यांना घरासारखं वाटत होतं. तिथली संस्कृती आणि चालीरीती मक्केपेक्षा भिन्न असल्या तरीदेखील. त्यांना ते (मक्का शहर) सोडून जाणं भाग पडलं असलं तरी ते तिथं जवळपास ५० वर्ष राहिले होते. मदीनेच्या नवीन वातावरणात, तिथल्या रुढी परंपरा, चालीरीती, त्यांची मानसिक जडणघडण आणि त्यांच्या आकांक्षांचं निरीक्षण करत ते तिथं स्थायिक झाले होते, हळूहळू त्यांनी ते आत्मसात केलं, मदीनेच्या लोकांशी अत्यंत जवळीक साधली आणि ही जवळीक टोळी, जाती किंवा संस्कृतीबंधांपेक्षाही अधिक होती. दिनचर्या सुरू झाली. मुस्लिमांची संख्या सातत्यानं वाढत गेली. प्रेषित लोकांना शिकवण देऊ लागले आणि आपल्या निष्ठावंत सहकाऱ्यांना विविध कार्ये नेमून दिली.

आजुबाजूला विरोधी कारवाया सुरू होत्या त्यांचा बिमोड करण्यासाठी प्रेषित शिपायांच्या लहानलहान तुकड्या पाठवत असत. मदीनेच्या प्राबल्यास आव्हान देणाऱ्यांशी युद्ध करणं कधीकधी आवश्यक होत असे.

# हृदयांचं गुपित

प्रेषित मुहम्मद (त्यांना शांतता लाभो) यांनी मदीनेच्या उत्तरेकडील खेडूत टोळ्यांकडं– विशेषकरून बनु मुर्रा टोळीकडं जे फदकच्या रणद्वीप इथं शेती करणाऱ्या ज्यू शेतकऱ्यांवर आक्रमण करत होते– एक मोहीम पाठवली होती. फदक हे प्रेषितांच्या अंमलदारीत होतं. मुस्लिम शिपायांना प्रबळ सामना करावा लागला. ज्या ३० सैनिकांना पाठवलं होतं त्या सर्वांना मारण्यात आलं. प्रेषितांनी २०० सैनिकांची आणखीन एक फौज पाठवली. यात १७ वर्षीय उसामा (रजि.), जैद इब्ने हारिस यांच्या पुत्राचाही समावेश होता. जैद यांना प्रेषित आपला दत्तकपुत्र समजत होते.

ही लढाई बिकट झाली होती, कारण अनेक टोळ्या एकत्र आल्या होत्या. त्यांना मुस्लिम सैनिकांना पराभूत करून फदकवर ताबा मिळवायचा होता. परिस्थिती मुस्लिमांच्या बाजूनं फायद्याची झाली. बनु मुर्राच्या एका सदस्यानं उसामा आणि त्याच्या तरुण वयाची टिंगल केली. स्वत:वर नियंत्रण करण्यात यशस्वी न झाल्यानं उसामा तिथल्या तिथंच त्याच्याशी भिडले. कमजोर पडल्यानं तो खेडूत पळून जाऊ लागला. रागाच्या भरात उसामा यांनी त्याचा पाठलाग केला. त्या मोहिमेच्या नेत्याच्या सर्वांनी एकत्र राहण्याचा आदेशाकडं दुर्लक्ष करून उसामा यांनी त्या शत्रूला पकडलं. त्याला खाली पाडून जखमी केलं. त्या खेडुतानं ''मी साक्ष देतो, एकमेव अल्लाहशिवाय कोणी ईश्वर नाही'' (लाइलाहा इल्लल्लाह) असं जोरानं उद्‌गारला. पण उसामा यांनी त्याकडं लक्ष न देता त्याची हत्या केली. ते छावणीवर परत आल्यावर जेव्हा हा प्रकार सांगितला, मोहिमेच्या सेनापती आणि इतर सर्वांना त्याचा धक्का बसला आणि मग त्यांना आपल्या हातून गंभीर चूक झाल्याचं कळलं.

मदीनेस परतल्यावर उसामा लगेच प्रेषितांना भेटण्यासाठी गेले. विजय झाल्याचं कळल्यावर प्रेषितांनी त्यांचं स्वागत केल आणि आनंद व्यक्त केला. पण जेव्हा त्यांनी तो प्रकार सांगितला तेव्हा प्रेषितांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आणि विचारलं, ''त्यानं 'एकमेव अल्लाहशिवाय कुणी ईश्वर नाही' असं म्हटल्यावरदेखील तुम्ही त्याला मारून टाकलं?'' उसामा म्हणाले, ''त्याला

मारू नये यासाठीच फक्त त्यांनी या शब्दांचा उच्चार केला.'' प्रेषित रागानं म्हणाले, ''तो खोटं बोलतो की खरं हे तुम्ही त्याचं हृदय चिरून पाहिलं होतं?'' उसामा घाबरून गेले आणि त्यांची ही चूक माफ केली जाणार नाही याची त्यांना भीती वाटू लागली. प्रेषितांनी तरीदेखील त्यांना माफ करून टाकलं. लोकांशी आणि त्यांच्या हृदयातील गुपितांशी वागताना युद्ध असो की शांतता, कसं वर्तन करावं याची त्यांना शिकवण दिली.

खेडुतानं श्रद्धेची घोषणा केल्यावर उसामा यांनी त्याची हत्या करायला नको होती. जर तो गंभीर असता तर नक्कीच त्याला जीवदान दिलं असतं आणि तसा नसता तर त्याची घोषणा शांततेची आणि दयेची विनंतीवजा होती. अशा वेळी मुस्लिमांना पवित्र कुरआनात संयम आणि शांतता बाळगण्याचा आधीच आदेश दिला आहे :

> ''श्रद्धावंत लोकहो, तुम्ही अल्लाहच्या मार्गात निघाले असता चौकशी करून घ्या, कुणी तुम्हास 'सलाम' (अभिवादन) केला तर त्याला तू मुस्लिम नाहीस असं म्हणू नका. तुम्हाला या जगातली मालमत्ता हवी आहे. अल्लाहपाशी तर विपुल मालमत्ता आहे. आधी तुमची स्थितीदेखील तशीच होती. अल्लाहनं तुमच्यावर उपकार केले, तेव्हा चौकशी करत जा. निश्‍चितच तुम्ही जे काही करता त्या सर्वांची अल्लाहला माहिती आहे.''
>
> (कुरआन, ४:९४)

आपला मृत्यु समोर पाहून त्या खेडुतानं शांततेची विनंती केली होती, पण आपली अब्रू वाचविण्याचा निश्चय करून उसामा जुन्या टोळी-परंपरेकडं वळले. ज्याची इस्लामनंतर सुधारणा व्हायला हवी होती. आपल्या शत्रूच्या श्रद्धेच्या घोषणेमागं जे काही असेल, त्यांची कृती न्याय्य ठरवली जाऊ शकत नाही. उसामा यांनी वचन दिल की भविष्यात कधीही अशा प्रकारे वागणार नाहीत आणि यापुढं ते संयमानं आणि आदरानं वर्तन करतील. तीन वर्षांनंतर जेव्हा प्रेषित या जगाचा निरोप घेणार होते, युद्धाबाबतचे नियम आणि नैतिक शिकवणींची जबाबदारी त्यांनी उसामा यांच्यावर टाकली.

माणसांच्या मनामध्ये काय असतं हे माणसांच्या मर्यादित माहितीपलीकडचं एखाद्या व्यक्तीचा हेतू आणि त्याची भूमिका संशयास्पद वाटली तरी त्याच्याविषयी काही निर्णय घेण्याबाबत प्रेषित नेहमी सतर्क राहायचे. त्यांच्याभोवती जे दांभिक होते त्यांना प्रेषित चांगले ओळखून होते. पण त्यांच्याबाबत कधी कोणती कारवाई केली नाही. ते सतर्क राहायचे तर काही वेळा अडचणीतही यायचे, पण त्यांनी कधी टोकाचा निर्णय घेतला नव्हता.

## तबूक

उत्तरेकडून धोका असल्याच्या सूचना येत होत्या. हेराक्युलस बायझन्टाइन (रोमन) च्या फौजांनी मुस्लिमविरोधी अरब टोळ्यांशी संगनमत करून अरबांचे नवे अधिपती प्रेषित मुहम्मद (त्यांना शांतता लाभो) यांच्याविरूद्ध सर्वकष युद्ध करण्याच्या तयारीत आहे. तात्काळ कृती अनिवार्य होती. ही मोहीम इतकी धोकादायक होती की मुहम्मद यांनी पहिल्यांदाच तमाम सहकाऱ्यांना मोहिमेचे ठिकाण सांगितले. ते पूर्वेकडं कूच करणार होतं. म्हणजे शत्रूला त्यांच्या भूमीत बुचकळ्यात टाकण्यात यावं. वातावरण अनुकूल नव्हतं. उत्तरेत पोचताना त्यांना तीव्र उष्णतेचा सामना करायचा होता. प्रेषितांनी या मोहिमेवर येणारा खर्च भागविण्यासाठी जमेल तितका निधी देण्यास सांगितलं. उमर यांनी आपल्या मालमत्तेतून निम्मा भाग दिला तर अबु बक्र यांनी आपल्याकडं जे काही होतं ते सर्वच्या सर्व आणून दिलं. उस्मान यांनी निम्म्या सैनिकांना पुरतील एवढे उंट आणि घोडी दिली. त्या भागातील सर्व उंट आणि घोडी ताब्यात घेतली गेली. तरीदेखील सर्व सैनिकांना पुरतील एवढे ते नव्हते. म्हणूनच प्रेषितांनी काही सहकाऱ्यांना या मोहिमेत भाग घेण्यास नाकारलं. काही सहकारी या मोहिमेच्या गंभीरतेचा विचार करीत रडू लागले. शत्रूची अपेक्षित क्षमता इतकी प्रचंड होती की मुस्लिम समुदायाचे भवितव्य धोक्यात होते.

मदीनापासून ५०० कि.मी. च्या अंतरावर सीरियाकडं जाणाऱ्या मार्गावरील खडकाळ टेकड्यांकडं मुस्लिम लष्करानं कूच केलं. इ. स. ६३०

आणि हिजरतनंतरच्या नवव्या वर्षानंतरची ही घटना. या लष्करात ३०,००० मुस्लिम सैनिक होते. मुहम्मद यांच्या नेतृत्वातलं हे अरब द्वीपकल्पातील सर्वांत प्रबळ लष्कर होतं. रोम महासत्ता होती. त्यानं इस्लामी राज्याच्या सीमेलगत सुमारे एक लाख सैन्याची जमवाजमव केली होती. एका परकीय सत्तेविरूद्ध इस्लामी राज्याला आपल्या शक्तीचं प्रदर्शन करण्याचा हा पहिलाच प्रसंग होता. तरीदेखील रोमन सैन्यांच्या तुलनेत मुस्लिम सैन्याची संख्या नगण्यच होती. तथापि प्रेषित मुहम्मद यांच्या साहस आणि निश्चयाची शत्रूवर इतकी धाक बसली की त्यांनी रणक्षेत्रावर येऊन त्यांचा सामना करण्याचं धाडस केलं नाही. प्रेषित मुहम्मद यांच्या या साहसी आणि दृढ जोखिम घेण्याचा राजकीयदृष्ट्या फार मोठा फायदा झाला. शेजारी राष्ट्रांशी मैत्रीचे आणि राजकीय करार आणि इतर इस्लामच्या शत्रुंशी करार संपन्न झाले.

ही मोहीम वाया गेली नाही. मुस्लिम सैन्याची लक्षवेधी संख्येची सर्व अरब द्वीपकल्पावर छाप पडली. उत्तरेतील टोळ्यांना मुहम्मद यांची सैन्य उभं करण्याची क्षमता पटली. परिणामी प्रेषितांची प्रतिष्ठा वाढीस लागली आणि यमनच्या अनेक टोळ्यांनी मोठ्या संख्येनं प्रेषितांची भेट घेऊन इस्लाम स्वीकारला.

तबुकपासून प्रेषित मुहम्मद यांनी एका ख्रिस्ती व ज्यू धर्मिय टोळीशी करार केले. ते आपापल्या धर्माचं पालन करत होते. त्यांच्यावर कुणी आक्रमण करू नये यापासून त्यांची सुरक्षा करण्यासाठी त्यांनी मुस्लिमांना 'जिझिया कर' देण्याचं कबूल केलं. जिझिया, सैन्यांना दिला जाणारा असा सामूहिक कर होता ज्यान्वये इतर धर्मियांना मुस्लिम सैन्याबरोबर युद्धामध्ये भाग न घेण्याची परवानगी होती आणि त्याचबरोबर मुस्लिम अधिपतींवर जिझिया देणं कबूल केलेल्या इतर धार्मिक नागरिक / टोळ्यांना संरक्षण देणं आणि त्यांच्या जगण्याची सोय लावून देण्याची जबाबदारी येते.

इराक आणि सीरियाकडं जाणारा मार्ग सुरक्षित करण्यासाठी प्रेषित मुहम्मद यांनी खालिद यांना उत्तरेत लांबवर असलेल्या टोळ्यांशी करार करण्यासाठी पाठवलं. सारं काही यशस्वीपणे पार पाडल्यावर प्रेषित मुस्लिम सैन्यासह मदीनेस परतले.

# प्रतिनिधीमंडळ

हिजरतनंतरच्या नवव्या वर्षास 'प्रतिनिधीमंडळांचं वर्ष' म्हटलं जातं. मुस्लिम समुदायास आता इतकी मान्यता मिळाली की द्वीपकल्पातून सगळीकडून विविध टोळ्यांचे प्रतिनिधी मुस्लिमांशी करार-तह करण्यासाठी येऊ लागले. प्रेषित मुहम्मद (त्यांना शांतता लाभो) यांच्याकडं तह करण्यासाठी सर्वप्रथम बनु सकीफचे लोक आले. कारण हवाजिन टोळीचा प्रमुख मलीक (अल्लाह त्यांच्याशी राजी होवो) त्यांनी त्यांच्या शहराभोवती वेढा घातला होता आणि त्यांना आपल्या शेजारील टोळ्यांशी करार करणं शक्यच नव्हतं. (ज्यांच्या अधिकांश लोकांनी इस्लाम स्वीकारला होता किंवा प्रेषितांशी करार केलेले होते.) बनु सकीफ यांनी इस्लाम स्वीकारण्याची इच्छा व्यक्त केली, त्याचबरोबर श्रद्धेच्या बाबतीत काही अटींवर त्यांना चर्चा करायची होती. त्यांना आपलं उपास्य असलेल्या 'अल-लात'ची भक्ती चालू ठेवायची होती. प्रेषितांनी त्या दोन विषयांवर बोलण्यास नकारालं. इस्लाम स्वीकार करणं म्हणजे एकमेव अल्लाहचीच आराधना करणं, दुसऱ्या कशाची नव्हे. ती आराधना कुरआन आणि प्रेषितांनी ठरवून दिलेल्या विधींनुसार करणं. त्यांनी शेवटी कराराच्या अटी मान्य केल्या.

ख्रिस्ती आणि ज्यू टोळ्यांचेही प्रतिनिधी प्रेषित मुहम्मद यांच्याकडं आले, पण त्यांना इस्लाम स्वीकार करण्याची सक्ती केली नाही. उत्तरेतील इतर दोन टोळ्यांप्रमाणे त्यांच्याशी सहाय्यतेचा करार केला. त्यांना सामूहिक लष्करी कर (जिझिया) द्यावा लागायचा. प्रेषित मुहम्मद आणि त्यांचं सैन्य त्यांना सुरक्षा देतील. अशा प्रकारे सर्व द्वीपकल्पात हा स्पष्ट संदेश पोचला, ज्या टोळ्या इस्लाम स्वीकारतील त्यांनी दुसऱ्या कोणत्याही श्रद्धेची किंवा व्यवस्थेची कल्पना त्यागावी लागेल. इस्लामी श्रद्धा कबूल करण्याची घोषणा करताच मागील धर्माची स्थिती सोडली जावी आणि पूर्णपणे इस्लामचं आचरण करावं लागेल. म्हणजे नमाज अदा करणं, उपवास करणं, विशुद्धतेचा सामाजिक कर (जकात) आणि हजयात्रा यांची अंमलबजावणी करावी लागेल. पण जर टोळ्यांना आपल्या पूर्वीच्या सर्व परंपरांशी एकनिष्ठ राहायचं असेल तर एका

करारान्वये त्यांना सुरक्षा प्रदान करण्याचा कर म्हणजेच 'जिझिया' द्यावा लागेल. प्रेषितांना सर्व टोळ्या आणि कबिल्यांना या दोन्हींपैकी एक पर्याय निवडण्याचं स्वातंत्र्य दिलं. तबुकहून परत आल्यावर काही महिन्यांच्या आतच सर्वांनी हे मान्य केलं.

☆

# मानवाधिकारांबाबत प्रेषितांची संकल्पना

मानवाधिकारांच्या मूळ कल्पनेची जगाला पहिल्यांदा 'ब्रिटीश मॅग्ना कार्टा'पासूनच माहिती झाली असा डांगोरा नेहमीच पाश्चात्य मंडळी पिटत असते. मात्र त्यांनी सोयीस्कर हे विसरायला लावलंय की 'मॅग्ना कार्टा'च्या ६०० वर्षं अगोदर इस्लामचा उदय झाला होता.

वस्तुस्थिती अशी की प्रेषित मुहम्मद (त्यांना शांतता लाभो) यांनी रंग, वंश, कबिला, धर्म इत्यादी बाबींचा भेदाभेद न करता मानवाधिकारांची संपूर्ण कल्पना मांडली. त्यांनी कुरआनद्वारे हे सिद्ध केलं की एका व्यक्तीचा सन्मान तिच्या कर्मांवर केला जावा :

> "लोकहो! अल्लाहनं तुम्हांस एक पुरुष आणि एका स्त्रीपासून जन्माला घातलं आणि तुमच्यात जमाती आणि टोळ्या बनवल्या, तुम्हांस ओळखता यावं म्हणून. पण अल्लाहपाशी तर तुमच्यापैकी प्रतिष्ठित तोच, जो सदाचारी असेल. अल्लाह सर्वज्ञ आणि सर्वपरिचित आहे."
>
> (कुरआन, ४९:१३)

पवित्र कुरआनची ही आयत (श्लोक) सकल मानवजातीला संबोधित करते. ही केवळ मुस्लिमांपुरती मर्यादित नाही. ही मानवजातीच्या समतेवर भर देते. हे स्पष्ट करून सांगते की सर्व मानवजात एकाच माता-पित्याचे वंशज आहेत आणि त्यांच्यातले कबिले, टोळ्या, राष्ट्रे हे फक्त त्या त्या माणसांची

ओळख आणि अस्मिता होय. म्हणजे जगातल्या विविध ठिकाणच्या विविध लोकांची माहिती व्हावी.

मक्केजवळ अरफातच्या घाटीत आपल्या समारोपीय प्रवचनात इ. स. ६३२ मध्ये प्रेषित म्हणाले,

> ''मानवांनो! तुमचा ईश्वर एकच आणि तुमचा पिताही एकच. तुम्ही सर्व आदमची सन्तान आहात आणि आदम मातीपासून (निर्मिलेले) आहेत. लक्षात ठेवा कोणा अरबाला अरबेतरावर प्राधान्य नाही, किंवा एका अरबेतराला अरबावर प्राधान्य नाही. तसेच एका गौरवर्णीयास काळयावर्णीयावर प्राधान्य नाही, किंवा एका काळ्यावर्णीयास गौरवर्णीयावर प्राधान्य नाही. तुमच्यातला सर्वांत नेक तोच सर्वोत्तम.''

मानवजातीची जैविक एकता एक वास्तव आहे, ज्याविषयी प्रेषित मुहम्मद यांनी सांगितले,

> *''अल्लाह! मी साक्ष देतो, सारे मानव एकमेकांचे बांधव आहेत.''*

प्रेषित मुहम्मद यांच्या जीवनात आम्हाला या एकतेचं दर्शन आढळतं. एकदा प्रेषित आपल्या सहकाऱ्यांबरोबर होते त्या वेळी जवळून एक प्रेतयात्रा जात होती. प्रेषित मयताच्या आदरार्थ उभं राहिले. मुस्लिमांना याचं आश्चर्य वाटलं. ते म्हणाले, ''ही तर ज्यू धर्मिय प्रेतयात्रा आहे.'' प्रेषितांनी त्यांना स्पष्ट व आदरपूर्वक विचारलं,

> *''तो एक मानवी आत्मा नव्हता?''*

इस्लामनं मानवी जीवनास इतकं प्रचंड महत्त्व दिलंय. कुरआनचा आदेश आहे,

> ''जर कुणी एखाद्या व्यक्तीचा वध केला आणि तो दुसऱ्या व्यक्तीच्या खुनाच्या बदल्यात अथवा भूमीत उपद्रव माजवण्यासाठी नसेल तर त्यानं जणू सर्व मानवजातीची

हत्या केली. आणि जर कुणी एखाद्याचा जीव वाचवला तर त्यानं जणू साऱ्या लोकांचे प्राण वाचवले.''

(कुरआन, ५:३२)

प्रेषित मुहम्मद यांनी जोर देऊन ही गोष्ट सांगितली की,

''जर कुणी इस्लामी राज्यातल्या एका मुस्लिमेतर नागरिकावर अत्याचार करत असेल तर, मी निवाड्याच्या दिवशी त्या मुस्लिमेतराच्या बाजुनं उभा राहीन.''

☆

# कुरआन आणि मानवसन्मान

पवित्र कुरआनात कुणी 'मधली मंडळी' नाही. प्रत्येक व्यक्तीचं अल्लाहशी रास्त नातं असून आपल्या कर्मांची जबाबदारी तिच्यावरच आहे. हा कुरआनचा मूळ सिद्धान्त आहे.

> "प्रत्येक आत्मा आपल्या कर्मासाठी जबाबदार आहे. कुणी दुसऱ्याचं ओझं उचलणार नाही." (कुरआन, ३५:१८)

तथापि अल्लाहची अमर्याद कृपा आणि त्याच्या दयेनं आम्ही इतरांच्या क्षमेसाठी प्रार्थना करू शकतो. मात्र आपणसर्वजण एका व्यक्ती, एका समुदायाच्या नात्यानं आमचे काही अधिकार आहेत, तसेच जबाबदाऱ्यादेखील आहेत.

कुरआनातली मानवाधिकारांची कल्पना मानवाच्या सन्मानावर आधारित आहे. कुरआन मानवाच्या सन्मानाची रास्त आणि अविवादित पुष्टी करतो,

> "आम्ही आदमच्या संततीला खऱ्या अर्थानं सन्मान दिला, त्यांना धरती व सागरावर वाहतुकीची साधनं दिलीत आणि पाक वस्तू त्यांच्या उपजीविकेसाठी दिलीत आणि आम्ही त्यांना आपल्या कित्येक निर्मितीवर श्रेष्ठत्व दिले."
>
> (कुरआन, १७:७०)

हा सन्मान कमावलेला नव्हे, सद्‌वर्तनावर आधारलेला आहे. हा जन्मजात असून ईश्वराची स्वाभाविक देणगी होय. अल्लाहनं दिलेला प्रत्येकाचा हक्काधिकार आहे, मग तो कुणीही असो सदाचारी की पापी, त्याचा वंश, रंग, जात आणि राष्ट्रीयत्व कोणतं का असेना!

मानवतेच्या सन्मानाची कल्पना न्याय आणि समतेविषयीच्या कुरआनच्या भूमिकेशी स्पष्टपणे समान आहे.

> ''श्रद्धावंत लोकहो, अल्लाहच्या बाजूनं न्यायाची साक्ष देण्यास उभं राहा. एखाद्या जनसमूहाचं शत्रुत्व तुम्हाला त्याच्याशी अन्याय करण्यास प्रवृत्त करता कामा नये.''
>
> (कुरआन, ५:८)

इ. स. १९४८ मध्ये मानवाधिकारांच्या सार्वत्रिक घोषणा, कुरआनातल्या सर्वप्रथम मानवाधिकाराच्या कल्पनेची पुनरावृत्ती आहे. म्हणजे सर्व मानवजाती स्वतंत्र असून त्यांचे सन्मान व अधिकार सारखेच आहेत. त्यांना सामंजस्य व विवेक लाभलाय. त्यांनी एकमेकांशी बंधुभावाचं वर्तन करावं.

कुरआनमध्ये मानवाधिकांबाबतचे अनेक करारांविषयीचे सिद्धान्त मिळू शकतात. उदाहरणार्थ, कुरआनातील अध्याय १७, आयत क्रमांक ३३ प्रमाणे,

*''कुणाच्याही जिवाची, ज्यास अल्लाहनं आदरणीय ठरवलंय, हत्या करू नका.''* याचा अर्थ असा की 'सर्वांनाच जीवनाचा अधिकार आहे, स्वातंत्र्य आणि आपल्या सुरक्षेचा अधिकार आहे.' (मानवाधिकार कलम ३)

*''लोकांमध्ये न्यायनिवाडा करताना न्यायपूर्ण करा.''* (कुरआन, ४:५८) याचा अर्थ असा की 'सर्वांना कायद्यासमोर एक मनुष्य म्हणून मानण्याचा अधिकार आहे. कायद्यासमोर सर्व समान आहेत आणि कोणताही भेदभाव न करता सर्वांना कायद्याचं संरक्षण आहे.' (मानवाधिकार कलम ६ व ७)

*''एकमेकांची संपत्ती अवैध मार्गांनी खाऊ नका.''* (कुरआन, २:१८८) याचं निरुपण असं केलं जाऊ शकते की 'प्रत्येकास संपत्तीचा

अधिकार आहे आणि कुणालाही त्याच्या धनसंपत्तीपासून वाटेल त्याप्रमाणे वंचित केलं जाऊ शकत नाही.' (मानवाधिकार कलम १७)

पवित्र कुरआनातील शिकवण : *''एकमेकांची टिंगल करू नका, एकमेकांना वाईट नावांनी हाक मारू नका, एकमेकांच्या पाठीमागं बोलू नका.''* (कुरआन, ४९:११-१२) *''एकमेकांविषयी हेरगिरी करू नका.''* (कुरआन, ४९:१२) *''श्रद्धावंत लोकहो, आपल्या घरांशिवाय इतरांच्या घरांमध्ये त्यांची परवानगी न घेता जाऊ नका.''* (कुरआन, २४:२७) या सर्वांचा अर्थ असा की 'कुणीही मनाला येईल तसं इतरांच्या खाजगी व्यवहार, त्यांच्या कौटुंबिक जीवन, पत्रव्यवहार, त्यांचा आदर इत्यादींबाबत वागू नये. सर्वांना कायद्यान्वये सुरक्षेचा अधिकार आहे.' (मानवाधिकार कलम १७)

आम्ही पाहिलंय की कुरआननं लोकांना विस्थापित करणं, त्यांना बाहेर काढून टाकणं वर्ज्य केलंय आणि अशी शिफारस करतो की शरण घेणाऱ्याचं संरक्षण केलं जावं. (मानवाधिकार कलम १७)

हे अगदी उघड आहे की 'यूनो'च्या मानवाधिकाराच्या घोषणेतील अनेक अधिकारांना सिद्ध केलंय. पण कुरआन याहूनही पुढं जातो. कुरआनचं म्हणणं आहे, सन्मानाचं जगणं तेव्हाच शक्य आहे, जेव्हा लोकांना जीवनावश्यक वस्तू जसे अन्न, वस्त्र आणि घर असेल. म्हणजे जे भुकेलेले असतील त्यांचा अन्नधान्य मिळवण्याचा अधिकार आहे, विवस्त्र असलेल्यांना वस्त्र मिळावं आणि ज्यांची घरं नाहीत त्यांना घरं उपलब्ध व्हावीत. *''त्यांच्या मालमत्तेत गरजू व वंचितांचे अधिकार आहेत.''* (कुरआन, ५१:१९) म्हणजे माणसांची वैयक्तिक धनसंपत्ती आणि समाजाची सामूहिक धनसंपत्ती दोन्हींत त्यांचे अधिकार आहेत.

कुरआननुसार माणसाच्या सन्मानाचा महत्त्वाचा पैलू असा आहे की जीवनावश्यक वस्तू नसल्यानं माणूस किंवा समुदाय तग धरू शकत नाही. त्याबाबतचे माणसांचे व जनसमूहांचे निर्विवाद अधिकार आहेत. *''तुमच्या विधात्याच्या देणगीपासून वंचित राहणार नाही.''* (कुरआन, १७:२०) सर्वांना आपल्या गरजा भागविण्याचा, दारिद्र्यापासून मुक्त होण्याचा ज्यामुळे मानवाच्या सन्मानास धोका पोचतो, पूर्ण अधिकार आहे. आर्थिक, सामाजिक

आणि सांस्कृतिक हक्काधिकारांबाबत आंतरराष्ट्रीय कराराचं प्रमाण ठरवताना ज्या मुद्द्यांवर संयुक्त राष्ट्रांमध्ये राजकीय व वैचारिक भेद निर्माण झाले होते त्याचे संतुलित निकष कुरआनने आधीच विषद केले होते. अशा प्रकारे संयुक्त राष्ट्रांच्या कायद्यांच्या चौकटीपलीकडं कुरआन आमचं मार्गदर्शन करतो.

संयुक्त राष्ट्रांनी केलेले कायदे आणि अधिकारांबाबत कुरआनच्या दृष्टिकोनातील तफावत अशी की कुरआनच्या चौकटीत अधिकार आणि कर्तव्य दोन्ही समान असून स्वतंत्र आहेत. मानवजातीस जगण्याचा अधिकार आहे. या जगाचं व्यवस्थापन करण्याचं कर्तव्य अल्लाहचा खलीफा असल्यानं मानवाचं आहे आणि मानवाला सोपविलेल्या जबाबदाऱ्या व्यवस्थितपणे आणि योग्य रितीनं पार पाडव्यात.

पाश्चात्यांच्या योजनेनुसार व्यक्तीवर भर दिलेला आहे तर कुरआन समाजालाही तेवढंच महत्त्व देते. पाश्चात्यांच्या परंपरेनुसार, वैयक्तिक स्वातंत्र्य महत्त्वाचं आहे, तर कुरआनात एका व्यक्तीचं जगण्याचं सामर्थ्य आणि त्याचं अस्तित्व यास महत्त्व आहे. एका जनसमूहाला फक्त जगायचं नाही तर एका अशा सामाजिक, सांस्कृतिक आणि आध्यात्मिक वातावरणाची निर्मिती करायची आहे ज्यात एका व्यक्तीला आपल्या समस्त शक्तीचं आकलन करता यावं. कुरआनला फक्त एकमेव व्यक्तीची काळजी घ्यायची नाही तर मानवाधिकारांचं जतन करायचंय. या एका व्यक्तीच्या मानवतेचाही समावेश आहेत.

☆

# युवकांना उत्तेजन

मदीनेस परतल्यावर काही महिन्यांनी, हिजरतनंतरच्या ११ व्या वर्षी प्रेषित मुहम्मद (त्यांना शांतता लाभो) यांनी उत्तरेकडील सीरिया आणि पॅलेस्टाईनजवळ, ज्या ठिकाणी काही वर्षांपूर्वी त्यांचे सहकारी जाफर (अल्लाह त्यांच्याशी राजी होवो), अब्दुल्लाह आणि झैद मारले गेले होते, एक मोहीम पाठवण्याचा निर्णय घेतला. त्यांनी या ३००० सैनिकांची कमान झैद चे पुत्र उसामा यांना सोपवून सर्वांना आश्चर्यचकितच केले. उसामा यांचं वय त्या वेळी केवळ वीस वर्षांचं होतं आणि या सैनिकांमध्ये उमर (रजि.), अबु बक्र (रजि.), अली यांच्यासारखे अनुभवी व ज्येष्ठ सहकाऱ्यांचा समावेश होता. झैद यांच्या निवडीवर टीका होऊ लागताच त्यांनी तातडीनं कृती करून वादविवाद संपुष्टात आणला. त्यांनी घोषणा केली,

> ''तुम्ही उसामाच्या निवडीवर टीका करता, अशीच टीका तुम्ही उसामाचे पिता झैद यांच्या (निवडी) बाबतही केली होती. मी उसामास जी जबाबदारी सोपवलीय तीस ते सक्षम आहेत, जसं त्यांच्याआधी त्यांचे पिता सक्षम होते.''

गतकाळात काही मुस्लिमांनी झैद यांना सेनापती बनवण्यावर टीका केली होती, कारण त्यांना ते अजूनही गुलामच समजत होते. त्यांना स्वतंत्र केल्यावरदेखील. आता ते उसामा यांच्याकडं बोट करत होते, कारण ते अगदी लहान वयाचे होते. प्रेषितांनी आपल्या सहकाऱ्यांना सांगितलं की कोणत्याही

व्यक्तीस अधिकारपद देताना तिची सामाजिक स्थिती किंवा तिचं वय आड येता कामा नये. जर त्या व्यक्तीमध्ये आध्यात्मिक व बौद्धिक गुण असतील तर ती त्या पदास पात्र ठरते. समाजातील अतिगरीब व्यक्तीला वास्तविक समता बहाल करताना आणि युवकांवर विश्वास टाकताना योग्य निर्णय घ्यायला हवा. साधारणत: ज्येष्ठ सहकाऱ्यांसाठी हा एक मर्मभेदी असा बोधही होता. एका अशा व्यक्तीचं आदेशपालन करताना जी त्याच्या मुलासारखी असू शकते. त्यांना जिहादचा अनुभव येत होता, तसेच त्यांचे दिवस आता मर्यादित आहेत याचीदेकील त्यांना जाणीव होणार होती. या निर्णयाद्वारे प्रेषितानी त्यांना अशी शिकवण दिली की एका माणसाची शक्ती वयानुसार कमी होत जाते आणि तरुण वयातल्या लोकांना अधिकार देण्यासाठी जे सशक्त असून नवनिर्मितीस सक्षम असतील. अशांची निवड करावी लागते.

☆

# युद्धातली नीतीतत्त्वं

प्रेषित मुहम्मद (त्यांना शांतता लाभो) यांनी उसामा (अल्लाह त्यांच्याशी राजी होवो) यांना आपली पसंती देऊन त्यांना लगेच निघण्यास सांगितलं. पण प्रेषित अचानक आजारी पडल्यानं कूच करण्यास विलंब झाला आणि त्यांची सेना मदीनेजवळ थांबून राहिली. काही आठवड्यांनंतर प्रेषितांच्या इच्छेनुसार अबु बक्र (अल्लाह त्यांच्याशी राजी होवो) यांनी उसामा यांना मोहिमेवर जाण्यास सांगितलं. त्यांनी युद्धाच्या वेळी अंमलात आणावयाच्या नीतीतत्त्वांची आठवण करून दिली. कारण शत्रुंशी व्यवहार करताना ज्या सिद्धान्तांची अंमलबजावणी करायचीय त्याचा प्रेषित सातत्यानं उपदेश करत असत. "स्त्रिया, लहान मुले आणि वृद्धांची हत्या करू नका." अबु बक्र यांनी त्यांना आदेश दिला होता. "अप्रामाणिक कृत्यं करू नका, रास्त मार्गापासून भरकटू नका, विध्वंस करू नका, झाडांचा नाश करू नका, घरं आणि अन्नधान्याची शेती जाळू नका, फळझाडं तोडून टाकू नका आणि सेवन करण्याव्यतिरिक्त प्राण्यांची हत्या करू नका. तुम्ही जात असताना वाटेत तुम्हाला मठांमधील साधूसंत भेटतील, ईश्वराची भक्ती करण्यात मग्न असलेल्यांना तसेच सोडून द्या, त्यांची हत्या करू नका की त्यांच्या मठांची नासधूस करू नका." प्रेषितांनी वेळोवेळी केलेल्या या युद्धप्रसंगीच्या सूचना, निसर्गाची सुरक्षा आणि प्राणीमात्रांशी कशा प्रकारे वागावं या शिकवणी उसामा यांना कळवण्यात आल्या होत्या.

## २१

# प्रेषितांची युद्धसंकल्पना

इस्लामपूर्वीच्या आणि इस्लामेतर युद्धांमागं लूटमार करणं, रक्तापात माजविणं आणि हिंसा करणं यापलीकडं कोणतंच कारण नव्हतं. विजय मिळवणं, दुर्बलांवर अत्याचार करणं, घरादारांची, मालमत्तेची, पिकांची, शेतजमिनींची इतकेच नव्हे तर सबंध गावंच्या गावं आणि शहरंसुद्धा त्या युद्धांच्या केंद्रस्थानी होते. ही युद्धं स्त्रियांची अवहेलना करण्याचं, वृद्धांना, मुलाबाळांना, गुराढोरांना आपल्या अत्याचाराचं लक्ष्य बनवण्याची साधनं होती. पृथ्वीवर उपद्रव माजवणं, तीस भ्रष्ट करणं हा त्या युद्धांमागचा हेतु होता. जिंकलेल्या लोकांची धर्मस्थळे आणि त्यांचा ऐतिहासिक वारसा उद्‌ध्वस्त केला जात होता. नैतिक मूल्यांच्या मर्यादांचं जतन करण्याचा सिद्धान्तच त्यावेळच्या माणसांच्या जाणीवेतून हरपला होता.

इस्लामी युद्धे, इस्लामेतर युद्धांपासून वेगळी आहेत. इस्लाममध्ये युद्ध म्हणजे अल्लाहच्या मार्गातील उदात्त व पवित्र असा लढा होय. तो अत्याचार, अन्याय आणि हिंसेपासून मानवास मुक्ती मिळवून देऊन समाजाच्या उन्नतीसाठी असतो. प्रेषित मुहम्मद (त्यांना शांतता लाभो) यांनी इस्लामेतर युद्धांचे मापदंड बदलून टाकले. संघर्षाच्या प्रसंगी अंमलात आणल्या जाणाऱ्या नैतिक सिद्धान्तांच्या महत्त्वावर प्रेषितांनी भर दिला. पहिल्यांदा त्यांनी युद्धाची मूलभूत कल्पना आणि समज विशद करून दिली.

# *जिहाद-फी-सबी-लिल्लाह*

# अल्लाहच्या मार्गात संघर्ष करणे

*'जिहाद-फी-सबी-लिल्लाह'* (अल्लाहच्या मार्गात संघर्ष) च्या एका नवीन संज्ञेचा परिचय करून देऊन प्रेषित मुहम्मद (त्यांना शांतता लाभो) यांनी केवळ ऐहिक उद्दिष्ट आणि आपल्या हितसंबंधांसाठी युद्धे करण्याची प्रथाच बदलून टाकली. अल्लाहच्या कारणास्तव (फी-सबी-लिल्लाह), अल्लाहच्या संभाषणाद्वारे त्यांनी ही शिकवण दिली की युद्ध स्वत:साठी, स्वत:च्या अहंकारासाठी, लोकांना गुलाम बनवण्यासाठी आणि धनसंपत्तीसाठी करता कामा नये. किंवा इतरांवर अन्याय-अत्याचार केला जाऊ नये. युद्धाच्या सिद्धान्तांना एकमेकांशी बांधून ठेवण्यासाठी ही श्रद्धा एक महत्त्वाचं माध्यम ठरली.

युद्धाच्या या नवीन संकल्पनेच्या माध्यमानं प्रेषितांनी युद्धकाळातील नीतीमूल्यांचे कायदे संग्रहित केले, त्यांच्या नैतिक मर्यादा, त्यांचे घटक, अधिकार व कर्तव्ये, युद्धात सहभागी असलेल्या आणि नसलेल्यांमधील फरक, तसेच प्रतिनिधींचे अधिकार, युद्धबंदींचे आणि पराभूत झालेल्यांचे हक्काधिकार; हे सर्व सिद्धान्त प्रेषितांनी स्पष्टपणे मांडलं.

प्रेषितांनी मानवी जीवनाचं पावित्र्य आणि तिचं संरक्षण मग ते मुस्लिम असोत की परधर्मिय, अधोरेखित केलं.

प्रत्येक प्रेषिताची आपली एक विशिष्ट कार्यशैली असते. प्रत्येक प्रेषित भिन्न काळात आणि विभिन्न जनसमुदायांत आले होते. एका प्रेषिताची दुसऱ्या प्रेषिताशी तुलना करण्यात काही अर्थ नाही आणि कुरआन खऱ्या अर्थानं याची मनाई करतो. येशू ख्रिस्तांनी कोणतं युद्ध लढलं नव्हतं हे खरं, पण त्यांना तशी गरजही नव्हती, मात्र प्रेषितांना आपल्या बचावासाठी युद्धं करावी लागली.

जेव्हा प्रेषित मुहम्मद यांना प्रेषित्व बहाल केलं गेलं, त्यांनी लोकांना शांततेकडं बोलावलं, पण कुरैश सरदारांनी वर्षानुवर्षं त्यांचा विरोध केला.

त्यांना वाईट म्हटलं आणि त्यांचा व त्यांच्या सहकाऱ्यांचा सातत्यानं छळ केला. त्यांची मालमत्ता जप्त केली, त्यांना मक्केतून काढून टाकलं. मुस्लिमांनी मदीनेस स्थलांतर केलं, नंतरदेखील ते त्यांच्या मागावर होते आणि मदीनेच्या लोकांनी त्यांना आणि त्यांच्या सहकाऱ्यांना एक तर तिथून बाहेर करावं किंवा त्यांना मारून टाकावं असा त्यांच्यावर दबाव आणला. त्यांनी जर त्यांचं ऐकलं नाही तर याचे वाईट परिणाम होतील, अशी त्यांना धमकी दिली. मक्केच्या सरदारानं अबैय यांचा मुलगा अब्दुल्लाहला असा संदेश पाठवला की त्यानं त्याच्या अपराध्यांना आश्रय दिलाय. त्यांनी त्यांची हत्या करावी नसता ते मदीनेवर आक्रमण करून मुहम्मद यांच्याबरोबरच त्यालाही मारून टाकतील. जेव्हा मरणाला दुसरा पर्याय उरला नाही तेव्हा मुहम्मद यांनी संघटितपणे संघर्ष करण्याचा मार्ग अवलंबिला.

त्यांच्या शत्रुंनी त्यांच्यावर युद्धं लादली होती. त्यांचा हेतु युद्ध करण्याचा नव्हता. त्यांच्या युद्धांना म्हणूनच विस्तृत ऐतिहासिक परिघात पाहिलं जावं. ती युद्धं धार्मिक होती यात शंका नाही, कारण त्यांचा धर्म इस्लाम होता, ज्याविरूद्ध हे लोक आक्रमण करत होते.

कोणताही जबाबदार नेता सैनिकी अग्रक्रमणाकडं सहजासजी बघू शकत नाही. प्रेषित तर मुळीच नाही, ज्यांना प्रत्येकासमोर एक उदाहरण ठेवायचं होतं, भावी पिढ्यांसाठी सत्ताधीश तसेच सैनिकांसमोर एक आदर्श ठेवायचा होता.

प्रेषितांना स्वाभाविकपणे युद्ध विहित केलं नव्हतं, त्याच वेळी सहजच युद्ध रद्द केलं जाऊ शकत नव्हतं. कोणताही समाजसुधारक किंवा आध्यात्मिक गुरू फक्त युद्धातलं पाशवीपण कमीतकमी करू शकत होता. अल्लाहच्या आदेशानुसार प्रेषितांनी युद्धास मानवी आकार देण्यासाठी कायदे निर्माण करण्याचा प्रयत्न केला. शांततेसाठी लोकांना प्रेरित केलं आणि मानवी जीवनाची कमीतकमी हानी व्हावी याची दखल घेतली.

अशा प्रकारे प्रेषितांनी बलाढ्य शत्रूच्या विरोधात लहान सैन्याचा कौशल्यपूर्वक उपयोग करून प्रचंड विजय मिळविला. सात-आठ वर्षांच्या अल्पशा काळातच त्यांनी आपल्या सर्व शत्रूंना नेस्तनाबूद केलं किंवा त्यांचं

आक्रमण खिळखिळं करून टाकलं. त्यांनी जेवढी काही युद्धं केली त्या सर्वांत मिळून त्यांचे केवळ २५५ सहकारी मारले गेले तर शत्रूचे ७५९ सैनिक मृत्युमुखी पडले. प्रेषित मुहम्मद यांनी ६,५६४ युद्धकैदी बनविले, तरी त्यातले दोन कैदी ज्यांच्यावर अपराधिक आरोप होते, वगळता सर्वांना सोडून दिलं. आपल्या आठ वर्षांच्या सैनिकी मोहिमांमध्ये फक्त १,०१४ लोकांच्या जीवितहानीनं त्यांनी समस्त अरब द्वीपकल्पात शांतता आणि अनुशासन प्रस्थापित केलं. दुष्ट, वाईट आणि अन्याय-अत्याचाराला मूठमाती दिली. त्याजागी भलेपण, सद्‌गुण आणि कायद्याचं राज्य स्थापित केलं. हा प्रेषितांचा एक चमत्कारच होता. त्यांनी कमीतकमी शक्तीचा वापर करून उदंड परिणाम साकारले.

महान इतिहासकार एच. लॅम्मेन्स यांच्या मते–

> ''मध्ययुगीन काळात जेव्हा दोन्ही बाजुंचे हजारो लोक मारले जात होते, हा आकडा (१०१४), मुहम्मद यांनी दाखवलेला संयम, त्यांची अनुकंपा आणि मानवी जीवनासाठी त्यांची काळजी याचं दर्शन घडवतो. म्हणूनच त्यांना एक लढवय्ये म्हणता येत नाही. त्यांनी प्रत्येक जीवास पवित्र मानलं आणि न्याय्य कारणांशिवाय रक्तपात करण्याचं त्यांनी नाकारलं. त्यांनी आपलं जीवन शांततेसाठी व्यतीत केलं होतं.''

याची तुलना अशा क्रांतीशी करा ज्या युद्धाद्वारे केली गेली होती - महान युद्ध जे वर्षानुवर्षं चालत राहिलं, ज्यात लक्षावधी माणसं मारली गेली. या युद्धांमध्ये ठार झालेल्या लोकांची संख्या प्रचंड आहे.

# विसावं शतक - सर्वांत हिंसक शतक

नोबेल पारितोषिक विजेते विल्यम गोल्डिंग यांच्या निवेदनानुसार, मानवी इतिहासात विसावं शतक सर्वांत जास्त हिंसक शतक होतं. आपलं पुस्तक 'Out of Control : Global Turmoil on the Eve of Twenty-first Century' यात लेखक झेड. ब्रेझिन्स्की यांनी विसाव्या शतकात मारल्या गेलेल्यांची आकडेवारी दिलीय, जे मानवांनी घडवून आणलेल्या विनाशात बळी गेले त्यांची संख्या १८ कोटी ७० लाख (१८७ दशलक्ष) इतकी आहे. साळलेल्या वृत्तीनं अण्वस्त्र, रासायनिक आणि जैविक शस्त्रास्त्रांचा साठा करून त्यात अवाढव्य वाढ होतेय. यातला ६० टक्के शस्त्रपुरवठा जगभरातल्या देशांना अमेरिकेकडून होत आहे. अमेरिकेचे माजी अध्यक्ष जिम्मी कार्टर यांनी २००८ साली असं म्हटलंय की अमेरिका आणि रशियाकडं प्रत्येकी १२००० अण्वस्त्रं आहेत. त्याचबरोबर ब्रिटन आणि जर्मनीकडं शेकडो अण्वस्त्रं आहेत. कार्टर पुढं म्हणाले की इस्राईलकडं १५० अण्वस्त्रं आहेत, पण तो हे मान्य करत नाही. इतर देशांकडं अण्वस्त्रं असल्याचा अमेरिका मोठा गाजावाजा करतो, पण इस्राईलकडं तो डोळेझाक करतो. (संदर्भ : www.timesonline.co.uk./tol/news/world/middleeast/article4004300.ece/www.bbc.news)

आक्रमण आणि हिंसाचार सर्वव्यापी असून ते मानवी समाजाचं जणू एक अंगच आहे. मानवी जीवनाच्या इतिहासात २०वे शतक हे सर्वांत जास्त हिंसक शतक ठरलंय. विसाव्या शतकातच भयभीत करणारे नरसंहार आणि वंशहत्या झाली. दोन जागतिक युद्धांमध्ये अनन्यसाधारण जीवितहानी झाली. कोट्यवधी माणसं मारली गेली, निराश्रित झाली.

> पहिल्या जागतिक युद्धामध्ये एक कोटी लोक मारले गेले. दोन कोटी १० लाख लोक जखमी झाले आणि ७७ लाख लोक बेपत्ता झाले आणि बंदिस्त करण्यात आले.
>
> दुसऱ्या जागतिक युद्धात ६ कोटी लोक मारले गेले, लाखो लोक जखमी आणि बेघर झाले.

दुसऱ्या जागतिक युद्धाच्या शेवटी अमेरिकेनं जपानमधील हिरोशिमा आणि नागासाकी या शहरांवर अणुबॉम्ब टाकला. यात दोन लाख लोक मारले गेले आणि लक्षावधी निष्पाप लोक बेघर झाले.

रशियातील क्रांतीमध्ये १३ लाख लोकांचा बळी गेला.

फ्रेंच क्रांतीमध्ये दोन लाख ४० हजार लोक मृत्युमुखी पडले.

चीनमधील कम्युनिस्ट क्रांतीमध्ये २० लाख लोक ठार झाले.

इटलीच्या मुसोलिनीनं उत्तर आफ्रिकेतील मुस्लिम राष्ट्रांविरूद्ध युद्ध छेडलं, ज्यात अल्जेरिया, ट्युनिशिया आणि लीबिया या देशांचा समावेश आहे. यामध्ये चार लाख निष्पाप मुस्लिम ठार झाले.

सोव्हियत सत्ताधीश स्टॅलिननं रशियामध्ये जे यादवी युद्ध छेडलं होतं त्यात दोन कोटी लोकांची हत्या झली. बहुसंख्येत ते मुस्लिम लोक होते.

ॲडॉल्फ हिटलरनं दोन कोटींपेक्षा जास्त माणसांचा संहार केला.

दुसऱ्या जागतिक युद्धामध्ये ६० लाख ज्यू लोकांची हत्या झाली.

बोस्निया-हर्जेगोविना युद्धामध्ये दोन लाखांपेक्षा अधिक मुस्लिमांची हत्या करण्यात आली. हेग येथील आंतरराष्ट्रीय न्यायालयाच्या निकालानुसार बोस्निया युद्धामध्ये मानवजातीविरूद्ध अपराध केला गेला होता.

रक्तपाताचं हे सत्र अजूनही सुरूच आहे आणि हे युद्ध आता दहशतवादाचं युद्ध असल्याचं सांगितलं जातं. यामागचं उद्दिष्ट मात्र भौगोलिक राजकीय हित जपण्याचं आहे.

# तुलना

मानवी इतिहासात प्रेषित मुहम्मद (त्यांना शांतता लाभो) यांच्या युद्धांमध्ये जितके लोक मारले गेले आणि दुसऱ्या जागतिक युद्धामध्ये मृत्युमुखी पडलेल्यांची तुलना करा. जे लोक मारले गेले (सामान्य नागरिकांसहित) त्या संबंधानं या युद्धात ज्या सैनिकांनी भाग घेतला होता त्यांची टक्केवारी ५१७ आहे. युद्धात सहभागी झालेल्या सैनिकांची संख्या एक कोटी सहा लाख होती, तर मारल्या गेलेल्यांची संख्या पाच कोटी ४८ लाख होती.

प्रेषित मुहम्मद यांनी केलेल्या एकूण युद्धांमध्ये दोन्ही बाजुंचे केवळ १,०१४ लोक मारले गेले. ज्या लोकांनी या लढायांमध्ये भाग घेतला आणि जे लोक मारले गेले त्यांची टक्केवारी १.५ इतकी होते. या युद्धांमधील बहुसंख्य युद्धांमध्ये प्रेषित मुहम्मद विजयी झाले होते, पण मारल्या गेलेल्या कमी संख्येनुसार मुहम्मद यांचा समावेश जगातल्या निर्दयी, रानटी युद्धखोर जेत्यांमध्ये केला जाऊ शकत नाही.

शत्रू आणि कलुषित माणसं मुहम्मद यांचं चित्रण रक्तरंजित आणि युद्धखोर असं करतात, जणू लढाया करणं त्यांचा पेशाच होता. सत्यस्थिती अशी की मदीनेतील १० वर्षांच्या काळात त्यांनी फक्त ७९५ दिवस लढाया आणि मोहिमांमध्ये व्यतीत केले. अनेक युद्धं त्यांनी एकाच दिवसात जिंकली होती. पण त्या लढायांसाठी प्रवासात बरेच दिवस लागले. (प्रवास आणि मोहिमा दोन्ही मिळून ७०० पेक्षा अधिक दिवस) बाकीच्या वर्षांत (अंदाजे २८६५ दिवस) त्यांनी लोकांच्या जीवनात क्रांती घडवून आणण्यासाठी खर्ची घालवले, थोतांड देवतांची पूजा करणाऱ्या एका समाजाची सुधारणा करण्यात रात्रंदिवस झटत राहिले पण त्यांची काही पूर्वग्रहदूषित चरित्रकार आणि इस्लामविरोधी साहित्यिक मंडळी या वस्तुस्थितीकडं डोळेझाक करतात आणि

त्यांना युद्धखोर घोषित करून टाकतात.

युद्धाचे डावपेच आणि सैन्याच्या हालचालींबाबत विविध नीतींचा जसा यशस्वीपणे उपयोग केला, त्यामुळे कित्येक सेनापती आणि सैनिकांच्या पिढ्या आश्चर्यात आहेत. प्रत्येक युद्ध त्यांनी आपल्या सैन्याचं चांगल्या तऱ्हेनं संघटन केलं आणि याबाबत त्यांनी गुप्तता पाळली. ज्या गतीनं आणि अचानकपणे त्यांनी हालचाल केली त्यामुळे शत्रूनं नेहमी त्यासाठी तयारी केलेली नसायची. त्यांनी मानसशास्त्राप्रमाणे ज्या प्रभावीपणे शत्रूच्या मानसिकतेला आश्चर्यात टाकलं तसा त्यांच्या शत्रुंनी स्वप्नातही विचार केलेला नव्हता. या उद्दिष्टासाठी त्यांनी गुप्तहेर संस्था आणि टेहळणी पथकांचं गठन केलं होतं.

आपल्या सहकाऱ्यांना युद्धकला शिकविण्यात आणि शस्त्रांची देखभाल आपल्या शत्रूपेक्षा अधिक कौशल्यानं करण्याचं प्रशिक्षण देतान प्रेषितांनी कसलीही कसर ठेवली नाही. शेवटी आपल्या उद्दिष्टाच्या सत्यतेबाबत अशा तऱ्हेनं प्रेरणा दिली की इतिहासात कोणत्याही मनुष्यानं तसं केलं नसेल.

शत्रू आणि कलुषित मानसिकतेचे लोक मुस्लिमांना मूलतत्त्ववादी आणि दहशतवादाची उपाधी लावतात. भूतकाळातील पूर्वग्रहाचा हा परिणाम होय. बराच काळ हे सर्वसाधारणपणे मानले जात होते की प्रेषितांनी मुस्लिमेतरांना फक्त दोनच पर्याय दिले होते. कुरआन किंवा तलवार. पुढं असंही म्हटलं जाई की इस्लामचा प्रचार तलवारीच्या जोरावर झाला.

इतिहासात असा कोण सेनापती आहे की ज्यानं सैनिकी मोहिमा आणि आपल्या विजयामध्ये असं औदार्य दाखवलंय? असा कोण सेनापती आहे जो इतका उदार, इतक्या उत्कृष्ट स्वभावाचा मनुष्य, इतका क्षमाशील होता? असा कोण ज्यानं इतक्या प्रमाणात यश संपादन केलं आणि मोजकीच जीवितहानी झाली? जगातल्या इतिहासात दुसरा कोण असा शासक आहे ज्यानं कायदा व सुव्यवस्था इतक्या अल्पावधीत आणि एवढ्या प्रचंड भूभागात स्थापन केली? इतिहासात कोण असा सेनापती झाला ज्यानं आपल्या मागं इतका सभ्य वारसा सोडला, ज्यानं मानवी इतिहासाचा प्रवासच बदलून टाकला आणि जीवनाच्या हरेक क्षेत्रात मानवी संस्कृतीवर आपली छाप सोडली?

ही बाब दु:खाची आहे की मुहम्मद यांना लोक केवळ एका धर्माचे संस्थापक आणि तेदेखील जगाच्या बाबतीत संकुचित दृष्टिकोनातून पाहतात. आणि मानवी जीवनात त्यांनी जे चैतन्य निर्माण केलं त्याकडं फारच कमी लक्ष दिलं गेलंय. मानवजाती आणि विशेषकरून मुस्लिम, एक गुरू आणि मानवजातीचा उद्धारक या नात्यानं त्यांचे ऋणी आहेत. त्यांना साजेसी आणि प्रामाणिक आदरांजली म्हणजे मानवी जीवनातील हरेक पैलूवर त्यांनी टाकलेल्या चैतन्यपूर्ण प्रभावाला जगासमोर आणणं ठरेल. ज्यामुळे लोकांना त्याचा लाभ मिळावा आणि मानवजातीचं गुणात्मक, न्यायपूर्ण आणि शांततापूर्ण जीवन समृद्ध व्हावं.

'Life of Mohomet' या आपल्या ग्रंथामध्ये अमेरिकेचे साहित्यिक, चरित्रकार आणि इतिहासकार असे भाष्य करतो–

> ''प्रेषित मुहम्मद यांनी जे सैनिकी विजय संपादन केले त्यामुळे अहंकार आणि पोकळ अभिमान जागृत झाला नव्हता. स्वहितासाठी केले असते तर तसे ते निर्माण झाले असते. जेव्हा त्यांना महान सत्ता मिळाली, या काळातदेखील त्यांनी तोच साधेपणा अंगीकारला जसा अडचणींच्या काळात होता.''
>
> अमेरिकन सुप्रसिद्ध इतिहासकार एच. लॅम्मेन्स लिहितात–
>
> ''आपल्या यशाच्या शिखरावर, मक्का जिंकल्यावर प्रेषित मुहम्मद अत्यंत नम्रपणे वागत होते. मक्का त्यांच्या चरणाशी होते आणि पराभूत झालेले कुरैश लोक एकामागून एक रांगेनं पुढं येऊन निष्ठेची शपथ घेत होते. त्यांनी (प्रेषितांनी) एका वृद्ध माणसास पाहिलं. त्यांच्याकडं तो काहीसा भीत भीत अडखळत येत होता. मक्केचे विजेते मुहम्मद यांनी अत्यंत नम्रतेनं त्याचं समाधान केलं. म्हणाले,
>
> मी कुणी राजा नाही. मी एक सामान्य माणूस आहे, तुमच्यासारखाच. तुम्ही खाता तेच मीही खातो. तोच सूर्य तुमच्यावर आणि माझ्यावरदेखील प्रकाश टाकतो.''

जेव्हा या सर्वोत्तम यशस्वी, मुत्सद्दी प्रेषित मुहम्मद यांनी या जगाचा निरोप घेतला, ते ३६ लाख चौ.मैल (अंदाजे १० लाख चौ.कि.मी.) अरब द्वीपकल्पाचे सत्ताधीश होते. मदीनेतील त्यांच्या १० वर्षांच्या निवासकाळात दररोज ८४५ चौ.मैल (अंदाजे २५३५ चौ.कि.मी.) इतका भूभाग इस्लामी राजवटीखालील प्रदेशात सामील होत होता. मानवजातीचे महान मुक्तिदाता जेव्हा हे जग सोडून गेले तेव्हा त्यांच्याकडं दिवा लावण्यासाठी चिमणीत तेलही नव्हतं.

# २२

# प्रेषित मुहम्मद यांचे अनेक विवाह

जेव्हा कधी प्रेषित मुहम्मद (त्यांना शांतता लाभो) यांच्या नावाचा उल्लेख होतो, बऱ्याच माणसांच्या लक्षात अनेक पत्नी असलेल्या व्यक्तीची प्रतिमा येते. मुस्लिमेतरांना प्रेषितांचं व्यक्तिमत्त्व समजून घेण्यात हा एक अडसर असतो, ज्यामुळे बेजबाबदार आणि आगाऊ परिणाम उमटतात, जे इस्लाम आणि प्रेषितांच्या हिताचे नाहीत. आम्ही इथं वस्तुस्थिती सादर करत आहोत.

- विवाहसंस्थेला इस्लाममध्ये फार महत्त्वाचं स्थान लाभलंय. समाजजीवनासाठी हे अत्यावश्यक आहे.

- स्त्रीचं वय २५ वर्षं होईपर्यंत प्रेषितांनी त्यांना स्पर्श केला नाही. मक्केतील सर्वांत सत्यतावादी आणि विश्वसनीय (अल-अमीन) असं नावलौकिक त्यांना लाभलं होतं. एक प्रामाणिक आणि न्याय्य व्यापारी म्हणून त्यांचा आदर-सन्मान केला जात होता. तसेच सर्वांशी सौहार्दानं वागत होते, गरीब, अनाथ व विधवा महिलांना आश्रय देत होते.

# खदीजा

## (अल्लाह त्यांच्यावर राजी होवो)

प्रेषित मुहम्मद (त्यांना शांतता लाभो) यांचा पहिला विवाह ४० वर्षीय विधवा महिला उच्च दर्जाची नैतिक पार्श्वभूमी असलेल्या माननीय खदीजा यांच्याशी संपन्न झाला. त्या प्रेषितांपेक्षा वयानं १५ वर्षं मोठ्या होत्या. त्यांनी स्वत:च लग्नाचं निमंत्रण दिलं होतं आणि त्या विधवा व मोठ्या वयाच्या असतानादेखील प्रेषितांनी ते मान्य केलं. जर त्यांची तशी इच्छा असती तर कित्येक युवती त्यांच्याशी विवाह करण्यास इच्छुक असतील.

खदीजा यांच्याबरोबर प्रेषित मुहम्मद यांनी २५ वर्षं समाधानी आणि आनंदपूर्वक जीवन व्यतीत केलं. त्या विधवा आणि वयानं वृद्ध असतानादेखील प्रेषितांची एक संतती वगळता बाकीचे सर्व त्यांच्यापासून जन्मले होते. त्या हयात असताना प्रेषितांनी दुसरा विवाह केला नव्हता. खदीजा यांच्यावर त्यांचं अपार प्रेम होतं.

खदीजा यांचं निधन झाल्यावर त्यांना दु:खी अवस्थेत पाहून त्यांच्या एका मित्रानं त्यांना दुसरं लग्न करण्याचा सल्ला दिला, त्यावर प्रेषित म्हणाले होते,

''खदीजानंतर विवाह करण्याचा विचारच कोण करू शकेल? मला त्यांची आठवण येते, त्या माझ्याशी एकनिष्ठ होत्या. जेव्हा लोकांनी मला खोटं ठरवलं तेव्हा त्यांनी माझा विश्वास केला. लोक मला मदत करण्यास भीत असत, तेव्हा त्या माझ्या पाठीशी खंबीरपणे उभ्या राहिल्या. त्या माझ्या सर्वोत्तम सहकारी होत्या. त्यांनी माझ्या मुलांना जन्म दिला.''

असं असतानादेखील ते एक भोगासक्त पुरुष होते की एक अत्यंत काळजी घेणारे पती?

# खदीजा (रजि.) आजारी होऊन मरण पावतात

संतापानं वेडसर झालेल्या कुरैश सरदारांनी घातलेल्या बहिष्काराच्या तीन वर्षांच्या काळामध्ये प्रेषित मुहम्मद (त्यांना शांतता लाभो) यांचं कुटुंब आणि त्यांचे अनुयायी बाहेरील जगापासून पूर्णत: वेगळे पडले होते. हा अतिशय यातनादायक काळ होता. ज्या परिस्थितीत ते जगत होते त्याचा परिणाम स्त्रिया आणि मुलांच्या आरोग्यावर झाला. खदीजा आधीच कुरैशांच्या बहिष्कारामुळे कठीण परिस्थितीशी झुंजत असतानाच त्या आजारी पडल्या. इ. स. ६१९ च्या डिसेंबर महिन्यात एके दिवशी अल्पशा आजारानंतर त्यांनी या जगाचा निरोप घेतला. प्रेषितांना आपल्या अतिशय मायाळू पत्नी हरपल्याचा मोठा धक्का बसला.

कुरैश सरदारांकडून प्रेषितांना धमकावलं जात होतं. त्यांचा छळ केला जात होता. त्यांचं कौटुंबिक जीवनदेखील गोंधळून गेलं होतं. त्यांची मुलं अजून लहान होती आणि त्यांची काळजी घेण्यास कुणी नव्हतं. त्यांची ही अवस्था पाहून त्यांच्या मित्रांनी सल्ला दिला की एखाद्या विधवेशी त्यांनी विवाह करावा म्हणजे त्यांच्या मुलाबाळांची व्यवस्था होऊ शकेल. त्याचबरोबर एका युवतीशीही त्यांनी विवाह करावा जी त्यांना दिलासा देईल आणि त्यांचं दु:ख हलकं करील. अशा प्रकारे त्यांनी सौदा (अल्लाह त्यांच्याशी राजी होवो) आणि आयशा (अल्लाह त्यांच्याशी राजी होवो) यांच्याशी एकाच वर्षात विवाह केले. लग्नाचं हे प्रस्ताव त्यांच्या मित्रांनी पुढे केले होते. यामध्ये काही अनुचित प्रकार किंवा वासना नव्हती. तात्कालिक गरज म्हणून त्यांच्यासमोर हे प्रस्ताव मांडले होते जे त्यांनी मान्य केले.

# सौदा

## (अल्लाह त्यांच्यावर राजी होवो)

प्रेषित मुहम्मद (त्यांना शांतता लाभो) यांच्या दुसऱ्या पत्नी माननीय सौदा (अल्लाह त्यांच्याशी राजी होवो) याही विधवा होत्या. प्रेषितांच्या सुरुवातीच्या अनुयायींमधील त्याही एक होत्या. त्यांच्या सूचनेनुसार त्यांनी ॲबिसिनियाकडं स्थलांतर केलं होतं. तिथून परतल्यावर त्यांच्या पतीचं निधन झालं. त्यांना आश्रय हवा होता. स्वाभाविकच त्या प्रेषितांकडं वळू शकत होत्या. इस्लामी कार्यातच त्यांच्या पतीला मरण आलं होतं. प्रेषितांनी आश्रय दिला आणि त्यांच्याशी विवाह केला. विवाहासमयी सौदा यांचं वय ४० वर्षांपेक्षा अधिक होतं. त्यांच्या पहिल्या पतीपासून त्यांना एक मुलगा होता. प्रेषितांपासून त्यांना संतती झाली नाही.

# आयशा

## (अल्लाह त्यांच्यावर राजी होवो)

प्रेषित मुहम्मद (त्यांना शांतता लाभो) यांच्या तिसऱ्या पत्नी माननीय आयशा त्यांचे अतिशय जिवलग अनुयायी माननीय अबु बक्र (अल्लाह त्यांच्याशी राजी होवो) यांच्या कन्या होत्या. या विवाहाद्वारे प्रेषितांचं एक उद्दिष्ट अबु बक्र यांच्याशी बंधुभाव मजबूत करण्याचं होतं. प्रेषित मुहम्मद यांचा प्रामुख्यानं त्यांच्या शत्रूंपासून बचाव केला होता. लग्नाच्या वेळी आयशा यांचं वय जसं साधारणपणे म्हटलं जातं ११ वर्षं नव्हतं तर त्या १५ वर्षं वयाच्या होत्या.

इतर पत्नींच्या तुलनेत आयशा यांच्याशी प्रेषितांचे संबंध काहीसे वेगळेच होते आणि हे नातं वासनेचं नसून बौद्धिक स्तराचं होतं. त्यांना ते

मानवत होतं, कारण त्यांना आपल्या पतीशी संवाद करणं आणि चर्चा करणं आवडत होतं. त्या जणू प्रेषितांच्या शिष्याच होत्या. त्यांना या गोष्टीचा गर्व होता की मदीनेत त्या प्रेषितांबरोबर असताना कुरआनची बहुसंख्य अवतरणं झाली होती. ही त्यांना अल्लाहकडून विशिष्ट देणगी वाटायची. प्रेषितांना याची जाणीव होती की त्यांनी आपल्या जीवनातील महत्त्वाचं ज्ञान आयशा यांच्या माध्यमानं लोकांपर्यंत पोचवलं तर मानवजातीस याचा प्रचंड लाभ होईल, विशेषकरून कौटुंबिक आणि वयैक्तिक जीवनासंबंधीची माहिती जी खाजगी स्वरूपाची होती. वस्तुत: प्रेषितांना आपल्या समुदायास इस्लाम धर्माबाबत अर्धी माहिती आयशा यांच्याकडून शिकावयास सांगितलं होतं. प्रेषितांची दूरदृष्टी साध्य झाली. त्यांच्या निधनानंतर आयशा ४५ वर्षं जगल्या आणि प्रेषितांचं बौद्धिक ज्ञान मिळवण्याचं त्या प्रमुख स्रोत होत्या.

त्यांनी २२१० प्रेषितांची वचनं (हदीस) मुस्लिम समुदायास पोचवली. त्यांचं वर्णन अनन्यसाधारण असायचं. धार्मिक आणि न्यायिक विषयाच्या बाबतीत वेळोवेळी त्यांच्याशी विचारविनिमय होत असे.

वयाच्या ५६ ते ६० वर्षांदरम्यान प्रेषित मुहम्मद यांनी नऊ विवाह केले. याची कारणेही विविध होती. शेवटच्या तीन वर्षांत प्रेषितांनी विवाह केला नाही.

# हफसा

## (अल्लाह त्यांच्यावर राजी होवो)

प्रेषित मुहम्मद (त्यांना शांतता लाभो) यांच्या चौथ्या पत्नी हफसा (अल्लाह त्यांच्याशी राजी होवो) होत्या. माननीय उमर (अल्लाह त्यांच्याशी राजी होवो) यांच्या विधवा कन्या. ते प्रेषितांचे सर्वांत जास्त विश्वसनीय सहकारी होते. हफसा यांचे पहिले पती बद्रच्या युद्धामध्ये शहीद झाले. उमर यांचं आपल्या कन्येवर प्रचंड प्रेम होतं. त्यांनी आपले मित्र उस्मान यांना आपल्या मुलीशी लग्न करण्यास सांगितलं, पण त्यांनी नकार दिला. नंतर त्यांनी अबु बक्र

यांना सांगितलं, पण तेही तयार झाले नाहीत. त्यांना हफसा यांच्या परखड स्वभावाची माहिती असावी. उमर यांना रागात पाहून प्रेषितांनी हफसा यांचा आपली पत्नी म्हणून स्वीकार केला. हफसा तापट स्वभावाच्या होत्या. उमर यांनीच याची नोंद घेतली आहे. उमर यांच्या शब्दांत– ''एकदा माझ्या पत्नी एका प्रकरणाविषयी वाद घालत होत्या. मी त्यांना सांगितलं, मला उपदेश देणारे तुम्ही कोण? मला तुम्ही आपल्या मुलीच्या एका क्षुल्लक बाबतीत बोलू देत नाही. सर्वच गोष्टींबाबत हफसा प्रेषितांशी वाद घालत असते. मी उठलो आणि सरळ हफसाकडं जाऊन विचारलं, 'तू प्रेषितांशी रागानं बोलत असते हे खरं आहे काय?' तिनं उत्तर दिलं, 'हो, मी असं करते.' मी म्हणालो, मी याबाबतीत तुला ताकीद करतो. अल्लाह तुला शिक्षा देईल.''

# जैनब

## (अल्लाह त्यांच्यावर राजी होवो)

प्रेषित मुहम्मद (त्यांना शांतता लाभो) यांच्या पाचव्या पत्नी जैनब (अल्लाह त्यांच्याशी राजी होवो) खुजैमा यांच्या कन्या होत्या. हवाजिन या प्रबळ कबिल्याशी त्यांचा संबंध होता. प्रेषितांशी विवाह केलेल्या त्यादेखील विधवा होत्या. लग्नाच्या वेळी त्यांच वय ६० वर्षांचं होतं. त्या उदार मनाच्या होत्या. गरीब आणि गरजवंतांना अन्नाची सोय करून देत होत्या. त्यांना लोक अत्याचारपीडितांच्या माता म्हणत असत. लग्नाच्या तिसऱ्या महिन्यातच त्या मरण पावल्या.

# उम्मे सलामा

## (अल्लाह त्यांच्यावर राजी होवो)

प्रेषित मुहम्मद (त्यांना शांतता लाभो) यांच्या सहाव्या पत्नी उम्मे सलामा (अल्लाह त्यांच्याशी राजी होवो) विधवा होत्या. त्या बनु फिरास टोळीतील एका उच्चभ्रू परिवारातल्या होत्या. सर्वप्रथम इस्लाम स्वीकारणाऱ्यांपैकी त्याही एक होत्या. कुरैश लोकांनी त्यांच्या मुलाला बरोबर घेऊन जाण्यास मज्जाव केल्यानं त्या आपल्या पतीबरोबर मदीनेस गेल्या नव्हत्या. प्रेषितांच्या शत्रुंनी केलेला हाही एक प्रकार होता. काही काळानंतर त्या मदीनेस जाण्यात यशस्वी झाल्या, पण त्यांनी मदीनेस स्थलांतर केल्यानंतर त्यांचे पती इस्लामच्या कारणास्तव शहीद झाले. आपल्या मागं त्यांनी चार मुलं सोडली होती. त्यातच त्या गर्भवती होत्या म्हणून उम्मे सलामा दु:खी झाल्या. प्रेषितांनी त्यांच्यावर दया दाखवली आणि विवाहाचा प्रस्ताव दिला. उम्मे सलामा आत्मसन्मानी होत्या. अगोदर त्या तयार नव्हत्या. कारण त्यांना पहिल्या पतीपासून चार मुलं होती. प्रेषितांनी त्यांना आश्वासन दिलं की ते आपल्या मुलांप्रमाणे त्यांचा सांभाळ करतील. त्या काहीशा भावनावश झाल्या आणि संमती दिली.

दया, प्रेम आणि अनुकंपाव्यतिरिक्त इतर कोणत्या कारणानं एखादी व्यक्ती वयाच्या ५६ व्या वर्षी चार मुलाबाळांच्या एका विधवेशी लग्न करू शकते? या विवाहामागं दुसरंही एक महत्त्वाचं कारण होतं. उम्मे सलामा यांचा संबंध मक्केतील सर्वांत जास्त प्रबळ बनी मखजुम टोळीशी होता आणि त्या वेळी ते इस्लामचे कट्टर शत्रू होते. या विवाहाद्वारे प्रभावी आणि शक्तिशाली टोळ्यांना इस्लामजवळ आणण्याचं पवित्र उद्दिष्ट प्रेषित मुहम्मद यांचं होतं.

उम्मे सलामा फार नेक महिला होत्या. प्रत्येक महिन्यात त्या तीन दिवस उपवास करीत असत आणि अनेकदा रात्रभर नमाजमध्ये व्यस्त असायच्या. त्या प्रेषितांचं म्हणणं अत्यंत आदरानं ऐकत आणि मोठ्या अदबीनं त्याचं पालन करीत.

# जैनब

## (अल्लाह त्यांच्यावर राजी होवो)

प्रेषित मुहम्मद (त्यांना शांतता लाभो) यांच्या सातव्या पत्नी जैनब (अल्लाह त्यांच्याशी राजी होवो). मदीनेस स्थलांतर केलं तेव्हा त्या विधवा होत्या. प्रेषितांनी त्यांचं लग्न दत्तकपुत्र जैद बिन हारिस (अल्लाह त्यांच्याशी राजी होवो) यांच्याशी करविलं होतं. जैद यांनी त्यांना तलाक दिला आणि प्रेषितांनी स्वत: त्यांच्याशी विवाह केला. त्या वेळी त्या ३८ वर्षं वयाच्या होत्या. मुहम्मद यांची निंदा करणाऱ्या अनेक लोकांनी या विवाहावर आक्षेप घेतलाय. ते लोक दोन प्रकारे यास नैतिकदृष्ट्या चुकीचं समजतात. पहिलं कारण असं की जैनब प्रेषितांच्या दत्तकपुत्र जैद यांच्या पत्नी असल्यानं त्या त्यांच्या कन्येसारख्या आहेत. दुसरं कारण हे की मुहम्मद यांनीच तलाक घडवून आणला जेणेकरून त्यांच्याशी लग्न करता यावं. तथापि विचारपूर्वक विश्लेषण केल्यास हे स्पष्ट होतं की ही टीका पूर्णत: बिनबुडाची आहे.

जैद एक गुलाम म्हणून प्रेषितांकडं आले होते. त्यांनी जैद यांना मुक्त केलं आणि आपला दत्तकपुत्र असल्याचं जाहीर केलं. जैद प्रेषितांना इतके पसंत होते की त्यांनी आपली आतेबहीण जैनबशी त्यांचा विवाह लावून दिला. जैनब अबु तालिब यांच्या नात होत्या. नंतर असं स्पष्ट झालं की जैद यांच्याशी आपलं लग्न झाल्याचं जैनब यांना त्यांच्या सामाजिक स्थितीबाबत समाधान नव्हतं. म्हणून प्रेषितांनी दोहोंमध्ये तलाक घडवून आणला होता. हा आरोप खोटारडा होता. जैनब प्रेषितांना अनोळखी नव्हत्या. त्यांच्या आतेबहीण असल्यामुळे बालपणापासूनच त्यांना ओळखत होत्या. पहिल्या पतीच्या निधनामुळे प्रेषितांना त्यांचं पुनर्वसन करायचं होतं. त्यांना जर जैनब यांचं आकर्षण असतं तर त्यांनी जैद यांच्याशी त्यांचं लग्न लावून दिलं नसतं. जैनब जैद बाबत समाधानी नव्हत्या. खरं पाहता त्यांना एका गुलामाशी त्यांचा विवाह झाला हे अजिबात आवडत नव्हतं. जैद यांनी अनेकदा जैनब यांच्या वागणुकीबाबत प्रेषितांकडं तक्रार केली होती. मात्र प्रेषित त्यांना नेहमी संयम पाळण्यास सांगत

होते. त्यांच्या दबावतंत्रानं जैद इतके विवश झाले होते की एके दिवशी रागाच्या भरात त्यांना तलाक दिला. याच दरम्यान कुरआनचं अवतरण झालं,

> ''मुहम्मद तुमच्या पुरुषांपैकी कोणाचे पिता नसून अल्लाहचे प्रेषित आणि सर्व प्रेषितांपैकी अखेरचे प्रेषित आहेत. अल्लाहस सर्व बाबींची माहिती आहे.'' (कुरआन, ३३:४०)

जैनब यांच्या नातलगांनी प्रेषित मुहम्मद यांना त्यांच्याशी विवाह करण्याचा आग्रह धरला. प्रेषितांनी ते मान्य केलं नाही आणि म्हणाले, 'असं करण्याचा विचार केला जाऊ शकत नाही.'' ते म्हणाले, ''त्या त्यांच्या मुलाच्या पत्नी आहेत.'' कारण इस्लामेतर लोकांमध्ये दत्तकमुलास नैसर्गिक संतान समजलं जाई. याच वेळी कुरआनचं (आयतीचं) अवतरण झालं आणि हे स्पष्ट केलं की दत्तकपुत्र नैसर्गिक संतान नसते. योग्य संतती म्हणून स्वीकारणं नैसर्गिक असते. मुहम्मद यांना अल्लाहनं जैनब यांच्याशी विवाह करण्याची अनुमती दिली. जैनब यांच्या प्रेषितांशी विवाहामागचं उद्दिष्ट अरबांमध्ये पूर्वापार चालत आलेल्या दत्तकपुत्रास नैसर्गिक संतान समजण्याची परंपरा खोटी ठरवण्याचं होतं. विवाहपद्धतीस धार्मिक मान्यता होती. कुरआनात म्हटलंय,

> ''जेव्हा ज़ैदनं (घटस्फोटासंबंधीची) औपचारिकता पूर्ण केली तेव्हा आम्ही त्यांना (जैनब यांना) तुमच्याशी विवाहबद्ध केलं...''
> (कुरआन, ३३:३७)

त्या वेळी जैनब यांनी नतमस्तक होऊन प्रार्थना केली, ''हे विधाता! जर मी त्यांच्या लायकीची असेन तर मला त्यांच्या विवाहबंधनात दे.'' त्याच वेळी वरील आयत अवतरली आणि प्रेषितांनी जैनब यांना त्यांचा विवाह विधात्यानं प्रेषितांशी केलाय, असं कळवलं. ही बातमी ऐकताच जैनब यांनी आपल्याकडील सर्व दागिने गुलाम मुलगा सलामा यांना दान करून टाकले, कारण त्यांनी ही खूशखबर आणली होती. त्या नतमस्तक झाल्या आणि दोन दिवस उपवास करण्याचं ठरवलं. (अल्लाहचे आभार व्यक्त करण्यासाठी)

प्रेषित मुहम्मद यांनी याप्रसंगी एका भव्य मेजवानीचं आयोजन केलं आणि आपल्या ३०० अनुयायी व त्यांच्या कुटुंबियांना जेवणाचं आमंत्रण दिलं.

# जुवैरिया

## (अल्लाह त्यांच्यावर राजी होवो)

प्रेषित मुहम्मद (त्यांना शांतता लाभो) यांच्या आठव्या पत्नी जुवैरिया (अल्लाह त्यांच्याशी राजी होवो) हारिस यांच्या कन्या होत्या. ते बनु मुस्तलिक या प्रबळ टोळीचे सरदार होते. त्यांचा विवाह याच टोळीतील सर्वांत लहान वंशजाशी झालेला होता. त्यांचे पती आणि पिता दोन्ही प्रेषितांचे जुने शत्रू होते. एका युद्धात जुवैरिया युद्धकैदी बनून आल्या. एकदा हारिस मागंपुढं बघत प्रेषितांकडं गेले आणि म्हणाले, ''हे मुहम्मद (स.), मी माझ्या लोकांच्या सरदारांपैकी एक असून माझ्या मुलीनं सेविका होणं मला शोभत नाही. तेव्हा मी विनंती करतो की तिला सोडून द्या. मी त्याबद्दलचं प्रतिधन देण्यास तयार आहे.'' प्रेषित म्हणाले, ''स्वत: जुवैरिया यांनीच याबाबत निर्णय घेणं बरं नाही काय?'' हारिस यांनी जुवैरियांना सांगितलं, ''मुहम्मद यांनी आता सर्व काही तुझ्यावरच सोडलंय. म्हणून त्या त्यांचा अपमान करणार नाहीत.'' त्या म्हणाल्या, ''मला मुहम्मद यांच्याच सेवेत राहणं आवडते. याची उत्तम पद्धत ही की प्रेषितांनी माझ्याशी विवाहबद्ध व्हावं.'' जुवैरिया यांनी दिलेल्या उत्तरानं हारिस यांचं समाधान झालं. नंतर प्रेषितांनी जुवैरिया यांचा पत्नी म्हणून स्वीकार केला.

या विवाहाद्वारे मुस्लिमांमध्ये त्याच्या कबिल्यासाठी आपुलकीच्या उदंड भावना उत्पन्न झाल्या. इतर सर्व युद्धकैद्यांना मुक्त करण्यात आलं. या विवाहामुळे पुन्हा शांततेचे मैत्रीपूर्ण संबंध प्रस्थापित झाले. आयशा यांना जुवैरिया फार आवडू लागल्या. त्यांनी जुवैरियांना इस्लामच्या मूलभूत शिकवणी शिकवल्या. त्यांनी लवकरच सर्व काही अवगत केलं आणि नव्या श्रद्धेस स्वत:ला वाहून घेतलं.

# उम्मे हबीबा

## (अल्लाह त्यांच्यावर राजी होवो)

प्रेषित मुहम्मद (त्यांना शांतता लाभो) यांच्या नवव्या पत्नी उम्मे हबीबा इस्लामचे जुने शत्रू अबु सुफियान यांच्या त्या कन्या होत्या. उम्मे हबीबा आणि त्यांच्या पतींनी आपल्या माता-पित्यांच्या इच्छेविरूद्ध लग्न केलं होतं. त्याच्या छळाला कंटाळून त्या दोघांनी ॲबिसिनियाकडं स्थलांतर केलं. तिथं त्याच्या पतीनं ख्रिस्ती धर्म स्वीकारला, मात्र उम्मे हबीबा यांनी इस्लामचा त्याग करण्यास नकार दिला. त्यांचे पती ऐशआरामाचं जीवन जगू लागले. त्यांनी मद्यपान करणं सुरू केलं, त्यामुळे त्यांना मरण आलं. त्या मक्केत परतल्यावर प्रेषितांना त्यांच्यावर दया आली आणि त्यांनी त्यांच्याशी लग्न केलं.

प्रेषितांच्या इतर अनेक विवाहांप्रमाणेच उम्मे हबीबा यांच्याशी त्यांच्या विवाहानं त्यांच्या परिवाराच्या अनेकांची मनं जिंकली आणि बनु अब्द शम्सचा प्रमुख कबिला इस्लामजवळ आला. उम्मे हबीबा यांच्याशी प्रेषितांच्या विवाहाचे अनेक परिणाम झाले. या विवाहाच्या निमित्तानंच खालिद यांनी इस्लाम स्वीकारला. अबु सुफियान यांच्याकडून होत असलेला प्रेषितांचा विरोध या विवाहामुळे कमी झाला. आता कुरैशांना याचं भान येऊ लागलं की प्रेषित मुहम्मद त्यांचे शत्रू नसून नेहमी त्यांचं भलं इच्छिणारे होते आणि अशा प्रामाणिक नातलगांशी भांडण करणं हा त्यांचा मूर्खपणा होय. प्रेषितांशी त्यांच्या विवाहासमयी उम्मे हबीबा यांचं वय ३८ वर्षांचं होतं. त्यांनी आपल्या जीवनातील प्रत्येक क्षण मुहम्मद यांच्या सेवेत समर्पित केला. प्रेषितांसोबत त्या २० वर्षांपेक्षा अधिक काळ हयात होत्या आणि ७३ व्या वर्षी त्यांचं निधन झालं. पहिल्या पतीपासून त्यांना दोन मुलं होती. प्रेषितांपासून त्यांना संतती नव्हती.

# सफिया

## (अल्लाह त्यांच्यावर राजी होवो)

प्रेषित मुहम्मद (त्यांना शांतता लाभो) यांच्या दहाव्या पत्नी सफिया (अल्लाह त्यांच्याशी राजी होवो) होत्या. खैबर युद्धाच्या वेळी त्या युद्धकैदी झाल्या होत्या. त्यांचे माता-पिता ज्यू धर्मिय होते. सफिया यांचं लग्न प्रसिद्ध ज्यू कवी बिन मिश्कम यांच्याशी झालं होतं. पण त्यांचं जमत नव्हतं. बिन मिश्कम यांनी त्यांना सोडचिट्टी दिली होती. सफिया यांनी एका ज्यू धर्मिय महान योद्ध्याशी पुनर्विवाह केला. खैबरच्या युद्धात सफिया पिता आणि परिवारातील इतर सदस्यांबरोबर तोदेखील मारला गेला. सफिया यांना युद्धकैदी बनवून एका अनुयायीच्या सेवेत देण्यात आलं. इतर अनुयायींनी त्यावर आक्षेप घेतला. त्यांच्या म्हणण्यानुसार एका कबिल्याच्या प्रमुखाची कन्या असल्यानं त्यांना प्रेषितांच्या सेवेत दिलं पाहिजे. सफिया यांनीदेखील मुस्लिम होऊन मुस्लिमांच्या प्रमुखाशी विवाह करण्याची इच्छा व्यक्त केली. याद्वारेच त्यांच्या लोकांमध्ये आदर आणि सन्मान अबाधित राहू शकेल असं त्या म्हणाल्या.

प्रेषितांना सफिया यांच्या चेहऱ्यावर डोळयाजवळ हिरव्या रंगाची खूण पाहिली आणि ''ते काय आहे?'' असं विचारलं. त्यांनी उत्तर दिलं, ''मी एक स्वप्न पाहिलं होतं. मदीनेतून एका चंद्राचा उदय झाला आणि तो माझ्या पदरात पडला. मी हे स्वप्न पती कनाना यांना सांगितलं. ते म्हणाले, 'तुला मदीनेच्या राजाशी लग्न करायचंय?' आणि त्यांनी माझ्या गालावर मारलं आणि ही खूण पडली.''

प्रेषितांचं ऐश्वर्य, व्यक्तिमत्त्व, त्यांची सत्यता, त्यांचं सभ्य वर्तन आमि त्यांच्या कार्याच्या सत्यतेनं सफिया फार प्रभावी झाल्या होत्य. त्यांनी इस्लाम स्वीकारला. त्यांना याचा आदर्श मानवतावाद आवडला होता. त्याच्या श्रद्धेस त्यांनी वाहून घेतलं. त्या नियमितपणे इस्लामचे विधी पार पाडीत असत आणि इस्लामच्या परंपरेचा आदर करीत होत्या. इस्लाम स्वीकारल्याचा गर्व होता.

प्रेषित मुहम्मद यांच्या जीवनकाळात एकदा माननीय उमर यांनी

सफिया यांना विचारलं, ''ज्यू धर्माशी त्यांचे अजूनही संबंध आहेत?'' ''मी शुक्रवारचा दिवस पाळते, शनिवार नव्हे.'' सफिया यांनी त्यांना बेधडक उत्तर दिलं, ''पण आपल्या ज्यू धर्मिय नातलगांशी मला अजूनही ओढ आहे. इस्लामनं याची मनाई केलेली नाही.'' उमर नि:शब्द झाले. त्यांना मुलंबाळं नव्हती. ६० वर्षाच्या वयात त्यांचं निधन झालं.

## मारिया

### (अल्लाह त्यांच्यावर राजी होवो)

मारिया यांची अलकझांड्रियाच्या प्रमुख ख्रिस्ती धर्मगुरू (आर्कबिशप) यांनी प्रेषित मुहम्मद यांना सेविका म्हणून भेट दिली होती. नंतर प्रेषितांनी त्यांना विवाहबंधनात आणलं. त्यांना एक गुलाम म्हणून ठेवून घेणं प्रेषितांना आवडलं नव्हतं. खदीजा यांच्यानंतर मारिया एकमेव पत्नी आहेत ज्यांच्यापासून प्रेषितांना मुलगा इब्राहीम झाला होता. जन्माच्या दोन वर्षांनी ते मरण पावले. मारिया यांना दु:ख अनावर होऊन काही वर्षांनी त्यांचंही निधन झालं.

## मैमूना

### (अल्लाह त्यांच्यावर राजी होवो)

प्रेषितांनी सर्वांत शेवटी मैमूना नामक विधवा महिलेशी विवाह केला. यापूर्वी त्यांचे दोन वेळा विवाह झाले होते आणि आता त्या वृद्ध झाल्या होत्या. प्रेषितांचं वय ५७ वर्षे असताना त्यांच्याशी विवाहबद्ध झाल्या. या विवाहामागचं कारण प्रेषितांचे चुलते अब्बास यांनी मैमूना यांच्या कबिल्याला इस्लाममध्ये आणण्यासाठी प्रेषितांकडं सूचना केली होती आणि नेमकं तेच घडलं. त्यांच्याशी प्रेषितांचा विवाह झाल्यावर कबिल्याच्या लोकांनी बहुसंख्येनं

इस्लाम धर्म स्वीकारला.

वर उल्लेखित मजकुराद्वारे आपल्या लक्षात येईल की प्रेषितांच्या इच्छा आकांक्षांमुळे अनेक विवाहांची सुरुवात झाली नव्हती, तर स्वयं अल्लाहनंच या विवाहांची योजना आखली होती. मैमूना यांच्याशी त्यांचा शेवटचा विवाह झाल्यावर अल्लाहनं आपल्या पैगंबराला आदेश दिला, ''आता कुणाशी विवाह करू नका.'' (कुरआन, ३३:५२) कारण त्यावेळपर्यंत विवाहामागची उद्दिष्टे साकार झालेली होती आणि प्रेषितांचं कार्य अंतास येत होतं.

यातल्या अनेक महिला जवळपास ४० ते ५० वर्षं वयाच्या होत्या. म्हणजे प्रेषितांनी लग्न केलं तेव्हा त्यांच्या वयातला पहिला आणि महत्त्वाचा टप्पा उलटून गेलेला होता. त्या घटस्फोटित किंवा विधवा होत्या. अनेकजणींना त्यांच्या पहिल्या पतीपासून मुलं होती. त्या सर्वांना त्यांचा आश्रय हवा होता किंवा भेट म्हणून त्यांना दिल्या होत्या; पण त्यांनी त्यांना विधिवत पत्नी बनवलं. खदीजा आणि मारिया यांना वगळता त्यांच्या पत्नींपासून प्रेषितांना संततीलाभ झाला नाही.

या तथ्यावरून निर्णायकपणे हे सिद्ध होतं की प्रेषितांच्या विवाहबंधनांमागे सामाजिक आणि राजकीय उद्दिष्टे होती किंवा मानवतेच्या आधारावर त्यांना प्रिय असलेल्या इस्लामकार्याकाठी हे विवाह केले गेले होते. प्रेषित मुहम्मद यांच्या विवाहांबाबत ही सर्वसाधारण पृष्ठभूमी आहे. ते ठळकपणे हे सिद्ध करतात की या विवाहांमागं भौतिक गरजा नव्हत्या. हे समजणं आकलनाबाहेरची गोष्ट आहे की वैयक्तिक इच्छा-आकांक्षांच्या पूर्ततेसाठी प्रेषितांनी हे विवाह केले होते. मित्र असो की शत्रू ज्यांना प्रेषितांच्या नैतिक सचोटी किंवा त्यांच्या आध्यात्मिक श्रेष्ठतेवर या अनेकविध विवाहांच्या संदर्भात संशय असेल, त्यांना खालील प्रश्नांची सविस्तर आणि समाधानकारक उत्तरं शोधावी लागतील. कुणाही स्त्रीशी कसलाही संबंध नसताना त्यांनी पहिला विवाह वयाच्या २५ व्या वर्षी का केला? स्वत:पेक्षा १५ वर्षं जास्त वय असलेल्या वृद्ध विधवेची त्यांनी का निवड केली? ५० वर्षं वयापर्यंत ते त्यांच्या मृत्यूपर्यंत त्यांच्याबरोबर का राहिले? त्यांनी असहाय्य विधवा आणि घटस्फोटित महिलांचा का स्वीकार केला? ऐशआरामाचं जीवन

जगण्यापेक्षा त्यांनी साधं आणि कठीण जीवन जगणं का पसंत केलं? त्यांनी आपले अनेक विवाह आपल्या जीवनातील पाच वर्षांच्या काळातच का केले, ज्या काळात ते आपल्या कामामध्ये गुंतलेले होते आणि त्यांचं इस्लामी कार्य धोक्यात सापडलं होतं? जर त्यांना वैवाहिक आणि तीव्र भावनांनी त्यांच्यावर ताबा घेतला होता तर ते जसे होते तसे का जगले? या गोष्टी साध्या नाहीत. स्त्री आणि इच्छांच्या संदर्भात त्यांचं स्पष्टीकरण होऊ शकत नाही. यावर गंभीर आणि प्रामाणिक विचारविनिमय करण्याची गरज आहे.

एक पाश्चात्य साहित्यिक कॅरेन आर्मस्ट्राँग यांचा एक उतारा इथं प्रस्तुत करणं प्रसंगोचित ठरेल. त्या आपले पुस्तक 'मुहम्मद; अ प्रॉफेट फॉर अवर टाइम'मध्ये प्रेषितांच्या विवाहांबाबत लिहितात, ''इस्लामच बहुपत्नित्वाची संस्था, कायद्याचा एक भाग होती. या कायद्याचं उद्दिष्ट पुरुषाच्या लैंगिक वासनांची पूर्तता करणं नव्हतं तर विधवा, अनाथ आणि इतर असहाय्य स्त्रियांवर होत असलेल्या अन्याय-अत्याचाराला आळा घालण्यासाठी हा कायदा केला गेला. कितीतरी वेळा तत्त्वहीन लोक सर्व काही हडप करतात आणि परिवारातल्या दुर्बल लोकांसाठी काहीच सोडत नाहीत. त्या असुरक्षित महिलांचाही चांगल्या प्रकारे विवाह केला जावा म्हणून बहुपत्नित्वाचा कायदा केला गेला. त्याचबरोबर जुने आणि बेजबाबदार संबंध रद्द केले. पुरुषांनी फक्त चार पत्नी कराव्यात आणि त्यांना न्याय्य वागणूक द्यावी. त्यांची मालमत्ता अन्यायाच्या मार्गानं खाऊन टाकू नये. कुरआननं स्त्रीला कायदेशीर दर्जा देऊ केला, जो पाश्चात्य स्त्रीला १९व्या शतकापर्यंत मिळालेला नव्हता. स्त्रियांची गुलामीतून सुटका करणं हीच प्रेषितांची मनापासून इच्छा होती.''

# अनेकविध विवाहांची कारणं

काही टीकाकार अशी चर्चा करत असतात की प्रेषित मुहम्मद यांनी लैंगिक कारणासाठीच अनेकविध विवाह केले आणि त्यांच्या कार्याचं गांभीर्यानं अध्ययन न करताच निर्णय घेऊन टाकतात. विवाहापूर्वी त्यांचं जीवन कसं होतं, विवाहानंतर मक्केत आणि मदीनेत कोणत्या प्रकारचं जीवन होतं याचाही ते विचार करत नाहीत.

मदीनेमध्ये त्यांनी निरनिराळ्या उद्दिष्टांसाठी, वैयक्तिक व कबिल्यांविषयी आणि राजकीय हितांसाठी अनेक विवाह केले. आपल्या घरगुती जीवनाचा विस्तार सुरू केला तेव्हा त्यांचं वय ५० वर्षांचं होतं आणि त्या सर्व पत्नी एक प्रकारे विधवा होत्या. दोन पत्नी वगळता बाकीच्यांचं वय ३६ वर्षांपेक्षा जास्त होतं. चोहोबाजुंनी त्यांना शत्रूनं वेढलं होतं. आतून दांभिक आणि ज्यू धर्मियांपासून त्यांना धोका होता. कुरैश लोकांनी हल्ल्यांची मालिकाच नियोजित केली होती. मदीना शहर त्यांच्या लक्ष्यावर होतं. अवतीभवतीच्या टोळ्या मदीनेच्या सुरक्षेसाठी सतत धोका उत्पन्न करत होत्या. रात्रीच्या वेळी शांतपणानं झोपणं कठीण झालं होतं. अशा स्थितीत कोण बरं आनंददायी जीवन जगू शकत होतं? दुष्ट प्रवृत्तीची लोकं इतरांविषयी आपल्या स्वत:च्या इच्छा आणि भावनांप्रमाणे निर्णय घेत असतात, ते स्वत: दुष्ट असल्यानं इतरांनाही तशाच नजरेनं पाहत असतात.

प्रेषितांची जीवनशैली साधी, नम्रतापूर्वक आणि सभ्य होती. फर्नीचरच्या नावाखाली घरी दोन चटया होत्या. जग, एखादं ब्लँकेट आणि अशाच साध्यासुध्या वस्तू होत्या. दिवसाच्या वेळी ते आपल्या कामात व्यस्त असत. ते अरब द्वीपकल्पाचे सार्वभौम सत्ताधीश, सर्वोच्च न्यायाधीश, लष्करप्रमुख इत्यादी होते आणि रात्रीच्या वेळी ते सर्वांत समर्पित व्यक्ती होते. कुरआनचं म्हणणं आहे,

> ''तुम्ही रात्रीच्या वेळी कमी-जास्त दोनतृतियांश भाग (आराधनेत) उभं राहता.'' (कुरआन, ७३:२०)

त्यांच्या जीवनातील शेवटच्या काळात मदीनेच्या चारी दिशांनी धनसंपत्तीचा वर्षाव होत होता. त्यांच्या पत्नींमधील अधिकतर श्रीमंत व सभ्य अरब घराण्याच्या होत्या. आपल्या माता-पित्याच्या घरी त्या ऐशोआरामात जीवन जगत होत्या. पण प्रेषितांच्या घरी इतर आरामदायी वस्तू तर सोडाच जगण्यासाठी अत्यावश्यक साधनंदेखील उपलब्ध नव्हती. प्रेषित स्वत: कित्येक दिवस उपाशी राहत किंवा उपवास करत असत. त्यांच्या पत्नींसाठी केलेली तरतूद क्षुल्लक प्रमाणाची असे. आता मदीनेत संपत्तीचा लोंढा वाहताना आणि इतर लोकांमध्ये ते वाटून देताना पाहून त्यांनी आपल्या गरजा पूर्ण करण्यासाठी त्यांना अधिक प्रमाणात तरतूद करण्याची मागणी प्रेषितांकडं केली. यासंबंधी कुरआन म्हणतो,

> ''हे प्रेषित! आपल्या पत्नींना सांगा, जर तुम्हाला याच जगी आपल्या इच्छा पूर्ण करायच्या असतील, ऐश्वर्य हवं असेल तर मग या, मी त्याची तरतूद करून देतो आणि सभ्यतापूर्वक तुम्हाला निरोप देतो.''

त्यांना दोन पर्याय दिले होते. एक तर त्यांनी मुहम्मद यांच्या समवेत राहून नम्रतेनं गरिबीचं जीवन जगावं किंवा पाहिजे ती धनसंपत्ती घ्यावी आणि निघून जावं. त्या सर्वांनी मनापासून राजीखुशीनं गरिबीमध्ये त्यांच्याबरोबर राहणं मान्य केलं. तरीदेखील काही लोकांचं हे मत आहे की प्रेषितांना ऐहिक सुखसुविधांची इच्छा होती? अशा लोकांनी अगोदर आपल्या जीवनामध्ये डोकावून पाहावं आणि आपण कुठं आहोत हे बघावं मगच प्रेषितांचा स्वभाव, त्यांची जीवनशैली यांचा विचार करावा मग काय तो निर्णय घ्यावा आणि हा निर्णय इतिहासाच्या भक्कम पुराव्यांसह तथ्यावर आधारित असावा.

उहुदच्या युद्धात बरेच मुस्लिम सैनिक कामी आले. त्यांच्या पश्चात त्यांच्या विधवा पत्नी आणि अनाथ मुलांचं संगोपन उरलेल्या मुस्लिमांना करायचं होतं. विवाहसंबंध अशा विधवा महिला आणि अनाथ मुलांना आधार देण्याचा उत्तम पर्याय होता. प्रेषित मुहम्मद आणि त्यांचे अनुयायी अशा विधवा स्त्रियांना विवाहबंधनाशिवाय आपल्या घरी घेऊ शकत नव्हते आणि याच कारणास्तव प्रेषितांनीही असहाय्य आणि निराधार स्त्रियांशी विवाह केले.

मुस्लिमांनी अनेकांना युद्धकैदी बनविलं होतं. ज्यांना संरक्षण देणं भाग होतं त्यांना ठार केलं नाही. त्यांचे मानवी आणि भौतिक अधिकार नाकारले नव्हते. याउलट विधिवत विवाहांद्वारे त्यांना स्थैर्य दिलं गेलं. मुहम्मद आणि त्याच्ंया सहकाऱ्यांनी अशा असंख्य विधवा आणि महिला युद्धकैद्यांना सुरक्षा प्रदान केली आणि त्यांच्या मुलाबाळांना उपासमारीनं नाश होण्यापासून वाचवलं.

जर अशा विधवा आणि इतर महिलांना मोकाट सोडून दिलं असतं तर सारं वातावरणच भ्रष्ट होऊन नासून गेलं असतं. अशा रितीनं समाजाला अध:पतनापासून वाचवलं गेलं. प्रेषित आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी अशा महिलांना आपल्या हरममध्ये विवाहबंधनाशिवाय ठेऊन घेतलं नव्हतं. विधवा आणि अनाथांसाठी दुसऱ्या कोणत्या उपायाचा विचार कुणी करू शकतो? पवित्र कुरआनमध्ये ही गोष्ट पहिल्यापासून गृहित धरली होती आणि म्हणून तो विवाहाच्या उद्दिष्टांविषयी म्हणतो,

''तुमच्यावर कुणी आरोप लावता कामा नये.''

या विवाहांचं आणखी एक कारण हेही होतं की प्रेषितांच्या उक्ती आणि कृती मानवी समाजासाठी जतन करून ठेवण्याची खात्री करून घ्यावी. प्रेषितांना सकल जगाचं मार्गदर्शक बनवून पाठवलं गेलं होतं. त्यांच्या कृती आणि कर्म अल्लाहच्या मार्गदर्शनाखाली होते.

मानवजातीच्या संख्येत स्त्रियांचा वाटा निम्मा आहे. त्यांच्यापर्यंत इस्लामचा संदेश प्रभावीपणे आणि प्रामाणिकपणे पोचता करायचा होता. पुरुषांना प्रेषित मुहम्मद आपला संदेश दररोज प्रत्यक्ष कृतीनं आणि शिकवणींद्वारा पोहोचवत होते. इतर स्त्रियांपर्यंत हा संदेश पोचवण्यासाठी मनाची तयारी असलेल्या श्रद्ध आणि समर्पित महिलांच्या एका गटाची अत्यंत आवश्यकता होती. या उद्दिष्टासाठी प्रत्यक्ष व प्रभावी एकमेव मार्ग म्हणजे प्रेषितांनी बहुपत्नित्वाचा सिद्धान्त अवलंबावा. त्या प्रेषितांच्या सान्निध्यातल्या होत्या. त्यांचा उपदेश ऐकत होत्या आणि त्यांना कृती करताना जवळून पाहत होत्या. प्रेषितांच्या पत्नींच नियमित शिक्षण आणि संस्कारात प्रेषितांचं ज्ञान आणि नाजुक व गुप्त गोष्टींचा तपशील होता ज्यांचा संबंध फक्त स्त्रियांच्याच

समस्यांशी आहे, ते ज्ञान दुसऱ्या एखाद्या मार्गानं मानवांपर्यंत पोचलं नसतं. त्यांनी प्रामाणिकपणे आणि तीव्र श्रद्धेनं इस्लामचं ज्ञानभंडार आणि प्रेषितांच्या कृती, ज्या त्यांनी स्वत: पाहिल्या होत्या. त्यांच्या आचरणाद्वारे लाभलेल्या शिकवणी इतरांपर्यंत पोचत्या केल्या.

या विवाहांची अन्य काही कारणं–

(अ) कबिले / टोळ्यांतर्गत विवाहांना प्रेरणा देणं.

(ब) विधवांच्या पुनर्विवाहाचं महत्त्व पटवून देणं.

(क) घटस्फोटित महिलांचा पुनर्विवाह.

(अ) आंतरजातीय विवाहावर बंदी घालून समाजाची कशी चेष्टा करण्यात आली हे आपण पाहतच आहोत. मानवजातीला प्रत्यक्ष बोध घडावा यासाठी प्रेषितांनी जन्माच्या आधारावरील जाती-जमातींमधील सर्व मतभेद बाजूला सारले. सफिया ज्यूधर्मिय महिला होत्या. त्यांच्याशी विवाह करून प्रेषितांनी हे दाखवून दिलं की एक मुस्लिम कोणत्याही स्त्रीच्या गतकाळातील धर्माचा विचार न करता, विविध देश-राष्ट्रियत्वाचा विचार न करता तिच्याशी विवाह करू शकतो, मात्र तिनं अल्लाहबरोबर इतरांना भागीदार बनवू नये. मारिया यांच्याशी झालेला विवाह अशाच प्रकारचा होता.

(ब) विधवांचा पुनर्विवाह यापूर्वी एक मोठी समस्या होती. विशेषकरून भारत आणि इस्लामपूर्व जगतात. प्रेषितांनी अशा विवाहांची प्रेरणा दिली. त्यांनी स्वत: आयशा आणि घटस्फोटित जैनब यांना वगळता सर्व विधवा पत्नींशी विवाह करून एक आदर्श घडवला होता.

(क) इस्लामपूर्व काळातील अरब लोक घटस्फोट झालेल्या स्त्रियांशी विवाह करत नव्हते. त्यांना शिकवण देण्यासाठी प्रेषितांनी जैनब यांच्याशी विवाह केला. जैनब एका मुक्त केलेल्या गुलाम जैद यांच्या पूर्व पत्नी होत्या.

- प्रेषित मुहम्मद यांच्या विवाहसंबंधांवर वरवर नजर टाकली तर त्या विवाहांचं राजकीय महत्त्व आपल्या लक्षात येईल. याच संबंधांद्वारे विविध कबिल्यांशी प्रेषितांनी जवळीक साधली. हे कबिले भौगोलिक स्तरावर सबंध अरब द्वीपकल्पात पसरलेले होते. कबिल्यांच्या नात्यांद्वारे प्रेषितांच्या स्थितीला बळ मिळालं. यामुळे विविध कबिल्यांचा विरोध शमला. त्याच्या आकाक्षांवर आळा बसला आणि कौटुंबिक कलहांवर दडपण आलं. यामुळे अरब द्वीपकल्पामध्ये सामाजिक शांतता आणि न्यायाची स्थापना झाली.

- प्रेषितांचे काही विवाह कायदेविषयक आणि काही विकृत रुढी रद्द करण्यासाठी होते. अशाच प्रकारचा जैनब यांच्याशी त्यांचा विवाह होता. घटस्फोटित महिलांना विवाहाचा अधिकार आहे हे दाखवून देण्यासाठी जैद यांना प्रेषितांनी दत्तक घेतलं होतं आणि तत्कालीन अरब परंपरेप्रमाणे त्यांना आपला मुलगा म्हणत होते. पण इस्लामनं ही प्रथा रद्द करून टाकली. मुहम्मद पहिले पुरुष होते ज्यांनी प्रत्यक्षात आपली मान्यता नाकारली. त्यांनी आपल्या दत्तकपुत्राच्या घटस्फोटित पत्नीशी विवाह केला, हे दाखवण्यासाठी की दत्तक घेणयाचा अर्थ दत्तक गेलेलं मूल दत्तक घेणाऱ्या बापाची खरी संतान होत नाही. त्याचबरोबर हेही दाखवून देण्यासाठी की घटस्फोटित महिलेशी विवाह करणं कायदेशीर आहे.

वास्तविक पाहता जैनब प्रेषितांच्या चुलत बहीण होत्या आणि जैद यांच्याशी लग्नाआधी त्यांना लग्नाचा प्रस्ताव दिलेला होता. त्या वेळी प्रेषितांनी तो नाकारला होता. पण जेव्हा त्यांचा तलाक झाला, त्यांनी त्यांना स्वीकारलं ते कायदेविषयक दोन कारणांनी. घटस्फोटित महिलेशी विवाह करणं कायदेशीर आहे आणि दुसरं दत्तकपुत्राची वास्तविक स्थिती काय हे स्पष्ट करण्यासाठी. जैनब यांच्याविषयीचा हा वृत्तान्त काही लोकांच्या डोक्यामध्ये प्रेषितांच्या नैतिकतेविषयी हास्यास्पद विचारांशी संबंधित आहे. प्रेषितांचे शत्रू आणि त्यांच्या टीकाकारांचं हे कुभांड चर्चा करण्यासारखं नाही. (पाहा- कुरआन, ३३:३६-३८)

काही मुस्लिम कथन करणाऱ्यांना प्रेषितांचं पौरुष्य महत्त्वाचं वाटत

होतं अशांच्या क्षुल्लक आणि खोट्या कथनांचा प्रेषितांचे शत्रू आणि टीकाकारांनी उपयोग करून घेतला, हे दुर्भाग्य! त्यांच्या ह्या कथानकांमध्ये प्रेषितांच्या विवाहांच्या प्रकाराशीही साम्य आढळत नाही किंवा न त्यांच्या विवाहाच्या वास्तविकतेशीही संबंधित आहेत. परिणामी अशा बनावट वृत्तान्तांद्वारे प्रेषितांच्या शत्रू आणि पौर्वात्य अभ्यासकांच्या डोळ्यांचं पारणं फिटलं. मुस्लिमांच्या एका वर्गामध्ये याविरूद्ध प्रचंड प्रतिक्रिया उमटतेय.

कुरआन समकालीन समस्यांना हाताळत असतानाच अशा प्रकरणांविषयीही चर्चा करतो कारण त्या मूलगामी आणि कायमस्वरूपी असतात. विविध आयती- अध्यायांच्या अवतरणकाळाद्वारे त्या-त्या वेळची परिस्थिती समजून घेण्यास मदत होते. आणि म्हणूनच मुहम्मद यांच्या अनेकविध विवाहांना काळसापेक्ष दृष्टिकोनातून पाहायला हवं.

'द मेसेंजर : द लाइफ ऑफ मुहम्मद' या आपल्या पुस्तकात इंग्लंडचे चरित्रकार आर. व्ही. बोडले लिहितात,

> ''प्रेषित मुहम्मद यांच्या विवाहजीवनाकडं पाश्चिमात्य दृष्टिकोनातून ख्रिस्ती मापदंडानुसार पाहिलं जाऊ शकत नाही. ते एका अशा काळात आणि अशा देशात राहत होते जिथं त्यांचे स्वत:चंच नैतिक प्रमाण लागू होते.''

बोडले विचारतात,

> ''यूरोप आणि अमेरिकी नियमांनाच का म्हणून आशिया आणि आफ्रिकेच्या नियमांपेक्षा श्रेष्ठ समजलं जावं. त्यांचं म्हणणं असं की जोवर पाश्चात्य मंडळी हे सिद्ध करत नाहीत की त्यांचं जीवनमान इतरांच्या तुलनेत उच्चतम नैतिक मूल्यांवर आधारित आहे. त्यांनी इतर वंश, जाती आणि राष्ट्रांबाबत आपले निर्णय राखीव ठेवावेत.''

प्रेषितांच्या शत्रू आणि विरोधकांची यादी लांबलचक आहे. यामध्ये पाश्चात्य देशांतील काही महान नावांचा समावेश आहे. तरीपण मुहम्मद आणि त्यांच्या धर्मानं त्यांचं भीषण आक्रमण पचवलंय. कोणत्याही धर्माच्या तुलनेत

गेल्या पंधराशे वर्षांपासून प्रत्येक काळात आणि सर्व देशांमध्ये इस्लामनं अधिकाधिक लोकांना आकर्षित केलंय. इतिहास सांगतोय की इस्लामला जितकं जास्त चिरडलं जातं तितकाच तो शक्तिशाली बनतो.

# २३

# मदीना

## (एक आदर्श नगर)

प्रेषित मुहम्मद (त्यांना शांतता लाभो) यांनी मदीना येथे प्रथमच एका राजवटीची स्थापना केली होती. त्यांच्याकडं एका सुव्यवस्थित शासनाचा वारसा नव्हता. मूलत: ते एका अशा समाजाची सुधारणा करीत होते जो असंख्य कबिले, टोळ्या, जाती-जमातींमध्ये विभागलेला होता आणि जो-तो आपापल्या जाती-जमातीच्या विधी-परंपरेनुसार जीवन जगत होता. तिथं शासनाच्या कोणत्याही संस्था, जसे- न्यायव्यवस्था, लष्कर, शिक्षण विभाग, सर्वसाधारण प्रशासन वगैरे अस्तित्वात नव्हतं. याचं साधं कारण म्हणजे त्यांच्या आगमनापूर्वीही ते नव्हतं. त्यांना तळागाळातून सुरूवात करायची होती.

एक असा समाज ज्याला, संघटन आणि प्रशासनाचा अनुभव नव्हता, त्यामध्ये प्रेषित मुहम्मद यांनी समाजबांधणीच्या प्रक्रियेची सुरूवात केली. त्यांनी जीवन आणि विकासाच्या कोणत्याही क्षेत्राला हात घातला नाही असं नाही. नियम आणि कायदे बनवणं, जुन्या प्रथा मोडीत काढणं आणि मदीनेच्या लोकांना नवीन कायद्यांशी अनुकूल करणं काही क्षुल्लक बाब नव्हती. गेल्या दोन हजार वर्षांपासून सबंध अरब द्वीपकल्पातील लोक काळोखात लोटलेले असताना त्यांनी एका अशा मदीना राजवटीची कल्पना दिली होती जी त्यांना प्रकाशमान करणार होती.

पंधराशे वर्षांपूर्वी त्यांनी ज्या सुधारणांचा आरंभ केला त्यांचा ओझरता आढावा घेतला तर दिसून येईल की ते आपल्यापेक्षा फार पुढं होते.

मध्यपूर्वेत त्यांनी एक अशी व्यवस्था रुजविली जी परिपूर्ण इस्लामी सभ्यतेसाठी मैलाचा दगड ठरली.

त्यांनी पहिलीवहिली जी संस्था स्थापन केली ती मस्जिदे-नबवी (प्रेषितांची मशीद) होती. ती शहरातील हालचालींचं केंद्रस्थान होतं. या मशिदीला लागूनच प्रेषितांचं निवासस्थान होतं. प्रार्थनास्थळाबरोबरच (नमाज आणि इतर धार्मिक कार्यक्रमाचं स्थळ) ती सामाजिक केंद्र म्हणूनही उपयोगी होऊ लागली. ती शासकीय निवासस्थान होतं. विद्येचं केंद्र तसेच वैद्यकीय उपचाराची जागा होती. पुनर्वसनाचं केंद्र, समाजकल्याण केंद्र, त्याचबरोबर मनोरंजनाच्या बाबींचंही केंद्र होती.

नव्यानं उदयास येत असलेल्या शहराच्या मध्यभाग असल्यानं सर्व लोकांना इथं सहज प्रवेश मिळत होता. विविध भाषा बोलणाऱ्या, वेगवेगळ्या आवडीनिवडीच्या, रंगाच्या लोकांच एकत्रित येण्याचं हे सर्वप्रथम सार्वजनिक ठिकाण असल्यानं प्रेषितांच्या मशिदीद्वारे सामाजिक एकता घडून आली.

लांबवरचे प्रतिनिधीमंडळ याच मशिदीच्या सान्निध्यात स्थायिक व्हायचे. ज्या लोकांना कसली मदत हवी असेल आणि जे लोक मदत पुरविण्यास तत्पर असत ते इकडंतिकडं न जाता मशिदीतच यायचे.

# इतिहासातली पहिली लिखित राज्यघटना

मदीनेस स्थलांतर केल्यानंतर प्रेषित मुहम्मद (त्यांना शांतता लाभो) यांनी एका नगर-राजवटीचा (City-State) पाया रचला आणि एक राज्यघटना लागू केली. इतिहासातली ही लिखित स्वरूपातली सर्वप्रथम राज्यघटना आहे. इस्लामी राज्यातली सर्व नागरिकांच्या हक्काधिकार आणि त्यांची कर्तव्यं यामध्ये विहित केली गेली, यात मुस्लिम, ज्यू, ख्रिस्ती आणि अनेकेश्वरी अरब नागरिकांचा समावेश आहे.

# ज्ञानाचं प्रोत्साहन

प्रेषित मुहम्मद (त्यांना शांतता लाभो) यांनी ज्ञान संपादन करण्यास अनन्यसाधारण महत्त्व दिलं आणि असं जाहीर केलं की *''ज्ञान संपादन करणं प्रत्येक मुस्लिमाचं अनिवार्य कर्तव्य आहे.''*

''थोडंसं ज्ञान मोठ्या प्रमाणातल्या आराधनेपेक्षा चांगलं आहे.''

प्रेषितांचं निवेदन आहे, ''एका नेक व्यक्तीवर एका विद्वानाचं श्रेष्ठत्व, ताऱ्यावर पौर्णिमेच्या चंद्राच्या श्रेष्ठत्वासारखं आहे.''

''ज्ञान संपादन करणाऱ्यास दूत आपल्या पंखांच्या छायेत घेतात.''

# *अल-सुफ्फा*

## इस्लामचं पहिलं विद्यापीठ

प्रेषित मुहम्मद (त्यांना शांतता लाभो) यांना विशेषकरून सर्वसामान्य लोकांच्या साक्षरतेबाबत फार काळजी होती. शाळा उघडून ज्ञानप्रसारासाठी त्यांनी एक विस्तृत योजना अंमलात आणली. अल-सुफ्फा याचंच उदाहरण होतं. सुफ्फा - लांब आकाराचा एक चौथरा (मस्जिदे-नबवीमध्ये) बांधलेला होता. मदीनेत स्थलांतर करून येणाऱ्या नव्या मुस्लिमांसाठी, ज्यांच्या गरजांची तरतूद करण्यासाठी त्यांच्या परिवाराचे कोणी नातेवाईक नव्हते अशांना आश्रय देण्यासाठी तो बांधला होता.

या लोकांमधील साक्षर लोकांवर प्रेषितांनी मदीनेच्या निरक्षर सामान्य लोकांना साक्षर करण्याची जबाबदारी सोपवली. काही अशा लोकांना जे विद्वान होते, त्यांना इस्लाममध्ये नव्यानं प्रवेश करणाऱ्यांस इस्लामच्या शिकवणी आणि विधी शिकवण्यास सांगितलं. आणि काही इतर लोकांना रोजच्या रोज इस्लाम स्वीकारणाऱ्या जाती-जमातींच्या इस्लामी प्रशिक्षणासाठी गावोगावी पाठवलं जात होतं.

दिवसा सुफ्फामध्ये शाळा भरत होती आणि रात्री वसतीगृह. खरं पाहता हे इस्लामचं पहिलं निवासी विद्यापीठ होतं. जबलपुत्र मआज यांना प्रमुख म्हणून नियुक्त केलेलं होतं. मआजनं आपलं उभं जीवन आणि सर्व साधनं इस्लामसाठी समर्पित केली होती. कर्जाची परतफेड करण्यासाठी त्यांनी आपलं घरदेखील विकून टाकलं होतं.

प्रेषितांनी स्वतः एखाद दुसरं व्याख्यान इथं दिलं होतं. मदीनेच्या समाजात त्यांची महत्त्वाची जबाबदारी आणि इतर कामांमध्ये व्यस्त असतानादेखील जेव्हा कधी शक्य होईल ते अल-सुफ्फा इथं शिकवण्यास वेळ काढीत होते. त्या वेळी त्यांचे बरेच सहकारीही तिथं जमायचे.

एक दिवस प्रेषित आपल्या घरामधून अल-सुफ्फा इथं आले. त्यांनी माणसांचे दोन गट पाहिले. एक गट प्रार्थनेमध्ये तल्लीन होता आणि दुसरा गट शिक्षण प्राप्त करीत होता. प्रेषित म्हणाले, *''दोन्ही गट भल्या कामांमध्ये गुंतलेले आहेत, पण जो गट विद्या प्राप्त करीत होता तो अधिक चांगला.''*

प्रेषित मुहम्मद असंही म्हणाले,

''रात्रीच्या वेळी जर कुणी एक तास ज्ञान संपादनासाठी खर्ची घालत असेल तर ते रात्रभर प्रार्थना करण्यापेक्षा उत्तम आहे.''

अल-सुफ्फाच्या स्थापनेनंतर इतर ठिकाणीही शाळा उघडण्यात आल्या. अल-सुफ्फा वगळता मशिदीशी संलग्न मदीना शहरात विविध ठिकाणी नऊ शाळा होत्या, असं एक इस्लामी अभ्यासक बलाजुरी यांचं म्हणणं आहे.

मदीनेबाहेर अशा वस्त्यांमध्ये जिथं लोक अधिक प्रमाणात इस्लाम स्वीकारत होते, त्यांच्या मागणीनुसार प्रेषितांनी त्यांना धर्माचं प्रशिक्षण देण्यासाठी आपल्या प्रतिष्ठित सहकाऱ्यांना पाठवत असत. अम्र बिन हज्म यांना येमेनच्या राज्यपालपदी नियुक्त केलं. त्यांच्या प्रशासनिक कर्तव्यामध्ये शिक्षण देणंही सामील होतं.

# स्त्रियांचं शिक्षण

प्रेषित मुहम्मद (त्यांना शांतता लाभो) म्हणाले,

''तुम्ही एका पुरुषास शिकवाल तर तुम्ही एकच व्यक्तीस शिकवता. पण जर तुम्ही एका मुलीस किंवा महिलेस शिक्षण दिलं तर तुम्ही सबंध परिवाराला शिक्षण दिल्यासारखं आहे.''

ज्ञान संपादनाच्या संदर्भात प्रेषित मुहम्मद यांनी स्त्री-पुरुष भेद केला नाही. ज्या ज्या वेळी पवित्र कुरआनच्या अध्यायांचं (आयतींचं) अवतरण होत असे प्रेषित ते अवतरण प्रथम पुरुषांना आणि नंतर स्त्रियांना वाचून दाखवित असत. आठवड्यातून एक दिवस त्यांनी फक्त स्त्रियांच्याच शिक्षणासाठी ठरवून दिला होता. त्या त्यांना सर्व प्रकारचे प्रश्न विचारीत आणि प्रेषित संयमानं व आदरानं त्यांची उत्तरं देत असत.

प्रेषित मुहम्मद यांच्या पत्नी आयशा (अल्लाह त्यांच्याशी राजी होवो) यांनी प्रेषितांचं कथन केलंय ते असं : ''अन्सार महिला (अन्सार- मदीनेचे स्थानिक लोक) स्तुती आणि कौतुकास पात्र आहेत. त्यांची सभ्यता त्यांना ज्ञान संपादनापासून रोखत नाही. प्रेषितांच्या आयुष्यात मोजक्या महिलांनी कुरआन तोंडपाठ केलं होतं. त्यांच्यातल्या काही महिला कुरआनचं भाष्य करण्याचं प्रशिक्षण देत असत. असंख्य महिला प्रेषितांच्या वचनांचं वर्णन करीत असत. त्यांच्यापैकी काही महिला पुरुषांसारखंच अधिकृतपणे 'फतवा' (धार्मिक उपदेश) देत होत्या. उम्मुल फज्ल करीमा नामक एक महिला आपल्या घरीच शाळा चालवित होत्या. प्रेषितांच्या काळात कमीतकमी पाच स्त्रियांना लिहता-वाचता येत होतं. ''

# सचिवालय

इतिहासकार आणि चरित्रकारांनी प्रेषित मुहम्मद (त्यांना शांतता लाभो) यांच्या ५० सहकाऱ्यांची नोंद केली आहे, जे वेगवेगळ्या प्रसंगी लिखाणकार्य करीत होते. त्यांच्यातील काहीजणांवर पवित्र कुरआनची अवतरणं लिहून काढण्याची जबाबदारी होती; तर इतर काही सहकारी प्रेषितांच्या वतीनं राज्यपालांना आणि सम्राटांना शासकीय पत्र लिहित होते. काही सहकारी जकातचा हिशोब आणि राज्याच्या उत्पन्नाची नोंद ठेवत असत.

# शासकीय मोहर आणि पत्रं

जवळपास ४०० दस्तऐवज, लिखित साहित्य, सनदी आणि शासकीय व्यक्तींना पाठवण्याचे निर्देश आणि जनगणनेचा अहवाल जतन करून ठेवलाय. त्याचबरोबर प्रेषितांनी राजांना, परकीय सत्ताधीशांना आणि राज्यपालांना पत्रे लिहून इस्लामचं निमंत्रण दिलं होतं हेदेखील जतन करण्यात आलंय.

पत्र लिहिताना प्रेषित मुहम्मद आपल्या सचिवांना सुरूवातीला शक्तिशाली अल्लाहचं नाव आणि नंतर प्रेषक, ज्याच्या नावे असेल त्यांची नावं लिहण्यास सांगत असत. शेवटी शासकीय मोहर लावली जात होती. आपल्या प्रेषित्वाचा अधिकृत उल्लेख करण्यासाठी '''मुहम्मद' अल्लाहचे पैगंबर'' या नावानं चांदीचा एक शिक्का बनवून घेतला होता.

# सचिव व परकीय भाषा अवगत करणं

उमर (अल्लाह त्यांच्यावर राजी होवो) यांचे पुत्र अब्दुल्लाह पवित्र प्रेषित मुहम्मद यांचे विशेष सचिव होते. उच्चप्रतीचे विद्वान, तरुण अनस त्यांचे सचिव होते आणि साबित यांचे पुत्र जैद प्रमुख सचिव होते. जैद असामान्य विद्वान होते. प्रेषितांनी त्यांना हिब्रू भाषा शिकण्याचा सल्ला दिला. ते त्यांनी

अल्पावधित केलं. काही पत्रांचा हिब्रू भाषेत अनुवाद करण्यासाठी प्रेषितांना त्यांचं कौशल्य हवं होतं. ते हिब्रू भाषेच्या ज्ञानावर कमीच विश्वास करीत होते. जैद यांनी हिब्रू भाषा अवगत केली आणि तीत प्राविण्य मिळवलं. अशा प्रकारे प्रेषितांना हिब्रू भाषेत शासकीय कामकाज करण्यासाठी विश्वसनीय व्यक्ती उपलब्ध झाली. प्रेषितांनी जैद यांना सीरियन भाषाही शिकण्यास सांगितलं. जैद इथंही कमी पडले नाहीत. त्यांनी सीरियन भाषेवरदेखील प्रभुत्व मिळवलं.

जैद यांची स्मरणशक्ती विलक्षण होती. कुरआनातील आयती त्यांना तोंडपाठ होत्या. त्यांचा उच्चार ते अचूकपणे करीत होते. यामुळेच त्यांना कुरआनचा मजकूर लिहून काढण्यासाठी नियुक्त केलं होतं. प्रेषितांनी आपल्या आयुष्यातच कुरआनचं संकलन करण्यासाठी एक समिती गठन केली होती. त्या समितीमध्ये अबु बक्र, उमर, उस्मान आणि अली यांना नियुक्त करून जैद यांना तिचं अध्यक्ष केलं होतं (अल्लाह त्या सर्वांवर राजी होवो).

## जनगणना

मदीनेत आगमन झाल्यावर लवकरच प्रेषित मुहम्मद यांनी तिथल्या लोकसंख्येची जनगणना करण्याचा आदेश दिला होता. पाचशे मुस्लिमांसहित एकूण १०,००० लोकांची नोंद केली गेली. मदीनेमध्ये इस्लामच्या आगमनापूर्वी लोकांची गणना करणं किंवा त्यांचा अभ्यास करण्यास ज्यू धर्मिय लोक पाप समजून अल्लाहच्या मर्जीत हस्तक्षेप समजत असत.

## नगररचना

प्रेषित मुहम्मद यांनी मदीनेत नगरपालिका प्रशासन व्यवस्थेची सुरुवात केली. तिचं नाव 'बलदिया' असं ठेवलं. बलद (शहर) पासून निघालेला अरबी शब्द. शहराची व्यवस्था बलदिया बघत असत.

# चौपदरी रस्ते

लोकांना पहिला निर्देश म्हणजे रस्त्याच्या कडेला गटारी बांधण्यास सांगण्यात आलं. प्रेषितांच्या मशिदीभोवती साकारत असलेल्या नव्या शहरामध्ये प्रेषित मुहम्मद यांनी गल्लीबोळ आणि घरांदरम्यानच्या विशिष्ट मोजमापानं रहदारीच्या रस्त्यांची आखणी केली आणि त्यांना स्वच्छ ठेवण्याची लोकांना ताकीद दिली. इस्लामी विद्वान मुहम्मद हमीदुल्लाह यांनी लिहिलंय की प्रेषितांनी अशा तऱ्हेनं मार्गाची रचना केली की ओझं लादलेले दोन उंट दोन्ही बाजूंनी खांद्याला खांदा लावून चालू शकत होते, अगदी आजच्या काळातील चौपदरी रस्त्यांसारखी. त्यांनी रस्त्याच्या कडेला सावली देणाऱ्या झाडांची लागवड करण्याचेही आदेश दिले होते.

# गृहनिर्माण

प्रेषितांच्या मशिदीची (मस्जिदे-नबवी) भावी काळातील महत्त्वाची कल्पना करून प्रेषितांनी अनेक ठराविक कुटुंबांना राहतं घर विभागून दिलं. घरांभोवती भिंती बांधण्याचेही त्यांनी आदेश दिले, म्हणजे त्या घरांमध्ये राहणाऱ्या कुटुंबांना एकांतता लाभावी.

इस्लामच्या मर्यादित कुटुंबव्यवस्थेचा विचार करून जी पती-पत्नी आणि मुलांपर्यंतच मर्यादित असते, प्रेषितांनी नव्यानं विवाहित जोडप्यांना अलग-अलग सदनिका वाटून देण्यास प्रोत्साहन दिलं. प्रेषितांनी एकत्र कुटुंबपद्धतीपासून लोकांना परावृत्त केलं. एका जोडप्यापासूनच एका कुटुंबानं आकार घ्यावा आणि त्यांना स्वत:चं घर असावं, त्यांच्या आपसांत प्रेमाची बंधनं घट्ट व्हावीत, आपल्या घरी एकांत वातावरणात इतरांच्या नजरांपासून वेगळं. एका वचनात प्रेषितांनी संपन्नतेचे निर्देशांक व्यक्त केलेत ते असे, माणसाकडं स्वत:चं प्रशस्त घर असावं, स्वारीसाठी वाहन (त्या काळी प्राणी) असावं आणि अशा कुटुंबास त्यांनी सुखसंपन्न कुटुंब म्हटलंय.

# पाणीपुरवठा

त्या वेळी सार्वजनिक पाणीपुरवठ्याची संकल्पना नव्हती. मदीनेत आल्यानंतर प्रेषित मुहम्मद (त्यांना शांतता लाभो) यांनी पाहिलं की पिण्याच्या पाण्याची एकच विहीर आहे. त्या विहिरीस 'रोमाची विहीर' म्हटलं जाई. प्रेषितांनी घोषणा केली की जर कुणी ती विहीर विकत घेऊन मानवजातीसाठी अर्पण करील तर त्यास स्वर्गामध्ये चांगला मोबदला मिळेल. त्यांचे सहकारी उस्मान (अल्लाह त्यांच्याशी राजी होवो) यांनी ती विहीर विकत घेतली आणि तिचं लोकार्पण केलं.

त्यांचे एक सहकारी सऊद इबादापुत्र यांच्या आई मरण पावल्या. त्यांच्या वतीनं काही दानधर्म करण्याचं त्यांनी ठरवलं. त्यांनी प्रेषितांना विचारलं, ''कोणतं कार्य अधिक चांगलं असेल?'' प्रेषितांनी उत्तर दिलं, ''एक विहीर खोदण्याची व्यवस्था करा आणि तीस जनोपयोगासाठी अर्पण करा.'' सऊद यांनी तसंच केलं आणि प्रेषितांचा आशीर्वाद मिळवला.

प्रेषित मुहम्मद यांनी मदीना शहराची योजना आखताना पुरातत्व वास्तु आणि नैसर्गिक वारसा जतन करण्याचीही दखल घेतली होती. आपल्या घरांची दुरुस्ती करताना लोकांनी जुन्या किल्ल्यांच्या भिंती पाडू नयेत, अशी सूचना दिली होती. आपल्या घरांच्या बांधकामामध्येच शक्य तितकं सामावून घेण्यास त्यांनी सांगितलं होतं. तसेच लोकांनी झाडं तोडू नयेत, तर आपल्या घरांमध्ये आणि त्यांच्या अवतीभोवती झाडं लावण्याचीही प्रेषितांनी ताकीद केली. स्मारके आणि झाडांमुळे शहराच्या सौंदर्यात भर पडते, असंही ते म्हणत असत, याची नोंद इतिहासकार बैहकी यांनी केली आहे.

# विश्रामगृहे

सत्तेचं केंद्र झाल्यानं मदीना हे शहर शासन-प्रशासन, कायदे, व्यापारउदीम आणि विद्येचंही केंद्र म्हणून उदयास आलं. उत्तरेकडील सीरिया व पॅलेस्टाइन आणि दक्षिणेकडील मक्केच्या मार्गानं येमेनला जोडणाऱ्या महत्त्वाच्या महार्गादरम्यान हे शहर होतं. प्रवासी लोक या ठिकाणी अन्न, जनावरांसाठी चारा घेण्यासाठी तसेच विक्रीच्या वस्तूंची अदलाबदल करण्यासाठी थांबत असत. प्रेषितांनी त्यांच्यासाठी सराय (आश्रम) उभारण्याचे आदेश दिले, जिथं पुढच्या प्रवासासाठी सोयी-सुविधा आणि इतर सेवा उपलब्ध होत्या. दूरवरचे प्रतिनिधी प्रेषितांची भेट घेत असत, जेणेकरून नवीन राज्याशी संबंध प्रस्थापित करण्यास मदत होईल. सुरुवातीला त्यांना प्रेषितांच्या मशिदीला लागून असलेल्या खाजगी घरांमध्ये थांबवलं जात होतं. जसजसं इस्लामला नवनवीन विजय प्राप्त होत गेले, नव्यानं इस्लाम धर्म स्वीकारण्याची लोकांची रीघ लागली आणि ते नियमितपणे मदीनेस येऊ लागले. इतिहासकार नुरुद्दीन शमूदी यांनी लिहिलंय की प्रेषितांचे महत्त्वाचे अनुयायी अब्दुर्रहमान बिन औफ यांनी आपल्या मालकीचं एक प्रशस्त घर खास पाहुण्यांसाठी राखून ठेवलं होतं. मदीनेत एका वेळी २०० लोक येत होते, ज्यांच्यासाठी मोठमोठी घरं भाडेतत्त्वावर राखून ठेवण्यात आली होती.

# इस्पितळे

इस्लाम आगमनापूर्वी अरब लोक स्वत:च औषधोपचार करीत असत. सार्वजनिक आरोग्य व्यवस्था नव्हती. सार्वजनिक सेवेनं प्रेरित होऊन इस्पितळांची उभारणी झाली.

प्रेषित मुहम्मद (त्यांना शांतता लाभो) यांचे एक अनुयायी रफीदा यांनी जखमींच्या औषधोपचारासाठी प्रेषितांच्या मशिदीजवळच एक तंबू ठोकला होता. खंदकाच्या युद्धात मुआजपुत्र सअद जखमी झाले तेव्हा प्रेषितांनी त्यांना औषधोपचारासाठी त्याच तंबूमध्ये जाण्यास सांगितलं होतं. आरोग्य

सुविधा पुरविणे आणि इस्पितळांच्या उभारणीमध्ये इस्लामनं मोठी भूमिका बजावली आहे.

प्रेषितांच्या दोन महिला अनुयायी उम्मे सुलैम आणि नुसैबा युद्धात जखमींना पाणी पाजवित आणि त्यांना प्रथमोपचार सेवा पुरवित असत. इस्लामी इतिहासात त्या प्रथम नर्सेस होत्या.

## तज्ज्ञांकडून औषधोपचार

प्रेषितकालीन काही वैद्य (फिजिशियन) आणि चिकित्सक (सर्जन्स) यांची माहिती मिळते. एका आजारी अनुयायीची विचारपूस करण्यासाठी प्रेषित मुहम्मद (त्यांना शांतता लाभो) त्यांच्या घरी गेले होते. त्या वस्तीत एखादा डॉक्टर उपलब्ध आहे काय, असं त्यांनी विचारलं. दोन नावं पुढं आली. प्रेषित म्हणाले, ''दोन्हींपैकी जो चांगला आहे त्यास बोलावून घ्या.''

या घटनेवरून असं निष्पन्न होतं की प्रेषितांनी तज्ज्ञांद्वारे औषधोपचार करण्याची शिफारस केली.

या विषयावरील अशा प्रकारच्या वक्तव्यांनी औषधांचं महत्त्व, प्रेषितकाळात संपूर्णपणे कळलं असल्याचंच सिद्ध होतं. लोक प्रेषितांकडे सामान्य आजाराच्या उपचारासाठी येत असत आणि ते त्यांना साध्या प्रकारची औषधं सांगत असत. प्रेषितांच्या या प्रथांमुळे एका परिपूर्ण वैद्यकशास्त्राची संकल्पाना उदयास येते.

## मदीनेची बाजारपेठ

प्रेषित मुहम्मद (त्यांना शांतता लाभो) यांनी मदीनेत एक नियमित बाजारपेठ कायम केली होती आणि ती 'असवाक' नावानं ओळखली जात होती. ही बाजारपेठ प्रेषितांच्या मशिदीच्या उत्तर-पश्चिम बाजूस होती. ही बाजारपेठ ५०० मीटर लांब आणि १०० मीटर रुंद होती. त्या काळच्या

गरजेपेक्षा ही बाजारपेठ फारच मोठी होतील. यामागील प्रेषितांचा दूरदर्शीपणा दिसून येतो, कारण मदीना शहर झपाट्यानं विकास पावत होतं आणि त्याच्या अवतीभवती असलेल्या इतर टोळ्या, जाती-जमाती या नव्या आश्चर्याकडं पाहत होत्या.

# पाप, बेकायदेशीर आणि बंदी

प्रेषित मुहम्मद (त्यांना शांतता लाभो) यांच्यावर जगभरातल्या मानवांचं मार्गदर्शन करणं आणि त्यांच्यात सुधारणा घडवून आणण्याची जबाबदारी सोपवण्यात आली होती. यात जीवनाच्या आध्यात्मिक व नैतिक अशा दोन्ही क्षेत्रांचा समावेश होता. कुरआनद्वारे दिलेल्या ईशमार्गदर्शनानुसार ही जबाबदारी पार पाडायची आहे असं त्यांना सांगण्यात आलं होतं. पवित्र कुरआन आणि प्रेषितांच्या शिकवणींनी काळ आणि सामाजिक व्यवस्थेच्या दोन्ही सीमा ओलांडल्या होत्या, त्या मानवी समाजाच्या सर्व ज्ञात-अज्ञात क्षेत्रांशी संबंधित होत्या. त्यांनी सर्वकालीन विचारधारा देऊ केली आणि त्यानुसारच कायदे व नियम केले. त्यांची ही व्यवस्था मानवी समाजाचा सार्वत्रिक वारसा आहे आणि ज्या कुणास तिची गरज ्सेल त्यास ती उपलब्ध आहे. त्यांनी मानवतेसाठी मांडलेले सिद्धान्त खाली दिलेले आहेत, ज्या सिद्धान्तांना आजच्या २१व्या शतकातदेखील आम्ही उजाळा दिलाय.

- माप आणि वजन प्रामाणिक होते.
- किंमती नियमित केलेल्या होत्या.
- व्यापारावरली मक्तेदारीची प्रथा संपुष्टात आली होती.
- आवश्यक वस्तुंची साठेबाजी करणं आणि त्यांची कालांतरानं विक्री करणं बेकायदेशीर ठरवण्यात आलं होतं.
- व्याज आणि सावकारी व्यवसायावर प्रतिबंध घालून त्यांना अपराध घोषित करण्यात आलं होतं.

- मद्यपान करणं, त्याचा धंदा आणि त्याच्या संबंधित इतर सर्व कामांवर प्रतिबंध घालण्यात आला होता.
- जुगारावरही प्रतिबंध घालून त्यास बेकायदेशीर घोषित करण्यात आलं.
- वेश्या व्यवसायावर प्रतिबंध घालून त्यास बेकायदेशीर घोषित केलं गेलं.

प्रेषित मुहम्मद सुद्धा वैयक्तिक अचानक भेटी देत होते. एकदा एका व्यापाऱ्यानं भिजलेल्या धान्यावर सुकलेलं धान्य परसरल्याचं प्रेषितांनी पाहिलं. त्यांनी त्या धान्याच्या ढिगात खोलवर हात घातला आणि त्यात भेसळ केल्याचं त्यांच्या लक्षात आलं. त्यांनी व्यापाऱ्यास विचारलं, *"तुम्ही असं का बरं करता?"* व्यापारी म्हणाला, "पावसामुळे हे घडलं." प्रेषित म्हणाले, *"जे लोकांची फसवणूक करतात, ते आमच्यापैकी नाहीत."*

स्वच्छतेच्या बाबतीत प्रेषित मुहम्मद फार कडक होते. आपल्या अनुयायींना ते नेहमी आपली घरं, बाजारपेठ स्वच्छ ठेवण्याची ताकीद देत असत. रस्त्याच्या कडेला बसून गप्पागोष्टी करण्यास त्यांनी वर्ज्य केलं होतं.

कर वसुलीकरिता व निरीक्षणाकरिता प्रेषितांनी पुरुष व महिला निरीक्षकांची नियुक्ती केली होती आणि कायदा मोडणाऱ्यांकरिता कठोर कारवाईची तरतूद केली होती.

## पुरुष निरीक्षक

महत्त्वाच्या पुरुष निरीक्षकांमध्ये सआद बिन आस आणि अब्दुल्लाह बिन सआद आणि उमर (त्या सर्वांवर अल्लाह त्यांच्याशी राजी होवो) होते.

# स्त्री निरीक्षक

महत्त्वाच्या स्त्री निरीक्षकांमध्ये महरबाची मुलगी समरा आणि अब्दुल्लाहच्या कन्या शिफा होत्या. प्रेषित मुहम्मद यांनी शिफा या सर्वप्रथम सुशिक्षित महिलेस निरीक्षक आणि महसूल अधिकारी बनवलं होतं. आणि ही व्यवस्था त्यांनी मदीनेच्या बाजारपेठेतील महिला व्यक्तींना लक्षात घेऊन केलेली असेल.

# पुरुष व्यापारी

इस्लामी राजवटीतले पहिले खलीफा (सत्ताधीश) अबु बक्र कपड्यांचे व्यापारी होते. पर्शियन व बायजेन्टाईन साम्राज्यांवर विजय नोंदवून त्यांचा इस्लामी राजवटीत समावेश करणारे उमर धान्याचे व्यापारी होते आणि उस्मान व अब्दुर्रहमान बिन औफ (अल्लाह त्यांच्याशी राजी होवो) हे कापड उद्योगाशी संबंधित होते. प्रेषितांचे इतर अनुयायी विविध पेशे करत होते. जसे- विनकाम, सुतारकाम, शेती, फळबाग आणि शिवणकाम इत्यादी व्यवसाय करत होते.

# महिला व्यापारी

महिला व्यापाऱ्यांमध्ये मरहबाच्या कन्या असमा, सुहेबच्या कन्या खौला आणि मलिका उम्मे सैब ( या सर्वांवर अल्लाह त्यांच्याशी राजी होवो) प्रसिद्ध होत्या.

# व्यापार

पवित्र कुरआन व्यापार-व्यवसाय निवडण्याची चालना देतो.

आपल्या विधात्याकडून संपत्ती प्राप्त करण्यात काही गैर

नाही.'' - ''भूतलावर विखरून जा आणि अल्लाहची विपुलता शोधा.'' (कुरआन, ६२:१०)

''अल्लाहनं व्यापार वैध केलाय आणि व्याजबट्टा निषिद्ध केलाय.'' (कुरआन, २:२७५)

# एक व्यापारी

प्रेषित मुहम्मद (त्यांना शांतता लाभो) यांनी जसं प्रमाणिकपणे, पारदर्शकपणे आणि ज्या सरलतेनं इतर व्यापाऱ्यांशी व्यवहार केले ते तमाम व्यापारीवर्गासाठी नेहमीकरिता एक अनुकरणीय उदाहरण बनून गेले.

प्रेषित मुहम्मद यांची खालील वक्तव्यं प्रामाणिक व मेहनती व्यापाऱ्यांकरिता सोनेरी नियम आहेत.

''इतर अनिवार्य कर्तव्याप्रमाणेच कायदेशीर मार्गानं उपजीविका कमावण्यासाठी प्रयत्न करणं हेही एक कर्तव्य आहे.''

''सत्यवान व विश्वसनीय व्यापारी- प्रेषित, नेक व शहीद यांच्या सान्निध्यात राहील.''

''जी व्यक्ती विक्रेता असेल, ग्राहक असेल आणि कशावर तरी दावा करीत असताना कृपेचा व्यवहार करते, अल्लाह तिच्याशी दयेनं वागेल.''

''युद्धात शक्तीचा वापर करून जे काही मिळविता येईल त्यापेक्षा अधिक व्यापारात संपन्नता प्राप्त करून मिळविता येतं.''

''अप्रामाणिक व्यापारी काही काळानंतर अयशस्वी होतीलच; पण प्रामाणिक व्यापारी यशस्वी होत राहतील.''

# व्यापारी करार

मदीनेत इस्लामी राजवटीच्या स्थापनेपूर्वी व्यापारी कबिल्यांची सुरक्षा मोठी बाब होती. प्रेषित मुहम्मद (त्यांना शांतता लाभो) यांनी व्यापारी काफिल्यांच्या सुरक्षेसाठी एक व्यवस्था सुरू केली. व्यापार-उदीमांना अधिक संरक्षण प्रदान करण्याच्या दृष्टीनं त्यांनी आपसातले करार लिहून काढून त्यावर साक्षीदारांच्या स्वाक्षऱ्या घेण्याची पद्धत रुजविली.

व्यापारविषयक सर्व करार, विशेषत: जेव्हा मालांची पोच आणि रकमेची फेड उशिरा व्हायची असेल तेव्हा लिखित स्वरूपात करून घ्यावी. पवित्र कुरआनात याचा उल्लेख खालीलप्रमाणे आहे :

> ''श्रद्धावंत लोकहो, तुम्ही (आपसात) एका ठराविक मुदतीसाठी देवाणघेवाणीचा करार करून ते (रीतसर) लिहून काढा..... आपल्या पुरुषांपैकी दोन साक्षीदार नेमावेत.''
>
> (कुरआन, २:२८२)

आपसातल्या करारांना इस्लाममध्ये केंद्रस्थानी ठेवण्यात आलंय. मग ते विवाहसंबंधीचे असोत की व्यापारविषयक असोत की सामाजिक स्वरूपाचे असोत किंवा आपसातले कलह संपुष्टात आणण्यासाठी केलेले करार असोत की युद्धबंदीचे. पवित्र कुरआनात करारांचं, त्या करारातील अटींचं पालन करण्याचं महत्त्व आणि त्याची गरज सांगितलीय.

> ''वचनाविषयी नक्कीच विचारलं जाईल.''
>
> (कुरआन, १७:३४)

या संबंधात प्रेषितांचं वक्तव्य असे–

''मुस्लिमांनी करारांमधल्या अटींचं पालन करावं.''

# परकीय चलन

आंतरराष्ट्रीय व्यापारविषयक नियमांची अंमलबजावणी करण्यात प्रेषित मुहम्मद (त्यांना शांतता लाभो) अग्रेसर होते. त्यांच्या काळातच परकीय चलनाची पद्धत सुरू झाली. त्यांच्यानंतर मुस्लिम शासकांनी 'साका' (Sakka) पद्धतीची सुरुवात केली. सध्याचा चेक (Cheque) हा त्याच मूळ अरबी शब्दाचं आधुनिक रूप आहे.

# लष्करी व्यवस्थापन

जीवनाच्या अनेक क्षेत्रांमध्ये सुरुवातीला ज्या अनेक उपाययोजना केल्या गेल्या, त्यांतली एक म्हणजे लष्कराचं व्यवस्थापन करणं होय. प्रेषित मुहम्मद (त्यांना शांतता लाभो) यांनी गरजेप्रमाणे सैनिकांची निवड करून त्यांना विविध मोहिमांवर पाठवलं.

# कायस्वरूपी सैन्य

मदीनेच्या इस्लामी राजवटीद्वारा अशा सैनिकांना आधार दिला गेला ज्यांची मिळकत अपुरी होती, जेणेकरून सैनिकांची क्षमता वाढावी.

# शारीरिक योग्यता आणि सुरक्षा प्रशिक्षण

सैनिकी प्रशिक्षण आवश्यक असल्याची घोषणा करून प्रेषित मुहम्मद (त्यांना शांतता लाभो) यांनी प्रशिक्षणाची पद्धत योजली. उदाहरणार्थ- ते लोकांना व्यायामाद्वारे शारीरिक योग्यता प्राप्त करण्याची ताकीद देत होते. त्यांनी तिरंदाजीची प्रेरणा दिली. 'अल-सिबक' या मैदानात होणाऱ्या स्पर्धांमध्ये ते हजर असत. ते घोड्यांच्या, उंटांच्या आणि माणसांच्या शर्यतींचं

आयोजन करत असत. तसेच कुस्ती व पोहण्याच्या स्पर्धाही भरवित असत.

अशा सर्व प्रसंगी प्रेषित पारितोषिकांचं वितरण करत होते. मदीनेच्या उत्तरेकडील फाटकाजवळ 'अल-सिबक' नावाची एक मशीद आजही उभी आहे. 'अल-सिबक' या शब्दाचा अर्थ 'धावण्याची शर्यत' असा होतो. असं म्हटलं जातं की डोंगराजवळील जागेवर उभं राहून घोड्यांच्या धावण्याची शर्यत पाहत आणि पहिल्या तीन जागा निश्चित करत असत. अल-मकरिजी यांनी घेतलेल्या नोंदींनुसार पहिल्या पाच विजयी घोड्यांना पारितोषिके देण्यात येत होती. हे पारितोषिक खजूर आणि इतर वस्तूंच्या स्वरूपात दिले जात असे.

याचबरोबर शासनाच्या वतीनं शस्त्रास्त्रांचा साठा करून ठेवण्याची पद्धत सुरू झाली. यामध्ये विविध उपकरणं, घोडे, उंट आणि शासनाच्या मालकीतली कुरणं इत्यादींचा समावेश होता.

## गुप्त माहिती, टेहळणीची व्यवस्था

मदीना हे प्रत्यक्षात लहानसं इस्लामी राज्य होतं आणि प्रेषित मुहम्मद (त्यांना शांतता लाभो) या राज्याचे पहिले सत्ताधीश होते. पण हे शत्रूंनी वेढलेलं होतं, ज्यांना हे राज्य प्रबळ होण्याआधी आणि त्या भूभागात आपला अधिकार गाजवण्याअगोदर नष्ट करायचं होतं. आणि म्हणूनच प्रेषितांनी टेहळणी करणाऱ्या पथकांची पद्धत अंमलात आणली, ज्याद्वारे ते शत्रूच्या हालचाली, त्यांच्या योजना आणि त्यांची शस्त्रास्त्रांची शक्ती-साधनं वगैरेंची माहिती मिळवित होते.

मदीनेभोवती आणि त्याच्या सीमांना लागून असलेल्या भूभागातल्या सर्व घटनांची मााहिती या टेहळणी पथकाद्वारे मिळू लागली होती. त्याचबरोबर दळणवळणाची एक सशक्त व्यवस्था स्थापन्यासाठीदेखील प्रेषितांना या टेहळणी पथकाची मदत झाली.

मदीना शहराच्या संरक्षणाची ज्या ज्या वेळी गरज भासत असे त्या वेळी नाकेही उभारले. मुस्लिम सैनिकांना, लष्करी, गुप्त संकेत, पासवर्ड आणि

संकेतचिन्हं वापरण्याचंही प्रशिक्षण दिलं जात होतं. गुप्त माहिती मिळवण्यासाठी प्रेषित मुहम्मद एकापेक्षा अधिक मार्गांचा अवलंब करत होते.

# वित्त मंत्रालय

# 'बैतुलमाल' - राष्ट्रीय कोषागार

मदीनेच्या इस्लामी राज्यातले लोक सामूहिकपणे जकात, कर देत होते. 'बैतुलमाल' (कोषागार) मध्ये जमा करत होते. या जकातच्या रकमेतून राज्य शासनाद्वारे गरीब आणि गरजूंना आधार दिला जात होता.

महसुलाचा सर्वांत मोठा स्रोत जकात, अनिवार्य देणं होतं. ज्या कुणाकडं साधन-संपत्ती असेल त्यांना हा कर द्यावा लागतो. जकातचा दर विविध प्रकारच्या संपत्तीसाठी वेगवेगळा होता. कृषी उत्पादनावर १० टक्के इतका दर होता आणि एका व्यापाऱ्यास आपल्या गुंतवणुकीच्या २.५ टक्के कर द्यावा लागतो. कुणाकडं जर लोखंड, सोने, चांदीची खाण असेल तर त्यास ठरलेला कर द्यावा लागतो. मदीनेच्या बाहेरील सर्व इलाख्यांमध्ये महसूल अधिकाऱ्यांना पाठवून जकातची रक्कम गोळा केली जात होती.

प्रेषित मुहम्मद यांनी 'बैतुलमाल' (राष्ट्रीय कोषागार) च्या जमा-खर्चाचा हिशेब ठेवण्यासाठी कारकून नियुक्त केले होते.

राज्याच्या मिळकतीची देखरेख केली जात होती. ही जबाबदारी बिलाल (अल्लाह त्यांच्यावर राजी होवो) यांच्यावर सोपवली होती. ते वित्तमंत्री आणि नमाजसाठी अजान देणारे दोन्ही जबाबदाऱ्या पार पाडीत होते. प्रेषितांच्या मशिदीमध्ये (मस्जिदे नबवी) एक खोली 'बैतुलमाल'साठी खास ठेवण्यात आली होती. राज्याची संपत्ती, मालमत्तेच्या दस्तावेज आणि तहाची कागदपत्रे त्या खोलीत सुरक्षित ठेवले जात होते.

# पेन्शन आणि नुकसानभरपाईची व्यवस्था

प्रेषित मुहम्मद (त्यांना शांतता लाभो) यांनी गरीब व निराश्रितांना पेन्शनची व्यवस्था सुरू केली होती. मदीनेमध्ये बनू अरिज नावाची एक ज्यू टोळी होती. प्रेषित त्यांना पसंत करत होते आणि त्यांना वार्षिक मानधन देत होते. अनैसर्गिकरित्या मरण पावणाऱ्याच्या कुटुंबियांना नुकसानभरपाई करून देण्याची व्यवस्थाही त्यांनी केली होती.

# परराष्ट्र व्यवहार

मदीनेच्या इस्लामी राजवटीनं इतकं शक्ती-सामर्थ्य आणि मान्यता प्राप्त केली की हिजर सनानंतर ९ वर्षांनी ३८ राजे, कबिल्यांचे प्रमुख आणि अरब द्वीपकल्पातल्या सगळीकडचे प्रतिनिधी आणि परराष्ट्रे या राजवटीशी मैत्री आणि तह करण्यास उत्सुक होते. ज्यू धर्मिय तसेच ख्रिस्ती टोळ्याही प्रेषितांना भेटल्या आणि त्यांच्याशी परस्पर सहकार्याचा करार केले.

☆

# सर्वांना न्याय

प्रेषित मुहम्मद (त्यांना शांतता लाभो) मदीनेच्या इस्लामी राजवटीचे अधिकृत सर्वोच्च न्यायाधीश होते आणि ते महान न्यायव्यवस्थापक होते. वंश, जात, धर्म, नातेसंबंध यांचा कसलाही विचार न करता सर्व प्रकरणांचा ते न्याय-निवाडा करत होते. मित्र आणि शत्रू असा भेदाभेद त्यांनी कधीच केला नाही. कुरआननं जाहीर केलं–

> ''श्रद्धावंत लोकहो, तुम्ही अल्लाहसाठी न्यायनिष्ठ राहा. जरी तुमच्याविरूद्ध किंवा तुमचे माता-पिता, तुमचे नातलग मग ते श्रीमंत असोत की गरीब, यांच्याविरूद्ध जरी साक्ष द्यावी लागली तरीदेखील.'' (कुरआन, ४:१३५)

प्रेषितांनी प्रत्येक निर्णय वास्तविक तथ्यांच्या आधारावर घेतला आणि न्यायनिष्ठेचं, नि:पक्षपातीपणाचं उदाहरण जगासमोर ठेवलं. कायदेविषयक प्रकरणांचा त्यांनी जो न्यायनिवाडा केला, तो त्यांच्या सर्वसमावेशक दृष्टी, त्यांचा स्वभाव आणि गुणवत्तेवर प्रकाश टाकतो.

- खैबरच्या ज्यू लोकांकडून उत्पादनातला भाग गोळा करण्यासाठी अब्दुल्लाह बिन सेही यांना पाठवलं होतं. त्यांची हत्या झाली. त्यांचे चुलत भाऊ मुहीश यांनी त्यांचा मृतदेह शोधून काढला. ते प्रेषितांकडं गेले आणि ज्यू लोकांशी बदला घेण्याची विनंती केली. प्रेषितांनी विचारलं, ''तुम्ही शपथेवर सांगू शकता की ज्यू लोकांनीच ती हत्या केली?'' त्यांनी उत्तर दिलं, ''मी

आपल्या डोळ्यांनी मारेकऱ्याला पाहिलेलं नाही.'' प्रेषित म्हणाले, ''ज्यू लोकांना शपथ घेण्यास सांगितलं जाईल.'' मुहीश म्हणाले, ''आम्ही त्यांच्या शपथेचा कसा विश्वास करणार? ते शंभर वेळा खोटी शपथ घेतील.'' खैबरमध्ये ज्यू धर्मियांशिवाय अन्य कोणी राहत नाही आणि ज्यूंमधीलच एकानं ही हत्या केली यात वादच नाही. कुणी प्रत्यक्षदर्शी साक्षीदार नसल्यानं प्रेषितांनी ज्यू लोकांकडं विचारणा केली नाही आणि राज्याच्या निधीतून नुकसानभरपाई केली.

- मकसुमा टोळीच्या एका स्त्रीला चोरी करताना पकडले गेले. तिला इस्लामी कायदापद्धतीनं शिक्षा मिळेल म्हणून कुरैश लोक पेचात अडकले. कुणीतरी त्या स्त्रीच्या वतीनं प्रेषितांकडं मध्यस्थी करावी, असं त्यांना वाटलं. प्रेषितांचे आवडते एक युवक उसामा हे प्रेषितांकडं मध्यस्थी करण्यास उत्तम असतील, असा त्यांनी विचार केला. म्हणजे त्या स्त्रीला शिक्षेपासून मुक्त केले जाईल. जेव्हा उसामांनी तो विषय प्रेषितांसमोर काढला तेव्हा प्रेषितांचा चेहरा उग्र झाला. प्रेषितांनी त्यांना विचारलं, ''ते अल्लाहच्या इच्छेत कसा हस्तक्षेप करू शकतात? पूर्वीच्या कित्येक समुदायांचा विनाश याच कारणानं झाला. ते गरिबांना शिक्षा करत आणि श्रीमंत लोकांना मोकाट सोडून देत.'' प्रेषित म्हणाले, ''मी त्याची (अल्लाहची) शपथ घेतो ज्याच्या हाती माझा प्राण आहे. मुहम्मदच्या कन्या फातिमा यांनी जरी हा अपराध केला असता तर मी तिचे हात कापून टाकले असते.'' त्या वेळी जमलेल्या लोकांना संबोधून प्रेषितांनी हे वक्तव्य केलं.

- तारिक मुहरबी यांच्या कथनानुसार, एकदा प्रेषित मुहम्मद प्रवचन करत असताना एक अन्सारी (मदीनेतील निवासी मुस्लिम) मदीनेच्या मशिदीत बनी तलहा यांना पाहून उभा राहिला आणि म्हणाला, ''हे प्रेषित! ही बनी तलहाची माणसं आहेत. त्यांच्या पूर्वजांनी आमच्या कुटुंबातील एका सदस्याची हत्या केली होती. आम्ही विनंती करतो की त्याच्या बदल्यात आपण त्यांच्या एका माणसाला फाशीची शिक्षा द्या.'' प्रेषित म्हणाले, ''पित्याचा बदला त्याच्या मुलाला घेता येत नाही.'' प्रेषितांनी या उदाहरणाद्वारे हे दाखवून दिलं की त्यांच्यापेक्षा इतर कुणीही न्याय करण्यात सक्षम नाही. जर त्यांच्या

स्वत:च्या हितांविरूद्ध किंवा जे लोक त्यांना प्रिय आहेत त्यांच्याविरूद्ध जरी त्यांना निर्णय द्यावा लागला तरी. त्यांचा मित्र असो की शत्रू, जो कुणी एखाद्या प्रकरणासंबंधी न्यायासाठी त्यांच्याकडं आला असला तरी ते न्यायच करत होते. त्यांनी गरीब किंवा श्रीमंताची बाजू घेतली नाही. त्यांचा निवाडा त्यांनी न्यायानंच केला. आपल्या शत्रूचा न्यायही त्यांनी न्यायाच्या कडक नियमांतर्गच केला. मुस्लिम आणि मुस्लिमेतर दोन्ही त्यांच्याकडं आपली दाद न भिता आणि कसलाही विचार न करता मागत असत, कारण त्यांना माहीत होतं की ते न्यायसंगतच निवाडा करतील.

- एकदा बनु कुरैजा या ज्यू टोळीच्या एका माणसाची बनु नजीर टोळीनं हत्या केली. जेव्हा ही तक्रार प्रेषितांसमोर सादर करण्यात आली तेव्हा त्यांनी 'तौराह' (ज्यू धर्मियांचा पवित्र ग्रंथ) मधील कायदा लागू केला. हत्येचा बदला मृत्युदंड. ज्यू धर्मिय कायद्यानुसार जो युद्ध आणि विजयाच्या स्थितीत लागू केला जात असे. *''जेव्हा तुमचा विधाता तुमचा ईश्वर त्यांना तुमच्या स्वाधीन करील. तुम्ही त्यांच्या समस्त पुरुषांना तलवारीच्या खाली आणावे; पण स्त्रिया आणि लहान मुलांना, पशुंना आणि शहरातील हरेक वस्तू वगळता, जे युद्धात हाती आलेले आहेत ते तुम्ही स्वत:साठी बाळगू शकता.''* (Deuteronomy 20:13-14) ज्यू, मुस्लिम आणि इतर कबिल्यांतल्या दाव्यांमध्ये मुहम्मद हेच अंतिम न्यायालय होते.

प्रेषित मुहम्मद म्हणाले, ''न्यायाधीश तीन प्रकारचे असतात. एक प्रकारचे स्वर्गात जातील आणि उरलेले दोन प्रकारचे नरकात. जो सत्याला मान्यता देतो आणि त्यानुसारच न्याय करतो तो स्वर्गात जाईल. आणि जो सत्यतेला ओळखतो; पण अन्यायानं निकाल देतो तो नरकात जातो. आणि जो लोकांचा निकाल अडाणीपणानं देतो तोही नरकात जाईल.''

प्रेषित म्हणाले, ''एका न्यायाधीशानं वाईट अवस्थेत असताना निकाल देऊ नये.''

☆

# इस्लामी कायद्यासमोर सत्ताधारी व सामान्य माणूस समान आहेत

इस्लामी कायद्यानुसार इस्लामी राजवटीच्या प्रमुखाला वगळता येत नाही. इस्लामी कायद्यासमोर खलीफा म्हणजेच इस्लामी राज्याचा सत्ताधारी आणि सामान्य माणूस समान आहेत. एका कथनानुसार खलीफा अली (अल्लाह त्यांच्याशी राजी होवो) यांचं चिलखत हरवलं होतं. काही दिवसांनी त्यांनी ते चिलखत एका ख्रिस्तीकडं पाहिलं. त्यांनी न्यायाधीश शुरैह यांच्या न्यायालयात तक्रार दाखल केली. ख्रिस्ती माणूस म्हणाला, ''ते चिलखत त्याचंच आहे.'' शुरैह यांनी खलीफा अली यांना विचारलं, ''ते चिलखत तुमचं आहे याचा तुमच्याकडं कोणता पुरावा आहे काय?'' खलीफा अली यांनी नकारार्थी उत्तर दिलं. न्यायाधीशांनी ख्रिस्तीच्या बाजूनं निकाल दिला आणि खलीफांची तक्रार रद्दबातल ठरवली. ख्रिस्ती व्यक्ती अशा निकालामुळे इतका प्रभावित झाली की त्यानं इस्लामप्रवेशाची घोषणा केली आणि म्हणाली, ''हा प्रेषितांसारखा न्याय आहे. सत्ताधीश मला एका न्यायाधीशासमोर हजर करतो (जो त्यांच्या खालच्या दर्जाचा आहे) आणि न्यायाधीश सत्ताधाऱ्याच्या विरोधात निकाल देतो.''

इस्लामी समाजात न्यायव्यवस्था राज्यव्यवस्थेपासून मुक्त आहे.

न्यायाधीशानं इस्लामी कायद्याच्या तरतुदी (शरियत) कोणतीही भीती न बाळगता आणि कुणाचीही बाजू न घेता अंमलात आणायच्या आहेत. आपलं कर्तव्य पार पाडताना तो कोणत्याही अधिकारीवर्गाला उत्तरदायी नसून फक्त सर्वशक्तिमान अल्लाहसमोर उत्तरदायी आहे. इस्लामी कायद्यांचं पालन करण्यासाठी स्वतंत्र न्यायव्यवस्थेनं महत्त्वाची भूमिका बजावली आहे, मग ते सत्ताधारी व्यवस्था असो की सामान्य जनता.

- सीरियामधील एका टोळीचा राजा जबाला अल-गस्सानी एकदा हजचा विधी पार पाडत असताना त्याचा झगा एका अरबाच्या पायाखाली आला. रागानं जबालानं त्या अरबाच्या चेहऱ्यावर मारलं. त्या खेडूत अरबांनं याची तक्रार खलीफा उमर यांच्याकडं केली. त्यांनी जबाला यांना बोलावून घेतलं आणि त्या खेडुताला त्यास तशाच प्रकारे मारण्यास सांगितलं. ''हे कसं शक्य आहे,'' आश्चर्यात पडून जबालानं विचारलं. ''तो एक सामान्य माणूस आहे आणि मी राजा आहे.'' उत्तरादाखल खलीफा उमर म्हणाले, ''इस्लामनं त्यास तुमच्यासमान लेखलंय. नेक कर्म आणि पावित्र्य वगळता तुम्हाला त्याच्यावर कसलंही श्रेष्ठत्व नाही.''

☆

# प्रेषितांच्या मुलाच्या निधनावर दुखवटा

प्रेषित मुहम्मद (त्यांना शांतता लाभो) यांच्या जीवनाच्या अंतिम समयी म्हणजेच हिजरी सनाच्या दहाव्या वर्षी एकमेव अल्लाहचा धर्म अरब द्वीपकल्पात सर्वदूर प्रस्थापित झाला होता. इस्लामविरूद्धच्या शत्रुत्वाचा आणि द्वेषाचा सातत्यानं ऱ्हास होऊन इस्लामप्रवेश करणाऱ्यांची संख्या वाढत होती.

प्रेषित मुहम्मद यांच्या पत्नी मारिया (अल्लाह त्यांच्याशी राजी होवो) यांच्यापासून त्यांना एक मुलगा जन्मला आणि प्रेषितांनी त्याचं नाव इब्राहीम ठेवलं. याचा आनंद साजरा करण्यासाठी त्यांनी एक मेजवानी आयोजित केली. ते आपल्या मुलाला मांडीवर घेऊन त्याच्याशी खेळत होते.

इब्राहीम यांचं वय दीड वर्ष असताना त्यांना भयंकर आजारानं गाठलं. आपला मुलगा आपल्याला सोडून जाण्याच्या मार्गावर असल्याचं प्रेषितांनी पाहिलं. ते दररोज कित्येक तास आपल्या मुलासोबत राहत होते. जेव्हा त्या सुंदर मुलानं शेवटचा श्वास घेतला तेव्हा प्रेषितांना आपल्या एकुलत्या मुलाच्या निधनानं रडू कोसळलं, जसं कोणताही पिता करत असतो. त्यांनी मुलाला उचलून घेतलं आणि छातीशी लावलं. प्रेषितांच्या चेहऱ्यावरून अश्रू ओघळत होते. या नवीन दु:खानं त्यांचं हृदय हेलावून गेलं. त्यांच्या आंतरिक वेदना त्यांच्या चेहऱ्यावर दिसत होत्या.

त्यांचे निष्ठावान सहकारी अब्दुर्रहमान (अल्लाह त्यांच्याशी राजी होवो) यांना त्यांच्या हुंदक्यांचं आश्चर्य वाटू लागलं. कारण त्यांनी असा विचार

केला की प्रेषितांनी याआधी अशा प्रकारे शोक व्यक्त करण्याची मनाई केली होती. पहिल्यांदा प्रेषित काही उच्चारू शकले नाहीत आणि नंतर त्यांनी स्पष्ट केलं की प्रमाणाबाहेर शोक व्यक्त करण्यास आपण मनाई केलीय, स्वाभाविकच आक्रोश किंवा दु:ख व्यक्त करू नये. मग त्यांनी आपल्या भावना बोलून दाखवल्या ज्यांचं रूपांतर पुढे आध्यात्मिक शिकवणींत झालं. त्यांनी जाहीररित्या सांगितलं की त्यांचे अश्रू *''अनुकंपा आणि प्रेमळपणाचे संकेत''* आहेत. प्रेषितांनी आपल्या अनुभवाची एक गोष्टदेखील सांगितली आणि ती प्रत्येक मुस्लिमाच्या दैनंदिन जीवनातली एक सत्यता आहे.

''जो दयावंत नाही त्याच्यावर कुणी दया करणार नाही.''

आयुष्याच्या कठीण क्षणांमध्ये सारे मानव एकमेकांना जशा कृपेनं, प्रेमळपणानं आणि दयेनं वागतात, एकमेकांना समजून घेतात त्यामुळे त्यांना एकमेव अल्लाह अर्रहमान असीम दयावान आणि कृपाशालीशी जवळीक प्राप्त होते. त्यांच्याद्वारे अल्लाह श्रद्धावंतांच्या मनापर्यंत पोचतो.

प्रेषित मुहम्मद यांच्यावर व्यक्तिगत परिणाम झाला होता आणि त्यांनी आपलं दु:ख व्यक्त करताना काही विचार केला नव्हता. ते आणखीन म्हणाले,

> ''इब्राहीम! डोळे अश्रू वाहतात, मन अत्यंत दु:खी आहे आणि ज्यामुळे अल्लाहचं समाधान होईलच तेच म्हटलं पाहिजे.''

शक्तिशाली अल्लाहनं मुहम्मद यांची पुन्हा एकदा परीक्षा घेतली त्यांच्या संवेदना आणि कार्याद्वारे. त्यांनी कित्येक प्रियजनांना, सहकाऱ्यांना हरवलं होतं. त्यांच्या पत्नी खदीजा (रजि.), त्यांच्या तीन मुली आणि तीन मुलगे. आपल्या आयुष्यात त्यांनी क्लेश पाहिलेला होता पण ते मनाने शांत आणि आपल्या जीवितकार्याशी दृढ राहिले.

☆

# ग्रहण

प्रेषित मुहम्मद (त्यांना शांतता लाभो) कब्रस्तानातून परतल्यावर काही तासांनी सूर्यग्रहण झालं. मुस्लिमांनी लगेच ग्रहणाचा संबंध प्रेषितांच्या मुलाच्या मृत्युशी जोडला आणि यास चमत्कार म्हणू लागले. अल्लाहकडून प्रेषितांना एक प्रकारचा संदेश समजू लागला. प्रेषित मुहम्मद यांनी अशा सर्व कल्पनांचा शेवट केला. त्यांनी जोर देऊन म्हटलं, *"सूर्य आणि चंद्र अल्लाहच्या संकेतांपैकी दोन आहेत. कोणाच्या मृत्युमुळे ते काळवंडत नसतात."* अशा तऱ्हेनं प्रेषित मुहम्मद आपल्या सहकाऱ्यांना भौतिक नियम सांगत होते आणि अशा संकेतांवर भाष्य करण्याची चूक करू नये हे त्यांच्या लक्षात आणून देत होते, म्हणजे त्यांनी भ्रमांत सापडू नये. यात त्यांना आणि स्वत: प्रेषितांना आध्यात्मिक बोध होता. मानवांना, मुस्लिमांसहित त्यांच्या जवळची माणसं कशी सोडून जातात हे त्यांना कळावं. श्रद्धा आणि मानवतेची ही परीक्षा होती ज्यामुळे प्रेषितांचे अश्रू ढळले. अशा अचानक मृत्युशी कसं सामोरं जावं याची शिकवण देण्यासाठी ही परीक्षा होती. अनादिकाळापासून या सृष्टीमधील सृजनशीलतेद्वारे ही शिकवण दिली गेली. एका माणसाच्या मृत्युसमयी शक्तिशाली अल्लाहची उपस्थितीचा संकेत कोणताही चमत्कार नसून तो शाश्वत नैसर्गिक प्रक्रिया आहे, अल्लाहची अनंतकालीन निर्मिती.

# २४

# समारोपीय हजयात्रा

हिजरतनंतरच्या दहाव्या वर्षी रमजान महिन्यात प्रेषित मुहम्मद (त्यांना शांतता लाभो) यांना अल्लाहकडून दुसरा संकेत मिळाला. प्रेषितांनी आपल्या कन्या फातिमा यांना सांगितलं,

> ''अल्लाहचे दूत जिब्रईल, दरवर्षी मला एकदा कुरआनचं पठण ऐकवतात आणि मी त्यांना ते ऐकवतो. पण या वर्षी त्यांनी दोन वेळा कुरआनचं पठण ऐकवलं आणि मला वाटतं माझी वेळ जवळच आहे.''

हजयात्रा हा इस्लामचा पाचवा स्तंभ. प्रत्येक मुस्लिमानं आपल्या आयुष्यात कमीतकमी एकदा जुलहज्ज महिन्याच्या ठराविक दिवशी मक्केची वारी करावी. प्रेषित मुहम्मद यांनी अजूनपर्यंत हे कार्य केलं नव्हतं आणि त्याची तयारी करण्याची वेळ जवळ येत होती. सर्वत्र अशी घोषणा केली गेली की येत्या हजयात्रेचं नेतृत्व प्रेषित मुहम्मद करणार आहेत. त्यानंतरच्या आठवड्यांमध्ये मदीनेच्या वीस हजार हजयात्रेकरूंना मक्केला पाठवून दिलं आणि या संख्येच्या तीनपट संख्येनं अरब द्वीपकल्पातून सर्वदूर ठिकाणांहून लोक त्यांना येऊन मिळाले.

जेव्हा ते मक्केकडं मर्गास्थ झाले प्रेषितांवर मक्केविषयी महत्त्वाचं अवतरण आलं. याचा संबंध काबागृहाजवळच्या विधींशी होता. यामध्ये कुरआनातील नवव्या अध्यायातल्या पहिल्या पाच आयती होत्या.

(कुरआनातला एकमेव असा अध्याय ज्याची सुरुवात 'परम कृपाळू आणि अत्यंत दयावंत अल्लाहच्या नावानं' अशी होत नाही.) या आयतीद्वारे सुरुवातीस असं स्पष्टपणे जाहीर केलं गेलं की (अज्ञानकाळातील) विधी, ज्या पूर्वी काबाभोवती पार पाडल्या जात होत्या (काही यात्रेकरू विवस्त्र होऊन त्या विधी पार पाडत असत.) यापुढे सहन केल्या जाणार नाहीत. आणि मूर्तीपूजकांना (काबागृहात) प्रवेश दिला जाणार नाही.

हा संदेश ठळक होता आणि याद्वारे हे सिद्ध केलं गेलं की काबागृह - पवित्र मस्जिद आता फक्त एकमेव अल्लाहच्याच भक्तीसाठी राखून ठेवण्यात आलीय आणि फक्त मुस्लिमच यामध्ये प्रवेश करू शकतात.

कुरआनची आयत खालीलप्रमाणे–

''अल्लाहच्या मशिदींची काळजी घेणं अल्लाहवर श्रद्धा ठेवणाऱ्या लोकांचं काम आहे, ज्यांचा परलोकावर विश्वास आहे, जे नमाज कायम करतात आणि जकात देतात आणि अल्लाहशिवाय कुणालाही भीत नसतात यांनाच मार्गदर्शन लाभण्याची अपेक्षा आहे.''

बरेच सहकारी आणि त्यांच्यानंतरच्या अभ्यासकांनी असा अर्थ लावला आहे की ही मनाई फक्त मक्केच्या मशिदीलाच लागू आहे. इतर मशिदींबाबत नाही, ज्यामध्ये मुस्लिमेतर प्रवेश करू शकतात. पण या संदेशाचा स्पष्ट अर्थ असाच की एकमेव अल्लाहचीच उपासना केली जावी. *(तौहीद)*

मक्केत पोचल्यावर प्रेषितांनी हजयात्रेच्या विविध विधी पार पाडल्या आणि जे सहकारी त्यांच्या समवेत होते त्यांना स्पष्ट करून सांगितलं की अशा प्रकारे ते त्यांचे पूर्वज इब्राहीम (त्यांना शांतता लाभो) यांच्या विशुद्ध एकेश्वरी उपासनांची पुनरावृत्ती करत आहेत.

प्रेषितांच्या उभ्या आयुष्याप्रमाणे त्यांची ही हजयात्रादेखील त्याच स्रोताकडं, आरंभाकडं म्हणजेच एकमेव अल्लाहपाशी परतणं होती. इब्राहीम यांच्याच पावलांवर, ज्यांनी पहिल्यांदा काबागृहाची इमारत उभारली,

अल्लाहचं सदन, एकमेव अल्लाहच्या आराधनेखातर.

त्यांचे सहकारी प्रेषितांच्या प्रत्येक कृतीचं निरीक्षण करत होते. जे हजयात्रेचे विधी ठरवत होते, त्यांना प्रेषित म्हणत होते, *"तुम्ही माझ्याकडून हे विधी (शिकून) घ्या." हिजरी सन १० मधील जुल-हिज्ज महिन्याच्या नवव्या दिवशी* प्रेषितांनी १,४४,००० हजयात्रेकरूंसमोर चोहोबाजूंनी अराफातच्या डोंगरांनी वेढलेल्या (मक्केपासून २० कि.मी. अंतरावरील) 'जबल-अर्रहमा' (दयेची टेकडी) वरून प्रवचन दिलं. हजयात्रेचं हे केंद्रस्थान आहे. त्यांनी लहानलहान वाक्ये उच्चारली आणि त्या खोऱ्यातील सर्व लोकांना ते ऐकता यावे म्हणून त्यांच्याभोवती असलेली लोकं त्या वाक्यांची पुनरावृत्ती करत होते.

# समारोपीय प्रवचन

मक्का येथील अराफातच्या टेकडीवरून इ. स. ६३२ हिजरी सन १० मध्ये हजच्या वार्षिक यात्रेप्रसंगी प्रेषित मुहम्मद (त्यांना शांतता लाभो) यांनी समारोपाचं प्रवचन दिलं. या संदेशाचा मजकूर जबरदस्त व प्रभावी होता. प्रेषित सुरुवातीलाच म्हणाले की ते या ठिकाणी हजयात्रेकरूंशी पुढच्या वर्षी पुन्हा भेटू शकतील की नाही हे त्यांना माहीत नाही. नंतर त्यांनी त्या स्थळाचं पावित्र्य लक्षात आणून दिलं. तसेच त्या महिन्याची आणि स्वत: त्यांच्या जिवांचा मान-सन्मान आणि त्यांच्या मालमत्तेच्या पावित्र्याची आठवण करून दिली. त्यांनी स्पष्टपणे सांगितलं की अज्ञानकाळाचा शेवट झालाय. त्याचबरोबर त्या रुढी-परंपरांचाही; सत्तेसाठी एकमेकांशी स्पर्धा आणि आपसातील कलह नष्ट झालेत. यापुढं सर्व मुस्लिम श्रद्धा, बंधुभाव व परस्पर स्नेहानं एकसंघ झालेत, ज्याद्वारे ते इस्लामची साक्ष देतील. कोणत्याही परिस्थितीत त्यांनी *"अत्याचार करू नये की अत्याचारास बळी पडता कामा नये."* अल्लाहसमोर सर्व मान-सन्मान आणि त्याची नम्रता आहे हे त्यांनी समजून घेतलं पाहिजे. कारण *"तुम्ही सर्व आदमची संतान आहात आणि आदमची निर्मिती चिखलमातीपासून केली गेलीय. अल्लाहच्या नजरेत सर्वांत आदरणीय तोच जो सर्वांत जास्त सदाचारी असेल."*

प्रेषित मुहम्मद म्हणाले, *''अल्लाहशी अपार एकनिष्ठपणा वगळता कोणत्याही अरबाला अरबेतरावर श्रेष्ठत्व नाही.''* प्रेषितांनी मुस्लिमांना ही आठवण करून दिली की त्यांनी आपल्या भार्यांशी सभ्यतेनं वागावं. ते पुढे म्हणाले, *''महिलांच्या बाबतीत अल्लाहचं भान ठेवा आणि त्यांच्याशी चांगुलपणाने व्यवहार करण्याचा प्रयत्न करा.''* तिथं जमलेल्या सर्व श्रद्धावंतांना आणि नंतरच्या काळात जे त्यांच्या शिकवणींचं पालन करणार आहेत त्यांना मार्ग आणि त्या मार्गाच्या अटी दाखवण्यासाठी ते पुढं म्हणाले, *''मी तुमच्यात स्पष्ट असं मार्गदर्शन, अल्लाहचा ग्रंथ आणि प्रेषितांच्या कृती व उक्ती (हदीस) सोडून जात आहे, ज्यास तुम्ही जर घट्ट धरून ठेवाल तर ते तुम्हाला पापांपासून वाचवेल.''*

आपलं संक्षिप्त प्रवचन संपवताना प्रेषितांनी लोकांना विचारलं, *''मी हा संदेश प्रामाणिकपणे तुमच्यापर्यंत पोचवला?''* उपस्थित जनसमुदायातून प्रतिसाद मिळाला, *''हे अल्लाह, होय.''* प्रेषितांनी आपल्या हाताचं बोट उंचावलं आणि म्हणाले, *''हे अल्लाह, तू माझा साक्षी आहेस.''* प्रवचन संपल्यानंतर भाविकांनी प्रतिसाद दिला, *''आम्ही साक्षी आहोत, तुम्ही प्रामाणिकपणे संदेश पोचता केला. तुम्ही आपलं जीवितकार्य पार पाडलं आणि तुम्ही तुमच्या समुदायास उत्तम उपदेश दिला.''* आणि मग प्रेषितांनी प्रवचनाचा शेवट केला, *''हे अल्लाह, तू माझा साक्षी आहेस आणि जे या वेळी उपस्थित आहेत त्यांनी हा संदेश इथं अनुपस्थितांपर्यंत पोचवू दे.''*

मुस्लिमांच्या आध्यात्मिक जनसमुदायासमोर प्रेषित मुहम्मद साक्ष देत होते. त्यांच्याशी आध्यात्मिक एकता साधताना हजयात्रेप्रसंगी ज्याची मूळ मागणीच या सृष्टीच्या निर्मात्या, शक्तिशाली अल्लाहसमोर साधेपण आणि ऐक्य आहे. या वेळी प्रेषितांनी रंग, वंश, जात, लिंग यांचा भेद न पाळता मानवजातीमध्ये निर्विवाद समता या अल्लाहच्या संदेशाच्या मूळ गाभ्याची आठवण करून दिली. फक्त एकाच बाबतीत त्यांना वैशिष्ट्य लाभलं आणि ती बाब म्हणजे स्वत:शी कसा व्यवहार करता, आपल्या बुद्धिमत्तेद्वारे, क्षमतेद्वारे, भावनांद्वारे.

ती कुठलीही असोत, अरब वा अरबेतर, काळे अथवा गोरे, गरीब

किंवा श्रीमंत, स्त्री असो की पुरुष; सर्व मानव आपल्या आध्यात्मिक संस्कार, स्वभाव, त्यांचं नियंत्रण, श्रद्धेचं संवर्धन आदर, आत्म्याचं पावित्र्य आणि सभ्य वर्तन याद्वारेच त्यांची ओळख होते. हजारोंच्या संख्येनं भाविकांच्या उपस्थिती ज्यामध्ये गुलाम होते, कबिल्याचे प्रमुख होते, स्त्री-पुरुष दोन्ही होते, प्रेषितांना साक्ष दिली की त्यांनी आपलं जीवितकार्य स्दिधीस नेलं. आणि साऱ्या श्रद्धावंतांनी एकाच सुरात साक्ष दिली की त्यांना तो संदेश मिळाला आणि त्यांनी त्याचा मजकूर व अर्थ समजून घेतला.

काही तासांनंतर प्रेषित मुहम्मद यांना अवतरणाद्वारे कळवलं गेलं की त्यांचं कार्य आता संपत आलंय.

> ''आज तुमचा धर्म तुमच्यासाठी परिपूर्ण केलाय आणि
> तुमच्यासाठी धर्म म्हणून इस्लामची निवड केली.''
>
> (कुरआन, ५:३)

प्रेषितांच्या शृंखलेचा शेवट होत आला आणि प्रेषित आता आपल्या घरी, एकमेव अल्लाहच्या सान्निध्यात परत जात होते.

## 'हे मनपरिवर्तन करणाऱ्या...'

सारे मुस्लिमेतर बांधव : काहीजण शांततेच्या, सत्यतेच्या आणि प्रामाणिकपणाच्या शोधात होते, काही लोकांना अजूनही त्यांच्या संशयातली सत्यता पटली नव्हती पण त्याच वेळी ते सर्व लोक एक प्रकारचा आंतरिक लढा अनुभवत होते. त्यासाठी त्यांना परिश्रम आणि संयमाची गरज होती. प्रेषितांनी त्यांना अल्लाहच्या संकेतांचं अध्ययन करण्यास सांगितलं आणि प्रकाशासाठी अल्लाहपाशी मदत व मार्गदर्शनाची याचना करण्यास सांगितलं.

ज्या मुस्लिमांनी एकमेव अल्लाहचं अस्तित्व मान्य केलं होतं त्यांना प्रेषित मुहम्मद (त्यांना शांतता लाभो) यांनी नम्रतापूर्वक आणि आपलं दौर्बल्य ओळखून हा लढा सुरू ठेवण्यास सांगितलं. अल्लाहची आठवण करत आध्यात्मिक समृद्धी प्राप्त करण्यास सांगितलं. आणि कुरआननं म्हटल्याप्रमाणे

आपली हृदयं स्थिर ठेवावीत : *“आमच्या विधात्या! आम्हास मार्गदर्शन केल्यानंतर आमच्या मनांना विचलित करू नकोस.”*

प्रेषित अल्लाहची आराधना करत म्हणाले,

“हे मनाचं परिवर्तन घडवून आणणाऱ्या! माझं मन तुझ्या धर्मासाठी स्थिर असू दे.”

## २५

# स्वर्गामध्ये :
# सर्वोच्च एकात्मतेत

हजयात्रेचा शेवट झाला. प्रेषित मुहम्मद (त्यांना शांतता लाभो) यांनी सर्व विधी पूर्ण केल्या आणि आता त्यांना मदीनेला परतायचं होतं. त्यांच्याबरोबर आलेल्या यात्रेकरूंसमवेत ते मदीनेकडं निघाले. मदीनेस पोहोचल्यानंतर दैनंदिन जीवनाची सुरुवात झाली.

बऱ्याच मुस्लिमांनी इस्लामचा सिद्धान्त आणि कुरआन, धार्मिक विधींचे महत्त्वाचे घटक, त्यांचे नियम व अटी लोकांना शिकवल्या आणि शिकवून घेतल्या. प्रेषितांनी घालून दिलेल्या आणि अवतरणाद्वारे ठरवलेल्या नियमांनुसार 'जकात' (अल्लाहची धन्यता मिळविण्यासाठी आपल्या संपत्तीला विशुद्ध करणं) गोळा केली जात होती.

अशा प्रकारे इस्लामचे सर्व पाच स्तंभ (अरकाने इस्लाम) हजयात्रेच्या विधींसहित ज्या आताच पूर्ण झाल्या होत्या, संग्रहित केलं गेलं होतं. मुस्लिम समुदायाला दैनंदिन जीवन जगण्यासाठी इस्लामचे आवश्यक सिद्धान्त प्राप्त झाले होते.

# आजारपण

रमजान महिना संपल्यावर काही आठवड्यांनंतर हिजरी सन ११ मध्ये ज्या ठिकाणी मुस्लिम आणि कुरैश यांच्यात जे दुसरं युद्ध झालं होतं त्या उहुदच्या ठिकाणी प्रेषित मुहम्मद (त्यांना शांतता लाभो) गेले होते. तिथं जे लोक शहीद झाले होते त्यांच्यासाठी त्यांनी प्रार्थना केली. मग ते मदीनेच्या मशिदीत गेले. मिंबरवर बसले (प्रवचन देण्यासाठी मशिदीत असलेलं उंच स्थान) आणि मुस्लिम सहकाऱ्यांना संबोधून म्हणाले,

> ''मी तुमच्या आधी (परलोकात) जात आहे आणि मी तुमची साक्ष देईन.''

आपलं भाषण संपवताना त्यांनी उपदेश दिला,

> ''माझ्यानंतर तुम्ही परत अनेकेश्वरांकडं वळणार याची मला भीती नाही, मला भीती आहे ती या जगातल्या धनसंपत्तीमुळे तुमची भांडणं होतील.''

ते शब्द ठळकपणे असं व्यक्त करतात की त्यांनी हे आयुष्य सोडून देण्याची तयारी करावी. त्याचबरोबर आपल्या आध्यात्मिक समुदायाच्या भवितव्याबाबत त्यांनी चिंता व्यक्त केली. ते म्हणाले की त्यांची श्रद्धा लुप्त होणार नाही. पण हे जग आपल्या मोहानं त्यांचा ताबा घेईल आणि दुर्दैवानं दोन्ही एकमेकांच्या संगतीतच राहतील.

प्रेषित मुहम्मद वास्तविकपणे एक प्रकारचं भाकित करत होते. ते अल्लाहची भक्ती - आराधना करत राहतील, पण ते प्रतिष्ठा, धनसंपत्ती, सत्ता आणि त्यांच्या इतर हितसंबंधांमुळे विभागून जातील, ज्या बंधुभावानं त्यांच्यात एकता निर्माण केली होती ते विसरून जातील.

तो दिवस मावळल्यानंतरच्या रात्री प्रेषित मुहम्मद मदीनेतील अल-बकी कब्रस्तानात गेले, तिथं दफन केलेल्यांना खालील शब्दांत अभिवादन करण्यासाठी–

*''तुम्ही आमच्या पुढं गेलात, आम्ही तुमच्या मागं येणार आहोत.''*

परत निघताना प्रेषितांचं डोकं दुखू लागलं आणि जवळपास दोन आठवडे दुखत राहिलं. आयुष्याच्या शेवटच्या दिवसांत ते बिछान्यावर पडून होते. पहिल्यांदा त्यांना ताप आलेला असताना आणि डोकं दुखत असतानाही तेच नमाजचं नेतृत्व (इमामत) करत होते. दिवस उलटत गेले आणि त्यांचा आजार वाढतच गेला. प्रेषित मुहम्मद (त्यांना शांतता लाभो) बराच वेळ पडूनच राहत होते. काही दिवस ते आयशा (अल्लाह त्यांच्याशी राजी होवो) यांच्याच घरी होते. ताप कमी होत नव्हता. ते कमजोर होत गेले. त्यातून थोडं सावरल्यानंतर त्यांनी चेहऱ्यावर सात तांबे (पाणी भरण्यासाठी बनवलेलं जनावराच्या चामड्याचं पात्र) भरून पाणी टाकण्यास सांगितलं. त्यांना थोडं बरं वाटलं आणि डोक्याला पट्टी बांधून त्यांनी मशिदीत जाण्याचा निर्णय घेतला. ते मिम्बरवर बसले आणि आपल्या निष्ठावंत सहकाऱ्यांना संबोधून कबरीबाबत सांगितलं. ते आग्रहानं म्हणाले की त्याच्या कबरीला आराधनेचं स्थान बनवू नये.

प्रेषित म्हणाले, *''माझ्या कबरीवर मूर्तीपूजेचं कार्य करू नका.''*

मुहम्मद एक प्रेषित होते, पण ते मनुष्यच राहिले. आपल्या अनुयायींचं त्यांच्यावर किती प्रेम होतं याची त्यांना कल्पना होती. त्यांनी सहकाऱ्यांना इशारा दिला की त्यांच्यापूर्वी होऊन गेलेल्यांसारख्या चुका त्यांनी करू नयेत; जसे त्यांनी आपल्या प्रेषितांना इतकं आदर्श बनवलं की ते त्यांची उपासना करू लागले.

मनुष्याची कधीही उपासना केली जाऊ नये. प्रेषितांनी दिलेल्या या आज्ञेवरून स्पष्ट होते की इस्लामी प्रथेनुसार प्रेषिताचं चित्र आणि त्यांच्या मूर्ती का कोरू नयेत. माणसानं प्रेषितांच्या शिकवणी पाळाव्या, मनुष्यरूपी त्याच्या उपासना करू नयेत. ते मार्ग दाखवणारे आहेत, त्यांना अल्लाहच्या जवळ आणाले. केवळ अल्लाहच उपासनेस पात्र आहे.

नंतर प्रेषित उठून उभे राहिले आणि त्यांनी कुणाचं काही देणं आहे का?

असं विचारलं. कोणतं कर्ज त्यांच्यावर बाकी आहे का? कुणाचं मन दुखलं, कुणास इजा दिली, असं जर असेल तर त्या व्यक्तीनं तसं सांगावं म्हणजे ते प्रकरण मिटवून टाकू. एक व्यक्ती उठून म्हणाली की प्रेषितांनी त्याचे तीन दिरहम देणं आहे. प्रेषितांनी आज्ञा दिली, *''त्याचे तीन दिरहम लगेच परत देऊन टाका.''*

कुरआनच्या आज्ञेनुसार प्रेषितांनी कोणत्याही मुस्लिमाचे अंत्यविधी त्याच्या कर्जाची परतफेड केल्याशिवाय कधीच पूर्ण केले नव्हते. त्या व्यक्तीनं कर्जरहित हे जग सोडून जावं, कोणत्याही मनुष्याचं त्यानं काही देणं नसावं, त्या व्यक्तीनं असा कोणता अपराध बरोबर घेऊन जाऊ नये जो अक्षम्य असेल, त्यास कोणतंही दु:ख नसावं.

प्रेषित पुन्हा मिम्बरवर बसले आणि म्हणाले,

> ''शक्तिशाली अल्लाहनं आपल्या एका सेवकास या जगातल्या साधनांची अथवा आपल्यापाशी असलेल्याची निवड करण्याची संधी दिली आणि त्यानं त्याची निवड केली जे अल्लाहपाशी आहे.''

त्यांचे हे शब्द ऐकून अबु बक्र (अल्लाह त्यांच्याशी राजी होवो) यांच्या डोळ्यांतून अश्रू ढळू लागले. त्यांचं प्रेषितांवर जसं अपार प्रेम होतं त्यावरून त्यांनी हे ओळखलं होतं की मुहम्मद स्वत:विषयी सांगत आहेत आणि आपल्या निधनाच्या बाबतीत सांगत आहेत. प्रेषितांनी अबु बक्र यांना शांत केलं आणि तिथं जमलेल्यांना संबोधून रास्त आणि व्यक्तिगत अबु बक्र यांना म्हणाले,

> ''माझ्यासाठी ज्या अनुयायानं अफाट औदार्य, आपल्या सहवासाद्वारे आणि संपत्तीद्वारे ज्यांना दाखविलं ते अबु बक्र आहेत. अल्लाहव्यतिरिक्त माझा कुणी जिवलग मित्र असता तर ते अबू बक्र असते. पण इस्लामी बंधुभाव आणि आपुलकीस प्राधान्य आहे.''

# निरोप

मग प्रेषित मुहम्मद (त्यांना शांतता लाभो) आयशा (अल्लाह त्यांच्यावर राजी होवो) यांच्या घरी परत गेले. श्रद्धा, आचरण आणि काबागृहाच्या बाबतीत काही उपयुक्त गोष्टी सांगितल्या. नंतर ते मशिदीला जाऊ इच्छित होते. पण वेदना इतक्या तीव्र होत्या की ते एकदम गळाटून गेले. त्यांना थोडं बरं वाटल्यावर त्यांनी मुस्लिमांनी नमाज अदा केली का, असं विचारलं. आयशा म्हणाल्या की ते त्यांची वाट पाहत आहेत. त्यांनी पुन्हा उठण्याचा प्रयत्न केला, पण पुन्हा बेशुद्ध झाले. दुसऱ्यांदा शुद्धीवर आल्यावर त्यांनी तोच प्रश्न विचारला आणि त्यांना सांगण्यात आलं की मुस्लिम अजूनही त्यांची वाट पाहत आहेत. त्यांनी आयशा यांना म्हटलं की मुस्लिमांनी नमाज अदा करावी आणि अबु बक्र (अल्लाह त्यांच्यावर राजी होवो) यांनी नमाजचं नेतृत्व (इमामत) करावं.

नंतरच्या दिवसांतही प्रेषित मुहम्मद आयशा यांना हेच सांगत होते. पण जेव्हा कधी ते तसं म्हणत आयशा प्रत्येक वेळी त्यांना विनंती करत होत्या की अबु बक्र यांना या जबाबदारीतून मुक्त करावं. त्यांनी आग्रहानं सांगितलं की ते अत्यंत संवेदनशील आहेत आणि कुरआनचं पठण करतान ते रडू लागतात. आयशा यांच्या प्रत्येक वेळी असा आक्षेप घेण्यावर त्यांना तेच उत्तर मिळत होतं की अबु बक्र यांनीच नमाजचं नेतृत्व करावं.

दोन दिवसांनी जेव्हा त्यांना आजारातून थोडं बरं वाटू लागलं, ते मशिदीत जाऊ शकले. त्या वेळी जुहरची (मध्यान्हाची) नमाज मुस्लिम लोक अबु बक्र याच्या मागं अदा करत होते. अबु बक्र यांना वाटलं की आपण मागं यावं आणि प्रेषितांसाठी जागा सोडावी, पण प्रेषितांनी त्यांना तसं करू दिलं नाही. ते अबु बक्र यांच्या शेजारी बसले. प्रेषितांनी उर्वरित नमाजचं नेतृत्व केलं. अबु बक्र मोठ्यानं पुनरुच्चार करत होते.

ही प्रेषितांची मशिदीतली शेवटची उपस्थिती होती. त्याच्या दुसऱ्या दिवशी त्यांनी आपल्या मालकीच्या सर्व वस्तु शेवटच्या दिरहमपर्यंत वाटून

दिल्या, त्यांचं चिलखतसहित. त्यांनी उपदेश देणं सुरूच ठेवलं होतं. त्यांनी वारंवार हे सांगितलं की गुलाम, निर्धन आणि खालच्या लोकांशी उत्तम व्यवहार करावा. दुसऱ्या दिवशी सोमवारी सकाळच्या वेळी आयशा यांच्या घरातला एक पडदा त्यांनी उचलून टाकला म्हणजे त्यांना मशिदीतल्या मुस्लिमांना पाहता यावं. त्यांनी स्मितहास्य केलं. मुस्लिमांना आश्चर्य वाटलं आणि प्रेषित परत त्यांना येऊन भेटतील अशा विचारानं त्यांना आनंद वाटू लागला. पण तो पडदा पुन्हा खाली करण्यात आला आणि प्रेषित पुन्हा दिसले नाहीत.

त्यानंतर काही तासांनी त्यांच्या कन्या फातिमा (अल्लाह त्यांच्यावर राजी होवो) त्यांना भेटायला आल्या आणि प्रेषितांच्या तीव्र यातनांबाबत अत्यंत कनवाळू टिप्पणी केली. यावर प्रेषित आपल्या कन्येस म्हणाले,

*''आजच्या दिवसानंतर तुमच्या पित्याला कसलाही त्रास होणार नाही.''*

आपल्या कन्येशी कानगोष्टी करत प्रेषित म्हणाले की त्या लवकरच त्यांच्याशी येऊन मिळतील आणि यामुळे रडतरडत त्यांना हसू आलं.

वेदना वरचेवर तीव्र होत गेल्या आणि प्रेषितांना लवकर बोलता येत नव्हतं.

आयशा प्रेषितांच्या शेजारी येऊन बसल्या, त्यांना दाबून धरलं, त्यांचं डोकं मांडीवर घेऊन दाबू लागल्या.

प्रेषितांनी डोळे बंद केले, आयशा यांनी त्यांना धरून ठेवलं होतं आणि प्रेषित असं बोलण्याचा प्रयत्न करत असल्याचं त्यांनी ऐकलं,

*''नंदनवनात, सर्वोत्तम सहवास...''*

त्यांनी आयतीच्या शेवटच्या भागाचं पठण केलं,

''सर्व प्रेषित (त्या सर्वांना शांतता लाभो) शहीद, सदाचारी
आणि प्रामाणिक लोकाच्या सहवासात, ज्यांच्यावर
अल्लाहची कृपा अधिक - किती सुंदर हा सहवास!''

त्यांनी तीन वेळा याचा उच्चार केला.

''सर्वोत्तम सहवासात! सर्वोत्तम सहवासात! सर्वोत्तम सहवासात!''

त्यांचे हात एकदम ढिले पडले, त्यांचं डोकं जड झालं आणि प्रेषितांनी शेवटचा श्वास घेतल्याचं आयशा यांना जाणवलं.

प्रेषित मुहम्मद यांनी दि. ८ जून ६३२ इ. स. रोजी (वय ६३ वर्षं, सोमवार : १२ रबीऊल अव्वल, हिजरी वर्ष ११) या जगाचा निरोप घेतला, आपल्या विधात्याच्या भेटीसाठी, त्यांचा उपदेशक, मित्रानं शेवटी त्यांना परत बोलवून घेतलं. त्यांना चिरंतन शांतता देण्यासाठी. मनुष्याच्या या दुनियेच्या पलीकडं. परमोच्च विधात्यानं मानवजातीसाठी संदेश पोहोचवण्यासाठी त्यांना पाठवलं होतं. त्या दिवसापासून जगभर आणि सर्व काळातल्या मुस्लिम समुदायचं शेवटच्या प्रेषितास सलाम करण्याचं आणि मनापासून खालील प्रार्थना म्हणण्याचं थांबलेलं नाही.

> ''अल्लाह त्याचे दूत - प्रेषितांना अल्लाहचा कृपाप्रसाद पाठवतात, हे श्रद्धावंत लोक तुम्हीदेखील त्यांच्यावर अल्लाहची कृपा पाठवा, त्यांना सन्मानपूर्वक अभिवादन करा.'' (कुरआन, ३३:५६)

# प्रेम आणि शून्यता

प्रेषित मुहम्मद (त्यांना शांतता लाभो) यांच्या मृत्युची बातमी मदीनेत सर्वदूर पोहोचली आणि सर्वांना अमर्याद दु:खानं वेढून टाकलं. चेहऱ्यावर आक्रोश होता आणि अश्रू वाहत होते. प्रेषितांनी सांगितलं होतं की दु:ख व्यक्त करावं पण अर्थहीन भावनांचा उद्रेक नको, सभ्यतापूर्वक संयम ठेवावा. प्रेषितांच्या घरापाशी विलक्षण शांतता होती.

उमर (अल्लाह त्यांच्यावर राजी होवो) यांनी अचानक शांतता भंग केली आणि जोरात उद्गारले की प्रेषितांचं निधन झालेलं नाही. ते परत येतील. कुणी प्रेषितांच्या निधनाची गोष्ट जरी केली तर त्याला ठार करून टाकण्याची धमकीही त्यांनी दिली. त्यांचं अतिव प्रेम आणि त्यांची शून्यतेची भावना इतकी

तीव्र होती. ज्या व्यक्तीनं त्यांना मार्ग दाखवला आणि ज्यांच्या सहवासात ते राहिले आणि ज्यांच्या दृढ प्रेमाची ग्वाही खुद्द कुरआननं दिली होती. अशा व्यक्तीशिवाय आपल्या भवितव्याचं काय होईल याची त्यांना कल्पनाही करवत नव्हती.

> ''तुमच्यामधूनच एक प्रेषित तुमच्याकडं आला. तुम्हाला काही त्रास होणं त्याला जड जातं. तुमच्या भल्याची त्याला अत्यंत हाव आहे आणि तो श्रद्धावंतांचा स्नेही आणि कृपावंत आहे.'' (कुरआन, ९:२८)

भावनांनी त्यांच्यावर ताबा घेतला होता. या वेळी अबु बक्र (अल्लाह त्यांच्यावर राजी होवो) पोहोचले. प्रेषितांच्या बिछान्याशेजारी बसले आणि प्रेषितांच्या शरीरावरील ब्लँकेट उचललं. प्रेषित त्यांना सोडून गेल्याचं वास्तव पाहून त्यांच्या गालावरून अश्रू वाहू लागले. ते बाहेर आले. उमर यांना शांत करण्याचा प्रयत्न केला. ते अजूनही भावनांच्या धक्क्यातून सावरले नव्हते. शांत होण्यास त्यांनी नकार दिला, तेव्हा अबु बक्र बाजूस उभे राहिले आणि जमावाला संबोधून विद्वत्ताप्रचुर शब्दांनी इस्लामचा आत्मा व्यक्त करत म्हणाले, ''जे प्रेषित मुहम्मद यांची उपासना करत होते त्यांनी आता हे जाणून घ्यावं की प्रेषित मुहम्मद आता जीवंत नाहीत आणि जे शक्तिशाली अल्लाहची आराधना करत होते त्यांनी हे लक्षात घ्यावं की अल्लाह जीवंत आहे आणि त्यास मरण नाही.'' आणि त्यांनी खालील आयतीचं पठण केलं :

> ''मुहम्मद तर एक प्रेषित आहेत, त्यांच्या पूर्वीही प्रेषित होऊन गेलेत. जर त्यांना मरण आलं अथवा त्यांचा वध झाला तर तुम्ही आपल्या पाऊलवाटेवर मागं फिरणार? आणि जो कुणी आपल्या पाऊलवाटेवर मागं फिरेल अल्लाहचं काहीएक नुकसान करणार नाही. जे आभार व्यक्त करतात, अल्लाह त्यांना त्वरित प्रतिफळ देतो.''
>
> (कुरआन, ३:४४)

उमर यांनी ही आयत ऐकली आणि खाली कोसळले. नंतर त्यांनी हे मान्य केलं की त्यांनी जणू ही आयत पहिल्यांदाच ऐकली असावी, जरी ती फार

पूर्वी अवतरलेली होती. इतर मुस्लिमांप्रमाणेच त्यांनी हे सत्य स्वीकारलं की प्रेषित त्यांना सोडून गेलेत आणि अचानकपणे जी पोकळी निर्माण झाली आहे ती एकमेव अल्लाहशी प्रगाढ श्रद्धेनं भरून काढावी. ''अल्लाह जीवंत आहे आणि त्यास मरण नाही.'' प्रेषितांशिवाय, आपण त्यांच्या आदर्श जीवनाच्या प्रकाशात त्यांना जगायला हवं यासाठी त्यांना शक्ती, धैर्य आणि निश्चयासाठी अल्लाहकडं मदतीची याचना करावी लागेल.

२६

# अल्लाहचे प्रेषित : उत्कृष्ट आदर्श

कुरआनच्या अरतरणाद्वारे मुस्लिम अनुयायी, सद्यकालीन मुस्लिम समुदाय आणि अनंतकालीन इतिहासातल्या सबंध सामाजिक समुदायांना आणि सभ्यतांना सुचित केले जाते :

> ''तुमच्यामधील प्रत्येकासाठी ज्यांना अल्लाह आणि परलोकाच्या आकांक्षा आहेत आणि जे अल्लाहच्या स्मरणात मग्न असतात त्यांच्यासाठी अल्लाहच्या प्रेषितामध्ये उत्कृष्ट आदर्श आहे.'' (कुरआन, ३३:२१)

प्रेषित मुहम्मद (त्यांना शांतता लाभो) अत्यंत प्रभावशाली प्रवर्तक होते, ज्यांच्या शिकवणींचा अभ्यास केला जातो. मार्गाचं अनुसरण केलं जातं, एक आदर्श ज्याचं अनुकरण लोक करतात आणि ज्यांची वचनं, ज्यांच्या कृती आणि शांतपणा सर्वांना आवडतात यावर मनन केलं जातं.

आपल्या जीवितकार्याच्या २३ वर्षांच्या काळात मुहम्मद आध्यात्मिक आणि ऐहिक स्वातंत्र्याची वाट शोधत होते. त्यांना टप्प्याटप्प्यांनी अवतरणं प्राप्त होत होती. दैनंदिन जीवन जगत असताना जणू सर्वशक्तिमान सर्वोच्च अल्लाह त्यांच्याशी सर्वकाळ अनंतकालीन ऐतिहासिक संभाषण करत होता. मुहम्मद अल्लाहस अनुभवत होते. त्याच्याशी संवाद

घालत आणि अरब वाळवंटातील आपल्या प्रिय अनुयायींसमवेत ते रात्रंदिवस त्याच्या संकेतांवर आस्था ठेवत होते.

सारं जग निद्रेत असताना ते प्रार्थनेत व्यस्त असायचे. त्यांच्या भावा-बहिणींनी त्यांच्या आशा भंग केल्या पण ते त्यांच्यासाठी प्रार्थना करत होते. त्यांचा अवमान झाला, त्यांच्यावर संकटं आली लोकांनी त्यांची साथ सोडली तरी त्यांनी धीर सोडला नाही. त्यांच्या प्रगाढ अध्यात्म्याद्वारे ते स्वत्वाशी मुक्त झाले. ते आकाशात भरारी घेत असलेल्या पक्ष्यामध्ये, उंच उभारलेल्या झाडामध्ये, अंधकार पसरताना आणि मग एखाद्या तेजस्वी ताऱ्यामध्ये दडलेल्या अल्लाहच्या संकेतांना पाहत होते.

प्रेषित मुहम्मद आपला स्नेह व्यक्त करत होते आणि आपल्याभोवती त्याचा प्रसार करत होते. त्याच्या पत्नींना त्यांची जवळीक, त्यांची कोमलता, त्यांची आपुलकी आल्हाददायक वाटे. त्यांचे अनुयायी त्यांच्यावर अलौकिक अमर्याद औदार्यानं प्रेम करत होते.

ते आपल्या प्रियजनांबरोबर हसत खेळत राहात. एखाद्या गुलामास त्यांना काही बोलायचं झाल्यास ते त्याचं ऐकायचे. शहराच्या दुसऱ्या टोकापर्यंत त्याच्याबरोबर जायचे आणि त्याच्यावर प्रेमही करायचे. ते अल्लाहच्या मालकीत होते. त्यांच्यावर कुणा दुसऱ्याचा ताबा नव्हता. आपलं प्रेम मात्र त्यांनी सर्वांना वाटून दिलं. कुणाच्या हातात हात दिला तर ते कधी प्रथम स्वत:चा हात मागं घ्यायचे नाहीत आणि एखाद्याशी मवाळ वाणीनं, प्रेमभावनेनं बोलल्यास त्याच्या मनाला शांतता स्पर्श करते हे त्यांना ठाऊक होतं. ते स्वत्वापासून मुक्त होते. कुणाकडंही त्यांनी दुर्लक्ष केलं नाही. त्यांचं सान्निध्य लाभणं लोकांना छत्रछायाच वाटे, ते प्रेषित होते.

प्रेषित मुहम्मद यांनी लोकांना जवळ केलं. त्यांना क्षमा केली. दररोज ते अल्लाहशी आपल्या चुकांची क्षमा मागायचे. त्यांच्याकडं चुकांचं ओझं घेऊन येणाऱ्या पुरुषांचं आणि महिलांचंही ते स्वागत करीत आणि त्यांना क्षमा करण्याचा, समाधानाचा, अल्लाहशी संवाद साधण्याचा आणि त्याच्या संरक्षणाचा मार्ग दाखवत.

इतरांच्या चुकांवर ते पांघरून घालत, कुणास कळू देत नसत.

प्रत्येकास वैयक्तिक तठस्थपणाची आणि शिस्तबद्धतेची शिकवण देत. कंटाळवाणा करीत कुणी त्यांना किमान आचरणाबाबत विचारणा केली तर ते त्यांना स्वत:ची समज आणि बुद्धिमत्ता उपयोगात आणण्यास सांगत. आपल्या विसंगतीपासून मुक्त होण्याचा सल्ला देत. त्याच वेळी आपल्या उणिवा मान्य करण्यास सांगत. स्वातंत्र्यप्राप्तीसाठी आवश्यक दोषरहित जबाबदाऱ्या पार पाडणं आणि नीतीमूल्याचं पालन करणं या अटी त्यांनी शिकविल्या.

शांततेसाठी न्याय अपरिहार्य आहे आणि प्रेषितांनी आग्रहपूर्वक सांगितलंय की इतरांचा आदर-सन्मान करू शकत नाही अशी व्यक्ती समता अनुभवू शकत नाही. त्यांनी गुलामांची सुटका केली आणि मुस्लिमांनीही सतत असं करण्याची शपथ घ्यावी असा सल्ला दिला. श्रद्धावंत मुस्लिम समुदाय स्वतंत्र समाज असायला हवा, असं ते म्हणत.

कुरआनच्या अवतरणांनी प्रेषितांना मार्ग सुचविला आणि जसं आपण पाहतो, त्यांनी गुलाम, गरीब आणि खालच्या स्तराच्या लोकांकडं विशेष लक्ष पुरविलं. त्यांना प्रेषितांनी आपली प्रतिष्ठा व्यक्त करणं, आपल्या अधिकारावर हक्क सांगणं आणि न्युनगंडाच्या भावनेपासून सुटका करून घेण्यास सांगितलं. लोकांना धार्मिक, सामाजिक आणि राजकीय स्वातंत्र्याकडं बोलविणारा त्यांचा संदेश होता.

प्रेषितांच्या जीवितकार्याची सांगता झाली त्याप्रसंगी दयेच्या पर्वता (जबलर्रहमा) च्या पायथ्याशी असलेल्या मैदानात सर्व जाती-वंशाचे, सभ्यता-संस्कृतीचे, सधन आणि निर्धन लोक उपस्थित होते. त्यांनी इस्लामचा संदेश ऐकून घेतला आणि तो संदेश म्हणजे मनुष्याची प्रतिष्ठा जात-जमात, संस्कृती-सभ्यता, रंगभेदावर आधारित नाही.

एकदा प्रेषितांनी असं वक्तव्य केलं होतं की *''तुमच्यातील सर्वोत्तम मनुष्य तोच आहे जो लोकांसाठी सर्वोत्तम असेल.''*

मुस्लिमांनाच नव्हे तर समस्त मानवजातीला संबोधत (अन-नास) - त्यांनी शेवटच्या हजयात्रेप्रसंगी समारोपिय प्रवचनात दिला होता– मानवजातीतील बंधुभावाच्या नावानं त्यांनी सदसद्‌विवेक बुद्धीवादी लोकांना

न्यायाच्या मार्गात अडसर आणणाऱ्या प्रतिमांच्या पुढं जावा. अल्लाहच्या हुजुरात कुणीही भेदाभेद, सामाजिक अन्याय आणि वंशवादाला योग्य ठरवू शकत नाही. मुस्लिम समुदायातील एका काळ्या वर्णाची व्यक्ती लोकांना नमाजकडं बोलावत (अजान देत) होती आणि गुलामाचा मुलगा मुस्लिम सैन्याचा सेनापती होता. श्रद्धेनं बाह्य स्वरूपाच्या आधारावर घेतलेल्या चुकीच्या निर्णयापासून श्रद्धावंतांची सुटका केली.

प्रेषित मुहम्मद यांनी आपल्या समुदायातल्या महिलांच्या (तक्रारी) ऐकून घेतल्या, ज्यांना त्यांचा हक्क मिळत नव्हता, ज्यांच्याशी दुर्वर्तन केलं जात होतं आणि त्यांना वेगळं केलं गेलं होतं. पवित्र कुरआननं प्रेषितांच्या या बाबींची दखल घेतली.

> ''अल्लाहनं त्या स्त्रीचं म्हणणं ऐकून घेतलं जी आपल्या पतीविषयी तुम्हांपाशी वाद घालत होती आणि अल्लाहकडं आपल्या दु:खाची तक्रार करत होती. अल्लाह तुमच्या दोघांमधला संवाद ऐकत होता. निश्चितच अल्लाह ऐकतो आणि जाणतो.'' (कुरआन, ५८:१)

अशाच प्रकारे प्रेषितांनी एका महिलेची तक्रा ऐकली जिला आपल्या पतीपासून तलाक हवा होता. कारण तिला आपला पती आवडत नसे. प्रेषितांनी तिचं म्हणणं ऐकून घेतलं, प्रकरण तपासलं आणि दोघांना वेगळं केलं.

आपल्या पतीपासून तलाक (खुलअ) मिळविण्यासाठी पुष्कळ महिला प्रेषितांकडं येत होत्या. उबैयेची कन्या जमीला, साहिलची कन्या हबीबा आणि बरीरा, कैसपुत्र साबितची पत्नी. शेवटचं प्रकरण कथन करताना अब्बास म्हणतात, साबितची पत्नी प्रेषितांकडं आली आणि म्हणाली की आपल्या पतीविरूद्ध तिला धार्मिक बाबतीत काही सांगायचं नाही, पण तिला अप्रामाणिकपणे वागण्याचा दोष नकोय. (पतीकडून पतिला मिळणाऱ्या हक्काचं उल्लंघन.) प्रेषितांनी तिला विचारलं की तिच्या पतीनं मेहेर (लग्नाच्या वेळी पतीकडून पत्नीला मिळणारी रक्कम अगर इतर मालमत्ता) मध्ये दिलेली बाग परत करण्यास ती तयार आहे का? तिनं मान्य केलं आणि प्रेषितांनी

साबित यांना आपल्या पत्नीस तलाक देण्यास सांगितलं.

आणखीन एका महिलेनं प्रेषितांकडं तक्रार केली की तिच्या पित्यानं तिची मर्जी विचारात न घेता तिचं लग्न उरकून टाकलं. प्रेषित हे लग्न रद्दबातल करण्यास तयार झाले. पण त्या महिलेनं सांगितलं की खरं पाहता ती आपल्या पित्याच्या निवडीनं संतुष्ट आहे, पण तिला साऱ्या पित्यांना ही समज द्यायची होती की असा निर्णय घेणं त्यांचं काम नव्हे आणि आपल्या मुलीची मान्यता असल्याशिवाय त्यांनी तिच्या लग्नाचा एकतर्फी निर्णय घेऊ नये.

प्रेषित मुहम्मद यांनी महिलांना आध्यात्मिक संस्कार दोन्ही बाजुंनी घडावेत, स्त्रीत्वाची जाणीव पुरुषांच्या दृष्टिकोनात बंदिस्त असता कामा नये किंवा सत्तेच्या जोरावर पती-पत्नीतले संबंध संपुष्टात आणता येत नाहीत, त्याची काळजी घेतली होती.

समाजामध्ये सर्वसामान्य वातावरणात सामाजिक, राजकीय, आर्थिक आणि लष्करी क्षेत्रामध्येसुद्धा स्त्रीचा सहभाग प्रेषितांचं उद्दिष्ट होतं. त्यांनी ते नाकारलं नव्हतं. एवढंच नव्हे तर त्यांनी तशी प्रेरणा दिली.

आध्यात्मिक संस्काराच्या प्रकाशात त्यांनी महिलांना स्वत:चं अस्तित्व ठासून सांगण्याचं मार्गदर्शन दिलं. त्यांनी सहभाग घ्यावा, स्वत:स अभिव्यक्त करावं आणि मानसिक स्वातंत्र्य व नैतिक सिद्धान्तांवर आपला हक्क सांगावा.परम उपकार शक्तिशाली अल्लाहवर श्रद्धा ठेवून स्त्रियांनी स्वत:च याची निवड करावी.

प्रेषित मुहम्मद मुलाबाळांशी प्रेम करत होते. निरागस मुलं आणि त्यांची कोमलता त्यांना आवडत होती. अल्लाहशी आणि स्वत:शी जवळीक साधलेली असल्यानं ज्यांना हार्दिक भावनांची भाषा कळत होती त्यांच्याकडं ते लक्ष देत होते. ते मुलांना जवळ करत होते, त्यांना अंगाखांद्यावर खेळवत असत, त्यांच्या निरागसतेला हात घालत, जे खरं पाहता अल्लाहशी सतत प्रार्थना करण्यासारखं आहे. दूतांसारखंच मुलांनादेखील अल्लाहच्याच मालकीची असतात असे प्रेषितांच्या ध्यानी मनी सतत राहायचे. आणि म्हणूनच जर नमाजच्या वेळी एखाद्या बाळाच्या रडण्याचा आवाज आला तर प्रेषित नमाज लवकर अटपायचे.

प्रेषित म्हणाले,

“कधी कधी मी नमाज अदा करताना उशीर करतो, पण जेव्हा मी (नमाजदरम्यान) एखाद्या बाळाचं रडणं ऐकतो, मी ती लवकरच अटोपून घेतो, त्या बाळाच्या आईला त्रास होऊ नये यासाठी.”

प्रेषितांना बाळांची निरागसता अतिशय आवडत होती. त्यांच्यापासूनच त्यांनी आपल्याभोवती लोकांना आणि जगाला पाहण्याची शिकवण घेतली. मुलांच्या सुंदरतेपासूनच निसर्गातील सौदर्याचा भास झाला. सौंदर्य पाहून त्यांच्या मनावर परिणाम होत होता. कधी कधी डोळ्यांत अश्रू उभे राहायचे. कवितेच्या लयानं किंवा पवित्र कुरआनच्या लयबद्ध पठणाचा त्यांना आल्हाद वाटे, जे परमोपकारक आणि अनंतकालीन सौंदर्याकडून अवतरलं होतं.

## प्रकाशाकडं नेणारा प्रकाश

प्रेषित मुहम्मद (त्यांना शांतता लाभो) यांनी मानवजातीसाठी श्रद्धा, नैतिकता आणि आशा यांचा संदेश आणला. ज्यांच्याद्वारे शक्तिशाली अल्लाह समस्त मानवांना त्यांचं अस्तित्व आणि या जगाचा निरोप घेऊन शेवटच्या दिवशी त्यांच्या भेटीची आठवण करून देतो. हा संदेश घेऊन प्रेषित मुहम्मद आले होते. आयुष्यभर त्यांनी स्त्री-पुरुष, मुलंबाळं, गुलाम, सधन-निर्धन आणि इतर बहिष्कृत लोकांना ऐकून घेतलं. त्यांचं समाधान केलं. त्यांचं स्वागत केलं. या पृथ्वीतलावर लोकांच्या या आवडत्या प्रेषितांनी आपला स्नेह, दया आणि मनाचा प्रेमळ स्वभाव कुणापासूनही लपवून ठेवला नव्हता.

प्रेषितांच्या आयुष्यातील हरेक घटना पुनरुज्जीवन आणि सखोल बदल घडवून आणण्याचं साधन होती. श्रद्ध मुस्लिम तसेच कोणत्याही धर्माचे अनुयायी असोत, आपल्या व्यक्तिगत जीवनशैलीचा विचार न करता जे मुहम्मद यांच्या चारित्र्याचा अभ्यास करतात ते त्यापासून भरपूर लाभ मिळवू

शकतात आणि त्यांच्या संदेशाचा आत्मा आणि त्यांच्या जीवनचरित्राचा प्रकाश अनुभवू शकतात.

प्रेषित मुहम्मद एकाग्र होऊन उपासना करत होते. त्यांनी स्वत्वात बदल घडवून आणला, त्याचबरोबर जगाला कलाटणी दिली. अल्लाहच्या, आपल्या विधात्याच्या मार्गदर्शनानुसार त्यांनी (जगाला) सर्व काही देऊ केलं. अशा अर्थाचा तो संघर्ष होता, अशा अर्थाचे त्यांचे आदेश होते. श्रद्धावंतांना याद्वारे त्यांनी भल्या गोष्टींची जोपासणा करणे आणि दुष्टांचं निर्दालन करण्याचे आदेश दिले. प्रेषित मुहम्मद यांचं जीवन त्याच शिकवणींची प्रतिमा होती.

प्रेषित मुहम्मद यांच्या जीवनयात्रेतील प्रत्येक टप्प्याद्वारे त्यांनी एकमेव अल्लाहच्या उपासनेस वाहून घेतलं होतं याची प्रचिती येते. प्रत्येक व्यक्ती त्यांचा आदर करीत, त्यांच्यावर प्रेम करीत, कारण त्यांच्या आध्यात्मिक अस्तित्वानं त्यांनी आपला अहंकार सोडून देऊन, कोणत्याही बंधनाला न जुमानता सर्वांशी आपुलकीचा व्यवहार करण्याची शिकवण दिली होती. दैवी आपुलकी मानवांवर अवलंबून नाही. त्यांनी ते मान्य केलं, ते मुक्त होते. ते अल्लाहस समर्पित होते. मानवी भ्रमापासून ते अलिप्त होते.

प्रेषितांनी आपल्या एका अनुयायीस जिव्हाळयाचं गुपित सांगितलं होतं–

मानसांना जे आवडतं त्यापासून दूर व्हा. (त्यांचा हेवा करू नका. माणसं तुमच्यावर प्रेम करतील.) प्रेमाचा मार्ग अवलंबण्याची अल्लाहनं त्यांना प्रेरणा दिली होती.

> ‘‘माझा सेवक स्वतंत्रपणे माझी जवळीक अंगीकारतो आणि मी त्याच्यावर प्रेम करतो आणि जेव्हा मी प्रेम करतो, ज्या कानांनी तो ऐकतो ते मी ऐकतो, तो जे डोळ्यांनी बघतो ते मी बघतो आणि ज्या हातांनी तो धरतो ते माझे हात असतात आणि ज्या पायांनी तो चालतो ते माझेच असतात.’’

अल्लाहशी जवळीक साधणं म्हणजे स्वत:वर नियंत्रण करणं. अल्लाहच्या प्रेमास कशाचाही आधार नसतो. तो माणसांना मुक्त करतो आणि

त्यांना उच्चस्थान प्रदान करतो.

मुहम्मद यांनी ज्या मार्गाचं अनुसरण केलं त्यात विविध टप्पे होते. लोकांना श्रद्धेकडं बोलावणं, बहिष्काराला सामोरं जाणं आणि शेवटी परलोकाकडं प्रयाण करणं. या सर्व टप्प्यांमध्ये अल्लाहची त्यांना साथ होती आणि आपल्या प्रेमाद्वारे त्यांना प्रोत्साहन दिलं होतं त्यानंच लोकांना स्नेहपूर्वक प्रेषितांच्या सहवासात राहण्यास उत्तेजित केलं.

प्रेषित मुहम्मद यांचा धर्म सर्वव्यापी होता. त्यांनी लोकांना आठवण करून दिली त्या सर्वव्यापी नीतीमत्तेशी चिकटून राहण्याची, जे विभागून जात नाहीत, बांधील राहतात किंवा खोट्या अस्मितेच्या सीमा ओलांडतात.हेच खरं स्वातंत्र्य होतं. एका अशा व्यक्तीचं स्वातंत्र्य ज्यास न्याय प्रिय आहे आणि वांशिक भावना, राष्ट्रियत्व किंवा टोळी-कबिले यांत अडकून राहणं नाकारतो. त्याच्या प्रेमळपणानं नीतीमत्तेला तेज आणलं आणि त्याच्या नैतिक संवेदनशीलतेमुळे तो मुक्त झाला. पुरुषांमध्ये चांगुलपणानं शिखर गाठलं आणि त्यांच्यामधलं अलौकिक व्यक्तिमत्त्व शेवटच्या प्रेषितांच्या या अशा दोन स्वरूपाच्या सद्‌गुणांना त्यांच्या अनुयायींनी मान्य केलं.

प्रेषित मुहम्मद अल्लाहचे आवडते होते आणि पुरुषांमधले आदर्श व्यक्ती. त्यांना जवळ केलं, देऊ केलं. त्यांची सेवा केली आणि बदलून टाकलं. प्रेषित मुहम्मद प्रकाशाकडं मार्गदर्शन करणारा प्रकाश होते. त्यांच्या जीवनापासून बोध घेत श्रद्धावंत प्रकाशाच्या स्रोताकडं वळतात आणि त्यांचा प्रकाश, त्यांची आपुलकी, त्यांच्या प्रेमळ स्वभावाचा अनुभव घेतात.

प्रेषित मुहम्मद यांनी मानवी जगाचा निरोप घेतला असेल, पण त्यांनी आम्हाला, त्यास (अल्लाहस) सर्वोत्तम आश्रयस्थान, सर्वांत जवळचं. अल्लाहशिवाय दुसरा कुणी ईश्वर नाही याची साक्ष देणाऱ्यास विसरू नये ही शिकवण दिली आणि ही अधिकारिक स्वातंत्र्याची पायरी आहे. मुहम्मद यांना मान्य करणं म्हणजे त्यांच्या अनुपस्थितीत त्यांच्याशी जवळीक साधणं आणि त्यांच्या उपस्थितीत अल्लाहशी जवळीक साधणं; अल्लाह, प्रेषित, अल्लाहची निर्मिती आणि मानवजातीशी आपुलकी निर्माण करणं होय.

✯

# प्रेषित मुहम्मद
## (त्यांना शांतता लाभो)
# यांच्याबाबत मान्यवरांचं मत

'द हंड्रेड' नावाच्या अमेरिकेत प्रकाशित पुस्तकात लेखकाने शंभर विद्वानांची नावे दिली आहेत, ज्यांनी मानवी समाजावर, त्याच्या मते अभूतपूर्व प्रभाव टाकलाय. लेखक **मायकल हार्ट** याचा जन्म ख्रिस्ती कुटुंबात झालाय. त्यानं विज्ञानशास्त्रात शिक्षण प्राप्त केलं. या आदरणीय व्यक्तित्वाच्या श्रेणीत त्यानं सर्वांत वरची जागा येशू ख्रिस्त अथवा न्यूटन यांना दिली नाही. त्याच्या धारणेनुसार तो एकच मनुष्य ज्यानं सर्वांपेक्षा श्रेष्ठत्व सिद्ध केलंय आणि ती व्यक्ती म्हणजे प्रेषित मुहम्मद (त्यांना शांतता लाभो) हे होत. इतर कोणाही व्यक्तीनं मानवी इतिहासावर अशी छाप सोडलेली नाही. लेखकानं आपल्या 'द हंड्रेड' या पुस्तकात लिहिलंय–

> ''जगातील सर्वांत जास्त प्रभावी व्यक्तित्वांच्या यादीत अग्रस्थानी प्रेषित मुहम्मद यांची मी निवड केली, याचं काही वाचकांना आश्चर्य वाटेल तर इतर काही लोक यावर प्रश्नचिन्ह उभं करतील. पण जागतिक इतिहासात मुहम्मद हे एकमेव मनुष्य होते जे धार्मिक आणि ऐहिक दोन्ही स्तरांवर

> सर्वाधिक यशस्वी ठरले. मुहम्मद यांचा इस्लामवरील प्रभाव येशू ख्रिस्त आणि सेंट पॉल यांच्या एकत्रित प्रभावांच्या तुलनेत अधिक विस्तृत असण्याची शक्यता आहे. पण त्यांचं ऐहिक आणि धार्मिक स्तरांवर अद्वितीय प्रभाव आहे. माझ्या मते मुहम्मद यांना मानवी इतिहासात एकमेव सर्वांत जास्त प्रभावी व्यक्तित्वाचं स्थान मिळवण्याचा त्यांना अधिकार आहे.''

'जेन्युविन इस्लाम', खंड-१, अध्याय-८, आपल्या या पुस्तकात **जॉर्ज बर्नार्ड शॉ** लिहितात–

> ''त्यांच्या आश्चर्यजनक जीवनसामर्थ्यामुळे मी मुहम्मद यांच्या धर्माचा नेहमीच आदर करत आलोय. माझ्या मते इस्लामच एकमेव असा धर्म आहे ज्यामध्ये बदलत जाणाऱ्या परिस्थितींशी एकनिष्ठ होण्याची क्षमता आहे, जी प्रत्येक काळात आकर्शित करू शकते. मी त्यांचा (मुहम्मद यांचा) अभ्यास केलाय.– विस्मयकारक व्यक्तिमत्त्व. त्यांना मानवतेचा रक्षणकर्ताच म्हटलं पाहिजे.''
>
> ''जर कोणत्या धर्माला इंग्लंडच नव्हे तर यूरोपवर पुढील शंभर वर्षे राज्य करण्याची संधी मिळाली तर तो इस्लाम धर्मच असेल.''

फ्रान्सचे इतिहासकार आणि सुप्रसिद्ध कवी **ला मार्टिन** 'हिस्टरी डी ला टर्की', पॅरिस, १८५४, खंड-२, पृ. २७६-२७७ मध्ये लिहितात,

> ''तत्त्वज्ञ, वक्ता, प्रचारक, कायदातज्ज्ञ, योद्धा, कल्पनांवर प्रभुत्व गाजवणारे, तर्कशुद्ध मतप्रणाली पुनरुज्जीवित करणारे, प्रतिमारहित पंथाची बांधणी करणारे, धरतीवरील वीस साम्राज्यांची आणि एका आध्यात्मिक साम्राज्याची स्थापना करणारे - म्हणजेच मुहम्मद (स.). अशा सर्व प्रमाणांद्वारे मानवतेचं श्रेष्ठत्व मोजलं जाऊ शकते, असं

> आपण विचारू शकतो की त्यांच्यापेक्षा महान दुसरा कोणता मनुष्य आहे?''

**एम. के. गांधी**, 'यंग इंजिया', दि. १६ सप्टेंबर १९२४ (१७) मध्ये लिहितात,

> ''कोट्यवधी मानवांच्या ह्रदयांवर आज ज्यांनी निर्विवाद ठसा उमटवलाय, मला त्यांचं जीवनचरित्र जाणून घ्यायचं होतं. मी पहिल्यापेक्षा अधिक प्रमाणात हे मान्य करतो की त्या काळी तलवारीच्या जोरावर इस्लामला स्थान मिळालं नव्हतं. प्रेषितांची कमालीची नम्रता, करारांचं काटेकोर पालन, आपल्या अनुयायींबाबत त्यांची प्रगाढ आपुलकी, त्यांची दृढता, अल्लाहवर आपल्या जीवितकार्यात त्यांची वादातीत श्रद्धा, तलवारीनं नव्हे तर त्यांच्या या सद्‌गुणांनी सर्व अडथळ्यांवर मात केली आणि जे काही समोर होते ते जिंकून घेतलं.''

**ॲनी बेझंट**, सुप्रसिद्ध थियॉसॉफिस्ट, महिलांच्या हक्कांसाठी झटणाऱ्या लेखिका आणि वक्त्या, आपले पुस्तक 'द लाइफ ॲण्ड टिचिंग्ज ऑफ मुहम्मद', मद्रास, १९३२, पृ. ४, मध्ये लिहितात,

> ''अरबच्या महान प्रेषितांचा जे लोक अभ्यास करतात आणि ज्यांना हे माहीत आहे की त्यांनी कशी शिकवण दिली आणि कसं जीवन व्यतीत केलं, त्यांना त्या सामर्थ्यवान प्रेषितांच्या भीतीयुक्त आदराशिवाय दुसरं काहीही वाटणं शक्य नाही, महान प्रेषितांपैकी सर्वोच्च पदस्थ प्रेषित. मी जे काही मांडते त्यातल्या बऱ्याच गोष्टी बऱ्याच लोकांना माहीत असतील. मी जेव्हा जेव्हा त्यांना वाचते, मला नव्यानं कौतुक वाटतं आणि त्या सामर्थ्यवान प्रेषितांबाबत आदराच्या तीव्र भावना उफाळून येतात.''

आपले पुस्तक 'द प्रॉफेट ऑफ द इस्ट'मध्ये **दिवानचंद शर्मा** म्हणतात,

''मुहम्मद दयेचा आत्मा होते. त्यांच्याभोवती असलेल्यांनी त्यांचा प्रभाव कधी विसरला नाही.''

**नेपोलियन बोनापार्ट**, पॅरिस (फ्रान्सचे सम्राट)

''Bonaparte et L' Islam'' (१७), मध्ये लिहितात,

''मोजेस यांनी आपल्या समूहासाठी ईश्वराचं अस्तित्व सिद्ध केलं. येशू ख्रिस्तांनी रोमन साम्राज्यासाठी आणि मुहम्मद यांनी प्राचीन खंडामध्ये येशू ख्रिस्तांच्या सहा शतकांनंतर, ज्या वेळी अरब लोक मूर्तीपूजक होते, मुहम्मद यांनी अब्राहम, इस्माईल, मोजेस आणि येशू ख्रिस्तांच्या ईश्वराची उपासना सुरू केली. मुहम्मद यांनी घोषणा केली की एकमेव अल्लाहशिवाय इतर कुणी ईश्वर नाही, ज्यास कुणी जन्मलं नाही की ज्याचा कुणी पुत्र नाही आणि हे की त्रिमूर्तीची संकल्पना मूर्तीपूजेमुळे आलीय. मला वाटतं तो काळ फार लांब नाही जेव्हा सर्व देशांमधले विद्वान आणि शिक्षित लोकांना एकत्र आणून कुरआनच्या सिद्धान्तांवर आधारित एका समान राज्यप्रणालीची स्थापना करण्यास मला शक्य होईल. कारण हेच सिद्धान्त सत्य आहेत आणि फक्त त्यांच्याद्वारेच मानवांना आनंद प्राप्त होऊ शकतो.''

☆

# संदर्भ ग्रंथ सूची


| | | |
|---|---|---|
| 1. | Seerath - by Ibn Ishaaq | Mohammed bin Ishaaq. |
| 2. | Seerath - by Ibn Khatir | Ibn Khatir. |
| 3. | Seerath-un-Nabi | Maulana Shibli Noumani. |
| 4. | Seerath-un-Nabi | Syed Sulaiman Nadvi. |
| 5. | Muhamma Encyclopedia of Seerah | Afzalur Reman. |
| 6. | The Emergence of Islam | Dr. Mohd Hameedullah. |
| 7. | Mohsin-e-Insaniyath | Nayeem Siddique. |
| 8. | The Life of Muhammad | Haykal. |
| 9. | The Sealed Nectar (Ar-Raheequl-Makhtum) | Safiur-Rehman Al- Mubarakpuri. |
| 10. | Muhammad | Martine Lings. |
| 11. | Prophet Muhammad | Fethullah Gulen. |
| 12. | The Perfect Guide for Mankind | Mohd. Rabey Hasani Nadvi. |

| | | |
|---|---|---|
| 13. | Social Service in Islam | Syed Jalaluddin Umri. |
| 14. | The Messenger | Tariq Ramdan. |
| 15. | Muhammad and the Quran | Rafiq Zakaria. |
| 16. | Reading the Quran | Ziauddin Sardar |
| 17. | Muhammad's Legacy | Ibrahim H.Malabari, Canada. |
| 18. | The Leadership of Muhammad | John Adair. |
| 19. | Prophet Muhammad's Life and Teachings | A.R. Momin. |
| 20. | The Prophetic Misssion | Prof. M Rafat. |
| 21. | Prophet Muhammad 'A Role Model' | Muhammad Yasin Mazhar Siddiqui. |
| 22. | Teachings of Prophet | Proff. Dr. Mohammed Saud Alam Qhasimi. |
| 23. | Pondering Over the Quran | Amin Ahsan Islahi. |
| 24. | The Holy Quran | Abdullah Yusuf Ali. |
| 25. | The Quran | Prof. Dr. Syed Vickar Ahamed, USA. |
| 26. | The Quran | Dr. Nazeer Ahmed. |

This document was created with the Win2PDF "Print to PDF" printer available at

https://www.win2pdf.com

This version of Win2PDF 10 is for evaluation and non-commercial use only.
Visit https://www.win2pdf.com/trial/ for a 30 day trial license.

This page will not be added after purchasing Win2PDF.

https://www.win2pdf.com/purchase/